
मिपा
मिसळपाव
दिपावली अंक २०१२

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठक्र. |
|---|---|---|
| १) संपादकीय | गवि | १ |
| २) हिकमत | चाफा | ६ |
| ३) समाज, धर्म आणि संशोधन | १३_४विक्षिप्त अदिती | ११ |
| ४) सुगंधी दिवाळी : गाथा परफ्यूम्सची | सोत्री | १५ |
| ५) चित्रपट बघणे : एक कला | परा | २० |
| ६) टॉमॅटो शेव | रेवती | २३ |
| ७) बदामी / सयामी हलवा | गणपा | २४ |
| ८) एक अफगाणी, त्याची कहाणी | निनाद मुक्काम पोस्ट जर्मनी | २७ |
| ९) अ अनिमल्स आशिया | प्रदीप | ३१ |
| १०) रंगीत चिरोटे | सानिकास्वप्निल | ३३ |
| ११) आर्युर्वेद : वैद्यकशास्त्र? नवी जीवनपद्धती! | प्रास | ३५ |
| १२) प्रवास दिव्याचा! | चतुरंग | ४० |
| १३) फॉरबिडन | नगरीनिरंजन | ४६ |
| १४) ये साली जिंदगी.... | सुहास झेले | ५२ |
| १५) औरंगजेबाचे वस्त्रहरण अर्थात सुरतेची पहिली लूट! | मालोजीराव | ५६ |
| १६) शिलाहार राजवंश आणि गंडरादित्याचा कोल्हापूर ताम्रपट | वल्ली | ६४ |
| १७) प्रकाशयात्रा | अभिषेक९ | ७६ |
| १८) भारताचा ‘नेपोलियन’ अर्थात हेमू | सारथी | ८३ |
| १९) तुझ्या गळा माझ्या गळा.... | ५०फक्त | ८९ |
| २०) परीक्षा | विश्वजीत दीपक गुडधे | ९६ |
| २१) पनीर पापडी | सूड | ९७ |
| २२) सवाष्ण | अपर्णा | ९९ |
| २३) 'गेले खायचे राहून' | योगप्रभू | १०९ |
| २४) अलख | क्रांती | ११३ |
| २५) रांगोळ्या | डावखुरा | ११४ |
| २६) संपेल ना कधीही, हा खेळ चाकराचा | सर्वसाक्षी | ११६ |
| २७) एक न रुळलेली वाट... | स्नेहांकिता | १२२ |
| २८) अल्बर्ट ब्रोकोली प्रेझेन्ट्स इयान फ्लेमींग.... | चौकटराजा | १३४ |
| २९) आयुख | अपर्णा | १३८ |
| ३०) भेट तुझी माझी स्मरते.... | अरुण मनोहर | १४० |
| ३१) विपश्यना ध्यान शिबिरात भुताटकी? | शशिकांत ओक | १४४ |
| ३४) आमचे दिवाळी व्यवस्थापन !! | मामलेदारचा पंखा | १४८ |
| ३५) बाप.. | रामदास | १५४ |
| ३६) आभाळाचा श्वास | पूजा पवार. | १६० |
| ३७)वन फिश ॲट अ टाईम.. | बहुगुणी | १६१ |
| ३८)ते ६९ दिवस... | मोदक | २०८ |
| ३९)परी टॅक्सीडर्मीरूपे उरला | सुधांशुनूलकर | २२३ |
| ४०)तिथे भेटूच... | सोनल कर्णिक वायकुळ | २२५ |
| ४१)रिकामपणाचे उद्योग | मस्त कलंदर | २२६ |
| ४१)अमेरिकन राजकारणातील वर्णभेद | नंदन | २३३ |
| ४२)सोकाजानानांची चावडी | सोत्री | २३७ |

# संपादकीय

मिसळपावचा हा पहिला दिवाळी अंक हजारो सदस्यांना आणि लाखो वाचकांना देताना मला जो आनंद होतोय तो आनंद अगदी मिसळपाव संपादक मंडळापासून ते अंक डाऊनलोड करणाऱ्या मूषकालाही होत असणार.

पाच वर्षांच्या वाढत्या वयात आजपर्यंत मिपाने कधी दिवाळी अंक काढला नाही याचं कारण शोधण्यापेक्षा, आता का काढला हे बघणं जास्त महत्वाचं आहे. मिपाकरांना लेखनातून व्यक्त व्हायला मनापासून आवडतं, आणि रोजच्या लिखाणातून ते मनसोक्त व्यक्त होतच असतात (मग.. घाबरतात की काय?!). तरीही वेगळा अंक काढण्याचा खटाटोप कशासाठी?

तर, बऱ्याच काळाच्या निरीक्षणाने असं दिसलं होतं की एखादा "प्रोजेक्ट" हाती घेतला तर मिपाकर नेहमीपेक्षा दुप्पट उत्साहाने त्यात भाग घेतात. आधी घोषित करुन घेतल्या गेलेल्या कानसेन स्पर्धेत सर्वांनी एकत्र येऊन जी धमाल केली ती पाहता हे लक्षात येईलच. हा सहभाग लेखक म्हणूनच असेल असं नव्हे, किंवा लेखक म्हणूनच असावा असंही नव्हे. निव्वळ वाचक किंवा प्रतिसादकर्ता म्हणूनसुद्धा मिसळपाव हा एक खूप मोठा परिवार एकत्र येतो असं दिसतं.

तस्मात्, हा अंक काढण्यामधे सर्वांना एकत्र आणणं हाच विचार आहे. आणि त्या निमित्ताने एक संकेतस्थळ म्हणून मिसळपाव परिवार हा नव्या कल्पना स्वीकारणं आणि काळानुसार कल्पना बदलणं यासाठी नेहमीच तयार आहे हे ही पुन्हा अधोरेखित होतं.

दिवाळी अंक काढताना ज्या चर्चा घडल्या त्यामधे अंक पीडीएफ स्वरुपात बनवावा, ऑनलाईन स्वरुपात बनवावा की दोन्ही, यावर चर्चेने सुरुवात झाली. शेवटी "दोन्ही प्रकारे बनवावा" हा पर्याय जिंकला, कारण हे सर्वच चर्चाकर्ते (संपादक असले तरी) आधी पक्के मिपाकर आहेत. "काथ्याकूट" हा अस्सल मिपाकराचा धर्म उत्तमरित्या पार पाडल्यानंतर हे एकमत झालं.

त्याचं असं आहे, की आपण सगळे प्रतिसादाची वाट पाहतो. इथे, मिपावर लिखाण करुनच नव्हे.. रोजच्या जगण्यातही आपण समोरच्याच्या प्रतिसादाची वाट पाहातच असतो. आपण जिवंत आहोत याच्या खात्रीसाठी समोरचा जिवंत आहे याची खात्री आपल्याला आधी हवी असते. ...रोजच्या जगण्यात तो प्रतिसाद क्वचितच मिळतो.

पण इथे मिपावर त्याची कमतरता नाही. अक्षरशः कामधाम सोडून घरा-हपीसातून लोक प्रतिक्रिया देतात. आपल्या लेखनाला येणाऱ्या प्रत्येक नव्या प्रतिसादासोबत मूळ लेखकाची कॉलर आणखी टाईट होते. मिसळपाव वेबसाईटच्या इतिहासात सर्वकाळ आपल्या मुखपृष्ठापेक्षाही "नवे लेखन" या पानाला प्रचंड जास्त संख्येने हिट्स असतात ते यामुळेच.

मग अशावेळी दिवाळी अंक लिहिणाऱ्या लेखकांना जर प्रतिक्रिया मिळाल्या नाहीत तर मिसळपावचा अंतरात्माच हरवेल.
...म्हणून मग ऑनलाईन अंक हा प्रतिसादकांसाठी म्हणून आणि पीडीएफ स्वरुपातला अंक हा डाऊनलोड करुन आंतरजालाशी संपर्क नसतानाही निवांत वाचण्याची केवळ एक सोय म्हणून, अशी रचना केली आहे.

या अंकाची कल्पना नीलकांतने मांडली त्या क्षणापासूनच संपादक मंडळात उत्साह संचारला. रामदासकाका अंकाचे मुख्य सल्लागार असल्याने अंकाच्या भविष्याची काळजी नाहीशी झाली. वेळ कमी उरला होता म्हणून मग लेखन जमवण्याची जोरदार तयारी सुरु झाली. या अंकाला तेव्हापासून आजपर्यंत इतक्या सुहृदांचा हातभार लागला आहे की त्यांच्या नावाची यादी बनवणं हा या अंकाच्या निर्मितीतला सर्वात कठीण भाग असावा.

नीलकांत, प्रशांत आणि संपादक मंडळ या सर्वांनी अंकाची कल्पना मांडून, उचलून धरुन तिला प्रत्यक्षात आणण्याचं काम केलं. यात प्रत्येक संपादकाने आपले रोजचे व्याप सांभाळून जास्तीतजास्त लेखकांना लिहितं केलं. अंकाचा काही

भाग सर्वानुमते निवडलेल्या लेखकांकडून निमंत्रित लेखन म्हणून मागवला गेला. बाकीचा भाग मिपाकरांनी नीलकांतच्या आवाहनाला दिलेल्या प्रतिसादाने भरेल की नाही असा विचार कितीही दाबला तरी मनात येतच होता.

पण या आवाहनाचा प्रतिसाद पाहता आमची झोळी दुबळी पडली हे आता आनंदाने मान्य करतो. एक जाडजूड ग्रंथ बनेल इतकं साहित्य आमच्याकडे आलं. अक्षरशः पाऊस पडला. अंकाची एकूण जबाबदारी आणि त्यातही साहित्य निवडीची जबाबदारी नीलकांतने माझ्याकडे दिलेली असल्याने मी जरा तरंगत होतो.. पण इनकमिंग साहित्याचा हा गिरसप्पा धबधबा पाहून मात्र सुरुवातीला माझी साफ तंतरली.. जसंजसं वाचत गेलो तसंतसं मात्र इतका आनंद मिळत गेला की ही जबाबदारी न वाटता अभूतपूर्व संधी वाटायला लागली. आपलं नशीब चांगलं असं वाटायला लागलं.

मिसळपाव ही "क्लासेस"ची स्टडीरूम नव्हे. ते "मासेस"चं अंगण आहे. इथे लिहीताना थेट "माणसं" व्यक्त होताहेत, "लेखक" नव्हे. त्यामुळे मिसळपावच्या अंकाचा लौकिक "सर्वांचा" अंक असा राहिला पाहिजे. उच्चभ्रूंचा, सॉरी, "हुच्चभ्रूंचा" अंक असा नव्हे..त्यात साहित्यमूल्य ज्यांना शोधायचंय त्यांनी शोधावं..पण प्रत्यक्षात हा जनांचा प्रवाह आहे..त्यात आंबटगोडतुरट सर्व आहे..आणि त्यामुळेच इथे इतका आनंद आहे.

या भावनेतून आणखी एक ठरवलं, की एथ्निक, बोजड, अतिअभिजात कलाकृती असलेलं, क्लासिक पेंटिंग असावं तशा स्वरुपाचं, निसर्गसौंदर्य दाखवणारं, यापैकी रुळलेलंच एखादं मुखपृष्ठ किंवा डिझाईन करण्याऐवजी रंगीबेरंगी आणि लोकांच्या रोजच्या आयुष्यातली दिवाळीची प्रतीकं दाखवणारं डिझाईन कोलाज करुन या अंकात वापरलं.

मिसळीचा स्थायीभाव मिश्रतेतच असतो. वेगळ्या वाटीत फरसाण, वेगळ्या वाटीत उसळ, वेगळ्या वाटीत कांदा.. आणि तुमचं तुम्ही मिक्स करुन खा.. ही खरी मिसळच नव्हे. त्यामुळे कवितेचा वेगळा विभाग, रेसिप्यांचा वेगळा सेक्शन.. अशी नेहमीची मांडणी टाळली आणि खरोखर सर्व प्रकारचं लेखन मिसळीच्याच रुपात समोर यावं म्हणून कोणतेही विभाग करण्याचं टाळून सर्व लेख अधेमधे मिसळून त्यांचा क्रम लावला. मिसळ "लावली" म्हणा ना.. हे दोन्हीही पहिल्या प्रयत्नातले प्रयोगच..

या विचाराने एक झालं की जरी मला साहित्यावर कात्री वापरावी लागली,प्रत्येक शब्द प्रकाशित करता आला नाही, तरीही स्वतःचा व्यक्तिगत ढुढ्ढाचार्यपणा करुन फार अभिरुची वगैरे वगैरेच्या फाजील नशेत लोकांचं मनापासून आलेलं लिखाण घाऊकपणे नाकारत राहणं हेही घडलं नाही.

त्यामुळे माझा स्वतःचा सुरुवातीचा "चेकर"चा अभिनिवेष गळून गेला आणि मी जास्तीतजास्त साहित्याला अंकात स्थान कसं देता येईल याचा मनापासून प्रयत्न केला. जे साहित्य घेता आलं नाही त्याबद्दलही मला हळहळच जास्त आहे. पण निखालस निकृष्ट अशा कारणाने कोणतंही साहित्य नाकारावं लागण्याची वेळ लेखकमित्रांनी माझ्यावर आणली नाही. जे साहित्य नाकारलं त्यामागे मुख्यतः सर्वानुमते स्वीकारलेली काही बंधनं होती. संपादक या पदावर व्यक्तिगत मतांपेक्षाही सर्वसामान्य संकेतांना धरुन राहणं उचित होतं. त्यानुसार उदाहरणार्थ, मांसाहारी पाककृती.. मृत्यू किंवा रोग यांसारख्या विषयांवरचं दुःखांत लेखन.. सणाच्या उत्सवी वातावरणात समाजमान्यतेनुसार अभद्र किंवा बीभत्स ठरतील असे विषय यांना नाईलाजाने कात्री लावली गेली. त्यातलं बरंच लिखाण एरवीच्या संदर्भात उत्कृष्ट दर्जाचं असूनही..

आभार हा तर एक उपचार झाला. मिसळपावचा पिंड हा कृत्रिम "पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ.." छापाच्या औपचारिकतेपासून दूर आहे. तरीही केवळ मिसळपावशी कितीजण आणि कसे स्नेहाच्या धाग्याने जोडले गेले आहेत हे जाणवण्यासाठी अनेकजणांचा इथे आवर्जून उल्लेख केला पाहिजे. चाळीत गणपती बसवायचा आहे असं ठरलं की सारे घरनंबर आपल्या घरचं कार्य असल्यासारखे झटून कामाला लागतात तसं इथेही झालं.
धडाधड येऊन पडलेल्या लेखांना एकत्र आणणं हे काम वाटतं तितकं सोपं नाही. त्यांना अत्यंत सूत्रबद्ध पद्धतीने एकत्र आणण्याचं काम किसन शिंदे यांनी केलं.. नाही नाही..आपल्या किस्नाने केलं.

त्यानंतर समोर उभा ठाकलेला एवरेस्ट पर्वत होता तो मुद्रितशोधनाचा. इथे सुधांशुनूलकर यांनी उत्स्फूर्तपणे, अगदी न मागता मदतीचा हात पुढे केला. या हाताचं बोट धरता धरता मग मी तो हात ताब्यातच घेऊन टाकला आणि त्यांनीही जवळजवळ एकहाती हा पर्वत निस्तरला. सुधांशुनूलकर हे व्यावसायिक मुद्रितशोधक आहेत आणि त्यामुळेच मिपाला आपोआप उत्कृष्ट दर्जाच्या प्रूफ करेक्शनचा लाभ झाला. सुधांशुनूलकरांना अधिकाधिक साहित्य देत असताना कधीतरी मलाच मनाची लाज वाटली आणि त्यांचा भार कमी करण्यासाठी मी प्रासलाही यामधे ओढलं. "प्रास द जीनी" आपलं आयुर्वेदिक संशोधन बाजूला ठेवून मुद्रितशोधनाला बसला आणि त्यानेही रातोरात काम पूर्ण करुन दिलं.

काही लेखन हे पीडीएफ स्वरुपात मिळालं होतं. त्याचं रुपांतर युनिकोडमधे करणं, आणि तेही चुका न होऊ देता, हे काम करण्याचा चांगला मार्ग म्हणजे ते पुन्हा एकदा टाईप करणं. हे काम निश्चित कंटाळवाणं आहे. पण आवश्यकही. अशा काही लेखांबाबत लीलाधर आणि अन्य मेंबर्सना विनंती करताच हेही काम त्यांनी तडीला नेलं.

अभिजीत, मी नाही, असं म्हणत असला तरी त्याने डिझाईनची पूर्ण जबाबदारी घेतली. स्पा आणि सौरभ यांनी त्याला तज्ञ सल्ले देऊन डिझाईनसाठी खूप कल्पना सुचवल्या.

ज्यांनी अंकासाठी लेखन दिलं ते या अंकाचे सर्वात मोठे आधारस्तंभ. मुळात लेखन येतानाच धबधब्याऐवजी करंगळीधार आली असती, तर कसलं मुद्रितशोधन आणि कसलं सिलेक्शन..

ज्या हातांनी या अंकाचा भार उचलला पण त्यांची नावं माझ्यापर्यंतही पोचली नाहीत त्या सर्वांचंही ऋण मी इथे नोंदवतो. कोणताही ऋणनिर्देश राहिला असेल तर मी त्याबद्दल सपशेल माफी मागतो आहे. असा उल्लेख राहण्यामागे बाकी काहीही नसून माझा अंगभूत गबाळेपणा आणि विस्कळीतपणा हेच कारण आहे.

हा दिवाळी अंक बनवताना आम्ही अनेकजण रात्री जागत होतो. मध्यरात्री "व्यनि चेकवत" होतो. आलेल्या लेखनातला भरपूर मजकूर इकडून तिकडे "चोप्य पस्ते" करत होतो.. फार थोडा मजकूर "फाट्यावर मारत" होतो. हे सर्व करताना मी एका जाणिवेने कमालीचा भारावून गेलो. ती जाणीव अशी, की जे सर्व मिपाकर लोक्स मिळून हे काम करत होते ते सर्व वेगवेगळ्या गावांत, इतकंच नव्हे तर वेगवेगळ्या देशांत बसले होते.. कोणी अमेरिकेतून जर्मनीतल्या मिपाकराशी फॉलोअप करत होता, कोणी ऑस्ट्रेलियातून ठाण्याशी संपर्क ठेवून होते , कोणी नायजेरियातून रात्रीअपरात्री जागून महाडमधल्या लेखकमित्राला लिहीतं करण्यासाठी संवाद करत होते तर कोणी सोलापुरात बसून अमेरिकेतल्या वर्किंग टाईमात डिझाईन बनवत होता.. या सर्व कामात कोणीही एका छदामाची प्राप्ती होणार नसूनही समरसून भाग घेतला.. इतकंच नव्हे तर आपला पैसा कमावून देणारा रोजगारही काही क्षणच का होईना पण बाजूला ठेवून त्याच्याही वरची जागा या मिपा दिवाळी अंकाला दिली. यातल्या कित्येक लोकांची पूर्ण नावंही मला माहीत नाहीत. अगदी या घडीलाही माहीत नाहीत. अविश्वासाने भरलेल्या या जमान्यात चार देशांतल्या चार अनाम लोकांवर मी भिस्त ठेवून होतो, आणि एकदाही अशी सूक्ष्म शंकाही आली नाही की हे काम पूर्ण होणार नाही.. हा एक अद्भुतरम्य प्रकार आहे बुवा.


नीलकांतने मला अंकाची जबाबदारी घ्यायला सांगितलं. आणि पुढचं सगळं तर इतरांनीच केलं..अंक तर बनलासुद्धा..

पण मग या सर्वात मी नेमकं काय केलं..?

समुद्रात मोती बनताना शिंपल्याच्या आत वाळूचा एक कण शिरतो.  तो शिंपल्यातल्या ऑयस्टरला बोचत राहतो. मग एरवी शांत असलेला ऑयस्टर त्या वाळूच्या कणाभोवती थरावर थर देऊन सुंदर मोती बनवतो.

मोती किती सुंदर बनला आहे ते तुम्ही ठरवा. पण तो मी बनवला नाही. मी त्यातला वाळूचा बोचरा कण फक्त.

- गवि



# हिकमत

**चाफा**

"नमस्कार, राजवाड्यांचं घर हेच ना? "

"हो, हेच. पण तुम्ही कोण? एक मिनिटं, सांगू नका, मी अंदाज लावते."

"त्याच्याऐवजी दारावर पाटी लावली असतीत तर बरं झालं असतं."

"पाटी लावली असती, तर तुम्ही मला विचारलं असतंत का?"

"हे पण खरंय.."

"बरं मी गेस करते हं, तुम्ही इतके सुटाबुटात आलायत, म्हणजे तुम्ही सेल्समन असणार. बरोबर?"



"नाही.."

"मग, इन्शुरन्स एजंट?"

"नाही.."

"नक्कीच जनगणनावाले आहात तुम्ही"

"तुम्ही वेधशाळेत नोकरीला होतात का हो?"

"तुम्ही कसं ओळखलंत?"

"प्रत्येक वेळी नेमका चुकीचा अंदाज लावताय, त्यावरून."

"अगो बाई, हा पण अंदाज चुकला का?"

"अर्थात"

"आता शेवटचा, तुम्ही पोलिओ डोसवाले असणार, पण आमच्याकडे कुणीच लहान मूल नाही. हो, म्हणजे एक मुलगी आहे आम्हाला, पण ती कॉलेजात जाते."

"त्याच मुलीबद्दल सांगायला आलोय मी."

"अय्या, तुम्ही कोण?"

"हितचिंतक"

"इश्श, हे कसलं आडनाव... हितचिंतक?"

"ते आडनाव नाही हो, मी तुमचा हितचिंतक आहे, वेल विशर. जरा मुलीकडे लक्ष द्या."

"म्हणजे? ती नापास झाली की काय? परीक्षेच्या वेळी जरा आजारी पडली हो ती, नाहीतर एकदम अभ्यासू आणि सरळ मुलगी आहे हो, प्रिन्सिपल सर."

"चुकीचे अंदाज आहेत तुमचे."

"नक्की कुठले? "

"दोन्ही, माझ्याबद्दलचा आणि तुमच्या मुलीबद्दलचा.."

"काय झालं?"

"मी प्रिन्सिपल नाही आणि तुमची मुलगी सरळ नाही."

"काय सांगताय?"

"सत्य, तुमची मुलगी हल्ली एका मुलाबरोबर फिरत असते, दिवसाढवळ्या...."

"संस्कार आहेत हो,"

"हे असले संस्कार ?"

"तसं नाही, कुठे जायचं असेल तर दिवसाढवळ्याच, संध्याकाळी सातच्या आत घरात.."

"आता कसं समजावू मी तुम्हाला? हो, तुमच्या मुलीचं चोरून प्रेमप्रकरण सुरू आहे."

"असं? बोलली नाही कधी."

"घ्या, आता तुम्हाला बोलली असती तर ते चोरून झालं असतं का?"

"तेही खरंच. पण तुम्हाला कसं माहीत?"

"मी पाहिलंय ना तिला, बॉयफ्रेंडसोबत"

"तुम्हाला बॉयफ्रेंड आहे?"

"भलते अंदाज नका लावू, तुमची मुलगी तिच्या बॉयफ्रेंडसोबत असताना मी पाहिलंय."

"ओह, कसा आहे हो मुलगा?"

"तसा बरा आहे. शिकलेला आहे, अगदी भरपूर."

"इंजिनियर असणार."

"नाही, आता आणखी चुकीचे अंदाज वर्तवू नका. दहावीची परीक्षा सात वेळा दिलेय त्यानं, म्हणजे एकूण सत्तरवी शिकलाय म्हणा की."

"सत्तरवी? "

"हो, दहा गुणिले सात, सत्तरवी."

"अरे देवा, मग काही कमावतो वगैरे का?"

"आता तुमच्या मुलीचे सगळे हट्ट पुरवतो म्हणजे कमावत असणारच, तसाही पत्यात हात चालतो पोराचा."

"तो जुगार खेळतो?"

"नाही हो, टाईमपास म्हणून पन्नास पैसे पॉइंटनं रमी खेळतो, सहज आपला...."

"दिसायला बरा आहे का?"

"एकदम राजबिंडा, डोळे तर अतिसुंदर.."

"काय सांगताय काय?"

"मग, सारखा एक डोळा दुसऱ्याकडे पाहत असतो."

"मुलगा चकणा आहे?"

"थोडासा तिरळा म्हणायचा, पण चेहरा.. आहा, एकदम हसमुख."

"हसमुख माणसंच मला आवडतात."

"हा तर एकदम हसमुख, चोवीस तास हसत असतो,"

"बापरे, वेडा आहे की काय?"

"वेडा नाही हो, दात पुढे आहेत त्याचे, म्हणून कायम हसतानाच दिसतो."

"शी, मुलाचे दात पुढे आहेत."

"थोडेसेच म्हणजे अगदी मोजून दीड इंच असतील, तसा तो आंबटशौकीनही आहे."

"अरे देवा, आंबटशौकीन?"

"हो ना, घरचा लोणच्याचा धंदा आहे आणि मुलगा तो आवडीनं करतो."

"असं होय? मग चांगला बिझनेसमन आहे की, मेहनती दिसतोय.."

"हो ना, रोज घरोघरी फिरून लोणच्याची पाकिटं संपवायची म्हणजे मेहनत तर घ्यावीच लागणार ना!"

"आत्ताच तर म्हणालात ना लोणच्याचा धंदा आहे ...."

"म्हणजे त्याची आई लोणचं घालते आणि हा विकतो."

"मग त्याचे वडील काय करतात ?"

"त्यांचा शोध चालू आहे अजून, सापडले की कळेल."

"रंगानं तरी बरा आहे का?"

"थोडासा काळा आहे, एवढं सोडलं तर छानच.."

"काळाही आहे?"

"थोडासाच, म्हणजे बघा, फक्त रात्रीच दिसत नाही, दिवसा अगदी स्पष्ट दिसतो तो."

"देवा रे, आणि काही व्यसनं वगैरे?"

"आठवड्यातून चार-पाच वेळा बारच्या समोर दिसतो...."

"बाप रे, म्हणजे दारुड्या आहे की काय?"

"आता बारच्या बाजूलाच त्यानं घर बांधलंय तर मोकळ्या वेळात काय करणार ना!"

"स्वभावानं तरी बरा आहे काय?"

"आता स्वभाव, म्हणजे.... कुणी एक शब्द जरी वाकडा बोललं, तर लगेच मारतो बघा."

"म्हणजे कसा? नुसताच मारतो, की जीव घेतो..?"

"यातलं काहीच नाही, दडी मारतो तो."

"म्हणजे भितराही आहे....."

"आता घाबरेल नाहीतर काय करेल? त्याच्या किडमिडीत शरीराला चुकूनही कुणाचा धक्का लागला तर दोन-चार हाडं बाहेर यायची,"

"मुलगा हडकुळा आहे? असा हाडांचा सापळा?"

"नाही नाही, हाडांवर अर्धा सेंटीमीटर मांस असेल ना त्याच्या."

"म्हणजे मुलगा तिरळा, दातांच्या फळ्या असलेला, भितरा, किडमिडीत आणि......"

"अहो, यादी कसली करताय? तुमची मुलगी पळायची तयारी करत असेल एव्हाना."

"आहेच माझी पोर गुणाची, शाळेत असतानाही लवकर उठून प्रॅक्टिस करायची, शंभर मीटरची सात मेडल्स मिळवलीयेत तिनं."

"पण आता ती आणखी लांब पळणार आहे."

"चारशे मीटर का?"

"तुम्हाला कळत कसं नाही? ती त्या मुलासोबत पळून जाणार आहे."

"काय? थांबा, येऊ दे घरी. बघतेच तिच्याकडे."

"नुसत्या बघता काय? लग्न लावून द्या तिचं...."

"त्या तसल्या तिरळ्या, दाताड्या सापळ्याशी? पोरगी बिनलग्नाची राहिली तरी चालेल, पण मी एखाद्या चांगल्या मुलाशी तिचं लग्न लावून देईन."

"मग तो सावळा असेल तर?"

"चालेल."

"त्याला चष्मा असेल तर?"

"तिरळ्यापेक्षा बरा, तरी चालेल.."

"तो खानदानी श्रीमंत नसेल तर?"

"तरी चालेल."

"मग सासूबाई, मला आशीर्वाद द्या."

"तुमच्याशी लग्न करून देऊ? त्यापेक्षा पोरीला विहिरीत ढकलून देईन."

"मी दिसतो तसा म्हातारा नाहीये, तरुण आहे मी (मेकअप काढत) हा पाहा."

"बरा दिसतोस की, पण माझ्या मुलीला तू पसंत पडायला हवास रे.."

"तिला मी आधीच पसंत आहे, तुमचीच परवानगी हवी होती."

"म्हणजे माझ्या मुलीचा बॉयफ्रेंड तूच?"

"हो, मीच."

"मग मघापासून ते काय चाललं होतं?"

"तुमची मुलगीच म्हणाली, काही झालं तरी माझी आई आपल्या लग्नाला परवानगी देणार नाही म्हणून, हे सगळं नाटक केलं."

# समाज, धर्म आणि संशोधन
## ३_१४ विक्षिप्त अदिती

मानवी प्रगतीचा इतिहास बघताना, इतिहासलेखन सुरू झाल्यानंतर युरोपातला सर्वात भयंकर काळ असं ज्याला म्हणता येईल ते मध्ययुग, अंधारयुग पाचवं ते पंधरावं शतक या हजार वर्षांचं होतं. याला अंधारयुग समजतात, कारण या काळात प्रचंड प्रमाणात युद्ध झाली, अनेकविध कारणांमुळे मोठ्या प्रमाणात लोक मेले. शांतता, सुबत्ता यांचा हा काळ नव्हता. शांतता नव्हती म्हणून कला, विज्ञान, (सामाजिक) शास्त्र, अशा अनेक बाजूंनी युरोप मागे पडला. तिथल्या समाजावर ख्रिश्चन धर्माचा अतिशय गाढ पगडा बसला आणि त्यातून जगाचं दीर्घकालीन नुकसानच झालं. त्या आधी असणाऱ्या प्राचीन ग्रीको-रोमन संस्कृतींमधे कला, संगीत, विज्ञान, शास्त्र यांचा अभ्यास होत होता. असंही म्हणतात की चौथ्या शतकात अलेक्झांड्रियाच्या हायपेशियाला पृथ्वी सूर्याभोवती फिरते हे लक्षात आलं होतं. ख्रिश्चन धर्म, त्यातल्या तेव्हाच्या (आता वेडगळ/अडगळ ठरलेल्या) समजुती आणि समाजावर ख्रिश्चॅनिटीचा असणारा पगडा विद्वानांना वेळेत न उमगणे, यातून तत्कालीन युरोपीय समाजाची अधोगती झाली. ही अधोगती एवढी वाईट समजली जाते की युरोपीय भाषा आणि त्यांच्यातून आपल्याकडेही कालबाह्य मूल्यांना 'मध्ययुगीन' म्हणण्याची प्रथा आलेली आहे. चौदाव्या शतकाच्या आसपास युरोपात सांस्कृतिक पुनरुत्थान सुरू झालं, ज्याला आता renaissance असं नाव पडलेलं आहे. या रेनेसाँनंतर कला, विज्ञान, सामाजिक शास्त्र या सर्व शाखांमध्ये युरोपची प्रगती पुन्हा सुरू झाली. मध्ययुग अथवा रेनेसाँचा धांडोळा घेणं हा या लेखाचा आवाका नाही. समाजाच्या धारणा, धर्म, संशोधन आणि संशोधनातून होणारी मानवी प्रगती यांचा आपसातला संबंध मोजक्या उदाहरणांवरून थोडक्यात पाहणं हा या लेखाचा उद्देश आहे.

पृथ्वी सूर्याभोवती फिरते याचा हायपेशियाला चौथ्या शतकात अंदाज आला होता तर निकोलस कोपर्निकस १५व्या शतकात येईपर्यंत काय झालं? महत्त्वाचं असं काहीही नाही. विश्व पृथ्वीकेंद्री आहे हे दाखवण्यासाठी विश्वरचनाशास्त्र प्रचंड किचकट बनवलं गेलं. पृथ्वीभोवती अन्य ग्रह, सूर्य आणि इतर तारे फिरतात, असा त्या काळात समज होता. तत्कालिन युरोपीय समाज बहुतांशी ख्रिश्चन होता, आणि ख्रिश्चॅनिटीमधे विश्वाची कल्पना पृथ्वीकेंद्री असण्याची होती. पण या सिद्धान्तामधे ग्रह वक्री* का होतात याचं स्पष्टीकरण अतिशय क्लिष्ट होतं. एका मुख्य कक्षेत ग्रह पृथ्वीभोवती फिरतात. ग्रह वक्री का होतात यासाठी epicycles आणली गेली. पेनाची स्प्रिंग ताणून वर्तुळाकार बनवली तर कसा आकार दिसेल, ग्रह तशा प्रकारच्या कक्षेत फिरतात असा सिद्धात मांडून ग्रहांच्या वक्री गतीचं स्पष्टीकरण देण्यात आलं. मंगळ आणि शनी या दोन ग्रहांची निरीक्षणं करून कोपर्निकसला पृथ्वी सूर्याभोवती फिरते याचा अंदाज आला. एवढंच नाही तर पृथ्वीची सूर्याभोवती असणारी कक्षा वर्तुळाकार नाही, दीर्घवर्तुळाकार आहे, असा त्याचा निष्कर्ष होता. अतिशय क्लिष्ट स्पष्टीकरण देण्यापेक्षा 'सर्व ग्रह सूर्याभोवती फिरतात' असं मानल्यास या वक्री गतीचं स्पष्टीकरण देणं अगदीच सोपं होतं. (पुढे न्यूटनच्या गतीच्या पहिल्या नियमानंतर epicycles पूर्णतः मोडीत निघाली.) कोपर्निकसच्या निधनानंतर त्याच्या या सिद्धान्तावर धार्मिक तत्त्ववेत्त्यांकडून बरीच टीका झाली. अगदी कोपर्निकसला त्याच्या पूर्वसुरींनी काय म्हटलेलं आहे हे समजलं नाही, ते त्याच्या विचारात शास्त्रीय पद्धत नाही, इथपर्यंत.

पुढे खरा त्रास मात्र गॅलिलेओने भोगला. कोपर्निकसचा विश्वरचनेचा** सिद्धान्त आणि त्याबद्दल असणारे

वाद इटालियन शास्त्रज्ञ गॅलिलेओपर्यंत पोहोचले होते. गॅलिलेओने कोपर्निकसच्या सिद्धान्ताला पाठिंबा दिला; आणि चर्च आणि धर्माच्या विरोधात ही कृती असल्याचं समजलं गेलं. पृथ्वी हलत नाही असं बायबलमधील संदर्भांमधे लिहिलेलं आहे आणि गॅलिलेओने ते नाकारलं होतं. इथे सरळसरळ धर्माने विज्ञानात (किंवा विज्ञानाने धर्मात!) ढवळाढवळ केलेली होती. या धर्मबुडवेपणाबद्दल गॅलिलेओला तुरूंगात डांबलं गेलं. एवढंच नाही, तर गॅलिलेओच्या पूर्वप्रकाशित लिखाणावर बंदी आणली गेली आणि त्याला पुढे लिहायलाही बंदी केली गेली. पुढे रोमन कॅथलिक चर्चमधल्या प्रभावी व्यक्तींशी मैत्रिपूर्ण संबंध राखण्यामुळे त्याच्यावरची बरीच बंधनं शिथिल झाली. त्याने पुढे काही वर्ष आधुनिक भौतिकशास्त्राचा पाया रचणारं कामही केलं. पण मरणानंतरही गॅलिलेओच्या नशिबात उपेक्षाच होती. त्याच्या वाडवडलांच्या आजूबाजूच्या जागेत त्याचं दफन करू देण्यास कॅथलिक चर्चने नकार दिला. धर्मातल्या अशास्त्रीय समजुतींपायी, धर्म बुडवला म्हणून गॅलिलेओला 'मरणान्तानि वैराणि'चा फायदा मिळाला नाही.

कोपर्निकसच्या आणि गॅलिलेओच्या या इतिहासाचं आजही महत्त्व आहे का?

धर्माचा आणि पूर्वापार चालत आलेल्या समजुतींचा पगडा एवढा जबरदस्त होता की आईनस्टाईनसारखा थोर शास्त्रज्ञही त्याला बळी पडला. गणिताच्या माध्यमातून विश्वरचनेचं कोडं सोडवताना तो त्याचा भौतिक अर्थही लावत होता. त्या समीकरणांमधून त्याला स्पष्ट दिसत होतं की विश्व प्रसरण पावत आहे. पूर्वीच्या समजुतींचा पगडा एवढा जबरदस्त, की त्याने विश्वाचं प्रसरण गणितातून काढून टाकण्यासाठी एक स्थिरांक मध्ये घुसवला. थोडक्यात, समीकरणांमधलं विश्वाचं प्रसरण त्याने काढून टाकलं.*** दु:खात सुखाची गोष्ट अशी की या समजुतीपायी विज्ञानाची प्रगती फार वर्ष अडकली नाही. विश्वाचं प्रसरण होतंय हे एडविन हबलने निरीक्षणांमधून काही वर्षांतच शोधून काढलं. त्यातून पुढे विश्वनिर्मितीचा प्रसिद्ध सिद्धान्त 'बिग बँग' अथवा 'महास्फोट' याचा पाया रचला गेला.

प्राचीन काळात काही चिनी राजज्योतिषांना (फलज्योतिषी नव्हेत, ज्योतिषी) जीव गमवावा लागला होता, त्याची अलीकडेच आठवण झाली. कारण, तर त्यांना ग्रहण वर्तवता आलं नाही. ग्रहणाचा पृथ्वीवर, मनुष्यावर काय परिणाम होतो, याची तेव्हा कल्पनाही नव्हती. तरीही त्यांना जीव गमवावा लागला. लाक्वियामधला भूकंप वर्तवू शकले नाहीत किंवा या भागात भूकंप होऊ शकतो याचा अंदाज देऊ शकले नाहीत म्हणून इटालियन न्यायालयाने काही संशोधकांना अगदी गेल्याच महिन्यात दोषी ठरवलं आणि सहा वर्षांसाठी गजाआड केलं. भूकंपाचा अगदी अॅक्युरेट (मराठी?) अंदाज कोणीही वर्तवू शकत नाही. हे सांगताना सुलभीकरण करून सांगितलं जात असलं तरीही सामान्यांपर्यंत काय संदेश गेला आहे? शास्त्रज्ञ भविष्यातल्या दु:खद घटनांचा अचूक अंदाज घेऊ शकले नाहीत तर त्यांच्यावर दावा गुदरता येतो. संशोधनाच्या भविष्याच्या, विज्ञानाच्या आणि त्यामुळे प्रगतीच्या दृष्टीने ही घटना खचितच आनंददायक नाही[१].

एका मराठी दिवाळी अंकाच्या लेखासाठी हा विषय अगत्याचा का वाटला?

अलीकडेच फेसबुकाच्या एका मराठी ग्रूपमधे चर्चा करताना प्राचीन भारतीय शिल्प, भारतीय संस्कृती, कला आणि नग्नता असा विषय निघाला. सहाजिकच त्या चर्चेत लज्जागौरीचा उल्लेख झाला. घटस्थापनेला या मातृकेचा उल्लेख "या देवी सर्वभूतेषु मातृरूपेण संस्थिता" अशा प्रकारे झाला. धागाकर्त्याच्या अपेक्षेच्या विपरीत हे मातृरूप नसून स्त्रीदेहाची विटंबना असण्याचे आक्षेप आले. मातृरूप एका विशिष्ट रूपातच पाहावे

असा आग्रह धरणे अनावश्यक आहे. एकेकाळी आपले पूर्वज या रूपात मातृकेची पूजा करत, याबद्दल रा.चिं.ढेरे यांनी संशोधन केलेलं आहे. त्या संशोधनाकडे, संदर्भांकडे दुर्लक्ष करून स्वतःच्याच, मर्यादित मोजपट्ट्या लावून ते शिल्प हिडीसच आहे म्हणून भावना दुखावून घेणं प्रकर्षाने दिसलं. विशेषतः दुर्दैवाची गोष्ट म्हणजे त्या चर्चेत ढेऱ्यांच्या संशोधनाची संभावना पिवळ्या पुस्तकात झाली आणि पुस्तकं निरुपयोगी असण्याचं मत हे पुन्हा पुन्हा कोपर्निकस-गॅलिलेओची आठवण करून देणारं वाटलं.

देवदेवतांची नग्न चित्रं काढणाऱ्या मकबूल फिदा हुसेन, ऊर्फ एम.एफ. हुसेन यांच्या निधनानंतर अनेक ठिकाणी, वेगवेगळ्या प्रकारे त्यांचा निषेध झाला. काही मर्यादेपर्यंत सुसंस्कृत प्रकारचाही हा निषेध होता. पण अनेक ठिकाणी 'मरणान्तानि वैराणि' हे तत्त्व पुन्हा एकदा विसरलं गेलं. अखेरच्या दिवसात हुसेनवर आपल्या जन्मदेशातूनच परागंदा होण्याची वेळ आली. गॅलिलेओला आपल्या वाडवडलांसोबत पुरण्याचा हक्क मिळाला नाही, चारशे वर्षांनंतर हुसेनची अवस्थाही काही फार निराळी झाली नाही. गॅलिलेओने म्हणे एक धर्म बुडवला होता विज्ञानाच्या नावाखाली, हुसेनने म्हणे दुसरा धर्म बुडवण्याचा प्रयत्न केला, कलेच्या आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्याच्या नावाखाली. पण हुसेनच का, संशोधकांबद्दलही अतिशय अनुदार उद्गार आजही काढले जातात.

इतर सर्व संस्कृतींप्रमाणेच, आपल्याकडेही जननाला आणि पर्यायाने जननीला फार महत्त्व आहे. खरं तर यात संस्कृती, धर्म यांचा फार भाग नाही; ही भावना उत्क्रांतीमधून आलेली आहे[२]. वंशसातत्य, आपली गुणसूत्र टिकवून ठेवण्याची आणि एक सजीववर्ग म्हणून संपूर्ण समूहाचं अस्तित्व टिकवून ठेवण्याची धडपड हे इतर सर्व प्राण्यांप्रमाणेच माणसांमध्येही आलेलं आहेच. 'शिर सलामत तो पगडी पचास' अशा प्रकारच्या सामान्य वापरातल्या म्हणींमधूनही तगून, टिकून राहण्याचं महत्त्व वारंवार दिसतं. त्यामुळे नवीन जिवाच्या जन्माला आणि तो जन्माला घालणाऱ्या जननीला सर्वच संस्कृतींमधे अनन्यसाधारण महत्त्व आहे, अगदी गर्भ कसा तयार होतो हे समजण्याच्या आधीपासूनच[३]. अर्थातच त्या काळात औषधं, सुबत्ता फार नव्हती, यंत्रं फारच कमी कामं करत असत. त्यामुळे अधिक मुलांना जन्म देणारी स्त्री (किंवा इतर प्राण्यांमधली मादी) ही अधिक महत्त्वाची समजली जात असे, किंवा मनुष्यांमध्ये पूजनीय होती. उत्क्रांतीच्या या प्रवासामुळे 'लज्जागौरी' ही माता आपल्याकडे पूजनीय होती. नग्नतेकडे बघण्याची आपली दृष्टी आज मात्र एवढी स्पष्ट आणि स्वच्छ नाही.

लज्जागौरीवर संशोधन करणाऱ्या ढेरेंनी इतर देवतांवरही संशोधन केलं. पंढरपूरचा विठोबा मूळचा कर्नाटकातला, या त्यांच्या संशोधनावर समाजातून टीका झाली. ग.वा. बेहेरे 'सोबत' नावाचं नियतकालिक प्रकाशित करत. त्यात राजा राजवाडे यांनी ढेऱ्यांच्या संशोधनावर टीका करणारा लेख लिहिला. बेहेरे यांनी हा लेख छापला आणि शेजारी एक टिपण लिहून राजवाडे यांना सज्जड समज दिली, "शेवटी तुम्ही काय आणि मी काय, दीडदमडीचे पत्रकार आहोत. ढेरे यांच्यासारखे व्यासंगी लोक चार भिंतीत बसून जी ज्ञानसाधना / संशोधन करत असतात, त्यातून निष्पन्न झालेली गोष्ट भले जनसामान्यांच्या भावनांना न झेपणारी असो, आपण ती कशी पचवता येईल ते पाहायला हवं. त्या विरोधात लोकांना भडकावणे ही अक्षम्य चूक आहे."[४]

भावना, धर्म या गोष्टीही उत्क्रांतीच्या एका टप्प्यावर महत्त्वाच्या आहेत. एक समाज म्हणून टिकून राहण्याच्या दृष्टीने माणसात असणाऱ्या भावनांचं आणि धर्माचं महत्त्व आहे. पण मनुष्याचं अस्तित्व फक्त टिकून राहणं इथवरच मर्यादित नाही. टिकून राहणं तर मेंदूचा फार विकास न झालेल्या प्राण्यानांही जमतं.

माणसाची खरी शक्ती आणि वेगळेपण त्याच्या मेंदूत आहे. या मेंदूत आपल्या अस्तित्वाचा अर्थ शोधण्याची शक्ती आहे. ज्ञानाच्या वेगवेगळ्या शाखांचा अभ्यास करून अस्तित्वाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न अनेक लोक करतात. कोणी उत्क्रांतीचा अभ्यास करतं, कोणी खगोलशास्त्राचा; तर कोणी मानवी मनात डोकावून बघतं. कलाकारांच्या अभिव्यक्तीमधून समाज किती प्रगत आहे याचा अंदाज येतो; म्हणून पुरातत्त्वशास्त्राचा अभ्यासही अस्तित्वाचा अर्थ लावण्यात महत्त्वाचं ठरतं. या अभ्यासात, संशोधनात, नवीन विचार मांडण्यात वस्तुनिष्ठता आणि तर्कशुद्ध विचार जेव्हा भावनेपेक्षा वरचढ असतो, तेव्हा समाजाची प्रगती होते. पूर्वग्रह, मर्यादित आकलनावर अवलंबून असणारे धर्माधिष्ठित समज समाजाच्या प्रगतीच्या कोणत्याही टप्प्यावर मारकच ठरतात. संशोधनाच्या इतिहासात हे वेळोवेळी दिसलेलं आहे. या इतिहासातून बोध घेणं आपल्या हातात आहे.

- *अनेक महिने ग्रहांची गती पाहिल्यास ग्रह हे ताऱ्यांच्या पार्श्वभूमीवर पश्चिमेकडून पूर्वेकडे सरकताना दिसतात. काही काळाकरता ग्रहांचे पूर्वेकडून पश्चिमेकडे सरकणे म्हणजे वक्री.

- ** आधुनिक विज्ञानात याला ग्रहगणित समजलं जातं. आज ज्याला विश्वरचनाशास्त्र समजलं जातं, ते त्या काळात अस्तित्वात नव्हतं.

- *** आता या स्थिरांकाची किंमत शून्य समजली जात नाही, शून्य आणि एकच्या अध्येमध्ये याची किंमत असावी, असा अंदाज आहे. सध्या विश्वरचनाशास्त्रातला हा एक 'हॉट टॉपिक' आहे.


१. http://www.guardian.co.uk/science/brain-flapping/2012/oct/24/most-danger...

२. कहाणी मानवप्राण्याची - नंदा खरे आणि इतर

३. भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास - वि. का. राजवाडे

४. सतीश तांबे, अंशतः खासगी संवादातून.

# सुगंधी दिवाळी : गाथा परफ्यूमची

सोत्री

*चित्र: आंतरजालाहून साभार*



माझ्या लहानपणी मला दिवाळीला, फटाक्यांच्या आकर्षणाबरोबर अत्तराची बाटली हे एक फार मोठे आकर्षण होते. दर वर्षी दिवाळीला वडील एक अत्तराची बाटली आणायचे. बाटली काय म्हणतोय, कुपीच असायची ती एक लहानशी. अभ्यंगस्नान केल्यावर थोडे अत्तर कपड्यावर चोपडून मिळायचे. नंतर त्याच अत्तराचा फाया कानात घालायला मिळायचा. मग नुसता घमघमाट व्हायचा आणि एकदम राजेशाही वाटायचे. त्या काळातला तो चंगळवादच होता. त्यानंतर पुन्हा वर्षभर काही अत्तर स्वतःच्या अंगावर मिरवायला मिळायचे नाही. हा, पण कधीतरी आईबरोबर हळदी-कुंकवाला गेले की तळहाताच्या उलट्या बाजूला थोडेसे अत्तर चोपडले जायचे, पण त्यात दिवाळीच्या अत्तराची मजा नसायची. कधीतरी गावातल्या अतिश्रीमंतांच्या लग्नात मोठाल्या पंख्यांवरून सोडलेला अत्तरमिश्रित पाण्याचा फवाराही थोडीफार सुगंधी झुळूक द्यायचा. ह्यापलीकडे लहानपणी कधी अत्तराचा संबंध आला नव्हता.

मोठे झाल्यावर, कॉलेजात जायला लागल्यावर, डिओ आणि परफ्यूम हे अत्तराचे श्रीमंत अवतार आहेत कॉलेजातल्या श्रीमंत मित्रांकडून कळले. ते काही वापरायची ऐपत नव्हती. ते तसले काही घेऊ या का? असे आमच्या पूज्य वडिलांना नुसते म्हटले जरी असते, तर दर वर्षी दिवाळीला मिळणारा हक्काचा अत्तराचा फायाही मिळायचा बंद झाला असता. त्यामुळे कॉलेजात असताना डिओ आणि परफ्यूम हे ऐकण्यापलीकडे काही मजल गेली नाही.

*चित्र: आंतरजालाहून साभार*

पुढे नोकरी लागल्यावर चार्ली नावाची एक एक सेंटची बाटली घेतली होती. त्या विषयातले ज्ञानही तेव्हा एवढे अगाध होते की डिओ म्हणजे काय, परफ्यूम, सेंट म्हणजे काय ह्यातली काहीही अक्कल नव्हती. काहीतरी छान वास येतो, येवढीच काय ती अक्कल. एकदा ऑफिसमधल्या एका मित्राच्या घरी, अंधेरीला, आम्ही काही मित्र पार्टीसाठी मुक्कामी राहिलो होतो. दुसऱ्या दिवशी सकाळी त्याच्या घरूनच ऑफिसला जाणार होतो. सकाळी अंघोळ झाल्यावर त्याच्या ड्रेसिंग टेबलावरच्या कपाटात बघितले तर बऱ्याच रंगीबेरंगी बाटल्या दिसल्या. त्यात एक डिओ असे लिहिलेली बाटली होती. मनात म्हटले “च्यायला चला, मुफ्त का चंदन, घीस मेरे नंदन” आणि फवारले त्यातले द्रव्य शर्टावर सगळीकडे. तसे करताना त्या मित्राने पाहिले आणि दात काढत म्हणाला, “साल्या, घाटीच आहेस. अरे, डिओ आहे तो परफ्यूम नाही.” मीही दात काढले आणि बळंच हँ. हँ.. हँ... केले. पण तो घाव जिव्हारी



लागला होता. मित्राने माप काढले म्हणून नव्हे, तर साला, जे कळत नाही ते करायची हौस दांडगी, ह्या स्वतःच्या वृत्तीमुळे. पण काळाच्या ओघात पुढे ती घटना विसरूनही गेलो.

मुंबईतल्या एका कंपनीत काम करीत असताना एकदा, पहिल्यांदा अमेरिकेत कामानिमित्त जायचा योग आला. तेव्हा त्या कंपनीत आम्हाला एका आठवड्याचे ट्रेनिंग दिले होते अमेरिकेत कसे वागायचे, एक कंसल्टंट म्हणून, ह्याबद्दल. तिथल्या रीतीभाती, खाण्यापिण्यातले आणि दैनंदिन जीवनातले शिष्टाचार ह्यावर सगळा भर होता. त्यावेळी कळले की अमेरिकेत, तिथल्या लोकांची भारतीयांबद्दलची एक तक्रार म्हणजे, 'इंडियन पीपल स्मेल'. त्यामुळे आम्हाला अमेरिकेत जाण्यासाठी जो 'किट अलावंस' (प्रवास तयारी भत्ता) दिला होता, त्यात कोणती वेगवेगळी डिओ आणि परफ्यूम्स घ्यावी, याची यादी दिलेली होती. त्या वेळी मात्र भत्ता कंपनीने दिलेला असल्याने महागडी डिओ आणि परफ्यूम्स घ्यायची इच्छा पूर्ण झाली, इथेही मुफ्त का चंदन घीस मेरे नंदन हा मंत्र होताच साथीला. पण अमेरिकेत गेल्यावर ते तसे ट्रेनिंग का दिले गेले होते, त्याची प्रचिती आली. दुसऱ्यांदा अमेरिकेत गेलो ते एका नवीन कंपनीतून. तोपर्यंत बॉडी शॉपिंगचा धंदा पार फोफावला होता. त्यामुळे पहिल्या कंपनीसारखे काही एटिकेट्स ट्रेनिंग वगैरे देण्याच्या फंदात ही नवीन कंपनी पडत नव्हती. (पण माझा खरा रस होता प्रवास तयारी भत्त्यात, मात्र तो काही ह्या वेळी नव्हता.) ह्या वेळी माझ्याबरोबर २-३ दक्षिण भारतीय होते, ज्यांचे आयुष्य 'ठेविले अनंते तैसेची राहावे' ह्या उक्तीवर उभे होते. त्यांचा आणि डिओ, परफ्यूम्स वगैरेंचा दूरान्वयेही काही संबंध नव्हता. अमेरिकेत गेल्यावर तिथल्या त्या क्लायंटच्या ऑफिसमधल्या मुली कायम काहीही काम (ऑफिसचेच, बरं का) असले की फक्त माझ्याकडेच यायच्या. नाही हो, मी काही मदनाचा पुतळा वगैरे नाहीये, त्यामुळे माझा कसलाही गैरसमज झाला नव्हता. पण त्या दक्षिण भारतीय मित्रांना फार जळजळ व्हायची. मग त्यांना 'इंडियन पीपल स्मेल'चा फंडा समजावून सांगितला, तेव्हा कुठे त्यांच्या जिवात जीव आला. त्यानंतर मग त्यांनीही कुठल्यातरी स्वस्तातल्या ब्रॅन्डचे डिओ घेतलेच एकदाचे. पण तरीही त्या ऑफिसमधल्या मुली काही माझ्याकडे यायच्या थांबल्या नाहीत. 'एकदा कानफाट्या नाव पडले की पडले' ही म्हण इंग्रजीत कशी समजावून सांगायची, हे काही केल्या मला जमले नाही; म्हणून मग मीही त्या दाक्षिणात्यांना काही समजावून यायच्या भानगडीत पडलो नाही. नाही तरी मलाही आतून खूप खूप बरे वाटायचे हो, त्या मुली माझ्याकडे यायच्या तेव्हा, खोटं कशाला बोला! चला आता ह्या नांदीनंतर आपल्या परफ्यूमच्या गाथेकडे वळू या.

**परफ्यूमचा इतिहास**

प्राचीन काळी, त्या वेळच्या पूजाअर्चनेच्या वेळी, काही खास वनस्पती किंवा काही खास झाडांच्या खोडाच्या साली जाळून सुवासिक धूर केला जायचा. रोमन संस्कृतीत (ख्रिस्तपूर्व) पॅगन लोक देवाची पूजाअर्चना



करताना हा सुवासिक धूर वापरीत. त्यांच्या मते देवाकडे जाण्याचा मार्ग ह्या 'धूरा पासून' सुरू होतो. लॅटिन भाषेत *'per fumum'* म्हणजे 'धुरा पासून' किंवा इंग्रजीत *'from smoke'*. त्याचेच पुढे काळाच्या ओघातले आधुनिक रूप म्हणजे ह्या सुगंधाला आजचे पडलेले नाव, परफ्यूम. त्यामुळे आजच्या काळात वापरला जाणारा 'परफ्यूम' हा शब्द आलेला आहे, लॅटिन भाषेतून, 'धुरा पासून'.

*चित्रः आंतरजालाहून साभार*

परफ्यूमच्या सुवासिक इतिहासात डोकावले असता, परफ्यूमचा वापर हा इसवीसनाच्या ४००० वर्षांपूर्वीपासून असल्याचे ह्या विषयातील संशोधकांचे आणि जाणकारांचे मत आहे. ह्या ऐतिहासिक खोलात जर जायचा प्रयत्न केला तर तो इतिहास आपल्याला पार इजिप्तपर्यंत घेऊन जातो. मध्यपूर्वेत इजिप्तजवळ उत्खननात

इसवीसनाच्या ४००० वर्षांपूर्वीच्या काही कबरींचा शोध लागला आणि त्या कबरींमध्ये काही कुप्या मिळाल्या. त्या कुप्या ह्या सुगंधी द्रव्यांच्या असल्याचे निदर्शनास आले. त्यावरून इजिप्तमध्ये त्या काळाच्या संस्कृतीत सुगंधी द्रव्यांचा फार वापर केला जात होता ह्याचा शोध लागला. पण त्या कबरींमध्ये ह्या कुपी काय करीत होत्या? तर त्या रहस्याची पुराणवस्तुशास्त्रज्ञांनी केलेली उकल अशी की, मृतात्म्याचा स्वर्गात जातानाचा प्रवास हा सुवासिक असावा, अशी त्या काळी धारणा होती. आहे की नाही हा परफ्यूमच्या इतिहास त्याच्या नावाप्रमाणेच एकदम आल्हाददायक!

**परफ्यूम कसे तयार होते?**



परफ्यूम कसे बनवतात हे कळले आणि मी आनंदाने बेहोषच झालो. कारण ते बनविण्याची पद्धत ही माझ्या अतिशय आवडीची आहे, अगदी 'गाळीव'. परफ्यूम तयार करण्याच्या पद्धतीत डिस्टिलेशन (Distillation) ही प्रक्रिया वापरली जाते. जेव्हा ही डिस्टिलेशन पद्धत वापरली जाते हे कळले, तेव्हाच ह्या परफ्यूमची गाथा लिहायची हे मनाशी नक्की केले. परफ्यूम तयार करण्यातली पहिली पायरी म्हणजे कच्चा माल मिळवणे. परफ्यूम बनविण्यासाठी लागणारा कच्चा माल म्हणजे सुवासिक पाने, फुले, झाडांच्या साली, झाडाची सुवासिक खोडे, सुवासिक वनस्पती (Herbs) आणि प्राण्यांचे सुवासिक अवयव (उदा. कस्तूरीमृग) हा गोळा करून त्याचा साठा केला जातो. हा कच्चा माल मिळवला की मग त्यांपासून सुवास वेगळा करणे ही महत्वाची पायरी असते. हा सुवास वेगळा करण्याच्या वेगवेगळ्या पद्धती आहेत. कच्च्या मालाच्या प्रकारानुसार ह्यातली एक पद्धत सुवास वेगळा करण्यासाठी वापरली जाते.

**उर्ध्वपातनाने अर्क काढणे (डिस्टिलेशन):**

ह्यात कच्चा माल एका भट्टीत (Still मध्ये) टाकून त्याला उकळवले जाते, हे उकळवण्यासाठी गरम वाफही वापरली जाते. त्या उष्णतेने त्या कच्च्या मालातील सुगंधी द्रव्याचे (तेल) बाष्प तयार होते. मग एका नळीवाटे हे बाष्प जाऊ देऊन त्याला थंड करून त्याचे पुन्हा द्रव पदार्थात रूपांतर केले जाते. हा द्रव म्हणजेच सुगंधी तेल (Concentrated Oil)

**द्रावकात विरघळविणे:**

पेट्रोलियमजन्य द्रावक किंवा बेंझिन असलेल्या मोठ्या फिरत्या भांड्यात कच्चा माल टाकून तो घुसळवला जातो आणि तो कच्चा माल त्या द्रावकात विरघळतो आणि एक मेणचट पदार्थ मागे उरतो. त्याला मग इथिल अल्कोहोलमध्ये मिसळवले जाते. मग त्या मिश्रणाला गरम केले जाते. त्या उष्णतेने त्यातले अल्कोहोल उडून जाते आणि मग मागे उरते सुगंधी तेल (Concentrated Oil).

**दाब देणे:**

ह्या प्रकारात कच्च्या मालावर दाब देऊन त्यातून सुगंधी तेल काढले जाते.

आता इथून पुढे, शास्त्र आणि कला यांचा खरी जुगलबंदी चालू होते. ही वेगवेगळी सुगंधी तेलं ठराविक मापात घेऊन, त्यांच्या सुगंधाची जातकुळी ओळखून, त्यांचा **मिलाफ (Blend)** केला जातो. हा मिलाफ करणारा किमयागारच (रासायनिक) असावा लागतो. फारच नैपुण्याचे काम असते हे. म्हणून हा मिलाफ करण्याच्या ह्या शास्त्राला, कलेचीही जोड असावी लागते असे म्हटले जाते. आता ह्यात कसली कला आलीय? असा प्रश्न तुम्हाला पडणे साहजिकच आहे. सांगतो! आपण जे फिनिश्ड गुड म्हणजे तयार माल असलेले परफ्यूम वापरतो त्याचे, 3 थर असतात. त्या प्रत्येक थराला नोट (Note) असे म्हणतात.

**टॉप नोट:** परफ्यूम फवारल्या फवारल्या जो गंध दरवळतो, तो टॉप नोट असतो.

**सेंट्रल किंवा हार्ट नोट:** परफ्यूम फवारल्यानंतर काही काळाने जो गंध दरवळतो, तो हार्ट नोट असतो.

**बेस नोट:** परफ्यूम फवारल्यानंतर कित्येक तास दरवळणारा जो गंध असतो, तो बेस नोट असतो.

मग आता सांगा, हे सगळे त्या ब्लेंड केलेल्या परफ्यूम जमवून आणायचे म्हणजे कलाकारीच आहे की नाही? त्यानंतरची पायरी म्हणजे **मुरवणे (Aging).** ब्लेन्ड केलेल्या ह्या सुगंधी तेलांना मग मुरवले जाते. काही महिने ते काही वर्षे इतका त्याचा कालावधी असू शकतो. ब्लेन्ड केलेल्या ह्या सुगंधी तेलांमध्ये पुढे अल्कोहोल मिक्स केले जाऊन त्याची घनता कमी केली जाते. ह्या अल्कोहोलमिश्रित परफ्यूममधल्या सुगंधी तेलाच्या प्रमाणानुसार त्याचे खालील वेगवेगळे प्रकार पडतात.

| परफ्यूमचा प्रकार | सुगंधी तेलाचे प्रमाण | टिकण्याचा कालावधी |
|---|---|---|
| Perfume | ५ ते ३० % | ६ ते ७ तास |
| Eau de Perfume or EDP | ८ ते १५ % | ५ ते ७ तास |
| Eau de Toilette or EDT | ४ ते ८ % | ४ ते ६ तास |
| Eau de Cologne | ३ ते ५ % | २ ते ३ तास |

**परफ्यूमच्या सुगंधाचे प्रकार कोणते?**

सध्याच्या आधुनिक काळात ह्या परफ्यूमचे साधारण पाच ढोबळ प्रकारात वर्गीकरण केले जाते.

**फ्लोरल नोट्स:** गुलाब, जाई, चमेली, कार्नेशन इत्यादी विविध फुलांपासून बनवली जाणारी परफ्यूम्स ह्या प्रकारात मोडतात.

**ओरिएंटल नोट्स:** प्राण्यांच्या सुवासिक अवयवांपासून मिळवलेल्या सुगंधी तेलांना फळांच्या आणि फुलांच्या सुगंधी तेलांबरोबर ब्लेंड करून बनवली जाणारी परफ्यूम्स ह्या प्रकारात मोडतात.

**वूड नोट्स:** चंदन, देवनार यांसारख्या झाडांच्या खोडापासून मिळवलेल्या सुगंधी तेलांपासून बनवली जाणारी परफ्यूम्स ह्या प्रकारात मोडतात.

**फ्रेश नोट्स:** सायट्रस (लिंबू, संत्री, मोसंबी) चवीच्या फळं आणि फुले यांपासून मिळवलेल्या सुगंधी तेलांपासून बनवली जाणारी परफ्यूम्स ह्या प्रकारात मोडतात.

**Fougère नोट्स:** फ्रेंच भाषेत Fern (नेचेसदृश वनस्पती)ला Fougère म्हणतात. ह्या नेचेसदृश वनस्पतींपासून मिळवलेल्या सुगंधी तेलांपासून बनवली जाणारी परफ्यूम्स ह्या प्रकारात मोडतात.

हे ढोबळ आणि मूलभूत वर्गीकरण झाले, ह्यांच्या उपप्रकारांत असंख्य प्रकारचे फ्लेवर्स असलेली परफ्यूम्स बाजारात उपलब्ध आहेत. त्यांचे प्रकार दर्शवण्यासाठी खालील फ्रेग्नन्स चक्र वापरले जाते.




*फ्रेग्नन्स चक्राचे चित्र विकीपीडियावरून साभार*

**परफ्यूम आणि डिओडोरंट मध्ये फरक काय?**

घर्मस्राव (Perspiration) रोखण्यासाठी डिओडोरंट्सचा (Deodorant) वापर केला जातो. घामामध्ये असलेल्या जिवाणूंमुळे घामाला एक दुर्गंध येत असतो. त्या घामाचा स्राव रोखून त्या दुर्गंधापासून मुक्ती मिळवून देण्याचे कार्य हे डिओडरंट्स करतात. त्यामुळे जिथे घाम येतो तिथे शरीरावर हे डिओडरंट्स फवारायचे असतात. बरेच डिओडरंट्स हे सुगंधरहितसुद्धा असतात. त्यांचे काम एकच - घर्मस्राव रोखणे. परफ्यूम्समध्ये घर्मस्राव रोखण्याचे काही असले काही गुणधर्म नसतात. त्यात फक्त सुगंधच (Fragrance) असतो. त्याचे कार्य फक्त आणि फक्त एकच, सुगंध देऊन शरीराला सुवास देणे.

**परफ्यूम कसे वापराल?** परफ्यूम फवारल्यावर त्यातले सुगंधी कण हळूहळू उडून जातात. ते उडून जाताना त्यांच्या नोट्सप्रमाणे गंध दरवळत राहतो. ह्या परफ्यूमचा गंध जास्त काळ दरवळत ठेवायचा असेल, तर ते परफ्यूम कसे वापरायचा ह्याचे ज्ञान असणे गरजेचे आहे. सर्वात आधी तुमच्या आवडीचा परफ्यूम निवडून घ्या. बरेच परफ्यूम्स वापरल्यानंतर तुम्हाला नेमका शोभणारा (सूट होणारा) परफ्यूम ठरवता येईल. आता परफ्यूम निवडून झाला असेल तर मग तो लावण्यापूर्वी छानपैकी आंघोळ करून घ्या. तुमच्या परफ्यूमच्या सुगंधाच्या जवळ जाणारा सुगंध असलेल्या साबणाने अंघोळ केल्यास उत्तम. उदाहरणार्थ, जर तुम्हाला फ्रेश नोट्सचे परफ्यूम्स आवडत असतील तर सिंथॉल लाईम वापरल्यास त्याच्या शरीरावर रेंगाळणाऱ्या गंधाबरोबर त्याची जोडी त्या परफ्यूमबरोबर जमून जाईल अगदी. आता हा परफ्यूम चोपडण्याच्या काही विशेष जागा आहेत, तेथे तो लावल्यास त्याचा परिणाम फार काळ टिकून राहतो. आपल्या शरीरावर जिथे नाडीचे ठोके पडतात त्या जागा हा परफ्यूम फवारण्यास अती उत्तम. म्हणजे हाताचे मनगट, हाताच्या कोपराची आतली बाजू, छाती (स्त्रियांसाठी ही जागा अतिशय उत्तम! ह्यात कसलीही अश्लीलता नाहीये. कसलेही भलते विचार मनात आणू नका). शिवाय मान आणि कानाच्या पाळीच्या मागची बाजू ह्या जागा तर खास महत्त्वाच्या. का ते विचारा? जेव्हा जोडीदाराला आपण कवेत घेतो, तेव्हा नाकाच्या सर्वात जवळ असणारे शरीराचे भाग हेच असतात. त्यामुळे तिथून येणाऱ्या सुगंधाने जोडीदाराला कवेत घेण्याच्या उन्मादाला आणखीनंच बहर येतो. साधारण जिथे जिथे हे परफ्यूम फवारले आहे, ती जागा अंगावरच्या कपड्यांनी झाकली जाईल अशी काळजी घेतल्यास त्या परफ्यूमचा परिणाम जास्त काळ राहू शकतो. परफ्यूममधले उडून जाणारे सुगंधी कण कपड्यामुळे हवेत विरून जायला वेळ लागतो आणि त्याचा परिणाम जास्त काळ टिकतो. चला तर मग, ह्या वर्षीची दीपावली तुमच्यासाठी अतिशय सुगंधी आणि सुवासिक अशी असो, इथे ही शुभेच्छा व्यक्त करत ही परफ्यूमची गाथा सुफळ संपूर्ण करतो.

# चित्रपट बघणे : एक कला

परा




चित्रपट पाहणे आणि त्यांची परीक्षणे लिहिणे हा आमचा एक आवडता छंद. काही लोक त्याला 'फुकटचा धंदा' असेदेखील म्हणतात. अर्थात ते, 'जे मित्र असले की शत्रूची गरज नाही' ह्या कॅटेगरीत मोडणारे असल्याने मी त्यांच्याकडे दुर्लक्षच करत आलो आहे. हान, तर परवा आसाच एक मित्र कम शत्रू आम्हाला रस्त्यात भेटला. (दारूखान्यात, शिणिमाला, तमाशाला आणि रस्त्यात मित्र भेटणे हा दुर्मीळ योग आमच्या आयुष्यात कायमच येत आला आहे.) अत्यंत उपहासाने त्याने मला 'मग, अटेंड करणार आहे का नाही सेमिनार? ' असे विचारले. दुपार असल्याने आणि मित्र बायकोबरोबर असल्याने प्यायलेला नसावा ह्याची खातरी होती. पण हे असे काही असंबद्ध बरळेल असे वाटले नव्हते. अर्थात अधिक चौकशी करता त्याच्याकडून जी माहिती समजली, ती ऐकून आम्ही अक्षरश: भर रस्त्यात डोक्याला हात लावून बैठक मारली. कुठल्याश्या संस्थेत म्हणे 'चित्रपट कसा पाहावा' ह्यावरती कार्यशाळा आयोजित करण्यात आलेली होती. अरे, कलियुग आहे म्हणून काय काहीही धंदे कराल का काय?


चित्रपट पाहायला शिकवणार? उद्या वंश वाढवायला शिकवाल, परवा दारू प्यायला शिकवाल.. काय अर्थ आहे का ह्या सगळ्याला? अभिनय, दिग्दर्शन शिकवतात इथपर्यंत ठीक होते, पण आता ते कसे पारखायचे हेसुद्धा शिकवणार? हे शिकायचे नसते तर अनुभवायचे असते, हेच ज्यांच्या मद्दड डोक्यात शिरत नाही, ते लोकांना काय शिकवणार आहेत? उद्या चित्रपटात फक्त सोनाक्षी सिन्हा आणि तिचे कमनीय अवयव येवढेच बघायला एखादा मनुष्य जात असेल, तर त्याला तुम्ही अजून नक्की काय शिकवणार आहात? की 'बाबा रे, असे एकदम 'टार्गेट ॲटॅक' करायचे नाहीत. आधी पावलापासून सुरुवात करायची, नेलपेंटची शेड, सॅंडल साधा आहे का हाय हील आहे ते बघायचे, मग वर वर सरकायचे. अंगात चोळी आहे, का काचोळी आहे.. साडी शिफॉनची आहे, का साधी वायल आहे ते ठरवायचे.. ' हे असले दळभद्री काही शिकवणार आहात का? तो इसम आत जाणार, सोनाक्षी आणि तिचे मटकणे डोळे भरून बघणार आणि साला पैसा वसूल झाला म्हणून बाहेर पडणार. त्याला घेणे देणे काय आहे तुमच्या कलेशी आणि शैलीशी? 'एक भुर्जी बना और हाफ फ्राय बिना पल्टी मार के उसके उप्पर' ही ज्याची अदा आहे, त्याला तुम्ही अजून शिकवूच काय शकणार आहात? मुळात मला सांगा की, एक हिरॉईन आणि दोनचार फाइट सीन्स सोडले तर आजकाल चित्रपटात बघण्यासारखे असते तरी काय? नेहा धुपिया, दिया मिर्झा, कंगना राणावत, कल्की कोचीन ह्यांच्यात काय बघायचे ते आम्हाला विचारू नका. मुळात हिरॉईन म्हणून ह्यांच्यावरती पैसे लावायला लोक तयारच कसे होतात? हा मला प्रश्न पडलेला आहे. ह्यांच्यावर पैसा लावण्यापेक्षा मी कल्याण बाजार किंवा अगदी एखाद्या क्रिकेट मॅचचे हायलाइट्सदेखील पसंत केले असते. ह्या बायांमध्ये सौंदर्य आणि अभिनय कसा बघायचा हे

तुम्ही शिकवू शकणार आहात का? सलमानचा अभिनय कसा पारखावा, हे तुम्ही शिकवू शकणार आहात का? अक्षय कुमार काहीही कसाही आणि बादरायणदेखील संबंध नसताना, अचानक 'बच्चे की जान लोगे क्या? ' असे म्हणतो तेव्हा त्या वाक्याच्या अर्थ आणि चालू दृश्याशी संबंध शिकवणार आहात का? गुढघ्यापर्यंत, खरे तर थोड्या वरच.. साड्या उंचावत (आठवले ना लगेच दृश्य?.. चावट कुठले) शाळेतल्या बायकांना समूहाने जाऊन एकाच विद्यार्थ्याची खाजगी शिकवणी घेण्याची गरज का वाटते? सोनम कपूर, रणबीर कपूर, नितीन नील मुकेश हे मानवी देह अभिनय समृद्धीमुळे चित्रपटात आहेत, का त्यांच्या मधल्या नावामुळे आहेत? अमीर खानला कॉलेज स्टुडंट म्हणून आणि मुग्धा गोडसेला सुपर मॉडेल म्हणून कसे सहन करायचे? प्रितम, अनु मलिक, हिमेश रेशमिया ह्या गंधर्वांनी जपानी डेली सोपपासून ते संतती नियमनाच्या जाहिरातीपर्यंतचे संगीत चोरून आपल्या चित्रपटात वापरले, तर ते कसे सहन करायचे? महेश भट्ट, विक्रम भट्ट हे दिग्दर्शक (? ) कथा, संगीत, तंतोतंत दृश्ये इत्यादी चोरून दमल्यावर आता फॉर अ चेंज म्हणून चित्रपटाची पोस्टर्सदेखील चोरू लागले आहेत. ह्याकडे कुठल्या नजरेने बघावे? हीरो हिरॉईनला खुले आम चुंबन, आलिंगन आणि विविध आसने करताना दाखवल्यावरती, बलात्काराच्या दृश्यात मात्र हात आखडता का घेतात? हीरोपेक्षा जास्त कमावणारा, मोठ्या पदावर कार्यरत असणारा बाप पाठीशी असलेला, आई किंवा बहीण ह्यांची जबाबदारी नसलेला, ४/५ प्रकारच्या चारचाक्या, १५/२० नोकर, बंगला इत्यादींचा मालक असलेला मनुष्य हा केवळ हिरॉइन त्याच्यावरती प्रेम करत नाही म्हणून खलनायक का मानायचा? अभिनय आणि कलाकार सोडा, आपण चित्रपटातल्या महान दृश्यांवरती बोलू या. 'मर्द' चित्रपटात निरुपा रॉयने देवीच्या वाहनाला... आय माय सॉरी.. वाघाला नमस्कार केल्यानंतर तो तिला उलटून नमस्कार करतो, ह्यातून काय बोध घ्यायचा? तीन इसम तीन खाटांवरती लोळत लोळत एकाच बाईला रक्त देतात, ह्यातून काय विज्ञान शिकायचे? चार्ली चॅप्लिन हा रणबीर कपूरचा आदर्श आहे, म्हणून चॅप्लिनच्या चित्रपटातील दृश्ये तो सररास आपल्या चित्रपटात कॉपी करतो का? चंद्रमुखीसारख्या गर्भश्रीमंत नायकिणी कुठे असतात? मेक-अप मन आणि ड्रेस डिझायनर हे कायम 'गे'च असतात का आणि ते कायम नको तेव्हाच कसे पकडले जातात? क्रिश हा चित्रपट पे-चेकची सरळ सरळ भ्रष्ट नक्कल असतानादेखील इंडियाज फर्स्ट ओरीजिनल सुपर हीरो अशी त्याची जाहिरात का बघावी लागते? करिश्मा कपूरचा पापी गुडिया (तो बघण्याचे पाप करणारा मी बहुदा एकटाच) हा चाईल्ड्स प्लेवरून सरळ सरळ ढापलेला असताना, 'पर्दे पर पहेली बार एक अनोखी कहानी' ह्यावर विश्वास कसा ठेवायचा? 'दो फूल' ह्या मेहमूदच्या अप्रतिम चित्रपटाची झेरॉक्स म्हणजे गोविंदाचा 'आँखे' असा उच्चारदेखील का करायचा नाही? राष्ट्रीय पुरस्कार विजेता अग्निपथ आणि स्कारफेसमध्ये साम्य आहे, असे उघड उघड का बोलायचे नाही? अजय उर्फ महादू देवगण आणि काजोल पडद्यावरती जसाच्या तसा 'अ मुमेंट.. ' साकारतात, तेव्हा तो अद्भुत प्रेमकहाणी पहिल्यांदाच पाहत असल्यासारखा कसा पाहायचा?

बरं, हे नासके प्रश्न जाऊ द्या बाजूला. मला एक सांगा, आजकाल 'बघण्याच्या' लायकीचे कितीसे चित्रपट पडद्यावरती येतात? नो सर!! सनी लिऑनलादेखील पडद्यावरती साकारता न येऊ शकणारे दळभद्री दिग्दर्शक असल्यावरती अजून काय होणार? बघण्याच्या लायकीच्या चित्रपटाचीच बोंब असताना, शिकण्याच्या लायकीच्या चित्रपटांबद्दल न बोलणेच चांगले. शिकायच्या लायकीच्या चित्रपटांचा विषय निघाला की पथेर पांचाली, शेजारी, कुंकू आणि मदर इंडियाच्या पुढे आपली यादी जात नाही. सत्यजित रे यांची पिढी बहुधा श्याम बेनेगलांबरोबरच संपली असावी. कारण मीरा नायर किंवा अख्तर मिर्ज़ा, जानु बरुआ ह्यांच्या चित्रपटांना पडदा बघण्याचेदेखील नशीब मिळते, हेच आजकाल खूप म्हणायचे. अर्थात गाजावाजा करत आणि समाजाला सुधारण्यासाठी, आरसा दाखवण्यासाठी म्हणून निघालेले चित्रपट स्वत: दिग्दर्शक तरी पुन्हा बघतात का, हा खरा प्रश्न आहे. फायर, माय वाईफ्स मर्डर, कोलकाता मेल, मिस्टर ॲंड मिसेस अय्यर ह्या हटके चित्रपटांमधून तरी नक्की वाट्याला काय आले? बॉम्बे बॉइज ह्या चित्रपटाने सगळ्यात आधी ही

मळलेली वाट सोडून एक वेगळाच रस्ता पकडला 'हिंग्लीशचा'. आज हा पादचारी मार्ग चक्क चक्क चार पदरी रस्ता होऊन 'बीइंग सायरस'पर्यंत पोहोचला आहे. सगळ्याच प्रस्थापितांना धक्का देणाऱ्या 'द अंग्रेज' किंवा 'हैदराबाद नवाब'ने काही काळ जबरदस्त धुमाकूळ घातला होता, पण शेवटी तीदेखील एक पटकन ओसरणारी लाटच निघाली.

आठवड्यातल्या पहिल्या शुक्रवारी थेटरात आणि पुढच्या महिन्याच्या शेवटच्या शनिवारी चॅनेलवरती झळकणाऱ्या आजच्या चित्रपटांच्या जमान्यात नक्की बघायला तरी काय शिकवणार आहेत? एकदा वाटले होते की, जावे आणि बघून तर यावे. पण मग भीती वाटली, की हे लोक अंधार करून पुन्हा पुन्हा मदर इंडिया, दो बिघा जमीन, भूमिका आणि अंकुरचे दळण दळत बसतील आणि स्वत:च्या समाधानासाठी, ही भूतकाळातील राजेशाही लक्तरे अंगावर घालत आम्हालासुद्धा टेऱ्या बडवायला लावतील. मग आम्हीदेखील उजेडात आल्यावरती दादासाहेब फाळके ते 'एक था टायगर' अशी परंपरेची झूल उडवत लिखाण करायला लागू. जाता जाता ह्या संदर्भात एक किस्सा आठवला. खालिद मोह्हमद ह्या नामवंत समीक्षकाने हृतीक आणि करिश्मा अशा नामांकित मंडळींना घेऊन 'फिझा' सारखा चित्रपट बनवला. ह्या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शनदेखील त्याचेच होते. ह्या चित्रपटाविषयी बोलण्यासाठी त्याने सुभाष घईला आमंत्रण दिले होते. आपल्या भाषणात घई साहेबांनी जाता जाता एक फार छान वाक्य सांगितले. ते म्हणाले, आजवर आमच्या चित्रपटातील ज्या ज्या गोष्टींची खालिदने खिल्ली उडवली, त्या सगळ्या गोष्टी ह्या चित्रपटातदेखील आहेतच की.



# टोमॅटो शेव
रेवती



साहित्य: एक अष्टमांश टीस्पून काळी मिरीपूड, एक अष्टमांश टीस्पून ओवा, १ टीस्पून काश्मिरी मिरचीचे तिखट, १ टेबलस्पून टोमॅटो पेस्ट, २ टेबलस्पून तेल, ८ टेबलस्पून हरभरा डाळीचे पीठ (बेसन), ५ टेबलस्पून पाणी, मीठ चवीनुसार, १ चिमूट इनो (सोडा), तळणीसाठी तेल, सोऱ्या व जाड शेवेची ताटली, झारा.

कृती: मिक्सरच्या लहान भांड्यात मिरीपूड, ओवा, तिखट, टोमॅटो पेस्ट, तेल, मीठ असे घालून अर्धा मिनिट फिरवावे. त्यात ५ टेस्पून पाणी घालून पुन्हा दोन मिनिटे फिरवावे. मिश्रण पांढरे होऊ लागेल. एका पातेलीत काढून घ्यावे. आता चिमूट सोडा त्या मिश्रणात कालवून बेसन घालण्यास सुरुवात करावी. हाताने अथवा चमच्याने बेसन कालवत राहावे. सैलसर पीठ तयार होईल. आपल्याला ते तसेच असायला हवे आहे. तळणी तापत घालावी. तेल चांगले तापल्यावर आंच मध्यम करून ठेवावी. जाड शेवेची ताटली सोऱ्यात लावावी. आतून तेलाचा हात फिरवावा. आता चमच्याने सोऱ्यात पीठ घालावे. सोऱ्या बंद करून तेलात गोल फिरवून शेवेचे फूल तयार करावे. एका बाजूने तळले गेल्यावर उलटून दुसरी बाजू तळून घ्यावी. तेलातून शेव बाहेर काढून पूर्णपणे थंड होऊ द्यावी. आता हाताने ते फूल मोडून हव्या त्या लांबीचे तुकडे करावेत. तिखट, आंबट चवीची चटकदार, खुसखुशीत शेव तयार.

सूचना:

१) तिखटाचे प्रमाण बेताने घेतले आहे. हवे असल्यास जास्त घालावे.

२) सोऱ्या तेलात न बुडवता वरून पीठ तेलात सोडायचे आहे.

३) वरील पाककृतीत मी रंग घातलेला नाही. हवा असल्यास खाण्याचा लाल रंग किंचित घालावा.

४) ही शेव जाड असल्यास चांगली लागते.

# बदामी/सयामी हलवा
## गणपा

सर्व रसिक खवय्यांना दीपोत्सवाच्या मंगलदायी शुभेच्छा. मौका है दस्तूर भी, तो कुछ मीठा हो जाये?

**साहित्य :**




३ भाग साखर. १ भाग कॉर्नस्टार्च. १ भाग बटर. २-३ चमचे साजूक तूप. ४ भाग पाणी. बदाम. १/२ चमचा वेलची / जायफळ पूड. केसर. खायचा रंग (ऑप्शनल.)












१ भाग कॉर्नस्टार्चमध्ये १ भाग पाणी आणि भिजवलेले केशर टाकावं.
साखरेच्या पाकाला उकळी यायला सुरुवात झाली (तळाला बुडबुडे दिसायला लागले) की त्यात कॉर्नस्टार्च टाकून ढवळावं.







मिश्रण दाट होऊ लागलं की त्यात २ चमचे साजूक तूप घालून ढवळत राहावं. मध्यम आचेवर तूप मिश्रणात एकजीव झाल्यानंतर त्यात १ मोठा चमचा बटर टाकावं. बटर एकजीव झालं की पुन्हा १ चमचा बटर टाकावं.







दरम्यान मिश्रणात हवेचे लहान लहान बुडबुडे तयार झालेले दिसतील. नंतर बदाम/काजू आदी सुक्या मेव्याचे तुकडे टाकून ढवळत राहावं. हे मिश्रण स्वत:हून कडा सोडायला लागेपर्यंत ढवळत राहावं. (साधारण दिलेल्या प्रमाणाला २०-२५ मिनिटे लागतात.)
ताटलीमध्ये हे मिश्रण काढून गार करत ठेवावं. (किमान १-२ तास.)




थंड झाल्यावर हव्या त्या आकारात तुकडे करावे.

# एक अफगाणी त्याची कहाणी


## निनाद, मुक्काम पोस्ट जर्मनी


तो प्रसंग अजूनही आठवला की गंमत वाटते. जेवत असताना आमच्या टेबलावर तीन अफगाण ,दोन पाकिस्तानी व मी एकटा हिंदुस्थानी जेवायला बसलो होतो. आणि अचानक एका अफगाणाने" आप कहाँ से हो "?असा प्रश्न विचारला." मुंबईसे "असे मी म्हटल्यावर तो क्षणभर चकित झाला. मला सगळ्यांसमोर प्रश्न विचारला," आप क्या रॉ के आदमी हो "?त्याच्या ह्या अकस्मिक प्रश्नावर टेबलावरील सर्व सज्जन गृहस्थ माझ्याकडे रोखून पाहायला लागले. मी हसून त्याला म्हणालो" ,नाही रे ,पण तुला असे का वाटले "?त्याने मला सांगितले की, तो पाकिस्तानमध्ये कुठे राहत होता ,सध्या तेथे काय परिस्थिती आहे. त्यावर त्याचे काय मत आहे, हे गेला आठवडाभर मी त्याच्याकडून सविस्तर जाणून घेतले. त्याला मी कराचीचा वाटलो , आणि मी मुंबईचा आहे असे आता अचानक कळल्यावर त्या १८ वर्षीय पठाणाने मला हा भाबडा प्रश्न विचारला. मग मी त्याला म्हणालो," जर मी खरेच गुप्तहेर असतो, तर मी मूळचा मुंबईचा असे चारचौघात सांगितलेच नसते. "ह्या युक्तिवादाने त्याचे समाधान झाले अन माझा जीव भांड्यात पडला.

युरोपला मंदीचे चटके बसायला लागले व बुडत्या जहाजातून सर्वप्रथम उंदीर बाहेर पळतात, ह्या न्यायाने मी माझ्या पत्नीसह लंडन सोडले आणि अबुधाबी येथे आलो. तेथे सर्व काही सुरळीत चालले होते. पण माझ्या पत्नीला मात्र येथे तिची मायभूमी जर्मनी व अबुधाबी ह्यांच्यात एक लोकशाही व राजेशाही असलेल्या देशातील फरक जाणवायला लागला आणि आम्ही युरोपात परतण्याचा निर्णय घेतला.

युरोपात जर्मनीने मंदीतून बाहेर पडण्याचे संकेत दिले व त्यास सकारात्मक प्रतिसाद देत आम्ही माझ्या बायकोच्या देशी जायचे नक्की केले. माझ्यासाठी भाषेची प्रमुख अडचण होती, कारण मला जर्मन येत नसले तरी इतके दिवस इंग्रजी भाषेतून आमचा संवाद चालायचा. मात्र जर्मनीत हे चालत नव्हते. जर्मन भाषेची प्राथमिक जाण असणे हे जर्मनीत दीर्घकाळ वास्तव्य करण्याची मनीषा बाळगणाऱ्या परकीय नागरिकांना सक्तीचे आहे.

म्हणून मी प्रथम मुंबईत आलो आणि दीड महिन्यात जर्मन भाषेचा पहिला स्तर उत्तीर्ण झालो. काळा घोड्याजवळ जर्मन दूतावासाच्या अनुदानावर गटे ही जर्मन भाषेची संस्था अल्प दरात जर्मन भाषा शिकवते. जगभर ह्या संस्थेचा दर्जा समान असतो. येथून जर्मन भाषेची प्राथमिक ,जुजबी तोंडओळख करून घेऊन मी जर्मनीला आलो. मी आणि माझी पत्नी पंचतारांकित हॉटेलात आधी काम करत असल्याने साहजिकच जर्मनीत आमचा मोर्चा तेथे वळला. माझ्या पत्नीस मनाजोगता जॉब मिळाला. माझे मात्र भाषेवरून अडू लागले. अशात एका हॉटेलातून मला चक्क बोलावणे आले. माझ्या कामाचे स्वरूप हे ट्रेनिंग आणि अजून बरेच होते. माझ्या कामात माझे शिक्षण व अनुभव धरून भाषा - प्रामुख्याने इंग्रजी ,उर्दू येणे महत्त्वाचे होते. ह्याचे कारण तेथील हाउसकीपिंगचा ९० टक्के स्टाफ अफगाण ,श्रीलंकन (तामिळ निर्वासित) ,पाकिस्तानी व उरलेले दहा टक्के इराक ,इराण ,व आफ्रिकेतील काँगो ,युगांडा ,अशा देशातील होता. जर्मनीमधील फ्रँकफर्ट येथे माझे वास्तव्य होते. माझ्या मते जर्मनीमधील जगभरातील सर्वात जास्त निर्वासित राहतात. हे निर्वासित आपल्या मायभूमीला पारखे झालेले असतात. मात्र निर्वासित असल्याचे पारपत्र त्यांच्याकडे असल्याने हे युरोपात

कोठेही जाऊ शकतात. कमी पैशात जास्त काम करण्याची त्यांची तयारी असल्याने हे लोक युरोपातील बहुतांश हॉटेलात श्रमाची कामे करतात. ह्यांना हॉटेल स्वतः कामावर घेत नाही, तर एका मध्यस्थ कंपनीतर्फे घेतात. ही कंपनी बहुधा एखाद्या तुर्की ,अफगाणी किंवा पाकिस्तानी माणसाची असते. ही कंपनी ह्या लोकांना ताशी साडेपाच युरो देते आणि जर्मनीत कमीत कमी वेतन ताशी ८ ते ९ युरो आहे. तेव्हा हॉटेलला स्वतःचा कायमस्वरूपी स्टाफ ठेवणे खर्चीकच ठरेल. म्हणून त्यांना ह्या कंपन्यांचा पर्याय परवडतो. जर्मनीत कर्मचाऱ्यांसाठी एक महिना भरपगारी रजा व इतर अनेक सोयी असतात, त्या ह्या कंपन्या निर्वासितांना देत नाहीत. अशा कंपन्यांचे सर्व रेकॉर्ड सांभाळणे ,त्यांच्याशी संवाद साधणे (कारण त्यांची भाषा मी सफाईने बोलू शकतो), त्यांना आवश्यक ते ट्रेनिंग देणे ,अशा प्रकारचे माझे काम होते.

संध्याकाळी जर्मन भाषेचा वर्ग आणि सकाळी नोकरी, असा माझा दिनक्रम ठरला होता. असेच एके दिवशी मी हॉटेलच्या पाचव्या मजल्यावर खोल्यांसमोरून जात असताना, माय नेम इज खान ह्या सिनेमातील शाहरूखचे डायलॉग एका खोलीतून माझ्या कानावर पडले. तेथे जाऊन पाहतो तर पाच ते दहा अफगाण कामधाम सोडून जमिनीवर फतकल मारून बसले होते ,आणि अगदी आय.एन.टी. एकांकिकेमध्ये जसे जीव तोडून संवाद म्हणतात त्या थाटात हा १८ वर्षाचा पठाण मुलगा ते संवाद म्हणत होता. मला पाहताच तो एकदम गप्प बसला. मी विचारले" ,नाव काय तुझे "?त्याने सांगितले," शेर खान "आणि तो मूळचा कंधारजवळचा असून पाकिस्तानात अटकजवळ त्याचे लहानपण गेल्याचे सांगितले. अटक हा शब्द कानावर पडला आणि अटकेपार झेंडे लावलेली मराठी फौज आठवली. येथे माझी आणि शेरखानची पहिली भेट झाली आणि पुढे आमची गट्टी जमली. ह्याचे कारण म्हणजे त्याचे बॉलिवूडवर निस्सीम प्रेम आणि ह्या सर्व लोकांमध्ये तो एकटा जर्मन युनिवर्सिटीत संध्याकाळी जात होता. त्यामुळे ह्या सर्व लोकांमध्ये तो बराच पुढारलेला आणि सुशिक्षित होता. त्याला हाताशी धरल्याने तो पश्तून किंवा डारी भाषेत अफगाण लोकांना काही महत्त्वाची माहिती सांगायचा. पश्तून ही प्रमुख भाषा असली तरी संपूर्ण अफगाणिस्तानमध्ये डारी भाषा बहुतेकांना समजते. उझबेक व तुर्कमेनिस्तानी भाषासुद्धा तेथे बोलल्या जातात. जशी पाकिस्तानात उर्दू राष्ट्रभाषा असली तरी पंजाबी भाषेचा तेथे पगडा आहे, तसे अफगाणिस्तानमध्ये पश्तून आणि डारी भाषेचे आहे .ही भाषा प्रामुख्याने इराणलगतच्या अफगाणी भागात बोलली जाते, कारण इराणी भाषा ह्या भाषेच्या अत्यंत निकट आहे. त्यामुळे अफगाण डारी भाषेत सर्व संवाद करत असल्याने इराणी लोकांना आमच्या हॉटेलात ते विनासायास समजायचे. लंडन आणि अबुधाबी येथे माझा पाकिस्तानी लोकांशी कामानिमित्त संबंध आला होता. राजकारण ते सर्व विषयावर चर्चा करताना त्यांची मते, त्यांच्या आपल्याविषयीच्या कल्पना व आपल्या त्यांच्याविषयीच्या कल्पना, असे माहितीचे आदानप्रदान व्हायचे. एक अफगाणी ,त्याची कहाणी ,त्याच्याच जबानी तो प्रसंग अजूनही आठवला की गंमत वाटते.

शेर खानचे कुटुंब पाकिस्तानात अटकजवळ राहते असे त्याने मला सांगितल्यावर त्याच्याशी गप्पा मारताना माझ्या तोंडातून पेशावर ,हिंगोरा दक्षिण ,उत्तर वझिरीस्तान अशी नावे किंवा चर्चा करताना बलुचिस्तान ते अगदी कराचीमधील लेहेरी (म्हणजे त्यांची धारावी) परिसरात उसळलेल्या अफगाण विरुद्ध मुजाहीर लोकांच्या दंगली असे विषय असायचे. ह्यामुळे मी बहुधा कराची शहरातील रहिवासी असावा, अशी त्याची समजूत होती. कितीतरी पाकिस्तानी लोकांशी बोलताना मी भारतीय आहे हे पहिल्यांदा स्वतःहून सांगत नाही. कारण जेव्हा आमच्या चर्चेचा रोख भारतावर किंवा राजकारणावर येतो, तेव्हा त्यांची मते, त्यांचे

समज, मानसिकता ह्यांचा थांगपत्ता लागतो. शेर खानच्या गावाजवळ तालिबान व रशियन ह्यांच्यात तुंबळ युद्ध झाले, तेव्हा त्याचे घर व काही नातेवाईक पैगंबरवासी झाले. तो पंधरा वर्षाचा असताना तालिबान व अमेरिकन सैन्य यांच्या युद्धात त्यांच्या अर्ध्या गावावर अमेरिकन धार्जिणा असल्याचा ठपका बसला. तेव्हा त्या लोकांना काही काळ तालिबानी हल्ले सोसावे लागले व शेवटी पाकिस्तानातील निर्वासितांसाठी बनवलेल्या छावणीमध्ये त्यांची रवानगी झाली. तेथून त्याचे व त्यांच्या भावाचे इंग्रजी भाषेवर प्रभुत्व नाटोच्या अधिकाऱ्यांच्या कामी आले. त्याचा भाऊ दुभाषी म्हणून काही काळ कार्यरत होता. मात्र त्यांच्या कुटुंबाला तालिबानकडून पहिली वॉर्निंग मिळाली आणि दुसऱ्या वॉर्निंगनंतर त्यांना जर्मनीमध्ये पाठविण्यात आले. आता शेर खानने हे तालिबानी वॉर्निंग प्रकरण थोडक्यात असे सांगितले : त्याचा उस्ताद, जो त्याला अफगाण शाळेत तालीम द्यायचा, तोसुद्धा काही काळ नाटोच्या अधिकाऱ्यांचा दुभाषी होता: त्यास जर्मन, इंग्रजी ह्या भाषा येत होत्या व महिन्याला काही हजार डॉलर इतका त्याचा पगार होता. मात्र तालिबानकडून त्यास पहिली, दुसरी वॉर्निंग आली की, हे काम सोडून दे. पण ह्यावर उत्तर म्हणून त्याची पगारवाढ करण्यात आली व उस्तादने आपले काम चालूच ठेवले. एके दिवशी तालिबानकडून त्याचे अपहरण करण्यात आले व त्याच्या मानेवरून सुरी फिरवण्यात आली. स्थानिक भागात सीडी वाटप करून ह्याचे चित्रीकरण दाखविण्यात आले.

हे ऐकून माझी वाचा बंद झाली होती, पण काहीतरी विचारायचे म्हणून उगाच अवसान आणून मी त्याला विचारले," अरे, सुरी ही नेहमी गळयावरून फिरवतात. मग हे मानेवरून का बरे? "ह्यावर शेर खान म्हणाला, "गळा चिरला की काम लगेच तमाम ,मानेवरून सुरी फिरली की तडफड..."

अफगाणिस्तान ,आपली मातृभूमी आपल्याला कायमची तुटली ह्याबद्दल खोल वेदना त्याचा बोलण्यातून जाणवत होती. त्याचा भाऊ ह्याच हॉटेलात काम करायचा. त्याने ह्याच्या बॉलिवूड प्रेमाबद्दल सांगितले. शाहरूख, सलमान खान हे पाकिस्तानात आवडते कलाकार. विशेषतः ते पठाण म्हणून ह्यांचा जिव्हाळ्याचा विषय. शाहरूख खानला एकदातरी पाहावे ह्या हेतूने भारतीय व्हिसा घेण्यासाठी शेर खान घरातून चक्क पळाला. पाकिस्तानातील भारतीय दूतावासाच्या बाहेर कितीतरी दिवस रांगेत होता. खिशात पाकिस्तानी दोन हजार रुपये. शेवटी त्याला कसेबसे समजावून घरी आणले.

शाहरूखला प्रत्यक्ष पाहण्यासाठी तो बर्लिनला जाऊन आला. ओम् शांती ओम् च्या प्रीमियरसाठी शाहरूख तेथे आला होता. सलमान आणि कतरिना ह्यांच्या ब्रेकअपची न्यूज वाचून ह्यांचा जीव तडफडला. सगळेच पठाणांना स्वतःच्या कामासाठी वापरून मग वाऱ्यावर सोडतात. सलमानचा वापर करण्यात आला आहे, अशी त्याची ठाम समजूत व त्यास सहानुभूती.

ह्या लोकांच्या डोक्यात कधी काय येईल हे कुणीच सांगू शकत नाही. मात्र तेथे मी एक गोष्ट अनुभवावरून शिकलो होतो : चर्चा राजकारणावर असो किंवा इतर कोणत्याही भाकड विषयावर, ती वादविवाद स्पर्धा आहे असे समजून मी कधीही वाद घालत नाही किंवा प्रतिवाद करत नाही. वाक्यात शक्यतो साखरपेरणी करत एखादा शालजोडीतील हाणून ह्या लोकांना त्यांच्या वाक्यातील फोलपणा किंवा त्यांच्या चुका दाखवतो. वादासाठी वाद करणे म्हणजे सशस्त्र हिंसक कृत्यांना आमंत्रण देणे.

ह्या लोकांचे विश्व वेगळे, ह्यांची मानसिकता व जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा आहे. शाहरूखचा माय

नेम इज खान हा चित्रपट शेर खानने जर्मनीत सात वेळा थेटरात जाऊन पहिला, तेही युरोमध्ये दक्षिणा देऊन.

ह्यामागील कहाणीसुद्धा अशीच रोचक आहे. त्याच्या क्लासमधील जर्मनीत जन्मलेल्या तुर्की मुलीशी त्याची ओळख झाली. शाहरूखच्या सिनेमाला येतेस का? असे तिला त्याने विचारले तर हा अफगाण नागरिक असल्याचे तिला कळले. तेव्हापासून तिने ह्याच्याशी बोलणे टाकले. जर स्वधर्मीय अशी वागणूक देत असतील, तर इतरांकडून काय अपेक्षा करायची? असा प्रश्न त्याला पडला. हा सिनेमा पहिल्यांदा पाहिल्यावर त्याने दुसऱ्या दिवसभर वर्गात त्या तुर्की मुलीला" ,माय नेम इज खान, अँड आय एम नॉट अ टेररिस्ट "हे जर्मन भाषेत सुनावले. अफगाणिस्तानमध्ये भारतीय विकास कामे करत आहेत, ह्यांचे त्याला कौतुक वाटते. त्याच्या चुलत भावाला रात्री अचानक ताप आला, तेव्हा भारतीय डॉक्टरने त्याला रात्री दवाखान्यात भरती करून त्यांचे प्राण वाचवले, ही गोष्ट आजही त्याच्या मनात घर करून राहिली. म्हणूनच की काय, त्यांच्या छावणीत नामांकित पाकिस्तानी संस्थांचे काही मुल्ला जेव्हा किशोरवयीन मुलांना जन्नतमध्ये जायचा राजमार्ग दाखविण्यासाठी आले होते, तेव्हा त्याने त्या गोष्टीकडे पाठ फिरवली होती. आपल्या सरकारने अफगाणिस्तानच्या रस्त्यावर प्रवासासाठी काही भारतीय बसेस दिल्या आहेत. त्यावर अफगाणी भाषेत 'फ्रॉम इंडिया विथ लव्ह' असे लिहिलेले असते. ह्या सगळ्या गोष्टींमुळे अफगाणी जनतेत भारतीयांविषयी चांगली भावना आहे. आय.एस.आय. आणि पाकिस्तानी सरकारची मात्र 'किराये के कातिल' अशी संभावना करतात.

गंमत म्हणजे तेथील तालिबान असो किंवा हक्कानी नेटवर्क, भारतीय विकास कामाच्या शक्यतो मध्ये येत नाहीत, कारण ह्या सुविधांची फळे त्यांनासुद्धा चाखायला मिळतात. उर्वरित जग त्यांच्यावर आकाशातून बॉंबवर्षाव करत असते.

सतत युद्धाच्या छायेत राहून त्यांच्या पिढीला मानसिक नैराश्य आलेले त्याच्या बोलण्यातून नेहमी जाणवायचे.

तालिबानी हल्ल्यात तुटलेला एक पूल भारतीय लष्कराने काही दिवसात पूर्ववत केला. कामाचा हा तडाखा पाहून गोरे लोक स्तिमित झाले. इति शेर खान.

मला भारतीय लष्कराबद्दल अभिमान वाटला ,त्याच वेळी माझ्या डोळ्यासमोर भारतात लोकशाहीत आमच्या कुर्ल्याचे व सांताक्रूझचे उड्डाणपूल राजकीय दबाव व इतर कारणास्तव ५ वर्ष अर्धवट अवस्थेत पडल्याचे चित्र दिसत होते.

पुढे एका इराकी माणसाशी त्याचा भावाचे कडाक्याचे भांडण झाले. त्या दिवशी अरब व अफगाण भाषेतून अनेक शिव्या कानावरून गेल्या आणि ह्या दोन्ही भावांनी हॉटेल सोडले. भविष्यात डॉक्टर होण्यासाठी मी त्याला शेवटच्या दिवशी शुभेच्छा दिल्या. पुढे फ्रॅंकफर्ट सोडून आम्ही म्युनिचला राहायला आलो, पण ह्या कामानिमित्त जगभरातील निर्वासित व त्यांच्या विलक्षण कहाण्या माझे अनुभवविश्व समृद्ध करून गेल्या. ह्याच विश्वाचा एक भाग असलेल्या शेर खानच्या आठवणी आज माझ्याकडून लिहिल्या गेल्या.

# ॲनिमल्स आशिया

## प्रदीप

जिल रॉबिन्सन ह्या ब्रिटिश स्त्रीस लहानपणापासूनच जनावरांविषयी प्रेम होते, व त्यामुळे तरुण वयात तिने ब्रिटनमध्येच व्हेटर्नरी डॉक्टरच्या मदतनिसाचे काम केले होते. १९८५ साली तिच्या नवऱ्यासमवेत ती हाँगकाँग येथे गेली. तिथेही तिने व्हेटर्नरी डॉक्टरच्या मदतनिसाचे काम पत्करले. तिथे जनावरांच्या संबंधित कार्य करणाऱ्या 'इंटरनॅशनल फंड फॉर ॲनिमल वेल्फेअर' ह्या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या आशियातील प्रमुखाशी तिची ओळख झाली. जिलने ह्या संस्थेसाठी ह्यापुढील ११ वर्षे काम केले. आशियाई देशांतून जनावरांना मिळणाऱ्या क्रूर वागणुकीची अनेक उदाहरणे तिला ह्या काळात स्वतःला पाहता आली. १९९८ साली तिने स्वतः 'ॲनिमल्स आशिया' ही संस्था स्थापन केली.

चीनमध्ये अस्वलांचे अनेक 'फार्म्स' आहेत. ह्यात एकेकटी अस्वले अगदी छोट्या पिंजऱ्यात कोंडून ठेवतात. त्यांच्या शरीरात विशिष्ट ठिकाणी भोक पाडून त्यातून नळी आत सारतात, जिच्यामार्गे त्यांचे पित्त (bile) बाहेर खेचले जाते. काही मानवी व्याधींवर हे उत्तम इलाज आहे, असा समज असल्याने ह्या फार्म्सचे मालक ते विकून पैसा कमावतात. अस्वले अत्यंत वाईट परिस्थितीत जखडून ठेवलेली असतात, त्यातून त्या नळीने त्यांचे पित्त (bile) सतत शोषण केले जात असतेच. कालांतराने ती व्याधिग्रस्त होतात, जखमेत सेप्टीक होते, व त्यांचा क्रूर अंत होतो.

१९९३ साली IFAW संस्थेसाठी काम करीत असताना जिलच्या नजरेत असा एक फार्म आला होता. हे क्रूर उपक्रम बंद करण्यासाठी जे काही प्रयत्न करावे लागतील, ते आपण केले पाहिजेत, असे तिने तेव्हाच मनोमन ठरवले होते. ॲनिमल्स आशिया स्थापन करावयाच्या अगोदरच १९९५ साली एका अस्वलाची सुटका करण्यात तिला यश आलेले होते.

तरीही ह्या फार्म्समधून अस्वलांची सुटका करणे व असे फार्म्स बंद करवणे हे अर्थात अत्यंत जिकिरीचे काम आहे, ह्याची जिलला कल्पना आहे. म्हणून ह्या कार्यासाठी तिच्या संस्थेने अत्यंत विचारपूर्वक धोरणाची आखणी केलेली आहे. 'चीनमधील अस्वलांची सुटका' ह्या उपक्रमासाठी स्थानिक सरकारे, समाज व या फार्म्समध्ये ज्यांचे व्यवहार गुंतले आहेत, अशा व्यक्ती ह्या सर्वांशी झगडा न उभारता, त्यांना विश्वासात घेऊन, त्यांच्याशी सुसंवाद साधत हे कार्य केले, तरच त्यात यश आहे, हे अगदी प्राथमिक धोरण संस्थेने ठरवले. २००० साली संस्थेने चिनी सरकारशी ह्या फार्म्समधून ५०० अस्वलांची सुटका करण्याचा करार केला, तेव्हापासून ह्याची अंमलबजावणी सुरू झालेली आहे. असे करताना अस्वलांच्या पित्ताव्यतिरिक्त (bileव्यतिरिक्त) झाडपाल्यापासून बनवलेली इतर काही औषधी अधिक उपकारक आहे, हे संस्थेने साधार दर्शवून दिले. तसेच सदर फार्म्स बंद केल्यामुळे त्यांच्या मालकांस सरकारकडून नुकसानभरपाई मिळवून देण्याची जबाबदारीही संस्थेने घेतली.

नंतर ह्याच उपक्रमास थोडे पुढे नेऊन संस्थेने २००६ साली व्हिएतनाम येथील २०० अस्वलांची सुटका करण्याचा तेथील सरकारशीही असाच करार केला. आजतागायत जिलच्या ह्या संस्थेने चीनमधून व

व्हिएतनाममधून मिळून ४०० अस्वलांची सुटका केलेली आहे. अस्वले असलेली ही फार्म्स आता बंद झालेली आहेत. सुटका झालेल्या अस्वलांसाठी संस्थेने चीनमध्ये व व्हिएतनाममध्ये खास छावण्या उभारल्या आहेत. ह्या छावण्यांत व्हेटर्नरी डॉक्टर्स, तसेच प्रशिक्षित नर्सेस इत्यादी कर्मचारी वर्ग आहे.

एकट्या चीनमध्येच अजून सुमारे १०,००० अस्वले अशाच फार्म्समध्ये बंदिवासात आहेत. हे कार्य विशाल स्वरूपाचे आहे, अजून बरीच मजल मारावयाची आहे, ह्याची जिल व तिच्या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना जाणीव आहे.

आग्नेय आशियात इतर जनावरांनाही अनेकदा क्रूर वागणूक दिली जाते. गेल्या दहाबारा वर्षांत चीनमध्ये खाजगी प्राणिसंग्रहालये, तसेच सफारी पार्क्स सुरू झालेले आहेत. ह्या पार्क्समध्ये वाघ, तरस, अस्वले इत्यादी प्राणिभक्षक जनावरे असतात. प्राणिसंग्रहालयास भेट देणाऱ्या पाहुण्यांच्या 'मनोरंजनाप्रीत्यर्थ' दररोज ह्यांचा एक 'खेळ' असतो, त्यांच्यासाठी टाकलेल्या भक्ष्यावर झडप घालून पाहुण्यांसमोर त्याचा फन्ना उडवणे, हा! ह्यासाठी शेळी, कोंबडी, गाय इत्यादी जनावरे बळी दिली जातात. जिलच्या संस्थेने असल्या उपक्रमांची पाहणी सुरू केली व त्यांची मोजदाद ठेवलेली आहे. तसेच ह्या अघोरी प्रथेवर बंदी घालण्याच्या दृष्टीने संस्थेने सरकारबरोबर बोलणी सुरू केलेली आहेत. ह्यामुळे जगापुढे देशाची प्रतिमा डागाळते, असे सरकारला पटवून देऊन बंदीविषयक विधेयक पुढे करता येईल, असा संस्थेचा विचार आहे.

ह्याबरोबरच संस्थेने 'डॉक्टर कुत्रे' हा उपक्रमही अंगीकारला आहे. कुत्रे माणसांचे नि:स्पृह मित्र असतात, तेव्हा इस्पितळे, विकलांग माणसांसाठी असलेली आधारगृहे, अनाथालये, येथे संस्थेच्या मदतीने खास प्रशिक्षण दिलेल्या कुत्र्यांना नेऊन त्यांच्यातर्फे तेथील निवासी रुग्णांवर, वृद्धांवर अथवा विकलांग व्यक्तींवर 'ॲनिमल थेरपी' करणे, हा तो उपक्रम होय.

१९९१ साली हाँगकाँग येथील बालकांच्या एका रुग्णालयात स्वतःचा कुत्रा नेऊन जिलने ह्याची सुरुवात केली होती. अस्वलांच्या फार्म्सचे कार्य थोडे मार्गी लावल्यावर तिने संस्थेतर्फे हे कार्यही अंगीकारले आहे.

अनेक संस्थांनी व सरकारांनी जिलला वेळोवेळी पदके देऊन तिच्या ह्या सर्व कार्याची नोंद घेतलेली आहे.

जिलच्या संस्थेची सविस्तर माहिती तिच्या संस्थळावर मिळू शकते.

# रंगीत चिरोटे
सानिकास्वप्निल




**साहित्यः**

१ वाटी मैदा, १/४ वाटी पिठीसाखर

१ टेस्पून तूप मोहनासाठी

२ टेस्पून तूप + २ टेस्पून कॉर्नफ्लोअर एकत्र करून साटा तयार करणे

खायचा शेंदरी रंग २ थेंब

पोळीवर साटा लावून दुसरी पोळी ठेवावी, परत साटा लावून तिसरी पोळी ठेवावी व पुन्हा साटा लावून चौथी पोळी ठेवावी.

१ टीस्पून दुधात केशर मिसळून घेतलेले, तळण्यासाठी तूप, सजावटीसाठी पिस्त्याचे काप





**पाकृ:**

मैद्यात थोडेसे मीठ व कडकडीत तुपाचे मोहन घालून पाण्याने किंवा दुधाने पीठ घट्ट मळून घ्यावे.

भिजवलेले पीठ अर्धा तास झाकून ठेवावे.

भिजवलेल्या पिठाच्या गोळ्याचे चार भाग करावे.

दोन भागात खाण्याचा शेंदरी रंग घालून एकत्र करावा.

एका भागात केशरमिश्रित दूध घालून एकत्र करावे व एक भाग पांढराच राहू द्यावा.

तयार उंड्यांच्या पातळ पोळ्या लाटून घ्यावा. अलगदपणे पोळ्यांचा रोल तयार करावा व त्याचे १ इंचाचे तुकडे करून घ्यावे.

तुकडे जिथून कापले आहेत, त्या बाजूने हलके दाबून लाटावे.

गरम केलेल्या तुपात तयार चिरोटे मध्यम आचेवर तळावे. चिरोट्यावर अलगदपणे तूप उडवावे, म्हणजे छान पदर सुटतात.

तळल्यावर वरून लगेच पिठीसाखर भुरभुरावी व पिस्त्याच्या कापांनी सजवावे.



# आयुर्वेद : वैद्यकशास्त्र? नव्हे जीवनपध्दती

**प्रास**



जवळपास आपल्या जन्मापासूनच जाणते-अजाणतेपणी आपला आयुर्वेदाशी संबंध आलेला असतो. मात्र ते आपल्या ध्यानात आलेलं नसतं. अगदी आजही अनेक घरांमध्ये, नुकत्याच जन्माला आलेल्या मुलांना सोनं उगाळलेलं तूप चाटवतात ,एखाद्या वेळी जुने -जाणते प्रसूतितज्ज्ञच हे काम करतात. लहान बाळांना विशिष्ट तेलाचं मालिश करतात ,त्यांना वेगवेगळ्या वनस्पतिज द्रव्यांची धुरी देतात ,पोट दुखून बाळ रडत असेल तर बाळाच्या पोटाला हिंगाचं पाणी लावतात ,तशातच ओव्याची पुरचुंडी गरम करून बाळाचं पोट शेकून घेतात .साधारण महिन्याभरानंतर त्यांना बाळगुटी चाटवणं सुरू होतं. पुढे सर्दी झाली ,लाव सुण्ठीचा लेप , लाव वेखंडाचा लेप. जुलाब झाले ,चाटवा मुरूडशेंग उगाळून ,चाटवा सुण्ठ उगाळून. मलावरोध होतोय तर चाटवा हरडा. खोकला होतोय ,तर उगाळा बेहडा नि चाटवा ,तुळशीची पानं उकळून केलेलं पाणी पाजा. मूल कुठे पडलं नि त्याला जखम झाली तर दडप त्यावर हळदीची पूड. असं या ना त्या प्रकारे प्रत्येक भारतीयाला आयुर्वेदाचं बाळकडू तेव्हापासूनच मिळू लागतं, असं म्हणणं अयोग्य होणार नाही. कारण या साऱ्याच गोष्टी करण्याचा उपदेश आयुर्वेदामध्ये केलेलाच आहे. म्हणजेच, आयुर्वेद हा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. पण आपल्याला मात्र याची जाणीव नसते, असंच म्हणावं लागतं. आजच्या काळाच्या अनुषंगाने असं होणं स्वाभाविकच म्हटलं पाहिजे.

आज आयुर्वेदाचं समाजामधलं स्थान झाडपाल्याचं औषध इतकंच मर्यादित झालेलं आढळतं. अर्थात आयुर्वेदामधली रसौषधी आजही आपलं स्वतंत्र स्थान टिकवून आहेत. पण सामान्यत:' घासफूसकी दवा ' म्हणजे आयुर्वेद, असं समीकरण झालेलं आहे. यामागे आज बहुतांशी समाजमान्यता मिळालेलं' आधुनिक वैद्यक 'असणं सहज शक्य आहे. आधुनिक वैद्यकाने औषधींच्या प्रयोगाच्या मार्गामध्ये आमूलाग्र बदल घडवून आणलेला आहे. त्यांची रासायनिक औषधी शरीरात प्रयुक्त करण्याची विविध माध्यमं आज उपलब्ध असल्याने आणि त्यांच्या तीव्र कार्यकारित्वामुळे आयुर्वेदोक्त माध्यमं काही अंशी कालबाह्य मानली जाऊ लागली आहेत. यामुळे आयुर्वेदाला घरगुती औषधांचं स्वरूप मिळाल्याचं दिसून येत आहे. पण मुळात आज ज्याला आपण आयुर्वेद समजतोय ,तोच खरा आयुर्वेद आहे का ?किंबहुना आयुर्वेद नेमकं कशाला म्हणायचं? आधुनिक वैद्यकाप्रमाणे आयुर्वेद ही केवळ एक चिकित्सा पद्धती आहे, की तिचा आवाका त्या पलीकडेही

पसरलेला आहे ?या आणि यासारख्या इतर प्रश्नांची उत्तरं मिळवण्याचा प्रयत्न म्हणून हा लेखन-प्रपंच!

आयुर्वेदाला व्यवस्थित जाणून घ्यायचंय ,आयुर्वेदाची नीट ओळख करून घ्यायचीय तर आपल्याला` आयुर्वेद ’ या नावापासूनच सुरुवात करावी लागते. आयुर्वेद या नावामध्ये मुळातच आयुः आणि वेद या दोन संस्कृत शब्दांची सांगड घातलेली आहे. यापैकी आपण` वेद ’या शब्दाशी चांगलेच परिचित आहोत. वेद हे प्राचीन ग्रंथ म्हणून भारतीयांना माहीत आहेत. तरी सुरुवातीला त्या अर्थी न घेता आपण वेदाचा शाब्दिक अर्थ विचारात घेऊ.

व्युत्पत्तिशास्त्राप्रमाणे` ,विद् ज्ञाने बोधे ’या मूळ धातूनुसार वेद या शब्दाचे` ज्ञान ’आणि` बोध ’असे अर्थ आपल्याला मिळतात. आता दुसरा शब्द` आयु ,’याचा अर्थ सहज स्पष्ट आहे. आयुः म्हणजे आयुष्य ;आपला किंवा म्हटलं तर कोणत्याही सजीवाचा जीवनकाळ. मग` आयु अर्थात आयुष्यासंबंधीचं ज्ञान’ असा आयुर्वेदाचा अर्थ आता निश्चित होतो. म्हणजेच, आयुविषयक ज्ञान देणारे शास्त्र म्हणजे आयुर्वेद. मग पुढे ग्रंथ या अर्थाने आयुष्याविषयी ज्ञान देणारा ग्रंथ तो आयुर्वेद, असं आपल्याला म्हणता येतं. म्हणजेच "आयुरस्मिन् विद्यते ,अनेन वाSSयुर्विन्दतीत्यायुर्वेदः।) ”सुश्रुत संहिता सूत्रस्थान.)

ज्यात आयु असते किंवा ज्यातून आयुचं ज्ञान होतं तो आयुर्वेद, असं सुश्रुत संहिता सांगते. आयुर्वेद अशा नावाचा ग्रंथ सध्या उपलब्ध नसला तरी या विषयाला वाहिलेल्या संहिता ग्रंथांमधून आयुर्वेदाचा अभ्यास केला जातो. आयुर्वेदाविषयीचं ज्ञान संग्रहित केलेल्या संहिता अनेक असल्या, तरी मूळ संहिता ग्रंथांमध्ये प्रामुख्याने चरक संहिता ,सुश्रुत संहिता आणि वाग्भट संहिता यांचा अंतर्भाव होतो. आयुर्वेदाचा सामान्य अर्थ समजून घेतल्यानंतर त्यातल्या विशेष अर्थाकडे आता लक्ष देऊ. आयु म्हणजे जीवन. जीवन म्हणजे जन्मापासून ते मृत्यूपर्यंतचा काळ हे जरी सर्वमान्य असलं, तरी यामधून नव्या प्रश्नांची उत्पत्ती होते. जन्म म्हणजे काय ?तो नेमका कसा होतो ?कधी होतो ?त्याचप्रमाणे मृत्यू म्हणजे काय ?तो नेमका कसा होतो ?कधी होतो ?जन्म-मृत्यू होण्यापूर्वी आणि नंतर काय स्थिती असते ?त्यांच्या दरम्यान जीवन सुरू असतं, म्हणजे नेमकं काय सुरू असतं ?हे आणि यासारखे अनेक प्रश्न उत्पन्न होत असल्याने आपल्याला मूळातच` आयु ’म्हणजे काय ते समजून घ्यावं लागतं. आयुर्वेदामध्ये याचाही विचार केलेला आहे. आयुची आयुर्वेदात सांगितलेली व्याख्या अशी आहे–

"शरिरेंद्रियसत्त्वात्मसंयोगो ...... आयुरुच्यते।) ”चरक संहिता सूत्रस्थान.)

अर्थात ,शरीर ,इंद्रिये ,मन आणि आत्मा यांचा संयोग म्हणजे आयु, म्हणजेच जीवन. या व्याख्येमुळे आपल्याला आयुष्याकडे पाहण्याची एक नवी दृष्टी मिळते. आपला जन्म म्हणजे आपलं शरीर ,आपली इंद्रिये ,आपलं मन आणि आपला आत्मा यांचा संयोग ;आपला मृत्यू म्हणजे त्यांचा वियोग, तर आयुष्य म्हणजे संयोग-वियोगादरम्यानचा काळ. तेव्हा आता आयुर्वेद म्हणजे शरीरादिकांचा संयोग टिकवून कसा ठेवता येईल, हे ज्ञान देणारं शास्त्र ,असं आपल्याला समजतं.

शरीरादिकांचा संयोग टिकून राहण्यासाठी त्यांचं व्यवस्थित पोषण होणं आवश्यक असतं. त्यातही लौकिक अर्थाने शरीरामध्येच इतर तीन तत्त्वं उपस्थित असल्याने शरीराचं योग्य पोषण झाल्यास हा संयोग अधिक काळ टिकून राहण्याची शक्यता असते, असं आपण नक्कीच म्हणू शकतो. मग आता या शरीराच्या

पोषणासाठी सर्वाधिक महत्त्वाचे ठरतात आहार आणि विहार. तेव्हा आता आयुर्वेद म्हणजे शरीरादिकांच्या पोषणासाठी त्यांच्या आहार-विहारासंदर्भातलं ज्ञान देणारं शास्त्र, असं आपल्याला समजतं.

आता या आहार-विहारांशी संबंधित कोणकोणत्या शक्यता उपस्थित होतात, याचा विचार करू. शरीराशी निगडित सहजभाव हा सुखदुःखाशी संबंधित असतो. शरीरासाठी कोणतेही श्रम न होणं ,भुकेची संवेदना जाणवल्यावर भोजन मिळणं ,ते आपल्या आवडीच्या चवीचं ,भरपूर नि रुचकर असणं हे सुखकर असतं; तर शरीराला श्रम करायला लागणं ,भुकेच्या वेळी भोजन न मिळणं ,मिळाल्यास आवडत्या चवीचं न मिळणं ,न पुरणारं ,न रुचणारं मिळणं हे दुःखकर असतं. याशिवाय काही वेळेला आहार भरपूर उपलब्ध असूनही तो प्रमाणात खाणं हे शरीरासाठी योग्य अर्थात हितकर असतं. तोच आहार प्रमाणाबाहेर खाणं अयोग्य अर्थात अहितकर असतं. तसंच, शरीरासाठी अन्नपचनादी क्रियांच्या दृष्टीने शरीराचं आवश्यक तेवढं चलनवलन होणं योग्य अर्थात हितकर असतं आणि ते तसं न होणं अयोग्य अर्थात अहितकर असतं. म्हणजेच, आपल्यासमोर आहार-विहारांच्या संबंधात सुखकर ,दुःखकर ,हितकर आणि अहितकर अशा चार शक्यता निर्माण होतात. आता शरीरादिकांसाठी सुखकर आणि दुःखकर काय आहे, हे शरीरादिक स्वतःच ठरवू शकतात आणि त्यातही सुखकरत्वाकडे त्यांचा साहजिक ओढा असणार, हे गृहीत आहे. पण ही गोष्ट त्यांच्यासाठी योग्यच असेल असं मात्र त्यांना निश्चितपणे ठरवता येणार नाही. म्हणजेच त्यांच्यासाठी हितकर काय आणि अहितकर काय, हे कळणं आवश्यक ठरतं. आता हे जर व्यवस्थित लक्षात आलं असेल तर आता शरीरादिकांचं व्यवस्थित पोषण होण्यासाठी हितकर काय व अहितकर काय, हे सांगून त्यांचा संयोग अधिक काळपर्यंत टिकवून ठेवण्याचं ज्ञान देणारं शास्त्र ते आयुर्वेद ,असं आपण नक्की म्हणू शकतो. वरती आपण म्हटलं आहे की शरीर ,इंद्रिये ,मन आणि आत्मा यांचा वियोग होणं म्हणजे मृत्यू. मृत्यू म्हणजे आयुष्याची अखेर. तेव्हा आयुर्वेदाची व्याप्ती तिथवरच. पण आयुर्वेद मानतो की शरीरादिकांचा संयोग ही जशी सहज क्रिया आहे, तसाच त्यांचा वियोग हीदेखील एक सहज प्रक्रिया असावी. मात्र त्यासाठी जी वेळ ठरली आहे, त्या वेळेपर्यंत तो संयोग टिकवण्यासाठी आवश्यक ते ज्ञान आयुर्वेद आपल्याला त्यातल्या तत्त्वांच्या साहाय्याने मिळवून देतो. पिकलेलं फळ ज्याप्रमाणे स्वप्रेरणेने झाडापासून विलग होतं, त्याचप्रमाणे मृत्यूची प्रक्रिया व्हावी ,असं आयुर्वेद मानतो. अशा प्रकारे नियत काळात घडलेल्या मृत्यूला आयुर्वेद काल-मृत्यू मानतो. व्याधी आदि इतर कारणांनी आलेला मृत्यू आयुर्वेद अकाल-मृत्यू मानतो. तेव्हा एका अर्थाने आयुर्वेद आपल्याला आयुष्याच्या प्रमाणाचं ज्ञान देतो ,असंच म्हणावं लागतं.

सर्व गोष्टींना अनुसरून चरक संहिता आयुर्वेदाची व्याख्या सांगते–

हिताहितं सुखंदुःखं आयुस्तस्य हिताहितम्।

मानं च तच्च यत्रोक्तमायुर्वेदः स उच्यते॥ (चरक संहिता सूत्रस्थान)

अर्थात, ज्या शास्त्रामध्ये हिताहित ,सुखदुःख या चारांपैकी हित-अहित तत्त्वांचं (आहार-विहारादींच्या संबंधाने) ज्ञान दिलेलं आहे ,आयुच्या प्रमाणाचं ज्ञान दिलेलं आहे, त्याला आयुर्वेद असं म्हणतात. चरक संहितेमध्ये दिलेलं आयुर्वेदाचं प्रयोजन हा या संदर्भामधला एक महत्त्वाचा मुद्दा म्हणता येईल. "प्रयोजनं चास्य (आयुर्वेदस्य) स्वस्थस्य स्वास्थ्यरक्षणमातुरस्य विकारप्रशमनं च। "चरक संहिता सूत्रस्थान.

अर्थात ,स्वस्थ व्यक्तीच्या स्वास्थ्याचं रक्षण हे आयुर्वेदाचं प्रमुख प्रयोजन आहे. त्यासाठी म्हणजेच स्वस्थ व्यक्तींमध्ये कोणत्याही रोगांची उत्पत्ती होऊ नये यासाठी योग्य आहार-विहारादींचं ज्ञान आयुर्वेद प्राधान्याने देतो. या ज्ञानाचा योग्य वापर करूनही इतर कारणांमुळे व्यक्तीमध्ये रोगनिर्मिती झालीच, तर त्या रोगाचं निर्दालन व्हावं आणि व्यक्तीला स्वास्थ्याची, आरोग्याची पुन:प्राप्ती व्हावी यासाठी उपयुक्त अशा चिकित्सेचं ज्ञानही आयुर्वेद आपल्याला देतो. एकंदरीत आरोग्याचं रक्षण करणं आणि रोगांना दूर ठेवणं हे आयुर्वेदाचे दोन हेतू आहेत असं म्हणता येतं.

आयुर्वेदाचं प्रयोजन व्यवस्थित समजून घेतलं तर असं म्हणता येतं की रोगनिर्मिती होऊच नये असा आयुर्वेदाचा मूळ उद्देश आहे. त्या हेतूने खाण्या-पिण्यात योग्य काय ,अयोग्य काय ?आपली दिनचर्या कशी असावी ?ऋतूनुसार निरनिराळ्या वातावरणात आपल्या आहार-विहारात काय बदल करावा ?कसा बदल करावा ?कशाचा अंतर्भाव अन्नात होतो ?त्यांचे गुणधर्म कोणते ?विविध अन्नपदार्थ कसे बनवले जातात ? शिजवलेल्या अन्नाचे गुणधर्म कोणते ?अन्नाची चव म्हणजे नेमकं काय ?अन्नाची शक्ती कशात असते ? अन्न-ग्रहणाचे नियम कोणते ?अन्नाचं प्रमाण कालपरत्वे कसं असावं ?व्यायाम म्हणजे काय ?तो कधी करावा ?कसा करावा ?किती करावा ?आयुष्याचं तत्वं समजून घेण्यासाठी कोणत्या मूलभूत ज्ञानाची आवश्यकता असते ?आपलं शरीर द्रव्यात्मकतः कसं उत्पन्न होतं ?शरीराचं कार्य कसं चालतं ?इंद्रियांची उत्पत्ती कशी होते ?त्यांचं शरीरातलं स्थान काय ?मन म्हणजे नेमकं काय ?ते कुठे असतं ?काम कसं करतं? आत्म्याचं शरीरातलं अस्तित्त्व कसं जाणावं ?शरीरादिकांचं पोषण कसं होतं ?आपलं आरोग्य कसं टिकवून ठेवावं? हे समजून घेण्यासाठी या आणि यासारख्या प्रश्नांच्या उत्तरांचा खूपच उपयोग होतो ;आणि आयुर्वेद या संबंधी प्रामुख्याने ऊहापोह करतो.

आरोग्य टिकून राहण्याच्या दृष्टीने सांगितलेल्या नियमांचं पालन करूनही जेव्हा इतर कारणांनी शरीरात रोगनिर्मिती होते ,तेव्हा तो रोग दूर करून पुन्हा आरोग्यप्राप्ती करणं हादेखील आयुर्वेदाचा हेतू असतो. या अनुषंगाने आयुर्वेदात शरीरामध्ये निर्माण होणारया रोगांची अधिक माहिती दिलेली आहे. संहिता ग्रंथांमध्ये व्यवस्थित शास्त्रीय पद्धतीने ही माहिती देण्यात आलेली आहे. शरीरात उत्पन्न होणारया रोगांची कारणं ,रोग निर्माण होण्यापूर्वी दिसणारी पूर्वरूपं ,रोगांची लक्षणं ,शरीरामध्ये रोगनिर्मिती होण्याची प्रक्रिया यांची माहिती देतानाच आयुर्वेद त्यावर करता येणारी चिकित्सा आधी सूत्ररूपात देतो आणि बरोबरच औषधी द्रव्यांच्या स्वरूपात देतो. त्या औषधी द्रव्यांच्या चिकित्सेसाठी वापरायच्या वेगवेगळ्या पद्धतींचीही तो माहिती देतो. रोगांचं शमन होताना किंवा झाल्यावर शरीर कोणती लक्षणं दाखवतं ,ज्याद्वारे आपण समजू शकतो की शरीरातून रोगनिवृत्ती झाली आहे, याची माहितीही आयुर्वेद आपल्या संहिता ग्रंथांमधून विशद करतो. शरीरामध्ये रोग निर्माण झालेला असताना कशा प्रकारचं पथ्यापथ्य पाळायचं ?याचाही ऊहापोह आयुर्वेदात केलेला आहे. पुढे केवळ आरोग्याची पुन:प्राप्ती इथेच न थांबता शरीराची झालेली झीज भरून काढण्यासाठी आणि पुन्हा अशीच रोगनिर्मिती न होण्यासाठी ,शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढवण्याचे उपायही आयुर्वेद स्पष्ट करतो.

आयुर्वेद शास्त्राची निर्मिती आपल्या देशातली आहे ,त्यातले विषय आपल्या जीवनाशी निगडित असे आहेत, त्यात सांगितलेली आहारीय तथा औषधी द्रव्ये नैसर्गिक आणि आपल्या मातीतली आहेत ,त्यात वर्णन

केलेली चिकित्सा-सूत्रे आपल्या अनुभवांना आणि परंपरेला साजेशी आहेत ,त्याचप्रमाणे त्यात विशद केलेले नियम बहुतांशी आपल्या सवयीचे आहेत.

आत्तापर्यंत झालेल्या विवेचनामधून आपण आयुर्वेदाबद्दल मूलभूत माहिती घेतली. या माहितीवरून आपल्या सहज ध्यानात येईल की आयुर्वेद हे केवळ रोग दूर करण्यासाठीचं शास्त्र नसून, कोणत्याही प्रकारचे रोग होऊ न देता आपलं नियत आयुष्य पुरेपूर मात्रेत व्यतीत करण्यासाठी सर्वांनी आचरावी अशी एक जीवनपद्धती आहे. या जीवनपद्धतीच्या आचरणातूनच शारीर-मानस आरोग्यप्राप्ती घडून आपण जीवनातील , धर्म ,अर्थ आणि काम या अत्यंत आवश्यक अशा तीन पुरुषार्थांच्या प्राप्तीसाठी प्रवृत्त होऊ शकतो. म्हणूनच वाग्भटाचार्य म्हणतात\\

"आयुः कामयमानेन धर्मार्थसुखसाधनम्

आयुर्वेदोपदेशेषु विधेयः परमादरः ॥ "वाग्भट संहिता (अष्टांग हृदय) सूत्रस्थान

अर्थात ,आयुर्वेदामधल्या उपदेशांच्या पालनाने (दीर्घ आणि स्वस्थ) अयुष्याची प्राप्ती होते आणि या (अशा) आयुच्या प्राप्तीमधून धर्म ,अर्थ आणि सुख (काम) यांची प्राप्ती शक्य होते. तेव्हा या आपल्या ,सध्या काहीशा दुर्लक्षित झालेल्या ,पारंपरिक ,आदर्श जीवनपद्धतीची पुन्हा एकदा व्यवस्थित माहिती करून घेऊ आणि आरोग्यप्राप्तीच्या पथावर पुन्हा एकदा मार्गस्थ होऊ.

# प्रवास दिव्याचा
## चतुरंग

दीपावली म्हणजे दिव्यांची ओळ. आपल्याला दिव्याचं आकर्षण अगदी लहानपणापासून असतं. लहान मुलांना आई-आजी निरांजनानं ओवाळताना तुम्ही बघाल तर ती ज्योतीवर हात मारायचा प्रयत्न करतात. संध्याकाळच्या वेळेलासुद्धा दिवेलागणीची वेळ असं म्हटलं जातं. रात्रीची वीज गेली तर विजेरी, मेणबत्ती, कंदील, पणत्या असं काही ना नाही पेटवून आपण आधी उजेड करतो, कारण अंधार नकोसा वाटतो. झोपायला शयनगृहात जावे तर पलंगाशेजारचा वाचनाचा छोटा दिवा लावून आपण पुस्तक चाळू लागतो. अभ्यास करायचा म्हटला की टेबललँप हवाच. 'कँडल लाईट डिनर'चा खास बेतही मेणबत्त्यांच्याच विशिष्ट उजेडात असतो. तर सगळं आयुष्य व्यापून टाकणाऱ्या अशा ह्या दिव्याचा प्रवास आहे तरी कसा?



तुम्हाला आश्चर्य वाटेल, परंतु माणसाला बराच पूर्वी दिव्याचा शोध लागलाय. माणसाने पहिला दिवा नेमका कधी लावला हे कळणं अवघड असलं, तरी साधारण ७०,००० वर्षांपूर्वी शेवाळाचा वातीसारखा वापर करून खोलगट दगडात प्राण्यांची चरबी वापरून दिवा लावला गेला, असं संशोधनात आढळलं आहे. २०,००० वर्षांपूर्वीपासूनचे नारळाची करवंटी, शिंपले, अंड्याचे कवच, खोलगट दगड यापासून बनवलेले दिवे सापडलेले आहेत.




पुढल्या काही हजार वर्षात उत्क्रांत होत होत ६५०० वर्षांपूर्वीच्या सुमारास माती भाजून त्याला आकार देऊन दिवे तयार करणे सुरू झाले.

आपल्याकडे दिवाळीला पणत्या वापरतो त्याच आकाराचे, परंतु व्यासाने थोडे मोठे आणि खोलगट ताम्रयुगीन दिवे पॅलेस्टाईन भागात सापडले आहेत. साधारण ४५०० वर्षे जुना दिवा.



खालचा रोमन दिवा १५०० वर्षे इतका जुना आहे. हादेखील पॅलेस्टाईन भागातच सापडला.

वात बाहेर येण्यासाठी ह्याच्या एका बाजूला व्यवस्थित गोल भोक करून ठेवलेले दिसते. ऑलिव तेल, माशाचे तेल, व्हेल ऑईल, मधमाशांचे



John Aiello

(FORMERLY HELLENIC-ROMAN COINS LTD.)

SPECIALIZING IN COINS AND BOOKS OF THE ANCIENT WORLD

P.O. BOX 324 HEWITT, NEW JERSEY 07421

To Whom It may Concern

Enclosed oil lamps are genuine teracotta oil lamps from the area of Palestine which circulated from 200 AD to about 450 AD

John Aiello
Sept 1986

मेण, तिळाचे तेल असे विविध प्रकार इंधन म्हणून वापरले जात.

आणि हे त्या दिव्याच्या अस्सलपणाबाबत खात्री देणारे प्रशस्तिपत्र.

अठराव्या शतकात युरोपात औद्योगिक क्रांतीची लाट आली, तेव्हा अगणित नवे शोध लागले. दिवा उत्क्रांत होणे इथेही अपरिहार्य होते.



हा बघा आपल्या कंदिलासारखा दिसणारा १८९० सालातला तेलाचा दिवा. संपूर्ण काचेचा असल्यामुळे दिसायलासुद्धा अतिशय सुरेख दिसतो. शिवाय त्यातलं इंधन संपत आलेलं चटकन समजतं. जाड कापडाची विणलेली वात वापरणे बहुधा ह्याच सुमारास सुरू झाले असावे. (जाताजाता - लॅंप या शब्दाचे मूळदेखील ग्रीक आहे. लॅंपास या ग्रीक शब्दाचा अर्थ 'टॉर्च' असा आहे.)

नैसर्गिक वायूवर चालणारे घरातले आणि रस्त्यातले दिवेदेखील जवळपास १८व्या शतकापासून वापरत. त्यात वापरल्या जाणाऱ्या प्रज्वलक (बर्नर) जोडणीचा हा फोटो.



जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड, अमेरिका अशा विविध देशात वेगवेगळ्या लोकांनी पेटंट घेऊन व्यावसायिक स्तरावर अशा दिव्यांचा उपयोग सुरू केला.


भारताचा विचार केला, तर आपल्याकडेही मेणबत्त्या, पणत्या, कंदील, लामणदिवे, समया, असे प्रकार होते आणि आहेत. बहुतांश वेळा सणासुदीच्या निमित्ताने किंवा उद्घाटन सोहळ्यासारख्या समारंभांच्या निमित्ताने यातल्या प्रकारांचा वापर होत असतो.

तेलाच्या दिव्याचा मुख्य तोटा म्हणजे त्यातली उघडी ज्योत, ज्यामुळे भाजणे, आग लागणे असे धोके मोठ्या प्रमाणावर संभवत. विजेचा शोध लागल्यानंतर विजेवर चालणारा दिवा शोधायला लगेचच सुरुवात झाली. थॉमस एडिसनने विजेच्या दिव्याचा शोध लावला, असा समज अजूनही बऱ्याच मोठ्या प्रमाणावर प्रचलित आहे. परंतु वस्तुस्थिती तशी नाही. ज्याला आपण बल्ब म्हणतो, त्या इनकॅंडेसंट दिव्याचा शोध एडिसनच्या बराच आधी लागला होता. परंतु जास्त काळ जळेल अशी फिलामेंट तयार करणे जमत नव्हते. एडिसन आणि त्याच्या टीमने बांबूपासून बनवलेली कार्बन फिलामेंट वापरून १२०० तास जळणारा दिवा तयार केला आणि त्याचे पेटंट घेतले. प्रथम अमेरिकी पेटंट ऑफिसने त्याला पेटंट नाकारले, कारण



दिव्याचा शोध आधीच लावलाय असे पुरावे पुढे होते. बरीच कागदी लढाई झाल्यानंतर दिव्यासाठी नव्हे, तर जास्त काळ जळणाऱ्या कार्बन फिलामेंटसाठी पेटंट दिले गेले.

कॅलिफोर्नियातल्या मेन्लो पार्कमध्ये प्रथम प्रदर्शित केलेला हा मूळ एडिसन दिवा.




आपण ज्यात बल्ब बसवतो, त्या आटेदार सॉकेटला एडिसन सॉकेट असेच नाव आजही प्रचलित आहे.

फिलिप्सने १९०४ साली बनवलेला हा दिवा. दिव्याच्या खालच्या बाजूला Nov 8 1904 अशी अक्षरे स्पष्ट दिसतात.

नंतरच्या काळात कार्बन फिलामेंटमध्ये बदल होत टंगस्टन फिलामेंट निर्माण झाली. बल्बच्या आत फक्त निर्वात पोकळीऐवजी उदासीन वायू (इनर्ट गॅसेस) वापरून फिलामेंटचे आयुष्य वाढवले गेले. परंतु एकंदर वापरलेल्या विजेच्या प्रमाणात दिला जाणारा प्रकाश बघता ९५% ऊर्जा उष्णतेच्या रूपात बाहेर फेकली जाते आणि जेमतेम ५% ऊर्जा प्रकाश मिळवण्यात कामी येते हे लक्षात आल्यानंतर, संशोधनाने पुन्हा एकदा जोर पकडला. यातून फ्लुरोसंट दिवे, म्हणजे ज्याला आपण ट्यूबलाईट म्हणतो, ते पेटले! यात काचेच्या नळीत दोन्ही बाजूला एलेक्ट्रोड असतात आणि थोडा पारा असतो. मोठ्या प्रमाणावर विद्युतदाब (हाय वोल्टेज) निर्माण करून पाऱ्याची वाफ केली जाते आणि त्या वाफेतून अतिनील (अल्ट्राव्हॉयलेट) किरण बाहेर पडतात. नळीच्या आतल्या बाजूने फॉस्फरचा थर दिलेला असतो (ज्यामुळे आपल्याला ट्यूब पांढरी दिसते). त्या थरात हे अतिनील किरण शोषले जाऊन दृश्य प्रकाश बाहेर पडतो. (काय गंमत आहे ना, शास्त्रज्ञांनी 'दिवे लावल्या'मुळे आपली 'ट्यूब पेटली'! ) ट्यूब, स्टार्टर, चोक आणि ज्यात ट्यूब बसवायची ती जोडणी, हे नुसत्या बल्ब आणि सॉकेटपेक्षा महाग पडते. परंतु ट्यूबलाईट्सची कार्यक्षमता (एफीशियंसी) बल्बपेक्षा जास्त असते, त्यामुळे विजेचे बिल कमी होऊन हे जास्तीचा खर्च वळता होऊ शकतो.

सध्याच्या 'हरित ऊर्जा' जमान्यात जास्तीत जास्त ऊर्जा बचतीचे वेध सगळ्यांनाच लागले आहेत. त्यामुळे युरोपात बल्बच्या निर्मितीवरच निर्बंध आले आहेत. अमेरिकेत २०१५पर्यंत साधे बल्ब्ज वापरातून हळूहळू नाहीसे करण्याचे धोरण अवलंबिले जाईल. इतर देशांतही हे लोण लवकरच पोहोचेल असे वाटते.

पुढे मग साधा चोक आणि स्टार्टरऐवजी इलेक्ट्रॉनिक बॅलास्ट्स शोधले गेले. वजन आणि आकार छोटा

करणे, क्षमता वाढवणे अशांसाठी याचा मुख्य उपयोग झाला. मग जमाना आला तो सीएफएलचा (कॉंपॅक्ट फ्लूरोसंट लॅंपचा). ह्यात बल्बचे एडिसन सॉकेट वापरूनच बसवता येईल अशी छोटी ट्यूब असते आणि त्याच्या तळाशी संपूर्ण इलेक्ट्रॉनिक स्टार्टर असतो.




वरचे चित्र आहे फिलिप्स कंपनीने बनवलेल्या पहिल्या सीएफएल दिव्याचे. १८ वॉट क्षमतेचा हा दिवा साध्या ६० वॉट बल्बइतकाच प्रकाश देऊ शकतो.

आहे ते सॉकेट वापरूनच विजेचा खर्च कमी करता येणे, ही युक्ती घरगुती वापरासाठी अगदी मोलाची ठरली आणि हे दिवे मोठ्या प्रमाणावर यशस्वी ठरले.


व्यावसायिक वापरासाठी (उदा. हॉटेल्स, मॉल्स इ.साठी) छोटे हॅलोजन दिवे वापरले जातात, ज्यात कमी ऊर्जा वापरून प्रखर प्रकाश मिळवला जातो. खालचे चित्र हॅलोजन दिव्याचे आहे.




रस्ते, स्टेडियम, मोठी गोदामे, जिम्नॅशियम अशा आकाराने मोठ्या जागी मात्र छोटे दिवे उपयोगी पडत नाहीत. तिथे एचडीएल दिवे (हाय इंटेन्सिटी डिस्चार्ज लॅंप्स) वापरले जातात. यामध्ये काचेच्या नळीत किंवा गोलात एक ट्यूब असते. या ट्यूबमध्ये गॅसची आणि धातूची पावडर भरलेली असते. ट्यूबच्या टोकाला इलेक्ट्रोड असतात. यामध्ये मोठा विद्युतदाब निर्माण करुन विद्युत शलाका (आर्क) तयार केली जाते. वायूमुळे शलाका तयार व्हायला मदत होते. एकदा शलाका तयार झाली की धातूची पावडर वितळून तिचा प्लाझ्मा तयार होतो. तयार झालेल्या शलाकेच्या प्रकाशाची तीव्रता प्लाझ्मामुळे कित्येक पटीने वाढवली जाऊन झगझगीत प्रकाश बाहेर पडतो. ट्यूबपेक्षा किंवा बल्बपेक्षा हे दिवे अधिक कार्यक्षम असतात, कारण खर्च केलेल्या विजेच्या प्रमाणापेक्षा ते जास्त प्रकाश

देतात.

एचडीएल दिवे -





फिलिप्स कंपनी एचडीएल दिवे बनवण्यात अग्रणी आहे. जगातल्या बहुसंख्य स्टेडियममधले दिवे हे फिलिप्सने बनवलेले आहेत.

सेमीकंडक्टरच्या (अर्धवाहकाच्या) शोधानंतर इलेक्ट्रॉनिक्स विश्वात क्रांतीच झाली. डायोड आणि ट्रान्झिस्टर यांच्या शोधांमुळे इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंचे आकारमान कमी होत गेले आणि त्यातल्या सोयीसुविधा वाढत गेल्या. दिव्यांच्या क्षेत्रातही हा शिरकाव न होता तरच नवल. एलईडी (लाईट एमिटिंग डायोड)च्या रूपाने हे नवीन जग खुले झाले. अत्यंत कमी ऊर्जा वापरून उत्तम प्रकाश मिळवता येतो, हे समजताच एलईडी दिवे तयार करण्यासाठी एकच झुंबड उडाली. ह्या दिव्यांसाठी लागणारे इलेक्ट्रॉनिक सर्किट महत्वाचे आहेच, शिवाय एलईडी हा बिंदुस्रोत (पॉइंट सोर्स) असल्याकारणाने, म्हणजे सर्वसामान्य दिव्याप्रमाणे प्रकाश चहूबाजूला फाकत नसल्याने, प्रकाश सगळीकडे एकसारखा पसरवण्यासाठी वेगळ्या प्रकारची भिंगे आणि काचेची टोपणे वापरली जातात आणि त्याची पेटंट्स घेतली जातात. फिलिप्स, जीई, सिल्वेनिया अशा कंपन्या यात आघाडीवर आहेत.

हिरवा, निळा आणि लाल अशा तीन रंगांच्या प्रकाशांचा वापर करून पांढरा दृश्य प्रकाश मिळवता येतो किंवा निळ्या एलईडीमध्ये फॉस्फरसचा वापर करून पांढरा प्रकाश मिळवता येतो. सध्या एलईडी दिवे बनवण्याचा खर्च बराच जास्त असल्याने स्टुडियोज, हॉटेल्स, पंचतारांकित सुविधा, विमानतळ, मोठ्या कंपन्यांची कार्यालये अशी ठिकाणे वगळता सर्वसामान्य घरगुती वापरासाठी हे दिवे तितकेसे वापरले जात नाहीत. परंतु यांचा उत्पादन खर्च वेगाने कमी होत आहे. वीज वापराचा खर्च कमी करण्यासाठी, शिवाय

पाऱ्यासारखी घातक द्रव्य वापरण्यावर येणारी बंधने बघता पुढल्या दहा वर्षात एलईडी दिवे मोठ्या प्रमाणावर वापरात येतील, हे निश्चित.

फिलिप्स कंपनीने तयार केलेले एलईडी मॉड्यूल






-

वरचा दिवा हा एलप्राईज लॅंप म्हणून ओळखला जातो. ६० वॉट्च्या साध्या दिव्याला पर्याय म्हणून शोधलेला आणि डिम (मंद) करता येऊ शकेल असा हा दिवा शोधून फिलिप्सने अमेरिकन ऊर्जा खात्याने ठेवलेले मिलियन डॉलरचे बक्षीस जिंकले आहे.

तर असा हा दिव्यांचा प्रवास शेकडो वर्षे सुरूच आहे. मानवाच्या प्रगतीत, आत्तापर्यंतच्या वाटचालीत ह्या दिव्यांनी दिलेले योगदान फार मोठे आहे. विजेवर चालणारे दिवे आले तरी आजही संध्याकाळी देवासमोर तेलवात करून 'दिव्या दिव्या दीपत्कार,

कानी कुंडल मोतीहार

दिव्याला पाहून नमस्कार'

असे म्हणून हात जोडून प्रार्थना करावीशी वाटते की, पुढल्या पिढ्यांसाठी पथदर्शक असे काही माझ्या हातून घडू दे, याकरता माझ्या आयुष्यात ज्ञानाचा दिवा लाव!

श्रेय अव्हेर - चित्र क्रमांक एक आणि सात आंतरजालावरून साभार.

बाकीची सर्व चित्रे फिलिप्स प्रयोगशाळा, शिकागो येथे मी स्वतः घेतलेली आहेत. स्वतःच्या खाजगी संग्रहातल्या दिव्यांची चित्रे घेण्याची अनुमती दिल्याबद्दल फिलिप्सचा संशोधक बॉब एरहार्डचा मी आभारी आहे.

# फॉरबिडन

## नगरीनिरंजन

मानवी देहाला मांस मिळाले त्याच वेळी त्याला वासनेचे बीज मिळाले ;पण हा माणूस स्वतःचा इतिहास स्वतः लिहितो आणि साऱ्या पतनाचा दोष इतरांवर ढकलत राहतो ;आणि त्यातही त्याचे कपट असे ,की या वासनेचा आनंद तर त्याला भोगायचा असतोच ,पण तिचा निर्व्याजपणे उपभोग घेण्यात त्याला पराकोटीची शरम वाटते. ज्यांना तो आपल्यापेक्षा फार हीन समजतो ,त्या जनावरांत हा स्वच्छ मोकळेपणा असतो. बागेतला पाचोळा आणि रानपाचोळा ,जनावराला दोन्ही सारखेच व आक्रमण किंवा अपराध झाला असे ठरलेच ,तर शिक्षा भोगायलादेखील त्याची तशीच सहज तयारी असते ;पण खाताना मात्र ते मळकट मनाने खात नाही. माणूस मात्र आधाश्याप्रमाणे खातो ,पण दर घासाबरोबर एक किडा खाल्ला असे समजत चेहरा नासका करून बसतो. म्हणजे एकीकडे ,न खाल्ल्याचे खुळचट पुण्य नाही ,तर दुसरीकडे ,खाऊन तृप्त झालो असा मांसल आनंद नाही. तो वासना भोगतो तेच ओशाळलेल्या मळकट मनाने ,कारण त्याच्या दृष्टीतच हा मलिन ठिपका कायमचा राहून गेला आहे.

-सर्प (जी.ए. कुलकर्णी)

* * * *

सगळं घर नीटनेटकं आवरून ते नुकतेच टेकले होते ,तेव्हा डोअरबेल वाजली. माधवने जाऊन दार उघडलं. काळ्या-पिवळ्या चेक्सचा कोपरापर्यंत बाह्या मुडपलेला कॉटनचा शर्ट ,निळसर रंगाची जीन्स आणि थोडीशी दाढी वाढलेल्या चेहऱ्यावर त्याचं नेहमीचं मोकळं बालिश हसू घेऊन किरण उभा होता. हातात पिवळ्या गुलाबांचा एक गुच्छ आणि वाईनची बाटली.

"आय वॉज शुअर! ,"तो रुंद मिश्कील हसत उजवा डोळा मारून म्हणाला" ,की आय वुड बी द फर्स्ट टू अराईव्ह. खूपच वेळेवर आलो नसेन अशी आशा आहे."

माधवने हसून त्याला आत यायला सांगितलं आणि त्याच्या मागे दार बंद केलं.

"हाय! "मानसीला तिथे उभी असलेली पाहून तो म्हणाला.

"हाय! "मानसी म्हणाली आणि तिने हात पुढे केला.

फुलांचा गुच्छ त्याने तिच्या हातात दिला " ,हे तुझ्यासाठी."

"थॅंक्स! सुंदर आहेत!"

माधवने बसायला सांगायच्या आधीच तो सोफ्यावर बसला. पाय एकमेकांवर टाकून आणि आपला एक हात सोफ्याच्या पाठीवर लांबवून दुसऱ्या हाताच्या कोपरावर रेलून तो आरामात बसला. अगदी रोजचं येणंजाणं असल्यासारखा. ऑफिसच्या कपड्यांमध्ये थोडा सडपातळ वाटणारा तो या कपड्यांमध्ये चांगला बळकट वाटत होता.

आल्यावर त्याने मानसीच्या हातात दिलेली फुलं ती कॉर्नर टेबलवरच्या व्हेसमध्ये सजवू लागली आणि माधवच्या हातात त्याने दिलेली वाईनची बाटली टीपॉयवर ठेवून माधव त्याच्या समोरच्या सोफ्यात बसला. माधवला वाटलं ,पंधरा वर्षांपूर्वी जर त्याला कोणी सांगितलं असतं की हा किरण भोगले तुझ्या घरी फुलं आणि वाईन घेऊन येईल, तर तो वेड लागल्यासारखं हसला असता. पण आज तो ते सगळं घेऊन आला होता आणि समोर बसला होता. माधव वॉज ॲम्युज्ड.

किरणने सावकाशपणे सगळीकडे नजर फिरवली.

"घर छान आहे तुमचं "!दोघांकडे आळीपाळीने पाहात तो त्याच्या घुमल्यासारख्या घोगरट आवाजात म्हणाला.
"थँक्स! गेल्या वर्षीच शिफ्ट झालो इथे. "माधव प्रसन्न हसून म्हणाला" ,ये ना. दाखवतो तुला घर." किरण किंचितसा हसला आणि त्याचे सतत हसल्यासारखे दिसणारे पिंगट डोळे मिश्कीलपणे आणखी बारीक झाले. त्याने न सांगताच त्याच्या हसण्याचं कारण माधवला कळलं आणि त्यालाही थोडं हसू आलं ,पण आता तो बोलून बसला होता. क्षणभर त्यांनी दोघांनी एकमेकांकडे पाहिलं आणि मग त्या टिपिकल रिच्युअलसाठी मनाचा हिय्या केल्यासारखा तो उठला.

रूढीप्रमाणे माधवने त्याला सगळं घर फिरून दाखवलं आणि त्यानेही रूढीप्रमाणे प्रत्येक ठिकाणी" वा वा, छान छान "असे उद्गार काढले. पण त्यात त्या पहिल्या वाक्याइतका सच्चेपणा उरला नव्हता. "बरेच दिवस झाले तुला घरी बोलवायचं होतं ,पण शेवटी आज मुहूर्त लागला. "परत जागेवर येऊन बसल्यावर माधवने त्याला म्हटलं.

"बरेच कसले ?मलाच इथे येऊन फक्त दीड महिना झालाय".

"हो ,पण आपण गेल्या दोन्ही वेळा बाहेरच भेटलो आणि प्रत्येक वेळी ये घरी म्हणायचं आणि बोलवायचंच नाही, हे बरोबर नाही. "मानसी पाण्याचा ग्लास घेऊन येता येता म्हणाली. "यू हॅव अ पॉईंट देअर "पाण्याचा ग्लास घेत तो म्हणाला" ,आय ॲम ग्लॅड यू इन्व्हाईटेड मी."

"शिवाय एनी वे आमच्या तीन-चार मित्रपरिवारांचा भेटण्याचा बेत होताच आज ,म्हटलं तुलाही ग्रूपमध्ये इनिशिएट करावं. "माधव म्हणाला.

"हां ,हे एकदम बेस्ट थिंकिंग झालं."

मग माधवने त्याला त्याच्या मित्रांची थोडी माहिती दिली. ते बऱ्याच वेळा करत असणाऱ्या ॲक्टिव्हिटीजची माहिती दिली. तो बराच उत्सुक दिसला नवे मित्र जोडायला.

"बाकी तू खूपच बदलला आहेस हं! "बाकीचं सटरफटर बोलून थोडी शांतता झाल्यावर माधव शेवटी बोलून गेलाच.
"म्हणजे"?
"म्हणजे...यू हॅव प्रोग्रेस्ड अ लॉट. एस्पेशियली... यू नो ,गिव्हन युवर.. "हम्बल म्हणायला माधव जरा अडखळला..." ,बॅकग्राऊंड..."

"हम्म्म "डोकं किंचित वरखाली हलवत त्याने विचार केला " ,आयल टेक दॅट ॲज अ कॉम्प्लिमेंट ,पण हॅलो! आय डोन्ट नो तुम्हाला तेव्हा काय वाटायचं ,पण मी काही गरीब नव्हतो!"

यावर काय रिॲक्शन द्यावी, याचा माधव विचार करू लागला ,पण तोच पुढे बोलायला लागला, "म्हणजे माझे आईवडील त्यांच्या लहानपणी नक्कीच गरीब होते आणि म्हणूनच नंतर पैसे मिळूनही ते गरीबच राहिले आणि त्यांनी कधीही मनासारखा पैसा खर्च केला नाही. बट नॉट मी! मी गरीब नव्हतो. आय हॅड अ ग्रेट चाईल्डहूड! खूप श्रीमंती नव्हती ,पण खायला प्यायला भरपूर होतं ,कपडेलत्ते पुरेसे होते. भरपूर हुंदडायला मिळायचं. माझी आई बरीच प्रेमळ आणि अं.. जरा निष्काळजीसुद्धा होती ,त्यामुळे सकाळ-संध्याकाळ मी खेळत असायचो. अभ्यासाचा फार कधी दबाव नव्हताच. पण त्यामुळेच आय थिंक मी एकदम हेल्दी आणि हॅपी गो लकी झालो. सतत मातीत खेळल्यामुळे माझा अगदी अवतार व्हायचा ,म्हणून तुम्हा लोकांना तेव्हा वाटलं असेल कदाचित."

माधवला एकदम काहीतरी आठवलं.

"तुला शर्वरी आठवते का रे"?

"ऑफकोर्स आय डू! "क्षणाचाही विलंब न लावता तो म्हणाला" ,ओह ,शर्वरी ,शर्वरी ,शर्वरी! तिला मी कसा विसरेन ?शी वॉज अ फाईन गर्ल."

माधवच्या चेहऱ्यावर आश्चर्य लख्खपणे पसरले आणि मानसीच्या चेहऱ्यावर उत्सुकता उमटून गेली. माधव आश्चर्याने पुढे काहीतरी विचारणार, इतक्यात डोअरबेल वाजली आणि तो विषय तिथेच राहिला. माधव-मानसीच्या एकेक मित्रवर्याचं सहपरिवार आगमन व्हायला लागलं आणि मग घरात एकच गोंधळ झाला. माधवने प्रत्येकाशी किरणची ओळख करून दिली आणि तोही प्रत्येक वेळी उभा राहून प्रत्येकाशी हात मिळवत होता ,बोलत होता.

जवळजवळ सगळे जमल्यावर माधवने घरातली ग्लेन फिडिचची आणि किरणने आणलेली वाईनची बाटली उघडली आणि मैफलीने सूर पकडला. घुटक्या-घुटक्यांनी गप्पा सुरू झाल्या. ग्लास संपता संपता ,हसण्याचे फुस्स फवारे किंवा गडगडाटी धबधबे ,खेचाखेची ,टोप्या उडवणे असे प्रकार फॉर्मात आले. जागतिक राजकारणापासून आपापल्या ऑफिसातल्या आणि सोसायटीतल्या भानगडींपर्यंत सगळे विषय चघळले जात होते ,मध्येच हौशी गायकांनी आपले गळे साफ करून घेतले ,मानसीला झालेल्या आग्रहावरून तिने तिच्या एक-दोन कविता ऐकवल्या. किरणनेही त्याच्या नेपाळमधल्या आणि युरोपमधल्या ट्रेकींगमधले काही किस्से सांगितले. थोड्या वेळाने सगळ्यांना भुका लागल्यात हे पाहून मानसीने टेबलवर जेवण मांडल्याचे जाहीर केले आणि मग हळूहळू सगळे दोन-तीनच्या गटांमध्ये विभागले जाऊन बोलत बोलत प्लेट्स भरून घेऊ लागले ,मुलं-बाळंवाले मुलांना भरवू लागले.

जेवणं झाल्यावर यथावकाश एकेक परिवार निरोप घेऊ लागला आणि माधव प्रत्येकाला लिफ्ट लॉबीपर्यंत सोडायला जाऊन येऊ लागला. किरण आणि मानसी सोफ्यावर बसून गप्पा मारत बसले. शेवटच्या जोडप्याला बाय करून माधव आत आला, तेव्हा मानसीचे शब्द त्याच्या कानावर पडले,

"ओह ,दॅट वॉज रिअली ब्यूटिफुल!"

"काय ते "?त्याने उत्सुकतेने विचारलं.

"काही नाही रे ,कवितांबद्दल बोलत होतो आम्ही. "किरण म्हणाला आणि मग लगेच उठत म्हणाला" ,चला, मीसुद्धा निघतो आता."

"थँक यू! "मानसीकडे वळून त्याने आपला उजवा हात हॅन्डशेकसाठी पुढे केला आणि तिने हात दिल्यावर तो हातात घेऊन म्हणाला " ,खूप मजा आली आज! थँक्स अगेन फॉर इन्व्हायटिंग मी."

"यू आर मोस्ट वेलकम! "मानसी म्हणाली. बहुधा तिने वाईनचा एक ग्लास जास्त घेतला असावा. तिचे गाल आणि कान लालबुंद झाले होते आणि डोळे काचेरी झाले होते.

तिला बाय म्हणून तो माधवकडे वळला आणि म्हणाला " ,चल खाली मला गाडीपर्यंत सोडायला."

खाली जाताना तो लिफ्टमध्ये काही क्षण मान खाली घालून उभा राहिला आणि मग खाली बघतच एकदम म्हणाला" ,आय थिंक शी लाईक्ड मी!"

"कोण ,"?बुचकळ्यात पडून माधवने विचारलं.

"शर्वरी."

"काय "?प्रयत्न करूनही माधवला हसू लपवता येईना.

"हसू नकोस. आय ॲम सिरियस."

"ड्यूड ,हसू नको तर काय करू ?जिच्याशी तू कधीही बोलला नाहीस आणि जिने पहिल्याच वेळी तुला पाहून 'हा असेल तर मी खेळणार नाही 'असं सांगून तुला कटवला होता ,तिला तू आवडला होतास असं तू म्हणतोस"?
"होय. तिला मी आवडलो होतो. "एकेका शब्दावर जोर देत तो म्हणाला" ,बट शी हेटेड इट. शी हेटेड दॅट शी लाईक्ड मी."

"काय बोलतोयस तू ?जर तिला तू आवडला असता तर व्हाय वुड शी हेट इट "?लिफ्ट थांबल्यावर दरवाजा उघडून बाहेर येत माधव खोचकपणे म्हणाला" ,ॲन्ड व्हाय वुड शी लाईक यू इन द फर्स्ट प्लेस "?त्याला हे भयंकर मनोरंजक वाटू लागलं होतं.

"का म्हणजे "?खिशातून सिगारेटचं पाकीट काढत किरण गंभीरपणे म्हणाला" ,मे बी शी फाऊंड मी फिजिकली ॲट्रॅक्टिव्ह."

"फिजिकली"?
"हो. का नाही ?आय वॉज व्हेरी ॲक्टिव्ह यंग मॅन ॲट दॅट टाईम. आणि कॉलनीतल्या त्या वयाच्या सगळ्या पोरांमध्ये आय वॉज द वन विथ द मोस्ट स्ट्रेट लिम्ब्ज, हे तुला आठवतच असेल." त्याने पाकीटातून सिगारेट काढून शिलगावली आणि माधवला दुसरी ऑफर केली.

"हं.. "त्याची तेव्हाची आकृती आठवायचा प्रयत्न करत माधव म्हणाला" ,ते मला मान्य आहे. पण तेव्हा ती फक्त दहावीत होती बाबा आणि तू नववीत."

"म्हणजे सोळा वर्षांची! क्वाईट द राईट टाईम टू फाईंड समवन ॲट्रॅक्टिव्ह. नो ?त्याआधी किंवा कधीही आम्ही बोललेलो नसलो तरी एकमेकांना अनेक वेळा पाहिलं नक्कीच होतं."

त्याने दिलेली सिगारेट पेटवता पेटवता माधव विचारात पडला.
"ओके. वादासाठी असं समजलो की तिला तू आवडला होतास ,तर त्या सिच्युएशनमध्ये' ,हा असेल तर मी खेळणार नाही 'असं ती का म्हणेल ?उलट तिने खूश व्हायला पाहिजे होतं की नाही"?

"येस. तिने खूश व्हायला पाहिजे होतं "वरती बघत धूर सोडत तो हसून म्हणाला " ,संस्कार ,समाज आणि संस्कृती नसती तर ती नक्कीच खूश झाली असती. बट यू नो हाऊ मेनी टॅबूज वुई हॅव अराऊंड दीज थिंग्ज! त्या वयात कोणाला असं काही वाटण्याची परवानगीच नसते. त्यात तिचं दहावीचं वर्ष होतं आणि मी ?मी तर वे आऊट ऑफ हर लीग होतो! आय हॅड नो स्टेटस. ना आर्थिक बाबतीत, ना सामाजिक दर्जाच्या बाबतीत. दॅट्स व्हाय आय थिंक शी हेटेड दॅट शी लाईक्ड मी. आणि तिला त्या दोन्ही भावनांचं विश्लेषण करणं जमलं नाही. मलाही तेव्हा ते कळलं नाही. मला त्या दिवशी खूप अपमानित झाल्यासारखं वाटलं ॲन्ड आय डिड नॉट फरगेट दॅट फॉर लॉंग टाईम."

थांबून त्याने एक दीर्घ झुरका मारला. माधवनेही काही न बोलता त्याचं अनुकरण केलं.
"जेव्हा आपण असे नियम सिरियसली घेतो आणि त्या नियमांबाहेरचं आपल्याला काही आवडतं ना ,तेव्हा आपल्याला स्वत:ची लाज वाटते ,घृणा वाटते. त्यामुळे वुई ॲक्च्युअली स्टार्ट हेटिंग द व्हेरी थिंग वुई लाईक्ड! "डोळे बारीक करून कुठेतरी शून्यात पाहात तो बोलू लागला " ,खूप काळाने हे मला कळलं आणि मग माझी अपमानाची भावना कमी झाली. माझा अपमान तिने केलाच नाही ,अपमान केला असेल तर या नियमांनीच."
माधवला हे खूपच बादरायण वाटायला लागलं होतं आणि आता ते आवरायला पाहिजे होतं. पण तरीही उत्सुकतेपोटी त्याने किरणला डिवचलंच.

"तुला खात्री आहे ते असंच होतं म्हणून"?

"अं "?त्याने माधवकडे एकदा रोखून पाहिलं आणि सिगारेटचा आणखी एक खोल झुरका घेऊन हळूहळू धूर सोडत बराच वेळ गप्प राहिला.

"शंभर टक्के खात्री नाही, "थोड्या वेळाने तो हळूच म्हणाला " ,कदाचित ती नुसतीच दुष्ट असेल ,पण त्याची शक्यता किती आहे"?

"हं.. "एवढंच बोलून माधव गप्प राहिला आणि त्याच्या त्या मनोरंजक सेल्फ प्रोटेक्टिव्ह थिअरीचा विचार करत बसला. किरणही कसलातरी विचार करत झुरके घेत राहिला. सिगारेट संपल्यावरही पाचेक मिनिटे ते तसेच उभे राहिले. थोड्या वेळाने एक मोठा सुस्कारा सोडून किरण भानावर आला. "एनी वे ,चल मी निघतो. खूपच मजा आली आज ".माधवकडे आपला उजवा हात पंजा लढवल्यासारखा धरून तो म्हणाला.

माधवने त्याच्या हाताला हात भिडवल्यावर त्याने तो बळकटपणे दाबला आणि माधवला किंचित त्याच्याकडे ओढून डाव्या हाताने त्याचा उजवा खांदा दाबला,

"नॉर्मली माझ्यासारख्या सड्याफटिंगाला कोणी असं फॅमिली गेंदरिंगमध्ये बोलवत नाही. बट यू डिड. थँक्स फॉर दॅट!"

त्याला बाय करून माधव वरती घरात आला तेव्हा सगळं आवरून मानसी शॉवर घेत होती. तो बेडवर तक्क्याला टेकून रेलला आणि डोक्यामागे हात धरून विचार करत पडून राहिला. मानसी बाथरूममधून फ्रेश होऊन बाहेर आली आणि येऊन त्याच्या छातीवर डोकं टेकवून पहुडली.

"तू सिगारेट ओढलीयेस "?थोड्या वेळाने तिने वर न बघताच त्याला विचारलं.

"हो ,किरणने ऑफर केली खाली. "तो म्हणाला" ,इंटरेस्टिंग फेलो ही इज. नाही"?

"हं.. "एवढंच म्हणून ती त्याच्या टीशर्ट वरून त्याच्या छातीवर बोट फिरवत राहिली. थोड्या वेळाने तिने डोकं उचलून त्याच्याकडे पाहिलं.

"लाईट्स ऑफ करतोस"?

त्याने तिच्याकडे पाहिलं. तिचे डोळे पुन्हा काचेरी दिसत होते आणि खालचा ओठ उमलायला लागला होता. त्याच्या चेहऱ्यावर स्मित उमटलं आणि एक हात तिच्या खांद्यांभोवती टाकत एक हात लांबवून त्याने दिवे बंद केले.

थोड्या वेळाने त्याच्या धपापणाऱ्या कुशीत ती क्लांत शरीराने पडून राहिली तेव्हा तो आश्चर्यानंदित झाला होता." शी वॉज अ डिफरंट वूमन टुडे, "त्याला वाटलं. वाईनचा असा परिणाम असेल तर घरात वाईनची एक बाटली नेहमी ठेवायला हरकत नाही, अशी नोंद त्याच्या मेंदूने घेतल्यावर जडावलेले त्याचे डोळे अलगद मिटले.

तीन महिन्यांनी एका शुक्रवारी सकाळी ऑफिसला जायच्या आधी चहा घेत तो पेपर वाचत -त्यानंतर दोन ट्रीपला जायचा प्लॅन ठरत होता. पेपर वाचता - दिवशी काही मित्रांबरोबर सहपरिवार एका डेहोता. दुसऱ्या .वाचता त्याला काहीतरी सुचलं पेपर बाजूला न करताच ".किरणलाही सांगतो उद्याचं. त्यालाही आवडेल कदाचित जॉईन व्हायला ,अरे हो" .तो म्हणाला..मानसी डायनिंग टेबलवर काहीतरी आवरत होती

.नको. त्याला नको सांगू." ती तुटकपणे म्हणाली"

"?का बरं " ,आश्चर्याने पेपरचा कोपरा थोडा दुमडून त्यावरून तिच्याकडे पाहून त्याने विचारलं "?का" .पण नको." त्याच्याकडे न बघताच मानसी म्हणाली ,काही कारण असं नाही"
"?तो एकटा बॅचलर आहे म्हणून"
".नाही... तसंच काही नाही.. पण नको वाटतं मला"
.अजूनही ती त्याच्याकडे बघत नव्हती
"?काही झालं का ?कारण काय आहे ?पण का"
आता मात्र तिने त्याच्याकडे तीव्र कटाक्ष टाकला. तिच्या कपाळावर आठ्या पडल्या होत्या. "काही व्हायला कशाला हवं ?मला तो आवडत नाही. बस्स. आणखी कारण कशाला पाहिजे "?ती ताडकन म्हणाली आणि वळून बेडरूमकडे चालू लागली" .उशीर होतोय मला. तुझा डबा भरून ठेवला आहे." पेपर धरलेले माधवचे दोन्ही हात आपसूक खाली आले आणि पेपर त्याच्या मांडीवर चुरगळला गेला. तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहताना त्याच्या भुवया प्रश्नार्थकपणे आक्रसल्या होत्या आणि चेहऱ्यावर बावचळल्यासारखे भाव आले होते. हिला असं एकाएकी काय झालं, याचा त्याने अर्धाएक मिनिट तीव्रतेने विचार केला आणि नंतर खांदे उडवून ,चुरगळलेला पेपर झटकून पुन्हा त्याने त्यात डोके घातले.

# ये साली जिंदगी

सुहास झेले

ऑफिसच्या मिटिंग रूममध्ये तो एकटाच बसून होता. एसीची सौम्य घरघर आणि हातातल्या पेनाची टेबलावरची टकटक ती भयाण शांतता भंग करत होती. त्याच्या एका बाजूला पाण्याची बाटली, एक कॉम्प्युटर, दोन-तीन फाईल्स पडून होत्या. मध्येच ते पेन तोंडात धरून फाईल्सवर आणि कीबोर्डवर हात चालवत होता. काही आकडेमोड, फॉर्म्युले तो पुन्हा पुन्हा तपासून बघत होता. शेवटी काही चूक नाही हे तपासून ऑफिसच्या लेटरहेडवर त्याने एक प्रिंट काढलं. ते तसंच काही वेळ हातात धरून निरखून बघत राहिला आणि मग एका कोपऱ्यात त्याने सही केली. त्या पानावर ठळक अक्षरात विषय होता - "**Performance Development Review For Year** 2012"

काही मिनिटांनी त्याचाच एक मित्र केबिनमध्ये आला. त्याच्याशी हात मिळवत समोरच्या खुर्चीमध्ये बसला. नेहमी हे दोघे मित्र भेटल्यावर गळाभेट घेत असत, पण आज वातावरण वेगळे होते. दोघांच्याही वागण्यात एक तणाव होता. मित्राने त्याला विचारले, "कसा आहेस?" तेव्हा त्याने त्याचे नेहमीचे उत्तर दिले, "कट रही हैं साली जिंदगी" आणि स्वत:च हसायला लागला. कसा आहेस असे त्याला कोणी विचारल्यावर त्याचे हे ठरलेले उत्तर असायचे. मग थोडा वेळ दोघेही शांत झाले आणि मग न राहवून त्याने मित्रासमोर तो कागद धरला आणि नंतर पाच मिनिटे त्या मिटिंग रूममध्ये शांतता पसरली. त्याचा मित्र तो कागद वाचू लागला, नंतर तो तिथे ठेवलेले काही परफॉर्मन्स रिपोर्ट्स अधाशासारखे चाळू लागला. एक एक पान उलटून आपले नाव आणि त्यापुढे असलेले आकडे पुन्हा पुन्हा तपासून घेऊ लागला. त्याला हवे ते मिळत नव्हते. त्याचा संयम आता सुटू लागला, तो आपल्या मित्राकडे बघून काहीश्या रडवेल्या स्वरात म्हणाला, "मित्रा, काही करता नाही का रे येणार? तुला तर माहीत आहे, मी संसारी माणूस आणि मला दोन मुलंही आहेत. हे असं अचानक झाल्यावर मी कुठे जाणार? मला इतक्या पगाराची नोकरी बाहेर मिळणार नाही रे. मित्रासाठी काही तरी कर रे. विनंती करतो."

त्याला हे काहीसे अपेक्षित होतेच, तो आपल्या जागेवरून उठला. त्या रूममध्ये फेऱ्या मारू लागला आणि तो मित्र त्याच्याकडे आशेने बघत राहिला. परफॉर्मन्स रिव्ह्यू ह्या गोंडस नावाखाली कंपनीने लोकांना कमी करायचे ठरवले. कंपनीच्या खर्चाचा ताळेबंद बघता त्यांना किमान २० टक्के लोकांना कमी करायचे होते आणि दोन लोकांना ह्या कामाची जबाबदारी दिली होती. गेल्या बारा महिन्यांचा कामाचा विदा जमा करून, यादीत सगळ्यात शेवटी नावं असणाऱ्या लोकांच्या नोकरीवर गदा येणार होती. जेव्हापासून ह्या दोन जणांची निवड ह्या कामासाठी केली गेली, तेव्हापासून त्यांच्या मित्रांना हे दोघे यमदूतासारखे भासायला लागले. सगळे एकमेकांचे मित्र, पण एका मित्राला दुसऱ्या मित्राच्या नोकरीची सूत्रे हातात दिल्याने वातावरण एकदम तणावपूर्ण झाले होते. रोज २० जणांना कामाच्या आधी एक तास बोलावले जायचे आणि हे प्रेमपत्र देऊन त्यांची नोकरीवरून गच्छंती केली जायची. नावाला परदेशी कंपनी, पण साला नोकरीची शाश्वती नाहीच. आधी मोठे मोठे पगार देऊन लोकांना मोठ्या प्रमाणावर भरती करायचे आणि काम संपल्यावर त्यांना नोकरीवरून काढून एकाच्या पगारात दोघा-तिघांना संधी द्यायचे. त्यामुळे कंपनीला चिक्कार फायदा व्हायचा.

ह्याच कंपनीत नवीन नवीन नोकरी मिळाल्यावर त्याच मित्रांबरोबर घालवलेले ते आनंदी क्षण त्याच्या डोळ्यासमोर येत होते. आज त्याचाच एक मित्र त्याची नोकरी वाचवण्याची विनंती, त्याच्याच जिवाभावाच्या मित्राला करत होता. तो मनातल्या मनात विचार करू लागला, "साला काय काय करावं लागतंय मला नोकरीपायी. आज ह्या मित्राच्या डोळ्याने त्याची बायका-पोरं नोकरी न जाण्यासाठी विनवण्या करत आहेत. ह्या सणासुदीच्या काळात मित्राला नवीन नोकरी शोधत हिंडावे लागेल.... पण पण आकडेवारीनुसार परदेशातल्या मोठ्या मंडळींनी हा कार्यक्षम नसल्याचे कळवले आहे आणि त्यामुळे कंपनीला त्याची काहीही गरज नाही"

त्याला काही सुचत नव्हते. त्याला दिलेल्या टार्गेटचे हे शेवटचे दोन दिवस. त्याने जर स्वत:ची कार्यक्षमता सिद्ध केली नाही, तर त्याला नोकरीहून पायउतार व्हावे लागले असते. त्यामुळे इकडे आड तिकडे विहीर अशी परिस्थिती झाली. त्यात दुष्काळात तेरावं म्हणजे, त्याच्या बॉसने त्याची काल केलेली कानउघडणी. कानउघडणी म्हणण्यापेक्षा धमकी म्हणू शकतो त्याला. त्याच्या बॉसच्या केबिनमध्ये घालवलेले ते क्षण त्याला आठवू लागले. ह्या परफॉर्मन्स ऑडीटसाठी ज्या दोघांची निवड केली, त्यांना कंपनी डायरेक्टरने आपल्या केबिनमध्ये बोलावले. दोघेही अवघडून उभेच राहिले, पण बॉसने बसायला सांगितल्यावर अवघडून बसले.

बॉस बोलू लागला, "मला काही लोकांकडून कळले आहे की, तुम्ही तुमचे काम नीट करत नाही. तुमच्या मित्रांशी चर्चा करताना तुम्ही सांगता की, कंपनी बकवास आहे, इथून सुटताय हे बरंय. (त्या दोघांवर ओरडत) How dare you to say that?? तुमचे हे मैत्रिपूर्ण संदेश तुमच्याकडेच ठेवा. तुम्हाला तुमचा पगार व्यवस्थित मिळतोय ना? कधी त्यात एक दिवस उशीर झाला? नाही नं? मग... ज्या कंपनीने तुम्हाला नोकरी दिली तिच्याबद्दल तुम्ही मस्करीतसुद्धा अपशब्द काढताय....एक लक्षात ठेवा, लोकांना नोकरीवरून काढायला तुम्हाला हौसेने सांगितलं नाही. तुमचे-माझे पगार व्यवस्थित आणि वेळेवर व्हावे, त्यात एक रुपयाचीसुद्धा कमी होऊ नये म्हणून ही कठोर पावले उचलावी लागत आहेत. ही कंपनी माझ्या बापाची नाही, की मी इथे मनाला येईल ती कामे करेन. प्रत्येक गोष्टी करताना मलासुद्धा २०-२५ ईमेल्स पाठवाव्या लागतात. मी फक्त एका प्रोसेसचा डायरेक्टर आहे. असे अनेक डायरेक्टर ह्या कंपनीत आहेत, त्यामुळे एकाला कमी करायला त्यांना काही कष्ट पडणार नाहीत. तुम्हाला हे करायला सांगताना मला आनंद होतोय असं नाही, पण मलासुद्धा कोणीतरी बॉस आहे आणि तो जे सांगेल ते मला करावंच लागेल. नाही केलं तर त्यांना दुसरा कोणी मिळेल, मग आपणच का नाही स्वत:ला पर्याय व्हायचं? मी इथे मोठा विचारवंत बसलेला नाही, पण तुमच्यापेक्षा अनुभव जास्त आहे माझ्याकडे आणि खरं सांगायचं तर माझ्याकडे जो जबाबदारी आहे, त्यासाठी मला तुम्हा कोणालाही स्पष्टीकरण द्यायची गरज नाही. मी जे सांगेन ते तुम्हाला मुकाट्याने करावेच लागेल, कारण मीसुद्धा तेच करतोय. जे मला माझ्या बॉसने सांगितलं, तेच तुम्हाला सांगतो - काम जमत असेल तर करा, नाही तर समोर दरवाजा आहे. तिथून चालते व्हा!!"

हे असे त्याला आजवर कोणी सुनावले नव्हते, पण काय करणार? परिस्थिती तशी आहे. सगळ्यांचे हात दगडाखाली आहेत. रिसेशन जे काय ते म्हणतात, ते काल्पनिकरीत्या सगळ्यांनी राबवायला सुरुवात केली होती. त्यामुळे कॉलेजमधून नुकतेच पास झालेले विद्यार्थ्यांना - जे अगदी कमी पगारात मिळेल ती नोकरी

करायला तयार असतात, अश्यांना - नोकरी देऊन, अनुभवी लोकांच्या पगारात चार-पाच डोकी काम करू लागली. काम करणाऱ्यांची संख्या वाढली, पण कार्यक्षमता हवी ती मिळाली नाही, कारण अनुभवाची कमतरता. मग परदेशातून एक ईमेल येणार, इतक्या लोकांची गरज ती काय? लोक कमी करा आणि खर्च आटोक्यात आणा आणि त्यासाठी सुरू होते परफॉर्मन्स ऑडीट. वास्तविक पाहता परफॉर्मन्स ऑडीट करणारा तो कोणी मोठा नव्हता. त्याचा स्वत:चा परफॉर्मन्स चांगला असल्याने कंपनीच्या डायरेक्टरने त्याची ही निवड केली होती. त्याला ते बिलकूल आवडले नव्हते आणि आपल्या मॅनेजरकडे त्याने तशी नाराजी व्यक्तही केली, पण त्याचे ऐकतेय कोण? त्याने तडकाफडकी आपला राजीनामा लिहिला आणि पाठवून दिला. त्याच्या कामाचे शेवटचे ६० दिवस तो मोजू लागला. आता मोजके १५ दिवस उरले आहेत त्याच्या कंपनीत. मग तो काहीतरी वेगळा पर्याय निवडण्यासाठी सिद्ध होत होता.

"अरे, काय झालं?" त्याच्या मित्राने त्याला हाक मारली. ती हाक ऐकून त्याची विचारांची तंद्री एकदम भंग पावली. काहीसा दचकल्यासारखा तो आपल्या मित्राकडे बघू लागला. विचारांच्या गर्तेत आपण किती काळ हरवलो होतो, ह्याचे त्याला भान नव्हतेच. तो नुसता फेऱ्या घालत होता. तो आपल्या जागेवर आला. त्याने मित्राच्या हातून तो पेपर घेतला. काही काळ तो तसाच बघू लागला त्या पेपरकडे, मग त्याने सहीखाली तारीख लिहिली आणि मित्राला म्हणाला, "माफ कर, मला जे जमेल ते नक्की करेन तुझ्यासाठी. तुला ३० दिवसांची मुदत देतोय. दरम्यानच्या काळात नोकरीचा शोध घेणे सुरू कर. मी तुला काही रेफरन्स देतो. तिथे जा, तुला अपेक्षेप्रमाणे पगार मिळेल. तुझा कंपनीतला शेवटचा दिवस २० नोव्हेंबर. कंपनी सोडताना तुला दोन महिन्यांचा पगार दिला जाईल. माझ्या परीने मी हेच करू शकतो. सॉरी यार..."

त्याचा मित्र काहीसा रागवत बाहेर पडला आणि इथे तो स्वत:ला दोष देत राहिला की आपण काय करतोय... पण मी काही चुकीचेही करत नाही. मला माझी नोकरीसुद्धा वाचवायची आहे. शेवटचे १५ दिवस असले तरी, इथे आपल्या कामावर कुठलाही काळा शिक्का बसू नये असे त्याला वाटत होते. जमेल तितक्या सहकाऱ्यांना वाचवायचे त्याने प्रयत्न केले. पाणी नाकापर्यंत आलेले पाहून, माकडीणसुद्धा आपले पिल्लू आपल्या पायाखाली घेऊन भरलेल्या हौदात श्वास घेण्यासाठी मान वर काढते, तिथे तो काय चीज? विचार करत करत तो त्या केबिनबाहेर पडला. एव्हाना पहिली शिफ्ट कामावर आली होती आणि जोरदार काम सुरू होते. सगळे जण आपापल्या कामात व्यस्त होते. कोणी त्याला पाहून जागेवरून उठून त्याचे आभार मानले, हात मिळवला, तर कोणी नुसते तोंडावर हसून मनातल्या मनात त्याला प्रचंड शिव्या घातल्या.

त्याने त्या गोष्टींकडे दुर्लक्ष केले. त्याला कामात मन रमवायचे होते. तो सगळ्यांना मदत करू लागला. मघाशी ज्या मित्राला त्याने नोकरीवरून कमी केले, त्याला घेऊन चहा प्यायला गेला आणि तोही त्याच्यासोबत न बोलता निघाला. त्याला आपली परिस्थिती कळली, ह्याचे समाधान त्याच्या चेहऱ्यावर होते. ब्रेकमध्ये त्याने स्वत: दुसऱ्या कंपनीमध्ये फोन करून त्याच्यासाठी इंटरव्ह्यू ठरवून दिले. कुठल्यातरी पापाचे क्षालन करण्याची त्याची अनामिक धडपड सुरू होती; जरी ते पाप नसले, तरी त्याच्या जिव्हारी खोलवर ते कुठेतरी लागलेले होते. त्याची ही धडपड बघून त्याचा मित्र मनोमन सुखावला आणि त्यांनी एकमेकांची गळाभेट घेतली आणि एकमेकांना मैत्रिपूर्ण शिव्या घालत “काम कर” म्हणून सांगत आपापल्या

डेस्कवर जाऊन बसले..

त्याच रात्री त्याच्या बॉसने त्याला प्रमोशन देऊन दुसऱ्या एका अकाऊंटमध्ये टीम लीडरची बढती दिली. त्याला हे अनेपेक्षित होते. त्याला उगाच अवघडल्यासारखे वाटले. इथे लोकांना काढून, त्यांच्या नोकरीच्या बदल्यात मला बढती... नको. त्याने ती जबाबदारी स्वीकारायला नकार दिला, पण त्याचा बॉस त्याला म्हणाला, "ये साली जिंदगी बहोत कुछ सिखाती हैं. तुम जो भी सीखोगे, वो एक दिन तुम्हारे काम जरूर आयेगा. आज तक तूने अलग अलग लीड लोगो कें साथ काम किया, अब तुझे भी आगे बढना तो होगा? भले तुम्हारी कोई बुराई करे... अच्छाई करनेवाले भी बहोत मिलेंगे... All the best !!

ह्या कॉर्पोरेट लाईफमध्ये जगताना अनेकदा आपल्या भावना ऑफिसच्या बाहेर असलेल्या केराच्या टोपलीत फेकून द्याव्या लागतात. आपल्या बॉसला शिव्या देताना आपल्याला काहीच वाटत नाही, पण जेव्हा आपण कोणाचे बॉस होऊ, तेव्हा आपल्याला कोणी शिव्या देणार नाही, याची शाश्वती कोणी देऊ शकेल?

# औरंगजेबाचे वस्त्रहरण अर्थात सुरतेची पहिली लूट

मालोजीराव

डिसेंबर महिन्यात केंव्हातरी साल १६६४ .....

स्थळ - ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी, लंडन येथील मुख्य कार्यालय

"तो जेव्हापासून येथे येऊन गेला आहे, तेव्हापासून आम्ही सगळेच भीतीच्या छायेखाली सतत वावरत आहोत. असे वाटत आहे की तो पुन्हा येईल आणि तसाच अग्निप्रलय पुन्हा घडेल. तो शहराजवळ आल्याच्या नवनवीन अफवा रोज फुटत आहेत आणि भीतीने लोक सैरावैरा पळत आहेत. जे लोक तेव्हा शहर सोडून गेले, ते अजून आले नाहीत. वीरजी व्होरा, हाजी बेग आणि इतर व्यापारी अजूनही आजारीच आहेत. सर्वशक्तिमान बादशहाने आम्हाला दिलासा देण्याचा प्रयत्न केला, पण तोच स्वतः हादरून गेला आहे. सध्यातरी इथे शांतता आहे, पण तीही भीषण वाटत आहे. 'तो' पुन्हा येऊ नये म्हणून आम्ही सगळेच देवाकडे प्रार्थना करत आहोत.

आपले विनम्र,

प्रेसिडेंट कौन्सिल सर जॉर्ज ऑक्सिंडेन

सुरत, २६ नोव्हेंबर १६६४."

फेब्रुवारी महिना, साल १६६४....ऑक्सफर्ड महाविद्यालय, इंग्लंड. ब्रिटिश दरबारातील मुद्सद्दी, औषधशास्त्र आणि विज्ञानाचे प्राध्यापक सर थोमस ब्राऊन यांच्या हातात एक पत्र होते. ब्रिटिश राजदूत जॉन एस्केलीयॉट याने सुरतहून २६ जानेवारीला पाठवलेले.... कार्यालयाबाहेर पडता पडता त्यांनी पत्राचा थोडा भाग वाचला.

"५ तारखेची मंगळवारची आमची सकाळ कोतवालाने वाजवलेल्या भोंग्याने झाली. कोणी मोगल सरदार आपल्या १२ हजार फौजेसह येऊन शहराजवळ थडकलाय, अशी पहिली बातमी होती. नंतर कळले, तो आलाय. दख्खनेतील लोक आणि महामहीम बादशहा त्याला राजा म्हणून संबोधतात, ज्याच्या नावाने दक्षिणेतील सुलतानांना घाम फुटतो, तो ग्रँड रेबेल येतोय.

त्याच्याबद्दल सांगायच झालं, तर उंचीला माझ्यापेक्षा थोडा लहान, पण ताठ आणि उत्कृष्ट बांध्याचा आहे. रोज व्यायाम करून कमावलेले शरीर आहे.प्र सन्न चेहरा, बोलताना मंद स्मित करतो. त्याच्या लोकांमध्ये तो सर्वात गोरा आहे, डोळे भेदक आणि बोलके आहेत. कठोरपणा, शांतपणा, क्रूर, विचारी, दयाळू अशी परस्परविरोधी विशेषणे त्याला देता येतील. त्याच्या लोकांमध्ये अतिशय लोकप्रिय आहे आणि त्याचे लोक त्याच्यासाठी काहीही करायला तयार होतात. गद्दारी आणि चूक करणार्याला तो भयानक शिक्षा करतो. बादशहाने त्याच्या रयतेचा केलेला छळ आणि नासधूस याचा बदला घेण्यासाठी, औरंगजेबाला अद्दल घडवण्यासाठीच तो येथे आला असावा..........."

नोव्हेंबर १६६३च्या शेवटी कधीतरी राजगडावर "मुजरा धनी, सुरतंवरनं व्यापारी आल्यात महाराजांना भेटायचं म्हन्त्यात, सोडू का कसं ? " दौलतबंकीने निरोप आणला, राजांनी हात हलवला. त्यांच्या डोळ्यात वेगळीच चमक होती.

"मुजरा, महाराज!" व्यापारयाने आत येतायेताच पगडी काढली, लांबडा लाडा पायघोळ सोडला, तशी कमरेला लटकवलेली तलवार दिसू लागली. तसा त्याने तलवारी जवळ हात नेला आणि बेलाचं पान काढून हातात घेतलं. "बहिर्जी नाईक जाधव" पुढे सरसावत सरनोबत प्रतापराव गुजर बोलले. महाराजांनी हसतच विचारणा केली, "नाईक, असेच वेषांतर करून याल, माहीत होतं. काय खबर आणलीत? " बहिर्जींनी एक भला थोरला कागद उघडून महाराजांसमोर पेश केला. "कामगिरी फत्ते झाली धनी, ह्यो सुरतेचा नकाशा. १५० कोस उत्तरेला घोडं मारावी लागत्याल, इनायत खान कोतवाल आन हजारेक लोक असत्याल बंदोबस्ताला. पन शहराला तटबंदी न्हायी ही एक अजून चांगली गोष्ट. महाराज, खासा लष्कर घेऊन जावे, अगणित द्रव्य मिळेल. दुसरी सोन्याची लंकाच हाय जनू. सोनं, हिरे, मोती, रत्न, फिरंगी वखारीतली उंची उडवायची दारू, अरबी घोडे, धान्याची कोठारं, तलम कापड... जे म्हनाल ते मिळतंय हुजूर. सुरत लुटली म्हंजी बादशाच्या कानफटात मारल्यागत हुईल बगा."



तापी नदी आणि व्यस्त सुरत शहर !

कौतुकाने बहिर्जीकडे बघत असलेल्या राजांनी नकाशाकडे नजर फिरवली. सुरत किल्ला, पहारे चौक्या, इंग्रज, डच यांच्या वखारी, इतर महत्वाची स्थाने याबरोबरच वीरजी व्होरा या व्यापार्याच्या घराभोवती ठळक खूण केलेली. हा व्यापारी म्हणजे तत्कालीन भारताच्या सर्वात मोठ्या व्यापारी केंद्रातील सर्वात श्रीमंत असामी होता. तेव्हाचा बिल गेट्स म्हणा हवं तर. भारतात आग्रा, सुरत, भडोच, कोकण, गोवलकोंडा, म्हैसूर, मद्रास तर सुरतेमधून जाण्याऱ्या एकूण महसुलापैकी लाखो रुपयांचा महसूल केवळ हा एकटा भरत असे. 'सूर्यपुर' असे मूळ नाव असलेल्या या शहरात मोगल, पर्शियन, आर्मेनियन, फ्रेंच, डच, इंग्रज, हबशी, पोर्तुगीज, अफगाणी, इराणी असे अनेक वंशाचे लोक व्यापार करत. रोज शेकडो टनांचा माल इथे उतरत असे. हजारो माणसांची सतत येजा असे, आफ्रिकेमधील आणि युरोपमधील अनेक देशांना येथील माल जात असे. फक्त व्यापारी केंद्रच नाही, तर सर्वाधिक महसूल मिळवून देणारे शहर, धनाढ्यांचे शहर म्हणूनही सुरतला संबोधले जायचे. सोनं, चांदी, कापड, मसाले, धान्य, जनावरे, गुलाम अशा सर्व प्रकारच्या वस्तूंचा व्यापार होत असे. पवित्र मक्केला लोक येथूनच जात असत, त्यामुळे सुरतला 'मक्केचे प्रवेशद्वार' म्हणत. सुरत म्हणजे एक प्रकारे मोगल साम्राज्याचा मुकुटमणीच होता जणू.

ठरलं तर मग, सुरतच लुटायची! मनाशी निश्चय करत महाराजांनी मोहिमेची आखणी करायला सुरुवात

केली. आपल्या माघारी गडकोटांची सुरक्षा पुन्हा एकदा तपासून लावून दिली. सरदारांना, सेनापतींना बोलावणी गेली, खलबतखान्यात सारे जमले. शिवरायांनी सरसेनापती प्रतापराव गुजर, मकाजी आनंदराव, रुपाजी भोसले आणि मानाजी मोरे या मातब्बरांची या मोहिमेसाठी निवड केली. सोबत सुमारे बारा हजार सैन्य होतेच. डिसेंबरच्या मध्याला किंवा शेवटला शिवाजी महाराज राजगडावरून निघाले. त्र्यंबकेश्वरच्या शंभू महादेवाचे दर्शन घेत ४ जानेवारी रोजी सुरतच्या अलीकडे घणदेवी येथे आले. त्या वेळी सुरतचा सुभेदार इनायतखान होता, त्याला शिवाजी महाराजांनी निरोप पाठवला की आपण बादशहाचे सरदार असून महाबतखानच्या आदेशावरून उत्तरेतील बंड मोडण्यास निघालो आहोत. इनायातखानाने यावर उत्तर पाठवले की येथील लोक हा प्रचंड फौजफाटा पाहून घाबरतील. तरी आपण शहरातून न जाता बाहेरील मार्गाने जावे. पण मधल्या काळात डच आणि इंग्रज वखारवाल्याने ५ जानेवारीच्या सकाळी पक्की खबर आणली होती की शिवाजीराजे आपल्या बारा हजार सैन्यासह सुरतवर चाल करून येत आहेत. शहरात एकच पळापळ सुरू झाली, व्यापार्यांनी दुकाने बंद करून घर गाठले, शहराच्या सीमेवर राहणाऱ्यांनी तर शहर सोडून भीतीने पोबारा केला. परदेशी व्यापारी आणि वखारवाले इंग्रज, पोर्तुगीज, डच यांनी बाहेर विकायला ठेवलेला माल पुन्हा गोदामात आणून त्याला टाळी ठोकली. इंग्रजांनी तर संध्याकाळी सोडायची जहाजे सकाळीच माल भरून इंग्लंडला पाठवून दिली.




इंग्रज वखार -सुरत

एव्हाना शिवाजी महाराज उधनाजवळ पोहोचले होते. म्हणजे सुरतपासून फक्त १ मैलावर. इकडे शहरात इनायातखानाने लोकांना धीर द्यायचे आणि संरक्षण द्यायचे सोडले आणि स्वताच किल्ल्यात जाऊन लपला. त्याच्यापाठोपाठ इतर अधिकारी, व्यापारी, शहरातील बडी प्रस्थही आश्रयासाठी किल्ल्यात जाऊन बसली. राजगडावर तुटपुंज्या सैन्यानिशी दीड लाखाच्या सेनासागारशी लढणारे संताजी शिळीमकर कुठे आणि हा भित्रा इनायत कुठे... मोगल आणि मराठा यांच्यात इथेच तर खरा फरक होता. शिवरायांचा एकेक मावळा त्यांना शंभर हत्तीचं बळ द्यायचा, तर इनायतखानसारखे भ्रष्ट मोगली अधिकारी त्यांचेच साम्राज्य हळूहळू पोखरत होते. इनायातखानाच्या या भित्र्या धोरणाने मराठ्यांना जणू मोकळे रानच मिळाले. ६ जानेवारीला मराठा सैन्य सुरत शहरात दाखल झाले. शहराच्या मध्यभागी येऊन एक मंडप उभा केला गेला. महाराजांनी इनायातखानास निरोप धाडला."वीरजी व्होरा, मोहनदास झवेरी, शांतीदास झवेरी, हरी वैश्य, सैद बेग, हाजी कासम या व्यापार्यांनी ताबडतोब येऊन खंडणीची बोलणी करावीत आणि ठरलेली खंडणी द्यावी. खंडणी मिळताच आम्ही निघून जाऊ. अन्यथा आमचे सैन्य शहराला आग लावेल. तुमच्यावर तलवार चालवेल". परंतु या निरोपला मोगली अधिकाऱ्यांकडून कोणतेही उत्तर आले नाही. त्यामुळे चिडलेल्या शिवरायांनी बहिर्जी नाईकांच्या नकाशाप्रमाणे ठरलेल्या ठिकाणांवर हल्ले करून लूट मिळवायची ठरवली. सैन्याच्या छोट्या तुकड्या केल्या गेल्या.



मराठ्यांनी उभारलेला शामियाना - मंडप

मराठ्यांच्या कोणत्याही मोहिमेत स्त्रिया, लहान मुले, वृद्ध, धर्मस्थळे यांना त्रास दिला जात नसे. हाच शिरस्ता होता, ज्याची नोंद आज्ञापत्रातसुद्धा आहे.

सुरत म्हणजे त्याकाळचे सर्वात मोठे शहर समजले जायचे. तत्कालीन फिरंगी प्रेसिडेंट जॉर्ज ऑक्सिंडेन आणि प्रवासी फ्रान्कोस व्हालेन्तैन यांच्या अंदाजानुसार, त्या काळी सुरातमध्ये सुमारे २,००,००० लाख लोक राहत असावेत. व्यापारासाठी येणारी-जाणारी वेगळीच. शहराला मोठे मोठे चौक होते, व्यापारी पेठा होत्या. रुपाजी, मानाजी, मकाजी यांच्या नेतृत्वाखाली तुकड्या शहरात घुसल्या. चौकाचौकात तेलाची पिंपे ओतली आणि पेटवून दिले. सरकारी आणि इतर प्रमुख इमारतींना आगी लावल्या. दरम्यानच्या काळात खबर काढण्यास आलेले २ डच, अँथोनी स्मिथ नावाचा इंग्रज वखारवाला आणि काही मोगल लोक महाराजांनी ताब्यात घेतले आणि खंडणीसाठी ओलीस ठेवले. इकडे इंग्लिश प्रेसिडेंट जॉर्ज ऑक्सिंडेन आणि डच गव्हर्नर अनेट ड्हान यांनी आपल्या वखारी चोख बंदोबस्तात ठेवल्या. मराठे सुरतेच्या किल्ल्यापाशी येऊन थडकले, तसे मोगलांनी संरक्षणासाठी तोफा चालवल्या. पण किल्ला शहराच्या मधोमध असल्याने बाजूच्या इमारतीस तोफांचा मार लागू लागला आणि शहराचेच नुकसान होऊ लागले. प्रकार असा झाला की मोगल स्वतःच मराठ्यांच्या वेढ्यात अडकले होते. मराठ्यांनी त्या दिवशी जकात कार्यालय फोडून पूर्ण साफ केले.

७ जानेवारीला हेरांनी प्रमुख व्यापार्‍यांची घरे सापडल्याची बातमी आणली. हाजी बेगचे घर लुटण्यास एक तुकडी गेली. महाराजांना हेरांकडून बातमी समजली की मोहनदास झवेरी हा एक सज्जन आणि दानशूर व्यापारी असून गोरगरिबांना मदत करण्याबाबत त्याची ख्याती आहे. हे ऐकल्यावर, मोहनदास झवेरी याच्याकडून खंडणी घेऊ नये व त्याला त्रास देऊ नये असे महाराजांनी आदेश दिले. राजांनी निकोलस कोलेस्ट्रा या ग्रीक व्यापाऱ्यांमार्फत डच आणि इंग्रजांना निरोप पाठवला की शाहसुजाने सुरत मला दिले आहे, त्यामुळे लष्करी मोहिमेसाठी मला पैशांची गरज आहे. लवकरात लवकर खंडणी द्यावी. शाहसुजा औरंगजेबाचा हा भाऊ २-३ वर्षांपूर्वीच वारला होता. त्यामुळे डचांनी परतीचा निरोप पाठवला की आपले वेंगुर्ल्यातील हितसंबंध लक्षात घेऊन सूट द्यावी आणि शांतता राखावी. मसाले आणि इतर वस्तू खंडणी स्वरूपात घ्या कारण वखारीत आम्ही रोख रक्कम ठेवत नाही. शिवाजी महाराजांनी या निरोपाचा विचार करून माफक खंडणी आकारली. तिकडे इंग्रजांनीसुद्धा कडवा प्रतिकार केल्याने त्यांचा नाद सोडून मराठे पुन्हा शहर लुटू लागले. डचांनी सुमारे २०,००० रुपये खंडणी दिली.

या धामधुमीत मंडपामध्ये एक विचित्र प्रकार घडला. इनायतखानाने वकील म्हणून पाठवलेल्या तरुणाने राजांसमोर काही शर्ती ठेवल्या. त्या वाचून, शिवराय त्यास चिडून काहीतरी म्हणाले आणि शर्ती ऐकण्यास नकार दिला. ते ऐकून, त्या आलेल्या वकिलाने शेल्यात लपवलेला खंजीर काढला आणि शिवरायांना मारण्यासाठी हात उचलला. तोच राजांच्या धारकरी अंगरक्षकांपैकी एकाने सपकन तलवार उपसत त्याचा हात छाटला, तसा तो वकील रक्तबंबाळ अवस्थेत शिवरायांवर पडला आणि ते रक्त राजांच्या अंगरख्यावर लागले. मागे थांबलेल्या मराठ्यांना वाटले, शिवरायांवर हल्ला झाला, म्हणून एका सरदाराने सगळ्या ओलिसांना आणि मोगलांना मारण्याचे आदेश दिले. तसे तिथे असलेल्या लोकांवर शेकडो तलवारी उगारल्या गेल्या. तेवढ्यात महाराज उठून उभे राहिले आणि त्यांनी थांबण्याचे आदेश दिले. या धामधुमीत २४ हात आणि ४ मुंडकी उडाली, अँथोनी स्मिथच्याही गळ्याजवळ आलेली तलवार थोडक्यात थांबली, म्हणून तोही बचावला.




सुरत शहर - व्यापारी गलबते

सुरतच्या सुभेदाराने केलेल्या या भेकड हल्ल्यामुळे मराठे अधिकच पिसाळले. त्यांनी टोळ्यांनी फिरून किल्ल्यावर हल्ले करायला सुरुवात केली. बार लावून सरकारी इमारती उडवून दिल्या. सगळीकडे आगच आग दिसत होती. हाजी सैद बेग या व्यापाऱ्याचे घर आणि गोदाम फोडून मराठ्यांनी सगळा ऐवज जमा केला. सगळा लुटीचा माल मंडपाजवळ आणला जात असे, त्यातील काही वाटा सैनिकांना वाटला जात. ८ जानेवारी - या धामधुमीतसुद्धा मराठ्यांनी एकाही मंदिर, मशीद आणि चर्चला त्रास दिला नाही किंवा नुकसान पोहोचवले नाही. फ्रेंच रेवरंड फादर आंब्रोज यांच्याबद्दल आदर दाखवत त्यांच्या कार्याचा शिवरायांनी गौरव केला. "फादर, येथील त्यांचे चर्च आणि त्यांच्या ख्रिश्चन वस्तीला कोणताही त्रास देऊ नये" असे आदेश दिले. त्याचबरोबर कॉन्स्टॅन्टिनोपल येथून निर्वासित म्हणून आलेल्या ज्यू लोकांनासुद्धा मराठ्यांनी आदराची वागणूक दिली. सुरतमधला सगळ्यात मोठा दलाल नुकताच मरण पावला होता. तो अतिशय श्रीमंत होता, पण त्याच्या सदाचारी, दानशूर आणि गरिबांबद्दलच्या कनवाळू वागणुकीमुळे प्रसिद्ध होता. त्याच्या संपत्तीला, घराला किंवा परिवाराला मराठ्यांनी धक्कासुद्धा लावला नाही. डचांचा म्हणण्यानुसार, जगातील सर्वात श्रीमंत व्यापाऱ्याच्या म्हणजे वीरजी व्होराच्या घराकडे मराठ्यांनी आपला मोर्चा वळवला.

वीरजी व्होराने आपली जाहीर केलेली मालमत्ता सुमारे (त्या काळचे) ८० लाख रुपये होती. मराठ्यांनी त्याची सगळी गोदामे आणि पेढ्या फोडून साफ केल्या. त्या दिवशी सोने, चांदी, मोती, रत्ने वगळून सुमारे ३०० ते ५०० हशम हातात प्रत्येकी २ पोती घेऊन शामियान्यात दाखल झाले होते. वीरजी व्होराच्या घरातून सुमारे ६००० किलो सोने, २८ पोती भरून मोती, हिरे आणि माणके, सुमारे ५० लाख रुपये रोख

असा भरमसाठ ऐवज... ऐवज कसला, साक्षात कुबेराचा खजिनाच जणू खुला झाला होता. इतर व्यापारी आणि दलाल यांच्याकडे मिळून सुमारे ३०,००० किलो सोने आणि हजारेक पोती भरून मौल्यवान साहित्य गोळा झाले. एव्हाना लुटालूट होऊन आता मराठ्यांनी लाकडाच्या वखारी, कापसाची गोदामे, तेलाचे घाणेही पेटवून दिले होते. त्यामुळे जणू अग्निप्रलय झाल्यासारखे सगळीकडे आगीचे आणि धुराचे प्रचंड लोट उठले होते. ग्रीक महायुद्धात TROY शहराची जशी अवस्था झाली होती, किंवा प्रत्यक्ष जळत्या TROYमध्येच उभे आहोत, असा भास होत होता.त्यानंतरच्या दिवशी - म्हणजे ९ जानेवारीला - जमलेला मुद्देमाल एकत्र करण्यास सुरुवात झाली. बैल, खेचरे आणून त्यांच्या पाठीवर पोती, पिशव्या बांधल्या. उरलीसुरली काही लूट घेऊन शहराच्या इतर भागात शिरलेले मराठा सैन्य शामियान्याजवळ येऊ लागले. दरम्यान हेरांनी खबर आणली की महाबतखान मोगली फौज घेऊन भडोचवरून सुरतेकडे येतोय. आता जनावरांवर लूट लादून शहर लवकरात लवकर सोडणे गरजेचे होते.

रविवारी सकाळी म्हणजे १० जानेवारीला शिवाजी महाराजांनी सुरतवरून आपला मुक्काम हलवला. पुढे स्वतः महाराज सैन्यासह शेकडो जनावरांवर लादलेला लुटीचा माल सोने, चांदी, रोकड, हिरे, माणके, मोती, तलम कपडे, अरबी घोडे, मौल्यवान चीजवस्तू असा लवाजमा आणि सर्वात मागे त्याच्या रक्षणासाठी ठेवलेले हजारेक मावळ्यांचे सैन्य पुन्हा राजगडाकडे निघाले.

मोहीम फत्ते झाली होती, औरंगजेबाच्या सल्तनतीचा राजमुकुट महाराजांनी पायदळी तुडवला होता. आलमगीर बादशहाच्या कारकिर्दीवरचा हा सर्वात मोठा डाग होता. हे अलौकिक शौर्य पाहून रजपूत अचंबित झाले होते, मोगल सैन्याचं एकमत झालं होतं की शिवाजी काळी जादू करतो म्हणूनच हे शक्य झालं, तिथे इंग्लंडचे चार्ल्स दुसरे यांना ही बातमी धक्कादायक होती. यामुळे दख्खनेच्या व्यापाराची सगळीच समीकरणे बदलली होती. आता विजापूर आणि मोगल नव्हे, तर फिरंगी दख्खनेत शिवरायांना व्यापारी भत्ता देणार होते. औरंगजेबाबरोबर हातमिळवणी करून शिवरायांचा काटा काढण्याची स्वप्न बघणाऱ्या आदिलशहासाठी हा मोठा धक्का होता.

या लुटीमागचा हेतू शुद्ध आणि सरळ होता. स्वतःच्या स्वार्थासाठी, विलासी जीवनासाठी अथवा रंगमहाल बांधण्यासाठी केलेली लूट नव्हतीच. वारंवार होणार्या मोगली, आदिलशाही हल्ल्याने प्रजा बिथरली होती, अन्न-धान्याचं, मालमत्तेचं अनोनात नुकसान झालेलं, त्यांना भरपाई मिळणं गरजेचं होतं. दुष्काळात आणि धामधुमीत प्रजेला चिरडून, पिळून त्यांच्याकडून सारा वसूल करणारा सुलतान व्हायचं नव्हतं या राजाला, तर प्रजेच्या डोईवर मायेचं आणि संरक्षणाचं छत्र धरणारा छत्रपती व्हायचं होतं. ४-५ लाखाचं खडं सैन्य असलेल्या मोगलांचा वार्षिक महसूल २०-२५ कोटींच्या आसपास, तर मराठ्यांचा जेमतेम कोटी रुपये. या लुटीमुळे वर्षभर पगारी सैन्य ठेवणं, ते दुपटीने वाढवणं शक्य होणार होतं. गडकोट दुरुस्ती, नवीन कोट उभारणी, आरमाराची बांधणी, दारूगोळा, हत्यारे यासाठी लागणारा पैसा उपलब्ध होणार होता. स्वराज्यासाठी सुमारे अडीच कोटी रोख रक्कम आणि सोने, चांदी इतर वस्तू असा मौल्यवान ऐवज मिळाला होता. औरंगजेबाच्या वस्त्रहरणाचा पहिला अंक संपला होता. महाराजांच्या चेहऱ्यावर आता नेहमीचे मंद स्मित दिसत होते. राजगडावरच्या त्या प्रसन्न सकाळी जिजाऊ मांसाहेब सोनेरी स्वप्न घेऊनच जाग्या झाल्या..."जे स्वप्नी दिसले ते साकार होईल का? माझा शिवबा खरच छत्रपती झालेला मी पाहीन का?"

- लेख संदर्भ -

- हॉग ट्रान्सस्क्रिप्ट्स
- ईस्ट इंडिया कंपनी रेकॉर्ड्स १६६१-१६६४
- कोर्ट मिनिट्स इन लंडन १६६४-१६६५
- दाघ रजिस्टर, बात्विया
- मुन्तखब-उल-लुबाब - महम्मद खाफीखान
- लेटर्स ऑफ सर थोमस ब्राऊन, १६६९

# शिलाहाराचा राजवंश आणि गंडरादित्याचा ताम्रपट

वल्ली

महाराष्ट्रातील आद्य राजवट सातवाहनांनंतर इये देशी गुप्त, अभीर, कलचुरी, राष्ट्रकूट, चालुक्य, कदंब इत्यादींनी वेगवेगळ्या भूभागावर राज्य केले. साधारण इ. ८व्या शतकात इथे शिलाहारांची राजवट उभी राहिली ती मुख्यतः पश्चिम महाराष्ट्रात आणि कोकण प्रांतात. शिलाहार राजांनी जरी प्रामुख्याने राष्ट्रकूट आणि चालुक्यांचे मांडलिक म्हणून काम पाहिले तरी त्यांची राजवट अत्यंत प्रबळ असून त्यांचे मांडलिकत्व केवळ नामधारी होते. हे राजे स्वतःला महामंडलेश्वर, कोकणाधिप, कोकणचक्रवर्ती, राजाधिराज अशी बिरुदे लावत. संपूर्ण कोकणात आणि दक्षिण महाराष्ट्रात राज्य करणारे हे राजे स्वतःला विद्याधर राजपुत्र जीमूतवाहनाचा वंशज मानत. प्राचीन दंतकथेप्रमाणे जीमूतवाहनाने शंखचूड नावाच्या नागाला गरुडाच्या पंजातून सोडवण्यासाठी स्वतःच्या प्राणांचे बलिदान दिले होते. ह्या प्रसंगापासूनच त्यांच्या कुलाला शिलाहार (शिला-आहार) असे नाव पडले, असे मानले जाते. तर प्रिन्स ऑफ वेल्स संग्रहालयातील शिलाहार राजा छद्वैदेवाच्या ताम्रपटात सिलार नावाच्या पराक्रमी वीराने परशुरामाच्या बाणापासून संत्रस्त झालेल्या समुद्राचे रक्षण केले, असा उल्लेख आहे. याच सिलाराच्या कुळाला पुढे सिलारा-सिलाहारा-शैलाहार-शिलाहार असे नाव मिळाले, असेही समजले जाते.

शिलाहारांच्या जवळपास दहा वेगवेगळ्या शाखांनी महाराष्ट्रात आणि कर्नाटकात कारभार केला. पैकी महाराष्ट्रातील उत्तर कोकण, दक्षिण कोकण आणि कोल्हापूरचे शिलाहार ही तीन घराणी सर्वाधिक प्रबळ होत. उत्तर कोकणचे आणि कोल्हापूरचे शिलाहार स्वतःला तगरपुराधीश्वर असे गौरवाने म्हणवून घेत त्यामुळे उस्मानाबादजवळील तेर-तगर हे त्यांचे मूळ ठिकाण असावे, पण नंतर हे कोकणात स्थायिक झाले असावेत.

तत्कालिन राजांच्या शिलालेखांत, ताम्रशासनांत शिलाहारांच्या राजवटीविषयी, वंशावळीविषयी माहिती उपलब्ध आहे. प्रस्तुत लेखात मी जरी कोल्हापूर शिलाहार घराण्यातील गंडरादित्याच्या ताम्रपटाविषयी लिहिणार असलो, तरी तत्पूर्वी महाराष्ट्रातील शिलाहार घराण्यांतील तीन प्रमुख शाखांची थोडक्यात माहिती करून घेणे उचित ठरावे.

**उत्तर कोकणचे शिलाहार :**

हे सुरुवातीला राष्ट्रकूटांचे मांडलिक होते. राष्ट्रकूट राजा दंतिदुर्ग याने उत्तर कोकण काबीज केल्यावर (साधारण इस. ७५०च्या आसपास) अनिरुद्ध नावाचा सरदाराला उत्तर कोकणाचा प्रांताधिपती केले. त्यानंतर साधारण इस. ७९०च्या आसपास कपर्दिन (पहिला) हा उत्तर कोकणच्या सत्तेवर आला. याच्यापासून उत्तर कोकण शिलाहार घराण्याची सुरुवात झाली. हा राष्ट्रकूट राजा गोविंद (तिसरा) याच्या समकालीन होता. कपर्दिनाने उत्तर कोकणात राष्ट्रकूट साम्राज्य वाढवायला भरपूर मदत केली आणि याची परिणती म्हणून याला उत्तर कोकणचे स्वामित्व मिळाले.

उत्तर कोकणाच्या शिलाहारांची राजधानी स्थानक अर्थात सध्याचे ठाणे ही होती. त्यांच्या पहिल्या राजधानीचे नाव 'पुरी' हे होते असे काही ताम्रपटांवरून आणि शिलालेखांवरून दिसते. काही संशोधक मुंबईजवळील

घारापुरी बेट किंवा जंजिऱ्याजवळील राजापुरी हिलाच हे राजधानीचे ठिकाण मानतात. पण ठाणे जिल्ह्यातच कुठेतरी हे ठिकाण वसलेले असावे, असेही मानले जाते. यांच्या राज्यात प्रामुख्याने हल्लीच्या ठाणे आणि रायगड जिल्ह्यांच्या भूभागाचा समावेश होता. जवळपास १४०० गावे ह्यांच्या अमलाखाली होती.

या घराण्यात असंख्य राजे राज्य करून गेले. त्यापैकी कपर्दिन (पहिला व दुसरा), पुलशक्ती, झंझ, वज्जड, चित्तराजा, मुन्मुणी, अनंतदेव (पहिला व दुसरा), अपरादित्य (पहिला व दुसरा), केशीदेव (पहिला व दुसरा) व शेवटचा सोमेश्वर हे राजे प्रमुख होत.

ह्या शिलाहारांनी असंख्य मंदिरे बांधली. अंबरनाथचे कोरीव शिवमंदिर, ठाण्याचे कौपिनेश्वर मुन्मुणी राजाच्या कारकिर्दीत बांधले गेले, तर झंझ राजाने पूरचे कुकडेश्वर, हरिश्चंद्रगडावरचे हरिश्चंद्रेश्वर, खिरेश्वरचे नागेश्वर, रतनवाडीचे अमृतेश्वर अशी बारा शिवालये बांधली. राष्ट्रकूट घराणे कमजोर झाल्यावर शिलाहारांनी जवळजवळ एकछत्री अंमल केला. पण नंतर ह्यांना गोव्याच्या कदंबांचे आणि त्यानंतर बदामीच्या चालुक्यांचे मांडलिकत्व पत्करावे लागले. उत्तर कोकणातला शेवटचा शिलाहार राजा सोमेश्वर. देवगिरीच्या यादवसत्तेचा प्रभाव वाढू लागल्यावर यादवसम्राट कृष्ण याने आपला मल्ल नावाचा सरदार उत्तर कोकणच्या मोहिमेवर पाठवला. मल्लाने जरी सोमेश्वरचा पराभव केला, तरी त्याला उत्तर कोकणाचा कुठलाही प्रदेश ताब्यात मिळाला नाही. पण कृष्णाचा भावाने आणि यादवांचा उत्तराधिकारी महादेव यादवाने ही मोहीम अशीच चालू ठेवली. हत्तींचे प्रचंड सैन्यदळ घेऊन त्याने सोमेश्वरावर स्वारी केली. जमिनीवरच्या या युद्धात सोमेश्वर पराजित झाल्यामुळे त्याने पळून जाऊन समुद्रात आश्रय घेतला (बहुधा घारापुरी येथे). महादेव यादवाने उत्तर किनाऱ्यावरच्या अरब मांडलिकांची मदत घेऊन भर समुद्रातही सोमेश्वराचा पाठलाग करून आरमारी युद्धात त्याचा संपूर्ण पराभव केला आणि उत्तर कोकणच्या शिलाहारांचे राज्य खऱ्या अर्थाने समुद्रात बुडाले. (इ.स. १२६५). बोरिवलीच्या एकसर गावात असणाऱ्या एका वीरगळात जमिनीवरचे हत्तींच्या साहाय्याने केलेले युद्ध आणि समुद्रावरचे नावांच्या साहाय्याने केलेले युद्ध कोरण्यात आलेले आहे.

**दक्षिण कोकणचे शिलाहार :**

उत्तर कोकणच्या शिलाहारांप्रमाणेच हे शिलाहार घराणेसुद्धा राष्ट्रकूटांचे मांडलिक होते. उत्तर कोकण काबीज केल्यावर राष्ट्रकूट सम्राट दंतिदुर्गाचा काका आणि वारसदार कृष्ण (पहिला) याने दक्षिण कोकणावर ताबा मिळवला आणि त्या प्रदेशावर आपला प्रांताधिकारी म्हणून शनफल्ल याची नेमणूक केली. (इ.स. ७६५). हा शनफल्ल दक्षिण कोकण शिलाहार घराण्याचा मूळपुरुष. याच्या साम्राज्यात रत्नागिरीतील आणि गोव्यातील काही भागाचा समावेश होता.

सुरुवातीला गोव्यातील चंद्रपूर (हल्लीचे दक्षिण गोव्यातील चंदोर हे गाव) आणि नंतर रत्नागिरी जिल्ह्यातील खारेपाटण ही यांची राजधानी होती, असे खारेपाटण येथे मिळालेल्या रट्टराजा शिलाहाराच्या ताम्रपटावरून समजते.

धम्मिराया, ऐयप्पाराजा, अवसर (पहिला, दुसरा आणि तिसरा), आदित्यवर्मन, भीम आणि शेवटचा रट्टराजा हे यातले काही प्रमुख राजे. यातल्या अवसर (तिसरा) याच्या कार्यकाळात एका दानपत्रात दोन व्यापाऱ्यांना

१०० दिनारांची वृत्ती दिली होती, असे लिहिले आहे (इ.स. ९८८). अरब दिनारांचा महाराष्ट्रातील इतका प्राचीन उल्लेख आश्चर्यजनक आहे.

या तिसऱ्या अवसराच्या कार्यकाळात राष्ट्रकूटांचे साम्राज्य कमजोर होऊन बदामीच्या चालुक्यांनी दक्षिण कोकणावर ताबा मिळविला आणि शिलाहार शाखेला स्वतःच्या अंकित करून घेतले. सत्याश्रय ह्या चालुक्य राजाच्या मृत्यूनंतर चोलांबरोबर सतत चालणाऱ्या लढायांमुळे चालुक्यांची केंद्रीय सत्ता उतरणीला लागली आणि याचा फायदा घेत रट्टराजाने आपले स्वातंत्र्य घोषित केले. सत्याश्रयाचा उत्तराधिकारी विक्रमादित्य (पाचवा) हा कमजोर असल्याने रट्टराजास शासित करू शकला नाही. विक्रमादित्याच्या पाठीमागे ही उणीव भरून काढत विक्रमादित्याचा धाकटा भाऊ आणि चालुक्यांचा राजा जयसिंह याने दक्षिण कोकण काबीज करून रट्टराजाची सत्ता संपुष्टात आणली (इस. १०२४) व दक्षिण कोकण शिलाहार घराण्याचा शेवट झाला.

**कोल्हापूरचे शिलाहार :**

राजकीय पटलावर कोल्हापूरच्या शिलाहारांचा उदय तसा उशिराच झाला. यांच्या सुरुवातीच्या कार्यकाळात राष्ट्रकूटांची सत्ता उतरणीला लागली होती आणि बदामीच्या चालुक्य-चोलांबरोबरच्या सततच्या युद्धांमुळे कमजोर झाली होते. १०व्या शतकाच्या मध्यावर तेव्हा कऱ्हाड-कोल्हापूर प्रांतावर राष्ट्रकूटांचा महासामंत सेंद्रक (सिंद) राजा आदित्यवर्मन सत्तेवर होता. त्याच्या एका दानपत्रात इंद्रायणीच्या जवळील कान्हे गावाचा आणि तिथल्या लेण्यांचा उल्लेख आहे. बहुधा नजीकची भामचंद्र डोंगरावरची ही लेणी असावीत. राष्ट्रकूटांची मध्यवर्ती सत्ता अतिशय कमजोर झाल्याने याच काळात शिलाहार घराण्याचा राजा जतिग (दुसरा) याने कऱ्हाडवर स्वारी करून आदित्यवर्मनच्या उत्तराधिकाऱ्याला सत्तेवरून खाली खेचले व कोल्हापूर शिलाहार घराण्याची स्थापना केली (इ.स. १०००). कोल्हापूर प्रांतावर जरी यांची सत्ता उशिरा स्थापन झाली, तरी ह्या घराण्याच्या सुरुवातीच्या पिढ्या कर्नाटकात सामंतपदावर होत्या. जतिग (पहिला) हा ह्या शाखेचा मूळ पुरुष (इ.स. ९४०-९६०) हा स्वतःला गोमन्थ दुर्गाचा स्वामी म्हणवतो. हा गोमन्थ दुर्ग म्हणजे हल्लीचे गोवे नसून कर्नाटकातील शिमोगा जिल्ह्यातील चंद्रगुत्ती. याच्या नंतरच्या पिढ्यांतील नायिमांक, चंद्रराजा ह्या पिढ्यासुद्धा कर्नाटकातच नांदल्या. आदित्यवर्मनचा पराभव करून जतिग (दुसरा) याने आपली राजधानी कऱ्हाड येथे वसवली व तिथूनही लवकरच त्याने ती कोल्हापूरला हलवली. लगेचच त्याने पन्हाळा (पर्णालक) किल्ला जिंकला आणि कोल्हापूर प्रांताचा विस्तार केला. यांच्या साम्राज्यात सातारा, सांगली, कोल्हापूर आणि बेळगाव येथपर्यंतच्या प्रांताचा समावेश झाला व यांनी बहुत काळ स्वतंत्रपणे राज्य केले. हे राजे जरी राष्ट्रकूट/चालुक्यांचे पूर्णपणे मांडलिक नसले, तरी त्यांच्या कलाने राज्यकारभार हाकत त्यांनी आपले राज्य संपन्न बनवले. चालुक्यांच्या असंख्य मोहिमांमध्ये कोल्हापूर शिलाहार घराण्याने त्यांना मदत केली.

जतिग (दुसरा) याचा नातू मारसिंह हा एका दानपत्रात जतिगाचा उल्लेख पन्हाळ्याचा सिंह असा करतो. तर आणखी एका दानपत्रात तो आपला पिता गोंकल याचा उल्लेख कुरहाट कुंडी (कऱ्हाड-बेळगाव), मिरिंज देश (मिरज) आणि दक्षिणचा कोक़णचा स्वामी असा करतो.

जतिग (पहिल व दुसरा) गोंकल, गूवल, चंदरादित्य, मारसिंह, भोज (पहिला व दुसरा) गंडरादित्य,

विजयादित्य हे या घराण्यातील प्रमुख राजे.

हे घराणे कोल्हापूरच्या महालक्ष्मीचे भक्त होते. मूळच्या देवी स्थानाचा त्यांनी जीर्णोद्धार करत प्रशस्त अशा मंदिराची निर्मिती केली. त्यांच्या कित्येक ताम्रशासनांत महालक्ष्मीला वंदन केलेले आढळते. भोजराजा शिलाहाराने किंवा ह्या शिलाहार घराण्याने सातारा-कोल्हापूर प्रांतात असंख्य किल्ले बांधले. विशाळगड, अजिंक्यतारा, चंदन-वंदन, रोहिडा, वैराटगड, पांडवगड, केंजळगड, कमळगड, परळी (सज्जनगड) असे बलदंड दुर्ग ही यांचीच निर्मिती. तर गंडरादित्याने खिद्रापूरचे कोपेश्वर मंदिर बांधायला सुरुवात केली. या मंदिराच्या कामात पुढच्या जवळजवळ दोन पिढ्या खर्ची पडल्या. कोपेश्वराबरोबरच गंडरादित्याने अनेक हिंदू मंदिरांबरोबरच जैन आणि बुद्ध मंदिरेसुद्धा बांधली. गंडरादित्याची पत्नी कर्णावती जैन धर्माचे आचरण करणारी होती.

साधारण १२व्या शतकाच्या मध्यावर देवगिरीचे यादव आणि द्वारसमुद्राच्या (हळेबीडू) होयसाळाबरोबर चाललेल्या युद्धामध्ये परास्त होऊन चालुक्य राजा सोमेश्वर (चौथा) याने गोव्याच्या कदंबांकडे आश्रय घेतला. कलचुरींनी गोव्यावर स्वारी केली, तेव्हा शिलाहार राजा विजयदित्याने गोव्याच्या मदतीसाठी धाव घेऊन कलचुरी अहवमल्लाचा सरदार चंडुगीदेव दंडनायकाचा पराभव केला व गोव्याचे राज्य पुन:स्थापित करण्यास मदत केली. या विजयादित्याचा पुत्र भोजराजा (दुसरा) हा ह्या शाखेचा शेवटचा उत्तराधिकारी. हा अत्यंत पराक्रमी असून स्वतःला महामंडलेश्वर, राजाधिराज, परमेश्वर, परमभट्टरक, पश्चिमचक्रवर्ती अशी बिरुदे लावत असे. ह्याने अनेक दाने दिली. महालक्ष्मीचा हा परमभक्त होता. तिची पूजा आणि नैवेद्य यासाठी याने दानपत्रे लिहून दिली. लवकरच याने स्वतःला स्वतंत्र राजा म्हणून घोषित केले. देवगिरीच्या यादवांना याची वाढती सत्ता सहन न झाल्यामुळे बलाढ्य सिंघण यादवाने कोल्हापूर शिलाहारांवर आक्रमण केले. कृष्णा आणि दूधगंगा ह्या दोन नद्यांच्या मधल्या प्रदेशात खिद्रापूरनजीक हे युद्ध झाले. यात भोजाचा सेनापती मारला गेला. कोपेश्वर मंदिराजवळ त्याच्या पराक्रमाचा वीरगळ आहे. हे युद्ध जिंकल्यावर त्याने पन्हाळ्यावर स्वारी करून राजा भोजाला बंदिवान बनवले आणि पन्हाळ्यावरच कैदेत टाकले. एका शिलालेखात सिंघणाचा पक्षिराज (सर्पांना चिरडणारा गरूड) असा उल्लेख येतो, जे शिलाहार सत्तेवरील विजयाचे प्रतिक आहे.

कोपेश्वर मंदिरात सिंघणाने एक शिलालेख कोरविला. आणि कोल्हापूरच्या वैभवशाली शिलाहारांचे राज्य खालसा झाले (इ.स १२१२).

ह्याच शिलाहार घराण्यातील एक प्रमुख राजा गंडरादित्य ह्याचा कोल्हापूर येथे सापडलेल्या ताम्रपट खूप महत्वाचा असून ह्या घराण्याच्या वंशावळीबद्दल, तसेच घराण्याचा एकूण कारकिर्दीबद्दल ह्या ताम्रपटात विस्ताराने लिहिले आहे. याबद्दल पुढे काही लिहिण्याआधी ताम्रपट म्हणजे नेमके काय ते समजून घेणे महत्वाचे ठरावे.

**ताम्रपट किंवा ताम्रशासन:**

ब्राह्मी लिपीची अक्षरे उभ्या, आडव्या, तिरप्या अशा रेषांची मिळून बनलेली असल्याने शिळांवर ती कोरणे तुलनेने सोपे जात असे. पण नंतर देवनागरीसकट इतर लिप्यांचा उगम होऊन अक्षरांना सौष्ठव प्राप्त झाले.

त्यामुळे शिळांवर अक्षरे कोरणे वेळखाऊ आणि किचकट काम बनले. तसेच शिळांचे वजन जड असल्याने त्या इकडून तिकडून नेण्यावर मर्यादा पडू लागल्या. त्यामुळे राजांची दानपत्रे धातूच्या पत्र्यांवर कोरण्याची प्रथा निर्माण झाली. हे धातूचे पट शक्यतो तांब्याचे वापरले जात, तर क्वचित चांदीच्या किंवा सोन्याच्या पत्र्याचाही वापर केलेला आढळतो. पत्रावर लिहिणे तुलनेने सोपे जाऊ लागले. तसेच ते टिकाऊ, वजनाने हलके असल्याने इकडून तिकडे सहज नेता येऊ लागले.

सर्वसाधारणपणे ताम्रपटाचे तीन पत्रे असतात. पहिल्या पत्र्याची पहिली बाजू व शेवटच्या पत्र्याची मागची बाजू कोरीच असे. पहिल्या पत्राची मागची बाजू, दुसऱ्या व तिसऱ्या पत्र्याच्या दोन्ही बाजू व तिसऱ्या पत्र्याची पहिली बाजू यावर लेख लिहिले जात. तिन्ही पत्र्याच्या उंचावलेल्या कडा व मधल्या खोलगट बाजूमुळे अक्षरांचे घर्षण न होता ती सुरक्षित राहत. तीनही पत्र्यांच्या कडेला छिद्र पाडून त्यात धातूची तार ओवली जाई व तिची टोके एकत्र करून त्यावर राजमुद्रा अंकित करून ते दानपत्र (अथवा ताम्रशासन) दात्याला दिले जाई. हा एक कायदेशीर दस्तऐवज असे.

**गंडरादित्याचा कोल्हापूर ताम्रपट - शके, १०३७ :**

शिलाहार राजा गंडरादित्य याने त्याचा सामंत निगुंब वंशातला नोळंब यास वंशपरंपरेने दिलेल्या गावाच्या दानाचा उल्लेख यात आलेला आहे. कोल्हापूरजवळील वळेवाड या गावातल्या शिबिरातून हे दान दिले गेले. कोल्हापूर येथील श्री. र. न. आपटे यांजकडून पुणे येथील डेक्कन कॉलेजचे माजी प्राध्यापक डॉ. काशीनाथ बापूजी पाठक यांच्याकडे हा ताम्रपट वाचनार्थ आला. त्यांनी त्याचे प्रथम वाचन केले. नंतर श्री. ग. ह. खरे यांच्याकडून एकदा आणि म.म. वा. वि. मिराशी यांच्याकडून दोन वेळा असे एकंदरीत चार वेळा ह्या ताम्रपटाचे संपादन झाले आहे.

ताम्रपटवर्णन :

ताम्रपटाचे तीन पत्रे असून ते एका जाड कडीत ओवलेले आहेत. कडीवर शिलाहार राजवंशाची खूण म्हणून सर्पधर गरुडाची मूर्ती कोरलेली आहे. पहिल्या व शेवटच्या पत्र्याची सुरुवातीची आणि शेवटची बाजू अलिखित असून दुसरा पत्रा दोन्ही बाजूंनी लिहिलेला आहे. पत्र्यांच्या कडा चारही बाजूंनी उंचावलेल्या असल्याने अक्षरे शाबूत आहेत.

अक्षरे कन्नड लिपीमध्ये असून भाषा मात्र गद्यपद्य संस्कृतात आहे, तरीही काही कानडी शब्द त्यात आले आहेत. शके १०३७, मन्मथ संवत्सर कार्तिक शुक्ल पक्ष, अष्टमी, बुधवार असा दान केल्याचा काळ आहे.

**ताम्रपटाची मूळ संस्कृत संहिता:**

**पत्रा पहिला, बाजू दुसरी**

१) स्वस्ति | जयत्याविष्कृतं विष्णोव्वाराहं क्षोभिताण्णवं दक्षिणोन्नतदंष्ट्राग्रविश्रा

२) न्तभुवनं वपुः || [१] जयति जगति रूढो राजलक्ष्मीनिवासः प्रविजितरिपु

३) वर्ग्गः स्वीकृतोत्कृष्टदुर्ग्गस्सकळसुकृतवासो वीरलक्ष्मीविळासो जनितसुजन

४) रागः श्रीशिळाहारवंशः [२] श्रीमत्शिळाहारनरेंद्रवंशे श्रीकीर्तिकान्ताः कमनी

५) यरूपाः विख्यातशौर्या बहवो नृपेंद्राः संपाळयामासुरिमां धरि

६) त्रीं [३] तद्वृंशे नृपातिर्ब्बभूव जतोगो गोमन्थदुर्ग्गाधिपो | भूमः (पः) श्रीवनितापतिस्सु

७) चरितो गंगस्त पेर्मानडेस्तस्याभूत्तनयप्प्रतापनिळया (यः) श्रीनायिमां

८) को नृपः कर्ण्णाटीकिचकुंकुमांकिततनुर्व्विद्याधराधीश्वरः [४] तस्यात्म

९) जरसुपरिवर्द्वितराज्यलक्ष्मी प्प्रादुर्ब्बभूव समुपार्जितपुण्यपुंजः

१०) चंद्राहृदयो जगति विश्रुतकीर्तिकान्तरस्यागार्ण्णवो बुधनुतो नयनाभि

११) रामः [५] तस्स्यापि पुत्रो जतिगो नरेंन्द्रो जातः प्रवीरो गजयूथनाथः तस्स्या

१२) त्मजौ गोंकलगूवलाख्या जातावुभौ वैरिकुळाद्रिवजौ [६] तदगोंकलस्य तनुजो रिपुदन्ति

१३) सिंहः श्रीमारसिंहनपतिर्म्मरूवक्कशर्प्पः प्प्रादुर्ब्बभूव समरांगणसूत्र

१४) धारो विख्यातकीर्तिरिह पंडितपारिजातः [७] तस्स्याग्रसूनुर्ज्जगदेकवीरो वी

१५) राजनाबाहुलतावगूढः | कीर्तिप्रियो गूवलदेवनामा बभूव भूपाळ

१६) वरो नरेंद्रः [८] तस्स्यानुजस्सकळमंगळजन्मभूमिरासीन्नृपाळतिलको भुवि भोज

१७) देवः प्रोत्तुंगवीरवनिताश्रयबाहुदण्डश्चण्डारिमण्डळशिरो गिरिवज्रदण्डः [९]

**पत्रा दुसरा, बाजू पहिली**

१८) श्रीमत्कदंबांबरतिग्मरश्मेश्शिरस्सरोजं खळु शान्तरस्य पूजां प्रचक्रे स च चक्रवर्त्तिशीविक्र

१९) मादित्यनृपेन्द्रपादे [१०] किं वन्न्र्य (र्ण्य)ते जगति वीरतरः प्रसिद्धः कोपात्तु कोंगजनृपोपि

२०) पपात यस्य सूर्य्यान्वयांबररविस्स च बिज्जणोपि चक्रे गृहं सुरपतेर्ब्भुवि य

२१) स्य कोपात् [११] यत्प्रतापप्रदीपेस्मिन् कोक्कलस्सलभयितः पलायिता न गण्यन्ते सोयं

२२) भोजनृपाळकः [१२] वेणुग्रामदवानळो विजयते वैरिभकंठिरवो गोविंदप्रळयान्त

२३) कः शिखरिणो वज्रः कुरंजस्य च भोजः स्वीकृतकोंकणो भुजबळात्तद्विल्लमोद्वंध

२४) कृत्सोयं कर्न्नदिशापटो रिपुभृद्दोर्द्दण्डकण्डूहरः [१३] तस्यानुजातो गुणराशि

२५) रासितबल्लाळदेवो जितवैरिभूपः जीमूतवाहान्वयरत्नदीपो गंभीर

२६) मूर्तिर्भ्भुविशौर्यशाली [१५] अजनि तदनुजातास्तिग्मरश्मिप्रतापो दिविजपतिवि

२७) भूतिस्सव्वर्लक्ष्मीनिवासः कृतरिपुमदभंगो राजविद्याप्रसंगो भुवनवि

२८) नुतमूर्त्तिग्गर्ण्डरादित्यदेवः [१५] चक्रे चाळुक्यक्रेशो विक्रमादित्यवल्लभः निश्शं

१९) कमल्ल इत्याख्यां गण्डरादित्यभूपतेः [१६] धन्यास्ते मानवास्सर्व्वे धन्याश्चमृगजात

३०) यः देश्स्स्फला यत्र गण्डरादित्यभ्पतेः [१७] यखंगाभ्दुततीव्रघा

३१) तचकितस्तत्कुण्डिदेशोधिपो दण्डब्रह्मन्नुपो जगाम सदनं संसेव्यमानं सुरै

३२) स्त्यक्त्वा राष्ट्रमतीवरम्यतुळां लक्ष्मी भुजोपार्जितां सोयं गण्डरदेवमं

३३) ण्डळपतिस्संशोभते भूतळे [१८] रत्नानि यत्नेन ददाति तस्मै रत्नाकं

३४) रो भंगभयाज्ज्डात्मा आपूर्य्य सम्यक्सततं बहित्रं सूक्ष्माणि

३५) वासांसि हयांश्च तस्मै [१९] किमिह बहुभिरूक्तैरल्पगब्भैंर्व्वचिभिर्भुवन

**पत्रा दुसरा, बाजू दुसरी**

३६) विदितवीरः क्रूरसंग्रामधीरः अपरनृपतिकोशं देशमत्यंतशोभं यदिकुपितचित्तः

३७) कारयत्यात्मकीयं [२०] समधिगतपन्चमहाशब्दमहाण्डळेश्वरः तगरपुरा

३८) धीश्वरः शिळाहारनरेंद्रः | जीमूतवाहनान्वयप्रसूतः सुवर्ण्णगरुड

३९) ध्वजःमरूवक्क्शर्पः | अय्यनसिंहः रिपुमण्डळिकभैरवः विद्विष्टगजकंठी

४०) रवः | गणिकामनोजः | हयवच्छत्स राजः | शौचगांगेयः | सत्यराधेय

४१) इडुवरादित्यः | रूपनारायणः | कलियुगविक्रमादित्यः | शनिवार

४२) सिद्धोः | गिरिदुग्र्गलंघनः | श्रीमन्महालक्ष्मीलब्धवरप्रसादादि समस्तराजाव-

४३) ळीविराजितः श्रीमन्महामण्डळेश्वरः श्रीगण्डरादित्यदेवः श्रीमद्वळय

४४) वाडशिबिरे सुखसंकथाविनोदेन राज्यं कुर्व्वाणः | सप्तत्रिंशदुत्तरसह

४५) स्त्रेषु श कवर्षेषु १०३७ अतीतेषु मन्मथसंवत्सरे कार्तिकमासे शुक्लपक्षे |

४६) अष्टम्यां बुधवारे मिरिंजे देशे | मिरिंजे गम्पणमध्ये | अंकु

४७) लगोब्याप्पेयवाडैतिग्रामद्वयं आदगोनाम ग्रामस्य प्रविष्टं कृत्वा तद्ग्रा

४८) मारूवणं त्यक्त्वा तत्रत्यनाग्र्गुण्डो यदि नायकत्वं कुर्वन्ति तेषां शरी

४९) रजीवितार्त्थ सुवर्ण्ण न ददाति यदि नायकत्वं नेच्छन्ति स्वेच्छया तिष्ठन्ति त

५०) दा कोदेवणं नास्ति | एवमनेन क्रमेण | श्रीमत्पवित्रेत्र निगुंब

**पत्रा तिसरा बाजू पहिली**

५१) वंशे जातः पुमान् हारिमनामधेयः कीर्त्तिप्रियः पुण्यधनः प्रसिद्धः श्री

५२) जैनसंघांबुजतिग्मरश्मिः [२१] तस्यात्मजोभूदिह बीरणाख्य स्तस्यानुजोभू

५३) दरिकेसरीति तद्वीरणस्यापि तनुभवोयं बभूव कुंदातिरिति प्रसिद्धः || [२२]

५४) तस्यानुजस्सुपरिपाळितबन्धुवर्ग्गः श्रीनायिमा जिनमतांबुधिचं

५५) द्रयेषः | त्यागान्वित सुचरितस्सुजनो बभूव प्रख्यातकीर्त्तिरिह धर्म्मप

५६) रः प्रसिद्ध [२३] तस्यापि वीरः सुजनोपकारी नोळंबनामा तनयोबभूव

५७) श्रीगण्डरादित्यपदाब्जभृंगो धर्म्मान्वितो वैरिमतंगसिंहः [२४] तस्मै

५८) समस्तगुणगणाळंकृताय निगुंबकुळकमळमार्तण्डाय | सुवर्ण्ण

५९) मत्स्योरगेन्द्रध्वजविराजिताय सम्यक्तत्त्व रत्नाकराय म पद्मावती देवीलब्धवर

६०) प्रसादाय नोळंबसामन्ताय सर्व्वनमस्यं सर्व्वबाधापरिहारं पुत्र

६१) पौत्रकमाचन्द्रार्क्क दत्तवान्

**मराठी भाषांतरः**

**पत्रा पहिला, बाजू दुसरी**

स्वस्ति, ज्याने समुद्र क्षुब्ध केला आहे व ज्याच्या उजव्या दाढेवर जग विश्राम पावत आहे, त्या वराहरूपी विष्णूचा जय असो.

या जगात जो प्रसिद्ध आहे, जो राजलक्ष्मीचे निवासस्थान आहे, ज्याने शत्रुवर्गाला जिंकले आहे, ज्याने सर्वोत्कृष्ट किल्ले आपल्या ताब्यात आणिले आहेत, ज्याच्या ठिकाणी सदैव सर्व सुकृतांचा वास आहे, जो वीरलक्ष्मींचे ठायी विलास करितो, सुजनांच्या ठिकाणी ज्याने प्रेम उत्पन्न केले आहे अशा शिलाहार वंशाचा जय असो.

या शिलाहार राजांच्या वंशात जे लक्ष्मी आणि कीर्ती यांचे मालक बनले आहेत, जे रूपसुंदर आहेत, ज्यांचे शौर्य विख्यात आहे अशा पुष्कळ राजांनी या धरित्रीचे पालन केले आहे.

त्या वंशात 'पेर्मानडी गंगाचा' गोमंथ नामक किल्ला धारण करणारा, ऐश्वर्यस्त्रीचा पती, उत्तम आचरणाचा असा 'जतिग' नावाचा राजा झाला. त्याला प्रतापाचे आश्रयस्थान, कर्नाटकी स्त्रीच्या स्तनाच्या कुंकवाने ज्याचे शरीर चिन्हित झाले आहे व जो विद्याधरांचा स्वामी आहे, असा 'नायिमांक' नावाचा मुलगा होता.

त्याचा मुलगा 'चंद्र' ज्याने राज्यलक्ष्मीची उत्तम वाढ केली, ज्याने पुण्यसंचय केला आहे, जो पृथ्वीवर प्रख्यातकीर्ती होता, जो त्यागाचा समुद्र, शहाण्यांनी स्तुती केलेला व डोळ्यांना आवडता असा होता.

त्याचा (चंद्राचा) मोठा, वीरहत्तींचे सैन्य बाळगणारा असा 'जतिग' या नावाचा मुलगा होता. त्याला शत्रुकुलरूपी पर्वतांना वज्रासमान असे 'गोकल' व 'गूवल' नांवाचे दोन मुलगे झाले.

त्या गोकलला शत्रुरूप हत्तींना सिंहाप्रमाणे समरांगणसूत्रचालक, विख्यातकीर्ती व पंडितांना प्रिय असा 'मारसिंह' नावाचा मुलगा झाला.

त्याचा थोरला मुलगा जगदेकवीर, राजसस्त्रियांच्या बाहूरूपी वेलींच्या विळख्यात असलेला, कीर्तिप्रिय, राजश्रेष्ठ असा 'गूवल' नावाचा राजा होता.

त्याचा धाकटा भाऊ 'भोज' हा सर्व मंगलांचे जन्मस्थान, नृपतिलक, सुंदर वीरपत्नींनी आलिंगलेला, भयंकर शत्रूंचे शिरोरूपी पर्वत असलेल्यांना वज्रासमान असा होता.

**पत्रा दुसरा, बाजू पहिली**

याने (भोज) कदंब वंशरूपी आकाशातील सूर्य असा जो 'शांतर', त्याच्या शिरकमलाने चालुक्य चक्रवर्ती 'विक्रमादित्य' याच्या पायांची पूजा केली.

या जगप्रसिद्ध योद्ध्याचे वर्णन काय करावे? याच्या कोपामुळे 'कोंगज' राजा पडला आणि सूर्यवंशरूपी आकाशाचा सूर्य असा जो 'बिज्जण', हा देवाघरी गेला.

याच्या प्रतापदीपावर 'कोक्कल' पतंग बनला (नाश पावला) व पळून गेलेल्यांची गणतीच नाही.

तोच हा 'भोजराजा', ज्याने वेणूग्राम (बेळगांव) जाळले, जो शत्रुरूपी हत्तींना सिंहासारखा होता, ज्याने 'गोविंदाचा' नाश केला, 'कुरंज'रूपी पर्वताला जो वज्रासमान झाला, ज्याने कोकण ताब्यात आणिले व बाहुबलाने 'भिल्लम' याची मुक्तता केली. हा (राजा भोज) शत्रुराजांची बाहूंची कंडू शमन करणारा असा होता.

त्याचा धाकटा भाऊ 'बल्लाळदेव' हा ज्याने शत्रुराजांना जिंकले, जो जीमूतवाहन वंशांतील रत्नदीप, जो गंभीर स्वरूपाचा व भूवरी शौर्यशाली असा होता.

त्याच्या (बल्लाळदेवाच्या) पाठीमागून सूर्यासारखा प्रतापी, इंद्रासारखा ऐश्वर्यवान, सर्व लक्ष्मींचे निवासस्थान, शत्रूंच्या मदाचा भंग केलेला, राजविद्येची गोडी असलेला, जगाने ज्याची स्तुती केली आहे, असा 'गंडरादित्य' झाला.

याच्या साहाय्याने चालुक्य 'विक्रमादित्य' याने 'नि:शंकमल्ल' ही पदवी धारण केली.

ज्या ठिकाणी 'गंडरादित्य' राजा होता तेथील मानव, पशू व तो देश हे सर्व धन्य होत.

ज्याच्या तलवारीच्या तीव्र आघाताने भ्यालेला 'कुंडी'देशाचा राजा 'दंडब्रह्म' अतिशय रम्य राष्ट्र व स्वहस्ते मिळवलेले ऐश्वर्य टाकून देवाघरी गेला. तो हा गंडरादित्य' भूतलावर शोभायमान होत आहे. जड असा जो

समुद्र तो स्वत:च्या भंगाच्या भयाने यास नेहमी रत्ने, तलम वस्त्रे आणि अश्व देतो.

**पत्रा दुसरा, बाजू दुसरी**

याची अल्प स्तुती करून काय उपयोग ! जो जगप्रसिद्ध वीर भयंकर संग्रामातही धैर्यशाली असा हा रागावला तर दुसऱ्या राजांचे खजिने आणि सुंदर प्रदेश आत्मसात करितो.

ज्याने पाच महाशब्द मिळविले आहेत, असा महान मंडळांचा स्वामी (महामंडळेश्वर- महान मांडलिकांचा ईश्वर), तगरपुराचा स्वामी, शिलाहार राजा जीमूतवाहनाच्या वंशात उत्पन्न झालेला, सुवर्ण गरुडाचा ध्वज असलेला, मरूवक्कसर्प, आयाळ असलेला सिंह, रिपुमंडळाला भयंकर, शत्रुरूपी हत्तींना सिंह, गणिकांना मदनासारखा, घोड्याला वत्स राजासमान, शुद्धतेंत जणू भीष्मच, खरेपणात कर्ण, अंधाराला आदित्य, रूपाने विष्णू, कलियुगातला विक्रमादित्य, शनिवार सिद्धी, गिरिदुर्गांचे ओलांडून जाणारा, 'महालक्ष्मी'चा प्रसाद व सर्व राजांमध्ये शोभायमान असा गंडरादित्यदेव श्री 'वळयवाड' शिबिरात सुखसंभाषण व विनोद यांनी युक्त होऊन राज्य करीत असता, याने शक १०३७, मन्मथ संवत्सर, कार्तिक शुक्ल अष्टमी, बुधवार या दिंवशी 'मिरज' देशातील 'मिरज' विभागातील 'अंकुलगे' '(अक्कलखोप) आणि 'बोप्पयवाड' (आंबेवाडी) ही गावे 'अदगो' नावाच्या गावाचा त्यातच समावेश करून व त्यातील अंकुलगे व बोप्पयवाड या गावांचा कर (आरूवण) माफ करून त्या नगरांतील प्रमुख व्यापारी (नाग्गांवुंड) सावकारी करतील त्यांना सुवर्णनाण्याचा कर लागेल व जे सावकारी करणार नाहीत त्यांना कोदेवण (राजक्षत्रावरील कर) लागणार नाही, अशी ही गावे (अधोलेखित 'नोळंब' सामंताला) देता झाला. 'निगुंब' वंशात कीर्तिप्रिय, पुण्यधन, जैनसंघरूपी कमळाला सूर्याप्रमाणे व प्रख्यात असा 'हारिम' नांवाचा मनुष्य झाला.

**पत्रा तिसरा, बाजू पहिली**

त्याचा (हारिम) मुलगा 'बीरण', त्याचा धाकता बंधू ' अरिकेसरी'. त्या बीरणांचा मुलगा प्रसिद्ध कुंदाति.

त्याचा (कुंदातिचा) धाकटा भाऊ 'नायिम'. याने बंधुवर्गांचे उत्तम पालन केले. हा जिनमतरूपी समुद्राला चंद्राप्रमाणे झाला. तसेच हा त्यागयुक्त, सुचरित, सुजन, प्रख्यात व धर्मपर असा होता.

त्याचा (नायिमाचा) सज्जनांना उपकारक, वीर, गंडरादित्याच्या पदकमलांच्या ठिकाणी भुंग्यासारखा, धर्मयुक्त व वैरीरूप हत्तींना सिंहासारखा असा 'नोळंब' नांवाचा मुलगा होता.

सर्व गुणसमुदायांनी अलंकृत, 'निगुंब' कुलकमलाला सूर्यासारखा, सुवर्ण मत्स व सर्प यांच्या ध्वजेने विराजमान, समुद्र व पद्मावती देवीचा वरप्रसाद मिळालेला, अशा त्या 'नोळंब' सामंतास सर्वमान्य व कुठलाही त्रास नसलेले असे वरील ग्रामद्वय पुत्रपौत्रादी वंशपरंपरेने जोवर सूर्य चंद्र आहेत, तोवर दिले आहे.

**थोडेसे स्पष्टीकरण :**

वरील ताम्रपटात शिलाहार आणि गंडरादित्याचा सामंत नोळंब याच्या निगुंबवंशाची वंशावळ आली आहे.

कोल्हापूर शिलाहार वंशावळ (गंडरादित्यापर्यंत):

१) जतिग(प्रथम)

२) नायिम

३) चंद्र

२) जतिग (द्वितीय) - गूवल (प्रथम) आणि गोकल ही दोन मुले

३) गोकल - मारसिंह

४) मारसिंह - गूवल (द्वितीय), भोज (प्रथम), बलाळ आणि गंडरादित्य ही चार मुले

५) गंडरादित्य

निर्गुंब वंशः

१) हारिम - बीरण आणि अरिकेसरी ही दोन मुले

२) बीरण - कुंदाति आणि नायिम ही दोन मुले

३) नायिम - नोळंब

४) नोळंब

या ताम्रपटाच्या प्रारंभीच विष्णूच्या वराहावताराचा 'जयत्याविष्कृतं विष्णोव्वाराहं ...' हा श्लोक येतो. चालुक्य राजवटीचे राजचिन्ह 'वराह' हे असल्याने शिलाहार हे चालुक्यांचे नाममात्र का होईना, पण मांडलिक होते हे स्पष्ट होते.

यानंतर शिलाहार राजा भोज (पहिला) याच्या पराक्रमाचे बरेच वर्णन आले आहे.

भोजाने कदंब नृपती शांतर, कोंगजनृपती, सूर्यवंशी बिज्जण, कोक्कल, गोविंद, कुरुंज यांचा पराभव केला, वेणुग्राम जाळले तर भिल्लमाची मुक्तता केली. हा शांतर म्हणजे कदंबराजा शांतिवर्मन असावा. तर कोंगज, कोक्कल, कुरूंज यांचा पत्ता लागत नाही, गोविंद मौर्यवंशातील असावा. भिल्लम बहुधा यादवकुळातला असावा. सेऊणचंद्र यादवाने गोविंदाच्या मदतीने भिल्लमाला कैदेत टाकून गादीवर आला असावा. वेणुग्रामात (बेळगावात) सौंदत्तीच्या रट्टांचे राज्य होते. ही सर्व युद्धे भोजाने चालुक्य विक्रमादित्यासाठी केली असावीत. भोजाचे विक्रमादित्याची नातेसंबंधसुद्धा होते. विक्रमादित्य (सहावा) याची पत्नी चंद्रलेखा अथवा चंदलादेवी ही भोजाचा पिता मारसिंह याची कन्या होती.

यानंतर गंडरादित्याच्या पराक्रमाचे वर्णन ताम्रपटात आले आहे. गंडरादित्याच्या साहाय्यानेच विक्रमादित्याने नि:शंकमल्ल ही पदवी धारण केली आणि त्याने कुंडी देशाचा राजा दंडब्रह्म याचा उच्छेद केला. यावरून गंडरदित्यानेसुद्धा अनेक मोहिमांमध्ये विक्रमादित्याला मदत केली असावी असे दिसते. गंडरादित्याला मरुवक्कसर्पाचीही उपमा दिलेली आहे. मरूवक्क हे सुगंधी वनस्पती मरवा याचे कन्नड रूप. मरव्याजवळ साप येत नाहीत, अशी समजूत आहे. मरूवक्कसर्प म्हणजे ज्या

प्रमाणे मरव्याजवळ साप येत नाहीत, त्याचप्रमाणे गंडरादित्यासमोर सापांसारखे दुष्ट मनुष्य येत नाहीत.

ज्या शिबिरात बसून गंडरादित्याने हे दान दिले, ते वळयवाड कोल्हापूरच्या पूर्वेस २/३ मैलांवर असलेले वळेवाड असावे. तर निगुंबवंशी सामंत हे जैन धर्माचे अनुयायी दिसतात.

असा ह्या ऐतिहासिकदृष्ट्या महत्वाचा कोल्हापूर ताम्रपट, शिलाहारवंशावर बराच प्रकाश तर टाकतोच शिवाय त्यांच्या पराक्रमाचीही माहिती पुरवतो.

# प्रकाशयात्रा

## अभिषेक९

भारतात एकामागून एक भ्रष्टाचाराची प्रकरणे बाहेर येत आहेत. टूजी (2G), कॉमनवेल्थ, आदर्श, अंतरीक्ष-देवास आणि आताचा कोळसा वाटप... महाराष्ट्रात तर अजूनच वाईट परिस्थिती आहे! वरील घोटाळ्यांचे बरेचसे शिलेदारदेखील मराठीच! क्षुब्ध होण्यासाठी एवढे कारण पुरेसे नव्हते, म्हणून वर सिंचन घोटाळा, टोल घोटाळा आणि अनुशेषाची नेहमीची भानगड आहेच.. अण्णांची टोपी घालून मागच्या वर्षी रस्त्यावरही उतरलो. पण सत्ताधारी पक्षाने संसदेतच आमच्या भावनांचे धिंडवडे काढले आणि चाणाक्ष मीडियाने माझ्यासारख्यांचा 'विनोद' केला. जीव त्रस्त झाला होता, मनात खूप संताप साचला होता. सगळ्या परिस्थितीकडे पाहून दोन दशकापूर्वीच्या कुसुमाग्रजांच्या ओळी आठवल्या...

'हे लोकशाही नामक जगदंबे,

तुझं मेणाहून मऊ असलेलं,

लाख पापांचं जहर

पोटात घालणारं अतिवत्सल रूप आम्ही पाहिलं आहे, अनुभवलं आहे. '

२०१२मध्ये हेच रूप पुन्हा दिसत आहे, अनुभवास येत आहे... देशाची राजकीय हवा भ्रष्टाचाराने बरबटून गेली आहे. अशा स्थितीत माझ्यासारख्याच्या हातात आता एकमेव शस्त्र होते, ते म्हणजे सोशल मीडिया.. त्यानेच वार करत होतो. राग साठवायचा आणि ट्वीटर / फेसबुकवर ओतायचा, हाच उद्योग चालू होता.

अचानक एक दिवस मुंबईच्या रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे महानिदेशक डॉ. विनय सहस्रबुद्धे यांच्या फेसबुक पेजवर 'प्रकाशयात्रा - गुजरात' असे काहीतरी वाचले. 'रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचा' 'शासकता पर्यटन' नावाचा एक अभिनव उपक्रम! स्वखर्चाने तीन दिवस गुजरातचा दौरा करायचा, तेथील विकास प्रकल्पांची माहिती घ्यायची, ते प्रत्यक्ष बघायचे आणि शेवटी गुजरातचे मुख्यमंत्री माननीय श्री. नरेंद्र मोदींची भेट घ्यायची. कल्पना भन्नाट वाटली. ज्या गुजरात मॉडेलबद्दल सध्या सगळीकडे बोलले जाते, ते जातीने जाऊन पहावे असे कुणाला वाटणार नाही? मी लगोलग अर्ज करून टाकला.

अखिल भारतीय निवड प्रक्रियेतून १४ जण निवडले गेले. सुदैवाने त्यात माझाही नंबर लागला. २२ ऑगस्टच्या सकाळीच मी अमदावाद (अहमदाबाद)ला पोहोचलो. आम्हा १४ तरुणांचा समूह आणि सोबतीला रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे कार्यकारी निदेशक श्री. रवींद्र साठे. देशाच्या वेगवेगळ्या भागातील, वेगवेगळ्या क्षेत्रातील तरुण 'प्रकाशयात्रा'च्या उद्देशाने एकत्र आले होते. सोशल नेट्वर्किंगच्या माध्यमामुळेच हे शक्य झाले. शाहीबागेच्या सर्किट हाउसमध्ये मुक्कामाची व्यवस्था होती. पापडी-जिलेबीच्या खास गुजराती नाश्त्यासोबत एकमेकांच्या ओळखी झाल्या आणि आमची प्रकाशयात्रा चालू झाली.

यात्रेच्या पहिल्याच टप्प्यात गुजरातच्या वैभवाचे दर्शन घडले. आमच्या यात्रेसाठी गुजरात सरकारने खास

इसुझी कंपनीची टुमदार गाडी दिली होती. त्यापेक्षा दमदार होते भारदस्त मिशावाले ड्रायव्हर काका. काकांनी दिलखुलास हसत स्वागत केले आणि गाडीत बसवले. दिमतीला इन्फो विभागाचे दोन अधिकारीही होते. साबरमती ओलांडून आम्ही गांधीनगर सचिवालयात दाखल झालो. सकाळच्या प्रथम सत्रात आम्ही गुजरात सरकारच्या ५ महत्त्वाकांक्षी प्रकल्पांचा आढावा घेणार होतो. व्यवस्था चोख होती. अगदी वेळेवर पहिले प्रेझेन्टेशन चालू झाले.

**ओम नमामि देवी नर्मदे...**

'सरदार सरोवर' प्रकल्पाच्या अभियंत्याने पहिल्या प्रेझेन्टेशनला सुरुवात केली. दक्षिण गुजरातेतून नर्मदेचे पाणी मध्य-उत्तर-पश्चिम गुजरातकडे ४५६ किलोमीटर लांबीच्या कालव्याद्वारे वळवण्याचा हा भव्य प्रकल्प आहे. पुढे १९०० कि.मी.च्या इतर कालव्यांनी हे पाणी गाव-गावात पोहोचणार आहे. याशिवाय साबरमती, माही या नद्यांमध्येही ह्या कालव्यांचे पाणी सोडले जाणार आहे. जगातील आठ अद्भुत प्रकल्पांपैकी एक म्हणून १९९४ साली हाच प्रकल्प नावाजला गेला होता. पाणी आणि उर्जा असे दुहेरी फायदे देणारा हा प्रकल्प आहे. २८ MAP (Million Acre Feet ) पाणी आणि १४५० MW वीजनिर्मिती अशी एकूण या प्रकल्पाची योजना. याने गुजरातची १८ लाख हेक्टर जमीन ओलिताखाली येणार आहे, ८७ लाख टन अन्न उत्पादन वाढण्याची अपेक्षा आहे. एवढेच नाही, तर किमान ९००० खेड्यांना आणि १३१ नगरांना पाणीपुरवठा, ३०००० हेक्टर जमिनीचे पुरापासून संरक्षण आणि तब्बल १० लक्ष रोजगार निर्मिती होणार आहे.

गावांच्या वेशीपर्यंत पाणी कालव्याने पोहोचले की मग पुढे काय, असा प्रश्न येतो. भारताचा आजपर्यंतचा अनुभव असाच आहे. जलपुरवठ्याचे महाकाय प्रकल्प रचण्यात आले, पण सामान्य जनतेपर्यंत पाणी पोहोचतच नाही. जायकवाडी, कृष्णा-खोरे ह्या सगळ्या प्रकल्पांचे असेच झाले. येथे गुजरातचा वेगळेपणा लक्षात आला. मोदी सरकारने २००२मध्ये जल-व्यवस्थेमध्ये आमूलाग्र बदल करण्यास सुरुवात केली. सर्वप्रथम जलपुरवठा विभागाची पुनर्रचना करण्यात आली. वास्मो (WASMO) नावाची एक विशेष कार्यसंस्था (Special Purpose Vehicle) उभारली. 'उपयोगकर्ता हाच सर्वश्रेष्ठ प्रबंधक आहे' हे या पूर्ण उपक्रमाचे ब्रीदवाक्य. या संपूर्ण उपक्रमाचा गाभा आहे - पाणी समिती. पाणी समिती पाण्याच्या गरजेचा आढावा घेणार, त्यानुसार योजना बनवणार, योजनेची अंमलबजावणीही करणार. या उपक्रमासाठी तांत्रिक साहाय्य व इतर आर्थिक मदत मात्र वास्मो पुरवणार. पाण्याचा दर काय असणार, तो किती कालावधी नंतर आकारायचा, हे सगळे पाणी समिती ग्राम-सभेच्या संमतीने ठरवणार. आतापर्यंत ९०% खेड्यांमध्ये पाणी समितीची स्थापना झाली आहे, जून २०१२पर्यंत तब्बल ८००० प्रकल्प पूर्ण झाले आहेत, ७५% घरांना नळाने पाणीपुरवठा होत आहे. एवढेच नाही, तर पाण्याची गुणवत्ता टिकवण्यासाठी तब्बल १,१९,२४९ लोकांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले आहे. या उपक्रमाचे परिणामही दिसू लागले आहेत. गांधीनगर जिल्ह्यात केलेल्या एका अभ्यासानुसार, पुरवठ्याचे पाणी ९८% टक्के शुद्ध आणि पिण्यायोग्य आहे. ह्या सर्व व्यवस्थेला लागणारा खर्चदेखील लोक-सहभागातून केला जातो. एक रुपया प्रती दिवस प्रती जोडणी असा दर बऱ्याचश्या गावांनी ठरवला आहे. एकूण गावांच्या ३३% (६०००) गावांनी आपले दर आपणच ठरवले आहेत. २००८चा पंतप्रधान उत्कृष्ट लोकसेवा पुरस्कार, २००९चा संयुक्त राष्ट्राचा लोकसेवा पुरस्कार आणि

२०१०चा CAPAM संस्थेचा आंतरराष्ट्रीय नाविन्याचा पुरस्कार अशा विविधरंगी पुरस्कारांनी 'वास्मो' ने नावलौकिक मिळवला आहे.

**गुजरात : न्यू गेटवे ऑफ इंडिया??**

आपल्या महाराष्ट्राच्या मुंबईत 'गेटवे ऑफ इंडिया' आहे. पण आजमितीला गुजरात खऱ्या अर्थाने 'गेटवे ऑफ इंडिया' होऊ पाहत आहे. गुजरातला १६०० कि.मी.ची सागरी किनारपट्टी लाभली असून गुजरातचे स्थानदेखील 'भू-राजकीय'दृष्ट्या अतिशय महत्वाचे आहे. ह्याचाच फायदा घेत गुजरातने सागरी दळणवळण, बंदरांचा विकास यात उंच भरारी घेतली आहे. गेल्या १५ वर्षांत एकूण राष्ट्रीय दळणवळणातील गुजरात सागरी बोर्डाचा वाटा ८%वरून तब्बल २८%पर्यंत वाढला आहे. भारतातील एकूण ९१५ बंदरांपैकी तब्बल २६० बंदरे गुजरातमध्ये आहेत. खाजगी निवेशाला प्रोत्साहन देण्याच्या नीतीमुळे गेल्या १० वर्षांत गुजरातेत तब्बल २०००० कोटींची गुंतवणूक झाली. त्यामुळे दहेज, मुंद्रा, पिपावाव, सिक्का, हझीरा अशा ठिकाणी खाजगी बंदरे विकसित केली गेली आहेत. जहाज-बांधणी व्यवसायालाही प्रोत्साहन दिले जात आहे. बंदरापर्यंत सहज पोहोचता यावे यासाठी रस्ते-रेल्वे-सागरी मार्ग यांचा समन्वय साधण्यात आला आहे. याशिवाय रो-रो फेरी प्रकल्प, ग्रीनफिल्ड पोर्ट प्रकल्प,पोर्ट सेझ प्रकल्प, सागरी प्रशिक्षण कार्यक्रम असे महात्त्वाकांशी प्रकल्प आहेतच. ७२० कि.मी. सागरी किनारा असलेल्या महाराष्ट्राला यातून बरेच शिकण्यासारखे आहे.

**अनंत अमुची ध्येयासक्ती...**

गुजरातला सुजलाम सुफलाम (विकसित) करणाऱ्या या सगळ्या प्रकल्पांबद्दल प्रेझेन्टेशन्स संपल्यानंतर आम्ही वळलो मोदींच्या दोन अतिशय महत्त्वाकांक्षी प्रकल्पांकडे - ढोलेरा एसआयर (SIR) आणि गिफ्ट (गुजरात इंटरनेशनल फायनान्स टेक-सिटी). ढोलेरा एसआयआर हा या प्रकारचा भारतातला पहिलाच प्रकल्प. सुमारे ९०००० हेक्टर जमिनीवर, एकूण २२ गावांच्या भूमीवर हा एसआयआर साकारण्यात येणार आहे. एसआयआर म्हणजे स्पेशल इन्व्हेस्टमेंट रीजन - विशेष निवेश विभाग. गुजरात सरकारने २००९ साली ह्यासाठी विशेष कायदा केला आणि लगेचच हा एसआयआर स्थापन केला गेला. ढोलेरा एसआयआर म्हणजे ६ कोर औद्योगिक सेक्टर, ६ CBDs, अहमदाबाद-भावनगर जलदगती मार्ग, खेळाची मैदाने, विमानतळ, गोल्फ कोर्स, सोलर फार्म, काल्पासार धरण, तीन आयटी पार्क्स, इत्यादी. आणि ह्यात अंदाजे लोकसंख्या २० लक्ष, एकूण रोजगार निर्मिती ८ लक्ष! एवढे सगळे ऐकून आम्हास मुख्य प्रश्न पडला तो जागेचा. पण उत्तर त्यांच्याकडे तयारच होते! ढोलेरा एसआयआरमध्ये भूमी अधिग्रहण न करता होणार आहे जागेची अदलाबदली आणि टाउन प्लानिंग. हा प्रकल्प म्हणजे 'गुजरातमध्येच एक नवीन गुजरात' वसणार आहे.

२१व्या शतकाचे सगळ्यात ठळक वैशिष्ट्य म्हणजे आर्थिक जागतिकीकरण. भारताने १९९१ साली उदारवाद नीतीचा स्वीकार केला आणि भारताची आर्थिक भरभराट होऊ लागली. पण अतिशय वेगाने बदलत जाणाऱ्या आजच्या आर्थिकीकरणाची आव्हानेही तेवढीच आहेत. ह्यासाठी प्रत्येक राष्ट्राने तत्पर राहण्याची नितांत गरज आहे. हीच गरज ओळखून मोदींनी एक जबरदस्त मोठा प्रकल्प आखला आहे, 'गिफ्ट'चा!

पॅरिसचे ला-डिफेन्स, टोकियोचे शिंजुल्, लंडनचे डॉकयार्ड यांच्याच धर्तीवर एक फायनान्स सिटी उभारायचा विचार आहे.

देशालाच नव्हे, तर संपूर्ण जगाला आर्थिक सेवा पुरवण्याचा हा एक महात्त्वाकांक्षी प्रकल्प. २०२०पर्यंत एक कोटी रोजगार आणि $४०० बिलियन GDP, म्हणजे सध्याच्या जवळजवळ चौपट क्षमतेची आर्थिक सेवा ह्या क्षेत्रातून पुरवली जाईल. मेकेन्झीच्या अभ्यासानुसार एकूण ५ गुरगाव व ७ पुणे नव्याने वसतील, अशी क्षमता या क्षेत्रात आहे. मुंबईचे बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स अशाच काहीशा कल्पनेतून सुरु करण्यात आले होते, पण ते फक्त सिमेंटचे जंगल होऊन बसले आहे. त्यातून धडा घेत गिफ्ट हे फक्त कमर्शियल क्षेत्र न राहता, मनोरंजन क्षेत्र म्हणूनही उदयास येणार आहे. ह्या प्रकल्पाबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी आणि डायमंड आकाराची मुख्य इमारत बघण्यासाठी गिफ्टची वेबसाईटच बघणे योग्य.

**साबरमतीचे ऋण...**

प्रभावित होऊन आम्ही सचिवालयातून बाहेर पडलो. साबरमतीच्या प्रसन्न आणि पवित्र वातावरणात आम्ही प्रकाशयात्रेच्या पुढच्या टप्प्याकडे वळलो. साबरमती नदीचा विकास! २१व्या शतकातील नागरीकरणामुळे अत्यंत वेगाने नद्यांचा ऱ्हास होत आहे. गंगा वाचवा, यमुना वाचवा अशा घोषणा नेहमी दिल्या जातात, पण प्रत्यक्ष कृती मात्र दिसत नाही. पण जेव्हा 'साबरमती वाचवा'ची हाक दिली गेली, तेव्हा गुजरात सरकारने इतरांप्रमाणे कानाडोळा न करता एक परिपूर्ण योजना तयार केली. ह्यासाठी खास 'साबरमती रिव्हर फ्रंट' विकास निगमाची स्थापना केली. अहमदाबादमधून वाहणाऱ्या साबरमतीच्या दोन्ही काठांचा विकास करणे अशी ही योजना आहे. सर्वप्रथम पाणी शुद्ध करण्यासाठी, सांडपाण्याचा निचरा वळवण्यात आला. पाण्याची पातळी नियमित ठेवण्यासाठी सरदार सरोवर मुख्य कालव्यातून नर्मदेचे पाणी सोडण्यात येते. पर्यटन क्षेत्र हा भाग म्हणून विकसित व्हावा यासाठीदेखील विविध योजना आखल्या. सुंदर पायवाट, सांस्कृतिक स्थळे, संग्रहालय इत्यादींनी परिसर सुशोभित होणार आहे. याशिवाय जल-वाहतुकीसाठी 'फेरी सेवा'सुद्धा केली जाणार आहे. हा प्रकल्प भूगर्भीय जलस्तर वृद्धिंगत करेल व नगरला शुद्ध पाणीपुरवठा होईल. त्यासोबतच अहमदाबाद हिरवेगार होईल. पूर्ण होण्याच्या आधीच या प्रकल्पाला अनेक राष्ट्रीय व जागतिक पुरस्कार मिळाले आहेत. हा सगळा प्रकल्प बघताना मला पुण्याची आठवण झाली. मुळा-मुठेचाही विकास असाच व्हावा असे मनोमन वाटते!

**जनमार्ग..**

आज नगरांना प्रवासी वाहतुकीची मोठी समस्या भेडसावत आहे. गुजरातमध्ये आज ४२% नागरीकरण झाले असून येत्या काही वर्षात ही टक्केवारी ५०% वर जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे वाहतूक समस्या सोडवण्यासाठी गुजरात सरकारने अहमदाबाद बीआरटीएस (जनमार्ग) सारखे प्रकल्प हाती घेतले आहेत. दिल्ली, पुणे याशिवाय अनेक ठिकाणी वाहतुकीची ही पद्धत अस्तित्वात आहे किंवा प्रयोजित आहे. पण सध्यातरी अहमदाबाद बीआरटीएस हा भारतातला एकमेव यशस्वी बीआरटीएस प्रकल्प आहे.

कारण राजकीय इच्छाशक्ती आणि त्याच इच्छाशक्तीने दिलेली परिचालन स्वायतत्ता. तब्बल ९० कि.मी. लांबीची (सध्या कार्यरत ४५ कि.मी.) ही बस सेवा, दिवसाला सव्वा लाख लोकांची ने-आण करते.

सार्वजनिक-निजी भागीदारी (PPP) पद्धतीने ही योजना कार्यरत आहे. माहिती तंत्रज्ञानाने बीआरटीएसचे नियंत्रण कक्ष सुसज्ज आहे. ह्या कक्षातून आम्हाला प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. बस सध्या कुठे आहे, तिच्या चालकाचे नाव, चालकाचा आतापर्यंतचा रेकॉर्ड, प्रवाशांची संख्या, अशी माहिती स्क्रीनवर दाखवण्यात आली. नंतर आम्ही बीआरटीएसच्या बसमधून एक फेरफटका मारला. वेगवान सेवा, मोकळी जागा, नियंत्रित प्रवेश-निकास आणि टुमदार बस-थांबे. सगळेच कौतुकास्पद वाटले.

येथे विशेष सांगावे वाटते ते जनमार्गच्या HR Managerबद्दल! विशीतली ही मुलगी कुठल्याश्या कॉलेजमधून एम.बी.ए. होती. पण तिने शासकीय बीआरटीएस स्वीकारली. तिच्या म्हणण्यानुसार आधी तिला थोडी धाकधूक होती, की शासकीय यंत्रणेत आपण कसे काम करू शकू. पण तिचा अनुभव पूर्णपणे उलटा. उच्च-तंत्रज्ञानाने युक्त, जागतिक दर्जाची व्यवस्था आणि संपूर्णपणे प्रोफेशनल मानसिकता ह्यामुळे ती कामात पूर्ण रमली होती. असाच काहीसा अनुभव मला पुढे चारंकालाही येणार होता.

दिवसाच्या शेवटी आम्ही एका 'चाइल्ड पार्क'ला गेलो. ह्या 'चाइल्ड पार्क'ची संकल्पनासुद्धा अफलातून आहे. येथे लहान मुलांसाठी बँक, पोलीस स्टेशन, न्यायालय, अग्निशमन दल, इस्पितळ, रेडीओ रूम यांच्या प्रतिकृती आणि बीआरटीएस, रुग्णवाहिका, अग्निशमन दल यांच्या छोट्या गाड्या ठेवल्या आहेत. लहान मुले या लुटुपुटुच्या बँकेत जाऊन ATM मधून पैसे काढतात, चेक भरतात; शिवाय अग्निशमन दलाच्या गाडीतून येऊन आगदेखील विझवतात! हे लहान मुलांचे चालते-फिरते जग पाहून आम्ही हरखून गेलो. मनात सतत विचार येत होता, येथे खेळलेली मुले पुढील आयुष्यात किती प्रगल्भ होतील!

**सौर-समुद्र...**

दुसऱ्या दिवसाची यात्रा सकाळी ६ वाजता चालू झाली. उद्देश होता ५०० MWच्या चारंका सोलार पार्कचे दर्शन. एकाच ठिकाणी ५०० MWचा सौर ऊर्जानिर्मितीचा हा भारतातीलच नव्हे, तर आशियातील पहिलाच प्रकल्प आहे. हे शक्य झाले मोदींच्या व्यवहारचातुर्यामुळे. खाजगी उद्योजकांना गुजरातकडे खेचण्यात ते यशस्वी ठरले. गुजरातमध्ये पायाभूत सुविधा होत्याच, त्याचसोबत खाजगी उद्योजकांसाठी शासकीय व्यवस्थाही सुकर करण्यात आली. भारतात इतरत्र चालणाऱ्या लाल फितीच्या कारभारापेक्षा उद्योजकांनी ही व्यवस्था स्वीकारली. मोदींना गुजरात हे सौर ऊर्जेचे केंद्र बनवायचे आहे. पण सौर ऊर्जेला जागा मुबलक प्रमाणात लागते. एक मेगावाट निर्माण करण्यास किमान ५ एकर जागा लागते. ह्या प्रश्नाचे उत्तरदेखील शोधण्यात आले. सरदार सरोवर प्रकल्पाच्या मेहसाणा कालव्यावर सौर पॅनल्स बसवले. ह्याचा फायदा म्हणजे जागाही वाचली आणि खालील पाण्याचे बाष्पीभवनही थांबले. शिवाय उशिरा तापून उशिरा थंड होण्याच्या पाण्याच्या गुणधर्मामुळे सौर पॅनल्ससाठी मुबलक उष्णता निर्माण होते. सौर ऊर्जेच्या क्षेत्रात भारतात होणाऱ्या एकूण १००० मेगावाट (MW) वीजनिर्मितीपैकी ६०० मेगावाट वीजनिर्मिती एकट्या गुजरातमध्ये होते.

चारंका सौर प्रकल्प आम्हास दाखवला तो दोन व्यक्तींनी. त्यातील एक नाविक दलाचे कमांडर (निवृत्त) आणि एक अभियंता तरुण. कमांडर येथे विशेष ड्युटी अधिकारी म्हणून कार्यरत होते. वय वर्ष ६०मध्ये असलेला उत्साह वाखण्याजोगा होता. तो अभियंता तरुण नुकताच कॉलेजमधून बाहेर पडला होता. पण

त्याची विषयावरची पकड, कामाबद्दलची निष्ठा, आणि प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देण्याची धडपड बघून आनंद झाला. एवढेच नाही, अहमदाबाद पासून २५० कि.मी. असूनही त्याचे ज्ञान जागतिक दर्जाचे होते. सौर

ऊर्जेसोबतच, अक्षय ऊर्जेबाबतच्या नवनवीन तंत्रज्ञानाने तो अवगत होता. यामागे त्याची स्वतःची जिद्द होतीच, पण त्यासोबतच कारणीभूत होता गुजरात सरकारचा प्रशिक्षण कार्यक्रम.

गुजरातची भरारी फक्त सौर ऊर्जेत नाही, तर संपूर्ण ऊर्जा क्षेत्रात आहे. वीजनिर्मिती, पारेषण आणि वितरण क्षेत्रातील सुधारणांचा पाया २००३मध्ये घातला गेला आणि योजनाबद्ध पद्धतीने वीज क्षेत्रामध्ये सुधारणा करण्यात आल्या. पारेषण - वितरण तूट तब्बल ३६%पासून २०%पर्यंत खाली आणली. २०००-०१ साली गुजरातमध्ये ५०० मेगावॅटचा तुडवडा होता, आज गुजरात तब्बल २५०० मेगावॅट अधिक वीजनिर्मिती करत आहे. गुजरात शासनाची 'ज्योतिग्राम' योजना आज संपूर्ण भारतात अमलात आणली जात आहे. जागतिक स्तरावरील संस्थांनी या योजनेची नोंद घेतली आहे.

चारंका पाहून आम्ही अहमदाबादला परतलो. येथे अजून एक गोष्ट नमूद करावीशी वाटते. चारंका अहमदाबादपासून सुमारे २५० कि.मी.वर आहे. कच्छ वाळवंटात असलेल्या ह्या दूरवर्ती भागातही आम्ही केवळ चार तासात पोहोचलो. राष्ट्रीय महामार्ग, राज्य-मार्ग, जिल्हा-मार्ग अशा विविध प्रकारच्या रस्त्यांवरून आम्ही प्रवास केला, पण कुठेही वेग कमी झाला नाही, किंवा धोका जाणवला नाही. तात्पर्य, रस्त्यांच्या बाबतीतही गुजरात अतिशय विकसित आहे. ५०० कि.मी.चा प्रवास करूनही संध्याकाळी कुठलाही थकवा नाही..

**नरेंद्र मोदी...**

तिसर्‍या आणि शेवटच्या दिवशी आम्ही मुख्यमंत्री श्री. नरेंद्र मोदींना प्रत्यक्ष भेटणार होतो. गांधीनगर सर्किट हाऊसमध्ये बैठक होती. बरोबर ११च्या ठोक्याला मुख्यमंत्री आले. कॉन्फरन्स रूममध्ये प्रवेश करताच 'क्यों प्रकाशयात्रीओं, प्रकाशमान हो गए?' असा प्रश्न विचारून त्यांनी वातावरण प्रफुल्लित केले. ओळखसत्र आटोपल्यानंतर मोदींनी प्रथम आम्हा तरुणांचे विचार ऐकण्याची इच्छा प्रकट केली. आम्ही तीन दिवसात जे बघितले, अनुभवले, त्यावर आमचे विचार ऐकण्यात त्यांना रस होता. विशेष म्हणजे प्रत्येकाने सांगितलेल्या कल्पना, सूचना त्यांनी शांतपणे ऐकून घेतल्या. आमच्या निवेदनातील धागे उचलून मोदींनी त्यांचे अंतरंग उलगडायला सुरुवात केली. 'गुजरात की विकासयात्रा तो अभी शुरू हुई है, अभी तक तो कुछ हुआ ही नही है!' हे ऐकून आम्ही बुचकळ्यात पडलो. ही सुरुवात आहे, तर विकास म्हणजे मोदींसाठी नक्की काय असेल!!

भारतात संघीय व्यवस्था आहे. ह्याचा व्यवहारातला अर्थ 'राज्यांनी मागायचे आणि केंद्राने द्यायचे' असा होतो. राज्यांची मागणी काय, तर - गहू, तांदूळ, दुष्काळी मदत, केंद्रीय सुरक्षा बळ इ. पण मोदींनी केंद्राकडे काय मागावे, तर इस्रोचा आख्खा उपग्रह (Space Satellite)! आमच्याप्रमाणेच केंद्राचे अंतरीक्ष खातेसुद्धा बुचकळ्यात पडले असणार. शेवटी गुजरातला ३६ मेगाहर्टझ (MHz)ची बँडविड्थ दिली गेली. त्यावरून गुजरात इ-शिक्षा, इ-मेडिसिन आणि अशी अनेक कार्ये करत आहे. मोदींना विकासाचे जनआंदोलन उभारायचे आहे. अटल बिहारी वाजपेयींनी 'विकास' हा राष्ट्रीय मुद्दा केला. त्यापुढे जाऊन मोदींना 'विकास' ही

मूलभूत गरज बनवायची आहे. गुजरातच्या विकास मॉडेलच्या शाश्वततेबद्दल एकाने प्रश्न विचारला असता मोदींनी लगेच स्पष्ट केले की, ह्यामुळेच प्रत्येक कल्पनेला संस्थागत करण्याचा गुजरातचा प्रयत्न आहे. 'मोदी रहे न रहे, विकास का ये चक्र रुकना नहीं चाहिए', असे ते म्हणाले. गप्पांमध्ये मोदींनी अजून बऱ्याच विषयांना स्पर्श केला. आमच्यातील एका मित्राने मोदींना शेवटचा प्रश्न विचारला, "शासन-व्यवस्था कशी असावी, ह्याबद्दल तुमचे मत काय?" ह्यावर त्यांनी दिलेले उत्तर २१व्या शतकासाठी अतिशय समर्पक आहे - 'अधिकतम शासन और न्यूनतम सरकार'..!

आमच्या ह्या अनुभवाबद्दल जेवढे लिहावे तेवढे कमीच आहे. तीन दिवसात आम्ही गुजरातची जी विकास-यात्रा पहिली, ती केवळ २०-३०% असणार. ज्योतिग्राम योजना, कर्मयोगी अभियान, अधिकाऱ्यांचे वार्षिक चिंतन शिबिर, निर्मल गुजरात योजना, गुजरात हरित क्रांती आयोग, भूज भूकंप पुनर्वसन, रर्बन (RURBAN) योजना, भारतातील सर्वात मोठे गोड्या पाण्याचे कृत्रिम सरोवर, मुख्यमंत्री फेलोशिप योजना, सद्भावना यात्रा, भास्कराचार्य अंतरिक्ष अनुप्रयोग और भू-सूचना संस्थान, स्वागत ऑनलाईन योजना, इ-सिटी, निरोगी बाल योजना, विद्या-दीप योजना, शिक्षक प्रशिक्षण योजना, रक्षा-शक्ती विश्वविद्यापीठ, बालिका समृद्धी योजना, अशा अनेक योजना पाहायच्या राहिल्याच होत्या.

प्रकाशयात्रा खऱ्या अर्थाने प्रकाशमान ठरली. शासकता पर्यटन करण्यासाठी आम्ही आलो होतो, पण शेवटी शेवटी आमच्यातील प्रत्येक जण ह्याकडे अभ्यास म्हणून बघू लागला. हे मॉडेल आपापल्या राज्यात कसे लागू करता येईल ह्याचा विचार प्रत्येक जण करीत होता. या यात्रेने एक नवीन ऊर्जा दिली, एक नवीन आशा जागृत केली.

अभिषेक म. चौधरी
user id - अभिषेक९
email - chaudhari.abhishek@gmail.com



# भारताचा 'नेपोलियन' अर्थात हेमू

सारथी

हेमू ऊर्फ सम्राट हेमचंद्र विक्रमादित्य भारताच्या इस्लामकालीन कालखंडातील एक हिंदू राजा. ज्याला 'भारताचा नेपोलियन' या नावानेदेखील ओळखले जाते. याने तब्बल २२ लढाया जिंकूनसुद्धा, पानिपतच्या दुसऱ्या युद्धात दुर्दैवी पराभव पत्करावा लागल्यामुळे हेमूचे सामर्थ्य झाकोळले गेले. कष्ट करून आणि स्वतःच्या अंगीभूत कौशल्याने राजेपदापर्यंत पोहोचलेले इतिहासामध्ये अगदी हाताच्या बोटावर मोजण्याइतके लोक आहेत, त्यातीलच हेमू एक.

१६व्या शतकामध्ये उत्तर भारतामध्ये सत्ता गाजवलेला हा एकमेव हिंदू राजा. १६व्या शतकामधला भारत हा राजकीय आणि सामाजिकदृष्ट्या अस्थिर होता, विशेषतः उत्तर भारतामध्ये मुघल आणि अफगाण यांमध्ये सत्तासंघर्ष सुरू होता. त्यामानाने दक्षिण भाग हा विजयदेवरायाच्या हिंदू राजवटीखाली स्थिर होता. १५२६ची पानिपतची पहिली लढाई जिंकून जेव्हा बाबर गादीवर आला, तेव्हा त्याने भारतातील बहुतांश हिंदू मंदिरे फोडली. त्यामुळे मुघलांना कोणीतरी लगाम घालणे ही त्या काळाची गरज होती आणि हेमू ती जबाबदारी यशस्वीरीत्या पार पाडत होता.

हेमूचा जन्म १५०१मधला. पौरोहित्य करणाऱ्या एका गरीब ब्राह्मण कुटुंबामधला. राजस्थानच्या पूर्वेस असणाऱ्या अल्वर जिल्ह्याच्या मचेरी नामक गावामध्ये हा 'भारताचा नेपोलियन' जन्माला आला. हेमूचे वडील राय पूरनदास, हे पौरोहित्य करून कुटुंबाची गुजराण करत असत. पण जसे मुघलांचे वर्चस्व वाढू लागले, तसे पौरोहित्य करणाऱ्या ब्राह्मणांना मुघलांच्या जाचास सामोरे जावे लागू लागले. त्यामुळे हेमूच्या वडिलांनी पौरोहित्याचा व्यवसाय बंद करून कुटुंबासह रेवाडीच्या कुतुबपूरमध्ये (सध्याच्या हेमूनगरमध्ये) राहण्यास गेले. हे ठिकाण पूर्वी मेवातमध्ये येत असे, सध्या हे हरियाणात येते. रेवाडी हे पूर्वीच्या काळातील इराक, इराणला जोडणाऱ्या दिल्लीच्या रस्त्यावरील मध्यवर्ती ठिकाण होते. सर्वात प्रथम हेमू शेरशाह सुरीला खाद्यपदार्थ पुरवत असे. पुढे हेमू आणि हेमूचे वडील शेरशाह सुरीला शोरा (Potassium Nitrate) पुरवू लागले. शोरा (Potassium Nitrate)चा उपयोग दारूगोळा बनवण्यासाठी केला जात असे. या वेळेस हेमूचे वय १५ वर्षे होते. पुढे धर्मांतर करण्यास विरोध केल्याच्या कारणास्तव वयाच्या ८२व्या वर्षी हेमूच्या वडिलांचा शिरच्छेद करण्यात आला. या ठिकाणी राहून तो हिंदी, संस्कृत या भाषांबरोबरच पर्शियन, अरेबिक भाषांवर त्याने पकड मिळवली. लहानपनासूनच त्याला व्यायामाची आणि कुस्तीची आवड होती. 'इमाम दस्ता' (हे एक लोखंडाचे मोठे भांडे असते आणि मोठ्या हातोड्याच्या साहाय्याने यामध्ये मिठाचे चूर्ण केले जाते)मध्ये मीठ चिरडून त्याने स्वतःची ताकद आजमवण्यास सुरुवात केली. मोठे झाल्यावर हेमूनेदेखील व्यवसायात आपल्या वडिलांना मदत करण्यास सुरुवात केली. लहानपणापासूनच मित्र असलेल्या सहदेवच्या गावी हेमू घोडेस्वारीमध्ये निपुण झाला. सहदेव हा जातीने रजपूत होता आणि हेमूने लढलेल्या प्रत्येक युद्धात याचा सक्रिय सहभाग होता. (अपवाद पानिपतचे दुसरे युद्ध). हेमू हा धार्मिक वातावरणात लहानाचा मोठा झाला. त्याचे वडील वृंदावनच्या वल्लभ संप्रदायाचे सदस्य होते, याचबरोबर त्यांनी अनेक तीर्थक्षेत्रांना भेटी दिल्या होत्या. एकदा असाच हेमू शोरा घेऊन गेला असता, शेरशाह सुरीच्या नजरेत आला. त्याच्या व्यक्तिमत्त्वावर प्रभावित होऊन शेरशाह सुरीने त्याला स्वतःच्या सैन्यात उच्च पदावर घेतले आणि येथूनच हेमू उर्फ सम्राट हेमचंद्र विक्रमादित्य याच्या कारकिर्दीला सुरुवात झाली.

शोरा विकण्यास सुरुवात केल्यानंतर थोड्याच दिवसानंतर हेमूने तोफांसाठी लागणाऱ्या तांबे आणि पितळाचे पत्रे पाडण्याचा कारखाना सुरू केला. यासाठी त्याने गोव्याच्या पोर्तुगीजांची मदत घेतली. या सुमारास इ.स. १५४०मध्ये शेरशाह सुरीने मुघल शासक बाबरचा मुलगा हुमायून याला भारतामधून हद्दपार करण्यात यश मिळवले होते. इ.स. १५४५मध्ये शेरशाह सुरीच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा इस्लाम शाहने राजधानी

दिल्लीवरून ग्वाल्हेरला हलवली. पश्चिमेकडून वारंवार होणाऱ्या हल्ल्यांपासून ग्वाल्हेर हे ठाणे सुरक्षित होते. इस्लाम शाह सुरीने हेमूमधील व्यवस्थापकीय कौशल्ये आणि इतर गुण ओळखून त्याला स्वतःचा वैयक्तिक सल्लागार बनवले. हेमूने इस्लाम शाह सुरीला फक्त व्यापार आणि उदीमामध्येच मदत केली असे नाही, तर त्या वेळच्या उत्तर भारतातील राजकारणामध्येदेखील हेमूचा सक्रिय सहभाग होता. हेमूमधील हे गुण हेरून इस्लाम शाह सुरीने हेमूला 'शंगाही बाजार' अर्थात दिल्लीचा 'बाजार अधीक्षक' या पदावर नेमणूक केली. या पदानंतर थोड्याच दिवसात हेमूला या पदाबरोबरच अंतर्गत सुरक्षेचा मुख्य अधिकारी म्हणून नेमण्यात आले आणि त्याच्या पदाला वजीरपदाबरोबरची मान्यता देण्यात आली. इ.स. १५५३मध्ये हेमूच्या आयुष्यात 'शिशिर' आला. इ.स. १५५३मध्ये शेरशाह सुरी मरण पावला आणि आदिलशाह सुरी गादीवर आला. आदिलशाह सुरी हा एक अतिशय विलासी, दारूच्या आहारी गेलेला, स्त्रीलंपट शासक होता. त्यामुळे प्रजेमध्ये आणि सैनिकांत त्याच्याविरुद्ध असंतोष वाढत गेला आणि हे सर्व थांबवण्यासाठी त्यला हेमूसारख्या कुशल प्रशासकाची आवश्यकता होती. आदिलशाह सुरीने हिंदू योद्धा हेमू उर्फ हेमचंद्र विक्रमादित्याला साम्राज्याचा पंतप्रधान आणि भूदल प्रमुख बनवले. आदिलशाह सुरी स्वतः चुनारला गेला, ही जागा त्याला जास्त सुरक्षित वाटत होती. सेनाध्यक्ष झाल्यानंतर हेमूच्या हाताखाली अफगाणांची फौज आली. अशा प्रकारे राज्याचे सर्व प्रशासन हेमूच्या हाताखाली आले होते. शासन हातात आल्यावर हेमूने कर न भरणाऱ्या छोट्या-मोठ्या प्रदेशांना ताब्यावर आणले. कमकुवत आदिलशाह सुरीविरुद्ध झालेले उत्तर भारतामधले अनेक छोटे-मोठे उठाव हेमूने या किल्ल्यांच्या आश्रयाने चिरडले. इ.स. १५५३ ते १५५६मध्ये किल्ला फार मोठ्या प्रमाणात सक्रिय राहिला. याच सुमारास इब्राहिम खान, सुल्तान मुहम्मद खान, ताज कर्रानी, रख खान नूरानी यांसारख्या मातब्बरांचा हेमूने पराभव केला आणि एकामागून एक करत साऱ्यांना यमसदनास धाडले. जुलै, १५५५च्या छप्परघटाच्या युद्धामध्ये हेमूने बंगालचा सुभेदार मोहम्मद शाह याला पाणी पाजले आणि युद्धामध्ये मोहम्मद शाहचा मृत्यू झाला. अशा प्रकारे बंगालच्या प्रचंड सत्तेवर अंकुश ठेवण्यासाठी हेमूने सेनापती शाहबाज खानला नेमले. याच दरम्यान आदिलशाह सुरीचे मानसिक संतुलन ढळले आणि हेमू व्यावहारिकदृष्ट्या राजा मानला जाऊ लागला. हेमूला हिंदू तसेच अफगाणी सेनापतींचे मोठ्या प्रमाणवर समर्थन होते. जेव्हा हेमू जुलै, १५५५च्या छप्परघटाच्या युद्धामध्ये व्यस्त होता, त्याच सुमारास हुमायूनने या संधीचा फायदा घेत पंजाब, दिल्ली आणि आग्रा यावर परत कब्जा केला. यानंतर साधारण ६ महिन्याच्या आसपास हुमायूनचा मृत्यू झाला आणि त्याचा १३ वर्षाचा मुलगा अकबर नाममात्र बादशहा झाला आणि बैरम खान राज्यकारभार सांभाळू लागला. युद्धास अनुकूल परिस्थिती प्राप्त झालेली बघताच दिल्लीवर स्वतःचा एकछत्री अंमल कायम करण्यासाठी आणि मुघलांना कायमचे हुसकावून लावण्यासाठी, भल्या मोठ्या सेनेचा विशाल सागर घेऊन बंगालवरून, सध्याच्या झारखंड, पूर्वेचा उत्तर प्रदेश,

मध्य प्रदेश या मार्गाने हेमूने दिल्लीकडे कूच केले. हेमूच्या युद्धनीतीमुळे आणि रणांगणातील कौशल्यामुळे मुघल सैनिकांमध्ये गोंधळ माजला. आग्र्याचा त्या वेळेचा सुभेदार इस्कंदर खान उझबेक न लढताच आग्रा सोडून पळाला. हेमूने इटावा, काल्पी, बयाना यासारख्या सुभ्यांवर मोठ्या कौशल्याने आणि सफाईदारपणे विजय मिळवत, सध्याच्या उत्तर प्रदेशच्या मध्य आणि पूर्व भागावर आपले नियंत्रण प्रस्थापित केले. ६ ऑक्टोबर १९५६ रोजी दिल्लीजवळ तुघलकाबादजवळ झालेल्या एका दिवसाच्या लढाईमध्ये हेमूने अकबरच्या फौजेला पाणी पाजले आणि दिल्ली परत हस्तगत केली. हेमूने सलग २२ लढाया लढल्या आणि जिंकल्या.

**हिंदू राज्य :**

हेमूने शतकानुशतके परकीय राजवटीत, परकीय शासकांच्या गुलामीमध्ये जखडलेल्या भारताला मुक्त करून दक्षिण भारतामधील विजयनगर साम्राज्याच्या बरोबरीने भारतामध्ये 'विक्रमादित्य या नावाने 'हिंदू राज्य' सुरू केले. ७ ऑक्टोबर १५५६ रोजी दिल्लीमधील जुन्या किल्ल्यामध्ये हेमूचा राज्याभिषेक झाला आणि हेमू 'सम्राट हेमचंद्र विक्रमादित्य' या नावाने ओळखला जाऊ लागला. रजपूत आणि अफगान सेनानायकांच्या उपस्थितीत आणि धार्मिक पद्धतीने राज्याभिषेक पार पडला. या घटनेच्या निमित्ताने त्याने

स्वतःची छबी असलेली नाणी वापरात आणली. राजधानी परत एकदा दिल्लीला हलवण्यात आली आणि जुन्या किल्ल्यामधून सर्व राज्यकारभार बघितला जाऊ लागला. हेमूने परत एकदा मोठ्या फौजांची जमवाजमव केली. कोणत्याही अफगाण सेनानायकाला त्याच्या पदावरून न हटवता सैन्यामध्ये हिंदू अधिकाऱ्यांची नेमणूक केली. केवळ कौशल्य, साहस आणि पराक्रम यांच्या जोरावर हेमू, 'सम्राट हेमचंद्र विक्रमादित्य' या नावाने देशाच्या सर्वोच्च स्थानी आरूढ होता. इतिहासकार अब्दुल फजलच्या मतानुसार हेमू दिल्लीनंतर काबूलवर आक्रमण करण्याची योजना आखत होता.

**हेमूची ऐतिहासिक हवेली :**

एक साधा व्यापारी, नंतर सेनेचा पंतप्रधान आणि शेवटी थेट सेनानायकापर्यंत पोहोचलेल्या हेमूच्या ऐतिहासिक कारकिर्दीच्या अनेक गोड-कडू आठवणी या हवेलीबरोबर जुळलेल्या आहेत. महाभारतकालीन रेवाडीच्या कुतुबपूरमध्ये असलेली दोन मजली हवेली आजही प्राचीन कलात्मक कारागिरीची साक्ष देते. कलात्मक प्रवेशद्वार, तसेच दुर्मीळ दगडांवर केलेली कलाकुसर आजही आपल्याला प्रभावित करते. चारही बाजूंना असलेले नक्षीकाम आपले लक्ष वेधून घेते. सज्जे आणि खोल्या बघून कधीकाळी असणाऱ्या या हवेलीच्या भव्यतेची आपणास सहज प्रचिती येते. तळमजल्यावर छोटे-मोठे मिळून बारा कक्ष आहेत, तर चार मोठी सभागृहे आहेत. एक कक्ष खास स्वयंपाकासाठी राखीव असल्याचे आढळून येते. येथे तीन तळघरे असून सध्या ती बंद अवस्थेत आहेत. विशेष गोष्ट अशी की या ठिकाणी कोठेही खिडक्या नजरेस येत नाहीत. याच्या मागे-पुढे त्या काळी अंगण, बाग-बगिचे देखील होते. कदाचित सुरक्षिततेच्या दृष्टीने असे बांधकाम करण्यात आले असावे. या तीस फूट हवेलीचा पहिला मजला ९०० ते १००० वर्ष जुना असल्याचे सांगितले जाते. या हवेलीचा दुसरा मजला एका विशिष्ट प्रकारच्या विटांनी बनवला गेला आहे. या विटांना 'लखौरी विटा' म्हणतात. पाच इंच लांब, साडे तीन इंच रुंद आणि दीड इंच जाड असलेल्या या विटांच्या बांधकामामध्ये पोर्तुगाली शैलीचे दर्शन होते. १५४०मध्ये या हवेलीचा जीर्णोद्धार करण्यात आला. तळामध्ये असलेली दोन सभागृहे आजही शाबूत आहेत. त्यामधील एकाचे छत पडले आहे. अर्थात सरकार या हवेलीच्या डागडुजीबाबतदेखील उदासीनच आहे.

'तो आला, त्याने पाहिलं आणि त्याने जिंकलं' हे हेमूच्या बाबतीत तंतोतंत खरे होते म्हणण्यापेक्षा त्याने ते खरे करून दाखवले हे जास्त योग्य होईल.

हेमू, सम्राट हेमचंद्र विक्रमादित्य आणि हेमचंद्र भार्गव अशा विविध नावांनी हेमू ओळखला जातो. पण सर्वात जास्त लोकप्रिय हेमूच.

एक साधा शोरा विक्रेता म्हणून जीवन जगणारा हेमू, आदिलशाह सुरीचा सेनापती, नंतर पंतप्रधान आणि शेवटी विक्रमादित्य बनतो तेव्हा खरेच या अलौकिक राजाला आणि त्याच्या अलौकिक कर्तृत्वाला सलाम केल्याशिवाय राहवत नाही.

राज्याभिषेकानंतर लगोलग झालेल्या पानिपतच्या दुसऱ्या युद्धात हेमूला केवळ आणि केवळ दुर्दैवाने पराभवाचा सामना करावा लागला. हेमूने त्याच्या संपूर्ण आयुष्यात अनुभवलेला पहिला आणि शेवटचा पराभव. अकबराकडून हेमूच्या सैन्याची आणि हजारो हिंदूंची कत्तल करण्यात आली.

ज्याप्रमाणे नेपोलियनने त्याच्या सैनिकांना त्यांच्या उज्ज्वल भवितव्याची हमी दिली होती, त्याचप्रमाणे हेमूनेदेखील अनेक सैनिकांना जमिनी आणि जडजवाहीर बक्षीस म्हणून दिले होते आणि त्यांना त्यांच्या उज्ज्वल भवितव्याची हमी दिली होती.

**हेमूच्या आयुष्यातील अखेरचे युद्ध - पानिपतचे दुसरे युद्ध :**

पानिपतचे दुसरे युद्ध हे ५ नोव्हेंबर १५५६ रोजी सम्राट हेमचंद्र विक्रमादित्य उर्फ हेमू आणि अकबर

यांच्यामध्ये झाले. खरे पाहता, हे युद्ध हेमू आणि अकबराचे सेनापती बैरम खान यांमध्ये झाले असे म्हणणे उचित ठरेल. युद्धाच्या वेळी अकबराचे वय अवघे १४ वर्षे होते.

हेमूने दिल्ली जिंकल्याच कळताच दिल्ली परत मिळवण्याच्या हेतूने बैरम खान दिल्लीवर चालून येण्यास निघाला. हेमूला याची कुणकुण अगोदरच लागली असल्याने हेमूने आपल्या सैन्यासह पानिपतच्या दिशेने कूच केले होते आणि ५ नोव्हेंबर १५५६ रोजी या दोन्ही सेना एकमेकांना भिडल्या. ज्येष्ठ इतिहासकार कीन यांच्या मतानुसार, भय आणि सुरक्षेच्या कारणास्तव अकबर आणि त्याचा रक्षणकर्ता बैरम खान याने युद्धात प्रत्यक्ष भाग घेतला नव्हता. प्रत्यक्ष युद्धभूमीपासून ते ८ मैल अंतरावर उभे होते. अकबरबरोबर ५००० अतिविश्वासू आणि तयारीचे सैन्य होते, युद्धात पराभव होत असल्याचे दिसून येताच काबुलकडे पळून जावे, असा बैरम खानचा सैन्याला आदेश होता.

हेमू स्वतः सैन्याचे नेतृत्व करत होता, हेमूच्या सैन्यात सुरुवातीला १५०० हत्ती आणि तोफखाना होता. हेमूने अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने ३०,०००च्या घोडदळाला घेऊन कूच केले होते. या घोडदळामध्ये रजपूतांचा आणि अफगाणांचा भरणा होता. सैन्याचा आणि अफगाणांचा उत्साह वाढवण्यासाठी हेमूने त्यांना जहागिरी म्हणून जमिनी दिल्या होत्या आणि त्याच्या खजिन्याची द्वारे उघडली होती. अशा प्रकारे त्याने अतिशय कर्तबगार असे सैन्य एकत्र केले होते.

**अकबराचे सैन्य :**

नाममात्र प्रमुख : अकबर

प्रत्यक्ष प्रमुख : बैरम खान. याचा मुलगा अब्दुल रहीम खान हा अकबराच्या दरबारातील 'नऊ' रत्नांपैकी एक होता.

तिरंदाज असलेले घोडदळ प्रमुख : मोहम्मद कासिम

मुघलांच्या केंद्रस्थानी असलेल्या पायदळ, घोडदळ यांच्यामध्ये उस्ताद अली कुली खान (तोफखान्याचा प्रमुख) हा पानिपतचे पहिले युद्ध लढला होता. अकबराच्या आजोबांबरोबर हुसेन कुली खान, मोहम्मद साजिद खान पूर्वांची, शाह कुली खान महरूम, मीर मोहम्मद बरका, कासिम खान नियास्पोरी व सईद मोहम्मद बरका असे महारथी होते. सर्वात पुढे असलेल्या सैन्यामध्ये मेहमूद खान बुझ्स्की, कक्साल खान, हुसेन कुली बेग, शाह कुली बेग महराम आणि समाजी खान होता.

मुघलांची उजवी फळी सिकंदर खान उझबेग सांभाळत होता तर डावी फळी अब्दुल्ला खान सांभाळत होता.

**हेमूचे सैन्य :**

प्रमुख अर्थात हेमू, 'हवाई' नावाच्या त्याच्या हत्तीवर.

तोफखाना प्रमुख : मुबारक खान आणि बहादूर खान

हत्तीदल : हसन खान फौजदार, मैकल खान, इखतीयार खान, संगरम खान आणि कपन. उजवी बाजू शादी

खान कक्कर तर डावी बाजू रामया सांभाळत होता. केंद्रस्थानी जातीने हेमू आणि भगवान दास होते. आता सैन्याची रचना पाहू,

जसे आपण बघितले, तशी डावी, उजवी आणि मधली आघाडी अशी ही दोन्ही सैन्ये विभागली गेली. अकबरातर्फे हुसेन कुली बेग, शाह कुली खान महरूम सर्वात पुढची फळी सांभाळत होते, तर शाह कुली बेग महराम, हुसेन कुली खान, अली कुली खान हे मधली फळी सांभाळत होते. कोणत्याही युद्धात (अगदी

क्रिकेटमध्येसुद्धा) मधली फळी ही अतिशय महत्त्वाची मानली जाते. मधल्या फळीचे हे काम असते की जसे प्रमुखाला शत्रुपक्षाची बाजू कमकुवत झाल्याचे निदर्शनास येते, तशी मधली फळी पुढच्या फळीला बाजूला करत वाऱ्याच्या वेगाने शत्रुपक्षात घुसते आणि शत्रुपक्षाची मधली फळी एकमेकांपासून विभक्त करते. दुसरे काम असे की, जर पुढची फळी पडली तर येणाऱ्या मधली फळी शत्रुपक्षाला स्वतःच्या अंगावर घेते. शाह बदाग खान आणि शाह अब्दुल माली हे राखीव तुकडी सांभाळत होते. हेमूतर्फे हेमू आणि भगवान दास मुख्य आघाडी सांभाळत होते, तर उजवी बाजू शादी खान कक्कर तर डावी बाजू रामया सांभाळत होता. हेमूने या लढाईच्या अगोदर २२ युद्धे जिंकली होती, त्याच्या आघाडीच्या फळीत सुमारे १००० हत्ती होते. हेमूचे सैन्य अनुभवी होते, तसेच हत्तींनी आणि शस्त्रांनी सुसज्ज होते. हत्तीच्या सुळ्यांना जंबिये लावले गेले होते.

हेमूचे सैन्य मुघालांपेक्षा काकणभर सरसच होते. पण मुघलांचे सैन्य धोकादायक बनले होते ते त्यांच्या घोडदळामध्ये असणाऱ्या तिरंदाजांमुळे. घोडदळ तिरंदाज हे अतिशय धोकादायक मानले जातात, ते शत्रुपक्षावर एका ठरावीक अंतरावरून बाणांचा वर्षाव करत राहतात. यामुळे शत्रुपक्ष गोंधळतो आणि या दलाच्या मागे लागतो आणि त्यांना तेच हवे असते. अशा प्रकारे शत्रुपक्ष विखरला की त्यांना हरवणे सोपे जाते.

**आता प्रत्यक्ष काय घडले पाहू :**

यात अजून एक लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे दोन्ही सैन्याच्या मधोमध एक खंदक होता, जो हत्ती ओलांडून जाऊ शकत नव्हते.

सर्वात प्रथम हेमूने हत्तींच्या साहाय्याने हल्ला चढवला तो मुघलांच्या डाव्या आणि उजव्या फळीवर जी अब्दुल्ला आणि सिकंदर खान सांभाळत होते. मुघलांच्या पायदळाला हत्ती आवरेनासे झालेले बघताच मोहम्मद कासिम त्याचे तिरंदाज असलेले घोडदळ घेऊन अब्दुल्ला खानच्या मदतीला जातो. तिरंदाज बाण मारून हत्तींना जायबंदी करायचा प्रयत्न करत असतानाच वाऱ्याच्या वेगाने उजवी बाजू शादी खान कक्कर तर डावी बाजू रामया सांभाळत, मुघलांच्या डाव्या आणि उजव्या फळीवर तुटून पडतात. अजून हेमू आणि भगवान दास मुख्य आघाडी सांभाळत आहेत. आत्ता फक्त हत्तीदलच पुढे आहे. या दरम्यान वेगवेगळी झालेली हत्तीदलं युद्धाच्या केंद्रस्थानी सरकू लागतात. हे बघताच मुघलांची मधली फळी खंदकाकडे सरकू लागते. हीच संधी आहे हे बघून हेमू वेगाने आक्रमण करतो. आता दोन्ही दले खंदकापुढे येऊन थांबतात. हेमूच्या सैनिकांनी जरी खंदक पार केला तरी आता त्यांना हत्ती साथ देऊ शकणार नाहीत. हे कळताच मुघलांची मधली फळी खंदकाच्या विरुद्ध बाजूला चिकटून राहते, तर हेमूचे हत्तिदल परत एकदा वेगवेगळे होऊन डाव्या आणि उजव्या बाजूला सरकू लागतात. भगवान दास आणि हिंदू-अफगाणी सैन्य हेमूच्या मागे येऊन उभे आहे.

इकडे अब्दुल्ला खान (मुघल डावी फळी) शादी खान कक्करला (हेमू उजवी फळी) मागच्या बाजूने केंद्रस्थानी ढकलतोय तर दुसऱ्या बाजूला रामयाला (हेमू डावी फळी) सिकंदर खान उझबेगने (मुघल उजवी फळी) केंद्रस्थानी ढकललेय. याच वेळेस मुघलांची शाह कुली बेग महराम, हुसेन कुली खान, अली कुली खान असलेली मधली फळी विभागून वाऱ्याच्या वेगाने बाहेर पडते आणि खंदकाच्या दोन्ही टोकांना असलेल्या हत्तिदलाला जाऊन भिडते. आता हेमूचे सैन्य सर्व बाजूंनी घेरले गेले आहे. आणि जे घडू नये ते घडते, भगवान दास आणि हेमूचे भरवशाचे वीर शादी खान कक्कर, रामया पडतात. हेमू हत्तीच्या अंबारीत बसून सैन्याला लढाईला अजूनही प्रवृत्त करतोय. त्याचं वेळेस एक बाण हेमूच्या डोळ्यात जातो आणि हेमू बेशुद्ध होऊन अंबारीत कोसळतो. शाह कुली खान जो हेमूच्या हत्तीच्या जवळचं असतो, त्याच्या काहीतरी अतर्क्य घडल्याचे लक्षात येतं. सैन्याच्या साहाय्याने तो हत्तीच्या माहुताला पकडतो आणि हत्तीवर असलेल्याचे नाव विचारतो. माहूत नाव सांगतो, हेमू पडल्याचे कळताच हेमूचे सैन्य

विखरते. हेमूला बेशुद्धावस्थेत मुघलांच्या छावणीमध्ये घेऊन जाण्यात येते. अकबर हेमूला मारायचे नाकारतो पण बैरम खान हेमूचे शीर कापून काबूलला तर धड दिल्लीला रवाना करतो. अबुल फझल (अकबरनामाचा लेखक) म्हणतो, जर अकबराने हेमूला जीवनदान देऊन स्वतःच्या सैन्यात घेतले असते तर अकबरची दृष्टी आणि हेमूचे सामर्थ्य वापरून काय जिंकता आले नसते? हेमूच्या पळणाऱ्या सैन्याला इस्कंदर खानने पाठलाग करून पकडले. त्याच्या हातात सुमारे १००० हत्ती आणि अनेक सैनिक लागले. युद्धानंतर हाताला येतील तेवढे दिल्लीमधील जडजवाहीर घेऊन हेमूची बायको निसटली, इस्कंदर खानाने तिला पकडण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. (हेमू युद्धभूमीवरच मरण पावल्याचा काही ठिकाणी उल्लेख आहे.)

**दुर्लक्षिलेला हेमू :**

हरियाणाचा हा इतका महान योद्धा, भारताच्याच नाही तर हरियाणाच्या इतिहासाच्या पानांमधूनदेखील गायब आहे. इतिहासाने ज्याच्यासाठी कितीतरी पाने राखली, त्याच्यासाठी हरियाणा सरकार, त्यांच्या पाठ्यपुस्तकांमध्ये साधे एक पान राखू शकले नाही, यासारखी दुर्दैवाची गोष्ट नाही. हरियाणा सरकारने हेमूसाठी ना कुठले स्मारक उभारले आहे, ना त्याचा राज्याभिषेक दिवस साजरा केला जातो, ना तो शहीद झालेला दिवस कोणाच्या लक्षात असतो.

इतका महान योद्धा हा भारताच्या इतिहासात तसा दुर्लक्षिलेलाच राहिला. त्याच्या कुटुंबाचे पुढे काय झाले? हे फारसे कोणास माहीत नाही. लढण्यात आणि स्वराज्य उभारण्यातच हेमूचे संपूर्ण आयुष्य खर्ची पडले. हेमूला आयुष्यात सुखाचे असे फारच थोडे क्षण मिळाले. राज्याभिषेक झाल्यानंतर एक महिन्याच्या आतमध्येच मृत्यूने हेमूला गाठले. न त्याच्याकडे परंपरेनुसार चालत आलेली राजगादी होती न संपत्ती. पण हे सर्व नसतानाही मुघलांना पळता भुई थोडी करून सोडणाऱ्या आणि अल्पकाळ का होईना हिंदू राज्य प्रस्थपित करणाऱ्या या दुर्लक्षित पण तितक्याच पराक्रमी ‘विक्रमादित्याला’ मानाचा मुजरा.

# तुझ्या गळा माझ्या गळा....

**५०फक्त**

ऑफिसच्या गारव्यातून बाहेर येत लिफ्टसमोर उभं राहिलं की जरा बरं वाटतं, मन शरीराच्या आधीच बारमध्ये जाउन पोहोचलेलं असतं. खाली पार्किंगमध्ये येताना मी रोज विचार करतो, प्रत्येक वेळी बाहेर पडणं हे असं आधी खाली खोल खड्यात जाउन मगच असतं का ? कारण, आमच्या ऑफिसचं पार्किग मायनस ९ला आहे. गाडी घेउन वर येताना प्रत्येक वळणावर गाडी घसरायची भीती वाटते, पण घसरलो कधीच नाही, बहुतेक त्या भीतीमुळंच माझा वेग आपोआप कमी होतो. बाहेर आल्यावर लगेच सिक्युरिटीसमोर थांबावं लागतं, रोज नेमका इथं येउन थांबलो की मंद्याच्या फोन येतो. तो सिक्युरिटीवाला बॅग उचकत असतो अन मंद्याची बोंबाबोंब चालू असते. केबिनमध्ये ती लेडी गार्ड असेल तर मी फोन उचलतच नाही, 'जिगर मा बडी आग है, पर्यंत रिंगटोन वाजू देतो, तो बाहेरचा काळा ठोकळा अन ती लेडी गार्ड वैतागून जातात, संध्याकाळची सुरुवात मजेत होते.

मी आज सगळ्यांना सांगितलं, उद्याचा शुक्रवार शेवटचा. त्यानंतर मी दोन वर्षे येणार नाही. प्रोजेक्टला बदली झाली आहे माझी. सगळ्यांना खूप हेवा वाटतोय, तोंडावरून दिसतंय तसं. आज सगळे मिळून मला त्यांच्या पेगमधला एक चमचा दारू माझ्या ग्लासात टाकून कॉकटेल करून देतात. एक लार्ज विथ सोडा, बॉटम्स अप. पाच मिनिटं काही सुचत नाही, मग हळूहळू नॉर्मल होतो. तशी मला कधी चढत नाही दारू, पण हे पाच वेगळ्या वेगळ्या एकत्र करून म्हणून थोडा त्रास झाला. सगळ्यांचा निरोप घेऊन मी लवकर निघतो, प्रवासाची तयारी करायची आहे, मेडिकल टेस्ट करून घ्यायच्या आहेत, तीन लसी टोचून घ्यायच्या आहेत. हे सगळं आवरून घरी पोहोचायला अकरा वाजतात. दरवाजा उघडून मी आत येतो, लाईट सकाळी अॅटो मोडला टाकले होते, ते चालू बंद होत राहतात माझ्या मागं मागं. दोन तासांत बॅगा भरून होतात. मग दोन्ही गाड्यांच्या किल्ल्या घेऊन मी खाली जातो, इथं पण खड्यात जावं लागतं मायनस ३ला. स्कॉर्पचं कव्हर काढतो, आतून पल्सरचं कव्हर काढतो. स्कॉर्पचं कव्हर पल्सरच्या बॅगमध्ये ठेवतो, तिच्या बॅटरीच्या वायर काढून ठेवतो, कव्हर घालतो. मग ठोंगा, म्हणजे स्कॉर्पिओ चालू करून चेक करतो. ठोंगा महिन्यातून दोन वेळाच बाहेर निघतो.

आज शनिवार, ऑफिसमधून अर्धे डिटेल घ्यायचे आहेत, ते मिळणार संध्याकाळी साडेचार वाजता, आणि त्यासाठी ठोंगा घेऊन जावं लागेल. अर्धे डिटेल उद्या मिळणार, अर्धे १४० किलोमीटरचा प्रवास झाल्यावर. नेहमीचं आहे हे. यावेळी हॉटेल आणि पोरी वेगळ्या आहेत, असं ऐकून आहे, पाहू या. नेहमीप्रमाणे ऑफिसला आलो, कामं केली, रिपोर्ट छापले, पैसे घेतले, प्रोजेक्ट करन्सी. बरोबर साडेचार वाजता मायनस ९ला आलो. ठोंगा वॉशिग एरियात घातला, बाहेर आलो तेव्हा आउट ऑफ द वर्ल्ड फिलिंग आहे. मग सरळ घरी आलो, जेवण केलं आणि झोपलो. उद्या सकाळी अकराच्या सुमारास निघेन. खरं तर लवकर निघणार होतो, पण सात वाजता शाल्मली येणार आहे. मग दोन तास तरी जातीलच, म्हणून अकरा वाजता. अकरा वाजता निघालो की हॉटेलला पोहोचायला तीन वाजतील. मग तिथंच मुक्काम होईल, पहाटे तीन वाजता

निघेन आणि सात वाजता साईटवर. कार्यक्रम पक्का आहे. उद्या सकाळी शाल्मली येईल, तिची वाट बघत झोप लागली आज थोडी लवकरच.

सकाळी साडेसहा जाग आली, उठून आवरलं, बरोबर सात वाजता दरवाजा वाजला. शाल्मलीच ही, कधीच बेल वाजवत नाही. दरवाजा उघडून आत येताच तिच्या ओल्या केसांचा वास घरभर पसरला. पुढचा तास फार छान गेला. दोघांनी मिळून चहा, पोहे केले, घरातल्या माझ्या आवडीच्या गोष्टी काढून तिच्या आवडीच्या गोष्टी वर काढून ठेवल्या. आता दोन वर्षे तिच्या मनासारखं होणार सगळं, पुन्हा मी गेल्यावर तिला हे सगळं जमणार नाही, म्हणून. मग दहा ते साडेदहा आम्ही गॅलरीत बसून होतो. अलार्म वाजला तसा उठून आवरलं. एकटाच मायनस ३ला आलो. शाल्मलीला पूजा करायची होती. ठोंगा काढला, शहरातली गर्दी मलाही आवडत नाही अन ठोंग्यालाही. ती संपली की पाचवा गिअर, अठराशे आरपीएम, पंच्याहत्तरचा स्पीड. पहिला घाट लागेपर्यंत तरी.

साडेचार वाजल्यानंतर जे पहिलं हॉटेल दिसलं, तिथं गाडी घातली, दहा सेकंद इंजिन बंद केलं, सिस्टिमनं सर्व काही अपडेट झाल्याचं कळवलं. बाहेर पडून हॉटेलमध्ये गेलो, रूम बुक केली आणि आत जाऊन झोपलो. जेवण वगैरे करायचं नव्हतंच. पहाटे अलार्म वाजला, उठून आवरलं. चेक आउट करून निघालो. आज एकूण नऊ तास प्रवास करायचा आहे. ही साईट नवीनच आहे, आजचा प्रवास तसा नवीनच भागातून आहे, बऱ्यापैकी निर्मनुष्यसुद्धा. कंटाळवाणं होणार आहे सगळं. या नोकरीत आलो ते पैसा, घर, गाडी मिळणार म्हणून. पहिले सहा महिने फार छान गेले. पण जेव्हापासून साईट सुरू झाल्या, तेव्हापासून त्रास आहे खरं तर. ही माझी दुसरीच साईट, पहिली एक महिन्यासाठीच होती ट्रायल बेसिसवर. वर्षभराने त्याचे रिझल्ट आल्यावर मग इथं दोन वर्षासाठी पाठवत आहेत. शाल्मलीला जेव्हा हे समजलं, तेव्हा तिनं स्पष्ट नाराजी व्यक्त केलेली होती. पण मिळणारा पैसा, सुरक्षितता ह्यांच्या जिवावर तिला समजावता आलं होतं. दिवसभर गाडी चालवून साडेपाचच्या सुमारास साईटच्या गेटसमोर उभा आहे, सगळ्या चेकिंगला वगैरे अर्धा तास गेला. मग आत आलो, आता सगळंच सिस्टिमच्या हवाली इथून पुढं.

गेले आठ दिवस नुसता माझ्या रूममध्ये बसून आहे. जेवणखाण वेळेवर मिळतंय, ठरल्या वेळेला बाहेर फिरायला मिळतंय, ठरलंय तेवढंच मग पुन्हा रूममध्ये. प्रत्यक्ष काम काहीच दिलेलं नाही अजून. सिस्टिमवर वेटिंग लिस्ट चेक केली. अजून तीन दिवस मला कुणी भेटणार नाही. प्रचंड कंटाळा आलेला आहे. पहिल्यांदा साईटवर गेलो होतो ते आठवतं पुन्हा एकदा, म्हणजे गेल्या आठ दिवसांत दररोज दोन वेळा आठवून झालेलं आहे. आता पुन्हा आठवंतय, बॉसनं घेतलेलं ब्रेन स्टॉर्मिंग, झालेले वाद आणि मग दोन दिवसांनी दिलेला होकार, नंतर शाल्मलीचा गोंधळ आणि बरंच काही. ही कंपनी जॉइन करतानाच लक्षात आलेलं होतं की काहीतरी घोळ आहे; पण पैसा, घर आणि गाडी डोळ्यासमोर नाचत होते. अशा वेळी नेहमी करतो ते केलं, बॅगमधून एक इंजेक्शन काढलं आणि टोचून घेतलं. या ऑषधाचा प्रभाव पुढचे दोन दिवस टिकेल. मग एकच दिवस वाट बघणं आणि त्यानंतर काम सुरू.

आज दुपारी माझा पार्टनर येणार आहे. नंबर ८९३७, वय वर्षे २९. आज सकाळीच आलेल्या मेसेजमध्ये होतं तसं. बरोबर तीन वाजता रूमचा दरवाजा उघडला, तेव्हा जॉब नंबर ८९३७ समोर उभी होती. चेहऱ्यावर

प्रसन्न हसू, केसांचा बांधलेला पोनी आणि त्याला न शोभणारं बंगाली कुंकू कपाळावर. 'हाय, मी प्रवीण' 'हाय, मी मीना, आत येऊ?' दोनच वाक्यं बोललो, पण खूप जवळची ओळख आहे असं वाटलं. पुढची दोन वर्षे तरी एकत्र काढायची आहेत, किंवा रिझल्ट मिळेपर्यंत. दोघं आत येऊन रूममागच्या लॅबमध्ये गेलो . “थोडा वेळ गप्पा मारू या का, आपण अहेड ऑफ स्केड्युल आहोत बरंच” तिला विचारलं. कपडे बदलत पडद्यामागनं तिनं उत्तर दिलं, “मी तेच करणार आहे. तुझी कितवी साईट आहे?” मला बरंच हायसं वाटलं “दुसरी, तुझी?” पडदा बाजूला करत ती म्हणाली, “चौथी, यू आर टू ज्युनियर टू मी. किती रिझल्ट पॉझिटिव्ह आहेत आजपर्यंत, काय पर्सेंटेज?” तिनं सोफ्यावर अंग टाकत विचारलं. “काही घेणार, नव्वद टक्के आहेत रिझल्ट, निदान माझ्याकडून तरी.” पार्टनर आल्यावर रूममधल्या सर्व सर्विस ओपन होतात, त्यानुसार बार उघडलेला होता. “आतातरी फक्त सोडा दे. तीन क्यूब टाक त्यात.” दोघांचे ग्लास तयार करून टिपॉयवर ठेवले, तेव्हा तिचा चेहरा फुललेला होता, बंगाली कुंकू पुसल्यानं कपाळ थोडं जास्तच मोठं दिसत होतं.

'तर मि. प्रवीण, येत्या महिनाभरात आपल्याला ही दोन पझल्स सोडवायची आहेत, मला वाटतं तुम्ही माझ्या शरीरापेक्षा या कोड्यांवर जास्त लक्ष द्यावं. कसं सुरू करायचं आपण? आधी एक पूर्ण करायचं की दोन्ही पॅरलली करत जायची?” तिच्या आवाजात सिनियरनेस जाणवत होता. मी माझी नजर तिच्यावरून काढून समोरच्या टिपॉयच्या स्क्रीनवर नेली. दोन प्लॅन आणि दोन ड्रॉइंग उघडी होती स्क्रीनवर. मला एका ड्रॉईंगमधलं बरंचसं समजलं. प्लॅनमधली गावं, रस्ते ओळखीचे वाटत होते, पण दुस-याचा काही पत्ता लागेना. “मलासुद्धा काहीच समजत नाही यातलं. प्लॅन ए आहे तो पूर्ण शहरातला पाणीपुरवठा विषयुक्त करून मरणाचं थैमान घालायचा आहे, पण दुसरा काय आहे ते समजत नाहीये. तुला कळलं का काही यातलं?” मीनानं संवादाला सुरुवात केली. “ग्रेट, मला प्लॅन बी समजलाय संपूर्ण. सगळ्या शहरात मोक्याच्या ठिकाणी गाड्या अडवून एक प्रचंड ट्रॅफिक जाम घडवून आणायचा आणि मग मेमॅवेच्या साहाय्यानं धुळधाण उडवून द्यायची. वुई कॉम्प्लिमेंट इच अदर.” उगा जवळीक दाखवायची म्हणून मी बोललो. “मेमॅवे म्हणजे काय ? समथिंग केमिकल ऑर हाऊ?” मीनानं मूलभूत प्रश्न विचारला. “मेमॅवे म्हणजे मेगा मॅग्नेटिक व्हेव - मेमॅव्हे, पण उच्चार मेमॅवे असाच केला जातो.

“चल, तू माझ्या क्षेत्रातल्या प्लॅनवर काम करायला सुरुवात कर, मी तुझ्या फील्ड्मध्ये दिवे लावतो, म्हणजे दोन्ही प्लॅनच्या सगळ्या बाबी चेक होतील आणि व्यवस्थित होतील. व्हॉट से पार्टनर?” मी माझा नेहमीचा गेम प्लॅन टाकला. असं केलं की ‘ते माझं फिल्डच नाहीय’ या सबबीखाली मला माझ्या चुका लपवता येतात. तिनं होकार दिला. माझी व्होड्का आणि तिचा सोडा संपला होता. आता तिनंच उठून विचारलं “अजून एक घेणार का?” माझा होकार आहे असं समजून ती बारकडं गेली. काचेचा दरवाजा उघडणार तेवढ्यात सिस्टिमचा बायकी आवाज आला “रूट ३ रूमचे अल्कोहोल कंझम्शन लिमिट संपले आहेत.” आणि त्यामागं एक जिवंत बायकी आवाज “ओ शिट मॅन, धिस इज अनफेअर” हातातला ग्लास तिनं फोडून टाकला. पुन्हा येऊन ती सोफ्यावर बसली. दोन्ही हात डोक्याच्या मागं धरून, मी तिच्याकडं न पाहायचा अयशस्वी प्रयत्न केला. ते जास्त वेळ जमलं नाही आणि तिच्यदेखील लगेच लक्षात आलं. डोळे बंद असूनदेखील “तुझी पहिली साईट डेडबॉडीजवरून व्हायरस उचलायची होती ना?” मला सिनियर असल्यानं

तिला माझी हिस्ट्री माहीत होती, तो चान्स मला नव्हता. “हो, पहिली साईट एवढी बेकार लागली मला.” मी माझी निराशा स्पष्ट केली. “मग त्या वेळी स्त्रियांच्या प्रेतांकडं पाहताना, त्यांच्यावरून व्हायरस उचलताना ज्या भावनेनं वागला असशील ना, त्याच भावनेनं वाग आताही माझ्याबरोबर. पुरुषाबरोबर राहायची वेळ आली तर माझी रिॲक्शन प्रेतापेक्षा जास्त वेगळी नसते हे लक्षात घे, उगा नंतर अपेक्षाभंग नको.” तिचं स्पष्ट बोलणं मला लागलं. “म्हणजे तू इथून बाहेर गेल्यावर माझ्यामागं भूत होऊन लागणार नाहीस ना, माझ्या इच्छा पूर्ण कर म्हणून? त्यापेक्षा आताच काय ते मागून घे. प्रेतंदेखील काही कमी डिमांडिंग नसतात.” माझ्या विनोदाच्या ढ क्वालिटीवर तिला हसूदेखील आलं नाही, ती उठून रूममधल्या तिच्या बेडवर गेली, बाजूचा लेसर ट्रॅप चालू केला अन झोपली, अगदी प्रेतासारखी.

आज दोनशे दिवस झालेत, केमिकल इंजिनियरिंग आमच्या इंजिनियरिंगपेक्षा फार कमी अवघड नसतं याची पूर्ण कल्पना मला आली आहे. त्यत मीनाबरोबर झालेल्या करारानुसार, वर्किंग टाईममधला फक्त एकच तास एकमेकांच्या शंका निरसनासाठी ठेवलेला आहे. त्यामुळं फार अवघड होतं, प्रत्येक वेळी माहिती सिस्ट्मिमधून घ्यावी लागते. मिळत नाही, समजत नाही असं नाही, पण तिच्याकडून ऐकायला बरं वाटतं, आणि मी सिस्टिमवरुन माहिती करून घेऊन तिला पुन्हा मुद्दाम विचारतो आहे, हे तिच्या लक्षात येतं. तिच्या शिक्षणाची नक्की कल्पना नाही, पण फार नसावं. जेवढं मला अडतं त्यापेक्षा तिला जास्त अडतं, आणि स्पेशली मॅग्नेटिक इंडक्शनमध्ये ती जाम फसते. तो टेस्ला तिला प्रत्येक वेळी घुमव घुमव घुमवतो आणि जोरात आदळतो खाली, आणि तो तर आपला खास दोस्त! याचा बराच फायदा घेतो मी, तिच्या शंका अर्धवटच क्लिअर करतो. मग पुढच्या शंकानिरसनच्या तासात ती पुन्हा तेच घेऊन बसते, सिनियर असली तरी लाजत नाही, कळत नाही हे सांगायला. माझं तसं नाहीये, बहुधा पुरुषी अहंकार मध्ये येतो अजूनदेखील. तिच्या प्रत्येक उत्तरात काहीतरी खुसपट काढतो, तिचं बोलणं मध्येच तोडतो, तिला आवडत नाही ते खरं तर. पण पुरुष असल्याचा कंड कुठंतरी शमला पाहिजे ना.

“प्रवीण, हे बघ म्हणजे हा मेमॅवेचा संपूर्ण प्लॅन झाला नाही अजून, पण एका शहराच्या गेल्या एकोणीस महिन्यातल्या ट्रॅफिकचा स्टडी करून मी एक ट्रॅफिक होल्ड प्लॅन बनवलाय. पहिल्या होल्डपासून शेवटचा होल्ड येईपर्यंत बारा मिनिटं जातील, आणि त्यानंतर मेमॅवेला तू म्हणतो तसं अर्धा तास लागेल होत्याचं नव्हतं करायला, किमान ७०% सक्सेस रेशो दिसतो आहे. आपल्याला काय पाहिजे, रेशो मिनिमम ९५% ना, मग अजून बरंच काम करावं लागेल.” एक दिवस मीनानं एक वॉक थ्रू दाखवला रूममधल्या स्क्रीनवर. समोर टिपॉयच्या स्क्रीनवर माझं काम चालू होतं. मला वर पहायला दोन मिनिटं गेली. तिनं पुन्हा पहिल्यापासून दाखवलं, “गुड ना ,ब-यापैकी जमलंय ना रे, आणि हेच अल्गोरिथम वापरून कोणत्याही शहराला यात फिट बसवता येईल असं करायचं आहे मला ते. आता उरलेलं २५% तू जमव.” तिला प्लॅन पुन्हा एकदा रनथ्रू करायला लावला, त्या वेळी मी टिपॉयवर लिहित होतो वर बघता बघता. रन थ्रू संपल्यावर तिच्या ते लक्षात आलं. शेजारी येऊन बसत ती म्हणाली, “काय काय लिहिलं आहेस माझ्या विद्यार्थ्यानं, बघू?” मी तिची व्हायवा घ्यायला सुरुवात केली. एक तासभर आम्ही बोलत होतो. तिनं टिपॉयच्या तिच्या बाजूला ब-याच नोट्स काढ्ल्या. आमचं बोलणं संपलं, तशा त्या बोटातल्या रिंगवर पिकप केल्या अन तिच्या बेडवर जाऊन बसली, लेसर ट्रॅप चालू केला.

आज सहाशे पन्नास दिवस संपले प्रोजेक्टचे. मीना आणि मी, बाकीच्या दोन्ही टीमपेक्षा खूप पुढं आहोत, म्हणजे सातशे दहा दिवसांचे टारगेट आम्ही साठ दिवस आधीच पूर्ण केलंय. सध्या आम्ही प्लॅन २ आणि प्लॅन ३ बनवतोय, पहिले प्लँन फेल झाले तरची तयारी, अर्थात आम्हाला ते डिटेल वर्कआउट करायचे नाहीत, पुढच्या सिनियर टीम आमच्या स्क्रॅचवर काम करून फायनल करतील आणि आताही सिस्टिम त्यावर पॅरलली काम करत आहेच. आमचे ओरिजनल प्लॅन सध्या रूट १९ला चेक होत आहेत, त्यापुढं अजुन एक रूट, तो क्लिअर केला मी प्रमोशन, मी मास डिस्ट्रक्शनवरून पर्सनल हंटिंगला जाईन आणि मीना इनर किलिंगला. तिच्या पहिल्या दोन साईट पर्सनल हंटिंगच्या होत्या, त्यामुळं तिला ती एक स्टेप टाळता येईल, असं वाटतंय. उद्या पहाटे पाचपासून रूट १९बरोबर मिटिंगला बसायचं आहे. डार्क मिटिंग, या प्रकाराचा मला अनुभव नाही, म्हणजे रूममध्ये फक्त स्क्रीनच दिसतो, पलीकडं कोण आहे तुम्ही पाहू शकत नाही आणि तेसुद्धा तुम्हाला पाहू शकत नाहीत. फार भयाण प्रकार आहे हा. मीनाला विचारलं तर ती काही स्पष्ट बोलली नाही याबद्दल. आज संध्याकाळी ती आमची गाडी घेऊन बाहेर गेली आहे कुठंतरी. बहुधा लांब गेली असेल, कारण आज गाडी हवी म्हणून तिनं गेला आठवडाभराचा कोटा सेव्ह केला होता तिचा आणि मलासुद्धा एक दिवस रूममध्येच बसवून ठेवलं होतं.

पहाटे पाच ते दुपारी एक, रूट १९ची मेगामॅरेथॉन मिटिंग संपली, आमची दोन्ही प्रोजेक्ट रूट १९नं अॅडमिन क्लिअर केली, आता ती फायनान्स क्लिअरसाठी रूट २०ला जातील, तिथं साधारण ५० दिवस लागतात, आणि त्यानंतर हातात येईल डायरेक्ट डी डेट आणि प्रमोशन लेटर. डी डेटच्या आदल्या दिवशी आम्हाला इथून सोडलं जाईल. पुढचे ५० दिवस फार निवांत नाही जाणार, पण फार टेन्शन नसेल आम्हाला. आता निम्मा दिवस गाडी वापरायची परवानगी आहे, प्रोजेक्टच्या रूट १६पर्यंत आम्ही बिनघोर फिरू शकतो. रूममधला बार चोवीस तास खुला होणार उद्यापासून. आणि माझ्यासाठी सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे मी शाल्मलीबरोबर दररोज ३०० सेकंद बोलू शकतो. हो, म्हणजे पाच मिनिटंच, पण ३०० म्हटलं की खूप जास्त वाटतं. जवळस दोन वर्षानी, धाकट्या बहिणीबरोबर बोलताना काय बोलू आणि काय नको, असं होणार आहे मला. अर्थात, आमचं बोलणं ट्रॅक होणार, रेकॉर्ड होणार आणि सेन्सॉरदेखील, तरीही खूप खूप छान वाटतंय मला. एका वेळी २० लाख लोकांना कसं मारता येईल, याचाच गेल्या सहाशे पन्नास दिवसात विचार करत होतो. मीना तिचे ३०० सेकंद कुणाबरोबर बोलेल, काय माहीत? असेल तिचा कुणीतरी बॉयफ्रेंड वगैरे, नाहीतर मुलगा आणि नवरासुद्धा असेल. अजून साठच दिवस... मलादेखील तिची हिस्ट्री चेक करायची ऑथोरिटी मिळेल आणि मग कळेल मला सगळं.

उद्या सातशे दिवस पूर्ण होणार. आज आम्ही दोघं बाहेर गेलो होतो रूट १३ला. तिथं, आमच्या प्रोजेक्टवर एक ग्रुप चर्चा करत होता. आम्हीसुद्धा जाऊन उभे राहिलो झालं, काही कमी पडलंय का पाहायला. अर्थात इथं कुणीच कुणाला ओळखत नाही, त्यामुळं ते लोक बिनधास्त बोलत होते. काही पॉइंटस मिळाले आहेत. रात्री बसून पुन्हा अपडेट करून घेऊ ते. गेले पन्नास दिवस मीना दररोज पाच मिनिटं पुढचा वेळ देते, पहिला दिवस ००:००ला बोललो, दुस-या दिवशी ००:०५ला, असं करून तिचा प्रत्येक वेळचा मूड समजला मला. एकदम मस्त आयडिया दिली तिनं. सगळ्या घराला नवीन रंग दिला आहे तिनं, टाइल्स बदलल्या आहेत, अजून बरंच काही. माझ्यासाठी दोन-तीन मुली पाहून ठेवल्यात. आईबाबांची कसर भरून काढते

आहे. हे सगळं मी मीनालासुद्धा सांगितलं. ती कुणाशी बोलते ते कळलंच नाही. दररोज दुपारी एक वाजता मला रूमच्या बाहेर जायला सांगते. काही कळलंच नाही त्यामुळं. उद्या दिवसभरात कधीही रूममधले स्पीकर सुरू होतील आणि आम्हाला गुड न्यूज मिळेल. आणि मग अर्धा दिवस फोन, पूर्ण दिवस गाडी आणि रूट १८पर्यंत प्रवासपरवानगी. मीनाही कुठं गेलीच नाही आज दिवसभर. नुसती बेडवर पडून आहे. सकाळीच तिनं चार पेग व्होड्का घेतली आहे, त्याबरोबर तीन बाटल्या सोडा. एवढं डायल्यूट करून कसं काय घशाखाली जातं, कोण जाणे. असते एखाद्याची आवड. कोण सांगणार काय ते?

डोक्याचा भुगा झालाय, डी डे अजून एक महिन्यानं आहे, मेमेंवेचा प्लॅन फायनल झाला आहे, मला आणि मीनाला प्रमोशन मिळालं आहे. अजून पगारही वाढला आहे, पण फोन बंद झालेत. आता प्लॅन यशस्वी किंवा अयशस्वी होईपर्यंत आम्हाला बाहेर कुणाशी संपर्क साधता येणार नाही. पण प्रत्येक सिनेमाला असतो जसा क्लायमॅक्स असतो इथं पण आहे; आमचा प्लॅन ज्या शहरात ट्राय करणार आहेत, तिथं मीनाच्या आईबाबांचं घर आहे. जसाजसा आमच्या प्लॅनवर शहराचा प्लॅन लॅप होत गेला, तसं तसं तिला रडू आवरेनासं झालं. आम्ही नेहमीप्रमाणे अंधारात होतो डार्क मिटिंगच्या, पण रूममधली आर्द्रता लिमिटच्या बाहेर गेल्याचं आणि अनावश्यक आवाज येत असल्याचं सिस्टिमनं रूट २०ला कळवलं तसं, एक क्षण आमची रूम प्रकाशानं झगझगून गेली. मीनानं प्रयत्न करूनदेखील तिला डोळ्यातलं पाणी पुसता आलं नाही. मिटिंग संपल्यावर ती लगेच निघून गेली गाडी घेऊन. कधी परत येईल... माहीत नाही. मला आता तिची दया येते आहे. इथं पूर्वी झालं आहे तसं ती बहुधा रूट २०ला जायचा प्रयत्न करेल आणि मरून जाईल. इथं आत्महत्या करायचा तो एकमेव मार्ग आहे, बाकी कोणत्याही मार्गानं तुम्ही स्वताला संपवू शकत नाही. मी पण तसंच केलं असतं का आमच्या शहराचा प्लॅन लॅप केला असता तर? २० लाख लोकांना एकत्र मारायचा आमचा प्लॅन निवडला गेला म्हणून कालपर्यंत मीना आनंदात होती, आणि आज तिला दु:ख आहे ते त्या मरणा-या वीस लाखांचं नाही, तर त्यातल्या दोघांचं. का, तर ती तिची आपली आहेत म्हणून.

त्या बिनओळखी एकोणीस लाख नव्याण्णव हजार नऊशे अठ्याण्णव लोकांच्या मरणानं आम्हाला काही फरक पडत नव्हता, पण या दोघांच्या जाण्यानं पडत होता. त्या वीस लाखांचं मरणं आमच्या देशासाठी फार गरजेचं आहे. दर सहा महिन्यांत असे रँडम निवड करूरुन वीस लाख लोक मारले जातात, त्याशिवाय बाकीच्यांना जगणंच शक्य नाही, असा एक निष्कर्ष काढलेला आहे सिस्टिमनं. मरणाचा हा उत्सव साजरा करण्यासाठी स्पर्धा आयोजित केल्या जातात. त्यांना वाचवणं शक्य आहे, पण त्यासाठी त्यांची गरज आम्हाला सिस्टिमला सिद्ध करून दाखवता आली पाहिजे. अजून तीस दिवस उरले आहेत. काहीतरी करणं भाग आहे, काय ते कळत नाहीये. मीनानं आत्महत्या केली नाही, ती रात्री परत आली. कुठं गेली होती ते विचारलं, काही बोलली नाही. मी माझ्या बेडकडं जात होतो तेव्हा माझ्या मागं आली, मला घट्ट पकडलं मागून आणि सोफ्यावर आणून ढकललं. मला काहीच समजेना. आज तिनं पुन्हा ते बंगाली कुंकू लावलं होतं. दोन वर्षात तिची पोनी जाऊन केस चांगले खांद्याच्या खालपर्यंत आले आहेत, कधी लक्षात आलं नव्हतं, पण आज आलं. पण माझ्याकडं पाहताना भेसूर वाटली नाही. उलट कुणावर तरी उपकार करत असल्याची भावना डोळ्यात दिसत होती.

"तुला ड्राय बनवू का कॉकटेल?" तिनं विचारलं. "आज एंजॉय करायचं आहे आपल्या जवळच्या कुणाचं तरी

मरण. आज मी प्रेतासारखं नाही, तर मित्रासारखं वागणार आहे तुझ्याबरोबर.” व्होड्काचे दोन ग्लास हातात घेऊन येत ती बोलत होती. “तुला काय वाटलं असतं रे, तुझ्या बहिणीच्या घराखाली मेमॅवेचा जनरेटर लावला असता तर, त्या एका न दिसणा-या वलयानं तुझ्या घराची वीट न वीट हादरवून तोडली असती, एखाद्या बीमच्या खाली तुझी बहीण चिरडली असती, तुझी आवडती पल्सार, किती तुकडे होऊन पडली असती का तिला आग लागेल रे लगेच. ....” बराच वेळ ती बडबडत होती. काही काही कल्पना तर एवढ्या भयंकर होत्या की मला खरंच भीती वाटायला लागली. शाल्मलीबद्दल हे ऐकवेना. जेव्हा ती थांबली, तेव्हा तिला सांगितलं, “असं काही होणार नाही माझ्या घराला. माझा अंदाज खरा ठरला मेमॅवेचा, गेल्या महिन्यात मी दररोज पाच मिनिटं शाल्मलीला समजावलं आहे त्याबद्दल आमच्या कोडमध्ये. आता माझं घर मेमॅवेप्रुफ झालं आहे. तुझी घाणेरडी स्वप्नं कधीच पूर्ण होणार नाहीत. शाल्मलीला पाणी पिणं बंद कर हे सांगणं मला शक्य नव्हतं. म्हणून मग मीच पहिल्यापासून पाण्यात विष घालायच्या प्लॅनमध्ये फॉल्ट ठेवत गेलो. आणि शेवटी मला हवं ते मिळवलं. तुला माझ्या क्षेत्रात एवढं तज्ज्ञ व्हायचं होतं की तू प्रत्येक गोष्ट काळजीपूर्वक करत गेलीस आणि मग माझ्या ट्रॅपमध्ये अडकत गेलीस. आता यामधून मी तुला सोडवू शकतो, पण एका अटीवर.”

“माझं शरीर हवंय तुला, पण मिळणार नाही अजिबात. अगदी माझ्या आईबाबांच्या बदल्यातदेखील नाही.” तिच्या बोलण्यात निर्धार होता, “आणि तू असं काहीतरी करशील, याची मला कल्पना होतीच. अरे, तुझी सिनियर आहे मी. या खेळाचे, सिस्टिमचे नियम तुझ्यापेक्षा जास्त माहीत आहेत मला. आपले फोन बंद होण्याच्या शेवटच्या दिवशी मी शाल्मलीला निरोप दिला आहे, आपण लग्न करणार आहोत आणि तयारीसाठी तिला माझ्या घरी जायला सांगितलं आहे. पाच-सहा दिवसांनी ती तिकडे जाणार आहे.” मंदशी हसत ती खाली बसली. “आणि मी तर तुला यातून सोडवूही शकत नाही. सॉरी ज्युनियर.” माझं डोकं अजिबातच कामातून गेलं. तिला जीवे मारावं असा विचार करून मी उठलो, पण ती माझ्यापेक्षा चपळ निघाली, मी तिला पकडेपर्यंत ती तिच्या बेडवर पोहोचली अन लेसर ट्रॅप सुरू केला. हताश होऊन मी तिथंच खाली बसलो. सगळं हरलो होतो मी. “आणि आता ऐका आजच्या परिस्थितीला अनुरूप गाणं. याची निवड कळवलीय श्री. प्रवीण यांनी.” रेडिओवरच्या निवेदिकेसारखा आवाज तिनं काढला आणि मग गाणं म्हणायला लागली, “तुझ्या गळा माझ्या गळा, गुंफू मोत्यांच्या माळा| तुज कंठी मज अंगठी, आणखी गोफ कोणाला| हेऽऽ हेऽऽ तुझ्या गळा माझा गळा ' .........

# परिक्षा

विश्वजीत दीपक गुडधे

म्हणे त्यांच्याकडे बडी हुशारी होती
ती तर पाठांतराची ओकारी होती

कागदावरच त्यांनी फोडल्या डरकाळ्या
पेच येता ती टोळी पळणारी होती

इतिहासात पेटविली क्रांतीची मशाल
संकट येता, घेतली लाचारी होती

विज्ञानात केलेत अंधश्रद्धांवर वार
त्यांची झुंड तर भोंदूच्या दारी होती

भूगोलात केली त्यांनी जगाची सैर
परि शेजारच्यास न ओळखणारी होती

आयुष्याचे गणित कधी आलेच नाही
तरीपण बरोबर ही गुणाकारी होती (?)

मायभूचे ऋण न जाणले, झटपट शिकून
त्यांना करायची परदेशवारी होती

सदा शिकले चांगले, पण वागले उलटच
तरीही त्यांनी घेतली भरारी होती

अनुत्तीर्ण झाले परीक्षेत जीवनाच्या
परि त्यांना मिळाली टक्केवारी होती

# पनीर पापडी
## सूड

मध्यंतरी एका हॉटेलच्या मेनूकार्डवर पहिल्यांदा हा पदार्थ पाहिला. उत्सुकतेने मागवला आणि थोड्या अनवट पदार्थाची चव घेता आली. यात काय काय वापरलं असावं, याचा खाता खाता विचार सुरू झाला. पनीर आणि पापड हे तर सहज कळून येत होते. पण बाकीचे पदार्थ अंदाजपंचे वापरून हा पदार्थ घरी बनवायचा घाट घातला.



साहित्यः

पनीर पाव किलो

पापडाचा चुरा (मी उडदाच्या पापडाच्या बोटभर जाडीच्या पट्ट्या कापून घेतल्या होत्या.)

तीन मोठे चमचे डाळीचं पीठ

बारीक चिरलेली कोथिंबीर

एक हिरवी मिरची बारीक चिरून (आपल्या आवडीनुसार तिखटाचे प्रमाण कमी-जास्त करू शकता)

चवीपुरते मीठ

चिमूटभर हळद

तळणासाठी तेल.

**कृती:**

पनीरचे साधारण इंचभर आकाराचे तुकडे कापून घ्यावे. डाळीचं पीठ, भजीसाठी भिजवतो त्यापेक्षा किंचीत पातळ भिजवून घ्यावं. कारण पापडाचे तुकडे पनीरला नीट चिकटावे म्हणून हे पीठ वापरायचं आहे. पनीरवर त्याचा जाड थर तयार होता कामा नये. या पीठात बारीक चिरलेली हिरवी मिरची, कोथिंबीर आणि मीठ घालून नीट ढवळून घ्यावं.

आता एका कढईत तेल तापत ठेवावं. तेल नीट तापलं की पनीरचे तुकडे डाळीच्या मिश्रणात बुडवावे, जास्तीचं पीठ निथळलं की पापडाच्या तुकड्यांमध्ये घोळवून तेलात मध्यम आचेवर तळावेत. गॅसची आच मोठी राहिल्यास पापड करपून जायची शक्यता असते, त्यानुसार अंदाज घेऊन आच कमी-जास्त करत



राहावं. तळून झाले की टिश्यूपेपरने जास्तीचे तेल टिपून सॉस किंवा चटणीसोबत हा पदार्थ गरमगरम खायला द्यावा.

# सवाष्ण
## अपर्णा

"पाटलीणबाई?" पाटातल्या खळखळ वाहणाऱ्या पाण्याकडे एकटक पाहत असलेली हरणा जणू दचकलीच. साधी, कुणी अवचित मारलेली हाकही तिला अशी दचकवून जावी? तिने वर पाहिलं. खाड्याची जना बांधावर उभी होती. एक क्षणभर तिच्या नजरेत ओळख चमकली. पण मग पुन्हा अनोळखीपणाचं धुकं पांघरून तिने नजर फिरवली. पण तिच्या नुसत्या नजर फिरवण्याने जना अशी हटणारी नव्हती. बांध उतरून खाली येत तिने तिचा हात धरला. नेहमीच्याच सवयीने तिने तो धरलेला हात हेलकावला. तो हेलकावा बघता बघता तिला हेलावून गेला.

"आता? आता?" तिला सांभाळत जना उद्गारली. पण बघता बघता दोघींची सारख्याच आवेगाने मिठी पडली, अन हरणाचा बांध फुटला. त्या गदगदलेल्या तिला उरी धरत जनाही उसासली. काय बोलावं हे जनालाही उमगत नव्हतं.

"हरणा?" त्या हाकेसरशी त्या दोघीही भानावर आल्या. कृष्णराव बाजूला केव्हा आले, ते दोघींनाही जाणवलं नव्हतं.

"मैतरणीला भेटायला आली जणू?" काही तरी बोलायचं, म्हणून कृष्णराव बोलून गेले. पण त्यांची नजर मात्र, हरणाच्या नजरेला भिडायला जणू आतुरली होती.

डोळे पुसत हरणा बाजूला झाली. आज कित्येक दिवसांनी ती त्यांना पाहत होती. खरं तर आज कित्येक दिवसांनी ती हे सारं शिवार, हा सूर्यप्रकाश, हे बांध अन हे खळखळतं पाणी पाहत होती. त्या खळखळत्या पाण्यानं हरणाच्या आठवणी जागल्या.

लग्न हरणाला आठवतही नव्हतं. घरातल्या तशा कोणालाच स्वतःचं लग्न आठवायचं कारण नव्हतं. कारण काळ होता १८५०चा. जुन्याजाणत्या म्हणत, "दुसऱ्याचं बघायचं अन आपलंपण असंच झालं असेल असं कल्पावं. आणि काय वेगळं असतं लग्न म्हणजे? पाच दिवस रोज हळदी, साखरपुडा, सीमांतपूजन, असा एक कार्यक्रम अन जेवणावळी, दुसरं काय?"

हरणालाही हे मान्य होतं. नाही म्हणायला ती वरातीत पेंगून कृष्णरावांच्या मांडीवर झोपली होती, असं कृष्णराव वारंवार चिडवीत. हरणाला फणकारा येत असे. "असं कुणी झोपू दिलं असतं का?" असं उलट विचारे ती, अन "तुझं एव्हढंसं मुटकुळं कुणाच्या ध्यानात नाही आलं" असं सांगून ते खदखदून हसत असत.

वयाच्या अवघ्या पाचव्या वर्षी हरणाचं लग्न झालं होतं. नर्तवड्याच्या मोहितेंची ज्येष्ठ कन्या ती. हरणाच्या लग्नात तिची आईच होती अवघी १८ वर्षांची. तो काळच होता तसा. रोगराईच्या, मोगलांच्या, फिरंग्यांच्या, लढाई अन निसर्गाच्या तडाख्यातून सापडेल तेव्हढं आयुष्य जगत माणसं तेव्हा. त्यामुळे जमेल तेव्हढं जगणं असं आसुसून जगलं जाई. हरणाचं माहेर तोलामोलाचं होतं. घर शेतीभातीचं, भरल्या गोठ्याचं होतं.

सारं लहाणपण तिथेच तर गेलं तिचं. सात-आठ वर्षाची असताना एकदा ती कुठल्याशा कार्याला म्हणून इथे आली होती. माहेरी, घरात परकर-पोलक्यात वावरणारी हरणा सासरी म्हणून चांगलं नऊवारी लुगडं नेसून चार दिवस राहिली होती. लुगड्याचा तो बोंगा आवरत, बालसुलभ औत्सुक्याने आईची नजर चुकवून शेतावर आल्याचं चांगलं आठवणीत होतं हरणाच्या. शेतावर काम करणाऱ्या एकीनं, तिला अगदी दंडाला धरून बाजूलाच ऊस खाणाऱ्या एका मुलाला, " मालक? काय म्हणावं? पाटलीण तुम्हाला शोधत आली जणू?" असं हाकारलं होतं. तेव्हाच तर पाहिलं होतं तिने बारा-तेरा वर्षाच्या कृष्णरावांना. दंड कसाबसा सोडवून घेत हरणाने धूम ठोकायचा प्रयत्न केला अन त्या लुगड्याच्या बोंग्यानं दगा दिला होता. मग वळून सरळ पाटाच्या पाण्यात बसकण मारली होती तिने. हरणाचं रडं थांबवून अन ते लुगडं सरळ बांधून देऊन तिला घरी पोहोचवेपर्यंत सारं काम मग त्या दंड धरणाऱ्या बाईला करावं लागलं. ते पाटाच्या पाण्यात बसकण मारून रडणं आजतागायत विसरू देत नव्हते कृष्णराव तिला. जरा कुठे पाटाच्या पाण्याजवळ हरणा गेली की "अगं! अगं! आता कुणाला आणायचं लुगडं नेसवायला फिरून?" असं चिडवत ते तिला.

भलते मिश्कील होते कृष्णराव! अन का असू नयेत? शेंडेफळ होतं ते थोरल्या पाटलांचं. त्यांच्याहून वयानं खूप मोठे दोन भाऊ होते. सगळ्यात मोठा भाऊ, त्यांना 'पोलीसबाबा' म्हणत; गावचा पोलीस पाटील होता. दोन नंबरचा, त्यांना 'थोरले आबाजी' म्हणत. सारी शेती सांभाळत होता. वडील वारले अन हे छोटंसं पोर दोन्ही भावांच्या तळहातावरचा फोड झाला जणू. एकाच्या मांडीवर बसावं अन दुसऱ्याच्या ताटातलं खावं, इतकं लाडकं! त्याला घेतल्याशिवाय दोघेही भाऊ कधी जेवले नाहीत. पैरणीच्या कपड्यात कधी यांची इटुकली पैरण चुकली नाही. जावईपण खायला जेव्हा हे दोघे स्वतःच्या सासरी जात, तेव्हा सोबतीला हे 'धाकले दीर' अगदी गरजेचे असत.

उगा नावाचे पाटील नव्हते ते. चांगलं जाधवांचं घराणं होतं. मागच्या अठरा पिढ्या तलवार गाजवणाऱ्या होत्या. त्यांच्याच तर पुण्याईनं चांगला चौसोपी वाडा होता. इनाम जमिनी होत्या. मोगलांच्या जागी फिरंगी आले, अन कसं कुणास ठाऊक, पण तलवारीचं बळ गंजायला लागलं. जणू हा नवीन गनीम साध्या मराठमोळ्या मनाला उमगलाच नाही. उगा जमिनी कसाव्या अन गुपचूप राहावं, एव्हढच हाती उरलं. तोवर लढाईचे अन प्रतिकाराचे साचेही बदलले होते. गावात मोगलांच्या आक्रमणानं नावालासुद्धा एक देऊळ नव्हतं. नाही म्हणायला वेशीजवळ एक तुळशी वृंदावन होतं. अन त्याला रोज पाणी घालणं हा पोलीसबाबांचा परिपाठ होता.

हरणाची सोयरीकही पोलीस बाबांच्या मर्जीनंच झालेली. पुढे आणखी पाच वर्षांनी जेव्हा हरणा मोठी झाली अन् तिची आता खरोखरी नांदण्यासाठी सासरी रवानगी झाली, तेव्हा गदगदलेल्या तिच्या आजीनं तिला सरळ पोलीसबाबांच्या ओटीत घातलं. "तुमची भावजय नव्हे, तर तुमची पोटची पोर समजा" म्हणून कळवळून सांगितलं.

हरणा सासरी आली. ते एव्हढं मोठं घर, तिथे आधीच मोठ्या जावा होत्या. त्यांची मुलं होती. वाड्यातच वाटण्या होऊन बाजूला भाऊबंदाचं आणखी एक घर होतं. दोन्ही घरात मिळून जवळजवळ पंचवीसभर माणसं होती. तिच्या वयाच्या आणखी दोघीतिघी सासुरवाशिणी होत्या. नात्यानं त्या तिच्या सुना लागत

होत्या. तिला नावानं न बोलावता 'धाकल्या आत्यासाब' असं बोलवायचं, असा घरातल्या मोठ्या स्त्रियांचा आग्रह होता.

ओटीभरणासाठी तिच्याबरोबर एक आत्या आलेली. त्या आत्याचा हात धरून हरणा त्या स्वतःच्या वाड्यात अगदी गप्प बसून होती. अन् तेव्हाच तिला तिच्या जिवाचा साथीदार भेटला. ओटीभरणाच्या आधी तिच्या आत्याने तिला दटावल्या सुरात काही सांगायचा प्रयत्न केला होता. तसं तिच्या आईनेही 'बायकांचं आयुष्य' या विषयाला धरून बरंच काही समजावलं होतं. पण या साऱ्या प्रकाराने हरणा हबकून गेली होती.

तशी भाग्यवानच म्हणायची हरणा. इतक्या चांगल्या घरातून आलेली, इतक्या चांगल्या घरात पडलेली ् तिच्या वयाचा अनुरूप जोडीदार मिळालेली.

तर अशी घाबरून, जीव मुठीत धरून कृष्णरावांच्या खोलीत प्रवेशलेली हरणा जेव्हा पहिल्यांदा कृष्णरावांनी पहिली, तेव्हा त्यांचा स्वतःच्या डोळ्यावर विश्वासच बसेना.

हातात लुगड्याचा बोंगा धरून, पाटात बसून रडणाऱ्या हरणाच्या जागी अंगभर दागिने ल्यायलेली, कपाळी ठसठशीत कुंकू चमकणारी एक उंच मुलगी उभी होती. तेराचौदाच्या हरणाकडून सतराअठराच्या कृष्णरावांच्या काहीही अपेक्षा नव्हत्या. आजवर इतक्या लाडात वाढल्याने अन् सदानकदा खेळात रमलेल्या त्यांचा स्वतःचा पोरपणा अजून पुरता हटायचा होता. समोर असलेल्या आपल्या पत्नीकडून घ्यायघ्यायचा व्यवहार अजून पुरता उमगायचा होता. अन् इथेच त्या दोघांतला अनुबंध जुळला की काय कुणास ठाऊक. तिच्या पायातल्या त्या एव्हढाल्या जड पैंजणांकडे, त्याच्यावर असलेल्या तोरड्या, पायाच्या बोटातल्या मासोळ्या, घणघणीत जोडवी हे सारं पाहून त्यांना हसू फुटलं. डोक्यावरचा पदर घट्ट मुठीत धरून उभ्या असलेल्या हरणालाही मग अगदी हलकं हलकं होऊन गेलं. आता त्या पदराची तमा न बाळगता मग तीही अगदी हलकेच हसली. एकूण दमदाटीनं सांगितलेलं सारं खोटं ठरलं होतं. तिच्या पाटात पडण्याची आठवण काढून दोघेही पहिल्यांदाच एकत्र हसले. वरातीत ती त्यांच्याच मांडीवर झोपल्याची आठवण ऐकून तिला पहिल्यांदाच फणकारा आला. अन् ही आठवण सांगितल्यावर ती फणकारते, याची खूणगाठही कृष्णरावांनी पहिल्यांदाच बांधली. दुसऱ्या दिवशी ओटीभरणानंतरच्या एकत्र आंघोळीत जेव्हा बाकीच्या बायका त्यांना चिडवीत होत्या, त्यांच्या पाठीला रिठा शिकेकाईनं घास म्हणून तिला सांगत होत्या, तेव्हा खरंच तिला अजून कोणतीच जाणीव नव्हती झालेली. असेच आठ दिवस सरले अन् मग तिची आत्या तिला घेऊन परत माहेरी आली. बरोबर कृष्णरावांची आठवण घेऊन आलेल्या हरणाला मग कधी आठ दिवस सासर अन् महिनाभर माहेर असे सणवार धरून फेरे सुरू झाले. असंच वर्ष-दीड वर्ष सरलं अन् एका पंचमीला गाडी घेऊन स्वतः कृष्णराव तिला न्यायला आले. जावई एकटा आलेला पाहून, सासऱ्यांनी मग तिलाही एकटीलाच गाडीतून पाठवली. विशीच्या जवळपासच्या कृष्णरावांना आता मिसरूड फुटलं होतं. उंचीनं ते तसे फारसे नव्हते, पण खांदे भलते भरदार दिसत होते. डोईला फेटा अन् समोर ओढलेला त्याचा जरीकिनारी शेमला. पंधरा सरलेल्या हरणाचा नकळत ठोका चुकला. छातीत धडधड सुरू झाली. त्या छपरी गाडीत माग वळून, "जरा पुढं सरकून बसा. बैलांच्या गळ्याला फास लागतोय." म्हणून खोडकर हसणाऱ्या

कृष्णरावांकडे एखादं चुंबक ओढावं तशी ओढ जाणवू लागली तिला. सारी वाट सरेपर्यंत तिच्या जिवात जीव नव्हता, अन् ते असं भलतं संकोचलेलं रूप पाहून कृष्णरावांना एक शब्द सुचत नव्हता तिला हाकारण्याचा. गाव जवळ आल्यावर मात्र कृष्णराव वळले अन् "आता बास झालं माहेर, नीट गाव धरून ह्यावा आता." एव्हढंच बोलले. त्यांचा आवाज ऐकूनच मोहरलेल्या तिलाही मान हलवण्याखेरीज आणखी काऽही सुचलं नाही.

आता ती काही नवी नव्हती या घराला. दारात मुटका उतरून आत आल्यावर आता ते घर तिला पहिल्यांदाच दिसू लागलं जणू. पुढच्या देवडीला एक मोठी लाकडी चौकट होती. आत आल्यावर उजव्या बाजूला मोठी ऐसपैस पडवी अन् त्यावर माचा, गुडगुडी असा थाट होता. मध्ये प्रशस्त चौंगाण होत. मग सोपा. तिथे गणपतीची देवळी. देवघराचं उंचीला छोटं दार, सोप्यातून आत जायच्या दाराला नक्षीदार खिळे होते, कोरीव चौकटीला वर घोड्यांचे दोन अर्धपुतळे शोभत होते. सोप्याला छप्पर तोलायला असेच लाकडी खांब होते. घरात श्रावणाची गडबड सुरू होती. खरं तर पाऊसपाण्यात बैल जोडायला साऱ्यांचाच विरोध होता पण कृष्णराव कुणाचंही न ऐकता तिला आणायला गाडी घेऊन आले होते. तिच्या मोठ्या जावा तिला पुन्हा पुन्हा हे ऐकवीत राहिल्या. सणाला म्हणून पोलीस बाबांच्या दोन मुली माहेरी आलेल्या, हरणाच्याच वयाच्या. सारे त्यांच्या माहेरपणात अन् जावयाच्या उसाभरीत दंग होते. ओटीभरण होऊन जवळजवळ दीड वर्ष सरल्याने हरणाला अन् कृष्णरावांना एकांत मिळणं दुरापास्त होतं. सारी रात्र हरणानं जागून काढली. सकाळी जातं पडल्याचा आवाज आल्याबरोबर उठून ती कामाला लागली. आता इथे राहायचं तर घरच्या इतर ज्येष्ठ स्त्रियांच्या हाताखाली काम करावं लागणार होतंच. रोज पायलीभराच्या भाकरी हे तर अगदी साधं सोपं गणित होतं. अन् त्या पायलीभराच्या भाकरी, पीठ जात्यावर दळून दिवस उजाडायला तयार असतं. पोतेरा केल्याशिवाय चुलीला विस्तव नसत घालत तेव्हा. चुलीवर आधण चढायच्या आधी, अंगणात सडा सारवण होत असे. त्यावर गोपद्म उमटत असत. गोठ्यात धारा निघत असत अन् ते गरमगरम धारोष्ण दूध पिऊन घरचे पुरुष वावराकडे निघत. दिस उगवला म्हणजे शिवारात कामाचा पहिला फेरा सुरू होत असे. दुपार चढायला लागली की कामं थांबत. कामावरची माणसं मग घरची, त्या दिवसाची धुणंभांडी अशी दिनचर्येची कामं उरकत असत. काही निवडणं, टिपणं, दुसऱ्या दिवशीची जोडणी याच वेळात व्हायची. उन्हं साधारण कलली की मग पुन्हा शिवारात कामाचा दट्ट्या सुरू, तो अगदी कडुसं पडेपर्यंत! तिथनं पुढं मग पुन्हा गावाघरात माणसांचा वावर जाणवे. दिवेलागणीला जेवणखाणं उरकून गावात भजनाचा, लेझमीचा आवाज घुमू लागे. पारावर, कट्टीवर बसून गप्पा रंगत. अन् गाव हळूहळू शांत होत असे.

तिच्या या घरात बराच गोंधळ होता. पोलीसबाबांना नुसत्या मुलीच झाल्याने त्यांनी दुसरं अन् मग तिसरं अशी लग्न केली होती. त्या दोघींनाही नुकतीच पुन्हा फिरून कन्यारत्ने झालेली. मधल्या 'थोरल्या आबाजींची' प्रथम पत्नी वारली होती. तिची तीन मुलं होती. त्यांचंही पुन्हा लग्न झालेलं. या बायकोची दोन मुलं. आता प्रथमच तिला जाणवला तो त्या साऱ्यांच्यातला एकमेकीतला दुस्वास! पोलीसबाबांच्या तिन्ही बायका एकमेकीवर कुरघोडी करण्यात दंग! पहिल्या बायकोची मुलं सांभाळावी लागतात म्हणून मधल्या बाई वैतागलेल्या. या साऱ्यात तिची अवस्था काय होणार होती, देव जाणे. पण एक होतं. साऱ्या जणी कामाला मात्र मागे हटणाऱ्यांपैकी नव्हत्या. सकाळच्या न्याहारीचं बांधून तयार झालं अन् न्याहारी शेतावर घेऊन जायची जबाबदारी हरणावर येऊन पडली. शेतावरच्या एका माणसाच्या डोक्यावर ही भली मोठी

बुट्टी देऊन, कडेवर पाण्याची घागर घेऊन हरणा शेतावर गेली. कोण कुठे काम करतंय, याची सोबतच्या माणसाला बरोबर माहिती होती. तिच्या हातावर चार भाकरी अन् त्यावर भाजी, दही घालत त्यानं तिला विहिरीकडे पिटाळलं. "धाकले मालक तिकडे मोटेवर आहेत." त्यानं माहिती पुरवली. त्या भाकरींवर पदर झाकत ती विहिरीकडे वळली. सारावर बैल नुकतेच सोडले होते. मोट बाजूला ओढून ठेवली होती. विहिरीतून पाण्याचा आवाज येत होता. ती तशीच आत डोकावली. कृष्णराव आत एका दगडावर उभे होते. तिची चाहूल लागताच त्यांनी वर पाहिलं. नजर बारीक करत ते म्हणाले, "आता? एकदम कामालाच लागल्या तुम्ही? आम्ही काय नुसते मुराळी का काय? आल्याबरोबर घरात कुठं गडपच झाल्या तुम्ही ते?" तीही काही कमी नव्हती, "व्हय व्हय! त्या घरात काय पत्ता लागतोय कोण कुठं आहे ते? अन् आता लेकी जावयांचं बघाल की स्वतःचंच घोडं दामटाल म्हणते मी?"

"ऑ? आवाज हाय म्हणायचा घशात! न्हाय. काल वाटलं, सासऱ्यानं मुकी पोर बांधली का काय गळ्यात म्हणून म्हंटलं."

"मुकी का म्हणून बांधतील? अशा फसवणाऱ्यांच्यातले वाटले का काय मोहिते तुम्हाला?"
"काय अनुभव नाही आला अजून मोहितेंचा आम्हाला. कडू लागतेत का ग्वाड तेबी चाखायला न्हाय गावलं अजून."
आता मात्र ती लाजून लाल झाली. तिचा तजेलदार सावळा चेहरा त्या लालिम्याने अधिकच चमकू लागला, "या आता वर, न्याहारी आणलीय. भुका लागल्या असतील."

"भुका लागल्या म्हणून तर नर्तवड्यापर्यंत बैल ताबडली घरातल्यांच्या शिव्या ऐकत. खरं काय घास लाभला नाही भुकेला." कृष्णराव मुद्दा सोडायला तयार नव्हते.

लाजेनं खाली वळलेली नजर नेमकी त्यांच्यावरच पडत असल्याने ती हैराण झाली. विहिरीपासून दूर सरत ती सारावर टेकली. विहिरीतून वर येत कृष्णरावही तिच्या जवळ बसले. तिने भाकरी त्यांना देण्यासाठी पुढे केलेला हात त्यांनी तसाच भाकरीसकट पकडला अन् ते त्यावरच भाकरी मोडून खाऊ लागले. त्या पहिल्यावहिल्या स्पर्शाने ती अंतर्बाह्य थरारून उठली. त्या धडपडीत हातावरची भाकरी खाली पडली. तिच्याकडे रोखून पाहात कृष्णराव बोलले, "एकूण, तुम्ही उपाशी ठेवायचं ठरवूनच आल्या जणू आम्हाला?"
"नाही हो? असं काय बोलताय?" तिने खाली पडलेल्या भाकरी उचलून हातात घेतल्या.

"मी आणते जाऊन पुन्हा." ती अजीजीने बोलली.

"नको."
त्यांना राग आला की काय हे पाहण्यासाठी तिने विषय बदलला.

"कसला बाई गाव म्हणायचा हां? वरून इतका पाऊस पडतोय तरी मोट कशाला जुंपायची म्हणते मी!"
"खूळ लागलंय आम्हाला. वारं लागलंय नर्तवड्याचं." मग बैलांकडे वळत ते म्हणाले, "चला रे गड्यांनो, आपली इथं काय किंमत नाही. येव्हढं माझ्यासाठी काल तुम्हाला चिखल पावसात ताबडवलं, म्हणून जरा धुवून काढावं म्हंटलं तर इथे गावाची अक्कल निघाली."

तिला खुदकन हसू फुटलं. मग तीही हातातल्या भाकरी बैलांकडे घेऊन जात म्हणाली, "असं कसं होईल? हे घ्या, माझ्या हातान मी चारवते तुम्हाला. तशी, तुम्हाला चारवताना कुणी पाहील याची भीती नाही मला. हक्काचं असलं तरी कधी कुठं काय वागावं कळत मला."

वर पावसाची लक्षण पुन्हा दिसू लागली. श्रावणातली झिरमिर तिच्या चेहऱ्यावर शिंतोडली. तिच्याकडे पाहत त्यांनी विचारलं, "छप्पर बांधलंय शेतात. तिथे नाही ना कुणी पाहायचं? चालेल का तिथं यायला?" त्या शब्दात, त्या नजरेत जे आर्जव होतं, त्यानं ती पुरी भारावली. उठून कधी त्यांच्या मागोमाग तिथे गेली तिला कळलंही नाही. छप्पर कसलं ते, सरळ सरळ दोन खोल्यांचं छोटंस घरच होतं ते. वेळ पडली तर गड्यांना राहायला अन् कधीमधी शेतावर जेवण बनवायला म्हणून व्यवस्था होती ती. आत छोटीशी चूल होती. एक बाज होती उठाबसायला. त्या इवल्याशा घरात, छपरावर पावसाच्या अक्षता तडतडत असताना ती पहिल्यांदा त्यांच्या आधीन झाली. सवाष्णीचं लेणं त्यांच्या ओठांनी तिच्या अंगांगावर रेखलं ते इथंच. धपापत्या श्वासांनी जेव्हा ती उठून बसली तेव्हा ते बाहेर निघून गेले होते. बाहेर पुन्हा हालचाल जाणवली म्हणून तिने दाराकडे पाहिलं, तर दारात तिच्याच वयाची एक तरुणी उभी होती. आत येत मिश्कील हसत तिने विचारलं "आँ? पाटलीणबाई, काय सपान बिपान बघितलं का काय? न्हाय, येव्हढ्या धपापताय ते?" काय उत्तर द्यावं ते न समजून हरणा शरमून गेली. अन् मग तिच्या पाठीत अगदी मोकळेपणानं धपाटा घालत तिने आपली ओळख दिली. "मी खाड्याची जना. माझं मालक तुमच्या शिवारावर असत्यात. मी बी येते इथं कामाला." मग तिला आवरासावरायला मदत करून जनानेच तिचे केस सारखे करून दिले. वर पदर घेऊन सारं अंग कसं लपेटून घ्यायचं, हेही तिनेच तिला शिकवलं. अवखळ पायानं शेतावर गेलेली हरणा, एक स्त्री होऊन परतली होती.

मग हा परिपाठच झाला. घरातलं सारं आवरून न्याहारी नाहीतर संध्याकाळचं का असेना, पण ती शेतावर जाऊ लागली. एव्हाना त्यांची स्वतःची अशी एक खोली त्यांच्यासाठी मिळाली होती, पण हरणा रमली ती शेतावरच. त्या कौलारू घरात भर दुपारी कवडसे सांडायचे उन्हाचे, अन् त्या कवडश्यातच तिच्या शरीरावर चांदणं उमटायचं. 'धाकल मालक' शेतघराकडे झळकले की हिम्मत नव्हती कुणाची तिकडे फिरकण्याची! पण तो अधिकार घेतला होता जनानं. तीच एक होती, जी नेमकी कृष्णरावांची पाठ फिरली की हरणाला चिडवायला तिथे उगवायची. दोघी एका वयाच्या सासुरवाशिणी, बघता बघता जिवाभावाच्या मैतरणी होऊन गेल्या. पण आता जवळजवळ दोन वर्ष सरली, तरी हरणा तशीच सडी राहिली होती. सुरुवातीला सारे चेष्टा करीत.. मग हळूहळू सुरू झाला प्रश्नांचा भडीमार. तिच्या बरोबरच्या साऱ्या जणी कधीच्या डोहाळे लागून माहेरी गेलेल्या, पण हरणाचं काही लक्षण दिसेना. कुणी म्हणालं, होईल वर्षा-दोन वर्षानं. कुणी सांगितलं, हे खाऊ नका, ते खावा. कुठल्या देवाचं काही करायचं राहिलं का, ते कुणी विचारलं. कुणी भुताखेताचा हवाला सांगितला. घरात तर वेगळीच कहाणी सुरू झाली. वर्षाला कुणा ना कुणाचा पाळणा हलणाऱ्या त्या घरात आता तिचा पाळणा केव्हा हलणार? हे ठासून विचारलं जाऊ लागलं. त्यातच थोरले आबाजी, जे सारं शेत पाहायचे, त्यांना त्याच्या मोठ्या मुलाचं लग्न करायचं होतं. अन् मग सुना घरात येण्याआधी त्यांनी स्वतःचं शेत वाटणी करून मागितलं. घरा-शेताच्या तीन वाटण्या करून घेतल्या गेल्या. अन् मधल्या जाऊबाई स्वतःची चूल वेगळी मांडून मोकळ्या झाल्या. आता उरल्या पोलीसबाबांच्या तीन बायका अन् ही.

एव्हाना बरीच वर्षं सरली. हरणा जवळजवळ पंचविशीची झाली. अगदी तिच्या बरोबरची जनासुद्धा, छोटा राऊ बरोबर घेऊन शेतावर येऊ लागली. आता मात्र हरणाचा विश्वास ढळला. त्या शेतघरात ती अगदी फुटून फूटून रडली. मातृत्वासाठी आसुसलेलं तिचं मन ती आणि कुणासमोर उघड करणार? मला कोण? हा स्वतःच्या अस्तित्वाचा प्रश्न तिला छळू लागला. कृष्णरावांवर असलेलं तिचं निरातिशय प्रेम, जे तिचा आधार होतं, तेच ढासळतं की काय, असं होऊन गेलं.

"होईल आपल्यालाही." त्यांनी तिला समजावायचा प्रयत्न केला. पण तो काळच असा होता की बाईचं एकच काय, पण अर्धमुर्धं उणेपणही समाजाला खपत नसे. वांझपणा म्हणजे तर पुरुषांना दुसरं लग्न करण्याची सुवर्णसंधीच! तसाही, पुरुषांनी किती लग्न करावीत याला कुठलाच बंध नव्हता. गावातच चारपाच सवती, रोज सकाळसंध्याकाळ एकमेकींना पाण्यात पाहत दिवस कंठीत होत्या. घरात पोलीसबाबांच्या तर तीन पत्नी होत्या. मग हरणा काय चीज होती? पण कृष्णराव मात्र खंबीर होते. त्यांनी तिला वचन दिलं, मी दुसरं लग्न करणार नाही. त्या एका वचनावर ती जीवन कंठू लागली. जना तिला धीर द्यायची. जनाची स्वतःची मुलं होऊनसुद्धा कधी जगली नाहीत. एव्हढ्या दहा वर्षात एकटा राऊच काय तो जगला होता. पण हरणाचं दुःख वेगळं होतं. तिला एकदाही असली चाहूल नव्हती लागली. आतल्या आत खंतावणाऱ्या हरणाला एक कृष्णराव सोडले तर कुठेच एका शब्दाचाही आसरा नव्हता उरला.

तिच्या स्वतःच्या माहेरी तिच्या आईलाच दर दोन वर्षाआड पाळणा हलायचं भाग्य लाभत होतं. थोडी जगत होती थोडी मरत होती, सारा देवाचा खेळ! पण जगणं कुणाचं थांबलं नव्हतं. थांबलं होतं ते फक्त हरणा अन् कृष्णरावांचं आयुष्य !

त्यातच मग सुरू झाले घरच्या तिन्ही मोठ्या जावांचे टोमणे. आधिच स्वतःला मुलगा होत नाही म्हणून नशिबावर रागावलेल्या त्यांना हरणाचं वांझपण एक कारणंच झालं नेहमी टाकून बोलायला. एखादं काम होत नाही...मग काय पोर होतं का? काही खावंस वाटलं काय डोहाळे लागले का? माहेरी जायचंय ..जा ना कायमचीच. त्यात त्यांना दिसत अन् जाचत होत, ते कृष्णरावांचं तिच्यावरचं प्रेम. त्यांच्या "हरणाऽ ऽ " या हाकेमध्ये जाणवणारा त्यांचा स्नेह! अंगापिंडानं हरणा सडपातळ होती. या तिघीजणींच्या नशिबी जो सवतीमत्सर होता, तो हरणाच्या नशिबी कसा काय नाही याचा विस्मय त्यांना वाटत होता. आपल्याला फक्त मुलगा नाही म्हणून पोलीसपाटलांनी पुन्हा लग्न केलं, पण हरणाला एकदाही दिवस न जाता आपला दीर असा कसा "हरणा" "हरणा" करतो, याचा प्रश्न त्यांना सुटता सुटत नव्हता.

आपल्या नशिबी मुलगा नाही, याची पोलिसबाबांना एव्हाना खात्री झाली होती. वेगळं राहिल्यापासून थोरले आबाजीही तुला मुलगा नाही अन् कृष्णाला पोरबाळ नाही म्हणून आताच सारी जमीन माझ्या मुलांच्या नावावर कर म्हणून मागे लागलेले. या गोष्टीचा पोलीसबाबांना राग आलेला. त्यांनी कृष्णरावांसाठी नवीन स्थळं पाहायला सुरुवात केली. अडचण एकच होती. स्थळ बघायला येणार वा जायचं म्हटलं की कृष्णराव गायब व्हायचे. परतून आले की, गप खाली मान घालून शिव्याशाप ऐकायचे अन् शेतावर निघून जायचे. बिचारी हरणा त्यांच्या या ओढाताणीत दिवसदिवस उपाशी राहायची. ज्या दिवशी ते परतून येतील, त्या दिवशी शेतावर भाकर बांधून घेऊन जायची अन् दिवस दिवस त्यांच्या कुशीत टिपं गाळत राहायची. "ऐका

हो ऐका! पैशाला पासरी बायका" अशा म्हणीच्या काळात हे जोडपं एकमेकाच्या निष्ठेवर दिवस कंठत होतं. शेवटी पोलीसबाबांनीही स्थळ बघायचा अन् बोलवायचा नाद सोडून दिला.

हरणा पंचेचाळिशीला आलेली. कृष्णराव पन्नाशीचे. अन् अशातच पोलीसबाबांच्या नातवाचं लग्न निघालं. बघावं तेव्हा त्यांच्या चारपाच लेकी माहेरी असत. माझ्या बापाचं बक्कळ राज्य आहे, मी खाणार! असा त्यांचा खाक्या होता. लग्नाची धावपळ सुरू होती. जवळच्या नातेवाइकात हरणाचे माहेरचेही होते. तिच्या आईला पाचच वर्षांपूर्वी शेवटची एक मुलगी झालेली. अडगुलं मडगुलं अशी ती बायजा हरणाला स्वतःच्या लेकीसारखीच वाटली. लाडाची मेहुणी म्हणून कृष्णरावही तिला हसत हसत खांद्यावर घेऊन शेतावर फिरून आलेले. स्वयंपाकघरात हरणा काहीतरी करण्यात गुंतलेली, सारं घरं पाहुण्यारावण्यांनी भरून गेलेलं. दारात मांडवामध्ये हळदीचा कार्यक्रम सुरू झालेला अन् अशातच एकदम तिला धरून अंधारखोलीत ढकललं गेलं. या खोलीत खरं तर हरणाला कधीच प्रवेश नव्हता. ही खोली बाळंतिणीची होती. "असं का?" "कोण आहे?" या प्रश्नांना उत्तर म्हणून खोलीला बाहेरून कडी घातली गेली. हरणाच्या हाका बाहेरच्या गलबल्यात कुणाच्या कानावर गेल्या, नाही गेल्या कुणास ठाऊक, पण बाहेरच्या गलबल्यातलंही काही तिच्या कानावर नसावं गेलं. तासाभरानं जेव्हा कडी निघाली अन् हरणा बाहेर आली, तेव्हा घरात नवीन लग्नाची द्वाही फिरत होती. हळदीच्या मांडवात मांडलेल्या कळसात कृष्णरावांना जबरीनं बसवून त्यांना हळद लावली होती. बाजूच्या पाटावर, रडून आकांत करणारी, परकर पोलकं ल्यायलेली पाच वर्षांची बायजा होती. तिच्या आईला काही कळायच्या आत, मांडवाच्या खांबाला धरून गरगर फिरण्याचा खेळ करण्यात गुंगलेली ती पोर हिसकावून घेऊन तिला हळद फासली गेली. स्वतःच्या ज्येष्ठ लेकीसाठी जीव टाकणाऱ्या त्या पन्नास वर्षांच्या जावयाच्या बाजूला बसलेली आपली पाच वर्षांची लेक बघून तिची आई दातखीळ बसून बेशुद्ध पडलेली. बाप "असं का? सरळ मागायची होती..." असा अर्थहीन प्रश्न विचारत होता. अन् हरणा? कृष्णरावांनी आपल्याला फसवलं अन् आपल्या बहिणीचं आयुष्य नासवलं, एव्हढा एकच विचार तिच्या मनात घुमला. तशीच वळून नदीच्या वाटेला पळणाऱ्या तिला पकडून पोलीसबाबांसमोर आणलं गेलं. बाजूला धायधाय रडणारे कृष्णराव बसले होते. उसळ्या मारून स्वतःला सोडवू पाहणारी हरणा पोलीसबाबांच्या एका जरबी नजरेत गप्प झाली. "काय पोरखेळ लावलाय?" पोलीसबाबा गरजले. "अन् तू कृष्णा? काय बायकांसारखं रडतोस? मी जमेल तेव्हढा प्रयत्न केला तुझं आयुष्य सरळी लावायचा. पोटच्या पोरासारखा सांभाळला मी तुला जन्मभर. कधी आईआबा आठवले का रे तुला? सरळ स्थळ बघून वेळच्या वेळी टाका घालत होतो. हिला काय सोड म्हणत होतो? तेव्हा दोघांनीही ऐकलं असतं, तर आज माझ्यावर ही वेळ आली नसती. हे बघ, ही सारी इस्टेट तुला सांभाळायची आहे. विचार कर. माझ्या लेकी काय? आता त्यांच्या सुना आल्या. जातील त्यांच्या घरी नांदायला. मधल्यानं कधीच वाटून घेतलंय आपापलं. त्याच्या हपापल्या भावनेला मला पायबंद घालायचा आहे. मला तुझा मुलगा हवाय हे सारं चालवायला. अगदी माझ्या वाटणीचंही!" हळदी झाल्याच्या दुसऱ्या दिवशी, बायजाचा कृष्णरावांबरोबर विवाह झाला. हरणानं त्यानंतर जे अंथरुण धरलं, ते दोनतीन महिने ती उठलीच नाही. रोज शेतावर तिची वाट पाहून कृष्णराव थकून गेले. त्यातच हरणाची आई हरणाला भेटायला येऊन गेली. लेकीच्या उशाला बसून आसवं ढाळत तिने हरणाकडून बायजाच्या सुखाचं वचन घेतलं अन् म्हणूनच आज हरणा शेतावर आली होती. पाटाच्या पाण्याच्या गतीने सारं आयुष्य तिच्या नजरेसमोरून झरझर फिरलं.

कृष्णरावांनी हलकेच पुढे होऊन तिचा हात धरला. आज त्या स्पर्शाने दोघांनाही कोणताच धुमारा फुटला नाही. पण त्यांच्याबरोबर हरणा शेतघरात गेली. डोळ्यांना अश्रूंच्या धारा लागल्या होत्या दोघांच्याही. एकमेकाचे अश्रू पुसत ते दोन जीव थरथरत एकमेकांच्या कुशीत विसावले. आपल्यालासुद्धा कसा काही थांगपत्ता नव्हता, ते तिला सांगायचा परोपरीनं प्रयत्न करत होते. पण हरणाला आता त्यात स्वारस्य नव्हतं. "काय ठेवलंय आता त्या आठवणीत?" तिने त्यांना थांबवत विचारलं.

" मला एकाच गोष्टीचं वचन हवं धनी तुमच्याकडून."

"काय देऊ तुला? माग, काय पाहिजे ते माग." कृष्णराव आवेगाने म्हणाले.

"बायजाला तुम्ही सुख द्याल! एक बाई म्हणून आता तिच्या कपाळी जे कुंकू आहे, त्याला न्याय द्याल."

कृष्णराव सुन्न होऊन बसून राहिले.

"द्या मला. एव्हढं एक वचन द्या! माझ्या माघारी असो वा मी असताना, पण मला हे एव्हढं वचन द्या."

गडबडीनं तिच्या तोंडावर हात ठेवत कृष्णराव म्हणाले, "असं बोलू नको. मी स्विकारून न स्विकारून आता काय फरक पडतो हरणा? त्या अश्राप पोरीचं लगीन लागलंय माझ्याशी."
"नाही, मी जाणते तुम्हाला. आजवर दुज्या कुणा नारीचा स्पर्श नाही तुम्हाला. आता मात्र त्याचा हक्क असणार आहे बायजाला."

" तिचं मायेनं करायला तू असणारच ना हरणा?"

"धनी माझ हृदय फुटलंय. मी नाही टिकायची फार दिवस." हरणा जणू निर्णयाचं बोलून गेली.

आणि मग हृदय फुटलेली ही हरणा दोन वर्षातच अखेरच्या घटका मोजू लागली. एव्हाना पुरे पिकलेले कृष्णराव रात्रंदिवस तिच्या उशाला बसून राहिले. "बायजाला सुख द्या, बायजाला सुख द्या" असा एकच धोषा लावत हरणान शेवटचा श्वास घेतला. तिला दिलेलं वचन पाळण्यासाठी म्हणून की काय, कृष्णराव श्वास घेत राहिले. दिवस दिवस शेतघराच्या बाजल्यावर बसून राहू लागले. जना रोज तिच्या घरून भाकरी आणून त्यांना आणाशपथा घालत घासभर खायला घालत राहिली.

वर्षं कशी सरली देव जाणे! पण एक दिवस नर्तवड्याहुन सांगावा आला. बायजाला ओटीभरणासाठी घेऊन येत असल्याचा. अजूनही अंगान बोदगी, रंगान केतकी असणारी बायजा मग, कुणा नातेवाइकाचा हात धरून सासरी आली. तिच्याही नजरेत वाड्याच्या भिंती उमटल्या. पण ते कौतुक ऐकायला आता कृष्णरावांना रस नव्हता. पदर मुठीत धरून सामोरी आलेली ती बारा वर्षांची कन्या कृष्णरावांनी स्वीकारली. पुन्हा आंघोळीचे सोहळे झाले. पण आता त्यात कुणालाच स्वारस्य नव्हतं उरलं. बहिणीची आठवणही नसणाऱ्या बायजाला काही कळणं शक्यच नव्हतं. आठवडाभर कृष्णराव देतील ते घेऊन बायजा माहेरी गेली अन् महिनाभरातच माणूस तिच्या डोहाळ्यांचा सांगावा घेऊन आला. पोलीसबाबांच्या चेहऱ्यावर समाधान मावेनासं झाल. पण कृष्णरावांनी नि:श्वास टाकला. बायजा सहा महिन्यांची गरोदर असताना जणू, "मी तुला दिलेल वचन पूर्ण केल", हे सांगायला कृष्णरावही हरणाकडे निघून गेले.

माघारी उरले ते पोलीसबाबा. दोन जीव दुखावून आपण नक्की काय साधलं? असा प्रश्न त्यांना नक्कीच पडला असावा. रोज सकाळ संध्याकाळ वेशीवरच्या वृंदावनाला पाणी घालणं, हा एक परिपाठ सोडला तर तेही फारसे घराबाहेर पडेनासे झाले. अन् तीनच महिन्यात नर्तवड्याहून सांगावा घेऊन माणूस आला. बायजाला मुलगा झाला. वर्ष होतं १९०१. महिना ऑगस्ट. तीन माणसांच्या आयुष्याचं खत होऊन एक कोंब फुटला घराण्याला शेवटी! कृष्णरावांचं नाव उरलं, पोलीसबाबांच्या श्राद्धाची व्यवस्था लागली. बायजाही नाही म्हटलं तरी शेवटी या साऱ्याची मालकीण झालीच. फार कर्तबगार निघाली बायजा! सारा गाव तिला 'धाकल्या बाई'चा मान द्यायचं. शेवटी एका पुत्राची माता होती ती! नामनिशाण उरलं नाही ते हरणाचं. परंतु तिचं नावही न घेता आजही उरली आहे पितृपक्षातल्या पानावर एक सवाष्ण !

माघारी उरले ते पोलीसबाबा. दोन जीव दुखावून आपण नक्की काय साधलं? असा प्रश्न त्यांना नक्कीच पडला असावा. रोज सकाळ संध्याकाळ वेशीवरच्या वृंदावनाला पाणी घालणं, हा एक परिपाठ सोडला तर तेही फारसे घराबाहेर पडेनासे झाले. अन् तीनच महिन्यात नर्तवड्याहून सांगावा घेऊन माणूस आला. बायजाला मुलगा झाला. वर्ष होतं १९०१. महिना ऑगस्ट. तीन माणसांच्या आयुष्याचं खत होऊन एक कोंब फुटला घराण्याला शेवटी! कृष्णरावांचं नाव उरलं, पोलीसबाबांच्या श्राद्धाची व्यवस्था लागली. बायजाही नाही म्हटलं तरी शेवटी या साऱ्याची मालकीण झालीच. फार कर्तबगार निघाली बायजा! सारा गाव तिला 'धाकल्या बाई'चा मान द्यायचं. शेवटी एका पुत्राची माता होती ती! नामनिशाण उरलं नाही ते हरणाचं. परंतु तिचं नावही न घेता आजही उरली आहे पितृपक्षातल्या पानावर एक सवाष्ण !

# 'गेले खायचे राहुनी...

योगप्रभू

'पेशवाईतील जेवणावळींमुळे मराठेशाही बुडली', अशी एक तिखटजाळ टीका कधीमधी वाचायला मिळते, तेव्हा मला त्याची गंमत वाटते. इतिहासाचा धांडोळा घेतला तर असे दिसते, की जेवणावळी घालण्यापासून अगदी शिवाजी महाराजांचीही सुटका झाली नव्हती. मोहीम फत्ते करुन आल्यावर आणि सणासुदीच्या निमित्ताने महाराज आपल्या कारभाऱ्यांना, सरदारांना पंगतीचा लाभ देत. अनेक मनसुबे आणि राजकारणे अशा पंगतींमधूनच आकाराला येत. एक मात्र खरे, की शिवकालीन जेवणावळींना मुघली सुखासीनतेचा स्पर्श झालेला नव्हता. त्यामुळे अशी सामूहिक भोजने साधीच राहिली. त्यांना शाही खान्याचे आणि मेजवान्यांचे रुप कधीच प्राप्त झाले नाही. शिवकालीन पंगतीचे चित्र रेखाटायचे झाल्यास ते कसे असेल? दोन स्वतंत्र सोप्यांत शाकाहारी आणि मांसाहारींच्या वेगळ्या पंगती बसत असतील. एकीकडे ब्राह्मण कारभारी पुरणपोळी, कटाची आमटी ओरपत असतील. दुसरीकडे सरदार मंडळींच्या पंगतीत मटणाचे गोळे घातलेला पुलाव आणि सागुतीचा आग्रह चाललेला असेल. क्वचित कुणी बुजुर्ग सेनापती मिश्कीलपणे 'पंत इकडून काही पाठवू का तिकडे?' असे विचारत असेल आणि या थट्टेचा राग न मानता मंडळी पंगतीचा लाभ घेत असतील.

पेशव्यांच्या काळापर्यंत या जेवणावळींमध्ये खूप काही बदल झाले. पेशवे ब्राह्मण असल्याने शनिवारवाड्यात मांसाहाराला स्थान नव्हते. ओघानेच जेवणात सगळे शाकाहारी पदार्थ. मांसाहाराच्या पंगती सरदारांच्या तळावर होऊ लागल्या. पहिल्या बाजीरावाला मद्याची आणि मांसाहाराची सवय असल्याचे सूचक उल्लेख कादंबऱ्यांत आहेत, परंतु शनिवारवाड्यात ते वास दरवळले नाहीत. कारण पेशवे कुटुंबातील बुजुर्ग स्त्रियांची करडी शिस्त. थोरल्या बाजीरावांनीही खाण्याचे फारसे शौक केले नाहीत. मोहिमेत वेळप्रसंगी कणसे हातावर चोळून तिखटाची फक्की मारुन पुढची दौड करणारा हा शिपाईगडी. तंबू ठोकून तबियतीत खाणे खाण्याइतका वेळ कुणाला होता? साताऱ्याला छत्रपती शाहू स्वामींनी दिलेल्या मेजवान्या किंवा मोहिमेवर नसताना शनिवारवाड्यातील सणासुदीच्या पंगती याखेरीज बाजीराव साहेबांना जेवणाचे सुख फारसे लाभले नाही. पेशवाई भोजनातील पदार्थांची वाढलेली संख्या, हाही एक महत्त्वाचा बदल. सवाई माधवरावांच्या मुंजीच्या निमित्ताने नाना फडणविसाने पाठवलेल्या पत्रात किती प्रकारचे पदार्थ करावेत आणि ते ताटात कुठे वाढावेत, हा तपशील वाचला तर मन थक्क होते. त्याचबरोबर नानाच्या सूक्ष्म निरीक्षणशक्तीचेही कौतुक वाटते.

इथे आणखीही एक गोष्ट नमूद केली पाहिजे, की शिवकाळात परकी सत्तेच्या बड्या प्रतिनिधींचे शिवाजी महाराजांकडे येणे-जाणे तुरळक होते. महाराजही कुणाला मेजवान्या देण्याच्या फंदात पडले नाहीत. गोवळकोंड्याला कुतुबशहाने महाराजांचा आठवडाभर शाही पाहुणचार केला तेव्हा 'तुमच्या अशा तबियतदार खान्याची आम्हाला सवय नाही' असे महाराजांनी त्याला ऐकवले होते. पेशव्यांच्या काळात मराठी साम्राज्य दक्षिणेप्रमाणेच उत्तरेतही विस्तारले होते. मुघल, रजपूत राजे, निजाम, शिंदे-होळकर-पवार-गायकवाड-पटवर्धन असे मातब्बर सरदार, इंग्रजांचे वकील असे बडे प्रतिनिधी पुण्यात पेशव्यांच्या भेटीला सतत येत. त्यामुळे

भोजनावळींची संख्या वाढली. हिंदुस्थानच्या राजकारणाचे सूत्रधार या नात्याने ही 'डिनर डिप्लोमसी' सांभाळणे पेशव्यांना अनिवार्यच ठरले.

शिवकाळापासून ते तहत उत्तर पेशवाईपर्यंत खाणे आणि गाणे या दोन शौकांपासून मराठी समाज वंचित राहिला होता. दुसऱ्या बाजीरावाच्या काळापर्यंत त्यातही बदल होऊ लागले. या बाजीराव साहेबांचे अन्य छंद नेहमीच चर्चिले जातात, पण त्याच्या जीवनाचे काही पैलू विचारात पाडणारेही आहेत. दुसरा बाजीराव हा दिसायला देखणा. वडील राघोबादादांचा विषयासक्तपणा आणि आई आनंदीबाईचे अप्रतिम सौंदर्य यांचा मिलाफ त्याच्यात होता. बाजीरावाचा गोरापान वर्ण, सुंदर व्यक्तिमत्त्व आणि तळहातावरील व पावलांवरील गुलाबी छटा यामुळे इंग्रज रेसिडेंटही मुग्ध झाला होता. या बाजीराव साहेबांची सौंदर्यासक्ती त्यांच्या आहारातही प्रतिबिंबित झालेली होती. इंग्रजांनी ब्रह्मावर्ताला रवानगी केल्यानंतरही त्याच्या विलासी राहणीत फरक पडला नव्हता. बाजीराव साहेबांना एक पदार्थ भारी आवडत असे. तो म्हणजे मक्याच्या कोवळ्या कणसांच्या दुधात साखर घालून खाणे. त्यासाठी २५-३० कणसे लागत आणि तीही हलक्या हाताने, लाकडी दांडक्याने चुरडायची. ते वाडगाभर कोवळे दूध आणि त्यात वेलची व साखर. क्या बात है? असे असले तरी हा पेशवा 'खवय्या' म्हणता येणार नाही. का? ते पुढे वाचूच.

या बाजीरावाने १८०३मध्ये इंग्रजांनाही केळीच्या पानावर जेवायला घातले होते. सर बॅरी क्लोज पुण्यात इंग्रजांचा रेसिडेंट असताना लॉर्ड व्हॅलेन्शिया या इंग्रज उमरावाने पुण्याला भेट दिली होती. त्यांच्या सन्मानार्थ बाजीराव साहेबांनी हिराबागेत खास ब्राह्मणी जेवणाची मेजवानी दिली. केळीच्या पानावर डाव्या बाजूला चटणी, लोणचे, पापड, कुरडया, कोशिंबीर, उजव्या बाजूला सात प्रकारच्या भाज्या, मध्यभागी साधा वरण-भात, साखरभात व सुरळी केलेली पुरणपोळी, शिऱ्याची मूद. पानाबाहेर सार, कढी, आमटी, तूप, खीर अशा पातळ पदार्थांनी भरलेले द्रोण. पेशवे स्वतः या पंगतीला बसले नाहीत. पेशवे इतरांचे आदरातिथ्य उत्तम करत असले तरी त्यांनी अन्य खाद्यसंस्कृतींबद्दल फारसा रस दाखवला नाही, मग ते पदार्थ चाखून बघणे राहिले दूरच.

पेशव्यांच्या जेवणावळींनी राज्य बुडाले, या वाक्याची मला आणखी एका कारणासाठी गंमत वाटते. पेशवे बोलून चालून पडले मराठी. मराठी समाजाच्या आहाराच्या सवयी पूर्वीपासून अगदी साध्या. ताजे गरम अन्न, रोजच्या आहारात शरीरातील दम टिकवून धरणारा, महाराष्ट्राच्या हवामानाशी अनुकूल आणि मेदनियंत्रण करणारा भाकरीसारखा पदार्थ, हंगामी पालेभाज्या, घरचे दूध-तूप इतक्यावर मराठी माणसे खूश असतात. पेशव्यांच्या जेवणात भात, भाज्या, कुरवड्या, पापड्या, खिरी, सार, आमटी, लोणचे असेच मराठी पदार्थ कायम राहिले. समजा पेशव्यांनी शानोशौकत करायचे ठरवले असते आणि व्यापाऱ्यांप्रमाणे रजपुतान्यातून आचारी मागवले असते, तर त्यांच्याही जेवणात भारीभक्कम आणि तुपाने निथळणाऱ्या मिठाया, सोहन हलवे, मालपुवे आले असते.

खाण्याचे श्रीमंती शौक कुणी केले असतील तर ते लखनौ आणि हैदराबाद इथल्या संस्थानिकांनी. त्याच्या नवलकथा वाचल्यावर पेशवेसुद्धा सामान्य वाटू लागतील. हिंदुस्थानवर इंग्रजांचा अंमल बसल्यावर संस्थानिकांना करण्यासारखे काही उरलेच नाही. उलट त्यांच्या विलासाला जोरच आला. खाना और गाना

या शौकांसाठी संपत्तीप्रमाणेच शांततेचा काळही महत्त्वाचा ठरतो. अशी शाही, विलासी, नजाकतदार, तबियतदार खाद्यसंस्कृती विकसित झाली लखनौचे नवाब आणि हैदराबादचे निजाम यांच्या अमदानीत. लखनौ आणि हैदराबादमध्ये शाही खान्याबाबत नेहमीच चुरस राहिली आहे. हैदराबादने बिर्याणी लोकप्रिय केली, तर लखनौने पुलाव. या नवाबांनीच नव्हे, तर त्यांच्या उमरावांनीही खाण्यात इतकी प्रचंड संपत्ती उधळली, की त्याची वर्णने थक्क करणारी आहेत. एकाच खाद्यकृतीचा सामाईक दुवा असलेले दोन किस्से माझ्या वाचनात आले. ते नमूद करतो.

लखनौला नसिरुद्दीन हैदर या नवाबाच्या राजवटीत एक आचारी दुसरीकडून नोकरीला आला. त्याची खासियत म्हणजे तो बदामाचे तांदूळ आणि पिस्त्यांची डाळ बनवून ते अलवार शिजवून त्याची खिचडी बनवत असे. ती दिसायला नेहमीच्या उडीद-तांदळाच्या खिचडीसारखी दिसली तरी चवीला अफलातून असे. याच खिचडीमुळे हैदराबाद संस्थानात दोघा कवींची फजिती झाली होती. निजामाच्या घराण्यातील युवराज मुअज्जमशहा हा एक विक्षिप्त वल्ली होता. त्याला भेटायला फानी आणि सिदत हे दोन कवी आले होते. युवराज खाना खात होते. त्याच वेळी युवराजांचा आचारी एक भांडे घेऊन आला. त्याने मुअज्जमशहाला भांड्यातून खिचडी वाढली. युवराजाने त्या दोघा कवींनाही ती खिचडी वाढण्याचा हुकूम केला. खिचडी बघितल्यावर त्या कवींची निराशा झाली. त्यांनी चमचाभर खिचडी वाढून घेतली. त्यांना वाटले, की ती उडदाच्या डाळीची खिचडी आहे, पण चाखून बघताच लक्षात आले, की ती बदाम-पिस्त्यांची आहे. त्यांना खरे तर ती खिचडी आणखी हवी होती, पण युवराजांना मागायचे कसे? पुन्हा मुअज्जम इतका खट्ट होता, की त्या दोघांनी अनिच्छेने खिचडी चमचाभर घेतल्याचे त्याने डोळ्याच्या कोपऱ्यातून पाहिले होते. त्याने आचाऱ्याला खिचडी पुन्हा आणण्याचा हुकूम शेवटपर्यंत दिला नाही आणि हे कवी राजाच्या घरच्या वैभवी पक्वान्नाला मुकले. बदाम-पिस्त्याची चमचाभर खिचडीच काय ती त्यांच्या पोटात गेली आणि आठवणीला आयुष्यभर पुरली.

काही काही पदार्थांच्या उगमामागे इतिहासातील व्यक्तिरेखांचा संदर्भ असतो. तीही एक वाचनातील गंमत ठरते. बिर्याणी जरी हैदराबादेची मिरासदारी असली तरी शहेनशहा औरंगजेबाच्या खानसाम्याने तिचा शोध लावला. तो किस्सा म्हणजे गोवळकोंड्याच्या कुतुबशहाने शरणागती पत्करल्यावर औरंगजेबाने त्या विजयाच्या आनंदात खानसाम्याला चांगलेसे काही पकवण्याची आज्ञा दिली. औरंगजेब या वेळी पार थकलेला होता. त्याच्या तोंडात दात नव्हते. आपल्या धन्याला हिरड्यांनीही खाता येईल असा एक मसालेदार नाजूक भात त्या आचाऱ्याने खपून बनवला. तो इतका मुलायम शिजला होता की घास जिभेवरच विरघळावा. मुख्य म्हणजे त्यातले मटणाचे तुकडेही मंदाग्नीवर शिजवून म्हाताऱ्या शहेनशहाला खाण्याइतके लुसलुशीत बनवले होते. शहेनशहा या पदार्थावर बेहद्द खूश झाला. बिर्याणीचा मूळ अवतार तो हा.

इडली-सांबार म्हटले म्हणजे आपण ती दाक्षिणात्यांची मक्तेदारी मानतो. ते खरेही आहे, कारण हे पदार्थ तिकडूनच आले आहेत. यातला इडली हा पदार्थ खूप जुना आहे. बाराव्या शतकात राजा सोमेश्वराने लिहिलेल्या 'मानसोल्लास' या ग्रंथात त्याला 'इडरिका' म्हणून संबोधले आहे. पण इडलीसोबतचे सांबार ही मराठ्यांची दक्षिण भारताला दिलेली देणगी आहे. तंजावूरच्या भोसल्यांच्या घराण्यातील संभाजी यांनी त्या प्रांतातील तमिळींना मराठी जेवणातील मसालेदार आमटीची चव माहीत करून दिली. त्यांच्या नावावरुनच

या आमटीला ते लोक संभार म्हणू लागले. पुढे त्यांच्या पद्धतीच्या चवीची ती रेसिपी आजचे सांबार म्हणून आपल्याकडे पुन्हा परतली.

आमच्या पेशव्यांना यातले काहीच जमले नाही. त्यांनी खाण्याचे अमीरी शौक केले नाहीत. सोने-चांदीच्या वर्खाच्या मिठाया खाल्ल्या नाहीत, रजपुतान्याप्रमाणे शुद्ध तुपाने निथळलेली पक्वान्ने खाल्ली नाहीत, मुघल -निजामाचे सामीष पदार्थ चाखले नाहीत, इंग्रजांच्या पदार्थांत रस दाखवला नाही आणि हातात सत्ता असतानाही मराठी पदार्थ परमुलखात लोकप्रिय करण्याचे प्रयत्न केले नाहीत, की कुशल बल्लवाचार्यांना पदरी बाळगून त्यांना नवे पदार्थ शोधायला प्रवृत्त केले नाहीत. एका अर्थी त्यांचे खूपच 'गेले खायचे राहुनी...'

# अलख
### क्रांती

हा अलख कुणा जोग्याचा
ही गहन कुणाची वाणी
प्राणांच्या कंठी रुजली
संध्यापर्वाची गाणी

झाकोळुन नभ गंगेच्या
पाण्यात उतरले थोडे
क्षितिजाच्या पार निघाले
अन् सूर्यरथाचे घोडे

या मूक उदास जलावर
धूसर वलये वाटोळी
रेखाटत बसली कुठल्या
कवितेच्या अनवट ओळी?

ज्या सांद्र वनातुन घुमले
अस्वस्थ क्षणांचे पावे
ते वन सोडून निघाले
अज्ञात दिशेला रावे

ढळत्या सांजेच्या पदरी
अस्फुटसा लुकलुक तारा
परतून चालला जोगी
अन् अलख घुमवितो वारा

प्रथम रंग भरून मग वरून पांढऱ्या रांगोळीने रेखाटन केलेल्या पुढच्या तिन्ही रांगोळ्या आहेत..

१]मुक्तहस्त रांगोळी..



२]मुक्तहस्त-पुनरावृत्ती..



३] मुक्तहस्त रांगोळी



४] फुलांची रांगोळी - लक्ष्मीचे गाठोडे [लक्ष्मीचे गाठोडे]



# संपेल ना कधीही, हा खेळ चाकरांचा

**सर्वसाक्षी**

जे नसते, तेच हवे असते हा तर अजरामर सिद्धान्त. लहान असताना आपल्याला कधी मोठे होऊ असे वाटत असते आणि मोठे झालो की 'गेले ते बालपण, गेले ते रम्य दिवस' अशी हुरहुर लागते. मग बालपण आणि शाळेतले दिवस यावरच्या मेलांवर मेला येतात ज्यात 'गेले ते दिवस' असा सूर लावणारे मुक्तक वा कविता असतात. कुणाला चिंचा आठवतात, कुणाला मधली सुट्टी आठवते, कुणाला न केलेले गृहपाठ आणि त्याबद्दल झालेल्या शिक्षा आठवतात, तर कुणाला बालपणी खेळलेले खेळ आठवतात. तसे म्हटले तर हे स्वाभाविक वाटते. पण मोठे झाले, नोकरीला लागले म्हणजे सगळे खेळ संपले, अशीच एक भावना का असते बरे? पटतंय? छे! मला तरी नाही पटत. साफ चूक. कोण म्हणतो खेळ संपले? किंबहुना व्यावसायिक जीवनात जितके खेळ खेळले जातात, तितके उभ्या बालपणात मैदानातही खेळले जात नसतील! मला तरी आतापर्यंत असा अनुभव आहे. अगदी सर्व स्तरात खेळ खेळले जातात. कारकुनांचे खेळ, अधिकाऱ्यांचे खेळ, व्यवस्थापकांचे खेळ ... एकूण सगळाच खेळखंडोबा. बघा तुमच्या आस्थापनेतही असे खेळ खेळतात का ते?

कागदाची विमाने उडविणे - मवि (मराठीत त्याला एच आर म्हणतात)चे लोक हा खेळ मोठ्या हौसेने खेळतात. फार रंगणारा खेळ. न कंटाळता हे लोक रोज नवीने विमाने उडवितात आणि कर्मचारी 'पोरखेळ' म्हणून ती सोडून देतात.. कुणी एखादे विमान चुकून धरेल तर शपथ. मागे एकदा एका कर्मचाऱ्याने सरळ सरळ मवि व्यवस्थापकाला सांगितले होती की "साहेब, एवढे कागद वाया घालवण्यापेक्षा मला चार पैसे देत जा. त्याबद्दल मी आख्ख्या कचेरीत फिरून निरोप तोंडी सांगेन." असो. न का वाचेनात कुणी? फर्माने काढण्यात मविचा वेळ तर छान जातो. खरे सांगू का, मुळात परिपत्रक (मराठीत त्याला सर्क्युलर म्हणतात) हा अत्यंत निरुपयोगी प्रकार आहे. मग ते छापील स्वरूपात असो, विरोप स्वरूपात असो वा अंतरजालीय पटलावर डकवलेले असो. माझा ठाम सिद्धान्त आहे, जर एखादी गोष्ट परिणामकारकरीत्या कचेरीतच काय, पण आस्थापनेच्या भारतभरातील सर्व शाखांमध्ये तत्परतेने पोहोचवायची असेल, तर उगाच परिपत्रकांचा प्रपंच करण्यापेक्षा जे काही सांगायचे असेल त्याचे चार कागद छापावेत, मग त्या छापील परिपत्रकाची घडी घालून त्याला टाचणबंद करून व वर मोठ्या अक्षरात 'गोपनीय' असे लिहून ते कागद कचेरीतील अनुपस्थित असलेल्यांच्या, तसेच 'आकाशवाणी' म्हणून ख्याती पावलेल्या महाभागांच्या कार्यासनावर ठेवावेत. काही तासातच मजकूर जगजाहीर झालेला दिसेल! पण असे झाले तर विमानांचा खेळ कोण खेळणार?

आंधळी कोशिंबीर - उत्पादन विभागातले कर्मचारी, संगणकीय क्षेत्रातले प्रणाली / आज्ञावली लिहिणारे, क्रय विभागातले यांचा आवडता हा खेळ. खेळात सहभागी असतात ते संलग्न विभागांचे कर्मचारी. साहेब आपल्या विक्री / पणन विभागातील कर्मचाऱ्यांना आपल्या उत्पादनाविषयी काही वैशिष्ट्ये सांगतो. ते लोक ग्राहकाकडे आणि काही सांगतात. ग्राहक आणखी काही समजतो आणि आपल्या उपभोक्त्या विभागाला विचारून आपली मागणी नोंदवतो. मग आपल्या उत्पादन / विकसन विभागाच्या प्रमुखाला

विक्रीवाले ती मागणी सांगतात. तो प्रमुख त्याला जे समजेल तसे आपल्या लोकांना कळवितो. मग चेपू, खाजगी विरोप, खरेदी संस्थळे यांच्या अध्ययनात मग्न कर्मचारी त्यांच्या मर्जीनुसार ऐकतात आणि जे समजले त्याप्रमाणे आपल्या सवडीने निर्मित वा विकसित करतात. अखेर ग्राहक जेव्हा आपल्या पदरी पडलेले फळ पाहतो तेव्हा त्याला चक्करच येते! मागितला हत्ती आणि मिळाला रेडा. मग तो परतपाठवणी करतो आणि उलट्या भाजणीने एकमेकावर राज्य ढकलायचा खेळ सुरू होतो. खेळाची सुरुवात होते ती उपभोक्ता विभागात. आपल्यावर राज्य आले हे समजताच ते डोळ्यावर पट्टी बांधून गरगरा फिरतात आणि आपल्या समन्वयकाला शिवतात. मग राज्य समन्वयकावर. समन्वयक राज्य घेतो आणि क्रय विभागाच्या प्रमुखाला हात लावतो. क्रय विभागवाला पुरवठादाराच्या विक्रेत्याला पकडतो. विक्रेता आपल्या उत्पादन प्रमुखाला पकडतो. उत्पादन विभागाचा वा विकसन प्रमुख आपल्या अधिकाऱ्यांना धरतो. तो अधिकारी निर्मितीचे सामान पुरविणाऱ्या क्रय विभागाच्या अधिकाऱ्याला वा आपल्या चमूत नको ती माणसे टाकणाऱ्या मवि विभागाला पकडतो. अशी ही आंधळी कोशिंबीर मस्त रंगते. ग्राहक हा नावाला राजा असला तरी राज्य त्याचे कधीच नसते, ते इतर सर्व जण उपभोगात असतात आणि दुसऱ्यावर देत असतात.

किंमत जंमत घसरगुंडी - व्यवस्थापन आपल्याला एखादा अतिरिक्त कार्यभार देणार असे ध्यानात येताच आपण फारच कार्यग्रस्त असल्याचा आव आणावा लागतो. मग एखादी संधी अचूक पकडून व्यवस्थापकीय संचालक, संचालक वा किमानपक्षी वित्त विभाग अध्यक्ष यांना गाठून गंभीर चेहऱ्याने सांगावे की आस्थापनेचा नफा कसा वाढेल याचा आपण विचार करतोय. वा! असे काही ऐकताच हे लोक तुमच्याकडे मोठ्या आदराने बघू लागतात. मग आपणही गंभीरपणे सांगायचे की अमुक उत्पादनाची किंमत अमुक टक्के घटवली तर खप तमुक टक्के वाढेल आणि जुना खप * जुने टक्के विरुद्ध नवा खप * नवे टक्के नफा यात नव्या नफ्याची रक्कम अधिक आहे. शिकारी कुत्र्यासारखे कान टवकारलेले हे लोक ताबडतोब चारचौघांना गोळा करतात आणि मग नवा खेळ सुरू होतो – 'किंमत जंमत घसरगुंडी'. आपापल्या संगणकावर एक्सेलच्या चौकड्या आखायच्या आणि आकड्यांची मारामारी करायची! गुणाकार, भागाकार, बेरीज, वजाबाकी, गुणोत्तर वगैरे भरपूर हाणून झाले की त्या चौकड्या एकमेकांवर भिरकावायच्या. एकाने उत्पादन खर्च कमी केलेला दाखवला तर दुसऱ्याने दर्जाची काळजी व्यक्त करायची आणि 'ग्राहक दुरावेल, नाव खराब होईल' अशी भीती व्यक्त करीत ते हाणून पाडायचं. तिसऱ्यानं नवा मुद्दा मांडायचा, म्हणजे झकासपैकी एक वक्ररेषालेख काढायचा, ज्याचा आकार घसरगुंडीसारखा असतो. वजन येण्यासाठी त्याला 'किंमत विक्रीमान कमान" यानेके पीवीसी उर्फ प्राइस व्हॉल्यूम कर्व असे भरभक्कम नाव द्यायचे, मग त्या घसरगुंडीवर अमुक किमतीला इतकी विक्री - इतका नफा, तर तमक्या किमतीला तमुक विक्री - तमुक नफा, असा धोशा लावायचा. शक्यतो कुणी निष्कर्षाप्रत येत नाहीच; पण आलेच तर इतरांनी त्याला परावृत्त करायचं. खेळ तुफान रंगतो. बराच वेळ खेळून अखेर भुका लागल्या की हा खेळ आपोआप थांबतो आणि खेळाडू जेवायला जातात.

दगड का माती? - हा खेळही मोठा गमतीचा असतो. हा खेळ खेळण्यासाठी लागणारे दोन गट सर्व कचेऱ्यांत असतातच; जास्तच, पण कमी नाहीत. हा खेळ खेळण्यासाठी खेळाडू तरबेज असावे लागतात. तर खेळ असा की आधी एक गट पकडायचा, एखाद्या अधिकाऱ्याच्या केबिनीत अलगद शिरून, कुणी पाहिले नाही ना

याची खातरजमा करत चक्क तळ ठोकायचा. त्या अधिकाऱ्याची स्तुती करायची. त्याचे प्रकल्प किती जोरदार, त्याचे विचार कसे दूरवर जाणारे, तो कसा वाकबगार यावर भाषण ठोकायचे, त्याने मागविलेला चहा प्यायचा आणि बाहेर कुणी पाहत नाही याची खात्री करून 'आलोच हां जरा' असे म्हणत सटकायचे आणि नेमके हेच सगळे दुसऱ्या गटातल्या अधिकाऱ्याकडे जाऊन करायचे. 'मालदारी तिथे कर्मचारी' या उक्तीनुसार ज्याची कमान चढती, त्याची बाजू पटकन मिळवायची असते. समजा तो दगड असला तर 'माती'ची हवा वाहू लागताच पटकन तिथून पळ काढून शिताफीने मातीवाल्याला गाठायचे असते. 'दगड' की 'माती' यापैकी काय उच्चारले जाणार हे ज्याला आगाऊ समजले तो शहाणा. मात्र या खेळासाठी हुशारीची आणि सरावाची गरज असते. जर दगडावरून मातीवर किंवा मातीवरून दगडावर जाताना पकडला गेला तर खेळाडू बाद, अंहं, नुसता बाद नव्हे, कदाचित बरबाद. अनेकदा या खेळात मुरलेले खेळाडू बघता बघता दगडाची माती करून टाकतात.

मीटिंग मीटिंग - देवळात गेले असता भक्तांची वर्दळ दिसते, रेल्वेच्या फलाटावर गेले असता प्रवाशांची आणि हमालांची लगबग दिसते, विमानतळावर गेले असता चेहरे गंभीर केलेले प्रवासी, परिटघडीचे कर्मचारी वावरताना दिसतात, तसे कुठल्याही बड्या, नामांकित आस्थपनेच्या मुख्यालयात गेले असता गाडीच्या डब्यात गळ्यात तकट बांधून कानातली, गळ्यातली विकणाऱ्या फेरीवाल्यांगत आपल्या दोन्ही हातात उघड्या झाकणाचे घडीचे संगणक घेऊन सुटाबुटातले कर्मचारी-कर्मचारिणी लगबगीने इकडून तिकडे जाताना दिसतात. ते कुठे जात असावेत? ते जात असतात मीटिंग मीटिंग खेळायला! बालपणी डॉक्टर डॉक्टर वा शाळा शाळा खेळतात, तसे कॉर्पोरेट विश्वातले कर्मचारी नित्यनियमाने मीटिंग मीटिंग खेळतात. भातुकलीच्या खेळाप्रमाणे या खेळाचीही खेळणी असतात. एखादी रिकामी खोली, एका भिंतीवर पांढरा फळा, रंगीत शाईचे बोरू, फळापुशे, धारण्या (मराठीत फाइल म्हणतात), कागदपत्रांची चळत, पाण्याचे पेले, चहा कॉफीचे पेले, विजेच्या / जालाच्या वाहिन्यांचे जाळे, बहुसमावेशक बोलका दूरध्वनी संच वगैरे. अशा प्रकारे अनेकानेक खोल्यांमधून अनेक चमू बघावे तेव्हा मीटिंग मीटिंग खेळताना दिसतात. हा अगदी मूलभूत आणि कुठल्याही विभागाच्या कुठल्याही पदाच्या कर्मचाऱ्यांना आवडणारा आणि सहज खेळता येणारा लोकप्रिय खेळ. कुठे गंभीर चेहऱ्यांनी तर कुठे तावातावाने, कुठे हसत खेळत तर कुठे हमरीतुमरीवर येत हा खेळ रंगलेला दिसतो. लहानपणी खेळ खेळताना बाद होणार वा आपल्यावर राज्य येणार हे लक्षात येताच मुले मनगटाला जिभेने चाटत झाप्य म्हणत सटकायची, तद्वत या खेळातले खेळाडू हातातला हस्तसंच उंचावीत आलोच असे म्हणत पळ काढतात व बाहेर जाऊन चार झुरके मारून संभाषण आताच संपवून आल्याच्या थाटात हस्तसंचाची कळ दाबत पुन:प्रवेश करते होतात. खेळ अधिक लांबल्यास (तो सहसा लांबतोच) फराळही मागवला जातो. सामान्य खेळाडू आपले आताच सांगितल्याप्रमाणे आपापसात खेळतात तर मुरब्बी व वरिष्ठ खेळाडू हा खेळ अधिक व्यापक व भव्य प्रमाणावर खेळतात (आमची मीटिंग देवीची कहाणी वाचा)

या खेळाचे वैशिष्ट्य असे की या खेळातून अनेकदा दुसरा एक खेळ आपोआप चालू होतो. 'शिवाजी म्हणतो' चा खेळ! अर्थातच शिवाजीच्या भूमिकेत असतो 'साहेब'. शिवाजी म्हणतो करा - केले. शिवाजी म्हणतो बंद करा - बंद केले. शिवाजी म्हणतो बरोबर - सगळे म्हणतात बरोबर. शिवाजी म्हणतो चूक - सगळे म्हणतात चूक. अचानक कुठूनतरी आवाज येतो 'हे असे नाही, ते तसे आहे' - बेसावध खेळाडू फसतो

आणि म्हणतो 'बरोबर, ते तसे आहे'. खल्लास! खेळाडू बाद आणि तो आवाज करणारा बरबाद. खरे-खोटे, बरोबर-चूक हे सगळे गैरलागू असते. अरे वा रे वा! स्वतः:ला काय शिवाजी समजतो? हा खेळ कधी कधी घरात सासू-सून वा नवरा-बायको यांच्यातही रंगतो. पण नियम तोच. शिवाजी म्हणतो तो हुकूम, अन्य बोलतो ते वायफळ. भावी नेतृत्व इथेच तयार होत असते.'मोठठं' होण्यासाठी 'काय' लागतं तेही मुले खेळता खेळता शिकतात. खेळापरी खेळ आणि अभ्यासापरी अभ्यास.

अत्यंत महत्त्वाचा, राजाश्रय लाभलेला आणि अनन्यसाधारण असा आणखी एक खेळ आहे आणि तो म्हणजे शाळा शाळा यानेके ट्रेनिंग ट्रेनिंग. जे गुण कर्मचाऱ्याच्या अंगी असावेत असे अध्याहृत धरून भरती केलेल्या कर्मचाऱ्याला ज्ञानार्जनाची गरज आहे हे लक्षात आल्यावर, तसेच आपण आदर्श व कल्याणकारी तसेच कर्मचारी प्रोत्साहक अशी आस्थापना आहोत हे सिद्ध करण्यासाठी प्रशिक्षणाचा खेळ खेळला जातो. मविवाले आपल्या खात्यात खास एक प्रशिक्षण अधिकारी भरती करतात. (कर्मचारी त्याला रिंगमास्टर म्हणतात). आपल्या विकासासाठी कर्मचारी आणि कर्तव्यादाखल आणि लोक सुधारतील, या आशेवर खेळ केले जातात आणि अनेक विषयांसाठी अनेक विभागांसाठी अनेक कौशल्यांसाठी हा खेळ रचला जातो आणि समस्त साहेब लोकांना नामांकनाची फर्माने जातात. साहजिकच साहेबांच्या लाडक्या बाळांची वर्णी लागते. 'अमुक हा कर्मचारी अत्यंत हुशार व मेहनती असून मला त्यात भावी नेतृत्व दिसते' असे शेरे मिरवत नामांकन जाते. लवकरच खेळाडूंची यादी फिरते आणि मग त्या खेळाडूंचा परस्पर संवाद सुरू होतो. बहुतेक करून दिवसा कष्ट केल्यावर रात्री श्रमपरिहार कसा करावा, 'सोय' कोण करणार, कार्यस्थळ कसे आहे, यावरच संवाद होतात. एकदा आमच्याकडे मोठीच गंमत झाली. नव्याने भरती झालेल्या आणि कर्मचाऱ्यांशी सुसंवाद करू पाहणाऱ्या प्रशिक्षण अधिकाऱ्याने 'होऊ घातलेल्या कार्यक्रमासाठी' सूचना मागविल्या. पहिलीच सूचना जोरदार आली - 'काळ्या फिती ३ नग, म्हातारा एक नग, रशियाजल एक नग आणि खंड्या पक्षी दोन खोकी'. त्याच्या जिवाचा संताप झाला! खेळाडू कसले पोहोचलेले हो, त्याने जाब विचारताच उत्तर दिले, ' आम्ही काय प्रवचनाला थोडेच येत आहोत?' असो. तर कार्यक्रम ठरला की प्रशिक्षक नेमला जातो. ही प्रशिक्षक मंडळी म्हणजे मोठी वस्ताद! आपण ज्ञानी असल्याचा आव आणणे, मोठे मोठे शब्द व संक्षिप्तरूपे तोंडावर फेकणे, समोरच्याला निरुत्तर करणे - मुळात ज्याचे उत्तर कसेही वळवता येईल असे प्रश्न विचारणे, यात हे लोक वाकबगार असतात. आपण एक-दोन दिवसात कुणाला ज्ञानामृत पाजून शहाणे करू शकत नाही वा बिघडवूही शकत नाही, हे त्यांना पक्के ठाऊक असते. आलेल्या प्रशिक्षणार्थींना ते त्याहूनही माहीत असते. मुळात हा खेळ म्हणजे आनंद सोहळा असतो. प्रशिक्षक आणि प्रशिक्षणार्थी दोघेही एकमेकांना सांभाळून घेतात. प्रशिक्षण संपल्यावर एक कागद फिरवला जातो. कीर्तन झाल्यावर थाळी फिरवतात तसा. या कागदावर काही जुजबी माहिती आणि अभिप्राय विचारला जातो. हे बिलंदर प्रशिक्षक नेहमी स्वतः:च्या सोयीचे प्रश्न विचारतात. उदाहरणार्थ, ' शिकविणारा कसा वाटला?' आता उत्तर 'बरा' येणार हे पक्के माहीत असते. 'दिलेले वाचनसाहित्य कसे वाटले? आता परस्पर जालावरून वा कुठल्यातरी पुस्तकावरून उतरविलेले हे साहित्य असल्याने आणि ते कुणीही फारसे गांभीर्याने वाचलेले असल्याची शक्यता नसल्याने याचेही उत्तर सकारात्मकच येते. पुढचा प्रश्न 'हा कार्यक्रम उपयुक्त आहे असे तुम्हाला वाटते का?' इथेच तर ग्यानबाची मेख असते. आस्थापनेच्या खर्चाने कचेरीबाहेर फिरायला मिळते, दोन दिवस आराम असतो, रोजची कामे करावी लागत नाहीत, शिवाय 'फुकट 'पाहुणचार' होतो, तेव्हा समस्त लोक या प्रश्नाचे उत्तर

नुसते सकारात्मक देऊन थांबत नाहीत, तर 'असा कार्यक्रम दर सहा वा तीन महिन्यांनी झाला पाहिजे' असेही सुचवितात. प्रश्न विचारताना तुम्ही काय शिकलात? वा तुम्ही यापुढे स्वतः:ला कसे सुधाराल वा विकसित कराल याचा परामर्ष न घेता ढोबळ प्रश्न विचारलेले असतात. पुढे जेव्हा व्यवस्थापनाला या कार्यक्रमाचा अहवाल दिला जातो, तो अहवाल म्हणजे मुत्सद्दीपणाचा उत्कृष्ट नमुना असतो. 'तुमचे कर्मचारी ढ आणि उनाड आहेत' असे लिहिले तर आफत ओढवेल आणि 'तुमचे कर्मचारी गुणी वा ज्ञानी आहेत' असे लिहावे तर 'मग प्रशिक्षकाची गरज काय?' असा प्रश्न व्यवस्थापनास पडेल व पुन्हा धंद्यावर गदा येईल. मग इराणच्या शहाने बादशहाला दिलेला पोपट मेला आहे हे बिरबलाने अकबराला सांगितले, तसे चातुर्याने घोळव घोळव घोळवलेला आणि 'तयारी चांगली आहे, लोक सकारात्मक आहेत, तेव्हा जर आमचे कार्यक्रम सातत्याने चालू ठेवले तर व्यवस्थापनास त्याचा नक्कीच फायदा होईल' असा अहवाल सादर केला जातो.

कामाच्या गावाला जाऊ या! - वरच्याच प्रकारात मोडणारा, पण जरा वेगळा असा हा खेळ. यामध्ये कर्मचाऱ्यांना कारखाना, प्रयोगशाळा, संशोधन केंद्र, पुरवठादार, व्यापार सहयोगी, इत्यादींच्या कार्यस्थळाला भेट देण्यासाठी पाठविले जाते. हीसुद्धा एक मस्त सहल असते. लोकदेखील उत्साहाने अशा भेट दौऱ्यांची हिरिरीने मागणी करतात. 'प्रत्यक्ष पाहणे खरे, नुसते ऐकून, वाचून वा बोधपट पाहून समजत नाही, शिवाय प्रत्यक्ष भेटीने ज्ञान वाढते, आत्मविश्वास येतो, परस्परसंबंध दृढ होतात, अशा अनेक कारणास्तव हे कार्यक्रम फर्मावले जातात आणि आयोजितही केले जातात. कारखान्यात गेल्यावर प्रत्यक्ष कामकाज अभ्यासणे फारसे गरजेचे नसते. 'एकदा डोळ्याखालून घातले म्हणजे बरे, अधिक खोलात जाऊन आपल्याला कारखाना थोडाच काढायचा आहे? असे मौलिक विचार प्रकट केले जातात. आता प्रत्येक कारखाना, प्रयोगशाळा, संशोधन प्रकल्प यात कुठे ना कुठे काहीतरी अधिक-उणे असतेच. आलेल्या मंडळींनी नावे ठेवू नयेत यासाठी पाहुण्यांची सरबराई केली जाते, काही बिलंदर कारखाना व्यवस्थापक आलेल्यांच्या हस्ते वृक्षारोपणही करतात. भाग्यवान मंडळींना याच कारणास्तव प्रदेश दौरेही घडतात. मात्र याचा लाभार्थी होण्यासाठी साहेबाचे आणि आपले संबंध सौहार्दाचे असणे अगत्याचे असते.

आता पटली ना खात्री? इतके खेळ खेळले जात असताना बालपणच्या खेळांची काय महती? आणि हो, नुसते खेळच नव्हे, तर क्रीडास्पर्धाही भरतात 'कॉर्पोरेट विश्वात'. जरा आठवा, विचार करा अशा स्पर्धा तुमच्या आस्थापनेतही नक्की होत असणार. काही स्पर्धा मी सांगतो, म्हणजे तुम्हालाही आठवतील.

तीन पायांची शर्यत - दोन कर्मचारी, दोन विभाग प्रमुख, दोन विभाग अशांची आवळ्याभोपळ्याची मोट बांधून त्यांना एखादा प्रकल्प एकत्रितरीत्या पुरा करायला जातो. या स्पर्धा बारमाही असतात आणि 'हॅं हॅं हॅं बघा कसे एकत्र फरफटताना तडमडत आहेत' असे बोलताना वाक्य पुरे व्हायच्या आधी आपली तंगडी कुणाच्यातरी तंगडीला बांधली गेल्याचे कर्मचाऱ्याला समजते.

'बाप शोधा स्पर्धा' म्हणजेच फाइंड अ फादर कॉंटेस्ट - एके दिवशी व्यवस्थापनाच्या अचानक लक्षात येते की कुणीतरी उपद्व्याप करून ठेवला आहे. एखादा प्रकल्प हाकाटला तर गेलाय, पण आता ती ब्याद ठरल्ये! कुणी केला हा उद्योग? कोणाला जबाबदार धरावे? याची सुरुवात कुठे व शेवट कुठे? आतापर्यंत किती पैसा वाया गेला? हे व असे अनेक प्रश्न उपस्थित होतात. मग बऱ्याच वेळाने लक्षात येते की आता फार उशीर झालाय. पाय तर अडकलाय, मग काय करायचे? मग 'बाप शोधा स्पर्धा' सुरू होते. करा रे हाकारे

पिटा रे डांगोरा, या नगरात कुणी लायक व्यक्ती आहे का? मग कर्मचारी साळसूदपणे दुसऱ्याचे नाव सुचवितात. नसते झेंगट आपल्या कामाव्यतिरिक्त कोण ओढवून घेणार? मग पदोन्नतीला आसुसलेला, उत्साही आणि अर्थातच नवशिका बकरा सापडतो आणि त्याच्या डोक्यावर मुकुट चढवला जातो.

तर मंडळी, हे खेळ तुम्हीही खेळता का? उगाच 'ताण व्यवस्थापनाच्या' शिबिराला जाण्यापेक्षा हसा, खेळा, आनंदी व्हा आणि निरोगी राहा, या माझ्यातर्फे तुम्हा सर्व वाचकांना हार्दिक शुभेच्छा.

# एक न रुळलेली वाट....
## स्नेहांकिता

टीपः या कथेतील सर्व व्यक्तिरेखा व प्रसंग काल्पनिक आहेत. कुणा हयात वा मृत व्यक्तीशी साधर्म्य आढळल्यास तो केवळ योगायोग समजावा.'

अंगाशी चोपून बसलेली अद्ययावत जरीवर्कची अस्सल म्हैसूर सिल्क साडी, गळ्याशी चपखल बसणारा राजस्थानी पद्धतीचा हिऱ्याचा कंठा अन त्याखाली रुळणारा अस्सल मोत्याचा, मध्ये मध्ये हिरेजडित पेट्या असलेला दोनपदरी सर. एका हातात आधुनिक पद्धतीची हिऱ्याचीच दोन ब्रेसलेट्स अन् दुसऱ्या हातात दुबईहून खरीदलेले, सोन्याचा बेल्ट असलेले हिरेजडित नाजूकसे घड्याळ. शिवाय, कानभर विखुरलेली छोटी छोटी नाजूक कर्णभूषणे अन् गोऱ्या रेखीव चेहऱ्यावर मेकअपचा हलकासा मुलामा. सकाळपासून हा सगळा साज सांभाळत मंगल कार्यालयात मिरवताना मैथिलीच्या शेलाट्या बांधेसूद तनूला भलताच शीण झाला होता. त्यात आणि छोटी सिया सारखी 'मम्मा, चल ना घरी..', 'मम्मा, भूक लागली' म्हणून तिचा पदर ओढत होती. आता अक्षता पडल्या की मागच्या रिकाम्या खुर्चीवर अंमळ टेकायचं, असं मैथिलीनं केव्हाचं ठरवलं होतं. मावसबहिणीच्या लग्नासाठी ती दोन दिवस माहेरी आली होती.

'शुभ मंगल सावधान..'चा गजर झाल्याबरोबर धाडधाड फटाके उडू लागले अन पटकन जेवणाच्या हॉलमध्ये जाऊन तिनं सियाला थोडं खाऊ घातलं अन धाकटी बहीण वृषाली बरोबर तिची घरी पाठवणी केली. 'आता घेऊ या समाचार फारा दिवसांनी भेटणाऱ्या आप्तजनांचा...' असं मनाशी म्हणत तिने मागच्या खुर्चीला पाठ टेकली न टेकली तोच...

'अगं मिठ्ठू, तू केव्हा आलीयेस दिल्लीहून ? कशी आहेस ? अन् सिया कुठाय ?' हा सवाल कानावर आला अन् त्याबरोबरच एक हलकीशी थाप पाठीवर पडली. तिने वळून बघितले अन् नको त्या व्यक्तीला समोर पाहून तिला एकदम अवघडल्यासारखं झालं. उत्साहानं नवीन कपड्याची घडी मोडावी अन् नेमका समोरच वंगणाचा डाग निघावा, तसं काहीसं. तिच्या पातळ रेखीव जिवणीला अस्पष्टशी मुरड पडली...

...नीलम'काकू' हसऱ्या प्रसन्न मुद्रेने अंगावरच्या गढवाल सिल्क साडीचा पदर डोक्यावरून ओढत समोर ठाकली होती. तिच्या चेहऱ्यावर मेकअपचा वाजवीपेक्षा जास्तच ठळक थर दिसत होता. लग्न झाल्यापासून गेल्या सहा वर्षानंतर मैथिलीनं तिला आजच प्रथम पाहिलं होतं. समीर - मैथिलीचा नवरा - जॉबसाठी दिल्लीला राहत असल्यामुळे तिचं माहेरी जाणंयेणं तसं कमीच होतं.

उसन्या आनंदाचा आव आणणे मैथिलीला जरा कठीणच गेलं.

"बरी आहे. परवा आले अन् उद्या संध्याकाळी जाणार परत. सिया वृषालीबरोबर घरी गेली आत्ताच. 'काकू ' असा तिचा स्पष्ट उल्लेख करणे टाळून मैथिली म्हणाली.

उद्या संध्याकाळी जाणार ना? मग सकाळी नाष्ट्याला ये ना घरी. डोक्यावरचा पदर सावरत नीलम अगत्यानं बोलली.

नाही हो, खूप जणांकडे जायचं आहे... मैथिलीने माफक हसून टाळले.

इतक्यात अम्याकाका कुठूनसा ढांगा टाकीत आला.

वा वा, इतक्या दिवसांनी आली आहेस गावात अन् अशीच निघालीस? ते काही नाही. तुझा बाप अन् तो मोरूकाका, या दोघांनाच उचलून आणतो. मग कशी येत नाहीस ते बघू! अम्याकाकाच्या धबधब्यासारख्या आग्रहापुढे मात्र मैथिलीचं काही चालेना.

बरं बाई, बघू या.. म्हणाली, पण अखेर ती कबूल झाली. येईन उद्या.. इतक्यात चुलत, मावस, मामे बहिणींच्या गराड्याने तिला वेढले अन् यावर विचार करायलासुद्धा तिला दिवसभर फुरसत झाली नाही.

रात्रीची जेवणे आटोपल्यावर तिने सियाला झोपवले अन् खूप दिवसांनी निवांत भेटणाऱ्या माहेरच्या माणसांच्या गप्पागोष्टींमध्ये ती गुंगून गेली. खूप उशिरानं, बेडवर आडवे होण्यापूर्वी मात्र तिला आईपाशी अम्याकाकाचा विषय काढल्याशिवाय राहवले नाही.

अगं आई, अम्याकाका आता 'ति'ला घेऊन राजरोस फंक्शनला सुद्धा जातो वाटतं?

चादरी काढता काढता आई क्षणभर थबकली अन् मग सुस्कारा सोडून म्हणाली, सवय होते गं सगळ्याची लोकांना. अन् तीसुद्धा इतकी वर्षे राहिलीये ना त्याच्यापाशी. तो जाईल तरच ही कुठे जाणार, नाहीतर नाही. एकटी कधीच कुणाकडं जात नाही ती. ...चार दिवस गळ्यात घातलं की लोढण्यालासुद्धा घालणाऱ्याचा शिक्का बसतो. ही तर दहा वर्षं झाली राहिलीय त्याच्याजवळ... अन् तिचा तो नवरा?' मैथिलीनं जरासं अडखळत विचारलं.

तो कुठं जाईल बिचारा? असतो तिच्यापाशीच!

जवळपास पन्नासाव्या तरी वेळी या अजब नात्याचं तिला पुन्हा मनाशी नवल वाटलं. बाळबोध संस्कारात वाढलेल्या तिला हे सगळं अतार्किक, अनैतिक, हुच्च असंच वाटत होतं. अम्याकाकासारखा सुसंस्कृत, परिपक्व माणूस असं बेलगाम वागेल, हे काही तिच्या मनाला पटेना. पाठ टेकल्या टेकल्या तिच्या मिटल्या डोळ्यांपुढे, सरातून मोती सरकावे तसा अम्याकाकाचा भूतकाळ संथपणे सरकू लागला.

अम्या उर्फ अमरेंद्रकाका तिच्या मावशीच्या नवऱ्याचा, मयूर ऊर्फ मोरूकाकांचा मित्र. मोठ्या रईस घराण्यातला, दोन बहिणी अन् दोन भावांच्या पाठीवरचं शेंडेफळ. वडिलांचे दहापंधरा उद्योगधंदे मोठे भाऊ सांभाळीत. अम्याकाका अधूनमधून कारखाने अन् ऑफिसात चक्कर टाकी. वडिलांचे मोठमोठ्या कंपन्यांचे शेअर्स होते. घरबसल्या ढिगानं पैसा घरी येत होता.

अम्याकाका दिसायला एखाद्या सिनेनटासारखा देखणा. एकदम हसरा, बोलका, उमदा, अन् दिलदार. वृत्तीने

काहीसा खुशालचेंडू. नेहमी पॉश अप-टू-डेट कपडे. स्वभाव अत्यंत गमत्या. कायम कुणाची तरी फिरकी घेत असे. मोरूकाका त्याचा एक किस्सा नेहमी सांगत असे. एकदा त्यानं नवीन परफ्यूमची बाटली आणली होती. तिचं झाकण काढून वरचं बटन प्रेस केल्यावर परफ्यूमचा फवारा थांबेचना. हा पठ्ठया गल्लीच्या कोपऱ्यावर जाऊन उभा राहिला अन् सुहास्य वदनाने, जाणाऱ्यायेणाऱ्या लोकांवर परफ्यूम संपेपर्यंत फवारा मारीत बसला!

तसेही, अम्याकाका जिथे जाईल तिथे थट्टामस्करी अन् हास्याचे फवारे उठत असत. त्याच्या लोकप्रियतेला थांग नव्हता.

मैथिली शाळा पास करून कॉलेजात गेली तेव्हा अम्याकाका कॉलेज पास करून वधूसंशोधन करू लागला होता. तसा तो मोरूकाकापेक्षा ४-५ वर्षांनी लहान. पण त्याच्या हसमिजाज, चेष्टेखोर स्वभावामुळे सर्व वयातल्या लोकांशी त्याची सारखीच दोस्ती असे. मैथिली अन् तिची भावंडे त्याला 'ए अम्याकाका..'च म्हणत.

जात्याच थोड्याशा लघळ स्वभावामुळे 'जब भी कोई लडकी देखू, मेरा दिल दिवाना बोले, ओले ओले...' अशी अम्याकाकाची सारखी हालत होत असे. काहीसा खर्जातला, अमीन सयानींसारखा त्याचा आर्जवी मृदू आवाज होतकरू युवतींच्या कानातून पाहता पाहता मनात घुसे. त्यात त्याची बोलण्याची मिठ्ठास शैली, देखणे व्यक्तिमत्त्व अन् सुसंस्कृत शिष्टाचार यामुळे तो आजूबाजूच्या अनेकींच्या 'दिलकी धडकन' बनला नसता तरच नवल. तोही फ्लर्ट करण्यात पटाईत होता. मैथिली तर तो भेटला की पहिला प्रश्न करी. क्यूं अमरेन्द्रकुमारजी, कौन है आजकी ताजा हिरोईन?

'स्थळ' म्हणून एकदम वरच्या श्रेणीत असल्यामुळे अम्याकाका चांगली पारखून वधुपरीक्षा घेऊन अन् शोभेशी हिरकणी मिळाल्यावर मगच लग्न करणार, असा सगळ्यांचा अंदाज. पण त्याला बाविसावं वर्ष सरून जेमतेम दोन महिने झाले असतील तोच अम्याकाकाचं लग्न ठरल्याचं मैथिलीच्या कानी आलं. तिला जरा आश्चर्य वाटलं. अन् त्याहून आश्चर्य वाटलं ते त्याच्या भावी वधूला पाहिल्यावर...

अश्विनी, अमरेन्द्रकाकाची भावी वधू, त्याच्या सख्ख्या मामाची मुलगी. कृश म्हणावी इतकी सडपातळ. नाकीडोळी 'बरी'. अम्याकाका एकदम लालसर गोरा, तर ही पिवळट पांढरी. डोळे मात्र अगदी हरिणीसारखे भेदरट. अश्विनी एकदम अबोल अन् लाजाळू होती. तिला अजून अठरा वर्षे पूर्ण व्हायला दोन महिने अवकाश होता. अन् अम्याकाका म्हणे तिच्या प्रेमात पडला होता. मामेबहिणीशी लग्न करायला घरच्यांचा विरोध. पण अम्याच्या हट्टापुढे कुणाचे चालेना. शेंडेफळ म्हणून सर्वांचा लाडका ना!

अश्विनीला अठरा वर्षं पूर्ण झाली त्याच्या तिसऱ्याच दिवशी तिचं अन् अम्याकाकाचं लग्न झालं. अम्याकाकाच्या उत्साहाचा वारू आता बेफाम उधळलेला. प्रत्येक वेळी भेटला की अश्विनीचं नवीन कौतुक त्याच्या शब्दांमधूनच नव्हे, तर उत्साही चेहऱ्यावरूनही पाघळलेल्या आइसक्रीमसारखं टपकत असे. महिन्यातून पाच सहा वेळा तरी मयूरकाका अन् इतर मित्रांची ड्रिंक्स –नॉनव्हेज पार्टी व्हायची. प्रत्येक वेळी अम्याकाका अश्विनीसाठी, खाद्यपदार्थांच्या मागवलेल्या एक एक डिश पार्सल करून नेत असे. कारखान्याच्या वसुलीसाठी दोने महिन्यातून एकदा देशात सगळीकडे फिरती असे. तेव्हा अम्याकाका प्रत्येक

वेळी अश्विनीलाही घेऊन जात असे. त्याच्या या काहीशा अपरिपक्व नवथरपणाची नातेवाईक अन् मित्रपरिवारात थोडीशी टिंगलसुद्धा व्हायची. पण अमरेन्द्रकाका एका वेगळ्याच विश्वात गुंग होता.

यथावकाश अश्विनी अन् अम्याकाकाला मुलगी झाली. मैथिली आईबरोबर बारशाला गेली होती. बारशाचा थाट डोळे दिपण्यासारखाच होता. अम्याकाकाच्या आनंदाचं अन् उत्साहाचं माप आता पुरेपूर भरलेलं. पण अश्विनीची मुद्रा अंमळ फिकुटल्यासारखी वाटली मैथिलीला. ओटी घालता घालता तिची आईसुद्धा म्हणाली अम्याकाकाच्या आईला, बाळंतीण बाईला जरा बाळसं येऊ दे हो आता... बघता बघता सई २ वर्षाची झाली. अश्विनीच्या प्रकृतीची मात्र वरचेवर तक्रारच सुरू होती. पुष्कळदा अम्याकाकाच सईचं सगळं करायचा. डॉक्टर, वैद्य झाले, तपासण्या, औषधे झाली, अंगारे-धुपारे झाले. दोष नखातही नाही, तरी ही मात्र दिवसेंदिवस खंगत चालली. अम्यासारखा प्रेमळ नवरा, मोठं घराणं, कुणाचा जाच नाही, कामाचा त्रास नाही, तरी हिची तब्येत अशी का? याचं सर्वांना आश्चर्य वाटत असे.

सई अडीच वर्षाची झाली अन् एक दिवस बातमी आली. अम्याकाका पुन्हा एकदा बाबा होणार आहे. झालं. अश्विनीला अगदी फुलात ठेवायचंच काय ते बाकी होतं. डॉक्टरांची सकाळ संध्याकाळ घरी चक्कर सुरू झाली. अश्विनीच्या उशा-पायथ्याला औषधं, टॉनिक्स अन् फळं यांची रेलचेल झाली. सगळं घरदार तिच्या तैनातीत. अम्याकाका तर एक क्षण तिला एकटी सोडेना. पण तिच्या मुखावर मनापासून हसू उमटलेलं काही कधी कुणी पाहिलं नाही. सदा काहीतरी तक्रार.

घरात आई अन् मावशी कुजबुजताना नंतर एकदा मैथिलीच्या कानावर आलं. अम्याकाकानं तिला खाजगीत विचारलंसुद्धा होतं म्हणे, बाळंतपण झेपणार नसेल तर एम.टी.पी. करायचं का म्हणून. पण तिनं नकार दिला.

असेच दोनेक महिने गेले अन् एक दिवस ती धक्कादायक बातमी आली.

अश्विनीनं गळफास लावून घेऊन आत्महत्या केली!

बेडरूममधल्या पंख्याला साडीचा फास अडकवला अन् स्वत:चा गळा आवळून घेतला. जाताना चिठ्ठी लिहून ठेवली होती. प्रकृतीला कंटाळून मी आत्महत्या करीत आहे. कुणाला दोष देऊ नये. माझ्या नशिबाची मी बळी ठरले.

*********

अम्याकाकावर दुर्दैवाचा आघात झाला. एका रात्रीत त्याचे कानशिलावरचे केस पिकले. चेहेऱ्याचा नूर पार उतरला. प्रसन्नतेची जागा अकाली प्रौढत्वाने घेतली. डोळ्यात खोल उदास वेदना पसरून राहिलेली. अखंड वाहणाऱ्या वाक्-गंगेचा ओघ रोडावला. मित्रपरिवारात उठबस होती. पण बोलणे जवळजवळ शून्य. फक्त सईशी बोलताना त्याचा उदासपणा किंचित दूर होई. शक्य तितका वेळ तो तिच्या संगतीत काढी.

तिच्यामध्ये तो जणू अश्विनीचे दुसरे रूप पाहण्याचा प्रयत्न करी.

असंच एक वर्ष गेलं. अमरेन्द्राच्या घरी त्याच्यासाठी दुसरी सोयरीक करायचं घाटू लागलं. अमरेन्द्राला याची कुणकुण लागली. त्यानं एक दिवशी सगळ्यांना हॉलमध्ये जमवलं अन् स्वच्छ सांगून टाकलं. अश्विनीची जागा भरण्यासाठी मला मुलाखती घ्यायच्या नाहीत. तुम्हाला घ्यायच्या असतील तर खुशाल घ्या. नंतर आणखी एका आयुष्याचा खेळखंडोबा केला म्हणून मला दोष द्यायचा नाही, ...कदाचित मी करेनही पुन्हा लग्न. सईची काळजी मलाही आहे. आणि मीही काही संपूर्ण स्वयंसिद्ध नाही, याची मला जाणीव आहे. पण आता सध्या काही नको. वेळ आल्यावर मीच सांगीन.

आता अम्याकाका पार बदलून गेलेला दिसत होता. गेला होता तो गमत्या, पाघळू अन् रंगेल मिजाज..... ती फुलपाखरी भ्रमर-वृत्ती.. ! त्याची जागा आता एका दृढ, खंबीर, निश्चयी प्रेमळ पित्याने घेतली होती. जणू आता सई हे त्याचे एकमेव ध्येय होते.

याच दरम्यान एकदा कधीतरी मैथिली मावशीकडे गेली असताना अम्याकाका मोरूकाकांकडे काही कामानिमित्त आला होता. अजून तिशी ओलांडली नव्हती त्याने. वरवर पाहिले तर लक्षात आले नसते. पण बारीक नजरेने पाहिल्यावर त्याच्या डोळ्याखाली उमटलेल्या काळ्या रेषा, नजरेतला हरवलेपणा, हालचालीतील पराभूतता या गोष्टी निकटच्या माणसांच्या काळजाला भिडत. एखादं सूर्यफुल पूर्ण उमलावं अन् त्याच क्षणी त्याला बर्फात गोठवावं, तसं काहीसं त्याच्याकडे पाहून मैथिलीला वाटलं. खूप प्रेम होतं गं त्याचं अश्विनीवर ! पुरुषाची जात कठोर खरी. पण तिच्या बाबतीत याचे काळीज लोण्याहून मऊ. बारीकसारीक गोष्टीतही तिची कटाक्षाने सोय, व्यवस्था पाहणार. जातच निराळी त्याच्या मायेची. अजून तिशीसुद्धा गाठली नाही बिचाऱ्याने. उभं आयुष्य कसं काढणार हा? तो गेल्यावर मावशी सहज बोलून गेली.

त्या हळव्या वयात, त्या क्षणी मैथिलीला डोळ्यांपुढे प्रेमाचा एक भव्यदिव्य आविष्कार साकार झाल्यासारखं वाटलं. कॉलेजच्या ट्रीपला गेली असताना चांदण्या रात्री ताजमहाल पाहिला होता, तेव्हा तिला असंच काहीसं वाटलं होतं.

य घटनेला एखाद दोन वर्षे गेली असतील. सई आता शाळेत जाऊ लागली होती. त्यानंतर सईला शाळेत सोडायला जाताना किंवा येताना मैथिलीला एक-दोनदा अम्याकाका भेटला होता. कॉलेजच्या अखेरच्या वर्षात, महत्त्वाच्या टप्प्यात असल्यानं अन् नवनवीन मित्रमैत्रिणींच्या भावविश्वात गुंग झाल्यामुळं यानंतर तिचं अम्याकाकाच्या घरी जाणं येणं कमी झालं.

मध्येच एक दिवशी कॉलेजमधून येताना अम्याकाका स्कूटरवर दिसला. मागे एक बाई. त्याच्याच वयाची, गोरी, नाक डोळे बेतास बात. लक्षात राहिली, ती गडद मेक-अपमुळे. नीट पाहीपर्यंत स्कूटर भुर्रकन गेलीसुद्धा.

...असेल कोणीतरी, मैथिलीनं जास्त लक्ष दिलं नाही. फार कुतूहल वाटायचं तिचं वयही नव्हतं. मग पुढच्या काही दिवसात ती जोडी वरचेवर दिसायला लागली स्कूटरवर.

अन् त्यापाठोपाठ वाऱ्यावरच्या वावड्याही कानावर येऊ लागल्या. ती - नीलम अन् अम्याकाका दिवसाचे बरेचसे तास एकमेकासोबातच घालवतात. परवा कुणीतरी त्यांना पन्हाळ्यावर बघितले. त्यानंतर दोन दिवसांपूर्वी अंबाबाईच्या देवळात....!

मग एकदा तिने आईला स्पष्टच विचारले, आई, अम्याकाकाचं लग्न ठरलंय का?

वयात आलेल्या तरुण मुलीच्या प्रश्नाने आईला अडचणीत टाकले.

“तुला कशाला पाहिजे त्याच्या लग्नाची पंचाईत ? आता मे महिना गेला की तुझ्याच लग्नाची वाटाघाट चालू होईल, ते बघ...आई उगाचच डाफरली.

मग तिने मावशीच्या घराकडे मोर्चा वळवला. मावशी सर्वात धाकटी त्यामुळे मैथिलीच्या अन् मावशीच्या वयात सहासात वर्षांचाच फरक. म्हणून तिची मावशीशी कायम गट्टी असे. मावशीकडून सगळं काही तिला तपशीलवार समजलं.

नीलम सईच्या शाळेत शिक्षिका होती. विवाहित. तिलाही एकच मुलगी. ऋचा सईच्याच वर्गात होती. सईच्या पेरेंट-टीचर मीटिंगच्या माध्यमातून नीलमची अन् अम्याकाकाची ओळख झालेली. कशी वाढली, कुणालाच माहीत नाही. पण सहाच महिन्यात दोघांना एकमेकांशिवाय राहवेनासं झालं. नीलमचा मूळ गाव दूर कर्नाटकात. इथे कुणी सोयरेधायरे नाहीत. अम्याकाकाच्या घरी मात्र गहजब झाला. चर्चा, समजावणी झाली, धमक्या झाल्या. अम्याकाका बधला नाही. अखेर मित्र या नात्याने मोरूकाकांवर मध्यस्थीची जबाबदारी आली.

मोरूकाकांनी अम्याला बोलावून घेतले.

अरे अम्या, कोण ही नीलम?

अश्विनीनंतर तीच मला जवळची वाटली रे, मोऱ्या.

अरे, लग्न का करत नाहीस मग तिच्याशी?

तिचं लग्न झालंय.

मग घटस्फोट घे म्हणावं

ते शक्य नाही रे... काही अडचणी आहेत...

“मग काय विचार आहे तुझा?

काही नाही. आम्ही काही कुणाचा जीव नाही घेणार. ती तिच्या घरी, मी माझ्या घरी.

पण पुढे काय?

सध्या काही ठरवलं नाही. वेळ आल्यावर पाहू..

धन्य आहेस....!

मोरूकाकांची शिष्टाई कृष्णशिष्टाईसारखी वाया गेली.

अम्याकाकाचे घरच्यांशी संबंध पूर्ण बिनसले. तो फॅक्टरीच्या आवारातल्या गेस्ट हाऊसमध्ये जाऊन राहिला, सई दिवसा त्याच्यापाशी, अन् रात्री घरी असे. हे असंच काहीबाही मधूनच मैथिलीच्या कानावर येत राहिलं. आता अम्याकाका लग्नाच्या बायकोसारखे नीलमबरोबर गावात उजळ माथ्यानं वावरू लागला. तिच्या नवऱ्याची काय अवस्था होती काही कळायला मार्ग नव्हता.

एकदा मैथिली मावशीकडे गेली असताना अम्याकाका नीलमला घेऊन तिथे आला. तिचा ठळक मेकअप तेव्हाच मैथिलीच्या प्रथम डोळ्यात भरला. त्याने तोंड भरून हसून नीलमची ओळख करून दिली. मिठ्ठू, ही तुझी नवीन 'काकू' ...म्हणजे...काकूसारखीच आहे. त्याच्या डोळ्यात पूर्वीची चमक काहीशी परत आलेली.

तीही तशीच तोंड भरून हसली. खूप अगत्यानं बोलली.मैथिलीच्या आईची चौकशी केली. जणू वर्षानुवर्षे आईशी तिचा परिचय होता.... मैथिलीनं जपून जेवढ्यास तेवढीच उत्तरं दिली. अम्याकाका गेल्यावर ती मावशीला म्हणाली, जरासुद्धा काही लाज, संकोच नाही की गं तिला ...!

अम्यालाच नाही तर तिला तरी कुठला आलाय? बाकी तशी बरी आहे स्वभावानं अन् बोला-बिलायला. दोन तीनदा आली होती जोडी आमच्याकडं....अम्या घर बांधणारेय नवीन तिच्यासाठी.

अन् तिचा नवरा?

काय की बै काय करतो..! आपण कशाला विषय काढा तो?

मावशीकडून परत येताना तिचं डोकं भ्रमल्यासारखं झालं. मनातल्या ताजमहालाच्या प्रतिमेला कुठेतरी तडे जाऊन तो ढासळू लागला. बाई गं, असं असतं स्त्री-पुरुष प्रेम? यालाच म्हणतात का पुरुषाची जात? अन् तीही कशी महामाया, नवरा घरी अन् अम्याकाका बाहेर? बस बस, मैथिलीला पुढे काही विचार करवेना.

यादरम्यानच मैथिलीचं लग्न ठरलं. समीरला परदेशी जायचं असल्यामुळे पदवी परीक्षेचा निकाल लागण्याआधीच मैथिलीवर अक्षता पडल्या. मग वैवाहिक विश्वात गुरफटून गेलेल्या मैथिलीला या प्रकरणाचा जवळजवळ विसरच पडला.

आज अचानक कपाटातली जुनाट कुपी उघडावी अन् हिन्याचा दर्प नाकात घुसावा तशा या सगळ्या आठवणी भसकन वरती आल्या.

सियाची झोप चाळवल्यामुळे तिला जवळ ओढताना मैथिलीची विचारशृंखला तुटली. थोपटून सियाला पुन्हा झोपवताना तिने ठरवलं. उद्या अम्याकाकाशी स्पष्टच बोलायचं सगळं. समीरच्या श्रीमंती अन् परदेशवारीमुळे तिचा शब्द आता माहेरी कौतुकाचाच नव्हे तर वजनदारही झाला होता. शिवाय लग्न होऊन एका मुलीची आई झाल्यानंतर तिला याबाबत अम्याकाकाला काही विचारण्याइतका मोठेपणा नक्कीच प्राप्त नव्हता का

झाला ?... तिनं मनाशी विचार केला. झोप लागता लागता कधीतरी समीरची आठवण आली तिला. तो काय बरं म्हणेल हे सारे ऐकल्यावर? अन् मग कधी झोप लागली तिला समजलंच नाही.

*********

सकाळी उठल्यावर तिला खूपच उत्साही अन् फ्रेश वाटत होतं. सर्वांशी गप्पा मारत चहा झाला. सियाला उठवून दूध देऊन तिनं अंघोळ उरकली अन् सियाला आईवर सोपवून ती अम्याकाकाकडे जाण्यासाठी तयार झाली. चिकनचा पांढराशुभ्र सलवार-कुर्ता अन् राणी कलरची बांधणीची ओढणी या साध्याच पोशाखात तिचं मूळचं सौंदर्य खुलून दिसत होतं. मेक-अपला फाटा देऊन तिने पावडरचा हात तोंडावर फिरवला आणि पर्स अन् भावाच्या, नंदनच्या अल्टोची किल्ली घेऊन ती बाहेर पडली. सकाळी नऊचा सुमार. रस्ते अजून आळसटलेले. दिल्लीच्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर मैथिलीला हे रस्ते म्हणजे रिकामं मैदानच वाटत होतं. अम्याकाकाच्या फॅक्टरीच्या मागे असलेला त्याचा छोटेखानी नवीन बंगला मैथिलीला सहज सापडला. निघताना तिने फोन केला असल्यामुळे नीलमकाकू अन् अम्याकाका स्वागताला बाहेरच आले होते.

“ये, ये मिठ्ठू, गरीबखान्यात स्वागत..!’अम्याकाका.

गरीबखाना? मग आमच्या दिल्लीच्या फ्लॅटला काय म्हणशील काका? ती हसून म्हणाली.

गाडी पार्क करून ती दोघांबरोबर बंगल्यात शिरली. मोजकंच पण देखणं फर्निचर. सगळीकडे टापटीप. तिला एकदम अम्याकाकाचे जुनं घर आठवलं. माणसं अन् पसारा दोन्ही भरपूर असलेलं अन् कुठंच काही व्यवस्था, मेळ नसलेलं.

बरोबर आणलेला सुक्यामेव्याचा बॉक्स हॉलमधल्या टीपॉयवर ठेवून तिने नीलमने दिलेला पाण्याचा ग्लास घेत बैठक मारली. नीलमच्या चेहेऱ्यावर मेकअपचा थर नसल्याचं पाहून तिला का कुणास ठाऊक, बरं वाटलं

नेहमी प्रमाणे नीलमकाकूने आईची, तिच्या सासू-सासऱ्यांची, घराच्या सर्वांची अगत्यानं चौकशी केली. सियाला आणलं नाही म्हणून माफक रुसवा व्यक्त केला. मग परिचितांची खबरबात झाली. मैथिलीने सई अन् ऋचाची चौकशी केली.

“ऋचा गेली आहे कॉलेजमध्ये अन् सई तिकडच्या घरी. अं, म्हणजे ती तिथेच असते झोपायला अन् दिवसा इकडे येऊन जाऊन असते.

‘तिकडचं घर’ म्हणजे अम्याकाकाचं घर हे मैथिलीच्या लक्षात आलं. अम्याकाकाच्या घरच्यांनी सईला अट्टाहासाने तिकडेच ठेवून घेतलं असल्याचं आईकडून ऐकल्याचं तिला आठवलं.

मैथिली नकळत नीलमच्या हालचाली निरखून पाहू लागली. चाळीशी नुकतीच पार केल्यामुळे काहीसं स्थूल

झालेलं शरीर, आता आता मिळालेल्या सुखवस्तूपणामुळे किंचित सुटलेलं. पण सराईत हालचाली. सहज बोलणं. कुठेही अवघडलेपणा, ओशाळलेपणा नाही. स्थिर नजर. छे, हे चित्र काही एका सैल चारित्र्याच्या स्त्रीचं नक्कीच नाही, मैथिलीला वाटून गेलं.

नीलम नाष्ट्याच्या तयारीला लागली अन् तोपर्यंत अम्याकाकाने फिरून तिला घर दाखवलं. चांगला चार बेडरूमचा बंगला. वरच्या तीन बेडरूम पाहिल्यावर चौथी रूम न दाखवता अम्याकाका थेट गच्चीच्या जिन्याकडे वळला, हे तिच्या नजरेतून सुटलं नाही. गच्चीतली नीलमकाकूची टेरेस गार्डन पाहून अन् तिचं कौतुक ऐकून झाल्यावर खाली येताना अम्याकाका नीलमला मदत करण्यासाठी चार पावलं पुढे गेला, तेव्हा मैथिलीला डोळ्याच्या कोपऱ्यातून दिसलं. चौथ्या रुमच्या दारातून एक उंच, किडकिडीत पुरुष झटकन आत गेला. तेवढ्यातूनही त्याचे सिगारेटमुळे काळे झालेले ओठ अन् छातीच्या काड्या झालेल्या फासळ्या तिच्या नजरेतून सुटल्या नाहीत.

'नीलमचा नवरा...!' तिच्या लगेच लक्षात आलं.

झरझर जिना उतरून ती स्वयंपाकघरात आली.

डोशांचा खमंग वास दरवळत होता. अम्याकाका प्लेटस मांडत होता. नीलमने पटापट डोसे टाकले. दोन तीन प्रकारच्या चटण्या अन् सुरेख कुरकुरीत डोसे ... मैथिलीचा आवडीचा पदार्थ. बरोबर छोटे छोटे राजस्थानी पद्धतीचे पकोडे, चिंचेची चटणी, अन् अम्याकाका नीलमकाकूचा भरघोस आग्रह. नको नको म्हणत, बोलत बोलत तिने पोटभर डोसे अन् पकोडे खाल्ले.

इतक्यात कॉफी संपली असल्याचे नीलमकाकूच्या लक्षात आलं. तिने अम्याकाकाला दुकानातून कॉफी आणायला सांगितलं. आलोच.. म्हणत तो बाहेर पडला.

संधी साधून मैथिलीने विषय काढला.

अम्याकाकाचं बाकी कौतुक वाटतं बाई. किती बारीकसारीक अवधानं ठेवून घर बांधलंय हे! सर्व सोयी छान केल्या आहेत.

हो ना. पहिल्यापासून त्यांचा असाच स्वभाव... सगळ्यांची काळजी घेण्याचा...

'काकू, तुमची काकांशी ओळख कुठे अन् कशी झाली विचारलं तर राग नाही ना येणार? आडवळणापेक्षा सरळसोट मार्ग बरा वाटला मैथिलीला. अन् इतक्या वेळात तिच्या दिलखुलास स्वभावाची ओळख होऊन भीडही चेपली होती.

नीलमकाकू प्रसन्नपणे हसली. अजूनही भरघोस असलेल्या केसांचा शेपटा खांद्यावरून पुढे ओढत ती टेबलाशी बसली.

त्यात राग कसला? उलट स्पष्ट विचारलंस याचा आनंदच झाला. तुला आहे ना वेळ पाचदहा मिनिटं? ऐक मग.

हनुवटी तळव्यावर ठेवून मैथिली नकळत थोडी आरामात रेलली. नीलम सांगू लागली. दहा वर्षं होऊन गेली या गोष्टीला. माझे मिस्टर स्टार फॅब्रिक्समध्ये अकौंटंट होते. पण सहा महिने लांबलेल्या आजारपणामुळे त्यांना मालकाने कामावरून कमी केलं. डॉक्टरांनी टीबीचे निदान केलं अन् माझ्या डोक्यावर आभाळ कोसळलं... होती नव्हती ती पुंजी औषधोपचाराला खर्च झाली. ऋचा फक्त तीन वर्षांची. माहेरची परिस्थिती बेताची. सासरे निवृत्त. त्यांच्यावर आधीच धाकट्या दिराचा भार. त्यांच्यापुढे काय हात पसरायचा? यांची तब्येत औषधांनी तशी तोळामासा का होईना, टिकून राहिलेली. पण छातीचं पार खोकं झालेलं. माणूस काही काम करण्याच्या बेताचा राहिला नव्हता. अखेर मी शाळेत शिक्षिकेची नोकरी घेतली. तुटपुंजा पगार. यांच्या औषधपाण्याचा खर्च जाऊन घरखर्च जेमतेमच भागायचा. कधीकधी तर तोही नाही. परका गाव. उधार-उसनवारी तरी कुणाकडे करायची अन् कशाच्या जिवावर? महिनाअखेरीला तर कधी कधी उपासमारीचीही वेळ यायची. त्यातल्यात्यात सोय म्हणजे ऋचाचं शिक्षण, मी तिच्याच शाळेत शिक्षिका असल्याने, फ्री होते.

यांची तब्येत पुन्हा कधी मूळपदावर येण्याची शाश्वती डॉक्टरही देत नव्हते. त्यांची जगण्यावरची सगळी वासनाच मरून गेलेली. दोन वेळा जेवण मिळालं तरी वा, न मिळालं तरी वा. त्यांना डिप्रेशनमधून बाहेर काढता काढता मीच डिप्रेशनमध्ये जाऊ लागले. माझ्याकडे 'त्या' नजरेने तर त्यांनी पाहून वर्षं लोटली असतील. एक व्रत घेतल्यासारखंच झालं होतं बघ. कुंकवाचा धनी म्हणून का होईना, तो होता. म्हणूनच की काय, समाजातल्या विखारी कीटकांपुढे माझा निभाव लागला. तरीही कोसळणाऱ्या नवनवीन आपत्तींना तोंड देणं, अन् एका अजाण मुलीला अन् तितक्याच जाणीवहीन नवऱ्याला सांभाळणे मला, कुणा एका खंबीर आधाराशिवाय दिवसेंदिवस जड पडू लागले.
अशीच एकदा उपासाने शाळेसमोरच्या रस्त्यावर चक्कर येऊन पडले ती अमरेंद्र यांच्या गाडीसमोरच! सईची शिक्षिका म्हणून ते मला ओळखत होते. त्यांनी उठवून पाणी दिलं. घरी नेऊन सोडलं. अतिशय सभ्य माणूस. एका शब्दाची फालतू चौकशी नाही केली. ना माझ्याबद्दल, ना माझ्या नवऱ्याबद्दल ना परिस्थितीबद्दल. फक्त मूक आधार.. तोही नजरेचा.
मग हळूहळू या माणसाची ओळख होत गेली, सईच्या निमित्ताने. माझी सर्व परिस्थिती समजूनही त्यांच्या नजरेत कधी फरक नाही पडला. त्यांचीही पार्श्वभूमी मला नंतर समजली. वरवरच्या बेफिकीर अन् खुशालचेंडू व्यक्तिमत्त्वात खोल कुठेतरी दडलेलं संवेदनक्षम कोमल मन पाहून मी आश्चर्य करायची. परिस्थितीमुळे मी स्वत:ला असाहाय्य समजायची. पण खरोखर आश्चर्य वाटलं ते आणखी एक गोष्ट लक्षात आल्यावर..... पुरुष जेव्हा एकाकी असतो, तेव्हा त्याची अवस्था स्त्रीपेक्षाही अधिक दयनीय होते. दु:खाच्या एकाकी जळत्या वाटेवरच्या दोन सहप्रवाशांची मनं कधी जुळली, काही कळलंच नाही. नकळत मने एकरूप झाली तरी समाज अन् दोघांची कुटुंबे यांचे भान आम्ही कधीच विसरलो नाही. हुरहुर, कातरपणा, असल्या भावनांना थारा देण्याइतके आम्ही नवथर नव्हतो. तरी, एकमेकांच्या सहवासाच्या दोन घटकांनीसुद्धा दिवस सगळा सुसह्य होऊ लागला. रोजच्या घडीभराच्या संवादातून समस्यांशी झुंजायला बळ मिळायचं. आणि एक दुसऱ्याच्या नुसत्या दूरच्या अस्तित्वानंही दुखऱ्या मनाला एक दिलासा मिळत असे. यापेक्षा वेगळा काही मार्ग दोघाच्याही ध्यानी मनी नव्हता.
अन् मग असं एकत्र राहण्याचा निर्णय कधी घेतला? मैथिली.
नुसत्या मानसिक आधारावर जीवन जगता येत नाही, हे जाणण्याइतके वय अन् समज दोघांनाही होती. त्यातल्या त्यात अमरेंद्र जास्त प्रॅक्टिकल. त्यांनी विवाहाचा प्रस्ताव ठेवला. पण मी घटस्फोट घेतला तर माझ्या नवऱ्याचे हाल कुत्र्यानंही खाल्ले नसते, हे मी ओळखून होते. सासरच्या लोकांना काय आजच जाणत होते? अन् आजवर सोबत केली एकमेकांना नि आता असं अर्ध्या रस्त्यात सोडायचं? छे! अन् सोडलं असतं तर बिचाऱ्याला कुठेतरी सरकारी दवाखान्यात सडण्याशिवाय दुसरा काय पर्याय होता?

माझ्याही मनाला पटलं नाही अन् अमरेन्द्रही सहमत होते.
पण मग काय असंच घुसमटत आयुष्य घालवायचं? अन् कुणासाठी हा एकाकी रस्ता धरायचा? मुली तर लग्न होऊन आपापल्या घरट्यात गेल्या असत्या. आमची ससेहोलपट चालूच राहिली असती. उलटसुलट गटांगळ्या खात आम्ही असे खूप दिवस घालवले. एक दिवशी मात्र एक प्रसंग घडला, त्याने अमरेन्द्रांचं डोकं सटकलं.

अमरेन्द्रांच्या आग्रहावरून मी अलीकडे थोडीफार चार भिंतींच्या बाहेर पडू लागलेली. एकदा असेच रात्रीच्या नाटकाला गेलो होतो त्या दिवशी आम्ही. अकरा वाजता मला घराबाहेरच्या रस्त्यावर सोडल्यावर काही टगे रस्त्यावर फिरत होते ते छेड-छाड करू लागले. अमरेन्द्रनी त्यांना हुसकावल्यावर गेले. जाता जाता एकजण म्हणून गेला.. काय रात्रभर बसणारेस काय तिच्याजवळ ? जाशील की कधीतरी...मग आहोतच आम्ही! झालं. अम्रेन्द्रांच्या डोळ्यात खून उतरला. त्याची अशी पिटाई केली त्यांनी की परत काही बिचारा गल्लीत फिरकला नाही. पण त्यानंतर अमरेंद्र घरी जायला तयार होईनात. मी खूप समजावलं... आता नाही येणार कुणी, इतकी धुलाई झाल्यावर, वगैरे. पण ते म्हणाले 'नीलम, मी तुझ्या बाल्कनीत सतरंजी टाकून झोपतो आज रात्री. सईपण आजीकडे गेलीय.'

अन् खरोखरच रात्रभर ते बाल्कनीतल्या आरामखुर्चीवर शाल पांघरून झोपले. आत मी, झोपलेली ऋचा अन् माझा नवरा! तोही माझ्याइतकाच भेदरलेला. गुंडांची पुरेशी धुलाई झाल्यामुळे की काय, सुदैवाने रात्रीत पुन्हा काही गैरप्रकार घडला नाही. पण झोप मात्र नाहीच लागली.
सकाळी उजाडल्यावर मी केलेला चहा घेऊन माझा नवरा स्वत: अमरेन्द्रांजवळ गेला आणि त्याने त्यांचे पायच धरले. मी आजवर खूप चुकीचा समज करून घेतला हो तुमच्याविषयी. पण तुम्ही खरंच खूप वेगळे आहात. नीलमला तुम्हीच खरोखरी लायक आहात. माझं काय, आज आहे, उद्या नाही. तिच्या गरजा भागवायला मी नाही हो समर्थ. मी तिला घटस्फोट देतो. तुम्ही दोघे लग्न करा....

कितीतरी वर्षांनी मी माझ्या नवऱ्याच्या डोळ्यात पाणी बघितलं.

अमरेंद्र हसले. वा राव, अन् तुम्ही कुठं जाता?

जातो हरिद्वारला...

ते काही नाही चालायचं. बघू या नंतर पुढे काय करायचं ते. आता अंघोळ करा अन् झोपा मस्तपैकी. रात्री झोपला नव्हतात ना? अन् अमरेंद्र मिश्कील हसले.

यानंतर माझ्या नवऱ्यानेच हा मार्ग सुचवला. आम्ही तिघेही एकत्र राहणं. पहिल्यांदा मला धक्काच बसला. पण विचार केल्यानंतर, सगळ्यांच्या हिताचं रक्षण करणारा याशिवाय दुसरा मार्ग नाही हे माझ्या लक्षात आलं. हो, ना करत अमरेन्द्रही तयार झाले.

अन् मग त्यांनी हे घर बांधलं. विरोध अर्थातच खूप झाला. अमरेन्द्रांच्या घरच्यांकडून, समाजाकडून, परिचितांकडून. पण आम्ही तिघे आमच्या निर्णयावर ठाम होतो. मी नोकरी सोडली. अमरेन्द्राना मी चोवीस तास त्यांच्या समोर हवी असते ना. ऋचाला विश्वासात घेऊन सोप्या शब्दात सर्व समजावून सांगितलं. तिलाही अमरेंद्रकाकांचा लळा लागलेलाच होता. सई मात्र अमरेन्द्रांच्या घरच्यांकडून फितवली गेली. तरीही या घरी यायची मुभा त्यांनी तिला दिली, हा त्यांचा मोठेपणाच म्हणायचा....

माय गॉड! हे इतकं सगळं रामायण-महाभारत मला खरंच माहिती नव्हतं, हो, नीलमकाकू. हा अमरेन्द्रकाका तर पहिल्यापासूनच अजब आहे, पण तुमचीही धन्य आहे हो. इतकी फाईट घ्यायची समाजाशी म्हणजे येरागबाळ्याचं काम नव्हे!

एकदा करायचं ठरवल्यावर परमेश्वरच बुद्धी देतो निभवायची. कुत्सित नजरा, शाब्दिक तीर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष अपमान, सगळ्यातून पार पडलो, ते दोघं बरोबरीनं. शक्यतो कुणाला प्रत्युत्तर दिलं नाही. अपमान झाल्याठिकाणी पुन्हा गेलो नाही अन् हक्क असेल तिथून ढळलो नाही. आता मात्र आम्हाला या साऱ्यांचा सामना शक्यतो करावा लागत नाही. काहीसे उपेक्षित का असेना, या समाजानं आमचं एक स्थान आता मान्य केलं आहे हे जाणवतंय..

इतक्यात अम्याकाका कॉफी घेऊन हजर झाला.

कोपऱ्यावरचं दुकान बंद होतं, म्हणून मेन रोडला जाऊन आणली कॉफी. मैथिली, बोअर तर नाही ना झालीस?

अरे, काका, नीलमकाकूसोबत तू तरी कधी बोअर होतोस का....? मैथिली मिश्कीलपणे प्रसन्न हसली. कॉफी पिऊन तिने त्यांचा निरोप घेतला. एक डौलदार वळण घेऊन गाडी रस्त्यावर काढताना मैथिलीच्या मनात कितीतरी प्रश्नांची उत्तरं मिळत होती. आणि तिच्या डोळ्यासमोर एक आरसपानी ताजमहाल उंच उंच आकाशात झेपावताना दिसत होता...अगदी एकसंध !

# अल्बर्ट ब्रोकोली प्रेझेन्ट्स इयान फ्लेमींग....

**चौकटराजा**




चित्रगृहातील फक्त एक दिवा चालू राहतो उशिरा आलेल्या प्रेक्षकांना जागा नीट दिसावी म्हणून. काहीतरी जाहिराती वगैरे पडदा व्यापून असतात. मग ती वेळ येते. अंधार.

ट्रूण डॅंग, ट्रूण डॅंग, ट्रूण डॅंग ट्रूण डॅंग

तरा त रा ................

पडद्यावर कॅमेऱ्याच्या शटरसारखा पिसारा व त्यात एक गोल. त्यात एक उंचनीच व्यक्ती पडद्याच्या डावीकडे चालू लागते. मग

पुढचा पिसारा डावीकडे उजवीकडे सरकतो व एकदम ती व्यक्ती प्रेक्षकांवर गोळी झाडते. रक्ताचा ओघळ मात्र वरून खाली असा पडद्यावर सरकू लागतो.

मग वर दर्शविलेली "अल्बर्ट ब्रोकोली ...प्रेझेन्ट्स .......इयान फ्लेमिंग्ज" ही अक्षरे प्रकट होतात......

इयान फ्लोमिंग हे काही काळ सैन्यात होते. त्यानी आयुष्यात नंतर व आधी प्रत्रकारितेत काम केले. दुसऱ्या महायुद्धात त्याने अनेक कमांडोज व गुप्तहेर जवळून पाहिले. आपल्या निरीक्षणाची शिदोरी घेऊन कमांडर जेम्स बॉंड हा मानसपुत्र निर्मिला. उंच, बांधेसूद, कपाळावर केस न येणारा, निळ्या डोळ्यांचा, प्रणयी, निर्दय, समयसूचक, थंड डोक्याचा, प्रसंगी वरिष्ठांना नडणारा. १९६२ साली "डॉ. नो" ते अलीकडेच प्रदर्शित होऊ घातलेला ‘स्कायफॉल, या ५० वर्षांच्या प्रवासात अनेक नटांनी हे पात्र रंगविले. ग्रेगरी पेक,

हॅरिसन फोर्ड, टॉम क्रूझ अशांची वर्णी या कामी लागली नाही. पण ज्यांनी हे पात्र साकारले, त्यातील चौघांनी तरी ते पात्र आपल्या वेगवेगळ्य अभिनयशैलीने मस्त रंगविले.

काळाच्या ओघात विशेषतः रॉजर मूरने या पात्राला मिश्कीलपणाची डूब दिल्यानंतर बाँड हा प्रौढांचाच लाडका नायक राहिला नाही. निर्मात्यांनीही स्त्रीच्या अंगप्रदर्शनाचे प्रमाण कमी करून सर्वांनाच माय नेम इज...बोंड...जेम्स बाँड हे टिपिकल वाक्य मूरनंतरच्या सर्व बाँडना सर्वच वयोगटाच्या प्रेक्षकांसमोर पेश करण्याची संधी दिली.

बाँड हा सुपरमॅन, बॅटमॅन, स्पायडरमॅन, इंडियाना जोन्स, काउंट ड्रॅक्युला, फॅन्टम, फॉन्टोमस, पिंक पँथर, मिस्टर बीन यांच्याप्रमाणेच अजरामर झालेला आहे. त्यात बाँडचे खास काय आहे हो? असा प्रश्न पडावयासच नको खरे तर! १९६२मध्ये "डॉ. नो" या चित्रपटाने खरे तर बाँडपटाने प्रथम रुपेरी पडदा पाहिला. आता ‘स्कायफॉल’ या तेविसाव्या बाँडपटापर्यंत ती वाटचाल आली आहे. सारेच बाँडपट अगदी तुफान यशस्वी झाले नाहीत, पण बहुतांशी झाले. त्यामागे प्रथम अल्बर्ट ब्रोकोली व आता बार्बरा ब्रोकोली यांचे कौतुक आहेच. पण अनेक कारणांनी यशस्वी बनण्याची बाँडपटांची परंपरा का निर्माण झाली, हे पाहणे रंजक ठरावे.

बाँडपटाचे प्रथमपासूनच खास वैशिष्ट्य म्हणजे त्याची श्रेयनामावली. त्या त्या काळातील अत्युत्तम तंत्रांचा ग्राफिक्समध्ये वापर करून घेतलेली ‘टायटल्स’ चुकवू नये अशीच असतात. साधारणपणे चित्रपटाचा विषय व श्रेय नामावली यांचा संबध सर्व हॉलीवूड पटात असतो, पण विशेषतः बाँडपटात हे प्रकर्षाने जाणवते. उदा. अलीकडच्या 'कॅसिनो रोयाल'चे पाहा. चित्रपटातील पत्त्याचा जुगार आपल्याला श्रेयनामावलीत दिसतो. श्रेयनामावलीत चित्रपटाच्या नावाशी संबंधित गीत बहुधा असते व त्या धुंदफुंद गीताच्या पार्श्वभूमीवर मदनिकांच्या आकृत्या, पिस्तुले व दस्तुरखुर्द महाशय कमान्डर जेम्स बाँड हे असतात.

बाँड यांचे पूर्ण नाव 'जेम्स बाँड' असून त्याना त्यांची प्रेयसी, त्यांचे बॉस ‘एम’ व त्यांच्या कार्यालयातील मिस मनीपेनी ह्याच व्यक्ती सर्वसाधारणपणे जेम्स या नावाने संबोधतात. बाकी सहकारी डबल ओ सेव्हन या नावाने त्यांना संबोधतात, तर त्यांचे शत्रू त्यांना मिस्टर बाँड या नावाने संबोधतात. जेम्स बाँड हे ब्रिटिश नेव्हल सर्व्हिसेसचे सदस्य असून हा कमांडर त्यांचा हुद्दा आहे. एम १६ या गुप्तचर विभागाचे एजंट म्हणून साहसी कारवाया करणे व मानवजातीच्या दुष्मनांचा नायनाट करणे, हे त्याचे जीवितकार्य आहे. बाँडपटाच्या सर्वच कथा इयान फ्लेमिंग यांच्या कृती नाहीत. तरीही श्रेयनामावलीत निर्माते इयान फ्लेमिंग यांचे नाव आवर्जून देतात.

एका साहसी मोहिमेने बहुतेक वेळा बाँडपटाची सुरुवात होते. त्यात जबरी मारामारी वगैरे होऊन बाँडच्या व्यक्तिमत्वाची एक झलक दाखविली जाते. मग श्रीमान बाँड हे नव्या मोहिमेसाठी एम १६च्या कार्यालयात दाखल होतात व मुख्य कथानक चालू होते. तसे पाहता बाँड यांचा कारभार एकहाती नसतो. हरेक मोहिमेत एक प्रेयसी व एक स्थनिक साहाय्यक त्यांना येऊन मिळतोच. काही वेळेस प्रेयसीच धोका देते व विषकन्या बनू पाहते, असेही कथानक असते. बाँडपटातील काही मूलभूत गोष्टी प्रेक्षकांनाही आता पाठ झालेल्या आहेत. मियामी, वॉशिंग्टन, शिकागो, न्यूयार्क, सॅन फ्रॅन्सिस्को व लॉस एंजिलिस, तसेच ग्रॅन्ड

कॅनियन येथे अमेरिकन चित्रपटांचे चित्रीकरण होताना दिसते. पाईनवूड स्टूडियो लंडन येथे बॉंडपटाचे इनडोअर शूटिंग; तर जगभर कुठेही म्हणजे बहामा, कॅरिबियन वेटे, माल्टा, हॉलंड, भारत, दक्षिणपूर्व आशिया, जपान, सार्दिनिया, ग्रीस, नेपाळ येथे बाह्य चित्रीकरण झालेले आढळून येईल. मधूनमधून आदिवासी लोकांच्या वस्त्यांच्या ठिकाणीही बॉंडमहाशय साहसे करताना आढळतात.

अर्नोल्ड श्वार्ड्झनेगर यांच्या चित्रपटातील अशक्यप्राय साहसांप्रमांणे बॉंडपटात साहसे दाखविण्यात येत नाहीत. मोठे मोठे किडे, साप असला अवास्तव आचरटपणाही बॉन्डपटात टाळलेला दिसेल. बॉंडच्या साहसांप्रमाणे साहसे प्रत्यक्ष करून दाखविणारे लोक आहेत. फक्त या साऱ्याच साहसांचे एकत्रीकरण बॉंड यांच्या कौशल्यात कसे काय दिसते बुवा? असा प्रश्न पडणे शक्य आहे. बॉंडना कमांडो पद्धतीचे प्रशिक्षण मिळाले असावे, असे त्याचे उत्तर शोधता येते. बॉंड एकाच वेळी हिंदी हीरोप्रमाणे अनेकांशी मारामारी करताना आढळणार नाहीत. जमिनीवरून गुरुत्वाच्या विरुध्द दिशेने उडी घेताना दिसणार नाहीत. बॉंड हा माणूस ताकदीपेक्षा युक्तीचा, तसेच साधनांचा वापर करताना आढळतो. खात्याच्या तांत्रिक प्रयोगशाळेकडून त्यांना अशी जादुई साधने वेळोवेळी पुरविण्यात येतात. बॉंडच्या पटात त्याच्या डेमोचा एक कार्यक्रम असतोच. एका चित्रपटात मांसाचे तुकडे एका खडकावर टाकून त्यांचा मगरींसाठी आकर्षण म्हणून शत्रूने उपयोग केलेला असतो. व खडकावर उभे असलेल्या बॉंडच्या पायापाशी ते तुकडे ठेवलेले असतात. त्याच मांसाच्या तुकड्याना विशिष्ट अंतरावर फेकून मगरींचा सेतू उभा करून बॉन्ड मगरीच्या पाठीवर पाय देऊन पळून जातो. किंवा एका चित्रपटात बाथरूममध्ये सोडलेला विषारी साप तो ज्वालाग्राही रूम-स्प्रेने जाळून टाकतो, ही बॉंडच्या समयसूचकतेची पुरेशी उदाहरणे आहेत.

जेम्स बॉंड हे शत्रूच्या गोटात जाऊन वेगवान हालचाली करून शत्रूचा प्लॅन व प्लॅन्ट दोन्ही उडवून लावतात. बहुतेक वेळा हे प्लॅन्ट भूमीखाली असतात. कधी पाण्याखालील स्कूबा डायव्हरच्या रूपात शत्रूशी भिडणे, कधी स्विस आल्पसच्या उतारांवर स्केटिंग करीत गुंगारा देणे, कधी अस्मानातून डीप जंप घेणे तर कधी ॲमस्टरडॅम वा व्हेनिसमधील चित्तथरारक पाठलाग, तर कधी सॅन फ्रॅसिस्कोच्या गोल्डन गेट ब्रिजवर मारामारी, असा प्रचंड साहसाचा मसाला ठासून भरण्यात या चित्रपटाचे निर्माते वाकबगार आहेत. अशा साहसी कारवाया करताना बॉंडपटाची ट्रण डॅन्ग ,,,ट्रण डॅन,,,,,,ट्रण डॅन्ग तरा त रा ही सिग्नेचर धून वेगवेगळ्या चित्रपटात वेगवेगळ्या वाद्यांवर व दर वेळी नवा बाज घेऊन वाजविली जाते. हे बॉंडच्या चाहत्यांना मोठे रोमांचकारी वाटत असते.

बॉंडपटांची नावे ही कधी लांब तर कधी लहानशी असतात. नेव्हर से नेव्हर अगेन, ऑन हर मॅजेस्टीज सिक्रेट सर्वीस, द स्पाय हू लव्हड मी ही लांब किंवा गोल्डफिंगर, कसीनो रोयाल अशी आखूड. बहुतेक सर्व चित्रपट टेकनिकलरमध्ये असून पॅनव्हिजन या ॲस्पेक्ट रेशोमध्ये असतात. बॉंडपटात आलेली काही इतर पात्रेही लोकांच्या दीर्घकाल स्मरणात राहिलेली आहेत.

जेम्स बॉंड यांना अतिअडचणीच्या प्रसंगी साह्यभूत व्हावीत अशी साधने बनविणारे श्री क्यू हे असेच पात्र आहे. ते एकूणापैकी २० बॉंडपटात येऊन गेले आहे. एम, मिस मनीपेनी हे तर आहेतच पण स्कारामांगा, ब्लोफेल्ड या उलट्या काळजाच्या व्यक्तिरेखांनाही आपण विसरू शकत नाही. एका चित्रपटातील क्लॉ नावाचे

पात्रही अविस्मरणीय. बॉक्स ऑफिसवरील धंद्याचा भाग म्हणून अल्पवस्त्र मदनिका हा बॉंडपटाचा अविभाज्य भाग आहे. तरी अलीकडे त्याला अधिक मर्यादा आलेल्या दिसतात. अशी मदनिका समुद्राच्या पाण्यातून किनाऱ्याकडे डौलात चालत येत बिकिनीवर दर्शन देते, असा प्रसंग बहुधा बॉंडपटात असतोच. मदनिका मात्र नायिका नसेल तर छद्मीपणे 'गुडबाय मिस्टर बॉंड,,, (मीन्स गो टू हेल नाऊ) असे म्हणायचा सीनही असतो.

बॉंडपटात सात वेळा चमकून रॉजर मूर हा आघाडीवर आहे, तर सहा चित्रपटात झळकून शॉन कॉनेरी हा रनरअप आहे.
पण डॅनियल क्रेग याने सादर केलेला आताचा 'जेम्स बॉंड' सर्वोत्तम आहे, असे अनेकांचे मत आहे. बॉक्स ऑफिसचा विचार करता असे दिसते की एकाही बॉंडपटाने निर्मात्याला खड्ड्यात घातलेले नाही. पण खर्चाच्या मानाने गल्ल्ला गोळा करण्यात बॉन्डपट क्रमाक्रमाने घसरत चाललेले दिसतात. १९६२ साली प्रथमच बॉंडपट 'डॉ.नो' या नावासह प्रदर्शित झाला, त्याचा एकूण खर्च व गल्ला यांचे प्रमाण १:५८ असे होते, ते घसरत जाऊन 'क्वांटम ऑफ सोलेस'पर्यंत ते १:२ इतके घसरले आहे. बहुधा हॅरिसन फोर्ड, टॉम क्रूझ, अर्नोल्ड श्वार्झनेगर यासारख्यांच्या थीमवाल्या थ्रिलरनी बॉंडपटांना चांगलाच शह दिलेला दिसतो.

बॉंडपटाबद्दल मजेशीर कथाही आहेत. श्री इयान फ्लेमिंगनी आपल्या काही वैयक्तिक 'आवडीनिवडी जेम्स बॉंड या मानसपुत्राला चिकटविल्या आहेत. १९६४मध्ये त्यांचे निधन झाले, त्यापूर्वी १९६३मध्ये त्यांनी एका बॉंडपटात हौस म्हणून दीड मिनिटाचे काम केले आहे. इतर काही प्रसिद्ध व्यक्ती (उदा. मॅडोना) यांनीही प्रसंगी अगदी लहान फुटेज असलेली कामे केली आहेत. याबाबत निष्ठावंत निर्माते अल्बर्ट ब्रोकोली यांनीही एका बॉंडपटात आपली हौस भागवून घेतली. (अशी 'हौस' आपल्याकडे सुभाष घई व हॉलीवूडमध्ये आल्फ्रेड हिचकॉक यांना होती, हे बाय द वे सांगावेसे वाटते). बॉंडपटांना फारसे गौरव पुरस्कार काही मिळाले नाहीत, पण दोन चित्रपटांना तांत्रिक बाबतीत ऑस्कर मिळाले. बाकी चार चित्रपटांना उत्कृष्ट संगीतासाठी नामांकन मिळाले होते.

हे काही असले तरी बॉंडचा एक चाहतावर्ग आहे. तो बॉंडचा नवा चित्रपट आला की थेटरला जाऊन आजही पाहतो.
या वेळी टायटल्समध्ये नवीन काय? बॉंडची मल्टीपर्पज कार आता काय काय घेऊन येते? मारामारीसाठी आता कोणती नवी लोकेशन्स असणार? याची उत्सुकता त्याला थेट चित्रगृहाकडे खेचून नेते. या वेळी १९६२सारखे थेटर नसते. तिथे आता आरामदायी खुर्च्या, मंद रूम स्प्रे, मोठा पडदा सगळे चकाचक! अंधार होतो. पडद्यावर कॅमेऱ्याच्या शटरच्या पिसाऱ्याचे ग्राफिक अवतरते.. गोलाकार आकारातून बॉंडची आकृती चालू लागते. साउंड ट्रॅकवरचे सिग्नेचर ट्यून आजूबाजूच्या अत्याधुनिक स्पीकरमधून घुमू लागते. 'ट्रूण डॅंग, ट्रूण डॅंग, ट्रूण डॅंग ट्रूण डॅंग तरा त रा .......
बॉंड अचानक आपल्याकडे वळतो ... पिस्तूल चालवतो..... रक्ताचा ओघळ रूपेरी पडद्यावर खाली सरकू लागतो.

# आयुख
अपर्णा

चित्र रेखाटायच्या आधी
मनात बरेच मनसुबे
हे $$ सुंदर, असं सुरेख रेखाटू ...
तशी अंगात ज्वानीची रगही असते
नसानसात धडक्या मारणारं
उसळतं रक्तही भरीस पाडतं
आतापावेतो तसे आपण
दुसऱ्याच्या चित्रातले
त्यांचे मनसुबे कधी धुळीला लावलेले
तर कधी त्यांच्या मनाजोगता रंग ल्यायलेले
अन् कधी तर अवचित चक्क रंगबहार साधलेले
पण आता परिस्थिती वेगळी
हाती कुंचला अन् मनी रेखाटन
समोरच्या रंगांचा मर्यादितपणासुद्धा
ते आवेगी रेखाटन रोखू नाही शकत
धमकच असते तशी त्या वयाची
मग हळूहळू जाणवू लागतं
आपलं अपुरेपण
समोरच्या रेखाटनात उमटलेल्या
आपल्याच त्रुटी
आपल्याच भरकटलेल्या पाऊलखुणा
कधी चुकलेली कागदाची निवड
कधी चुकलेली रंग छटा
सारी सरमिसळ....
कुठे फिसकटलेले फराटे
कुठे निसटलेले आलेख

अन् कधीकधी तर उमटलेले ओरखडे
कधी परक्यांचे, कधी आप्तांचे
अन् कधी आपले स्वत:चेच
चित्र घडत जातं
तसं कधीकधी वाटतं
बदलावं हे सारं
काढावं नवीन काही
आता जाणिवांचे कंगोरे घेऊन
कदाचित काही चांगलं उमटेल
पण,
हाती तोच एक कागद
तेच चार कुंचले
अन् समोर पसरलेलं
सुटका नसलेलं
तेच एक चित्र
आपलं

# भेट तुझी माझी स्मरते

## अरुण मनोहर

नवरा बायकोमधल्या कुठल्याही संवादाचे बघताबघता नेमके कशामुळे विवादात रूपांतर होते, ह्याविषयी जरी दोघांमध्ये विसंवाद असला, तरी 'समोरचा नेहमीच कैच्या कै बोलतो', ह्या एका बाबतीत दोघांचेही एकमत असते. जर 'उद्याच्या पार्टीला कोणती भेटवस्तू घेऊन जायचे' ह्या विषयावर हा संवाद असेल, तर समोरच्याने सुचविलेले डाऊन मार्केट प्रेझेंट हे वेळ येईल तेव्हा त्याने त्याच्या (किंवा तिने तिच्या) नातेवाइकांनाच द्यावे, आज मी माझ्या आवडीचा अप-मार्केट आहेर देणार आहे, हा निर्वाणीचा इशारा ठरलेलाच असतो. असल्या निर्वाणीच्या इशाऱ्यांचे पालन केले जाते किंवा नाही हे अर्थात हा इशारा फेअर सेक्सकडून आला होता की अनफेअर सेक्सकडून, ह्यावर अवलंबून असते. असो, हा कोळसा जास्त न उगाळलेलाच बरा, जितका जास्त उगाळाल, तितके फेअर-अनफेअर मळभ बाहेर येईल!

मात्र एक नक्की! भेटवस्तू काय घेऊन जायची, ह्याबद्दल अगदी तो इव्हेंट येईपर्यंत वादंग चालत असतो. भेटवस्तूंमध्ये पूर्वी स्टेनलेस स्टीलच्या भांड्यांची चलती होती. एकमेकांशी कुठलाही समन्वय नसलेले पेले, वाट्या, पातेली घराघरात जमायला लागली. बरे, ते पेलेदेखील द्यायचे तर निदान सहा, आठचा सेट तरी असावा? पण नाही. कोणी तीन उभे पेले दिले, की कोणी तीन बसके पेले दिले असणार! एसटीच्या बसमध्ये दिसावे तसे विविध रंगरूपाची व आकाराची मंडळी फडताळातल्या सिटांवर दाटीवाटीने बसलेली दिसू लागली. तीच गोष्ट चिनी मातीच्या मगांची. प्रत्येक मगवर आपापल्या परीने विनोदी वाटण्याच्या प्रयत्नातली घोषवाक्ये छापलेली. असे मग धड वापरताही येत नाहीत, ना फेकता येत! आणि काही वस्तू अशा आहेत की ज्यांची निर्मिती फ़क्त भेटवस्तू शोधण्याचे कार्य सुगम व्हावे म्हणूनच केली असावी. याउपर त्यांचा काहीही उपयोग नसतो. आहेरात वेगवेगळ्या आकारांचे कँडल स्टँड जमतात. त्यातल्या एकातरी वितळलेल्या मेणाचा लेप लागत असेल तर शपथ!

सुदैवाने भेटवस्तू निवडताना, ती जर (भारतीय) स्त्रियांसाठी असेल, तर 'साडी' हा एक बराच सेफ प्रकार आहे. साडी भेट मिळाली की बहुतांश स्त्रिया अगदी खूष होतात! स्वतः अगदी साडी क्वचित नेसत असल्या तरी. किंवा भले डझनावारी साड्यांनी त्यांचे कपाट भरलेले का असेना! लग्नात अगदी कितीही चांगली भेट मिळाली, तरी साडी तर दिलीच नाही असा सूर त्यांच्याकडून बरेचदा ऐकू येतो. त्यामुळे बायकांसाठी भेट म्हणून साडीचा अग्रक्रम असतो. अर्थात साडीची निवड हा मोठा क्लिष्ट प्रश्न असतो. तो सोडवायला बायकाच अगदी उत्साहाने मदत करीत असल्याने पुरुषांनी त्याची चिंता करू नये. साडी भेट मिळाल्यावर ती आवडणे हे मात्र उंबराचे फूल सापडण्याइतके कठीण असावे. ही अशी माझ्याकडे आधीच आहे, मला ही दिली, आणि त्या हिला पाहा किती सुंदर दिली! ही काय धूप-छावच आहे, आजकाल कोण्णी घालत नाहीत असल्या... काय वाट्टेल ती खुसपटे काढून, मिळालेली साडी कपाटातल्या उंच ढिगात सगळ्यात खाली खुपसण्यात येत असेल तर असो! आपले भेट देण्याचे कर्तव्य पार पडलेले असते!

इतके दीर्घ विचारमंथन करून आणलेली वस्तू, घेणारा किती 'प्रेमाने' वापरतो हे जर आधीच फास्ट फॉरवर्ड

करून पाहण्याची सोय असती, तर मला वाटते जगातली भेटवस्तूंची अर्धी दुकाने बंद पडली असती. मुळात भेटवस्तू निवडण्याचा हा यक्षप्रश्नच निकालात निघाला असता. पण ही फास्ट फॉरवर्ड टेक्नॉलॉजी अवगत नसल्याने, प्रेम आणि पैसे खर्च करून घरोघरी एकापेक्षा एक टाकाऊ वस्तू घेतल्या आणि दिल्या जातात. त्यातल्या बहुसंख्य, वरचे वेष्टन पुन्हापुन्हा बदलून पुनर्वापटपात फिरविल्या जात असाव्यात, हा एक आपला अंदाज. सध्या रिसायकलिंग हा बझ वर्ड असल्यामुळे अशा कल्पना सगळीकडे भराभर फोफावतात. पण उघडपणे हे कबूल करणे म्हणजे सोशल टॅबू! त्यामुळे तेरी भी चूप, मेरी भी चूप असा मामला असतो. रंगीत गुळगुळीत वेष्टनांचा उद्योग मात्र ह्यामुळे जोरात आहे. जसा पूर्वीच्या काळी स्टीलच्या भांड्यांवरची नावे खोडून नवीन नावे घालणाऱ्यांचा उद्योग जोरात होता ना, तसेच! लग्नप्रसंगी वा वाढदिवसाला वगैरे पुनर्वापट करण्यायोग्यदेखील नसलेल्या वस्तू मिळेल ते अडगळीचे कोपरे शोधतात. तिथून कधी अगदीच अडचणीची वेळ आली तर त्यांनाही चलनवलनाचा व्यायाम मिळतो, किंवा रद्दीवाल्याची टोपली! ह्या सगळ्या वस्तू सोडून उरलेल्या केवळ थोड्यांनाच मालकाकडे वापरले जाण्याचे भाग्य लाभत असावे.

भेटवस्तूंची ही परवड पाहून की काय, इकडे लग्नसभारंभांत लाल पाकिटे देण्याची प्रथा सुरू झाली असावी. नक्षीदार सुबक लाल पाकिटांमध्ये करकरीत नोटा घडी करून बंद पाकीट यजमानाच्या हातात ठेवले की यजमान आणि पाहुणा, दोघेही खूश! काय आणू, आवडेल का? वापरतील का वगैरे डोकेदुखीपासून पाहुण्याची सुटका झालेली असते. ढिगांनी नको असलेल्या वस्तूंची विल्हेवाट लावावी लागणार नाही म्हणून यजमानही सुटकेचा निःश्वास टाकतो.

पाकीटांचे यश पाहून ही प्रथा बघता बघता सगळीकडे पसरली. पाकिटात किती पैसे घालायचे, त्याचे आराखडे एकमेकांना विचारून बांधले गेले. आता तर सिंगापुरात एक अलिखित नॉर्मच तयार झालेला असावा. म्हणजे पार्टी कोठे आहे ह्यावर भेटपाकिटातली रक्कम ठरते. पंचतारांकित मेजवानी आहे, की मोठ्या रेस्ट्राँमध्ये, की नुसतीच देवळात ह्यावर पाकिटातल्या रकमा ठरविल्या जात असाव्यात. कोणी तरी म्हणालेही होते, थंब रूल असा आहे की प्रत्येकी जेवणाचा जो खर्च त्या ठिकाणी असतो, निदान तेवढी तरी रक्कम प्रती पाहुणा अपेक्षित असते! बाजारीकरणाचा हा आविष्कारच म्हणायचा!

काही सभारंभात पार्टी हॉलमध्ये घुसण्याच्या मार्गात, रजिस्ट्रेशन टेबल मांडले जाते. टोल नाका असतो ना, तसेच म्हणा हवे तर. किंवा आत मांडलेल्या जेवणाचे मूल्य स्वीकारण्याची जागा! यजमान तिथे स्वागताला उभा असतो. बॉक्स आणि पाहुण्यांची यादी घेऊन एखादी सजलेली सुंदरी, आधी आलेल्या पाकिटांचा टेबलमागे बसलेली असते. त्या बॉक्समध्ये आधी आलेली पाकिटे निष्काळजीपणे टाकलेली असतात. नवीन आलेल्या पाहुण्यासाठी ते चांगले मार्गदर्शक ठरते. एखादा अगदीच बावळट (म्हणजे अंगी नाना कळा असणारा) ती खूण न ओळखता जाऊ लागला तर ती सुंदरी त्याच्याकडे कटाक्ष टाकीत त्या बॉक्समधल्या पाकिटांना उगाचच खाली वर करते. येवढा इशारा बहुधा पुरेसा होतो, आणि पाहुण्याच्या खिशातले विसरलेले पाकीट सुंदरीच्या अथवा यजमानाच्या हातात विराजमान होते. लगेच पाहुण्याचे नाव त्या यादीत टिक केल्या जाते. कोणास ठाऊक, पाहुणा आत गेल्यावर कदाचित खालच्या डुप्लिकेट यादीत इतरही काही नोंदी होत असाव्यात!

हा संशय येण्याचे कारण म्हणजे, एका मित्राच्या सभारंभात त्याने अनुभवलेला चटका! सभारंभ संपल्यावर आलेल्या पाकिटांमधील रोख मोजताना निदान पाच-सहा पाकिटे रिकामीच निघाली होती! अर्थातच, देणाऱ्याचे नावही पाकिटांवर नव्हते! आणि नावे असलेली पाकिटे बाजूला काढून, ही निनावी मंडळी ओळखणे शक्य नव्हते; कारण, आत नोटा टाकूनदेखील निनावी राहिलेली चार-पाच पाकिटे होती. आता बोला! "ती टेबलवरची सुंदरी तुझ्या विश्वासातलीच होती ना?" असा प्रश्न विचारून मी त्याची दुविधा आणखीनच वाढवली!

हे असे सगळे पाहुणे गेल्यावर पाकिटांची उपसाउपस करून दुःखी होण्यापेक्षा, जुन्या काळी गावाकडे पाहिलेला प्रकार आठवला! स्टेजवर नवरा-नवरी बाशिंगे बांधून बसली असत. येणारा पाहुणा काय ती गिफ्ट म्हणा, फुले म्हणा, पाकिटे म्हणा - घेऊन यायचा. ती भेट बघून लगेच माइकवर अनाउन्समेंट व्हायची - "भिका गदराळेकडून वधूस येक पाचवारी हिरवी साडी सप्रेम भ्येट!" लगेच मंडपात टाळ्यांचा कडकडाट! मग त्यातले काही नमुने ऐकण्याजोगे असत!

"येरबा दांडगट आणि पतनी कडूनवरवधूंस ईस रुपे आणि कुकवाचा करंडा भ्येट!" "कोतवाल कदम याजकडून वरासाठी दुद काढायची बादली".. काय विचारू नका! अशात रिकामे पाकीट आले असते तर कोण जाणे, अशी अनाउन्समेंट झाली असती - "भिमा बसनाळेकडून येक रिकामा लिफाग्फा!"

हे लिफाफा प्रकरण आता लोकांमध्ये एवढे आवडते झाले आहे की काही निमंत्रण पत्रिकांवर चक्क 'बॉक्स गिफ्ट्स कृपया आणू नये' असे आवर्जून लिहील्या जाते. म्हणजेच, रोख रकमेत आहेर द्या असा संदेश देणे! मनोरंजनाच्या कार्यक्रमासारखे सरळ प्रवेशशुल्क अमुक अमुक असे लिहिणेच अजून बाकी आहे. काही पत्रिकांवर 'आपला आशीर्वाद हाच आहेर' असे लिहिले असले, तरी आणणाऱ्याने प्रेमाने आणलेच आहे तर त्याचे मन का दुखवा, म्हणून मागील कोपऱ्यात भेटी स्वीकारल्या जात आहेत, असेही दृष्य कधी दिसते. अशा वेळी आहेर देणारा भेटेल त्या आहेर न देणाऱ्याजवळ "आम्ही आहेर न देता कुठल्याच सभारंभाला जात नाही हो!" अशी टिमकी मिरवायला विसरत नाही.

भेट वस्तूंच्या ह्या देवाणघेवाणी बाजाराचे अगदी तंत्रशुद्ध व्यवस्थापन काही 'प्रगत' देशांत झालेले दिसून आले. आंतरजालामुळे जग आधीच छोटे झालेले आहे. आता वेबॲपमुळे त्याला प्रभावी चेहरादेखील मिळाला आहे. डोहाळजेवण (ह्याला बेबी शॉवर का म्हणतात कोण जाणे), लग्न इत्यादी सभारंभ असले की वेबॲपवर एक इव्हेंट प्रकाशित करायचा. त्यावरच गेस्ट लिस्ट मॅनेजमेंट ॲप असते. सभारंभाला कोण येणार ह्याची ह्या ॲपवर नोंदणी होते. त्या पानावरच भेटवस्तू रजिस्टर करून ठेवायची. पण निवडीसाठी तुम्हा नवराबायकोत उगाच वाद नको व्हायला, म्हणून यजमानाची विश लिस्ट तिथे असते. कुठल्या दुकानातून ती घ्यायची ह्याचीही लिंक असते. ती भेट जर कोणी या आधी सिलेक्ट केली नसेल, तर त्यावर जाऊन कार्डने पैसे भरून ती आरक्षित करून ठेवता येते. म्हणजे यजमानाला हव्या असलेल्याच वस्तू मिळतात आणि डुप्लिकेट होत नाहीत.

बरे, एखादा विश लिस्ट आयटम खूप महाग असेल तरी काही हरकत नाही. पाहुणे त्यावर आपल्या

इच्छेप्रमाणे रक्कम नोंदवू शकतात. प्रत्येकाने नोंदलेल्या अशा रकमा एकत्रित होऊन तिथे दिसतात. म्हणजे आवश्यक असेल ती कमी नवीन पाहुणा भरून काढू शकतो, किंवा अर्थातच यजमान ती कमी भरून ती वस्तू घेऊ शकतो आणि दुकानातर्फे ती वस्तू यजमानाने सांगितलेल्या वेळी ठिकाणावर पोहोचविण्याची सोयदेखील असते.

व्यवस्थापन तंत्राचा हा उत्तम नमुना जरी म्हणता आला, तरी सगळ्या उपस्थितांसमोर, स्वहस्ते भेट देण्यात पाहुण्यांना जो आनंद होतो, तो अशा परस्पर पोहोचविलेल्या भेटींनी कसा मिळणार? मग तो आनंद मिळविण्यासाठी, जालावरील आमंत्रणावर ती वस्तू बुक करून, दुकानातून स्वत: घेऊन ती सभारंभात स्वहस्ते आणणाऱ्या उत्साही पाहुण्याचे काय होत असेल, ह्याचे काल्पनिक व्यंगचित्र मला एकदा दिसले.

जालावरच्या गिफ्ट ऑर्डर फॉर्ममध्ये लग्नात वधूवरांना कोणत्या भेटी हव्या ही यादी होती. नेहमीच्याच डीव्हीडी प्लेयर, टेनिस रॅकेट, ड्रेस, कॉस्ट्युम जुवेलरी इत्यादी इत्यादी. जवळ वळ सगळ्या वस्तू घेतल्या गेलेल्या दिसत होत्या. मात्र एका वस्तूने माझे लक्ष वेधून घेतले. मी खुर्चीवरून पडायचाच बाकी राहिलो. ‘घरात वापरायची शिडी’ त्या वराला हवी होती. ती काही कोणी अजून दिली नव्हती. बहुधा वाचणारे माझ्याचसारखे हसून हसून फुटले असतील!

मला कार्टून काढता येत असते तर मी ही संधी नक्कीच सोडली नसती. एक दांपत्य नटून थटून लग्नाच्या हॉलमध्ये प्रवेश करीत आहे. पुरुषाच्या हातात कशीबशी सांभाळलेली, रंगीत कागद गुंडाळलेली ॲल्युमिनियमची उंच शिडी आहे. त्याच्याकडे अचंब्याने पहाणाऱ्या बघ्यांना तो म्हणत आहे - “काय करणार, जालावरच्या यादीत ही एकच वस्तू टिक केलेली नव्हती, मग मला तीच आणावी लागली!”

खरं तर, भेट देणे-घेणे हा किती सौहार्दपूर्ण सोहळा असायला हवा, नाही का? कुठली का असेना, पण प्रेमाने दिलेली भेट देताना आणि घेताना दोघांचाही ऊर प्रेमाने भरून यायला हवा. पण आजकाल जीवनाच्या बाजारीकरणात आम्ही हा आनंद गमावून बसलो आहोत. आता फ़क्त मोजमाप, तुलना आणि वन अपमनशिपची दु:खदायक स्पर्धा तिथे शिरली आहे. ह्याने काय आहेर दिला, त्याचा आहेर किती महागडा होता, त्याने लग्नसभारंभात कुठे जेवण दिले, अशा गोष्टींवर मनामनातली नाती तोलली जातात. साने गुरुजींच्या गोष्टीतला भाऊबिजेला सुपारी देणारा भाऊ आणि डबडबत्या डोळ्यांनी ती ओवाळणी स्वीकारणारी बहीण कुठे बघायला मिळेल? तशी बहीण आता सिनेमामध्येदेखील दिसणार नाही. कारण सिनेमा काय किंवा लेख काय, शेवटी जनमानसाचा आरसाच असतात! तेव्हा ह्या आरशात भेट जनातली जी स्मरते, ती बघण्याचा हा एक प्रयत्न!..... भेट तुझी माझी स्मरते!

# विपश्यना ध्यान शिबिरात भुताटकी

## शशिकांत ओक

**नुकतेच कोल्हापूरच्या विपश्यना केंद्रात शिबिर साधनेला जाणे झाले. त्या काळातील काही आठवणींवर आधारित लेख.**

दहा दिवसांकरिता मौन व्रत. संतुलित मित आहार. पहाटे चार ते रात्री नऊपर्यंत ठरावीक आखीव कार्यक्रम.

साधनेतून आपल्या विचारावर लक्ष साधून नंतर सर्व शरीरातून एक संवेदनेची लहर उत्पन्न करायचे तंत्र शिकणे, हा या शिबिराचा उद्देश होता. त्या वेळच्या घटनात मौनाने आणखी गुंतागुंत वाढली... ती रात्र होती सहाव्या दिवसाची...

साधनेच्या कार्याला आता जारीने सुरुवात झाली होती. पूज्य गोएंकांच्या मधुर वाणीतून व साधनेतील खाचाखोचा सांगितल्या जात होत्या.

पाली वाणीतून ते अनेक श्लोक व अभंग सादर करत. आता पाली भाषेतील 'अनिच्छ' म्हणजेच 'अनित्य'. 'सव्व' म्हणजे 'सर्व', अशा शब्दांशी जवळीक साधली जात होती. 'क्षणोक्षणी घडून संपणारे हे जग अनित्य आहे. मग सुख व दुःखदेखील असेच अनित्य आहे, तर असा अनित्य जीवन प्रवास शरीराद्वारे होतो. त्यातून निघणाऱ्या संवेदनाही अशाच अनित्य आहे, याची जाणीव क्षणोक्षणी होऊन काही केल्या झोप येत नव्हती...

...एरव्ही न सुचणाऱ्या अनेक विचारांचे काहूर माजले होते. पहाटे पहाटे जरा झापड आली असावी. इतक्यात... इतक्यात एकदम जोरात ओरडल्याचा आवाज झाला... काय असावे? असे क्षणभर वाटले. पण नंतर सामसूम होती. म्हणून मी जरा साशंकपणे काय झाले असेल की मलाच आभास झाला असावा, असा विचार करत असता, पुन्हा जोरात ओरडल्याचा आवाज झाला. आता खात्रीच झाली की आवाजाचा आभास नाहीत... नक्कीच कोणीतरी मदतीची हाक देत आहे. मी मच्छरदाणीतून बाहेर आलो. बॅटरी हातात घेऊन माझ्या खोलीचे दार उघडून बाहेर आलो. खरे तर माझ्याबरोबर खोलीत राहणाऱ्यालाही उठवावे काय, असे वाटले, पण मौनाचे बंधन होते. मग कशाला उठवा, असे मनात म्हणत मी शेजारच्या खोलीच्या पायऱ्या चढून दरवाज्याशी थांबलो. एकदा वाटले की जर कोणी साप किंवा असे काही कॉटखाली लपून जाताना पाहून ओरडले असेल तर त्याला मदत हवी. पण आवाज केला तर ते पळून जाईल म्हणून, आतला आवाज शांत असावा...

मौनाचा भंग न व्हावा, पण मी बाहेर मदतीला आहे असे सूचित करायला मी खाकरून दरवाज्यावर हळुवार टकटक केली व वाट पाहत राहिलो. तो एकदम अचानक आतून दरवाजा झटकन उघडला गेला... "कोण? ... कोण आहे?..." असे म्हणत, अर्ध्या चड्डीतील तेथील साधक एकदम बाहेर आला. बॅटरीच्या प्रकाशात पाहत मला म्हणाला, "छे!, छे! कुठे काय? सर्व ठीक आहे!"

तो जागा झाला आहे व घाबरलेला नाही असे पाहून त्याला खालच्या स्वरात मी म्हटले, "आपल्याला काही

आवाज आला का? कारण मला या खोलीतून दोनदा ओरडल्याचा आवाज आला, म्हणून विचारायला आलोय."

असे म्हणत, आश्चर्य करत मला विचारले,

"किती वाजलेत?" त्याच्या एकंदरीत आवेशावरून कदाचित त्याला वाटले असावे की, मी काही कारणाने घाबरून गेल्यामुळे, धास्तावल्याने जरा तंद्रीत आहे. मला जरा ताळ्यावर आणायला त्याने विचारले असावे. "किती वाजले?"

चारला काही मिनिटे कमी आहेत असे मी म्हणता, 'जागे आहेत बरं का' याची खात्री वाटून ते म्हणाले, "बरं! बरं!"

त्यांनी पटकन दार बंद करायच्या आधी मी त्यांच्या खोलीतील दुसऱ्या साथीदाराच्या कॉटकडे पाहत होतो. त्यावर ते म्हणाले, "ते काय झोपलेत ना"

"ठीक आहे" असे म्हणत मी पुन्हा रूमवर आलो व खोलीत येऊन जरा आडवा झालो तोवर... टंण्ण... टंण्ण.... थाळावर पहाटे चारचे टोल वाजायला लागले व डोळ्यावरील झापड उतरवत साधकांची हालचाल सगळीकडे व्हायला लागली. 'किण किण... किण किण' .... बारीक आवाजाची घंटा त्या नीरव शांततेत आपले अस्तित्व दाखवून दुर्लक्ष करून पुन्हा जरा पांघरुणात घुसलेल्यांना सताड जागे करायला पुरेशी होती.

तो आवाज व ती घटना मी नंतर विसरलो होतो. पण ते प्रकरण तसे थांबणारे नव्हते! शिवाय मलाही त्या प्रकरणाचा तलास लावायची उत्सुकता होतीच.

एकदम रागावलेल्या स्वरात कोणी बोलतेय की काय, असे परतायच्या अगदी एक दिवस आधी वाटायला लागले. आता तर दिवसा हा आवाज! तोही मलाच फक्त येतोय की काय? असे वाटून मी सावधपणे त्यावर लक्ष ठेवायला लागलो, तर तो आवाज वाढतच होता. एकाचे दोन आवाज झालेले... आता दोन आवाज येतायत. बापरे ... पण मग आधीचा पहिला आवाज जरा मऊ झालेला आहे, त्याला कारुण्याची झाक आहे, असे वाटायला लागले. बुद्धाच्या भूमीतील साधना शिवारातील भुतेपण कारुण्यभावनेने ओथंबलेली असतात की काय, असे वाटून मी आश्चर्य करीत होतो व पूज्य सत्यनारायण गोएंकाजींच्या प्रभावी वाणीने भुतांचा स्वरही कातर झाल्याचे वाटून मला भगवान गौतम बुद्धांबद्दल आदर दुणावला! आवाजाचे हे गूढ आता मला फार आव्हानात्मक झाले. काय आहे त्याचा सोक्षमोक्ष लावलाच पाहिजे, असे वाटून मी खोलीच्या बाहेर आलो. अन पाहतो तो काय! पांढऱ्या रंगाचा एक दांडगा रानबोका आपली शेपटी ताठ करून, त्यावरी सर्व केस फिस्कारून भलताच रोमँटिक मूडमध्ये होता! उदी रंगाच्या मैत्रिणीशी जवळीक करायच्या बेतात असावा! त्या वेळी मी नेमका पोहोचल्याने त्याने मला पाहून असा काही तीव्र आवाज काढला अन डोळे फाडून पाहत जणू काही म्हणाला, 'समझता नही क्या बे? चल भाग जा! असा रागीट सुरात सल्ला देऊन शेपटीचा पिसारा झाडून तिच्या कातर आवाजाला साद द्यायला लागला. 'हा हंत हंत! ... नाही नाही, चालू देत तुमचे! असे मी उगीचच पुटपुटत खोलीत वळलो व हसून त्या आवाजाच्या रहस्याचा असा पर्दाफाश झाला असे म्हणून हवाईदलातील विमाने शत्रुपक्षाच्या नरडीचा घोट

घेऊन परतताना जे समाधान व्यक्त करतात, तसे उगीचच वाटले खरे....

तरीही हे प्रकरण तसे संपलेले नव्हते! कारण जो साधक ओरडला असे मला उगीचच वाटत होते, त्याला सत्य परिस्थिती सांगणे महत्त्वाचे होते. दहावा दिवस झाला तेव्हा आम्हाला सांगण्यात आले की मौन व्रत आता फक्त शांती पठारावर व शून्यागारातील व धम्महॉल क्रमांक २मध्ये लागू राहील, अन्य ठिकाणी तुम्हाला सकाळी १०नंतर बोलायला परवानगी आहे. दहा वाजले अन सर्वांना कंठ फुटला. मीही घसा साफ करून घेतला. तेवढ्यात शेजारच्या खोलीतील ती व्यक्ती दिसली. पांढरा शर्ट व खाली लेंगा, दहा दिवसाची दाढी वाढलेली जरा गावठीपणाची झाक... त्यांना तो आवाज बोक्यांचा होता असे हसून म्हटल्यावर, “असं का? बरं, बरं” म्हणून थंडा प्रतिसाद दिला व ते गेले. त्यानंतर आपापले सामान, सेलफोन, पैसे, पर्सेस, गोळा करायची धांदल झाली. नंतर अचानक शेजारच्या खोलीतील त्या ग्रहस्थांच्या बरोबर राहणाऱ्या व्यक्तीची ओळख झाली.

ते म्हणाले, “मी आपल्याशी बोलायला आलोय.” त्यांनी केलेला खुलासा ऐकून मी थक्क झालो. नंतर विचार करत राहिलो की नक्की खरे काय? ...

.... नंतर अकराव्या दिवशी ते, - ज्यांचे नाव पुढे, “मी दिलीप आठवले” म्हणून त्यांनी सांगितले - आणखी एक वयस्कर साधक अन मी, एकाच ट्रेनमधून समोरासमोर बसून गप्पा मारत होतो. त्या वेळी त्यांनी आम्हाला पुन्हा सविस्तर सांगायला सुरुवात केली, ते दिलीप आठवले म्हणाले, “सर, पहाटेच्या वेळी काढलेला आवाज बोक्यांचा आवाज होता असे तुम्ही ज्याला म्हणालात, तो बोक्यांचा आवाज नव्हता! तो त्याच साधकाचा - माणसाचा - होता! अहो काय सांगू! मी शिबिरात उशिरा दाखल झालो. तोवर मौनाला सुरुवात झाली होती. मला फक्त किल्ली, पांघरुणे व खोली क्रमांक सांगितला गेला. मीही गुपचूप गेले दहा दिवस काढले. पण अहो, सुरुवातीला माझी अशी काही बोबडी वळली की काही विचारू नका! रात्रीच्या वेळी आसपासच्या जंगलातील विविध प्राण्यांच्या कळपांच्या आवाजांनी मनात धडधड व्हायची! अहो, अगदी त्या निरुपद्रवी मोरांच्या केकाटणाऱ्या आवाजाने भीती वाटायची राव! अहो, पहिले काही दिवस मी या शिबिरात कुठून आलो, असे कोसत होतो. नेमके मलाच का या माणसाशेजारी राहायला दिले गेले? त्यातही ही इमारत शेवटची! त्यात माझी खोली शेवटची! नंतर कुंपणापल्याड सर्व जंगल! त्यात काही डाव होता की काय? त्यात सोबतीला दिला गेलेला असा साधक! चोर दरोडेखोरांनादेखील शिबिरातून साधना करायला देतात, म्हणून ऐकलं होतं. बहुतेक अशाच कोणा एकाला या कोपऱ्यातल्या खोलीत ठेवलेले असावे असा माझा पक्का संशय झाला होता! त्यांचे नाव मला काल कळले. ते होते शिरोटे म्हणून! पहिल्या रात्री झोपल्यावर ते असे काही आवाज काढायला लागले! मला आधी कळेना की, कोण आवाज काढतंय ते! पलीकडून आपणच ते काढताय की काय असे मला कधीकधी वाटले! बरं, सांगायची सोय नाही! मौनाचा खाक्या! धम्मसेवकांना सांगावे काय, असे वाटून दोन दिवस तग धरली. ते काय आवाज काढतायत ते कळत नसे, पण ते ओरडून काही बोलत असावेत! मग पुढे मला हळूहळू लक्षात आले की हा 'उखने उठणे' म्हणजे झोपेत बोलणारे व कधी चालणारे म्हणून जो प्रकार असतो, तसा यांचा प्रकार आहे. आमच्या गावाकडं आमचं एक पावणं असेच गाव चावडीवर जे काही दिवसा घडे, ते रात्री झोपेत मोठ्याने बडबडत असत. तुम्ही असे का करता आम्हाला भ्या वाटतं, म्हणून त्यासनी सांगितलं तर

त्यांचा विश्वास बसत नसं. "म्या कुठं आसं करतोय?" ते म्हणत. तसाच यांचा प्रकार असावा, असे मला लक्षात आले. एकदा हे आमचे पावणे लग्नाला म्हणून मुंबईला गेले. परतताना रात्री टेंपोच्या ड्रायवरनी म्हटलं, "आता रातचं दोन वाजल्यात. मला झ्वाप येतिया. वाईच झोपतो मग जाऊ पहाटेच्या येळला गावाकड. त्या तासाभरात आमच्या पावन्याला उखनं उठलं अन् ते झालं गायब. बिना परवान्याचा चालक पहाट व्हायला लागली तसा वऱ्हाडाला घेऊन सोलापूरला परतला. घरची दोन लोक नंतर तीन दिवसांनी पावण्यांना पकडून यशटींने घेऊन आले. अशीच तऱ्हा त्यांची.

मग मी जरा सरावलो. पण तुम्ही ज्या दिवशी बॅटरी घेऊन आलात, तेव्हा मात्र कहर झाला! फारच जोरात ते ओरडले होते! जे आवाज तुम्ही ऐकलेत तो मीही ऐकले! डोक्यावर पांघरूण घेऊन, डोळे किलकिले करून मी ते पाहत होतो! तुम्ही आल्यागेल्याचे, बोलल्याचे मी ऐकत होतो. नंतर तुम्ही बोक्याचे ते आवाज होते म्हणून त्यांना सांगितल्यावर ते बरं बरं म्हणाले, तेही मी ऐकले. पण तो खरा प्रकार असा होता! विपश्यना शिबिरातील भुताटकीवरील तुमचा किस्सा एका लेखातून सुनवेन, असे मित्र दिलीप आठवल्यांना पुण्यात स्टेशनवर निरोप घेताना म्हटले होते. ते आज मिसळपाववर दिवाळी अंकातून साकार झाले. "पण सर, तो शिबिरातील आत्महत्या करायला जाणाऱ्याचा किस्सा सांगायचा राहिलाय बरं का" असे त्यांनी हात हालवत नजरेआड व्हायच्या आधी म्हटले. मी म्हणालो, "वो किस्सा फिर कहीं, फिर कभी."

# आमचे दिवाळी व्यवस्थापन !!

## मामलेदारचा पंखा

दसऱ्यानंतरच्या एका (मी डोळ्यात प्राण आणून ज्याची वाट पाहत असतो अशा) रविवारी मस्त उशीरा उठलो. घड्याळ ९.३० ची वेळ दाखवत होते. पहिल्यांदा मला एक जबर धक्का बसला. मला वाटले बहुतेक आज माझे ऑफिस बुडल्यात जमा की काय? पण मग सावरलो. माझ्या अवलक्षणी सवयीप्रमाणे मी चहा नामक उत्तेजक पेय डोळ्यासमोर आणले आणि मला ते प्यावेसे वाटले. इकडे तिकडे पाहत, "कुणी मला चहा देईल का?" अशी आर्त साद मी घातली, ती नेमकी सौ.च्या कानावर पडली. त्याच क्षणाला माझी, रविवारची शांतता संपुष्टात आली. स्वयंपाकघरात आतून डरकाळी फोडावी तसा सौ.ने आवाज चढवला. "हं, उठलास वाटतं (आमच्याकडे स्त्री पुरुष समानता आहे, त्यामुळे "नो अहो-जाहो, इकडची स्वारी, तिकडची स्वारी.") आता काय चहाच हवा असेल. तुझा तेवढा रविवार आणि माझा काय सोमवार आहे असे वाटते का? जमत नव्हते तर कशाला वर तोंड करून बोललास की दर रविवारी मी चहा करेन. मी याव करेन नि त्याव करेन. ह्याचे नुसते बोलणेच पाहून घ्या" वगैरे वगैरे. माझा इकडे अंथरुणात उंदीर झाला. स्वयंपाकघरात मंगल सनई आपोआप वाजायला लागली. मी परत अंगावर पांघरूण घेणारच इतक्यात सौ. माझ्यासमोर दुर्गादेवीसारखी प्रगट झाली. "पुन्हा झोपतोस की काय? हद्द झाली आता. मी एकटीच उठून तडफडते आहे आणि तुला काय होतंय चहाच्या ऑर्डरी सोडायला? मलाही जास्त वेळ झोपावेसे वाटते. पण तरी मी काय करू शकणार? जाऊ दे, चल उठ लगेच. आपल्याला आज खूप काम आहे. सांगते नंतर तुला, आधी आवरून घे." माझ्या अंगावर काटा आला. मनात म्हटले, "आवरून घे" म्हणजे नक्कीच आपला रविवार बुडीत खात्यात जमा करणारे काहीतरी असावे. पण नाविलाज को क्या विलाज?

अस्मादिक आज्ञाधारक नवऱ्याप्रमाणे उठले आणि एयर इंडियाच्या महाराजाचा पवित्रा घेऊन उभे राहिले. बायकांना जात्याच स्वसंमोहन अवगत असते असे लग्नाआधी मागे मी एकदा ऐकले होते तेव्हा त्याचे प्रचंड कुतूहल वाटले होते. परंतु आता गेली २ वर्षे सतत त्याचे माझ्यावर गिनिपिगसारखे होत असलेले प्रयोग पाहून ते कुतूहल पूर्णपणे मावळले . आज आपल्या नशिबात काय वाढून ठेवले असेल त्याची सूतराम कल्पना मला काही केल्या येत नव्हती. खूप काम म्हणजे काय? नक्की मला कुठे जुंपले जाणार आहे तेच ठाऊक नव्हते. परिस्थितीचा अंदाज घेत, कसलेल्या शिपायाने शत्रूच्या भूमीत पावले टाकावीत, तसा मी घरात फिरू लागलो. कारण गोळीबार कधी, कुठून आणि कसा सुरु होईल ते सांगणे ब्रह्मदेवाच्या तीर्थरूपांना पण जमले नसते. घरात नक्की काय काम निघाले असावे यासाठी थोडी टेहाळणी केली पण माझ्या अज्ञ नजरेला कुठलेही काम दिसेना. (तसे मला काहीच दिसत नसते. पण आमच्या सौं.ची नसलेले काम निर्माण करण्याची हातोटी प्रचंड आहे.) मग मनाचा हिय्या करून मी सौ.लाच (दबक्या आवाजात) विचारले. "नक्की काय करायचंय आपल्याला आज? "ह्यानंतर साधारण २० मिनिटे झालेलं संभाषण तुम्हाला सांगण्यासारखे नाही. (तुम्हाला उत्सुकता असेल पण तरी नका विचारू) मात्र त्याचा थोडक्यात सारांश असा होता की मी कसा नवरा म्हणून निरुपयोगी आहे. इतर मैत्रिणींचे नवरे कसे प्रचंड कामसू आहेत (कोण लेकाचा गेलाय बघायला? लंकेत सोन्याचं विटा.) .माझ्यात जबाबदारी उचलण्याची तयारी नाहीये. (हे मला तिनेच सांगावे जिची जबाबदारी मी घेतलीय असे मी लग्नात कबूल केले होते. कुठे गेले ते देव आणि ब्राह्मण जे ह्या सगळ्याचे साक्षीदार होते? आता फक्त अग्निदेव उरलेत ज्यात मी खरपूस भाजून निघतोय आणि मग माझे लचके तोडले जातात!)

एकाएकी ती खास ठेवणीतल्या लाडातल्या भाषेत बोलू लागली. त्याचे काय आहे ना, तुला मला मदत करायला नको का? मग आपण आपले काम लवकर आवरून थोडा आराम करू शकू की नाही? (हे नुसते गाजर!) तरी मी गाढवासारखा दर वेळी फसतो. मग सर्वानुमते (म्हणजे फक्त तीच) असे ठरले की मला आज दिलेले काम जर मी केले तर माझे पापक्षालन होईल! खरं तर असे पापक्षालन मी पूर्वीही कित्येकदा केले आहे पण टोल नाक्याच्या वसुलीसारखे त्यातले मूळचे पाप किती आणि क्षालन कितीचे झाले याचा काही हिशोब अथवा नोंद नाही. हे असे ठरलेले इंजेक्शन मला दिले की मी बधिरता आल्यामुळे पुढचे सगळे काम बिनबोभाट करेन अशी तिची योजना असणार. मी मला दिलेला चहा अमृताप्रमाणे घटाघट पिऊन (चवीमुळे नव्हे, थंड झाल्यामुळे) पुढच्या श्रवणभक्तीकडे वळलो. सौ. कुठून तरी कागद आणि पेन

घेऊन आली. त्यावर अगम्य भाषेत काहीतरी लिहिले होते. (अरे देवा! ही डॉक्टर का नाही झाली?) बराच मोठा प्लान असणार तिचा काहीतरी. मी लगेच बँकेत किती शिल्लक आहे याचे गणित डोक्यात जुळवले. कारण तिच्या हातात कागद पेन हे कॉम्बिनेशन म्हणजे खूप पैसा ओतायची तयारी. अजून पगार झाला नाहीये. बोनस मिळायची तर आशाच नाही. महागाईमुळे डोळ्यात आधीच पाणी उभे राहिलंय. त्यात आता दिवाळी तोंडावर आहे. दि वा ळी !!!! हा, हेच ते कारण असावे ज्यासाठी सौ.चा इतका आटापिटा चाललाय. आणि झालेही तसेच. हजारो प्रकारच्या वस्तूंची यादी तयार करून ती आता माझ्या गळी उतरवण्यासाठी तिचे हे नमनाला घडाभर तेल ओतणे चालले होते तर! असो. बघूया पुढे काय होतंय ते असे म्हणून मी परत तिच्याकडे पहिले तर तिच्या चेहऱ्यावर अर्धी लढाई जिंकल्याचे भाव आताच उमटले होते.

आमच्या प्रेमळ संभाषणाचा हा नमुना -

"हे बघ मी यादी केली आहे. हे सगळे आज आपल्याला जमेल तेवढे संपवायचे आहे. दिवाळीला जास्त दिवस उरलेले नाहीत. नंतर हे राहिले ते राहिले असे नको व्हायला. तू एकदा वाचून बघ.

"नको ग! तूच वाच. तुझा आवाज किती गोड आहे. ( खरे तर मला तिचे अक्षरच कधी लागत नाही.) लता आणि आशानंतर तूच भारताची आशा! हं, वाच काय ते....

"बरं. पहिल्यांदा तू माळ्यावर चढायचे आहेस. तिथे किती जळमटे लागली आहेत हे मी तुला किती वेळा सांगितलंय पण तू दर वेळी टाळतोस. आज आधी ते काम. सगळा माळा खाली काढून साफ करून घेणे हे काम तुझे. (आता आली का पंचाईत. मला धूळीची अलर्जी आहे हे तिला ठाऊक आहे पण ती मला आज माळ्यावर चढवणार म्हणजे चढवणारच. हर हर महादेव!)

"दिवाळीला माळा कसला साफ करतेस. आपण फारतर एक पडदा लावू तिथे......

"नाही म्हणजे नाही. माझ्या सगळ्या मैत्रिणी यावेळी आपल्याकडे येणार आहेत.

"मग तुमची मैफल काय माळ्यावर ठेवली आहे का काय? घरात आलेले कुणीही कशाला जाईल तिथे चढायला?

"तू माळा साफ करणार आहेस, बास! मी हवे तर तुला मदत करेन.

"म्हणजे तू नक्की काय करणार आहेस? मला वर चढवून खालून स्टूल काढून घेणे याला तू मदत म्हणतेस?(गतकाळातील एका दुर्धर व बिकट प्रसंगाची आठवण, आणिक् काय!?!)

"झाले विनोद करून??? चला आता कामाला लागा.

"जरा ती लिस्ट आण बघू इकडे. (मी इतिहास संशोधक असल्यासारखी लिस्ट वाचली.) यात शेकडा ९० टक्के कामे माझ्याच नावावर दिसतायत. तू काय करणार मग नक्की? का मला बाहेर पाठवून तुझा लोळायचा प्लान आहे?

"हो. तुला तेच सुचणार. माझी घरातली कामे तुला कशी दिसतील रे? विचारतोस का तरी कधी मला की किती कामे करतेस तू? काही मदत करू का मी तुला? सदानकदा नुसता आपला पसरलेला असतोस.

"देवदयेने आधीच तुला माझी इतकी मदत मिळते आहे. अजून काय देऊ तुला? माझ्यासारखा नवरा आहे

म्हणून... दुसरा कोणी असता तर कधीच पळून गेला असता.... (ती हा डायलॉग मारण्याआधीच मी मारून घेतला. तेवढाच बुडत्याला काडीचा आधार.......)

"आता खूप झाले. तू नुसता पोपटपंची करत असतोस. आज काम करून दाखव. चल, आधी माळा साफ करणे. मग घरातले गेल्या वर्षीचे राहिलेले सामान जे वापरले गेले नाहीये ते शोधणे म्हणजे रंग, रांगोळी, पणत्या वगैरे. नंतर तुला बाहेर जायचंय आणि फराळाचे पदार्थ जे तू खाणार आहेस त्यांची तयारी म्हणजे कच्चा माल गोळा करायचा आहे. चला........!

इतक्या कडक शब्दात ऑर्डरी मिळाल्यावर मी माझे सगळे शाब्दिक बाण भात्यात परत ठेवले. (पुन्हा वेळ पडल्यावर जपून वापरायला. माझे तिच्यासारखे नाही. तिच्या जिभेवर नैसर्गिक धनुष्य बसवलंय. बाण सुटला की माणूस हमखास उताणा....) सगळ्यात आधी सज्ज होऊन माळ्याकडे मोर्चा वळवला. कसाबसा वर चढलो आणि नको असलेल्या वस्तू शोधू लागलो, पाहतो तर काय, माझ्या हालचालीमुळे एरवी निवांतपणे फिरणारे माळ्यावरचे झुरळ आणि पाली यांचे सैन्य वेगवेगळ्या दिशेने माझ्यावर हल्ला करण्याच्या तयारीतच होते. मीही प्रसंगावधान राखून हातातला झाडू आणि तोंडाची बडबड एकदमच सुरु केली. ग म भ न ची बाराखडी आपसूकच जिभेवर नृत्य करू लागली. ती ऐकून खालून सौ.च्या दिशेने पण गोळीबार परत सुरु झाला. "बघ, मला वाटलंच वर झुरळं-पाली झाल्या आहेत. घरभर फिरत असतात. तुला किती वेळा सांगितले की पेस्टकंट्रोलवाल्याला बोलाव पण नाही! तुला कुठे जमतंय? काही करायलाच नको.

मी सगळीकडून होणाऱ्या हल्ल्यामुळे बावचळून गेलो आणि त्या गडबडीत माळ्यावर ठेवलेल्या कप बश्या माझ्या धक्क्याने खाली पडल्या आणि एका नवीन अध्यायाला सुरुवात झाली. तो सेट नेमका लग्नात तिच्या घरच्यांनी दिला होता. आता माझा धीर सुटला. मी झाडू टाकून दिला आणि खाली उडी टाकली. खाली सौ. विठ्ठलासारखे दोन्ही हात कमरेवर ठेवून उभीच होती. गुन्हा आणि गुन्हेगार दोन्ही समोरासमोर होते. हा सूर्य आणि हा जयद्रथ! जयद्रथाच्या छातीचे ठोके अख्ख्या इमारतीला ऐकू जातील असे होते. मान खाली घालून कुर्बानीसाठी मी तयार झालो. त्यानंतर सगळे रीतीप्रमाणे झाले. मला घराबाहेर पिशव्या हाती देऊन हाकलण्यात आले. मीही पडत्या कप बश्यांची आज्ञा घेऊन बाहेर पडलो. खिशात जेमतेम १००० रुपये होते..म्हटले पुरेसे आहेत. काही जास्त सामान दिसत नाहीये....

एका किराणामालाच्या दुकानात कसाबसा घुसलो. दिवाळीसाठी खास आलेल्या वस्तूंनी आणि माणसांनीही दुकान ओसंडून वाहत होते. हवेत बेसन, गूळ, डाळी यांचा घमघमाट सुटला होता. मी माझी यादी पाहून भाव न विचारताच वस्तू बांधण्याची ऑर्डर दिली. आजूबाजूच्यांनी नजरेतूनच, "हा महामूर्ख कुठून आलाय देव जाणे" असे सर्टिफिकेट केव्हाच मला देऊन टाकले. दुकानदाराने मात्र तत्परतेने असे गिऱ्हाईक परत परत येत नसल्यामुळे माझे सामान बांधायलाही घेतले. संपूर्ण पिशवी भरून सामान आणि त्याचे बिल सुद्धा त्याने माझ्या हाती ठेवले तेव्हा मात्र मला फेफरे आले. त्याने लावलेले भाव पाहून माझ्या चेहऱ्यावरचे भावसुद्धा त्याच गतीने बदलू लागले. "कसा झटका बसला ह्याला, आता होईल सरळ." असे म्हणत ही गंमत पाहण्यासाठी बरेच लोक मुद्दाम वेळकाढूपणा करत तिथेच उभे होते. माझा चेहरा पाहून त्यातल्या बऱ्याच लोकांचे समाधान झाले आणि ते आपापल्या कामाला चालू पडले. आता दुकानात मालक आणि मी असे दोघेच होतो. मी मालकाला म्हटले, "अहो मी वस्तू मागितल्या होत्या. तुमच्या दुकानाचे खरेदीखत नाही. हे काय दिलंय मला? एवढ्याश्या वस्तूंचे बिल १२४० रुपये?"
"अहो ते बिलच आहे. दुकानाचा भाव ऐकलात तर आता इथूनच हॉस्पिटलला जायची वेळ येईल."
मी दिलेली पिशवी पुन्हा उपसायला सुरुवात केली. पहिल्यांदा तुपाचा डबा काढला. त्यावर स्पष्ट भाव होता, रू. २८० प्रति किलो. बापरे! यावेळी आपण तूप नकोच वापरायला. हे द्या परत ठेवून. आणि २०० ग्रामचा डबा असला तरच द्या. मागच्या वेळी मी तूप घेतले होते तेव्हा ते १६० रु किलो होते आणि आता एकदम २८०? मोगलाई लागली आहे काय? भाव म्हणायचा का मस्करी?
"काय साहेब, दीड दोन वर्षांनी आज बाजारहाट करायला बाहेर पडलाय काय तुम्ही? जरा अधून मधून मार्केटात एखादी चक्कर मारत जा, मग कळेल!"

एव्हाना मला फक्त माझ्या खिशात १००० रुपये आहेत ह्या सत्याची टोचणी लागली होती. बर एखादा पदार्थ काढून टाकावा तर घरी सकाळच्या प्रसंगाचा रिपीट टेलिकास्ट झाला असता म्हणून तो विचार झटकून टाकला. पण मग आता करायचे तरी काय? पुढची खरेदी तर बोंबललीच होती. आता इथूनच घरी जाणे भाग होते. मग मी माझे खिसे चाचपायला सुरुवात केली. नशीब जोरावर असल्यामुळे हाताला एक ५०० ची नोट एका कप्प्यात कोंबलेली सापडली. अतिशय गरजेच्या वेळी ती उपयोगाला येईल म्हणून मीच कधीतरी ती ठेवली असणार आणि आजच्या दिवसापेक्षा अधिक गरजेचा दिवस माझ्यासाठी कोणताही नव्हता. एक रुपयाही कमी दिला असता तर ह्या मालकाने मला पुड्या बांधण्यासाठी ठेवायला पण कमी केले नसते. शेवटी एकदाचे पैसे देऊन तिथून बाहेर पडलो आणि परत घराकडे मोर्चा वळवला. दिवाळी जवळ यायला लागली तसे एक एक करून कल्पनाही न केलेले खर्च उभे राहू लागले. मध्यंतरीच्या काळात आमच्या कंपनीने आम्हाला बोनस दिला. बोनसची 'एवढी प्रचंड' रक्कम पाहून मला इन्कम टॅक्सवाले आपल्या घरी धाड तर घालणार नाहीत ना ह्या विचाराने रात्र रात्र झोप लागायची नाही. आपण माकडांना सुद्धा गम्मत म्हणून खायला यापेक्षा जास्त शेंगदाणे देतो. एवढ्या रकमेत दिवाळीसारखा सण साजरा करणे म्हणजे एक मोठे दिव्यच होते. पण ते आव्हान मी स्वीकारले. (न स्वीकारून सांगतोय कोणाला?)

सालाबादप्रमाणे कपडे खरेदी आली. सौ.ला घेऊन खरेदीला जाणे हा आनंददायी अनुभव असतो. आपल्यासाठी नव्हे, आपल्या आजूबाजूच्या सगळ्यांसाठी! प्रत्येक कपड्याच्या दुकानात कमीत कमी अर्धा तास घालवल्यावर वर त्याच्या मालकालाच, "तुमच्याकडे व्हरायटी काहीच नाही, नवीन स्टॉक आला की सांगा", असे ऐन सणासुदीच्या काळात गर्दीने भरलेल्या दुकानात सांगायला सिंहाचे काळीज लागते आणि ते तिच्याकडेच आहे. माझ्यासारखी माणसे आपल्या समोर टाकलेल्याच कपड्यातून त्यातला त्यात बऱ्यापैकी कपडा शोधून पाचव्या मिनिटाला दुकानाबाहेर पडणे हे आपले कर्तव्य समजतात. सौ.ने दिवाळी परत कधीही येणार नसल्यासारखी खरेदी केली आणि तिच्याबरोबर नुसता फिरून मी अर्धमेला झालो. खिशातले सगळे पैसे संपेपर्यंत तिचा उत्साह मात्र अबाधित होता. जणू काही काँग्रेस सरकारने तिच्या नावे मुंबईतले दोन तीन पेट्रोल पंप आंदणच दिले आहेत. त्याउपर "आऊचा काऊ तो माझा भाऊ" या नात्याने तिच्या ढीगभर नातेवाईकांना सदिच्छा भेट म्हणून देण्यासाठी सुकामेवा आणि इतर दुग्धजन्य पदार्थ यांचीही खरेदी झाली. "दिवाळी हा सण सार्वजनिक असून तो केवळ आपल्या विभागापुरता मर्यादित नाही. इतर भागात दुष्काळ पडला असून तिथे मदत पाठवायची असल्यासारखी खरेदी करू नकोस" असा सल्ला मी त्या दिवशी ५६ वेळा ओठाशी आणून गिळला. दिवाळी आधीच रस्त्यात माझ्यावर फटाक्यांची आतिषबाजी होऊ नये म्हणून मोठ्या कष्टाने मी तो विषय टाळला.

दरम्यान मी आणून दिलेल्या सामानाची कशा प्रकारे 'विल्हेवाट' लावली गेली आहे हे पाहायला कामामुळे वेळच मिळत नव्हता. घरी आलो की नेहमी घरात चित्रविचित्र वास दरवळत असायचे. एक दिवस घरात इतक्या प्रमाणात जळण्याचा धूर जमा झाला होता की सौ.ने पार्ट टाईम फटाक्यांचा उद्योग तर सुरु केला नाही ना अशीही शंका मनाला चाटून गेली. पण मग एकदा हिम्मत करून स्वयंपाकघरात प्रवेश केला आणि तयार फराळ पहिला. दिवाळीनंतर मारामारीसाठी भरपूर शस्त्रास्त्रे असणार याचा मला प्रचंड आनंद झाला. चव घेऊन पहा असे म्हणत सौ. मागे लागली होती पण जर आताच चव घ्यायचा प्रयत्न केला तर ऐन दिवाळीत काहीच टाईमपास राहणार नाही म्हणून मी नको म्हटले. साबण, तेल आणि उटणी यांचा उपयोग आमच्या नंतरच्या २ पिढ्या सुद्धा करू शकतील इतक्या प्रकारची होती (एवढे करून ती मला लावून घ्यायला सौ. नेहमी विसरते. दिवाळी नंतर घरात हरवलेलं काहीही शोधले तरी उत्तेजनार्थ पारितोषिक म्हणून एक उटण्याचे पाकीट नक्की मिळतेच!) खिसे रिकामे होत होते आणि वस्तू घरात येत होत्या. त्यांचा उपयोग आहे की नाही ते पाहिल्याशिवायच 'दिवाळी खरेदी' या गोंडस नावाखाली त्या आणणे चालू होते. अचानक मला एक महान शोध लागला. मी माझा निष्कर्ष लगेच मांडला. घरात ह्या ज्या काही वस्तू येत होत्या त्या पुढच्या दिवाळीत बनणाऱ्या लिस्टमध्ये 'माळा साफ करणे' या सदराखाली मोडणार होत्या! आज पेरलेले उद्या उगवते ही म्हण सार्थ करणारी परिस्थिती कशी तयार होईल ह्याकडे जातीने लक्ष देण्याचे काम सौ. करत होती.

मध्यंतरीच्या काळात दिवाळी असल्याची जाणीव पदोपदी करून देणारे लोक भेटतच होते. पहिला बॉम्ब आमच्या घरातल्या मोलकरणीने टाकला. सौ.ला म्हणाली, "ताई, ह्यावेळी मला साडी-बिडी काही नको. (तिला देणार कोण होते हा दुसरा प्रश्न) तुम्ही आपला माझा एक पगार टाका. मी काय हवं ते करेन त्यातनं." या बायकांच्या अशा गुगलींना सौ. चांगलीच सरावलेली आहे. ती लगेच म्हणाली, "चालेल. ठीक आहे. नाहीतरी दिवाळी निमित्त घरातले डबे, भांडी घासायलाच झाली आहेत. ती देते तुझ्याकडे. (तुला कोण

नुसती दिवाळी देईल ग?) तिचे हे बोलणे ऐकून शून्यावर आउट झालेल्या फलंदाजासारखे तोंड करून बाई निघून गेली. त्यानंतर अशीच एक दिवशी बेल दाबली गेली. मीच दरवाजा उघडला. तसा माझा अवतार, मी त्या अवस्थेत कोणाला दर्शन द्यावे, असा नव्हताच. एका हातात झाडू आणि एका खांद्यावर सगळे घर पुसून काळे पडलेले फडके, अशा जाम्यानिम्यासह मी प्रश्नार्थक चेहऱ्याने कोण आले आता ह्या वेळी कडमडायला, असे भाव मनात आणत समोर पहिले तर एक हिरोवजा मुलगा आमची बेल दाबत होता. अंगात मस्त टीशर्ट, एक महागडी दिसणारी जीन्स आणि डोळ्याला गोविंदा स्टैल गॉगल! मी विचारले, "बोला. काय पाहिजे?

"दिवाळी."
"अरे तिला यायला वेळ आहे अजून."

"तसे नाय वो. मला दिवाळी द्या."

(ह्याला कसली दिवाळी? आणि मुळात हा आहे तरी कोण?)

"तू कोण बाबा?"

मला नाय वलाखलाव? मी तुमचा दूध टाकणारा पोऱ्या!

(अरे बाप रे! बाबा, इथे मीच तुझा पोऱ्या वाटतोय रे...... तूच दे मला काही तरी.....)

"अच्छा. तूच काय तो? रोज कितीही वायुवेगाने दार उघडण्याचा प्रयत्न केला तरी त्याच्याही आत धूमकेतूसारखा पळून जाणारा?"

"व्हय. मीच तो. रोज तुमचे तोंड पाहायला थांबत जाव काय उद्यापासून म्हनताव तर? जरा लवकर द्या की! मला अजून ५-१० घरी जायचा हाय....

"तुम्हाला सगळ्यांना इतक्या लवकर दिवाळी कशाला हवी असते रे?

"द्या की सायेब, तेवड्या पैशात काय गाडी घेणार हाय का तुमी?

माझे तोंड त्याने फेविकॉल लावल्यासारखे बंदच करून टाकले. त्याला कसाबसा १० रुपये देऊन वाटेला लावला.
ही तर फक्त सुरुवात होती. त्यानंतर कचरेवाला, माळी, धोबी, टेलिफोनवाले, इलेक्ट्रिसिटीवाले...... वाटेल ते लोक दिवाळी मागायला येत होते. सगळ्यात कहर म्हणजे घराखालचा रस्ता झाडणारा माणूससुद्धा पैसे द्या म्हणून मागे लागला. मी घरातच रिझर्व बँक उघडल्यासारखे मला वाटायला लागले. मी सगळ्या रिक्षावाल्यांशी भांडण करून करून महत्प्रयासाने मिळवलेले सगळे सुट्टे पैसे छूमंतर झाले, तसाच पगार आणि बोनस तर कधीच कापरासारखा उडून गेला.

अशातच येणार येणार म्हणता म्हणता दिवाळी आलीच. घर कधी नव्हे ते लख्ख दिसत होते. (त्यामुळे राहून राहून आपण कोणाकडे तरी पाहुणे म्हणून राहायला आलोय की काय अशी शंका येत होती.) आकाशकंदील, पणत्या, नवीन कपडे, गोड-धोड पदार्थ, सगळे काही सज्ज होते. पाहुणे, मित्रमंडळी यांचे येणे जाणे सुरु झाले. दिवाळीच्या त्या ५ दिवसात जेवढ्या मैफिली जमल्या त्या सगळ्या येणारे नवीन वर्ष नव्या उत्साहाने जगण्याची उमेद देऊन गेल्या. कित्येक जणांचे फोन येऊन गेले. फराळाची ताटे बिल्डींगभर फिरू लागली. घराघरातली बच्चेकंपनी त्यात अजूनच धमाल आणत होती. अक्षरशः स्वप्नवत्

जात होते ते दिवस! सौ. तर सगळे मनासारखे झाल्यामुळे एवढी चांगली वागत होती की कधीतरी ती माझीच बायको आहे ना, अशीच शंका येत होती. पण तिच्यातला हा तात्पुरता का होईना पण झालेला बदल सुखावणारा होता.

सौ.ने न चुकता घरातल्या सगळ्या गोष्टींचं व्यवस्थापन चोख केले होते. आमच्या घरातला फराळ मी त्याचे ताट बाहेर जाण्याआधीच चाखून पाहिला. उगाच बिल्डींग मधल्या लोकांशी वाकडे नको. आश्चर्य म्हणजे घरात दरवळणारे वास जरी विचित्र असले तरी पदार्थ मात्र अत्यंत चविष्ट झाले होते. मी चाटच पडलो. तिलाच विचारले की हा काय प्रकार आहे? तर ती उसळलीच. हे बघ, जे केलंय ते गप खा. जास्त प्रश्न विचारायचे नाहीत. पण मला भयानक उत्सुकता लागली होती. मी तिला खूपदा विचारल्यावर ती हळूच म्हणाली,
"सगळे विकत आणले आहे..........."

माझे डोके भणभणायलाच लागले. किराणामालाच्या दुकानात झालेला प्रसंग अजून ही जीवाला चटका लावत होता त्यावर आता हे काय नवीन?

मी कधी नव्हे ते चिडून म्हटले,

"मग हेच करायचे होते तर मला कशाला पिशवी देऊन एवढे ओझे उचलून आणायला सांगितलेस?" तर त्यावर तिचे थंड उत्तर होते, "गॅसचा भाव काय चाललाय माहित आहे ना तुला? ह्या सगळ्यात गॅस घालवला असता तर ऐन सणासुदीत वेळेवर कोण देणार होतं? शिवाय गॅसवाल्याला दिवाळी द्यायला लागली असती ती वेगळीच. बघ मी तुझे किती पैसे वाचवले?"

"बरं केलंस बाई. आता हे सगळे कितीला पडले तुला? आणि घरातल्या सामानाचे काय केलेस?"

"जास्त नाही काही. सगळा फराळ फक्त १५६० रुपये. मला म्हणून स्वस्त दिलंय नाहीतर २००० च्या खाली कुठे मिळत नाहीये. घरातले सामान मी आईकडे पाठवून दिलंय."

मी नंदीबैलासारखी मान हलवत अजून एक लाडू तोंडात कोंबला.

दिवाळी म्हणून असणारी लोकांची लगबग पाहून मात्र मनाला कुठेतरी खूप बरे वाटत होते. आयुष्यात कितीही त्रास, कटकट असू दे पण ह्या दिवसात मात्र मन खरच प्रसन्न राहते. एखादं दोन दिवस का होईना पण नवीन गोष्टींचे आयुष्यात स्वागत करणे आणि थोडासा बदल करून ते सुसह्य करणे हा उद्देश मात्र दिवाळीमुळे सुरेख साध्य होतो.

अत्यंत गरीबातले गरीब कुटुंबसुद्धा ह्या दिवसात त्यांच्या परीने जमेल तसे सण साजरा करण्याची धडपड करीत असते. म्हणून मग आम्ही दोघांनी सुद्धा ठरवले की आपल्या कॉलनीतल्या सायकल रिपेरिंग करणाऱ्या तुकाराम मामाच्या घरी जेवढे जमेल तसे फराळ, कपडे आणि त्याच्या मुलांसाठी फटके नेऊन द्यायचे. एक दिवस आम्ही ते सगळे घेऊन त्याच्या छोट्याश्या घरासमोर उभे राहिलो आणि त्याच्या मुलांच्या हातात ते सगळे ठेवले.

"दिवाळीच्या पणत्यांची आणि उत्साहाची खरी चमक आम्हाला त्या डोळ्यांमध्ये दिसली आणि आमची दिवाळी सार्थकी लागली!

# बाप

**रामदास काका**

सातवीच्या वर्गात असताना माध्यमिक शिष्यवृत्तीचे फॉर्म भरायची तारीख जवळ येत चालली होती.आमच्या शाळेतून आम्ही चार - पाच विद्यार्थी फॉर्म भरणार होतो. माझाच फॉर्म अजून भरला गेला नव्हता. सगळ्या तुकड्यात पहीला नंबर असल्यामुळे हेडबाईंनी सांगितलं होतं, भट्टेचा फॉर्म आल्याशिवाय खात्याकडे फॉर्म पाठवू नका.

गालगुंड झाल्यामुळे मी दोन दिवस शाळेत गेलो नव्हतो. मधल्या सुटीत पोळ बाईंनी मला स्टाफ रुममध्ये बोलावलं.

"ह्या दोन फॉर्मवर तुझ्या बाबांची सही घेऊन ये. पुढच्या आठवड्यात हे सगळं खात्याकडे पोहचवायचं आहे." मी मान डोलावली.

आमच्या शेजारचे मथुरेकाका तिथेच बसले होते. आमच्या शाळेत अर्धवेळ कलाशिक्षक म्हणून काम करायचे. त्यांचं बिऱ्हाड आमच्या बाजूच्या वाड्यातच होतं. चौकात बोर्ड रंगवायचं दुकान त्यांचच होतं. आमच्या दादांच्या वर्गात होते म्हणे ते! पण का कुणास ठाउक माझ्यावर नेहमी रागवायचे. चित्रं चांगली काढली तरीही रागवायचे.

बाईंना सांगितलं, देतो उद्या फॉर्म. बाहेर आलो आणि आठवलं दादा तर घरी नाहीयेत. मी परत बाईंकडे गेलो.

"बाई, आमचे दादा घरी नाहीय्येत. आता काय करायचं?"

स्कॉलरशिपची परीक्षा चुकणार म्हणून माझा जीव कासावीस व्हायला लागला.

मथुरे सरांनी मध्येच तोंड घातलं.

"अरे, दादा नसतील तर विश्वासराव नक्की घरी असतील बघ. त्यांची आण सही. एकूण एकच." असं म्हणून खदाखदा हसायला लागले.

पोळ बाईंना भयंकर राग आला.

"मथुरे सर, मुलांच्या समोर असं वेडवाकडं बोलू नका. मी हेडबाईंकडे तक्रार करीन."

मथुरेंना राग आला. त्यांनी हातातलं रजिस्टर जोरात आपटलं.

"अहो बाई, तुम्ही का मनावर घेताय?"

आणि माझ्याकडे बघून म्हणाले,

"काय रे तुला काही वाईट वाटलं का?" आणि आणखी जोरात फिदीफिदी हसले.

बाईंनी मला जायची खूण केली .मी बाहेर आलो पण आतून बऱ्याच वेळ बाईंचा रागावलेला आवाज येत होता. मथुरेकाका असं का म्हणाले याचाच विचार करत राहीलो. माझी टर ऊडवली जाते आहे हे नक्की कळलं पण त्याचा अर्थ काही केल्या कळेना.

थट्टा माझीच नव्हती. दादांचीच होती हे मला कळलं आणि मला गळ्यात काहीतरी अडकल्यासारखं वाटायला लागलं. शर्टाच्या कॉलरजवळचं बटन लावल्यानंतर गळ्याला सारखं सारखं घट्ट वाटावं असं वाटायला लागलं.

घरी येताना मी रुमाला पण विचारलं. आता रुमा म्हणजे माझ्या मागे दोन वर्ग असली तरी मानापमानाचे सगळे प्रॉब्लेम मी तिलाच विचारायचो.

मग दुपारी घरी आल्यावर आईला विचारलं तर तिच्या डोळ्यात टचकन् पाणी आलं मग मलाही रडावसं वाटलं .

संध्याकाळी रुमा धावत पळत घरात आली.
"रावांनी बोलावलंय तुला."
मी म्हटलं, "कशाला? आत्ता तर बैठकीची वेळ आहे ना?"
"म्हणूनच तुला बोलावलंय."
मी माडीवरून खाली आलो.
बैठकीत सात आठजण बसली होती.
मला बघितल्यावर राव उठले.
"ये, आत ये."
ते आणि मी आतल्या खोलीत गेलो.
"आज मथुरे मास्तर काय म्हणाला?"
मला रडायला यायला लागलं. मग मी अडखळत सगळं काही सांगितलं.
रावांच्या चेहेऱ्यावर राग वाढत जात होता.
मग बोलताना मी थांबलो. "मग पुढे काय?"
"काही नाही."
राव अचानक शांत झाले. मला म्हणाले, "ठीक आहे. तू आईची सही घे त्या फॉर्मवर आणि पोळ बाईला देऊन टाक."
आता मला थोडी हुशारी वाटत होती .
मी विचारलं, "मी जाऊ आता."
"हां. हां. जा आता. विचार करत बसू नको. आपल्याला स्कॉलरशिप मिळवायची ना?", राव म्हणाले.
मी, "हो", म्हटलं.
"मग जा आता आणि अभ्यास करा."

-------------------------------------------------------------------

साताठ दिवसात मी सगळं काही विसरलो.
ऑगस्ट महिन्यात, नागरीक शास्त्राच्या बाईंनी, आम्हाला निवडणूक आणि लोकशाही शिकवलं.
त्याच्या पुढच्या तासाला मथुरे सर आणि पीटीचे पाटील सर वर्गात आले.
"या वर्षी आपण शाळेत निवडणूका घेणार आहोत."
आमच्या वर्गात एक्कच गोंधळ. सगळेच जण निवडणूकीचे उमेदवार व्हायला तयार.
दोन चार जणांना चापटवल्यावर वर्गात बऱ्यापैकी शांतता पसरली.
वर्ग-समितीसाठी चार आणि शालेय समितीसाठी एक उमेदवार अशी निवडणूक होणार होती.
पाटील सर म्हणाले, "तू शालेय समितीसाठी उभा रहा. सातवीच्या सगळ्या तुकड्यातली सगळी मुलं तुला ओळखतात."
मथुरे सर काहीच बोलले नाहीत. पोळ बाईंनी झापल्यापासून माझ्याशी त्यांनी बोलणं टाकून दिलं होतं.
तासभर ओरडाआरडा झाल्यावर चार जागांसाठी सात उमेदवार आणि शालेय समितीसाठी आमच्या तुकडीतून मी एकटा.
"चला, उद्यापासून निवडणूकीच्या तयारीला लागा."
पुढच्या दोन तासात वर्गात कोणाचेच लक्ष नव्हते. सगळ्यांनी प्रचाराचे मनसुबे जाहीर केले. मला काही सुचेना.
मला सगळे हुशार मुलगा म्हणून ओळखायचे पण निवडणूक म्हणजे काय काय करायचं हे मला नव्हतं माहीती. रुमा मला डबा खायच्या सुट्टीत भेटली तेव्हा मी सांगीन म्हटलं तर तिला आधीच ते

माहीती होतं. ती पण निवडणूकीला उभी राहणार होती .
"आपण दोघं दोघं शालेय समितीवर. मज्जा यील नाय," रुमा म्हणाली.
मी म्हटलं "त्यात मज्जा काय?"
तर मला म्हणाली कशी, "तुला माहीत्येय ना आपण दोघ, आं... आं... आं!
मी म्हटलं, "ते मोठेपणी गं. आत्तापासून काय त्याचं?"
खरं सांगायचं तर ती शालेय समितीवर माझ्या बाजूला बसेल. आम्ही दोघंच बोलत राहू. या कल्पनेनी मला छान छान वाटायला लागलं.
पोळ बाई भेटल्या. मला म्हणाल्या, "अरे, निवडणूक म्हणजे सगळ्यांना भेटायचं. सांगायचं, मला मत द्या. माझी निशाणी काय अमुक तमुक आहे, ते सांगायचं."
मला काही त्यात मजा वाटत नव्हती. पण पाटील सरांनी सांगितलं तर आता ऐकायलाच हवं.
रुमा मला म्हणाली, "आपण रावांना विचारू या. राव आमच्या गावात नेहेमी निवडणूकीच्या कामात असायचे."
शाळेची निवडणूक आणि रावांना विचारायचं. बाप रे!
रुमा म्हणाली, "मी सांगते आईला. ती रावांना सांगेल."
दुसऱ्या दिवशी रविवार होता. मी आणि रुमा मागच्या पडवीत, अभ्यास करायचा सोडून कागदाच्या चौकोर तुकड्यांवर, मते द्या. मते द्या. निशाणी अमुक तमुक असं लिहीत बसलो होतो.
रावांच्या फटफटीचा आवाजा सुध्दा आमच्या कानावर आला नाही.
आम्हाला चाहूल लागली तेव्हा कळलं की राव मागे उभं राहून आम्ही काय करतोय ते बघत होते. राव बरेच खुशीत दिसत होते.
रुमानी हळूच त्यांना सांगितले, “आमच्या ना, शाळेत ना, निवडणूक आहे.”
"अरे मग तुमची पोस्टरं बनवा. जिंकून आलंच पायजे आपल्याला!"
राव जोरात हसले पण हसल्यावर एक आंबट वास आला.
रुमा म्हणाली, "राव म्हणाले तर आता आपण जिंकणारच हां!" रुमा जाम खूष झाली होती.
थोड्या वेळानी रावांच्या हाकेवर आम्ही बैठकीवर गेलो.
राव बोटावर बोट आपटत मला म्हणाले, "तू मला उद्या संध्याकाळी भेट. बरोब्बर सात वाजता ये."
ये म्हणजे काय मी तर असणारच ना."
दुसऱ्या दिवशी सकाळी राव आणि दादा सोबतच आले. दादांना आणायला राव नेहेमी स्टेशन वर जायचे. रावांच्या जीपमधून दोघं घरी यायचे. औषधपाण्यासाठी दादा दोन दोन दिवस ठाण्याला जायचे आणि दोन दिवसानी घरी आल्यावर एव्हढे थकलेले असायचे की सारखे सारखे झोपून जायचे.
दादा घरी आले की मला छान छान वाटायचं. आई आतूनच त्यांच्याकडे निरखून बघत रहायची ते पण छान वाटायचं. दादा घरी आले की आई त्या दिवशी दादांची आवडती आंबोळी आणि नारळाच्या दुधातली खीर बनवायची. अर्थात त्या दिवशी रुमा आमच्याकडेच जेवणार हे सांगायलाच नको. आम्ही दोघंही दादांकडे बघत बघत जेवायचो. जाळीदार आंबोळी लेसच्या पडद्यासारखी दिसायची. मधूनच दादा एक घास मला भरवायचे. माझ्याकडे बघून रुमा पुढे सरकायची. मग एक घास तिला पण. दादा फारसे बोलायचे नाहीतच. बोललेच तर एक दोन चार वाक्य. एव्हढे जपून जपून बोलायचे की एका शब्दानंतरचा दुसरा शब्द ऐकू येईस्तो पहिला शब्द विसरायला व्हायचं. पण हे नेहेमी नाही. औषधासाठी ठाण्याला जाऊन आल्यावरच. मग मी दादांना निवडणूकीची गंमत सांगितली.
"निवडणूक लढायची म्हणजे मन खंबीर हवं."
"रिठ्याच्या काळ्या बी सारखं टणक. थोडसं घासलं की गरम होणारं. जास्त घासलं की घासणाऱ्याच्या बोटाला चटका देणारं."

माझ्याकडे बघत मला म्हणाले, "तुझं मन नाही रे तसं. तुझं मन आहे सावरीच्या बोंडासारखं. थोडा उन्हाचा चटका बसला की उलणारं. मग सगळं काही वाऱ्यावर आणि हातात रिकाम्या कुयऱ्या."
मला काही म्हणता काही कळालं नाही. दादांचं बोलणं असंच असायचं. आता ऐकलं की दोन तासानी हळूच मनात शिरून समजणारं.

मग संध्याकाळी मथुरे सरांच्या दुकानातून एक माणूस आलेला मी बघितला आणि मी खाली गेलो. राव त्या माणसाशी बोलत होते. मला एव्हढंच कळलं की रावांनी त्या माणसाला माघारी पाठवून मथुरे सरांना बोलवायला सांगितलं.
तो माणूस परत फिरला तेव्हा रावांनी त्याच्या हातातली पिशवी काढून घेतली.
दहा मिनीटांनी मथुरे सर लगबगीनी आले तेव्हा मी आणि रुमा, राव कधी हाक मारतात याची वाट बघत उभं राहीलो. सर रावांना म्हणत होते,
"अहो पण मी त्याच शाळेत आहे ना..."
राव म्हणाले, चौकात दुकान मांडून बसला आहेत ना? मग...? मग...?
रावांशी वाद घालणं म्हणजे... मथुरे सरांना रावांचा दरारा माहिती असावा.
आम्ही वाट बघत होतोच. रावांनी एकच हाक दिली आणि आम्ही जिन्यावरून धडधड आवाज करत त्यांच्या घरात.
मग आम्ही मथुरे सरांच्या सोबत मागच्या पडवीत गेलो. सरांनी एक पांढऱ्या कापडाची गुंडाळी काढली.
रावांनी त्यांच्या गुरगुरणाऱ्या आवाजात सरांना सांगितलं, "बॅनर झाले की सांगा."
आमच्या डोक्यात प्रकाश पडला की मथुरे सरांना का बोलावलं आहे.
मग पडवीच्या भिंतीवर कापड ताणून लावलं.
सर माझी आणि रुमाची नजर टाळत कामाला लागले.
एकदाच मला आणि रुमाला विचारलं,
"काय रे, तुमच्या निशाण्या काय आहेत रे?"
माझी बासरी आणि रुमाची होडी.
सपासप ब्रश फिरायला लागला.
अर्ध्या तासात माझे दोन बॅनर तयार.
शालेय समीतीसाठी निवडून द्या .
विश्राम भट्टे. निशाणी : बासरी. एक बासरीचं चित्र.
मग रुमाचे दोन बॅनरपण तयार झाले.
रुमा महीपती विश्वासराव. शालेय समीतीच्या मुलींच्या गटाचा उमेदवार.
निशाणी : होडी.
हातात पेंटचा डबा आणि ब्रश घेउन मथुरे सर उभे राहीले. मला म्हणाले, "जा रे, रावांना बोलाव."
आता.राव बैठकीत हिशेबाच्या गोष्टी करत बसले होते.
आता रावांना बोलावणार कोण?
पण रुमाला बघीतल्यावर राव पटकन उभे राहिले.
भुवया उंचावत त्यांनी विचारलं,
"काय झालं?"
रुमानी फक्त आतल्या बाजूला खूण करून सांगितलं.

मग रावांनी गोपाळ्याला हाक मारली.
माझ्या पोटात गोळा उभा राहीला. गोपाळ्या म्हणजे रावांना एखाद्या माणसाला कुटायचं असलं की रावांच्या पाठीशी असणारा दैत्य.
आम्ही सरळ धूम ठोकली ती पडवीत.
राव आले.
त्यांनी मोठ्यांदी बॅनर वाचायला सुरवात केली.
रुमा महीपती विश्वासराव .शालेय समीतीचा मुलींच्या गटाचा उमेदवार.
निशाणी : होडी.
"छान! छान! रुमा महीपती विश्वासराव."
मग माझा बॅनर वाचायला सुरुवात केली.
शालेय समीतीसाठी निवडून द्या.
विश्राम भट्टे. निशाणी : बासरी
मग जरा पुढे होऊन परत एकदा
शालेय समीतीसाठी निवडून द्या .
विश्राम भट्टे. निशाणी : बासरी
पण दुसऱ्यांदा वाचताना त्यांचा आवाज पिचलेल्या बासरीसारखा आला.
मथुरे सर त्यांनी बनवलेल्या बॅनरकडे कौतुकानी बघत होते.
पण पुढे एकदम काय झालं ते कुणालाच कळलं नाही.
रावानी त्यांच्या हातातला रंगाचा डबा हिसकून घेतला.
अर्धा रंग लादीवर सांडला.
मथुरे सर घाबरून मागे झाले.
त्यांच्या मागे गोपाळ्या.
हातात ओतून रावांनी रंग माझ्या बॅनरवर फेकला.
"मादरचोद! वाच एकदा..."
मथुरे सरांना आता मागे सरकायला जागाच नव्हती.
ते म्हणाले, "राव केलेल्या कामावर रंग फेकू नका...."
पण असं म्हणता म्हणता ते रावांच्या जवळ आले.
नंतर फक्त खाडकन थोबाडीत मारल्याचा आवाज आला.
रुमा माझ्यामागे. माझे पाय थरथरायला लागले.
सरांच्या गालावर रंगाची चार बोटं उमटली होती.
मास्तर मटकन खालीच बसले.
"राव..., राव..., माफ करा...."
आणखी एकदा आवाज आला. दुसरा गाल.
मला ज्याम मुतायला लागली.
"मादरचोद...! फक्त विश्राम भट्टे...? बापाचं नाव कोण लिहीणार...?"
मथुरे सरांनी पाय धरलेले बघितले आणि मी अन् रुमा पळालोच.
दहा मिनीटांनी हाक मारल्यावर आम्ही पडवीत गेलो.
नव्या बॅनरचा कपडा फाडून मास्तरांनी रंगवायला सुरुवात केली होती.
राव दिसत नव्हते पण गोपाळ्या खांबाजवळ उभा होता.
नवीन बॅनर आणखी वळणदार अक्षरात तयार होत होता.

शालेय समितीसाठी उमेदवार.

विश्राम चित्तरंजन भट्टे.

मास्तरांच्या गालावर रंग तसाच होता.

रंगाच्या हातानी त्यांनी डोळे पुसलेले मी पाह्यले आणि माझ्या डोक्यात प्रकाश पडला.

स्कॉलरशिपचा फॉर्म आठवला.

रावांनी त्यांच्या पद्धतीनी न्याय केला होता.

निवडणूक झाली.

आम्ही दोघंही जिंकलो.

दिवाळीच्या सुट्टीनंतर मथुरे सरांनी शाळा सोडून दिली.

# आभाळाचा श्वास

पूजा पवार.

आभाळ भरुन येताना..!

आभाळातनं मोती सांडावेत
आणि तुझा भास व्हावा
कोंडलेल्या मनाचा थोडा
श्वास मोकळा व्हावा!

मोकळ्याच ढगांची गडगड
हा ऋतु कोणता असावा?
बंध भावनांचे जपण्या
तो बहुधा सज्ज नसावा!

निळसर रंग पुन्हा एकदा,
एखादाच ढग भरुन यावा
सांडणाऱ्या थेंबाला मार्ग
पापण्यांनी सुचवावा!

अशावेळी सांज होती
हा विसर का रे पडावा?
विसावलेल्या मनाचा पुन्हा
श्वास भरुन यावा!

भरुन येताना आभाळ
क्षण धुंद जरा असावा
फक्त आभास चांदण्याचा
रात्रीच्या श्वासांत ठरावा!

# वन फिश अॅट अ टाईम.. ".

**बहुगुणी**

एक डिसेंबर २०१२ ची सकाळ. शनिवारचे दहा वाजलेले. शिकागोमध्ये निलेशने Interstate 94 Eden Expressway वरून Caldwell Ave / West Peterson Avenue चं एक्झिट घेतलं. आता उजवीकडे डीव्हॉन अॅव्हेन्यूवर वळून लिटल इंडियामधल्या नेहेमीच्या भारतीय दुकानात जायचं, हाच विचार डोक्यात. तेवढ्यात शेजारच्या लेनमधून मागून वेगात आलेली एक Audi R-8 Spyder इंडिकेटर न देता त्याच्या पुढे घुसली. केवळ आरश्यात निमिषार्धात दिसलेली वेगवान निळी पट्टी त्याच्या मेंदूने जाणली, म्हणूनच तो वेळेत ब्रेकवर पाय ठेवून त्याची Lexus कंट्रोल करू शकला!

"आवशीचा घो, तुझ्या!", निलेश उद्गारला, "इंडिकेटर दे की च्या मायला!"

कन्व्हर्टिबल R-8 मधला तुळतुळीत टक्कल पडलेला साठीच्या बराच पुढचा ड्रायव्हर मागून दिसला, आणि आणखी एक कुर्रेबाज वळण घेऊन ती गाडी दिसेनाशी झाली. तेवढ्या क्षणार्धात गाडीच्या मागच्या लायसेन्स प्लेटवरचं फ्लॉरिडा ऑरेंजचं चित्र दिसलं निलेशला, 'नो वंडर, फ्लॉरिडा रजिस्ट्रेशन, मायामीची गाडी असेल इतकी मस्तीये अंगात म्हणजे...", निलेशने शेजारी बसलेल्या उमाला म्हंटलं.

थोडं पुढे गेल्यावर त्याच्या स्वभावानुसार चटकन् शांत झालेल्या निलेशने म्हंटलं, "एनि वे, नो पॉईंट इन गेटिंग मॅड अबाऊट इट, घाईत असेल बिचारा. Who knows, a few more years, and I would be in his place...."

उमाने किंचित प्रश्नार्थक त्याच्याकडे पाहिलं. "अगं म्हणजे Audi Spyder नाही गं, पण टक्कल नक्की!" मग दोघं खळखळून हसले.

आणखी दहाच मिनिटांतच ते त्यांच्या ओळखीच्या दुकानात शिरले, उमाने उद्याच्या संकष्टी चतुर्थीसाठी तिला हवी ती खरेदी केली, आणि दोघे घराकडे परतले. वाटेत रेडिओ एन पी आर वर राजकीय विश्लेषण चालू होतंच. नुकत्याच संपलेल्या अमेरिकेच्या निवडणूकीच्या रणधुमाळीचा धुरळा खाली बसून, आता प्रेसिडेंट काय करतोय, आणि वाट लागलेल्या अर्थव्यवस्थेत कधी जीव भरेल याची चर्चा चालू होती. समांतरपणे, निलेश आणि उमा - तश्या सुस्थितीत असलेल्या आणि सूज्ञपणे बचत सांभाळून असलेल्या इतर अनेक भारतीयांप्रमाणे - आता पैसे सुरक्षित गुंतवायचे असतील तर कुठे गुंतवावेत, याच्या चर्चेत मग्न होते. "मला वाटतं तू म्हणालास तसंच करावं, इथल्या सीडीज मध्ये काही दम नाहीये अजून काही वर्षं तरी. तेंव्हा अप्पांना विचार तू आजच."

घरी पोहोचून लगेचच निलेशने अप्पांना भारतात फोन लावला. परवाच त्याचं धाकटा भाऊ जयेशशी आणि अप्पांशी याविषयी बोलणं झालं होतं. पन्नाशीला टेकलेला निलेश आणि चाळीशी पार केलेला जयेश ही अप्पांची दोन मुलं, निलेश अमेरिकेत बरीच वर्षं स्थिरावलेला तर जयेश नाशिकमध्ये नामांकित आर्किटेक्ट.

भारतात काही पैसे पाठवून गुंतवणूक करावी का याची चाचपणी निलेश करीत असतांना जयेशने त्याला सांगितलं होतं, की सोन्यात पैसे गुंतवण्यात आज-काल फायदा वाटत असेल तरी भाव सध्या इतके वर आहेत की गुंतवणूक बरीच करायला लागेल; FD हा दुसरा पर्याय, पण ५-१० वर्षं तरी लॉक-इन करायला लागतील पैसे. त्या आधी रिटर्न्स हवे असले तर जमिनीत गुंतवायचा विचार करायला हरकत नाही.

"नाशिकच्या आसपास करणार असलास, दादा, तर ओझरच्या दिशेने असलेल्या जमिनींचा विचार कर, परवाच आपले पालक मंत्री येऊन 'वर्षभरात इंटरनॅशनल एअरपोर्ट होईल' म्हणून ग्वाही देऊन गेलेत. आता अगदी वर्षात नाही तर ५-एक वर्षात नाशिकला नक्की बिझी एअरपोर्ट असणार आहे कारण ॲग्रिकल्चरल मार्केट आणि इतरही इंडस्ट्री वाढतेय, त्यामुळे त्या भागातल्या जमिनी झपाट्याने एन ए होऊन विकायला काढताहेत लोकं. तिथे प्लॉट पहायचा असेल तर कळव, मी पहातो काय भाव आहेत ते."

"ओके, उमाशी बोलून सांगतो लवकरच तुला", म्हणाला होता निलेश.

आता आज उमाने उचल खाल्ली म्हंटल्यावर त्याने फोन लावला. आधी अप्पांशी पाच मिनिटे त्यांच्या प्रकृतीविषयी बोलून, कॉलेजकन्यका असलेल्या पुतणीशी निलेश थोडा वेळ बोलला. HSC च्या वर्षात असलेली अमृता तिच्या भाराभर कोचिंग क्लासेस मध्ये गुंतलेली असायची, सकाळी सहा वाजता आजोबा तिला स्कूटीवर घेऊन पहिल्या क्लाससाठी बस स्टॉप वर सोडायचे, ती थेट संध्याकाळी सात वाजता घरी यायची, मग मधल्या वेळच्या खाण्याचे, जेवणाचे दोन-तीन डबे घेऊन जाणं ओघानेच आलं. तिने घाई-घाईने काकाला गेल्या आठवड्यातली सगळी कसरत ऐकवली, "आज तरी कुठे शनिवारची सुट्टी आहे, खूप असाईनमेंट्स आहेत रे, पळते मी आता, बाबांशी बोल तू, ते आलेच आहेत.." म्हणाली.

"बोल रे, दादा. बोललास उमावहिनीशी?"

"हो, ती म्हणतेय चांगली आयडिया आहे, तू पाहिलंस, काय रेट आहे ते त्या भागात?"

"हो, वीस-एक लाखाची तयारी असेल तर दोन-तीन चांगले हायवेला लागून प्लॉट्स आहेत ॲव्हेलेबल, पाहीन मी जाऊन आणि डिटेल्स पाठवीन तुला फोटो वगैरेसकट. बुकिंगला २०-२५% लागतील, मग दोन तीन महिने मिळतील हातात. काय करू ते सांग."

"ठीक आहे, मी असं करतो, सध्या दहा हजार डॉलर्स ट्रान्स्फर करतो आजच. आज ५७ चा रेट आहे, म्हणजे त्याचे साडेपाच वगैरे लाख होतील. आम्ही फेब्रुवारीत येतो आहोत, तोपर्यंत इथल्या सीडीज डिझॉल्व करून आणखी तीन ट्रान्सफर्स करू शकेन. मग आपण फायनल डील करून टाकू. चालेल?"

"ओके. पाठव तू, मी सोमवारी बाकी माहिती पाठवेन तुला."

"शुअर, गुडनाईट."

"गुड डे टू यू."

फोन झाल्यावर निलेशने जेवणाची तयारी करणाऱ्या उमाला सांगितलं, "आलोच मी दोन मिनिटांत. ताटं घेईन आलो की". Money-to-India च्या साईटवर जाऊन लॉग-ईन केलं, beneficiary च्या pull-down menu मधून अप्पांचं नाव निवडलं (डॉ. श्रीकांत जोशी), आपला बँक अकाऊंट निवडला, amount मध्ये दहा हजार डॉलर्सचा आकडा टाकला, आणि Send Money Now च्या बटनावर क्लिक केलं. "झालं गं, उमा" म्हणत स्क्रीन वर आलेली रिसीट त्याने encrypted pdf file म्हणून लॅपटॉप वर सेव्ह केली. स्वयंपाकघरात आल्यावर जेवणाची ताटं घेतली, आणि म्हणाला "या, जमिनीच्या पहिल्या हप्त्याच्या मालकीण बाई, चला घ्या वाढायला!"

*************

*************

पाच डिसेंबर, बुधवारची सकाळ. मुंबईत फोर्ट मधील व्हिक्टरी बँकेच्या दुसऱ्या मजल्यावरच्या NRI Relationship Manager च्या तिच्या केबिनमध्ये स्मिता पेठे २२ इंची स्क्रीन वरून नजर फिरवत सफाईने आजची इनवर्ड ट्रान्सफर्स पहात होती. Money-to-India शी व्हिक्टरी बँकेचा tie-up असल्याने सर्व ट्रान्सफर्स त्याच कंपनीकडून होती. एकूण ११ ट्रान्सफर्स आलेली तिने पाहिली. रकमांवरून नजर फिरवतांना तिच्या लक्षात आलं की गेल्या दोन-तीन आठवड्यांत एकंदरीतच ट्रान्स्फर्सची संख्याच केवळ वाढली होती असं नव्हे तर रकमांमध्येही लक्षणीय वाढ झाली होती. बऱ्याचशा ट्रान्सफर्स अमेरिकेतून होत्या, तिथल्या बाजारपेठेतील मंदी हे एक कारण असलं, तरी भारतातल्या अर्थव्यवस्थेत अमेरिका तसंच युरोपातील पाश्चिमात्य देशांच्या मानाने झालेली कमी पडझड हेही कारणीभूत असावं. शहरातल्या दुसऱ्या एका प्रसिद्ध खाजगी बँकेत काम करणाऱ्या नरेंद्रनेही स्मिताला त्यांच्याकडचा अनुभव सांगितला तोही फार वेगळा नव्हता. खरंतर इथेही तशी काही कमी लाथाळी चालू नव्हती; रोजचे पेपरात येणारे कोट्यावधींचे स्कॅम्सचे आकडे, मध्यावधी निवडणुकांचे पडघम आणि एकंदरीतच लोकांमधली सामाजिक अस्वस्थता, या सर्वाने बाजारपेठ अस्थिर असू शकणं अशक्य नव्हतं, पण तरीही ती तितकी अस्थिर somehow नव्हती. आणि बाहेर पैसे जेमतेम एक-दीड टक्क्याने अडकवून ठेवण्यापेक्षा भारतातील अर्थसंस्थांवर विश्वास ठेवणं किंवा इथे गुंतवणूक करणं परदेशस्थ भारतीयांना जास्त भावत असावं असं दिसत होतं.

स्मिताने आजच्या दिवसाचे देशांतर्गत आऊटवर्ड ट्रान्स्फर्स किती आहेत ते पाहिलं, चार लोकल खातेदार होते, म्हणजे त्यांचे पैसे इथेच अकाऊंटमध्ये राहणार होते, पैकी तिघांच्या रकमा त्या मानाने किरकोळ होत्या. बाकीचे ६ बाहेरगावी जायचे होते, पण EFT असल्याने ते आज संध्याकाळपर्यंत त्या त्या बँकांच्या खात्यात क्रेडिट व्हायला हवे होते. शिवाय त्या त्या beneficiaries ना ॲलर्टिंग इ-मेल्स पाठवणंही गरजेचं होतं. तिने घड्याळात पाहिलं, अकरा वाजत आले होते. बारा वाजता नरेंद्र यायचा होता, आज त्यांना नायर साहेबांना भेटायचं होतं साडेबाराच्या लंच ब्रेकच्या आत, आणि मग त्या दोघांचं समोरच्या रेस्टॉरंटमध्ये जाऊन जेवणं, एकच्या आत परत येणं आणि मग उरलेल्या अडीच तासांत आजची Priority NRI Depositors ची fixed deposits ची सगळी कामं उरकणं, या सगळ्याचं गणित बसवायचं म्हणजे ती आऊटवर्ड ट्रान्स्फर्स आता सकाळीच संपवायला पाहिजेत याची तिला जाणीव झाली. तिने इंटरकॉमवरून खाली संकेतला फोन केला आणि शेजवळांना वरती पाठवून द्यायला सांगितलं. पाचच मिनिटांत बँकेच्या आतल्या जिन्याने शेजवळ थांबत थांबत वरती येतांना दिसले. 'आर्थ्रायटीसने थकलेत बिचारे,' स्मिताला दिवसातून दुसऱ्यांदा जाणीव झाली, 'नको वाटतं कामं सांगायला म्हाताऱ्याला!'.

"बोला पेठेबाई, काय करू?"

"बसा जरा दोन मिनिटं, मी हा प्रिंट आऊट काढते आणि नोटेशन्स करते त्यावर, तो तेवढा घेऊन जा खाली, कॉपीयर वर २ कॉपीज काढा, एक संकेतकडे द्या, एक नायरसाहेबांना द्या आणि ओरिजिनल मला आणून द्या. सावकाश आणलीत तरी चालेल. नाहीतर असं करा, खाली संकेतकडेच ठेवा, मी लंचहून येतांना घेऊन येईन वर."

"बरं, तसं करतो" म्हणत शेजवळ खुर्चीत बसले. स्मिताने ट्रान्सफर्सच्या पेज चा प्रिंट आऊट काढला, त्यावर मार्जिनमध्ये मार्किंग्ज केले आणि खाली सही केली.

पासष्टीच्या पुढे गेलेले शेजवळ प्रायव्हेट बँक आहे म्हणून goodwill वर नोकरी टिकवून राहिले होते, पण दिवसाकाठी वाढत जाणाऱ्या आर्थ्रायटीसने आता आणखी वर्षभरही काम करणं कठीण दिसत होतं.

"आज डब्यात काय आहे, शेजवळ?"

"आज डबा नाहीये, अमित यायचा होता नायरसाहेबांना भेटायला, तो थांबलाय खाली, आता साहेबांना भेटून झालं की मग जाऊ दोघं समोर इडली-वडा खायला गाडीवर."

अमित त्यांचा दोन मुलींपाठचा विशीतला मुलगा. कसाबसा डिप्लोमा पास झाला होता, आता आपल्या रिटायरमेंटच्या आत कुठे चिकटवता येईल हे पहाण्यासाठी म्हाताऱ्याची धडपड चालली होती.

"साहेब काही करतील असं वाटतं का?"

"बघू काय जमतंय ते, नाही तर आहेच तो आणि त्याचं नशीब!"

"हे घ्या, आणि सावकाश उतरा जिन्यावरनं, नाहीतर पाय घसरायचा शनिवारसारखा, नशीब म्हणून संकेत होता मागे."

"हो, सावकाशच जाणार आहे, द्या इकडे. बाकी तुम्ही कधी बार उडवताय?"

"अहो कसला बार शेजवळ? आधी जागेचं पहायचंय, आज भेटणार आहोत नायर साहेबांना लोनसाठी, जागा असेल तर पुढच्या गोष्टी, खरं की नाही?"

"होईल, होईल, सर्व व्यवस्थित वेळेत होईल."

"तुमच्या तोंडात साखर पडो" गोड हसत स्मिता म्हणाली.

****************

आजाराने पिच्छा पुरवलेला, अजून दोन लग्नाच्या मुली आणि नोकरीच्या शोधात असलेलं अल्पशिक्षित शेंडेफळ, हे सारं डोळ्यासमोर असूनही हा माणूस कसा धीराने राहतो याचं स्मिताला कौतुक वाटायचं.

थोडासा दिलासाही मिळायचा, आपलंही काम होईल या आशेने. तिचं आणि नरेंद्रचं लग्न जागा मिळण्यावाचून अडलेलं होतं. दोघेही मुंबईबाहेरून नोकरीसाठी आलेले आणि इतर दोन-दोन रूममेट्स बरोबर पार्ट-रेंटर म्हणून वेगवेगळ्या उपनगरांत राहायचे. पण आता नोकऱ्या मुंबईतच टिकवायच्या आणि लग्न करून एकत्र रहायचं तर अवाच्या-सव्वा पैसे भाड्यात घालवणं हा मार्ग दोघांनाही मान्य नव्हता, तेंव्हा मुंबईलाच कर्मभूमी करायची तर घर शोधणं ओघानंच आलं. 'घर शोधणं' या प्रक्रियेत दोन महिने घालवून त्यांना अखेर हवी तशी जागा एका दादर जवळच्या नव्या इमारतीत मिळाली, पण त्या फ्लॅटची अफाट किंमत त्यांच्या आवाक्याबाहेर होती. त्या दोघांच्या बचतीबाहेर जाऊन अधिक साठ-सत्तर लाख एका महिन्यात उभे करणं म्हणजे अनपेक्षित challenge ठरत होता. गृहकर्जासाठी नरेंद्रने इतर संस्थांप्रमाणेच त्याच्या बँकेतही विचारणा केली होती, पण जेमतेम वर्षाचाच नोकरीचा इतिहास हेच कारण सगळीकडे आडवं येत होतं. आज ते दोघे स्मिताच्या बँकेत नायरसाहेबांना भेटून पहाणार होते.

*******

शेजवळ जिन्याच्या कठड्याला धरून धरून खाली उतरले. निळी जीन्स आणि पांढरा टी शर्ट घातलेला आणि हातात त्याच्या कागदपत्रांचं एक फोल्डर घेतलेला अमित दाराच्या बाजूच्या भिंतीला टेकून उभा असलेला त्यांनी पाहिला, आणि त्याला हात करून बोलावलं, "हा प्रिंट-आऊट घे आणि त्या संकेतसरांच्या टेबलच्या बाजूचं झेरॉक्स मशिन माहितेय ना तुला, तिथे दोन कॉप्या काढ. तोवर मी नायरसाहेब आहेत का बघून येतो. जरा व्यवस्थित ठेव कागद, डाग नको पाडू."

अमितने पुढे होऊन प्रिंट-आऊट हातात घेतला आणि शेजवळ वळून खालच्या मजल्याच्या टोकाला असलेल्या नायरसाहेबांच्या ऑफीसकडे गेले. साहेबांच्या रुमच्या काचेतून मान वर करून पाहिलं तर आत कुणीतरी कस्टमर खुर्चीवरून ऊठण्याच्या बेतात असलेला दिसला त्यांना, म्हणून ते परत फिरले. तोवर अमितचं कॉपी काढणं झालेलं होतं. शेजवळांना पाहिल्यावर त्याने फोल्डर उघडून आतले कागद बाहेर काढले आणि शेजवळांना दिले.

त्यांनी कागद हातात घेतले आणि मोजले. "अरे काय रे हे? दोन म्हंटलं मी तुला, तीन कॉप्या केल्या तू..."

"अहो ते प्लसचं बटन चुकून तीनदा दाबलं गेलं, ऱ्हाऊ द्या आता," अमित म्हणाला.

"अरे राहू दे काय, ती पेठे बाई कावेल आता माझ्यावर. असं कर, मी ही एक कॉपी नायर साहेबांना देऊन येतो, दुसरी त्या संकेत साहेबांना नेऊन दे आणि तिथेच बाजूला ते श्रेडर मशिन आहे नं, तिथे या जास्तीच्या कॉपीचे तुकडे करून टाक. अन् तिकडेच ये साहेबांकडे, पुन्हा ते जेवायला हलले की भेटणं ऱ्हायचं."

"आपल्याला लवकर निघता येईल ना? ते पक्या अन् बाकीचे दोघं थांबणारेत अहमदाबादला जायला, दीडच्या कर्णावतीनं चाललोय..."

"अरे जाशील की, आता हे महत्त्वाचं काम बघ आधी!" थोडंसं त्राग्याने शेजवळ मुलाला म्हणाले, "भटकणं

तर नेहेमीचंच आहे. आणि आताशी बारा वाजतायेत, दीड वाजायला बराच वेळ आहे."

"आहे हो, पण बॉंबे सेंट्रलला पोचायचंय ना."

"जाशील, ते दे तेवढं अन् मग जाऊ साहेबांकडे."

**************

नरेंद्र आलाच पंधरा मिनिटांत, त्याचा SMS आल्याने तयारीत असलेली स्मिता त्याला खालीच भेटली आणि उत्साहाने दोघे नायर साहेबांच्या केबिनकडे गेले. आतून शेजवळ आणि अमित बाहेर येतांना दिसले. अमितच्या चेहेऱ्यावरून काही अंदाज येत नसला तरी शेजवळांचा चेहेरा पडलेला वाटला स्मिताला, पण उशीर व्हायला नको म्हणून तिने काही विचारलं नाही आणि 'May we come in, Sir?' विचारत दोघे केबिनमध्ये शिरले.

नायर साहेबांनी उठून नरेंद्रशी हात मिळवला. बँकेतल्या शेजवळ वगैरे लोकांशी खास मल्याळी हिंदीत कसेबसे बोलणारे नायर स्मिता आणि नरेंद्रशी इंग्लिश मध्येच बोलायचे. "Have a seat, tell me what is this about" ते म्हणाले.

पुढची दहा-पंधरा मिनिटं जागेची माहिती देण्यात आणि दोघांच्या पगाराची माहिती देण्यात गेली.

हळूहळू नायर साहेबांचा चेहेरा अगतिक होत गेला, म्हणाले, "I perfectly understand your predicament, I clearly see your need to find a place quickly so you can get married. But believe me, even if I tried, I cannot justify the amount you are asking; there is just no way to furnish that loan with your limited service history." दोघांचे चेहेरे पडलेले पाहून ते पुढे म्हणाले, "Why don't you wait for some time? Get married and find some other living arrangement temporarily, and then come back for a loan after say six months or so, maybe I can help then?"

"We will see, Sir, thanks for your help," म्हणत दोघे उठले. बाहेर येऊन जेवणासाठी कुठे जायचा मूडच गेला दोघांचा. बाजूच्या स्नॅक सेंटर वरून काहीतरी थातूरमातूर घेऊन दोघे आपापल्या ऑफिसात पोहोचले.

************

पाच डिसेंबरची संध्याकाळ. पंचवटी एक्स्प्रेसने तो नाशिकरोड स्टेशन वर उतरला, रात्रीचे अकरा वाजून गेले होते. स्टेशनसमोरच्याच हॉटेलात जेवून घेतांना त्याने आजूबाजूच्या लॉजिंग-बोर्डींगच्या पाट्यांवर नजर फिरवली आणि एक जागा निवडली. बिल देऊन बाहेर पडला आणि त्या ठिकाणी जाऊन रात्रीसाठी रुम रेट विचारला. कॅश पैसे काऊंटर वर टाकून किल्ली हातात घेतली आणि अर्ध्या तासात परत येतो म्हणून सांगितलं.

बाहेर येऊन हात दाखवून रिक्षा थांबवली. खिशातून कागद काढून पत्ता बघितला आणि रिक्षावाल्याला

विचारलं "शिखरेवाडी, किती घेणार?"

"एकट्यानंच जायचं असंल तर पन्नास रुपये. शेअर रिक्षा करायची असंल तर पंचवीस."

"शेअर नाही. पाच मिनिटं थांबून परत स्टेशनवर यायचंय, पंच्यात्तर देईन."

"बसा."

मुंबईच्या मानाने थंडी चांगलीच होती. रिक्षात कोपऱ्यात बसल्या-बसल्या त्याचं विचारचक्र चालू होतं. इन्फॉर्मेशन खात्रीची होती पण काम झालं तर पुढचं खरं.

"शिखरेवाडीला कुठं?"

"MSEB ऑफीसच्या समोर," कागदावरचा पत्ता बघत त्याने उत्तर दिलं. पाच मिनिटांनी रिक्षा थांबली. उतरून तो पश्चिमेला चालत गेला. लोक बाहेरून घरी येण्याची आणि जेवणाची वेळ केंव्हाच उलटून गेली असल्याने आसपास जवळजवळ सगळीकडे अंधार आणि शांतता होती. अपेक्षित बंगला त्याला डावीकडे सापडला. मान न वळवता पाटीवरचं नाव पाहून घेत तो तसाच पाच-दहा पावलं पुढे गेला. बाहेर कुठल्याश्या मोबाईल कंपनीची पाटी मिरवणारं एक बंद किराणा दुकान दिसलं. तिथवर जाऊन तो थांबला. रिक्षावाला आरश्यातून आपल्याकडे पहातोय याची त्याला जाणीव झाली. दुकानाकडे पहात असल्यासारखं दाखवत त्याने मोबाईल काढला, काही नंबर दाबले आणि हळू आवाजात मिनिटभर बोलला. मग मोबाईल खिशात टाकून रिक्षात परतून त्याला स्टेशनवर घ्यायला सांगितलं.

"बंद झालंय दुकान, उद्याला परत यावं लागेल भेटायला."

"येव्हढ्या उशीरा कसं भेटंल खुल्लं तुम्हाला, थांबनार म्हनून सांगुन गेल्येवते काय त्ये?"

"हो ना, म्हणून तर आलो आता. जाऊ दे, उद्या भेटू म्हणा. चल."
**************
**************

डिसेंबर ६.
सकाळी साडेपाचलाच उठून तो आवरून लवकर खाली आला आणि सरळ शिखरेवाडीला रिक्षाने पोहोचला. यावेळी त्याने रिक्षा बरीच बाहेर मेन रोडवर सोडली, आणि पायी चालत शिखरेवाडीत आला. सायकली आणि मोटरसायकली काढून नोट प्रेसला जाणारे कर्मचारी, सकाळची शाळा गाठायला बाहेर पडलेले विद्यार्थी इत्यादि गर्दीची लगबग हळूहळू सुरू झाली होती.

तो रमतगमत काल पाहिलेल्या दुकानापाशी आला, दुकान नुकतंच उघडलं होतं. सकाळी सकाळी भवानीला

नुसता प्रश्न नको म्हणून त्याने एक सर्फ साबणाचा पाऊच आणि दोन काड्यापेट्या मागितल्या. पैसे देता देता खिशातला कागद काढून त्यावरचं नाव वाचून दुकानदाराला विचारलं, "डॉक्टर श्रीकांत जोशी कुठे राहतात हो?"

"तो काय तो पलिकडचा बंगला समोरच्या बाजूला."

मान वळवत त्याने दुकानदाराच्या हाताच्या दिशेने बघितलं, "तो का? बरं. थोड्या वेळाने जातो, एवढ्या सकाळी नको डिस्टर्ब करायला डॉक्टरांना."

"अहो, डिश्टर्ब कुठलं करताय? डॉक्टर पडले की बाहेर मघाशीच नातीला घेऊन. बरोब्बर सहाला निघतात, तिला सोडतात मेनरोडच्या बसस्टॉपवर आणि येतात. आता दहा मिनिटांत येतील. थांबा थोडं. होईल भेट आले की."

"असं म्हणता? मी येतोच दहा-पंधरा मिनिटांत, थोडा कोपऱ्यावर चहा घेऊन येतो तोपर्यंत."

लगबगीने तो मेनरोडच्या दिशेने निघाला. नाशिककडे जाण्याच्या बस स्टॉपच्या दिशेने जाताजाता त्याला सत्तरीच्या आसपासचे डॉक्टर नातीबरोबर दिसले. थोड्या अंतरावर जाऊन रस्ता क्रॉस करून विरुद्ध दिशेच्या बस स्टॉपवर तो थांबला. डॉक्टरांची स्कूटी एका बाजूला लावलेली, आणि पंधरा-एक वर्षांची अप्रतिम सुंदर दिसणारी नाजूक नात स्कार्फ गुंडाळत उभी होती. तिचं बॅकपॅक आजोबांच्या हातात होतं. लांबून बस येतांना दिसली तशी तिने आजोबांकडून घाईघाईने बॅकपॅक घेतलं आणि पुढे झाली. बस थांबली तशी ती बसमध्ये चढली आणि बस चालू झाली.

ती निघता निघता त्याला आजोबांचे शब्द ऐकू आले, "अमृता, पास रिन्यू करायचाय, विसरू नकोSS." बस गेल्यावर डॉक्टर स्कूटीकडे वळले आणि ती चालू करून घराकडे वळले. ते दिसेनासे झाल्यावर त्याने डावीकडे नजर टाकली, नाशिकरोडकडे जाणारी बस येत होती. त्याने हात केला आणि बस थांबल्यावर स्टेशनचं तिकिट मागितलं.

***************

संध्याकाळी साडेसात वाजता डॉक्टर फिरून परत येतांना त्यांचा गळ्यातल्या लॅन्यार्डला अडकवलेला मोबाईल वाजला, रस्त्याच्या कडेला होऊन त्यांनी स्क्रीनकडे पाहिलं, नंबर ओळखीचा नव्हता. त्यांनी खिशातून चष्मा काढला आणि पुन्हा नंबर पाहिला, मोबाईल नंबर नव्हता, लोकल कॉल होता. त्यांनी बटन दाबून कॉल रिसीव्ह केला.

"हॅलो, डॉक्टर जोशी?"

"कोण बोलतंय?"

"नाव महत्वाचं नाही, निरोप महत्वाचा आहे, फक्त ऐका. तुमची नात अमृता सुंदर आहे, तिने नेहेमीच सुरक्षित घरी यावं असं वाटत असेल तर मी सांगतोय ते लक्ष देऊन ऐका."

डॉक्टरांना एकदम चक्कर येते आहे असं वाटलं. त्यांनी बाजूच्या खांबाचा आधार घेतला आणि म्हणाले, "कोण तुम्ही, काय हवंय तुम्हाला?"

"तेच सांगतोय, पुन्हा मध्ये बोलू नका. पोलिसांना कळवायची तसदी घेऊ नका. मी पब्लिक फोन वरून बोलतोय, तेंव्हा कॉलही ट्रेस करायची गरज नाही. लक्षात आलं? पुढचं सांगू?"

"....."

"तुम्हाला आज इ-मेल आली आहे, तुमच्या खात्यात शनिवारी अमेरिकेतून आलेले पैसे जमा होतील. अमृता नीट रहावी असं वाटत असेल तर ते पैसे तुमचे नाहीत असं समजा. ती सर्व रक्कम रविवारी रात्री आम्हाला मिळाली पाहिजे. हजाराच्या नोटांमध्ये बँकेतून काढून एका ब्राऊन पेपरच्या एन्व्हलपमध्ये ठेवा. ते कुठे पोचवायचे ते तुम्हाला शनिवारी रात्री ९ वाजता कळेल. ठीकाय?"

"अहो ते पैसे माझे नाहीत हो!" हादरलेले डॉक्टर कळवळून म्हणाले, "ते माझ्या अमेरिकेतल्या मुलाचे आहेत, त्याला मी काय-"

"सांगितलं ना? ते आमचे आहेत, आम्हाला हवे आहेत. आणि अमेरिकेतल्या मुलाचा विचार करू नका, तो कमवेल आणखी तिकडे, तुम्ही इथल्या नातीचा विचार करा! मी फोन ठेवतो आहे, पुन्हा सांगतो, आमचं तुमच्यावर लक्ष आहे, पोलिसांनाच नाही तर इतरही कुणालाच कळवू नका, नाहीतर नात हाती लागणार नाही!" फोन बंद झाला.

डॉक्टर लटपटत्या पायांनी अंधारून आलेल्या संध्याकाळी घराकडे चालत गेले आणि दार उघडताच खुर्चीत जवळजवळ कोसळलेच. आवाज ऐकून बाहेर आलेल्या धाकट्या मुलाकडे त्यांनी पाणी मागितलं. तेवढ्यात स्वयंपाकघरातून त्यांची धाकटी सूनही बाहेर आली. मुलाने आणलेलं पाणी घोटभर प्याल्यावरही त्यांना बोलण्याचं सुचेना. "काय होतंय अप्पा? छातीत दुखतंय का? गोळ्या विसरलात का?" मुलाने विचारलं.

त्यांनी खूणेने नाही म्हणून सांगितलं. "आधी अमुला फोन कर, ताबडतोब!"

आता सून घाबरली, "काय झालं?" म्हणाली.

"फोन कर म्हणतोय ना?" कधी न ओरडणाऱ्या सासऱ्यांनी असा आवाज वाढवल्यावर तिने लगेच मोबाईल उचलून मुलीला फोन लावला, "हॅलो, अमृता?.."

"कुठे आहे विचार तिला? आणि तिथेच थांब म्हणावं!"

"कुठे आहेस पिल्लू?"

....

"बरं, शिल्पाकडे का? मग इथेच आहेस. काही नाही...किती वेळ आहे?...बरं बरं." तिने प्रश्नार्थक नजरेने सासऱ्याकडे पाहिलं.

डॉक्टरांनी जयेशकडे पाहिलं, "जा आणि तिला घेऊन ये."

"काही नाही तिथेच थांब बेटा, बाबा येतायत तुला न्यायला. काही नाही, सहजच. OK?"

हळूहळू, पुढच्या दहा मिनिटांत त्यांनी मुलाला आणि सुनेला फोनकॉलविषयी सांगितलं. मुलगा आणि सून यांचं धाबं दणाणलं.

"सध्या काहीच करू नका, आधी लेकराला घेऊन या, मी थांबतो घरी, दोघंही जा", म्हणत डॉक्टरांनी दोघांनाही गाडी काढून जायला लावलं.

*************

जेवणं झाली आणि अमृता झोपी गेली. डॉक्टरांनी मुलाशी आणि सुनेशी हळू आवाजात चर्चा केली.

"तुम्ही पाहिलं का इ-मेल आलेली?" जयेशने विचारलं.

"अरे नाही पाहिली, पण आली असणार, five working days मध्ये येतात म्हणजे शनिवारी येणार आहेत हे अपेक्षित होतंच, म्हणून उद्या-परवा बघेन म्हंटलं. त्या लोकांना कसं कळलं या ट्रान्सफरचं? तरी मी नेहेमी म्हणतो तुम्हा लोकांना हे ऑनलाईन व्यवहार रिस्की असतात, जपून रहात जा, कोण आपली माहिती ट्रॅक करतंय कुणाला माहिती?"

सुनेने निक्षून सांगितलं की पोलिसांना मुळीच कळवायचं नाही आणि मुलीचा जीव धोक्यात घालायचा नाही. डॉक्टरांनीही त्याला दुजोरा दिला.

जयेश म्हणाला, "पण दादाला तर कळवायलाच हवं, साडेपाच लाख म्हणजे काही थोडी-थोडकी रक्कम नाही."

"कळवू ना," डॉक्टर म्हणाले, "पण त्यालाही स्पष्ट सांग की हे कोण गुंड आहेत कल्पना नाही, विषाची परीक्षा नको, राहता राहिला त्याच्या पैशाचा प्रश्न, माझ्या FD मधले आहेत ते देईन मी तुला, जमिनीचं काम अडणार नाही दादाचं."

जयेशने निलेशला फोन लावला. त्याच्याकडे सकाळचे साडेआठ वाजले होत, तो कामावर निघायच्या तयारीत

पण उमाबरोबर घरीच होता. जयेशने त्याला स्पीकरफोनवर बोलायला सांगितलं.

थोडक्यात त्याने दोघांना अप्पांना आलेल्या फोनबद्दल सांगितलं. हबकलेल्या उमाने जावेला सांगितलं, "पैसे मरू देत, आणि अमृताला पाठवूच नका तुम्ही कुठे आठवडाभर!"

"अगं कसं शक्य आहे ते? तिचे क्लासेस बुडवणं कठीण आहे या वर्षी आणि तिला काय सांगणार?" शेवटी नाशिकला पोलिसांत रिपोर्ट करायचा नाही यावर त्यांचं एकमत झालं.

"एक करू शकतोस तू, डॉक्टर निलेशला म्हणाले, "तुझ्या त्या राजूचे वडील ACP होते ना मुंबईला, त्यांच्याशी बोलून बघ काही मदत करू शकतील का, पण जे काय करायचं ते पैसे दिल्यावरच करा. मी जयेशला म्हंटलंय की सध्या जमिनीचा व्यवहार करायचाच असेल तर मी देईन पैसे."

"अप्पा, जमिनीचं काही अडलेलं नाहीये, आधी हे अमुवरचं संकट टळू देत. मी करतो राजूला फोन आणि बघतो नाना काय म्हणतात ते."

************

***********

निलेशने मुंबईच्या त्याच्या डॉ. राजीव माने या मित्राला फोन लावला. राजूचे वडील मुंबईत ACP म्हणून दहा-एक वर्षांपूर्वी निवृत्त झाले. एक अत्यंत कर्तबगार, न वाकणारा पोलिस आधिकारी म्हणून त्यांनी नाव कमावलं होतं. भ्रष्टाचाराची कीड लागलेल्या खात्यात 'खाणार नाही-खाऊ देणार नाही' अशा निर्धाराने वागणाऱ्या त्यांना तीस वर्षांत वीस ठिकाणी बदल्यांना सामोरं जावं लागलं होतं. पण त्यांच्या कारकीर्दीत त्यांनी अनेक अवघड गुन्ह्यांचा वेध घेतला होता. अखेरचं पोस्टिंग होतं ते मुंबई विमानतळावर. तिथला भ्रष्टाचार निपटून काढायचा खूप प्रयत्न केला होता त्यांनी वर्षभरात, पण अगदी सहन होईना तेंव्हा आपणही व्यवस्थेला बळी पडण्यापेक्षा मुदतपूर्ण सेवानिवृत्ती घेणं त्यांनी पत्करलं होतं. तीन वर्षांपूर्वी राजूच्या आई ब्रेस्ट कॅन्सरने निवर्तल्यानंतर त्यांनी स्वतःला थोडंसं समाजसेवेत पण बरचसं लिखाणात गुंतवून घेतलं होतं. त्यांनी लिहिलेली दोन पुस्तकं प्रसिद्ध झाली होती आणि बऱ्यापैकी वाचलीही गेली होती, एक गुन्हेगारांचं मानसशास्त्र या विषयावर तर दुसरं त्यांच्या कारकीर्दीतल्या गाजलेल्या गुन्हेगारी घटनांविषयी.

"राजू, निलेश बोलतोय, फार उशीर झालाय का?"

"नाही रे, आताच जेवणं आटपून टीव्ही वर बातम्या लावत होतो, काय विशेष?"

"अरे जरा महत्त्वाचं बोलायचं होतं, जरा नानांचा ॲडव्हाईस हवा होता, झोपले असतील तर राहू देत."

"अरे नाही, जागे आहेत, हे इथेच टीव्ही समोर आहेत. पण तू काय क्रिमिनल लफडं केलंयस का नानांचा ॲडव्हाईस मागतोयेस तो?"

"नाही रे जरा प्रॉब्लेम झालाय नाशिकला घरी, तू स्पीकरवर टाक फोन म्हणजे दोघांशी एकदम बोलेन."

नानांना बोलावून राजूने कॉल स्पीकरफोनवर टाकला. निलेशने त्याला कळलेली घटना जशीच्या तशी सांगितली. आणि पैसे देण्याचा पण नाशिकला पोलिसात तक्रार न करण्याचा कुटुंबाचा निर्णय सांगितला. "फक्त नाना, तुम्ही तुमच्या ओळखीने नंतर काही पाठपुरावा करू शकाल का हे विचारायचं होतं. निदान माहिती leak कुठून झाली हे कळलं तरी मला पुरेसं आहे."

"मुंबईतली receiving बँक कुठे आहे म्हणालास, फोर्ट मध्ये?"

"हो."

नाना दोन क्षण शांत राहिले. "बघतो मी उद्या सकाळी काय करता येईल ते. तिथले माझ्या ओळखीचे एक बावधनकर म्हणून ACP आहेत, आधी माझ्याकडे PI म्हणून होते, हुषार माणूस आहे. त्याला विचारतो. नुसतं माहिती कुठून leak झाली हे कळून उपयोग नाही, पैसे नंतर कुठे जातात ते ट्रेस करणंही अवघड नाही जर वेळेत हालचाल करता आली तर. आता वडील झोपले असतील का?"

"नाही, अप्पा जागे होते आम्ही दहाच मिनिटांपूर्वी बोललो तेंव्हा. काही विचारू का त्यांना?"

"मीच विचारेन फोन करून, राजू, तुझ्याकडे फोन नंबर आहे का त्यांचा? आहे ना, मग लाव त्यांना फोन हा झाला की. निलेश तू लाग तुझ्या कामाला, मी बघतो काय करता येईल ते."

डॉक्टरांना फोन लागल्यावर नाना म्हणाले. "पहिली गोष्ट, लोकल पोलिसांना सध्या कळवत नाही आहात ते एका दृष्टीने बरंच आहे. फक्त मला थोडी माहिती द्या. तुम्ही नाशिकमध्ये बरीच वर्षं प्रॅक्टिस केलीत ना? मग तुमच्याशी बोलणारा माणूस नाशिकचा होता असं वाटलं का त्याच्या भाषेवरून?"

थोडा विचार करून डॉक्टर म्हणाले, "नाही, भाषा पुण्याची वगैरे वाटली, कदाचित मुंबईची, नाशिकची नक्की नाही."

"इ-मेल वाचलीत बँकेची?"

"हो, आताच पाहिली, काल दुपारी बाराला आलेली आहे."

"निलेशने पैसे एक तारखेला पाठवले असं म्हणाला मला. तो माणूस तुम्हाला पैसे बँकेत शनिवारी येणार आहेत म्हणाला, जर मुंबईच्या बँकेत ते काल आले असतील आणि तो तुम्हाला आज संध्याकाळी फोन करून बोलला असेल तर शक्यता आहे की तो नाशिकमध्ये काल संध्याकाळी आला. त्याने तुम्हाला आणि अमृताला एकत्र काल संध्याकाळी किंवा आज कधी पाहिलं असेल?"

थोडा विचार करून डॉक्टर म्हणाले, "आज सकाळीच शक्य आहे, पण सहा वाजता, इतक्या सकाळी कोण पहाणार आम्हाला?"

"असू देत, I was just trying to narrow down the time frame of possibilities of your encounter. तुम्ही शांत झोपा आता. आणि त्या माणसाचा फोन आला की लगेच मला कळवा काय सूचना आहेत त्या, ठीक आहे?"

************

७ डिसेंबर, शुक्रवार.

नाना सवयीने सकाळी सात वाजता सर्व आवरून तयार होते, पण ठाण्यातून वीक डे ची मुंबईकडे जाणारी सकाळच्या लोकलची मरणगर्दी लक्षात घेऊन त्यांनी दहाच्या पुढे बाहेर पडायचं ठरवलं. मधल्या वेळात डायरी काढून साडेसातच्या सुमारास बावधनकरांना फोन केला. मोबाईल उचलला गेला नाही म्हणून आठ वाजता त्यांच्या ऑफीस मध्ये फोन केला.

"बावधनकर आहेत का? त्यांना म्हणावं मी नाना माने बोलतोय."

"काय काम आहे? साहेब आता अॅव्हेलेबल नाहीयेत," गेल्या दहा वर्षांनंतरच्या भरतीचा कुणी PSI वगैरे असावा, नाना माने या नावावरून त्याला काही बोध होणं शक्य नव्हतं. आणि साहेबांना आलेला फोन त्यांना डायरेक्ट न देणं ही पोलीस खात्याची खासियत नानांना चांगलीच माहीत होती.

"ठीक आहे, त्यांना म्हणावं माने सरांचा फोन होता, वेळ मिळाला की फोन करा म्हणावं." 'माने सर' ऐकल्यावर हा फोन साहेबांना दिलेला बरा असं बहुधा वाटलं असावं म्हणून पलिकडच्या व्यक्तीने म्हंटलं, "थांबा, पहातो मोकळे झाले का ते."

थोड्या शांततेनंतर एक्सायटेड बावधनकर फोनवर आले, "नमस्कार सर! आज बऱ्याच दिवसांनी फोन? कसे आहात सर?"

नानांनी त्यांना सांगितलं एका परिचिताची economic offense ची केस आहे.

"बहुधा EOW-II केस असणार आहे, तुम्ही South Division ला आहात ना, युनिट 1?" सर्वच ज्यूनिअर्सशी कायमच 'अहो-जाहो' च्या भाषेत बोलणारे नाना बदलले नाहीत, हे बावधनकरांच्या लक्षात आलं.

"हो सर."

"ठीक आहे, मी येतो अकरापर्यंत भेटायला, असाल ना?"

"नक्की सर, थांबतो मी इथेच, तोपर्यंत काही माहिती काढून ठेवू का?"

नानांनी त्यांना बँकेचं नाव सांगितलं, 'आपल्याला तिकडे जावं लागेल बहुतेक' म्हणाले. 'बाकी आता फोन वर बोलत नाही फक्त extortion ची केस आहे आणि आपल्याला नाशिक मध्ये माग काढायला लागेल एवढं सध्या लक्षात ठेवा."

"सर, .....नाशिक म्हणजे jurisdiction वेगळं पडेल ना सर, तिथे कुणाला involve करू का?"

"नको, केस मूळ मुंबईतच सुरू होतेय, तपासासाठी तुम्ही कुठेही जाऊ शकता, you will be well within your rights, don't worry, सध्या कुणाला सांगू नका. मग लागेल तशी मदत मागा."

अकरा वाजता नाना फोर्टमधल्या, पाटीवर 'EOW-II (Banking and Medical - Unit 1)' असं लिहिलेल्या ऑफिसात पोहोचले. बावधनकर थांबलेच होते. त्यांच्या केबिनमध्ये त्यांचे बॉस, डिचोलकर, Additional CP, येऊन थांबले होते, नानांना भेटायला. ही सगळी मंडळी नानांच्या हाताखालून गेलेली, त्यांच्या नजरेतला आणि वागण्या-बोलण्यातला आदर इतर कर्मचाऱ्यांच्याही लक्षात आलाच, त्यामुळे रूमच्या बाहेर पाळीपाळीने लोक येऊन, पाहून आणि नानांशी नजरानजर झालीच तर सॅल्यूट ठोकून जात होती. डिचोलकर म्हणाले "बावधनकर करतीलच काम सर, पण काही लागलं तर जरूर सांगा मला."

ते गेल्यावर नानांनी आपल्याला ज्ञात असलेले सर्व डिटेल्स बावधनकरांना सांगितले. "आधी बँकेत जाऊया, मग पुढचा ॲक्शन प्लॅन ठरवू, शनिवारी-रविवारी काही काम नाही ना घरी वगैरे? आपल्याला नाशिकच्या प्रवासाची तयारी ठेवायला लागेल."

"आपल्याला? तुम्ही येणार सर?" आश्चर्याने बावधनकर म्हणाले.

हसत नाना म्हणाले, "अहोSS, खूप वर्षांनी कसल्यातरी वासावर जायला मिळतंय, ते सुख मिळू द्या जरा!"

"जरूर सर, ड्रायव्हर आणि जीप तयार ठेवतो. चला, निघू या आपण."

********

बँकेत शिरण्याआधी बावधनकर नानांना म्हणाले, "सर, introduction करून दिल्यावर मी तुम्हालाच लीड घेऊन बोलू देणार आहे, आज मी शिकायची संधी सोडणार नाही!" :OK, if you say so." नाना हसत म्हणाले. बँकेत पोहोचल्यावर आधी नायर साहेबांच्या केबिनमध्ये त्यांच्याशी आणि मग स्मिता पेठे, शेजवळ, संकेत अशा सर्व जणांशी नाना आणि बावधनकर बोलले. नानांनी त्या प्रिंट आऊटची कॉपी मागितली. ती पाहिल्यावर त्याच्या लक्षात आलं की ज्या सात जणांना EFTने पैसे ट्रान्सफर व्हायचे होते त्या सर्वांचे घरचे डिटेल पत्ते, नाव, इ-मेल ॲड्रेस आणि मोबाईल नंबर त्या कागदावर होते.

शेजवळांना एक्स्ट्रा कॉपी झालेली आठवली, "पण अमितने ती श्रेड केली असायला हवी होती..."

"तुम्ही स्वतः नाही केलंत ते काम?" त्यांच्याकडे रोखून पहात नाना म्हणाले.

"नाही सर," शेजवळांना AC केबिन मध्ये घाम फुटला, "पण मी इथेच होतो ना, सर..."

"तुम्ही त्याला श्रेड करतांना पाहिलं का?"

"नाही, पण संकेतसरांनी पाहिलं असेल ना सर, त्यांच्या बाजूलाच आहे श्रेडर..." संकेतकडे वळून शेजवळ म्हणाले

"वेल...मला आठवत नाही त्याने श्रेड केल्याचं.." संकेत म्हणाला.

"आता कुठेय मुलगा?"

शेजवळांनी तो मित्रांबरोबर फिरायला अहमदाबादला गेल्याचं सांगितलं गाडीचे डिटेल्स दिले, 'कुठे उतरणार आहे ते माहीत नाही', म्हणाले.

"त्याला मोबाईलवर फोन करा आता, बाकी काही सांगू नका," नाना म्हणाले, "फक्त कुठे उतरला आहे आणि कधी यायचा आहे ते विचारा." शेजवळांनी फोन केला, अमितने दिलेलं हॉटेलचं नाव बावधनकरांनी लिहून घेतलं, अजून दोन दिवसांनी येतो म्हणाला.

"स्मिता मॅडम, तुमच्याकडची कॉपी आहे?"

"हो सर, आणू?"

"सध्या राहू द्या. तुमच्याकडची कॉपी कोणी पाहिली असण्याची शक्यता आहे? कोणी आलं होतं तुम्हाला भेटायला त्या सुमारास?"

"नाही सर...फक्त नरेंद्र..", ती रडायचीच बाकी होती.

"Her fiancé, Sir," नायर म्हणाले, "He was here to meet with me in connection with a home loan, he works in another bank close by." त्यांनी बँकेचं नाव सांगितलं.

"ठीक आहे, तुम्ही जा आपापल्या ठिकाणी, आम्ही जरा नायरसाहेबांशी बोलतो, आणि मग लागेल तर तुम्हाला बोलावू. इथे नाही तर चौकीवर, कामाची वेळ संपेपर्यंत बाहेर कुठे जाऊ नका आणि यासंदर्भात कोणालाही फोन करू नका. खास करून तुम्ही, शेजवळ." शेजवळ मानेनेच 'हो' म्हणाले.

बाकीचे सर्व गेल्यावर नानांनी नायरना स्मिता-नरेंद्र, संकेत आणि शेजवळ यांच्या सांपत्तिक स्थितीविषयी खोदून-खोदून विचारलं, "I am trying to find a motive here, who has the most need?"

नायर साहेबांनी माहिती दिली पण तिघांच्याही हेतूंबद्दल आपल्याला मुळीच शंका नसल्याचं सांगितलं. "I can vouch for them with confidence," म्हणाले.

बावधनकरांनी विचारलं, "What about Amit? How well do you know him?"

नायरांनी सांगितलं की तो यायचा अधून-मधून बँकेत वडिलांना भेटायला आणि स्टाफची छोटी-मोठी कामं करायचा कागदपत्रं या टेबलावरून त्या टेबलावर नेऊन द्यायला, विशेषतः शेजवळांच्या आर्थ्रायटीसमुळे कोणाला त्यात काही गैर वाटत नसे, परवाही तो आला होता ते नोकरीच्या संदर्भात भेटायला.

"Were you able to help?"

"I could not, told them so."

"So he could have a motive?"

"He could, but didn't look the criminal type to me."

"Thanks, Mr. Nair, we will need a copy of that print-out. And thanks for all your help. But please remember, nobody is off the hook yet, including you!"

"I understand, "कॉपी काढून देत नायर म्हणाले, "And we will do everything to help. But I will need to speak to bank's lawyer to keep a record of this, OK to do that?"

'चालेल, पण कमीत कमी आवश्यक माहिती द्या' "And document it.." असं नायरांना सांगून, त्यांचा निरोप घेऊन दोघे निघाले.

"बावधनकर," बाहेर आल्यावर नाना म्हणाले, "तुमच्या अहमदाबादच्या counterpart ला फोन करून माणसं पाठवा त्या अमितच्या पत्त्यावर आणि उचला त्याला आणि त्याच्या तिन्ही मित्रांना. संध्याकाळपर्यंत इथे आला पाहिजे. त्यांचे मोबाईल ताब्यात घ्यायला सांगा आधी." बावधनकरांनी फोन करून व्यवस्था केली.

"सर, यादीत सात जणं आहेत बेनिफिशिअरीज मध्ये..."

"हो, मीही तोच विचार करतोय. एक मुंबईचा आहे बाकीचे बाहेरगावचे आहेत....we need to follow all."

फोटर्च्या ऑफिसात पोहोचेपर्यंत जेवणाची वेळ झाली होती. नानांनी राजूला आणि सुनेला फोन करून पूर्ण दिवस लागेल म्हणून सांगितलं, 'जेवण बावधनकरांबरोबर घेतोय' म्हणूनही सांगितलं.

***************

जेवण झाल्यावर बावधनकर आणि नानांनी त्या यादीतल्या मुंबईच्या बेनिफिशियरीचा नाव-पत्ता घेतला. ऑफिस पासून फार लांबचा पत्ता नव्हता. बाँबे टीचर्स ट्रेनिंग कॉलेजपासून दहा मिनिटांवर असलेली सहा मजली बिल्डिंग, पाचव्या मजल्यावर राहणारे दाबके म्हणून कुटुंब होते. नानांनी बावधनकरांना सिव्हिलियन ड्रेसमध्ये यायला लावलं आणि गाडी काढून दोघे सरळ त्या पत्त्यावर गेले. ड्रायव्हरला गाडी थोडी दूर पार्क करायला सांगून दोघे बिल्डींगपाशी चालत गेले आणि लिफ्टने वरती गेले. घराचं दार बंद असल्याने बेल वाजवून दोघे थांबले. आतून कोणीतरी दारापाशी आल्याचा आवाज आला आणि की होल चा फ्लॅप उघडला. साठीच्या बऱ्याच पुढच्या गृहस्थांनी डोळा लावून बाहेर पाहिलं. बावधनकरांनी ID card की होल समोर धरलं आणि म्हणाले, "नमस्कार, मी ACP बावधनकर, Economic Offenses Wingच्या ऑफीस मधून आलोय, थोडीशी चौकशी करायची होती, हे माझे साहेब, माने सर, आत येऊ का?"

आतून एका स्त्रीचा दबका आवाज ऐकू आला..."..."

"आम्ही काही तक्रार केलेली नाही,..." त्या माणसाने विचारले "काय पाहिजे?"

"दाबके साहेब, आम्ही आत येऊन बोललो तर आधिक बरं होईल, व्हिक्टरी बँकेच्या संदर्भात चौकशी करायची आहे, तुमचा अकाऊंट आहे ना तिथे?"

काही क्षण गेल्यावर दाबक्यांनी दार उघडले. दोघांकडे व्यवस्थित पाहून झाल्यावर त्यांनी अनिच्छेनेच त्यांना आत येऊ दिलं.

"बसा, काय काम आहे?" मुळात क्षीण प्रकृतीच्या मिसेस दाबक्यांचा चेहेरा तणावग्रस्त वाटत होता. काही खातेदारांना परदेशातून आलेल्या रकमेसंबंधात धमकी आल्याचा संशय आला आहे हे बावधनकरांनी त्या दोघांना थोडक्यात सांगितलं आणि त्यांना कुणी फोन केला होता का ते विचारलं. दोघा दाबके पती-पत्नींनी एकमेकांकडे पाहिलं.

"घाबरू नका," बावधनकरांनी आपलं पाकिट बाहेर काढून त्यांना बिझिनेस कार्ड दिलं, "हा माझ्या ऑफिसचा पत्ता आणि फोन नंबर. तुमच्यावर त्यांची पाळत असेल असा आम्हाला संशय होता म्हणून सिव्हिलियन कपड्यांत आलो आहोत. त्या नंबरवर फोन करून तुम्ही माझ्याविषयी खात्री करून घेऊ शकता."

मग काही क्षण अवघड शांततेत गेल्यावर काहीतरी निर्णय घेतल्यासारखे दाबके म्हणाले, "ठीक आहे, माझा विश्वास आहे तुमच्यावर. आला होता फोन काल एक. मुलाने लॉस एंजेलिसहून पैसे पाठवले होते, चार लाख. फोन करणाऱ्याने आम्हाला जीवाची धमकी दिली आणि पोलिसांना सांगू नका म्हणून सांगितलं. पैसे उद्या शनिवारी बँकेतून काढून आणून रविवारी संध्याकाळी व्हीटी स्टेशनवर ठेवायचे आहेत, सात वाजता." एका दमात दाबके बोलून गेले आणि त्यांच्या पत्नीचा चेहेरा आशेने एकदम उजळला, "आता काही काळजी नाही ना? तुम्ही कराल ना मदत? पैसे नको ना ठेवायला?"

"आम्ही नक्कीच मदत करणार आहोत पण पैसे तयार ठेवा आणि ठरल्या वेळी सांगितलेल्या ठिकाणी ठेवा. पुढचं आम्ही पाहून घेऊ. कुठे आणि कसे ठेवायचे आहेत पैसे?" - बावधनकर

"ब्राऊन पेपरच्या एन्व्हलपमध्ये, प्लॅटफॉर्म नंबर अठराच्या कचरापेटीत सात वाजता टाकायला सांगितलं आहे, एक्झॅक्टली सात वाजता टाका म्हणाला तो."

"हजाराच्या नोटांमध्ये?" नानांनी विचारलं.

"हो."

"ठीक आहे, काळजी करू नका, मी साध्या वेषातले पोलिस आसपास ठेवीन, माझं कार्ड राहू द्या, पण शक्यतो मला ऑफिसात फोन करू नका. बघू कार्ड ते.." बावधनकरांनी दिलेलं कार्ड परत मागून घेतलं, पेन काढून मागे स्वतःचा मोबाईल नंबर लिहिला. "वाटलंच तर मला मोबाईलवर फोन करा. निघू?"

दाबके जोडप्याला सोडून दोघे गाडीत परतले. बावधनकरांनी ऑफिसात परतताच साध्या वेषातले तिघे हवालदार दाबक्यांच्या बिल्डींगच्या आसपास ८-८ तासांच्या शिफ्ट मध्ये असतील अशी व्यवस्था केली.

"बावधनकर," नाना म्हणाले, "This is getting more intricate than I thought. जरा स्टेट मॅप असेल तर बघू."


बावधनकरांनी आणलेला महाराष्ट्राचा मोठा नकाशा घडी उलगडून टेबलावर ठेवत नानांनी बँकेतल्या कागदाची कॉपीही मागितली. एक ठळक पेन्सिल घेऊन त्यांनी बेनिफिशिअरीजच्या गावांची नावं mark करायला सुरूवात केली...अकोला, भुसावळ, चाळीसगाव, जळगाव, मुंबई, नागपूर, नाशिक, शेगाव. प्रथमदर्शनी काही पॅटर्न दिसेना.

"सर, या यादीतली नावं अल्फाबेटिकली आहेत, तसा sequence नसेल तर?"

"यू आर राईट. मुंबई सुरूवातीला आहे या ट्रान्स्फर्सच्या. तिथून सुरूवात केली पाहिजे...पण नंतर काय? Let us call the Nagpur number."

यादीत पाहून बावधनकरांनी नागपूरच्या recipient चं नाव पाहिलं: 'पाध्ये', आणि नंबर पंच केला ऑफिसच्या फोनवर. थोड्याफार फरकाने दाबक्यांचीच पुनरावृत्ती, पण पाध्यांनाही कॉल आला होता, साडे तीन लाखांसाठी आणि हजाराच्या नोटांचं ब्राऊन पेपरचं एन्व्हलप, नागपूर रेल्वे स्टेशनच्या प्लॅटफॉर्म नंबर दोनच्या बाहेर द्यायचं होतं, सकाळी साडेअकरा वाजता, कुणाला ते नंतर कळणार होतं. पाध्यांनाही बावधनकरांनी पैसे तयार ठेवायला सांगितलं आणि साध्या वेषातल्या पोलिसांच्या प्रोटेक्शनची व्यवस्था केली.

"बावधनकर, I am sure you got the obvious connection..ट्रेन स्टेशन्स. बाकीचे बेनिफिशिअरीज कन्फर्म करायचीही गरज वाटत नाही मला, पण तरीही करा तुम्ही ते in parallel. आधी हे पहा," पेन्सिल हातात घेत, नकाशाकडे वळत नाना म्हणाले, "मुंबईहून रविवारी ८ तारखेला संध्याकाळी सातच्या सुमारास प्लॅटफॉर्म १८ वरून निघून नाशिकरोड मार्गे नागपूरकडे ला जाणारी आणि सोमवारी ९ तारखेला सकाळी ११ च्या सुमारास नागपुरात पोहोचणारी ट्रेन कोणती आहे?" त्यांनी नकाशावर पेन्सिलीने 'मुंबई - नाशिकरोड - चाळीसगाव - जळगाव - भुसावळ - शेगाव - अकोला - नागपूर' हा रूट ट्रेस केला.




बावधनकरांनी त्यांचा लॅपटॉप उघडून रेल्वेची एक बुकमार्क्ड साईट सर्च केली. [http://indiarailinfo.com/train/vidarbha-express-12105-cstm-to-g/1742/162](http://indiarailinfo.com/train/vidarbha-express-12105-cstm-to-g/1742/162)...

थोडयाच वेळात त्यांनी सांगितलं, "सर, 12105 Mumbai-Gondia Vidarbha Express जाते त्या रूटने त्या वेळात. पण नागपुरातून पुढे गोंदियाला जातेय ती."

"ओक्केS!" नाना उत्तेजित होऊन म्हणाले, "सांगा मला काय वेळा आहेत डिपार्चरच्या त्या त्या गावात?" बावधनकरांनी सांगितलेल्या वेळा त्यांनी पेन्सिलीने नकाशात त्या त्या गावांपुढे लिहायला सुरूवात केली.

मुंबई - ०७.१०
नाशिकरोड - १०.४२
चाळीसगाव - १२.३५
जळगाव - १.३५
भुसावळ - २.२५

शेगाव - ४.००
अकोला - ४.३०
नागपूर - ९.२०

"Interesting! नागपूरचा पिक-अप साडेअकराचा आहे, गाडी ९.२० ला डिपार्ट होते, येते किती वाजता?"

"८.५५ चं arrival आहे."

"अगदी उशीर झाला तरी तासभर लेट. म्हणजे बहुतेक शेवटच्या पिक-अपच्या आधी गाडी निघणार आहे. म्हाणजे या कलेक्शनचं फायनल डेस्टिनेशन नागपूर असावं, गोंदिया नव्हे."

"शक्य आहे."

"फील्डिंग लावा तिकडे नागपुरात. पण आधी Let's go for the other folks. उरलेल्या बेनिफिशिअरीजना फोन करून आणखी काही माहिती मिळते का ते पहा. किती वाजलेत?"

"चार वाजलेत, सर."

"ते अहमदाबादवाले कधी पोहोचताहेत, काही फोन झाला का?" बावधनकरांनी फोन करून चौकशी केली. थोडं बोलणं झाल्यावर ते वळले. "घेतलंय सर चौघांना, तीन तासांपूर्वी निघालेत, दोन-एक तासांत पोहोचतील. पण print-out त्या अमितच्या फाईलमध्येच मिळाला, चुकून राहिला म्हणतोय. त्याला काही माहिती नसावी असं दिसतंय."

"We will see. बरं, if you don't mind, मी जरा चेंज रूम मध्ये पडतो आडवा, दुपारचं अर्धा तास पडायची वाईट खोड लागलीये शरीराला, चालेल? आणि हो, माझ्या गोळ्या राहिल्या जेवणानंतरच्या. जरा पाणी तेवढं द्या."

"Sure, Sir!" म्हणत बावधनकरांनी बिसलेरीची नवीन बाटली काढून दिली आणि त्यांना आतल्या रेस्ट-रूममध्ये नेऊन पोहोचवलं. "तुम्ही पडा सर, मी तोपर्यंत हे बाकीचे कॉल्स करून घेतो."

**************
**************
नानांची अर्ध्या तासाचीच डुलकी होईपर्यंत बावधनकरांनी चाळीसगाव, जळगाव, भुसावळ, शेगाव आणि अकोल्याला फोन करून घेतले. चाळीसगाव आणि जळगावचे फोन लागले पण विशिष्ट व्यक्ति भेटल्या नाहीत फोनवर. भुसावळच्या शर्मा नावाच्या बेनिफिशिअरीने आपल्याला काही फोन वगैरे आला नसल्याचं सांगितलं, पण त्याचा मुळी आपल्याला खरोखरीच्या मुंबईच्या पोलिस अधिकाऱ्याचा फोन आला आहे यावरच विश्वास नव्हता असं वाटलं बावधनकरांना, त्याला खरंच धमकीचा फोन आला असेल तर हा दुसरा फोन त्यांचाच ट्रॅप असेल असंही वाटलं असणं शक्य होतं. तेंव्हा बावधनकरांनी 'भुसावळच्या पोलिसांकडूनही कुणीतरी घरी

येईल' असा निरोप दिला, "आलं की बघू," म्हणाला. शेगाव आणि अकोल्याला मात्र माहिती मिळाली आणि तिथल्या पैसे पिक-अप करण्याच्या वेळा गाडीच्या डिपार्चरच्या वेळेच्या अर्धा-अर्धा तास आधीच्या निघाल्या. बावधनकरांनी प्रिंट-आऊट कडे पाहत एकूण रकमेची बेरीज केली, सर्व मिळून २८ लाखांची रक्कम गोळा होणार होती. इतक्या थोड्या वेळात इतकं जबरदस्त प्लॅनिंग करणारे कोण असावेत याचा विचार करता-करता त्यांनी आजच्या दिवसाची इतर कामं आणि फायली निपटायला सुरूवात केली. सकाळी माने सरांचा फोन आला तेंव्हा या केस मध्ये पूर्ण दिवस जाईल अशी त्यांची अपेक्षा नव्हती! त्यांची आजची जमतील तितकी कामं त्यांनी आटोपून घेतली, तर आजची बाकीची कामं आणि पुढचे दोन-तीन दिवस आणखी या प्रकरणात जातील हे गृहीत धरून त्या दिवसांची कामं, हाताखालच्या एका PI आणि दोघा PSI ना delegate केली. तोपर्यंत नाना उठून बाहेर आलेच फ्रेश होऊन. डायाबेटिसचा किंचित त्रास आणि सहा वर्षांपूर्वी पेसमेकर लावलेला, तेंव्हापासून -आपल्यामुळे इतरांना त्रास होऊ नये म्हणून - स्वतःच्या प्रकृतीची ते काटेकोरपणे काळजी घ्यायचे.

बावधनकरांनी त्यांना फोन कॉल्स विषयी आणि रकमेविषयी ब्रीफ केलं. ती रक्कम ऐकली आणि नानांना एकदम काहीतरी आठवलं, "अहो, जरा मला ती टाईम्स ऑफ इंडियाची साईट उघडून द्या बरं". IIT ला आणि IIM ला शिकणाऱ्या राजूच्या मुलांनी आजोबांना एक्दम net-savvy करून टाकलं होतं! दहा-पंधरा मिनिटे सर्च केल्यावर त्यांना हवी होती ती बातमी सापडली आणि एकदम एक्साईट होत ते म्हणाले, "बावधनकर, this is possibly above  your pay grade! I think we ought to involve ATS!!"

"ATS?" anti-terrorism squad च्या उल्लेखाने बावधनकर हबकलेच!

'"कोण बारिया आहेत ना तिथे आता?"

"हो सर, दिनेश बारिया. पण.."

"त्यांना फोन लावा आणि ते सध्या नेमके कशाच्या ट्रेल वर आहेत ते विचारा. मला खात्री आहे हे प्रकरण आणि ATS चं टार्गेट यांचा नक्की संबंध असणार. हे वाचा...."

डिसेंबर १५, २०१२ ला नागपुरात महाराष्ट्र विधानपरिषदेचं हीरकमहोत्सवी अधिवेशन होणार होतं, आणि त्या कार्यक्रमासाठी पंतप्रधान मनमोहन सिंह प्रमुख पाहुणे म्हणून येणार होते.

"गाडी आणि पैसे ९ तारखेला पोहोचताहेत नागपुरात, अधिवेशन १५चं आहे, what is going  to happen in a week that needs big cash?"

बावधनकरांच्या अंगावर काटा आला, त्यांनी बारियांना शोधून काढून फोन लावला आणि भेटीसाठी वेळ मागितली. एक तासाने या म्हणाले. अर्ध्या तासाने निघावं लागणार होतं. तेवढ्यात अमित आणि त्याच्या मित्रांना घेऊन येणारी टीम आलीच.

सगळ्यांना इंटरॉगेशनसाठी नेल्यावर बाकीचे तर गळाठलेच, पण आधी टफ वाटणारा आणि 'मला काही

माहीत नाही' म्हणणारा पक्या २० मिनिटांत कोलमडला. त्याच्याकडून कळलं ते असं: पक्याला मुंबईत माहित असलेल्या एका भाईने त्याला सांगून ठेवलं होतं की काही मोठा हात मारण्याचा चान्स असेल तर ताबडतोब फोन करून माहिती द्यायची, त्या खबरीच्या बदल्यात त्याला भरपूर पैसे मिळतील. अमितने फुशारकी मारत बाकीच्यांना त्याचे वडिल कसे लाखा-लाखाचे डील्स करणाऱ्या बँकेत काम करतात हे पटवण्यासाठी त्याच्या फाईलमध्ये खरोखरीच चुकून श्रेड करण्याचा राहिलेला कागद दाखवला होता. रात्री अमित झोपल्यावर पक्याने तो काढून त्याची xerox copy काढली, मूळ कागद अमितच्या फाईलमध्ये ठेवला, आणि 'भाई'ला फोन करून तो कागद फॅक्स केला होता. त्याबद्दल २० हजार रुपये मिळणार होते मुंबईत आल्यावर.

बावधनकरांनी पक्याकडून त्या 'भाई'ची माहिती 'घेतली'. प्रदीप रेळे, रेकॉर्ड वरचा माणूस होता. त्याचा फोटो त्यांनी मागवून घेतला. आधी नावावरून नानांना काही बोध झाला नाही, पण फोटो पाहिल्यावर त्यांना बारा -एक वर्षांपूर्वीची केस आठवली. "I know this face, कुठे पाहिलंय त्याला?" बावधनकर त्याचं पूर्वीचं रेकॉर्ड चाळत असतांना थांबले, २००० साली नानांचं चंद्रपूरला पोस्टिंग असतानांची ती नोंद होती.

"सर, यू वुड हॅव नो आयडिया!!" ..."हा रेळे कोणाशी linked आहे माहितीये, तुमचा जुना दोस्त, अविनाश!"

"अविनाश? चंद्रपूर?"

"येस सर! The very same!"

"I'll be damned!"

स्टेशन डायरीत नोंद करून घेऊन, FIR नोंदवून अमित आणि त्याच्या मित्रांना तात्पुरतं लॉक अप मध्ये ठेवून बावधनकर नानांबरोबर बारियांना भेटायला निघाले. वाटेत त्यांनी राजूला फोन केला. "मी रात्री ९ पर्यंत येईन घरी, काळजी करू नका. .....हो, जेवायला घरीच आहे....बघतो, बावधनकर सोडतील मला" त्यांच्याकडे वळून बघत म्हणाले, "जमेल?" "Of course, Sir. मी तर म्हणत होतो आज माझ्याकडेच रहा रात्री." "राहिलो असतो, some other time, पण आज मला घरी जाऊन कपडे, औषधं वगैरे पॅक केली पाहिजेत." पलिकडून राजूने विचारलं असणार, "हो रे, जरा investigative भूत संचारलंय अंगात बऱ्याच वर्षांनी अंगात, बावधनकर आणि मी परवा रात्रीच्या ट्रेनने नागपूरला जाऊ बहुतेक....नाही...काळजी कसली करतोस? I will be just fine! ..अं...नाही, तीन-चार दिवसांत परत येईन, घरी आलो की बोलतो सविस्तर. OK? चल, बाय."
************
बारियांकडे भेटायला जातांना वाटेत नानांनी बावधनकरांना विचारलं, "तुमच्याकडे ते फोटॉन, नेट-कनेक्ट वगैरे आहे का लॅपटॉप बरोबर?"

"आहे ना सर, बऱ्यापैकी स्पीड आहे, चालू करू?"

"लावा, काही आठवलंय, ते पहातो..." पुढची पाच-दहा मिनिटे जीप ट्रॅफिकमधून निघत असतांना नाना

काही सर्च करण्यात गुंगून गेले होते. त्यांच्या सफाईचं बावधनकरांना प्रचंड कौतुक वाटलं. नानांनी "Found it!" म्हंटलं, आणि एक बातमी बावधनकरांना दाखवली.

बावधनकरांनी भराभर नजर फिरवून ती वाचली, "हो मला चांगलं आठवतंय हे प्रकरण, पण पुढे काही झाल्याचं आठवत नाही.." २० टन अमोनियम नायट्रेटच्या गोण्या भरलेला ट्रक मे २०१२ मध्ये गायब झाला होता. नॅशनल इन्व्हेस्टिगेटिव एजन्सी (NIA) त्याच्या मागावर होती, पण तपास अजूनही अपुरा होता.

"कसं आठवेल? कारण पुढे काही झालंच नाही! तो ट्रक शेवटचा कुठे गायब झालाय ते पहा."

"सतना, छत्तीसगढच्या बॉर्डरवर."

"अविनाश कुठेय सध्या, माहितीये?"

खजील होत बावधनकर म्हणाले, "नाही, सर, या EOW च्या रगाड्यात इतर फारसं फॉलो नाही करू शकलो..."

"नॉट टू वरी, अहो मी रिकामटेकडा आहे म्हणून फॉलो करू शकतो, इतकंच! असो, तो आहे गोंदियाच्या जंगलात. नाऊ, गेट इट?"

आता चकित होण्याची पाळी बावधनकरांची होती. "Fascinating!"

ते पेज नानांनी बुकमार्क केलं आणि लॅपटॉप बंद केला. ते बारियांच्या ऑफिसबाहेर पोहोचले होते.

बारिया नानांना ओळखत होतेच, त्यांनी genuine आनंद व्यक्त केला, बावधनकरांनी EOW च्या केसचं सांगितलेलं सगळं त्यांनी ऐकून घेतलं. आपलं target सांगायला ते तयार नव्हते. "PM's security is of course our priority, so we will be there in full force. तुम्ही दिलेला लीड आम्ही नक्की फॉलो करू, थँक्स!"

"बारिया, You can do better than follow our lead," नाना म्हणाले. त्यांनी लॅपटॉप उघडून बूकमार्क केलेलं पेज दाखवलं. बारियांनी बातमी वाचली आणि वरती पाहिलं.

नाना म्हणाले, "You must agree that the two investigations are converging, we have the same target, will you please work with us?"

"मी काय करायला हवंय तुम्हाला?"

"काही खास वेगळं नाही, तुम्हाला ट्रक मोबिलाइझ झालेला कळला की कळवा इतकंच फक्त. मला वाटतं हे

पैसे त्या ट्रकचं पेमेंट आहे...."

"ओके, यू डेफिनेटली हॅव अ व्हेरी सॉलिड केस, मला कळवत चला, हवी ती मदतही देईनच. थँक्स अगेन! मनापासून!"

***************
***************
घरी ठाण्याला गाडीतून जातांना नाना म्हणाले, "बावधनकर, I have changed my mind, मला वाटतं आपण उद्या सकाळीच नाशिकरोडला जाऊ. त्या डॉ. जोशींना कॉल यायच्या आत त्यांना फोन करणारा ट्रॅक करता आला तर पाहू. We will join the train from there, what do you say?"

"ठीक आहे सर, सकाळी किती वाजता पिक अप करू तुम्हाला?"

"आठच्या सुमारास या. म्हणजे मला बॅग वगैरे आवरायला मिळेल. आणि हो, तो प्रदीप रेळेचा फोटो विसरू नका."

"Sure. आणखी काही लागेल?"

"भरपूर ट्रॅव्हल व्हाऊचर्स ठेवा जवळ, पुढच्या आठवड्यात कुठे कुठे उतरायला आणि रहायला-जेवायला लागेल, सांगता येत नाही. आणि हो, लॅपटॉप आणि मोबाईलचे चार्जर्स विसरू नका. सिव्हिलियन ड्रेसही ठेवा चार-सहा बरोबर बॅगेत."

रात्री साडेआठला नानांना घरी सोडून, राजूशी आणि नानांच्या सुनेशी थोड्या गप्पा मारून, बावधनकर परतले.

************

**८ डिसेंबर, शनिवार**. दुपारचा १ वाजलेला होता.
अनमार्क्ड पोलीस कारने नाशिकरोडला पोहोचून नाना आणि बावधनकर डॉ. जोशींच्या घराच्या दिशेने निघाले. नाशिकरोड ते नाशिक या पुणे-नाशिक मेन रोडवर शिखरेवाडीच्या तोंडाशी आल्यावर समोरासमोरचे दोन बस स्टॉप दिसल्यावर नानांनी ड्रायव्हरला सांगून गाडी थांबवली. रस्त्याच्या बाजूला पार्क करून खिडकीतून त्यांनी नाशिकच्या दिशेने जाणारा बस स्टॉप आणि त्याच्या आसपासचा भाग न्याहाळला आणि 'चला' म्हणाले. डॉ. जोशींच्या घरापाशी पोहोचल्यावर त्यांनी उतरून आसपासची वस्ती न्याहाळली, जवळजवळ सगळीच राहती घरं, एक दोन दुकानं, त्यांपैकी एक घराच्या रस्त्याच्या विरुद्ध बाजूला पण अगदी समोरच. बावधनकरांनी ड्रायव्हरला पैसे दिले आणि 'गाडी घेऊन जाऊन जेवून ये' म्हंटलं.

आधी फोन करून सांगितल्यामुळे डॉक्टर आणि कुटुंबिय वाटच पहात होते. शनिवारची दुपार असल्याने अमृताचा क्लास नव्हता, पण तिला असाईनमेंट्स पूर्ण करायच्या होत्या, 'त्या शिल्पाकडे केल्यास तरी

चालतील, बाबा सोडतील तुला' असं आईने म्हंटल्यावर जेवण झाल्यावर ती खुषीतच शिल्पाकडे गेली होती.

"या, नानासाहेब, नमस्कार!" डॉक्टर म्हणाले. बावधनकरांची ओळख झाल्यावर सुनेने म्हंटलं, "हातपाय धुवून घ्या, ताटं घेते आधी, मग बोलू आपण."

"पैसे आणलेले आहेत?" नानांनी विचारलं.

"होय, सांगितलं तसं पाकीटात ठेवले आहेत..." डॉक्टर म्हणाले.

"Good, चला जेवून घेऊया." नाना म्हणाले. इतर जुजबी गप्पांमध्ये जेवणं झाली तरी जोशी कुटुंबाच्या मनावरचा ताण palpable होता.

हात धुवून बाहेरच्या खोलीत सर्व बसल्यावर नानांनी बावधनकरांकडून रेळेचा फोटो घेतला आणि डॉक्टरांना दाखवला, "हा रेकॉर्डवरचा रेळे म्हणून हिस्टरी शीटर आहे, या माणसाला गेल्या दोन-तीन दिवसांत तुमच्यापैकी कुणी पाहिलंय का, especially डॉक्टर गुरूवारी सकाळी तुम्ही अमृताला सोडायला गेलात तेंव्हा?" तिघांनी फोटो पाहून 'नाही' म्हणून सांगितलं.

"पण गुरूवारी सकाळीच का म्हणताय तुम्ही?" डॉक्टरांनी विचारलं.

"त्याने फोनवर specifically अमृताचं नाव घेतलं, आम्हाला मिळालेल्या माहितीनुसार या गुंडाला किंवा गुंडांना तुमच्याविषयी मिळालेली माहिती फक्त तुमचं नाव, घराचा पत्ता, इ-मेल अँड्रेस आणि तुमचा मोबाईल फोन नंबर इतकीच मर्यादित होती, तुम्हाला दोघांना एकत्र बोलतांना पाहिल्याशिवाय त्याला अमृताचं नाव माहिती असायचं काहीच कारण नव्हतं, म्हणून."

"On second thoughts," डॉक्टर म्ह्णाले, " पलिकडच्या बस स्टॉप वर कुणीतरी माणूस उभा असल्याचं मी स्कूटी वळवतांना माझ्या लक्षात आलं होतं, पण तो हाच होता की नाही ते मला आठवत नाही."

"Never mind, पण तो जर तोच असेल, तर त्याला तुम्ही नेमके चेहेऱ्याने कोण आहात हे कळण्यासाठी इथल्या local इतर कुणाची तरी मदत घ्यावी लागली असणार.....इतक्या सकाळी तशी मदत करणारं दुसरं कोण असेल?"

"काही कल्पना नाही," डॉक्टर मुलाकडे आणि सुनेकडे पहात म्हणाले.

"ते समोरचं किराणा दुकान कधी उघडतं?"

'तो सकाळीच सहाला आलेला असतो, आम्ही बाहेर पडतांना उघडलेलं असतं ते दुकान."

"चला, आमच्याबरोबर या, आपण भेटू जरा त्याला."

दुकानात दोन गिऱ्हाईकं होती, पण दुकानदार एकटा नव्हता, त्याची बायकोही होती. डॉक्टरांनी त्याला बाहेर बोलावल्यावर बायकोला गिऱ्हाईकं बघायला सांगून तो बाहेर आला.

दुकानापासून लांब अंतरावर चौघे चालत गेल्यावर डॉक्टर त्याला म्हणाले, "रतिलाल, आमच्या ओळखीचे हे पोलीस आधिकारी मुंबईहून एका गुन्ह्याच्या तपासासाठी नाशिकरोडला आले आहेत, त्यांना एक संशयित माणूस बुधवार-गुरूवारी या भागात आला होता असं वाटतं, त्याचा फोटो आहे त्यांच्याकडे, तुला आठवतंय का त्याला पाहिल्याचं?"

फोटो पाहिल्यावर लगेचच रतिलाल म्हणाला, "संशयित? अहो हा तुम्हाला भेटायला आलावता नं गुरुवारी सकाळी?" हळूहळू आवाजाची पट्टी वाढवत रतिलाल पुढे म्हणाला, "अहो मीच त्याला सांगितलं तुम्ही अमुला सोडायला स्टॉप वर गेलेले, म्हणून चहा घेऊन येतो भेटायला म्हणाला. नाय आला का? काय लफडंय काय डॉक्टर?"

"हे पहा," बावधनकर पोलिसी आवाजात म्हणाले, "आम्ही चौकशी करतोय हे कुणाला कळायला नकोय, नसत्या गोत्यात याल, कळलं?"

"हो, हो, मी कशाला बोलतोय हो साहेब?" आवाज एकदम खालच्या पट्टीत आणत रतिलाल म्हणाला.

"नीट आठवा," नानांनी विचारलं, "तुम्ही 'अमुला सोडायला स्टॉप वर गेलेले' म्हणालात, त्याला अमृताचं नाव तुम्ही सांगितलं का?"

"नाही हो, मी कशाला नाव सांगेन? मी 'नातीला घेऊन गेले' बोललो."

"OK, thank you! तुम्ही फार महत्त्वाची मदत केलीत आम्हाला," बावधनकर म्हणाले, "तो पुन्हा या भागात कुठे दिसला तर लगेच मला फोन करा, काय?" त्यांनी आपल्या कार्डवर मागे आपला मोबाईल नंबर लिहून देत म्हंटलं. "आणि हो, तुमच्या एका चुकीने पोरीचा जीव धोक्यात येईल याची जाणीव ठेवा आणि कुणाशी बोलू नका, काय?"

"नक्की, नक्की, साहेब!"

घरी परत आल्यावर नाना म्हणाले, "म्हणजे स्टॉप वर तुम्हाला दिसलेला हा रेळेच, आता आम्हाला ट्रॅक करायला चांगलीच मदत होणार. मला वाटतं आता संध्याकाळी ९ वाजता तुम्हाला फोन करून उद्या पैसे घ्यायलाही हाच येईल किंवा आसपास असेल. आम्ही नजर ठेवू. तुम्ही निश्चिंत रहा, OK?"

जाणवण्याइतके relax झालेले डॉक्टर म्हणाले, "थँक्स, पण तुम्ही आता कुठे उतरणार आहात, इथेच का

रहात नाही, दोघेही? आम्हालाही तेवढाच आधार वाटेल..."

"माझी काही हरकत नाही तुमची गैरसोय होणार नसेल तर.." नानांनी बावधनकरांकडे पाहिलं.

"मला प्रॉब्लेम नाही, पण आमचा ड्रायव्हर आहे बरोबर."

"आपल्याला गरज आहे का गाडीची, आपल्या प्लॅनप्रमाणे उद्या रात्री पुढे जायचं असेल तर?" नाना म्हणाले, "नाहीतर जाऊ दे त्याला गाडी घेऊन परत."

"हो. आणि उद्यापर्यंत गाडी लागलीच तरी मी आहेच की!" जयेश म्हणाला.

"OK, तसं करू, मग तो आता जेवून आला की बॅग्ज ठेवून घेऊ आणि दिवसाच निघू दे त्याला, रात्रीच्या आत पोहोचेल मुंबईत." बावधनकर म्हणाले.

"बावधनकर, त्या दाबक्यांना फोन करून कन्फर्म कारून घ्या, पैसे काढून आणले असले पाहीजेत त्यांनी एव्हाना."

बावधनकरांनी फोन केला, दाबक्यांनी पैसे तयार ठेवलेले होते. साध्या वेषातल्या हवालदारांनाही फोन करून त्यांचं काम व्यवस्थित चालू आहे याचीही त्यांनी खात्री करून घेतली.

"आणखी एक काम आहे, बावधनकर," नाना त्या दोघांना दिलेल्या खोलीत गेल्यावर म्हणाले, "मला गेल्या दहा वर्षांतली अविनाशच्या रेकॉर्डची सगळी माहिती हवी आहे, SID च्या database मध्ये असायली हवी, मिळेल? Electronically तासाभरात मिळाली तर फार बरं होईल."

"हो, शक्य आहे, SID च्या Internal Security मध्ये मिळेल," बावधनकर जरा विचार करून म्हणाले, "तासाभरात म्हणताय म्हणजे बारियांना मध्ये घातलं तरच शक्य आहे, करतो त्यांना फोन." त्यांनी बारियांना फोन करून State Intelligence Department मधून माहिती मिळवून पाठवण्याची गळ घातली.

नानांनी त्यांची आवश्यक अशी दुपारची वामकुक्षी पूर्ण केली आणि औषधं घेतली. तोपर्यंत बारियांनी promise केल्याप्रमाणे चार वाजेपर्यंत सर्व माहिती पाठवली होती. पुढचा तासभर एकाग्रपणे नानांनी सगळी माहिती अथ ते इति वाचून काढली. पाच वाजता डॉक्टरांच्या सुनेने सर्वांना चहासाठी बोलावलं. नाना चहा घेतांना डॉक्टरांना आणि जयेशला म्हणाले, "मला बरेच वर्षांपासून इथल्या त्या देवळाली कँपातल्या बार्न्स स्कूलला भेट द्यायची फार इच्छा आहे, आता जाऊ शकू का? तिथल्या मुख्याधापकांना भेटायलाही आवडेल."

"अरे जमेल का काय म्हणता, लगेच निघू, आमच्या जयेशने त्यांचं नुकतंच एका लायब्ररीचं डिझाईन केलंय, तो करेल फोन डॉ. परेरांना आणि विचारेल." जयेशने चहा घेतानाच फोन केला, डॉ. परेरा 'जरूर या,

मी थांबतो' म्हणाले. पाचच मिनिटांत जयेशने गाडी काढली. डॉक्टर आणि जयेश गाडी काढायला पुढे गेले तेंव्हा नाना मागे घुटमळले, बावधनकरांना म्हणाले, "एक पत्ता देतो तुम्हाला, त्या पत्त्यावर माणसं पाठवून एक महत्त्वाचं काम करायचंय."

त्यांनी हलकेच बोलत पाचच मिनिटांत काय करायचं ते सांगितलं. बावधनकर म्हणाले,

"सर, are you very sure? This might precipitate an early disaster..."

"काही होणार नाही, just do it very quietly. आम्ही त्या परेरांना भेटायला गेलो की तुम्ही अॅरेंजमेंट्स करा. Let's go."

पुढचे दोन तास नानांनी बार्न्स रेसिडेन्शिअल स्कूलचा विस्तीर्ण कॅंपस पहाण्यात आणि परेरांबरोबर बोलण्यात घालवले. शेवटी निघतांना ते म्हणाले "डॉ. परेरा, फार वर्षांची इच्छा होती माझी इथे यायची, I am very impressed with the school, मला कुणाला recommend करायचं झालं तर admit करू शकाल?"

"Anything for you, Sir, अगदी शैक्षणिक वर्षाच्या मध्येही सांगा, just let me know or send a note and I will take care of it, OK?"

आठपर्यंत सर्व जण घरी परतले. नऊच्या फोनचं टेन्शन जोशी कुटुंबियांना आलेलं स्पष्ट होतं. मैत्रिणीकडून घरी आलेल्या अमृताला तिच्या आईने लवकर जेवायला घालून झोपायला लावलं. ती झोपायला गेल्यावर थोड्याच वेळात डॉक्टरांचा मोबाईल वाजला. अपेक्षेप्रमाणे लोकल कॉल होता.

"डॉक्टर जोशी, उद्या रात्री साडेदहा वाजता नाशिकरोड रेल्वे स्टेशनच्या समोरच्या पायऱ्यांवर एक Nike चा लाल टी शर्ट घातलेला माणूस उभा असेल, त्याच्या हातात पाकीट द्या आणि वळून परत जा. तुमच्याखेरीज घरातला इतर माणूस आसपास दिसला तर अमृता उद्यानंतर दिसणार नाही. रात्री साडेदहा." फोन बंद झाला.

शहारलेल्या डॉक्टरांनी फोन ठेवला. नानांनी पाठीवर हात ठेवला, "Don't worry, everything will work out just fine."

जेवणाआधी खोलीत गेल्यावर नानांनी बावधनकरांकडे प्रश्नार्थक पाहिलं. "Done! झालं काम," बावधनकर पुटपुटले. इतरांबरोबर शांततेत जेवणं झाल्यावर दोघे झोपायला आपल्या खोलीत गेले.

*************

८ डिसेंबर: रविवारी सकाळी ११ वाजता बावधनकरांनी परत दाबक्यांना आणि त्यांच्या साध्या वेषातल्या माणसांना वेगवेगळे फोन केले, दाबक्यांना कुणाचाही फोन आला नव्हता आणि पोलीसांना कुणी संशयास्पद व्यक्ती आसपास आढळून आलेल्या नव्हत्या. संध्याकाळी चार वाजल्यापासून बावधनकरांनी depute केलेले इन्स्पेक्टर अन्सारी आणि त्यांच्या बरोबर २० पोलीस साध्या वेषात CST च्या प्लॅटफॉर्म

क्रमांक अठरावर विखरून उभे होते. गाडी लागायला वेळ असूनही प्लॅटफॉर्मवरची गर्दी क्षणाक्षणाने वाढत होती. पाच वाजता दोन तीन गणवेषातले TC येऊन रिझर्वेशन्सच्या print-outs चे कागद काचेच्या बोर्डामध्ये लावून गेल्याबरोबर प्रवाशांची त्या बोर्डाभोवती गर्दी झाली. ज्यांना आयत्या वेळचं रिझर्वेशन हवं होतं असे प्रवासी TCs च्या मागे मागे फिरू लागले, तेंव्हा TC नी त्यांना पिटाळून प्लॅटफॉर्मच्या सुरूवातीच्या बूथ वर जायला सांगितलं. ते प्रवासी तिथे रांग लावायला धावेपर्यंत गाडी प्लॅटफॉर्मवर लागली.

इन्स्पेक्टर अन्सारी स्वतः मध्यावर असलेल्या मोठ्या कचरापेटीपाशी उभे होते. त्यांना आणि त्यांच्या सहकाऱ्यांना नेमकं काय करायचं याच्या स्पष्ट सूचना बावधनकरांनी दिलेल्या होत्या. अन्सारी सकाळीच साध्या वेषात दाबक्यांना भेटून आले होते आणि येतांना त्यांचा फोटो घेऊन आले होते. त्या फोटोच्या प्रती सर्व पोलिसांना वाटलेल्या होत्या. बरोबर ६.५० ला दाबके हातात एक चामडी पिशवी घेऊन प्लॅटफॉर्म १८ वर आले. त्यांनी सांगितल्याप्रमाणे सर्व प्लॅटफॉर्म टोकापर्यंत चालत पालथा घातला. ६.५५ ला प्लॅटफॉर्मच्या सुरूवातीकडून दोन TC हातात रेल्वेने दिलेल्या ॲल्युमिनियमच्या बॅगा आणि पॅडवर लावलेले रिझर्वेशन चार्ट्स हातात घेऊन चालत आले. एका TC च्या खांद्यावर आणखी एक रेक्झिनची बॅगही होती. मध्यावर असलेल्या S4 डब्यापाशी थांबून दोघांनी मिनिटभर गप्पा मारल्या, आणि दोघांपैकी एक जण घाईने सर्वात पुढच्या S10 कंपार्टमेंटकडे चालत गेला. रेक्झिनची बॅगवाल्या S4 जवळच्या TC ने हातातला चार्ट दरवाजावर चिकटवला आणि तो डब्यात गेला. एव्हाना दाबके, परत येतांना वाटेत दिसलेल्या अन्सारींना ओळख न दाखवता, त्यांच्या थोडंच पुढे असलेल्या कचरापेटीशी जाऊन थांबले. त्यांनी चामडी पिशवी उघडून आतलं ब्राऊन पेपरचं बंद एन्व्हलप पेटीत टाकलं आणि मागे-पुढे न बघता ते प्लॅटफॉर्मच्या सुरूवातीकडे चालत गेले.

गाडीची शिट्टी झाली. प्रवाशांची डब्यांत शिरण्यासाठी आणि सोडायला आलेल्या लोकांची डब्यांबाहेर पडण्यासाठी धावपळ सुरू झाली. अन्सारींचं कचरापेटीवर बारकाईने लक्ष होतं. गाडी हलायला लागण्याची मिनिटभर आधी S4 मधला TC त्याची ॲल्युमिनियमची बॅग घेऊन बाहेर पडला. त्याने हातातली बॅग उघडली आणि आतलं एक ब्राऊन पेपरचं एन्व्हलप जाऊन कचरापेटीत टाकलं. अन्सारी पुढे सरकले. पुढच्याच क्षणाला चालू झालेल्या गाडीकडे पहात घाईत मन बदलल्यासारखं दाखवत त्या TC ने कचरापेटीतलंच पण दुसरं एन्व्हलप उचललं आणि बॅगेत टाकून बॅग बंद केली. अन्सारी जागचे हलेपर्यंत तो चपळाईने डब्यात शिरला. गाडीने वेग पकडला. अन्सारी धावतच S4 मध्ये चढले. त्यांच्या पाठोपाठ आणखी एक साध्या वेषातला हवालदारही डब्यात शिरला. दोघांनी TC ला डब्यात पुढे जातांना पाहिलं. अन्सारी घाईघाईने हवालदाराच्या कानात बोलले, "मी गाडीबरोबर जातोय, साहेबांना कळवतो. त्या दाबक्यांना घरी नेऊन सोडा आणि तुम्ही सर्व जण परत जा...." हवालदार मानेने हो म्हणून चालत्या गाडीतून उतरला. अन्सारींनी त्याला वेगाचा तोल सांभाळत गाडीबरोबर काही क्षण पळतांना पाहिलं, मग तो हळूहळू मागे पडला आणि गाडी CST च्या बाहेर पडली.

डब्यातले प्रवासी हळूहळू सामान लावता लावता आपापल्या जागांवर स्थानापन्न होत होते. अन्सारी चालत चालत पुढे गेले. मधल्या एका खिडकीजवळच्या सीटवर TC बसलेला होता. त्याने त्याची ॲल्युमिनियमची बॅग कुलूप लावून पायापाशी ठेवली होती तर रेक्झिनची बॅग काढून त्यातला चार्ट बाहेर काढला होता. त्याच्या थोडं पुढे जातांना खाली पहात अन्सारींनी त्याच्या नेमटॅगवरचं नाव वाचून घेतलं आणि पुढे गेले. दारापाशी जाऊन त्यांनी मोबाईल बाहेर काढला आणि नंबर पंच केला. पलिकडून बावधनकरांनी उचलताच हळू आवाजात म्हंटलं, "सर, अन्सारी बोलतोय. पिक अप झाला, पार्टी S4 चा TC निघाली. नाव एस. पी.

तिवारी आहे. मी त्याच डब्यात आहे. काय करू?"

बावधनकर म्हणाले, "Stay with him, तिकिट काढलेलंय?"

"हो सर, S10 मध्ये रिझर्वेशन आहे, मनमाड पर्यंतचं."

"OK, good, मी पंधरा मिनिटांत फोन करतो."

ट्रेनशी असलेला केसचा संबंध लक्षात घेऊन बावधनकरांनी मुंबईतून निघतांनाच ACP RAILWAY (CRIME) शिंदे यांना contact केलं होतं. त्यांनी डायरी काढून त्यांचा नंबर डायल केला: 022-23759182. शिंद्यांनी फोन उचलल्यावर बावधनकर म्हणाले, "शिंदे साहेब, बावधनकर. पार्सल निघालंय. माणूस रेल्वेचा निघाला. S4 चा TC, एस. पी. तिवारी. What's the deal?"

"पंधरा मिनिटं द्या, फोन करतो."

इकडे अन्सारी वाकून बंद दाराच्या पण उघड्या काचेच्या खिडकीच्या बार्स मधून उलटी पळणारी मुंबई बघत होते, पण एक डोळा तिवारीवर होता. त्यांच्या खांद्यावर हाताने टॅप करून TC ने विचारलं, "रिझर्वेशन आहे?" पाठीमागे वळतांना अन्सारींनी पाहिलं, ॲल्युमिनियमची बॅग हातात होती तिवारीच्या, म्हणजे डब्यात कुणाला ट्रान्स्फर होणार आहे की काय?....

"हो," खिश्यात हात घालून तिकिट बाहेर काढत अन्सारी म्हणाले, "S10 चं आहे, गाडी निघाली म्हणून धावत इथे शिरलो."

तिवारीने तिकिट पाहिलं, "OK, कल्याण पर्यंत थांबावं लागणार तुम्हाला, मध्ये S7च्या पुढे कनेक्टेड नाहीये."

"No problem. थांबतो मी. Thanks."

तिवारी परत फिरला. बाकीचे पॅसेंजर्स चेक करत करत आपल्या जागी पोहोचला. दहा मिनिटांनी त्याने मोबाईल काढला आणि मिनिटभर कोणाशी बोलला. मग फोन पॅंटच्या खिशात ठेवून त्याने कोट काढला, वरच्या बर्थवर चादर पसरली, कोटाची घडी करून तो उशाशी ठेवला. आधी त्याने ॲल्युमिनियमची बॅग वर टाकली आणि नंतर रेक्झिनच्या बॅगेतून inflatable उशी काढून ती फुगवली. बॅग आणि उशी वर ठेवून बाजूच्या सीटच्या कडेने तो वरती चढला आणि आडवा झाला.

वीस-पंचवीस मिनिटे अन्सारी कुणाच्या डोळ्यात येणार नाही अशा सहजपणे तिवारीवर नजर ठेवून होते. त्यांचा मोबाईल वाजला आणि त्यांनी तो पहिल्याच रिंगमध्ये उचलला.

"सर."

बावधनकर पुढचे दहा-एक मिनिटं त्यांना शिंयांकदून मिळालेली माहिती अन्सारींना देत होते. तिवारी ट्रेन सोडून कुठे जाण्याची शक्यता नव्हती, त्याने extra-long over-time मागून नागपूरपर्यंतची ड्यूटी मागून घेतली होती. माणूस नागपूरचाच राहणारा होता. "कल्याणपर्यंत तुम्ही त्या डब्यात लक्ष ठेवा, कुणाला ट्रान्सफर करत नाही ना पहा. मी कल्याणपासून बनकरला पाठवतो आहे, त्याला S4 चं रिझर्वेशन मिळवून दिलंय शिंयांनी. नाशिकरोडपर्यंत तो येईल. पुढे मी आणि माने सर जाऊ."
*************

८ डिसेंबर रविवारची रात्र, नऊ वाजल्यापासून डॉक्टर, जयेश, नाना आणि बावधनकर नाशिकरोड स्टेशनपासून ५०० मीटर्स वर गाडी पार्क करून गाडीतच थांबले होते. नाना आणि बावधनकर त्यांच्या overnight प्रवासी बॅगा घेऊन आले होते. डॉक्टरांनी हातातलं एन्व्हलप घट्ट धरून ठेवलं होतं. बावधनकरांनी अखेरच्या क्षणाला त्यांचे contacts वापरून नाशिकरोडचे तीन साध्या वेषातले पोल ीस मिळवले होते, ते तिघे जण त्यांच्या विशिष्ट सूचनांसह स्टेशनच्या दोन कोपऱ्यांत एक-एक आणि मध्यभागी एक असे उभे होते. त्यांना रेळेचे फोटो आणि वर्णन मिळालेल ं होत ं. नाना आणि बावधनकर आपापले रेल्वे रिझर्वेशन खिशात ठेऊन तयार होते.

पावणेदहा वाजता डॉक्टर गाडीतून उतरले. स्टेशनच्या उलट्या दिशेने चालत गेले आणि नाशिकरोड एस. टी. स्टँडला वळसा घालून रेल्वे स्टेशनकडे चालत आले.



मधल्या वेळात नाना आणि बावधनकर गाडीतून उतरून सरळ रेल्वे स्टेशनच्या दिशेने चालत आले आणि कुठेही न थांबता, एकमेकांशी casually बोलत प्लॅटफॉर्मवर गेले. आत पन्नास-एक पावलं जाऊन ते दोघे थबकले. बावधनकरांनी मोबाईल बाहेर काढला आणि बोलायला सुरूवात केली. नाना वळले आणि त्यांनी स्टेशनच्या बाहेर दृष्टी वळवली.

"काय दिसतंय?" बावधनकरांनी फोनवर विचारलं.

नाना ओठ कमीत कमी हालवत म्हणाले, "डॉक्टर येताहेत,..I see him...रेळेच आहे...लाल टी शर्ट मध्ये. त्याने डॉक्टरांकडून पाकीट घेतलंय, आत येतोय..looks like he has no back up.....डॉक्टर परतलेत.."

"Our tails?"

"They are walking in behind Rele, let's go!"

बावधनकरांनी फोन बंद करून पँटच्या खिशात टाकला. दोघे प्लॅटफॉर्म नंबर दोनच्या दिशेने जिन्याकडे चालू लागले. विदर्भ एक्सप्रेस नुकतीच लागलेली होती. जिन्यावरून पलिकडे उतरून दोघेजण S4 च्या दिशेने चालत गेले. डब्यापाशी पोहोचल्यावर बावधनकरांना साध्या वेषातले इन्स्पेक्टर बनकर उतरतांना दिसले. त्यांच्या पुढ्यातच ॲल्युमिनियमची बॅग घेऊन TC तिवारीही उतरला. बावधनकरांना ओलांडून थोडं पुढे गेला. तोपर्यंत तिथे आलेल्या रेळेला पाहून त्याने हात पुढे केला. रेळेने हातातलं पाकीट तिवारीला दिलं. तिवारीने बॅग उघडून पाकीट आत टाकलं आणि परत फिरला. रेळेही पाठ फिरवून जिन्याकडे गेला. तिवारी डब्यात शिरल्या-शिरल्या नाना आणि बावधनकरही आत गेले. क्रॉस करतांना दाराबाहेरच्या बनकरांनी हळूच सांगितलं, "No transfer, good luck!" बावधनकरांनी किंचित मान हलवली आणि ते आत चालत राहिले.

प्लॅटफॉर्मवरच्या कोपऱ्यापाशी रेळेने मोबाईल काढला आणि नंबर लावला. आसपासच्या गर्दीच्या आड त्याने कोणाला तरी फोनवर काही निरोप दिला, फोन बंद केला आणि तो जिना चढू लागला. गाडी हलायला लागली. दारात उभं राहून बावधनकरांनी रेळेच्या आसपास पांगलेल्या तिघा पोलिसांना thumbs-up ची खूण केली, तिघांनी झपाट्याने रेळेला वेढून त्याचे हात धरले आणि गर्दीतून बाजूला घेतले. गाडीने वेग घेण्याआधी बावधनकरांना दिसलं की रेळेचे खिसे तपासून त्याचा मोबाईल फोन ताब्यात घेतला गेला होता. 'Phase One complete', ते वळून नानांना म्हणाले. "Let's go find our berths."

***********
***********
पहिल्या पंधरा मिनिटांतच तिवारी सर्व प्रवाश्यांचे रिझर्वेशन्स चेक करून गेला. नाना आणि बावधनकर समोरासमोरच्या बर्थवर होते. त्यांनी मोबाईल्स वरती अलार्म्स लावून पुढच्या पाच स्टेशन्सच्या वेळा सेट केल्या, बावधनकर 'मी पूर्ण रात्रभर जागा राहतो, तुम्ही झोपा' असं म्हणाल्यावर नाना म्हणाले, "Why should you have all the fun alone?" अखेर त्यांनी आळीपाळीने दीड-दीड तास झोपायचं ठरवलं. झोपण्याआधी नानांनी राजूला फोन करून थोडक्यात ते कुठे आहेत आणि कुठे निघाले आहेत ते सांगितलं.

"हो, बावधनकर आहेतच बरोबर...घेतो, घेतो, सर्व गोळ्या घेतो....हो, करेन, पण दहाच्या पुढे करेन फोन, OK? Good Night!"

"बावधनकर, नागपूरची फील्डिंग लागलीय?"

"हो सर."

"गूड नाईट!"

रात्रीतून ठरल्या वेळी स्टेशनं येत गेली, चाळीसगाव, जळगाव, भुसावळ, शेगाव आणि अकोला. प्रत्येक स्टेशनवर चित्रपटातल्यासारखे निरनिराळे लाल टी शर्ट घातलेले तरूण ब्राऊन पेपरची पाकीटं घेऊन येत गेले, तिवारी सगळी पाकिटं जमा करत गेला आणि बॅगेला कुलूप लावत गेला. तिवारीच्या अपरोक्ष, प्रत्येक स्टेशनवरून गाडी निघाल्यानंतर टी शर्टवाल्या तरूणांनी फोन केले आणि मग त्यांना साध्या वेषातल्या पोलीसांनी ताब्यात घेतलं.

साडेचार वाजता बावधनकरांना इन्स्पेक्टर बनकरांचा फोन आला. ते बराच वेळ त्यांच्याशी हळू आवाजात बोलले.

फोन झाल्यावर त्यांनी नानांना सांगितलं, "सर, तुमचा अंदाज बरोबर आहे, सगळे फोन एकाच नंबरला जातायत, सेल टॉवर triangulate करून सायबर सेलच्या लोकांनी location दिलंय, बालाघाट फॉरेस्ट रेंजमध्ये कुठेतरी महाराष्ट्र-छत्तीसगढ बॉर्डर वर आहे. Right where you placed Avinash on the map."

सकाळी ८ वाजता नाना आणि बावधनकरांनी आळीपाळीने उठून आन्हिकं आवरून घेतली. तिवारी अकोल्यानंतर त्याच्या बर्थवर बॅग साखळीने हाताला बांधून गाढ झोपी गेलेला होता. साडेआठ वाजता तो मोबाईलच्या अलार्मच्या आवाजाने उठला. पाच मिनिटांनी त्याने एक फोन केला आणि मग पुन्हा एकदा डब्यात चक्कर मारून नागपूर स्टेशन येण्याच्या तयारीत आवरून बसला.

नानांनी बावधनकरांना विचारलं, "माझं काम झालं?" बावधनकरांनी एक फोन केला आणि सांगितलं, "हो, रस्त्यात आहे, दहा वाजता पोहोचेल."

"Great!" नानांनी डायरी काढून एक नंबर शोधला आणि फोन कडे पाहिलं. "अरेच्चा, या स्मार्ट फोनचं असंच आहे, चार्ज करायला विसरलो, तुमचा फोन द्या पाहू."

बावधनकरांनी आपला फोन दिल्यावर नानांनी हवा तो नंबर डायल केला, "Good Morning, Dr. Pareira! Mane Here. Ready to make good on your promise?" पुढची पाच मिनिटं ते हळू आवाजात काही बोलले आणि फोन बंद करण्याआधी म्हणाले, Many thanks, much appreciated." ते बावधनकरांकडे वळले आणि म्हणाले, "Good luck to us! Let the fun roll." दोघे बर्थवरचं सामान आवरून खाली उतरले आणि बॅगा घेऊन इतर प्रवाश्यांच्या बरोबरीने दाराकडे निघाले.

तासभर लेट झालेली गाडी बरोबर दहा वाजता नागपूर स्टेशनात शिरली आणि प्लॅटफॉर्म नंबर दोनवर लागली. तिवारी शांतपणे गर्दीच्या मागे राहतो आहे हे लक्षात आल्यावर बावधनकर नानांना खूण करून मागे थांबले. नाना पुढे दारापाशी जाऊन खाली उतरले. ते उतरल्याबरोबर क्षणभर बॅग घेऊन गर्दीच्या कडेला थांबले. गर्दी आजूबाजूने सरकत असतांना कुणीतरी त्यांच्या खांद्यावर हात ठेवला. नाना वळल्यावर पांढरा फुलशर्ट आणि निळ्या पँटमधल्या एका पन्नाशीच्या गृहस्थाने त्यांना हळू आवाजात म्हंटलं, "माने सर, मी PI गोसावी, नागपूर SID." नानांनी त्याच्याकडे पाहिलं, जुनी ओळख पटली, चंद्रपूरला असतानाची. "अरे वा, कसे आहात, गोसावी?" "छान सर, नंतर बोलू. बाहेर ग्रे कलरची इंडिका उभी आहे, ड्रायव्हर आत आहे. बावधनकर सर आले की जाऊन बसा, तो टारगेट follow करेल." इतकं बोलून गोसावी निघून गेले.

दहा एक मिनिटांनी एका दाराने तिवारी आणि दुसऱ्या दाराने बावधनकर उतरले. तिवारीने इकडे तिकडे पहात आळोखे-पिळोखे दिले. एका खांद्यावर रेक्झिनची बॅग आणि दुसऱ्या हातात अॅल्युमिनियमची बॅग घेऊन तो प्लॅट्फॉर्म नं. १ च्या स्टेशनमास्टरच्या ऑफिसकडे चालू लागला. ड्यूटी संपल्यामुळे त्याला चार्ज हँड-ओव्हर करायचा असणार हे बावधनकर आणि नानांना अपेक्षितच होतं. पुढचा तासाहून आधिक वेळ त्याने स्टेशनमास्टरच्या ऑफिसात कागदपत्र पूर्ण करण्यात आणि इतर टीसींशी गप्पा मारण्यात घालवला. नानांनी बावधनकरांना गोसावींचा निरोप सांगितला. नाना आणि बावधनकर आळीपाळीने पण अंतर ठेवून लक्ष ठेवून होते. मध्ये बावधनकरांनी काही फोन रिसीव्ह केले तर काही कॉल्स केले. साडेदहा वाजता बावधनकर प्लॅटफॉर्म नं. दोन वर गेले. त्यांना फोनवरच्या माहितीनुसार ठराविक कपड्यांत आलेले पाध्ये आणि खुणेच्या साध्या वेषातले दोन लोकल हवालदार दिसले. सव्वाअकरा वाजता तिवारी स्टेशनमास्टरच्या ऑफिसातून बाहेर पडला. त्याने कोट काढून सिव्हिलियन कपडे चढवले होते. फिकट निळी जीन्स आणि लाल Nike चा टी शर्ट. दोन्ही बॅगा हातात होत्याच. सावकाश जिन्याकडे चालत चढून तो प्लॅटफॉर्म नं. १ वरून नं. २ वर उतरला. बरोबर साडेअकरा वाजता पाध्ये पुढे झाले, तिवारीच्या शेजारी उभे राहून त्यांनी काखेतल्या शबनम मधून ब्राऊन पेपरचं पाकिट त्याच्या हातात दिलं आणि न बोलता ते प्लॅटफॉर्म नं. ३ च्या दिशेने चालत गेले. आजुबाजूला सफाईने नजर टाकून तिवारीने ते पाकीट अॅल्युमिनियमच्या बॅगेत टाकलं आणि तो पुन्हा प्लॅटफॉर्म नं. १ च्या दिशेने चालू लागला. जिन्यावरून उतरून तो बाहेरच्या दाराकडे चालू लागला तसे नाना आणि बावधनकर अंतर ठेवून त्याच्या मागे चालत गेले. स्टेशनबाहेर पडल्यावर बावधनकर तिवारीच्या जवळून पण मध्ये माणासांची गर्दी ठेवून चालत राहिले. नानांनी सावकाश चालत ग्रे इंडिकाचा नजरेने वेध घेतला आणि गाडी दिसल्यावर त्या दिशेने गेले. तिवारीने टॅक्सी स्टँडपाशी जाऊन मोकळी दिसली त्या टॅक्सीचं मागचं दार उघडलं आणि ड्रायव्हरला सांगितलं, "एअरपोर्ट चलो".
बावधनकरांनी ते ऐकलं आणि ते रस्त्यावर आले. टॅक्सी निघेपर्यंत मागून इंडिका घेऊन नाना आलेले होते. बावधनकरांनी टॅक्सीला पुढे निघू दिलं आणि मग ते इंडिकाचं दार उघडून आत बसले आणि ड्रायव्हरला म्हणाले, "एअरपोर्टला चाललाय तो, चला."

दर दोन चौकांमागे जाणवेल इतका पोलिस बंदोबस्त पाहून नानांनी विचारले, "बावधनकर, ही सगळी तुमची फिल्डींग?"

"नाही हो, मी फक्त..." बावधनकर म्हणेपर्यंत त्यांचा फोन वाजला. त्यांनी स्क्रीनकडे पहात नानांना म्हंटलं, "बारिया सर..." आणि कॉल रिसीव्ह केला. ते चांगले दहा मिनिटे ऐकत होते. फोनवर त्यांनी बारियांना थोडक्यात तिवारीविषयी, आणि ते एअरपोर्ट्च्या दिशेने तिवारीला फॉलो करीत असल्याचं सांगितलं. फोन झाल्यावर म्हणाले, "सर, मी तुम्हाला म्हणत होतो की मी फक्त गोसावींना कॉन्टॅक्ट केलं होतं तुम्हाला

व्यक्तिशः ओळखणारा जुना माणूस म्हणून. पण बाकी हे सारं बारिया सरांचं काम आहे, आणि एस आय डी च्या शिंद्यांचं. दोघांनाही मी आपण नागपूरला निघालो आहोत हे कळवलं होतंच. बारिया सरांनी आत्ता सांगितलं की त्यांना छत्तिसगढमध्ये ट्रकच्या मूव्हमेंटचा चॅटर मिळाला, त्यामुळे त्यांची टीम तिकडे आणि इथे दोन्हीकडे वावर वाढवतेय. बारिया सर स्वतः सकाळच्या फ्लाईटने नागपुरात आले आहेत. एअरपोर्ट पासून अर्ध्या किलोमीटरवर हॉटेल प्राईड म्हणून आहे, तिथे उतरले आहेत, आणि शिंद्यांनी म्हणे दोन कंपनीज आणून ठेवल्या आहेत गोंदियाच्या भागात."

"दॅट्स इंप्रेसिव्ह! म्हणजे आपण योग्य मार्गावर आहोत. पण हा एअरपोर्टला का चाललाय? इथून सगळ्या डोमेस्टिक फ्लाईट्सच आहेत ना?" नानांनी ड्रायव्हरकडे पहात विचारलं, "इंटरनॅशनल फ्लाईट्स आहेत का हो इथून?"

"एक रविवारची एअर अरेबियाची शारजाह्ची आहे सर, पण तेवढीच. आणि आजची फ्लाईट गेली दहा वाजता," ड्रायव्हर उत्तरला. इतक्यात त्याचा मोबाईल फोन वाजला. रस्त्यावरून नजर न हटू देता त्याने कॉल रिसीव्ह केला, "हो सर, देतो.." नानांकडे पहात त्याने फोन पुढे केला, "गोसावी साहेब, तुमच्याशी बोलताहेत."

नानांनी फोन घेतला. गोसावी म्हणाले, "माने सर, आमची डिपार्टमेंटची जीप तुमच्या मागे आहे ५ गाड्या सोडून. मी आणि बरोबरचे दोघे जण सिव्हिलियन ड्रेस मध्ये आहोत. बट ऑल ऑफ अस आर कॅरींग, लागलंच तर. सांगून ठेवतो. बाकी काही करायचंय?"

नाना म्हणाले, "गुड थिंकिंग, गोसावी! गाडीत वायरलेस असेल ना?..छान. मला वाटतंय एकतर एअरपोर्टच्या बाहेर, किंवा आतमध्ये लगेचच, बॅग ट्रान्सफर होईल. बाहेर झाली तर तुम्ही बॅग घेणाऱ्या माणसाला होल्ड करा, आणि आम्ही तिवारीला होल्ड करू. पण तो आत जातो आहे असं दिसलं तर आम्हाला आत यावं लागेल. पण माझ्याकडे काही आयडी नाही. तेंव्हा तुम्ही असं करा, पुढे एअरपोर्ट सिक्युरिटीला वायरलेसनं कळवता आलं तर पहा. मी आणि बावधनकरांना तिवारीच्या पाठोपाठ शक्य तितक्या गुपचुप दाराच्या आत जाता आलं पाहिजे. कुठलंही कमोशन नको. जमेल?"

"जमेल सर, आम्ही ओव्हरटेक करून पुढे जातो मग, निघू?"

"निघा, भेटूच पुढे, आणि हे पहा, शक्यतो आर्म्ड एन्काऊंटर नको, पॅसेंजर्स असणार आजूबाजूला. ओके? टेक केअर!" नानांनी ड्रायव्हरला त्याचा फोन परत केला, थोड्याच सेकंदात मागून एक पोलिस जीप आधी इंडिकाला आणि मग पुढच्या टॅक्सीला मागे टाकून पुढे गेली.

"अहो, बावधनकर, माझा फोन करायचा राहिला राजूला, तुमच्या फोन वरून करू का? माझा चार्ज अगदीच संपत आलाय.."

"ऑफ कोर्स, सर, लावून देऊ?" नानांनी सांगितलेला नंबर कनेक्ट करून त्यांनी फोन नानांच्या हातात दिला. नाना पाच-एक मिनिटं बोलले मुलाशी, आपली खुशाली सांगितली, घरी सगळं व्यवस्थित आहे ना विचारलं.

त्याने केस विषयी विचारलं असणार कारण त्याला म्हणे निलेशचा फोन आला होता. "सांग निलेशला की वी आर क्लोज, दुपारपर्यंत अपडेट देईन मी तुला. बाय."

नागपूर शहराच्या नैऋत्येला ६-७ किलोमीटर गेल्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर विमानतळाच्या पाट्या दिसायला लागल्या. आणखी मैलभरात एअरपोर्टच्या रस्त्याला पुढची टॅक्सी वळली. त्यामागे इंडिकाही वळली.

"ड्रायव्हर, गाडीत बीकन आहे?"

ड्रायव्हरने सांगितले की आहे.

"आणि तुम्ही आर्म्ड आहात?," नानांनी ड्रायव्हरला विचारलं.

"नाही सर, पण आय डी आहे माझ्याकडे. आणि गाडीत वायरलेसही आहे..."

"गुड. आम्ही आमच्या बॅगा गाडीतच ठेवू, आम्ही उतरलो की लगेचच गाडी पार्क करून बीकन गाडीवर ठेवा आणि चालू करा, आणि लॉक करून किल्ल्या घेऊन आमच्यामागे या. एकदा आम्ही काही ॲक्शन घेतो आहे असं दिसलं की पुढे व्हा आणि बावधनकर सर सांगतील त्याला ताब्यात घ्या. आत जातो आहोत असं दिसलं तर बाहेरच थांबा, ओके?" ड्रायव्हरने 'ठीक आहे' म्हंटलं.

टर्मिनलच्या मेन गेटपाशी टॅक्सी थांबल्यावर तिच्या मागे ४ गाड्या सोडून इंडिका थांबली. तिवारीने उतरून भाड्याचे पैसे दिले आणि बॅगा घेऊन प्रवेशद्वाराकडे निघाला, त्याच्या हातात बहुधा पासपोर्ट आणि तिकिटाचे प्रिंट आऊट असावेत. लगेचच नाना आणि बावधनकरही उतरले आणि फूटपाथवरून त्याच्या मागे गेले. प्रवेशद्वारापाशी पोहोचून त्याने दरवाजापासच्या सिक्युरिटी हवालदाराला पासपोर्ट आणि तिकिटाचे प्रिंट आऊट दाखवून आत प्रवेश केला. तिवारी आपल्याला ओळखू शकेल हे लक्षात घेऊन नाना आणि बावधनकर मागे घुटमळले आणि मधल्या काही प्रवाश्यांनंतर बावधनकर पुढे झाले, त्यांनी आय डी काढून हवालदाराला दाखवला. समोरच गोसावी दिसले, त्यांनी काम केलेलं होतं, एअरपोर्ट सिक्युरिटीच्या दुसऱ्या जवानाने हाताने 'जा' म्हंटल्यावर ते दोघे आत गेले. पाठोपाठ गोसावीही आत आले.

पुढे गेलेला तिवारी उजवीकडे वळला. चेक इन काऊंटरकडे न जाता त्याने मोहोरा वळवला तो आतल्या एका दुकानाकडे. 'राज इंटरनॅशनल' नावाच्या टर्मिनलवरच्या झगझगीत दुकानावरच्या निऑन बोर्डवर तिथे मिळणाऱ्या बऱ्याच वस्तूंची यादी सरकत होती.'बुक्स, टॉईज, सन ग्लासेस, चॉकोलेट्स,' वगैरे. तिवारी सरळ आत गेला. पुस्तकं आणि मॅगेझिन्स ठेवलेल्या भागापाशी त्याने बॅगा खाली ठेवल्या आणि एका मासिकाला हात घातला. त्याच्या पाठीमागेच दुकानात शिरलेल्या नाना आणि बावधनकरांना थोड्याच अंतरावर असलेला एक तरूण हातात तिवारीच्याच रेक्झिन बॅगसारखी बॅग हातात घेऊन पुढे सरकतांना दिसला. नानांनी बावधनकरांना आणी गोसावींना नेत्रपल्लवी केली.

दारातच उंच टाचांचे बूट घालून कॅरी-ऑन बॅगला टेकून उभे राहिलेल्या एका तरुणीला आणि विमानतळावर दुकानांचे आणि इतर चकचकीत अंतर्भागाचे फोटो काढणाऱ्या एका दाढीधारी हौशी तरूणाला वळसा घालून नाना आणि बावधनकर दुकानात शिरले. बहुतेक सर्व डोमेस्टिक उड्डाणं दिवसाच असल्याने प्रवाश्यांची गर्दी दुकानातही बऱ्यापैकी होती. त्या गर्दीत आपण आणि तिवारी यात अंतर ठेवून दोघे मधोमध असलेल्या काऊंटरच्या दोन विरुद्ध दिशांना वळले. गोसावी दुकानाबाहेरच थांबले.

दुसऱ्या तरुणाने हातातली रेक्झिनची बॅग तिवारीच्या तशाच बॅगशेजारी ठेवली, आणि वरच्या एका फिक्शनच्या पुस्तकाला हात घातला. तिवारीने त्याच्या हातातलं मॅगेझिन परत जागेवर ठेवलं, शेजारचं एक वर्तमानपत्र उचललं आणि सहजपणे खाली वाकत डावीकडची ॲल्युमिनियमची पेटी आणि उजवीकडची, पण त्या तरुणाने ठेवलेली रेक्झिनची बॅग उचलली आणि मॅगेझिनचे पैसे द्यायला काऊंटरकडे वळला. पुढच्याच क्षणाला त्या तरुणानेही खाली वाकून उरलेली बॅग उचलली आणि हातातल्या पुस्तकाचे पैसे देण्यासाठी वळला. नानांनी खुणेने बावधनकरांना आणि गोसावींना सबूरीची खूण केली. दोघांचे पैसे देऊन झाले तसे दोघेही दुकानाच्या बाहेर पडू लागले. गोसावी दोघांपैकी पुढे असलेल्या तरुणाच्या वाटेत सरकले, आणि त्यांनी हातात धरलेलं पोलिस आय डी त्याच्या चेहेऱ्यासमोर धरलं, आणि शांत पण कठोर आवाजात त्याला सांगितलं, "दुकानाच्या भिंतीजवळ उभे रहा, हातातली बॅग खाली ठेवा. यू आर अंडर ॲरेस्ट." त्याने तोंड उघडून काही हालचाल करण्याच्या आत आतापर्यंत दृष्टीआड उभे असणारे दोन साध्या वेषातले पोलिस पुढे आले. त्यांनी तिवारी आणि तो तरूण या दोघांचाही मार्ग रोखला. तोवर मागून आलेल्या बावधनकरांनी आपलं आय डी दाखवत तिवारीला सांगितलं, "मिस्टर तिवारी, द गेम इज ओव्हर. यू आर अंडर ॲरेस्ट टू. स्टेप टू द साईड!" या वेळेपर्यंत दुकानातील काही लोकांना या दोघांना अटक केली जाते आहे हे लक्षात आलं, त्यासरशी लोक बाजूला सरकले. इतक्या वेळ फोटो काढणारा तरूणही कॅमेरा खाली घेऊन आ वासून वाटेतच थांबला. नानांनी त्याला बाजूला व्हायला सांगितलं, आणि बावधनकर, गोसावी आणि इतर दोघा पोलिसांना सांगितलं, "एअरपोर्ट सिक्युरिटी ऑफिसमध्ये घ्या दोघांना, इथे चर्चा नको." आतापर्यंत त्या तरुणाचा आणि तिवारीचा क्षीण विरोध झुगारून बावधनकर आणि गोसावींनी त्या दोघांच्या बॅगा ताब्यात घेतल्या होत्या. त्या दोघांना पुढ्यात घेऊन वरात एअरपोर्ट सिक्युरिटी ऑफिसकडे निघाली. एअरपोर्ट सिक्युरिटी ऑफिसमध्ये गेल्यावर आधी तिवारी आणि त्या बॅगवाल्या तरुणाला हातकड्या घालण्यात आल्या. त्या तरुणाने आपलं नाव शेख अब्बास म्हणून सांगितलं. त्याच्या हातातून घेतलेल्या बॅगमध्ये सर्व ब्राऊन पेपरची पाकिटं सापडली. पैसे जसेच्या तसे होते.

सगळेजण एका टेबलभोवती बसल्यावर नानांनी दोघांकडे पाहून म्हंटलं, "लेट मी गेस, तुम्ही दोघेही - निदान तिवारी तुम्ही- कुठेही फ्लाईटने जाणार नव्हता, राईट?" तिवारीने मान हलवली, क्षणभराने अब्बासनेही मान हलवली.

बावधनकरांनी नानांकडे पाहिल्यावर ते म्हणाले, "दिस हॅज बीन अ नोन व्हल्नरॅबिलिटी इन द एअरपोर्ट सिक्युरिटी नेशनवाईड; भारतात इ-टिकेट अस्तित्वात आल्यापासून मी आणि इतर अनेकांनी सूचना करुनही विमानतळावर आत येतांना बहुतेक ठिकाणी फक्त पासपोर्ट आणि इ-टिकेटचा प्रिंट आऊट पाहून प्रवाश्यांना आत सोडलं जातं. आय कॅन गॅरंटी यू, या दोघांनी काढलेली तिकिटं प्रिंट आऊट काढल्यानंतर कॅन्सल केलेली असणार. दॅट वे, यांच्यासारखे समाजकंटक विमानतळावर सहज प्रवेश करू शकतात. आणि आत येऊन भेट झाल्यावर राजरोसपणे, काही विसरलो आहे असं सांगून बाहेर जाऊ शकतात! आज आपल्या नशिबाने हे दोघे कॅश घेऊन आले आहेत, त्या जागी एक्स्प्लोझिव्ज असती तर?"

हे ऐकून क्षणभर सुन्न झालेल्या बावधनकरांनी लगेचच बाजूला उभं राहून बारियांना आणि शिंद्यांना फोन करून अपडेट दिले. बारियांनी 'त्या दोघांसह नाना आणि तुम्ही बंदोबस्तात प्राईड हॉटेलवर घेऊन या' असा निरोप दिला. पुढच्या पाचच मिनिटांत सर्व जण दोन गाड्यांतून प्राईड हॉटेलच्या रस्त्यावर निघाले होते.

****************

****************

प्राईड हॉटेल मध्ये पोहोचल्याबरोबर बारियांनी स्वतः बाहेर येऊन नानांचं आणि बावधनकरांचं हार्दिक अभिनंदन केलं. नानांनी बावधनकरांकडे पहात सांगितलं, "थँक्स, पण खरं तर मी यांचे आभार मानायला हवेत, इतक्या वर्षांनंतर असा अ‍ॅड्रिनालिन रश एन्जॉय करू दिला म्हणून. वेल, तुम्ही दोघं आता बाकीचे सोपस्कार पूर्ण करा, मी जरा घरी फोन करून घेतो."

बावधनकर आणि बारिया इतर अधिकाऱ्यांबरोबर दोघा गुन्हेगारांना घेऊन डाव्या बाजूच्या कॉन्फरन्स रूममध्ये गेल्यावर नानांनी हॉटेलच्या रिसेप्शन काऊंटर वरच्या तरुणीला त्यांचा स्मार्टफोन कुठे चार्ज करता येईल का ते विचारलं. तिने थोडं दूर उजव्या कोपऱ्यात असलेल्या बिझिनेस सेंटरमध्ये तशी सोय असल्याचं सांगितलं. नाना आत गेले तर आत असलेला एक हॉटेलचा पाहुणा त्याला आलेला फॅक्स घेऊन बाहेर येत होता. आत रिकाम्या असलेल्या बिझिनेस सेंटरमध्ये एका कोपऱ्यात नानांना फोन चार्जर्स सापडले. तिथे चालत जाऊन त्यांनी त्यांना हव्या त्या चार्जरची केबल निवडली आणि फोन जोडला. चार्जिंग सुरू झाल्याची खात्री करून एकीकडे राजूचा नंबर डायल केला. त्याला बातमी सांगतांना त्यांना मनापासून आनंद झाला होता. त्यांनी त्याला सांगितलं की ते बहुतेक गोसावींबरोबर थोड्या गप्पा मारून, जेवणही घेऊन इतक्या वर्षांनंतरचा कालावधी कॅच अप करतील, आणि जर आज बावधनकरांनी हॉटेलातच रहायचं ठरवलं तर पुढचा फोन आता दुपारची झोप काढून मगच करतील. राजूशी बोलणं संपल्यावर त्यांनी चार्जरला लावलेला फोन काढला आणि ते मागे वळले. त्यांची जवळजवळ टक्करच झाली बाजुलाच असलेल्या एका तरुणाशी. आवाज न करता आत आलेल्या त्या दाढीधारी तरुणाने नानांना बोलण्याची संधीच दिली नाही, त्याने नानांच्या डाव्या बरगडीत छोट्या रिव्हॉल्व्हरची थंड नळी खुपसली, आणि म्हणाला, "चुपचाप कसलाही आवाज न करता माझ्या बाजूने चालत रहा, सरळ हॉटेलबाहेर जायचं आहे, समोर मी बसेन त्या गाडीत बसायचं. थोडाही मूर्खपणा केलात तर मी गोळी झाडेन. नानांनी त्याच्या हाताकडे पाहिलं, 'नो नॉनसेन्स' स्मिथ अँड वेसन पीसमेकर दिसलं. विरोध न करण्यातच शहाणपणा आहे हे त्यांनी जाणलं, आणि त्याच्या बरोबर बिझिनेस सेंटरच्या आणि हॉटेलच्या बाहेर गेले. समोरच्या एंजिन चालू असलेल्या आणि ड्रायव्हर बसलेल्या क्झायलो गाडीत ते दोघे बसल्यावर दार बंद झालं आणि गाडी वेगाने बाहेर पडली. मागच्या काळ्या काचा वरती झाल्या, आणि नानांना कळायच्या आत त्या दाढीधारी तरुणाने त्यांच्या तोडावर क्लोरोफॉर्मचा बोळा दाबला.

नानांना शुद्ध आली तेंव्हा गाडी शहराबाहेर पडून कोणत्याश्या तुरळक रहदारीच्या रस्त्याने चालली होती, त्यांना भूक लागल्याची जाणीव झाली. नाना शुद्धीवर येऊन बाहेर बघताहेत हे लक्षात आल्याबरोबर शेजारच्या तरुणाने तयार ठेवलेली लांब काळी पट्टी करकचून त्यांच्या डोळ्यांवरून बांधली आणि त्यांच्या चेहेऱ्यावर पुन्हा एकदा क्लोरोफॉर्मचा बोळा दाबला.

****************

हॉटेलच्या कॉन्फरन्स रूम मधली बैठक संपवून आणि दोघा कैद्यांना एस आय डी पोलिसांच्या ताब्यात देऊन बारिया, बावधनकर आणि गोसावी बाहेर आले. नाना दिसत नाहीत हे पाहिल्यावर बावधनकरांनी नानांना फोन करून पाहिला, तो उचलला गेला नाही.

त्यांनी रिसेप्शन काऊंटरवरच्या तरुणीला विचारल्यावर तिने ते फोन चार्ज करून बाहेर आल्यानंतर एका क्झायलो मध्ये बसून बाहेर गेल्याचं सांगितलं. त्यांच्याबरोबरच्या व्यक्तिचं वर्णन विचारल्यावर तिने दाढीधारी तरुणाचं साधारण वर्णन सांगितलं. बावधनकर आणि गोसावी दोघांनाही तो तरुण विमानतळावर पाहिल्याचं आठवलं आणि नानांना दगाफटका झाल्याचं त्यांच्या लक्षात आलं.

गोसावींनी शहराची नाकेबंदी करायच्या सूचना दिल्या, आणि तातडीने बावधनकर आणि गोसावी यांनी तिवारी आणि अब्बास यांना फैलावर घेतलं, पण तासाभराच्या कसून उलटतपासणीनंतरही त्या दोघांपैकी कुणालाच ती व्यक्ति माहीत नव्हती असं लक्षात आलं. अब्बासच्या इनक्वायरीनंतर तो इंडियन मुजाहिदीनशी संबंधित असल्याचं, आणि मिळालेले पैसे छत्तिसगढ मध्ये एका सभासदाला देण्यासाठी जाणार असल्याचं त्याने कबुल केलं. तिवारीने त्याला फक्त पैसे गोळा करून देऊन अब्बासकडे देण्यासाठी प्रदीप रेळे या माणसाने सांगितल्याचं, आणि त्या बदल्यात पन्नास हजार रुपये मुंबईत मिळणार असल्याचं सांगितलं. अविनाश कोण आहे, याची माहिती अब्बास आणि तिवारी दोघांनाही नव्हती, असं कसून केलेल्या चौकशीत निष्पन्न झालं. रेळेची चौकशी करणं हा मार्ग होता, पण त्याची रवानगी नाशिकहून मुंबईला झाली होती. बारियांनी शिंदेंना फोन करून कल्पना दिली आणि अॅलर्ट रहायला सांगितलं.

*******************

नानांना शुद्ध आली तेंव्हा ते एका शांत बंगलीवजा घरातल्या बैठकीच्या खोलीत, खुर्चीवर हात मागे बांधलेल्या अवस्थेत बसलेले होते. त्यांनी दीर्घ श्वास घेतला. त्या आवाजाने बाजूला बसलेली व्यक्ति उठून समोर आली. त्यांनी डोळे फोकस केले, काही क्षणात त्यांना समोरचा रुपेरी केसांचा सहा फुटी माणूस दिसला. "ओळखलं का, प्रोफेसर साहेब?" त्याने विचारलं.

मध्ये दहा-एक वर्षं उलटून गेली असली तरी नानांनी त्याला लगेच ओळखलं. "अविनाश, फायनली, वी मीट! मला कल्पना होतीच तूच यामागे आहेस म्हणून."

"पण तुम्ही या केसमध्ये गुंतलेले असाल याची मला माहिती नव्हती. इट वॉज अ ह्यूज सरप्राईझ व्हेन आय फाऊंड दॅट. लेट मी इंट्रोड्यूस माय कलिग्ज हिअर." त्यांचं लक्ष खोलीतल्या इतर दोघांकडे वेधत अविनाश म्हणाला, "हा कॉम्रेड प्रबीरकुमार, माझा बिनीचा शिलेदार." राकट पण पाणीदार डोळ्यांचा, बुद्धीमान वाटणारा बहुधा ओडिया असावा असा चाळिशीचा माणूस डावीकडे होता. "आणि या कॉम्रेड शिवकुमारला तुम्ही चेहेऱ्याने ओळखता, एअरपोर्ट वर बॅग एक्सचेंज झाल्याचा पुरावा हवा म्हणून आज मी त्याला फोटो काढायला पाठवलं होतं. यू शॉक मी द वे यू स्लिप्ड, खरेच म्हातारे झालात! तुम्ही बाकी सगळ्या शक्यता कव्हर केल्या, पण इतकं मोठं ऑपरेशन मी बॅक-अप शिवाय करेन असं कसं वाटलं तुम्हाला? शिवकुमारने मला ते फोटो इ-मेलने पाठवले आणि मी तुम्हाला लगेच ओळखलं. आणि हो, मलाही इथे इंटरनेट मिळतं!" नानांनी मनातल्या मनात स्वतःलाच गलथानपणाबद्दल दोष दिला.

"आता मलाच तुमची ओळख या दोघांना करून द्यायला हवी... " अविनाश म्हणाला, "हे रिटायर्ड एसीपी नानासाहेब माने. अत्यंत हुषार आणि कर्तबगार आधिकारी, पण सिस्टीमचाच हिस्सा. त्यांचं चंद्रपूरला पोस्टिंग असतांना मी त्यांच्या हाताखाली
पीएसआय म्हणून लागलो. अतिशय सुसंस्कृत पण करारी आधिकारी, पण चुकीच्या सिस्टीमच्या विरुद्ध उभं रहायची तयारी नव्हती."

"अलावू मी टू कंटिन्यू, मे आय?" इतर दोघांकडे पहात नाना म्हणाले. "हा तुमचा कॉम्रेड अविनाश आहे ना, ही वॉज अॅन इंटेलिजेन्ट ऑफिसर हिमसेल्फ, पण तो एक 'रोग ऑफिसर' होता, वन हू वॉन्टेड तू बी अ सिस्टीम अन्टू हिमसेल्फ, त्याला सत्तेची हाव होती आणि अंगात मस्ती." अविनाश कडे वळून पहात नाना म्हणाले, "ती मस्ती जिरवण्यासाठी आणि सत्ता मिळवण्यासाठी तू पोलिस खातं सोडून नक्षलवादी लीडर झालास."

"च् च् च्! आजही लेक्चर्सच देताय, प्रोफेसर! आता जीवाला धोका आहे तेंव्हा तरी शहाणे व्हा!" आपल्या सहकाऱ्यांकडे पाहत अविनाश म्हणाला, "पोलिसात असतंनाही यांनी माझं बौद्धिक घ्यायची संधी कधी सोडली नाही. सिस्टीमच्या विरूद्ध मी तक्रार केली, हे हरामखोर राजकारणी कधी बदलणार नाहीत आणि बिनडोक जनता कधी सुधारणार नाही असं एकदा म्हंटलं, तेंव्हा यांनी मला लेक्चर झोडलं होतं, एक एक करून समाज बदलता येतो म्हणून ऐकवलं होतं, आठवतंय नानासाहेब?"

"व्हेगली आठवतंय, पण तू ऐकल्याचं काही आठवत नाही." नाना म्हणाले.

"कसा ऐकणार, तुम्ही चक्क नीतिकथा सांगायचात, एकदा तर ती इंग्रजीतल्या समुद्रावर फिरायला जाणाऱ्या लेखकाची गोष्ट सांगितलीत, सेव्हिंग द ओशन वन फिश अॅट अ टाईम, अजून आठवतेय. लेखक नाही आठवत..."

"हं, लॉरेन आइस्ली ची गोष्ट आहे, तुला बरी आठवतेय.."

"मला आठवतेय कारण पटली नव्हती तेंव्हाही, आणि आजही त्यात फोलपणा ठासून भरला आहे असं वाटतं.."

"सांग तुझ्या या सहकाऱ्यांना, बघू आठवतेय का."

"ओके, लेट मी एन्टर्टेन यू. हिअर गोज. बरं का कॉम्रेड्स, तो लेखक एकदा पहाटे समुद्रावर जातो आणि त्याला असंख्य स्टारफिश मासे भरतीबरोबर वाहून आलेले, पण ओहोटीमुळे किनाऱ्यावर अडकून पडलेले दिसतात, कारण या माश्यांना पोहोता येत नाही. दूरवरून एक किरकोळ माणूस त्याच्या दिशेने चालत येतांना एक एक मासा समुद्रात फेकतांना दिसतो. त्याच्या जवळ जाऊन हा लेखक त्याला विचारतो, 'हा काय मूर्खपणा आहे, इथे हजारो मासे विखरून पडले आहेत, तू हे असे चार दोन मासे उचलून समुद्रात फेकल्याने समुद्राला किंवा त्या माशांना काही फरक पडणार आहे असं वाटतं का तुला?' तेंव्हा तो माणूस पुन्हा वाकतो एक तडफडणारा मासा उचलतो आणि त्याला समुद्रात फेकतो, म्हणतो..."

"मेड अ डिफरन्स टू दॅट वन," नानांनी त्याचं वाक्य पूर्ण केलं, "त्या एका माश्याला पडला फरक!"

"व्हॉट अ यार्न! असा फरक पडत नसतो, आणि अशा तळागाळातल्या एक-एक व्यक्तीला जीवन देण्याच्या गोष्टी सांगणं राजकारणी लोकांना बरोबर जमतं! ऑल हम्बग! एनि वे, त्या गोष्टीचं जाऊ द्यात नानासाहेब, मी सांगतो तुम्हाला आता काय होणार आहे ते..."

"नंतर सांग," नाना त्याला तोडत म्हणाले "आधी मला सांग, मला तू नागपुरपासून दोन-तीन तासांवर कुठेतरी आणलंयस, चार वगैरे वाजले असतील, हो ना?"

'कशावरून?"

"बाहेर ऊन उतरलेलं दिसतंय, मी हॉटेलात होतो तेंव्हा एक वाजत आला होता..."

"कशावरून ते आजच घडलं?"

"भूकेवरून माझ्या पोटातल्या! आणि तू मघाशी 'आज मी त्याला फोटो काढायला पाठवलं' म्हणालास...."

"गुड कॅच! स्टिल स्मार्ट ॲज अ व्हिप! असो, तर चार वाजण्याचा काय संबंध आहे?"

"मला माझ्या डायाबेटिसच्या आणि हार्टच्या गोळ्या घ्यायला हव्यायेत, माझ्या पँटच्या डाव्या खिशात आहेत त्या घेऊ देणार का?"

अविनाश म्हणाला, "जरूर, शिव, सोड त्यांचे हात आणि दे पाणी त्यांना गोळ्या घ्यायला."

शिवकुमारने बांधलेले हात सोडले आणि पाण्याचा पेला नानांच्या हातात दिला, त्यांनी खांदे वर खाली करत डाव्या खिशात हात घातला, आधी फोन आणि मग गोळ्यांचं पाकिट वरती आलं. शिवकुमारने झडप घालून फोन ताब्यात घेतला आणि अविनाशकडे दिला. नानांनी गोळ्या घेतल्या, आणि अविनाशकडे पहात म्हणाले, " हं, आता सांग मला काय होणार आहे ते?"

"तुम्ही माझा प्लॅन उद्ध्वस्त केला असं तुम्हाला वाटत असेल, पण पैसे तुमच्या हाती लागले म्हणजे माझे पत्ते संपले असं नाही, आय स्टिल हॅव ऑन एस अप माय स्लीव्ह, आणि आता तुम्हाला ओलीस ठेवून मी माझे पैसेही वसूल करीन. काय म्हणता?"

"मी सांगतो तुला मला काय वाटतं ते," नाना म्हणाले, "पण आधी मला माझ्या नातवाला दोन मिनिटं फोन करू दे, कारण मी चारच्या सुमाराला फोन करतो म्हणून त्याला प्रॉमिस केलं होतं, मे आय? मी त्याला मी कशा परिस्थितीत आहे वगैरे काहीही सांगणार नाही."

थोडा विचार करून अविनाश म्हणाला, "गो अहेड, करा फोन." त्याने नानांना हातातला फोन दिला.

नानांनी राजूचा नंबर फिरवला. दोन रिंगमध्ये राजूने फोन उचलला, "अरे कोण राजू का? अमेय नाहीयेका, .....नाही मी दुपारी चारच्या सुमारास फोन करतो म्हणून म्हंटलं होतं, म्हणून केला, काम काही नाही, मी मजेत आहे, अमेय ला सांग की त्याने गेल्या आठवड्यात इन्स्टॉल केलेलं ते ॲप उत्तम चालतंय. बाकी ठीक. हो, हो, गोळ्या वगैरे घेतोय मी व्यवस्थित, काळजी नको करूस, तेवढा निरोप अमेयला नक्की सांग, ठेवतो." नानांनी घाईने फोन बंद केला, आणि अविनाशला दिला,

"थँक्स! आता सांगतो मी तुला मला काय वाटतं ते. पहिली गोष्ट, तुझा तो 'एस अप द स्लीव्ह' फार दिवस राहणार नाही. एटीसी ला सुगावा लागलाय, ते तो एक्स्प्लोझिव्ह्ज चा ट्रक नागपूरपर्यंत येऊ देणार नाहीत."

अविनाशने चमकून त्यांच्याकडे पाहिलं, "ट्रक?"

"हो, ट्रक, आणि पंधरा तारखेचा कार्यक्रम उधळण्याचं स्वप्न सोडून दे, वोन्ट वर्क!"

अविनाशने मुठी वळल्या आणि त्याच्या कपाळावरची शीर तटतटून फुगली, चांगले पंधरा-एक सेकंद काहीच घडलं नाही, मग प्रबीर आणि शिवकुमार आपल्याकडे पहाताहेत हे त्याच्या लक्षात आलं, आणि तो म्हणाला, "एक नाही तर अशी दुसरी संधी मिळेल, ...आणि तुम्ही अजून माझ्या ताब्यात आहात! मला तुमचा जीव घ्यायला कसलाही विधीनिषेध नसला तरी सरकार तुमच्यासाठी नक्कीच वाकेल. तुम्ही थोड्या वेळाने फोन करून माझ्या मागण्या त्यांच्यापर्यंत पोहोचवणार आहात."

"दॅट वॉज माय अदर पॉईंट, अविनाश," नाना म्हणाले, "मी फोन करणार नाही. मला मरणाची भीती आहे असं तुला वाटायचं कारण नाही. तुला माझी पत्नी आठवतेय, नलिनी?"

अविनाशला संभाषणाची गाडी कुठे चाललीय ते कळेना, पण नानांच्या पत्नीचा उल्लेख झाल्यावर त्याचा चेहेरा बदलला. "मॅडमचं काय?"

"काही वर्षांपूर्वी, तिला ब्रेस्ट कॅन्सर झाला, आधी ट्रीटमेंटला दाद देतेय असं वाटलं, अतोनात हाल झाले तिचे कीमोथेरपीच्या साईड इफेक्ट्सने, मी माझ्या पोलिसी कामात नको इतका गुंतलेलो होतो, पण तशा त्रासात ती कुटुंबाला खंबीरपणे सांभाळून होती. अगदी स्वतःच्या मुला-नातवंडांचीच नव्हे तर एका अनाथ मुलीचीही खूप काळजी घेतली तिने. मग तो कॅन्सर पसरत पसरत शरीरात इतरत्र वाढला. आधी तिचं लिव्हर, मग हाडं आणि अखेरीस मेंदू, हे सगळं सगळं पोखरत पोखरत त्या व्याधीने तिचा जीव घेतला..."

"आय ॲम सॉरी!'" अविनाश म्हणाला, "मला आयुष्यात खूप आदराने वागवलं अशा मोजक्या व्यक्तिंपैकी मॅडम होत्या."

"तिच्या त्या दुखण्यात, तिच्या प्रत्येक अवयवाच्या बंद होण्यात, मी माझं एक एक मरण सहन करत

गेलो, अविनाश. ती गेल्यानंतरचा प्रत्येक दिवस मी तिचं राहिलेलं जगणं जगतो आहे, तिला ज्या गोष्टींनी आनंद दिला असता अशाच गोष्टी करतो. मला स्वतःला आता मरणाचीच नव्हे तर कसलीच भीती नाही....तेंव्हा मला भीति दाखवून सरकारवर दडपण आणण्याचा वगैरे विचार करू नकोस. मी कधीही मरायला तयार आहे. यू कॅन किल मी एनिटाईम!"

आपल्या सहकाऱ्यांकडे पाहत अविनाश म्हणाला, "व्हेरी गॅलन्ट ऑफ यू, नानासाहेब, पण त्या सरकारला तुमची ही जगण्याविषयीची अनिच्छा कुठे माहीत आहे? मला माहितीये मी वाकवेन त्यांना. आणि तुम्ही करणार नसाल फोन तर मी करेन, शेवटी डिमांड्स मलाच सांगायच्या आहेत."

"मी नाही करणार फोन, तू खुशाल कर," नाना म्हणाले.

"ऑल इन गुड टाईम, आणखी तासाभराने करु फोन. शिव, हात बांध परत आणि माझ्याबरोबर या दोघेही पुढच्या खोलीत."

*******************

*****************

दुपारचे चार वाजून गेले, गोसावींनी खूप प्रयत्न करूनही त्या क्झायलो गाडीचा काहीच सुगावा लागू शकला नव्हता. बावधनकरांना राहून राहून आपल्या गाफीलपणाचा संताप येत होता.

साडे चार वाजता बारिया सर म्हणाले, "बावधनकर, मानेसरांना अविनाशने उचलले असेल तर मला खात्री आहे त्याचा रॅन्सम कॉल लवकरच येईल, आपण सरांच्या फॅमिलीला निदान कळवलं तरी पाहिजे असा गोंधळ झाल्याचं, दे मस्ट नॉट गेट इट फ्रॉम द मेडिया."

बावधनकरांना बारियांचं म्हणणं पटलं, त्यांनी बारियांच्या हॉटेल रुममधून स्पीकर फोन वापरून राजूला फोन केला, हेतू हा की एटीसी चे प्रमुख उपस्थित आहेत म्हंटल्यावर त्याला कंफर्टिंग वाटावं, आणि शक्य तितक्या शांत आवाजात त्याला सांगितलं की एकच्या सुमाराला काही संशयित नक्षलवाद्यांनी नानांना पळवून नेलं होतं, आणि पोलिस तपास जारीने चालू आहे. बारियांनीही आपल्या खात्याच्या मदतीची ग्वाही दिली.

"एक वाजता?" राजू म्हणाला, "कसं शक्य आहे? नानांचा मला आत्ता चार वाजता फोन आला होता...आणि मला त्यांचा निरोप नीटसा कळलाही नाही." त्याने अमेयसाठी आजोबांनी दिलेला निरोप शब्दशः सांगितला.

"बावधनकर," बारिया म्हणाले, "ही वॉझ ट्राईंग टू कन्व्हे अस समथिंग क्रिटिकल! मिस्टर राजीव, तुम्ही प्लीज अमेयाला आजोबांना त्याने कुठलं अॅप डाऊनलोड करून दिलं होतं ते विचारता का? आम्ही थांबतो."

"तो इथे नसतो, अहमदाबादला आय आय एम ला आहे, मोबाईल नंबर देतो त्याचा."

पुढच्या पाचच मिनिटांत अमेयाचा संपर्क झाला, त्याने माहिती दिली आणि बारियांनी बावधनकरांना टाळी मागितली, "मी काय म्हणालो? द ओल्ड चॅप इज फुल ऑफ इंटेलेक्ट! चला शिंद्यांना कॉल करू आणि कामाला लागू!"

*************

सहा वाजता अविनाशने बावधनकरांचा नंबर नानांच्या मोबाईल मध्ये शोधून त्यांना आपल्या मोबाईलवरून फोन लावला, आणि ते फोन वर आल्यावर त्यांना नानांच्या सुटकेची किंमत म्हणून तीस लाख रुपये तयार ठेवण्याची आणि तुरुंगातून त्याच्या पाच सहकाऱ्यांची सुटका करण्याची मागणी केली. बावधनकरांनी 'सी एम ना निरोप कळवतो, दोन दिवसांची मुदत द्या' म्हणून सांगितलं. अविनाशने दोन दिवस नव्हे तर चार तासांनी फोन करतो म्हणून सांगितलं.

"तर काय मग प्रोफेसर, काय वाटतं तुम्हाला, तीस लाख आणि पाच नक्षलवादी ही पुरेशी किंमत आहे तुमच्या जीवाची?"

"पैशाची गोष्ट अलग, अविनाश, पण तुला त्या पाच नक्षलवादींच्या जगण्याशी काहीही घेणं देणं नाहीये, मान्य कर." नाना म्हणाले, "इन फॅक्ट, तुला पैसे आणि सत्ता सोडून कशाचंच, कधीच महत्व वाटलं नव्हतं."

"व्हॉट डू यू मीन?" चिडून अविनाशने विचारलं.

"म्हणजे असं," नाना शिवकुमार आणि प्रबीरकडे पाहत म्हणाले, "की तू तुझ्या निष्ठा कायम बदलत राहिलास, आधी सरकारी नोकरीत, आणि मग दलम् मध्ये जाऊन उठावाच्या नावाखाली अडाणी, निष्पाप आदिवासींची फसवणूक करत. दहशतीच्या मार्गाने त्यांची आणि अगदी या प्रबीर-शिव सारख्या सहकाऱ्यांचीही कायम फसगत करीत राहिलास. यांपैकी कुणावरही तू कधीही विश्वास ही ठेवू शकला नाहीस. स्वार्थ आणि भीति यांचं मिश्रण असलं ना स्वभावात, की असंच होतं!"

"नानासाहेब," चिडून अविनाश म्हणाला, "तुम्ही माझ्या सहनशीलतेचा गैरफायदा घेताय! स्टॉप इट!"

"रिअली? अरे तुझा वाळूत डोकं खुपसणारा शहामृग झालाय, आधी पुस्तकी ज्ञानाच्या जोरावर तू भोळ्या सहकाऱ्यांना मार्क्सवादाची, आयडियालॉजीची, तत्वांची भूल दाखवलीस. राजकारणी लोकांनी ती तत्वं हायजॅक केल्यावर तू जगभरातल्या कॉन्फिलक्ट जनरेशनच्या दुसऱ्या कुबडीची मदत घेतलीस, क्रांतीची. अशी क्रांती की जी तुला स्वतःलाच कधी झेपली नाही. ज्यांच्यासाठी तू या क्रांतीचे नारे लावलेस, त्या आदिवासींच्या परिस्थितीत काय फरक पडला तुझ्यामुळे? त्यांना दहशतीत ठेवणारे आणि अज्ञानाचा फायदा घेऊन लुटणारे बदलून त्यांच्या जागी तुझ्यासारखे आले!"

"खोटंय हे, हा असाच प्रोपॅगंडा करतात तुमच्यासारखे बुद्धीभेदी."

"प्रोपॅगंडा नाही, डोळे उघडून जगभरात बघ, नायजेरिया, सुदान, एरिट्रिया, इथिओपिया, मध्य-पूर्वेतले देश, सगळीकडे तुला एकच दिसेल, जुने तंटे सोडवण्यासाठी आता तत्ववादाची किंवा सशस्त्र क्रांतीची गरज नाहीये, लोकांना महत्व कळतंय ते रिसोर्सेसचं - नैसर्गिक संपत्ती सांभाळण्याचं. तुला आदिवासींचं खरंच भलं करायची इच्छा असेल तर त्यांच्या नैसर्गिक संपत्तीची लुटालुट थांबेल असं बघ. आहे हिंमत ते नेतृत्व देण्याची?"

"मी ते केल्याने हे असे जीवाला जीव देणारे सहकारी मिळतील?" शिव आणि प्रबीरक्डे पहात अविनाश म्हणाला.

"जीवाला जीव देणारे? पोलिसी हिसका बसल्यावर दहा मिनिटांत पोपटासारखे बोलणारा रेळे तुझाच सहकारी ना? मी खरं तेच सांगतो, तुझ्या आयुष्यात आलेल्या नीता सोडून तू कुणाशीही नातं जुळवू शकलेला नाहीस, खोटंय का हे?"

"नीता?" अविनाश चपापला.

"हो, तुला वाटलं की मला माहीत नाहीये? दहा वर्षांपूर्वी नऊ महिन्यांची ती गर्भारशी पोर तुझ्या तत्वज्ञानावर विश्वास टाकून रानावनात फिरली बंदुक हातात घेऊन, बाळंतपणात देखील तू तिची धड काळजी घेतली नाहीस, जीव गेला पोरीचा तुझ्या महत्वाकांक्षेपायी!"

"नानासाहेब!"

"का? ऐकवत नाहीये सत्य?"

"मी घेतली काळजी तिची, आणि इतरांचीही..."

"नाही, तिची नाही घेतलीस, तिच्या बाळाची घेतलीस, अनिलची."

"अनिल??"

"हुं, अनिल, अविनाश आणि नीताचा अनिल."

"तुम्हाला काय माहितीये?" अविनाशचा आवाज घोगरा झाला.

"मला सगळं माहितीये, त्याला तू पुण्याला कुठल्या घरात ठेवलंयस आणि तो कुठल्या शाळेत जातो ते..."

"नाना!" अविनाश ओरडला. "काय केलंत तुम्ही अनिलला? कुठे आहे तो?"

"किंचाळू नकोस! इट वॉज आयरॉनिकल यू ब्रॉट अप दॅट स्टोरी ऑफ सेव्हिंग वन फिश ॲट अ टाईम! अनिल तुझ्याच छायेत वाढला असता तर तसाच स्वार्थी आणि तत्वहीन झाला असता तुझ्यासारखा, मोकळ्या समुद्रापासून दूर तडफडणारा आणखी एक मासा, बट नो मोअर! आय सेव्हड दॅट वन!"

"तुम्ही थापा मारताय."

"कॉल माय ब्लफ, कर चौकशी," नाना म्हणाले.

पुढचे पंधरा मिनिटे अविनाश वेड्यासारखा फोनवर फोन करून खात्री करून घेत होता. शेवटी हताश होऊन नानांना म्हणाला, "मी सोडेन तुम्हाला, अनिलला परत करा."

"अच्छा, म्हणजे माझ्या जीवाची किंमत पाच नक्षलवादी बदलून स्वतःचं पोर अशी झाली तर आता!"

शिव आणि प्रबीर अविनाशकडे पहात होते.

"निदान कुठे आहे ते सांगा."

"नॉट गोइंग टू हॅपन! तो आहे तिथे सुरक्षित आहे, आणि सूज्ञ नागरिक म्हणून वाढेल."

"तो कुणाकडे आहे त्यांचा फोन नंबर द्या, फक्त बोलतो त्याच्याशी!"

"सॉरी, प्रामाणिकपणे सांगतो, माझ्याकडे तो फोन नंबरही नाही, तुला त्याला भेटण्याचा एकच मार्ग आहे... एसीपी बावधनकरांना फोन कर."

इतक्यात प्रबीरच्या हातातला फोन वाजला. त्याने मिनिटभर ऐकलं आणि फोन ठेवला, "कॉम्रेड, मानेगाव, लांजी आणि खैरागढचे रस्ते ब्लॉक करून एस आय डी च्या कंपन्या जंगलात येतायेत. आपलं लोकेशन कळलंय असा मेसेज आहे!"

"लोकेशन कळलं? कसं?" अविनाशने विचारलं "माझा सिम ट्रेस होणं शक्य नाही!"

नाना हसले, "तुझा नाही, माझा!"

"तुम्ही मुलाला फोन केलात...."

"येस! आणि त्या फोनमधल्या गूगलच्या लॅटिट्यूड ॲपवरून पोलिसांना या जागेचं एक्झॅक्ट लोकेशन मिळालंय! इंटरनेट झिंदाबाद!"

अविनाशने प्रबीर आणि शिवकडे पाहिलं. प्रबीरने म्हंटलं, "कॉम्रेड, या कंपन्या महाराष्ट्रातून येतायत, बैहर पास ओपन असेल छत्तिसगढचा, तिथून जाऊ शकू आपण."

"आय वुडंट टेक अ चान्स," नाना म्हणाले, मी ऐकलं की एटीएसचे कमांडोज नॉर्थ कडूनही येतील, बट इट्स युअर कॉल!"

अविनाशने सर्वांकडे एकदा पाहिलं, आणि काहीतरी मनाशी निर्णय घेतला. दीर्घ श्वास घेऊन तो म्हणाला, "कॉम्रेड शिव आणि कॉम्रेड प्रबीर, तुम्ही दोघे आणि इतर जण मोकळे आहात तुम्हाला हवं तर त्या रूटने निघायला. मी थांबणार आहे इथेच, नानासाहेबांबरोबर. गुड बाय!"

# ते ६९ दिवस

**मोदक**

१२१ वर्षे जुनी सोन्याची आणि तांब्याची खाण.

दुर्घटनेची आणि मृत्यूची काळीकुट्ट पार्श्वभूमी..

जमिनीपासून २३०० फूट खोल सुरू असलेले खोदकाम...

खोल भूगर्भात, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत काम करणारे कामगार....

एक अपघात.


५ ऑगस्ट २०१०, चिलीमधील अट‌ाकामा वाळवंटातील एका खाणीमध्ये भूस्खलन झाल्यामुळे ७ लाख टनी महाकाय खडक प्रस्तरापासून विलग होऊन कोसळला, आणि... एका दंतकथेला सुरुवात झाली.

चिली या देशाला खाण व्यवसायाची मोठी परंपरा लाभली आहे. विपुल साधनसामग्रीमुळे तांब्याच्या मोठमोठ्या खाणी अटकामा वाळवंटात खोदल्या जात होत्या. याच खाणींच्या जोरावर चिलीने जागतिक उत्पादनामध्ये दिमाखात मजल मारली होती. परंतु कित्येक दशके सुरू असलेल्या अव्याहत खोदकामामुळे भूगर्भामध्ये हालचाली सुरू झाल्या होत्या. नैसर्गिक बदल, जुनीपुराणी यंत्रे आणि मानवी हलगर्जीपणा यांमुळे दुर्घटनांचे प्रमाणही वाढले होते. २००० सालापासून खाणींमधल्या अपघातांमध्ये ३० ते ३५ लोक दर वर्षी मरण पावत होते. २००८मध्ये हा आकडा ४३पर्यंत गेला, सरकार खडबडून जागे झाले व बरेच नियम, कायदे कडक केले गेले.. पण बदलाचे हे वारे फार दिवस टिकले नाहीत. खाणींमधली धोकादायक परिस्थिती हळूहळू पुन्हा पूर्वपदावर आली. जीव धोक्यात घालून कामगार काम करतच होते..

परंतु या अपघाताने सर्व काही बदलून गेले.

अपघातानंतर खाणीमध्ये कामासाठी खोलवर उतरलेल्या सगळ्या कामगारांनी जमिनीवर येण्यासाठी जिवाच्या आकांताने धाव घेतली. खडकाच्या वरच्या बाजूला असलेले सर्वच्या सर्व कामगार खाणीबाहेर सुखरूप पोहोचले. खडकाच्या खालच्या बाजूला असलेले ३३ कामगार मात्र बेपत्ता होते.

मोबाईल व इंटरनेट या अधुनिक संपर्कसाधनांमुळे अपघाताची माहिती काही क्षणात जगभर पोहोचली. या ३३ जणांच्या कुटुंबीयांनी, चिली सरकारच्या वेगवेगळ्या प्रतिनिधींनी, पोलीस, रेस्क्यू, फायरब्रिगेड, सिक्यूरिटी, न्यूज चॅनेल्स या सर्वांनी खाणीकडे धाव घेतली. परिस्थितीचा आढावा घेतला गेला आणि सर्व जण हादरून गेले.




वरील फोटोमध्ये वरपासून खालीपर्यंत दिसणारा वळणावळणाचा मार्ग हा खाणीतला ये-जा करण्याचा एकमेव मार्ग आहे. उभ्या तुटक रेषा व्हेंटिलेशन शाफ्ट दर्शवितात. पहिला अपघात ५ ऑगस्टला, तर दुसरा ७ ऑगस्टला झाला, त्या जागाही दिसत आहेत.

खाणीतल्या प्रचंड रस्त्याला मधोमध विभागून तो महाकाय खडक कोसळला असल्याने खाणीतला वळणावळणाचा रस्ता पूर्णपणे बंद झाला होता आणि खाणीमध्ये ३३ जण बेपत्ता होते.

जर खाणकामगार जिवंत असतील तर त्यांनी खाणीमधल्या एकमेव सुरक्षित ठिकाणी, एका शेल्टरचा आश्रय घेतला असण्याची शक्यता होती. परंतु त्या शेल्टरमध्ये केवळ ४८ तास पुरेल इतकाच अन्नाचा आणि पाण्याचा साठा होता. अपघातामुळे बचावलेले कामगार तहान-भुकेने तडफडून मरण्याचा धोका कैक पटीने वाढला होता. कामगारांचा ठावठिकाणा शोधणे आणि जर ते जिवंत असले तर दुसरा रस्ता तयार

करून त्यांना बाहेर काढणे, याशिवाय अन्य कोणताही मार्ग शिल्लक नव्हता. सरकारने युद्धपातळीवर प्रयत्न सुरू केले. राष्ट्रपती व खाणमंत्री घटनास्थळी हजर झाले, या नाजूक क्षणी नक्की कशाची गरज आहे याचा आढावा घेतला; रेस्क्यू पार्टीज त्यांचे काम करत होत्याच. त्यांना सरकारकडून हवी ती मदत मिळत होती, मिळवली जात होती. वेगवेगळे तज्ज्ञ हळूहळू दुर्घटनेच्या जागी जमा झाले. खाणमंत्री गॉलबॉर्न हे खरे तर एक सिव्हिल इंजीनीयर, अमेरिकेतील स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटीची MBA ची पदवी घेतलेले एक कॉर्पोरेट. अगदी केवळ काही महिन्यांपूर्वी त्यांच्यावर खाणमंत्रिपदाची जबाबदारी आली होती. खाणीच्या कोणत्याही प्रकारच्या कोणत्याही ज्ञानाची कोणतीही पार्श्वभूमी नसताना त्यांनी या सर्व कामाची जबाबदारी उचलली. "तांत्रिक ज्ञान नसल्याने जर मला योग्य निर्णय घेता येणार नसेल, तर योग्य निर्णय घेता येईल अशी परिस्थिती मी नक्की तयार करू शकतो" हा सरळ साधा विचार करून गॉलबॉर्न प्रत्येक मीटिंगमध्ये सहभागी झाले, रेस्क्युअर्सना लागणाऱ्या वेगवेगळ्या सामग्रीची, यंत्रांची उपलब्धता लगेच होऊ लागली. एखादा तज्ज्ञ, एखादे यंत्र, एखादी माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसली तर ती कोठून मिळवली जाईल याची माहिती काढली जात असे व ती तातडीने मिळवली जात होती. रेस्क्युअर्सचे काम सुरू असतानाच बेपत्ता ३३ जणांच्या कुटुंबीयांची गर्दी जमली. सुटकेचे प्रयत्न म्हणजे नक्की काय सुरू आहे आणि कामगारांची अवस्था कशी आहे हे कळायला त्यांना काहीच मार्ग नव्हता. आप्तांच्या काळजीने सैरभैर झालेल्या त्या लोकांकडे कुणीतरी लक्ष देण्याची गरज होती. इथेही गॉलबॉर्न उभे राहिले.

बेपत्ता असलेल्या प्रत्येक कामगाराच्या कुटुंबीयांसाठी एक, असे ३३ तंबू उभारून दिले, त्यांच्यासाठी एक सामुदायिक स्वयंपाकघर, प्रसाधनगृहे, मोबाईल फोनसाठी चार्जर, नोटीसबोर्ड अशा सोयी तत्काळ उभारून दिल्या. संरक्षणासाठी पोलीस गस्त घालू लागले. त्या उजाड वाळवंटात जणू एक वेगळे शहर वसवले गेले. कुटुंबीयांनी या कँपचे नामकरण केले "esperanza" म्हणजेच "आशा" (Hope). या नातेवाइकांनी तिथे ३३ खाणकामगारांचे प्रातिनिधिक असे ३३ राष्ट्रध्वज उभारले. ३३पैकी १ कामगार बोलिव्हियाचा होता तर ३२ चिलीचे.



बेपत्ता कामगारांच्या सुरक्षिततेबद्दल कुटुंबीयांना असलेली चिंता लक्षात घेऊन स्वतः खाणमंत्री आणि सरकारमधील उच्चपदस्थ दर दोन तासांनी कुटुंबीयांना भेटत होते, आधार देत होते. रेस्क्यू टीम करत असलेली प्रयत्नांची पराकाष्ठा कुटुंबीयांपर्यंत पोहोचविण्याचे महत्वाचे काम हे लोक करत होते. रोज संध्याकाळी "आज काय घडले?", "उद्या काय प्रयत्न केले जातील?" अशी माहिती नि:संकोचपणे मीडियाला आणि कुटुंबीयांना दिली जात होती. इथेही गॉलबॉर्न यांनी एक धाडसी पाऊल उचलले. कुटुंबीयांची काळजी

लक्षात घेऊन सर्वप्रथम कुटुंबीयांसोबत या रोजच्या मीटिंग घेतल्या जात होत्या व नंतर मीडियासोबत. हा निर्णय घेतल्यानंतर पहिल्या मीटिंगमध्ये हजर असलेल्या सर्व मीडिया प्रतिनीधींना शांतपणे तंबूबाहेर काढले गेले व फक्त कुटुंबीयांशी संवाद साधला. या छोट्या छोट्या गोष्टींमुळे कुटुंबीयांचा विश्वास संपादन करण्यात चिली सरकारला यश मिळाले व त्यांच्याकडून संपूर्ण सहकार्य मिळाले. या दुर्घटनेबद्दल वर्तमानपत्रामधून सरकारची निर्भत्सना झाली, काही कुटुंबीयांनीही शाब्दिक हल्ले चढवले पण सरकारने अशा अप्रिय घटनांचा एकंदर प्रयत्नांवर परिणाम होऊ दिला नाही.

मीडियाशी व कुटुंबीयांशी बोलताना राष्ट्रपती पायनेरा व बाजूला खाणमंत्री गॉलबॉर्न



रेस्क्यू टीम, सरकार, कुटुंबीय सर्व जण प्रार्थना करू लागले, सुरक्षिततेची.. सुखरूपतेची..




कामगारांचा ठावठिकाणा शोधणे हे प्रमुख लक्ष्य होते. तब्बल १५ वेगवेगळ्या ठिकाणाहून शेल्टरच्या दिशेने ड्रिलिंग सुरू झाले होते. या ड्रिलिंगमध्ये अचूकता ही एक अत्यंत महत्त्वाची बाब होती आणि कामगारांच्या सुखरूपतेबाबत काहीच माहिती न मिळाल्याने सर्व प्रयत्न घाईगडबडीत सुरू होते. ड्रिलिंग करणाऱ्यांना परिस्थितीची जाणीव होती. मात्र गडबड करून भलत्याच दिशेला ड्रिल केले, तर ३३ कामगारांच्या जिवावर बेतेल याची त्यांना जाणीव होतीच.

तीन... चार... पाच... दिवस पार पडले. कोणत्याही योजनेला यश आले नव्हते. परिस्थिती जैसे थे होती. सातव्या दिवशी खाणीच्या तोंडाशी थोडी पडझड झाली व तो रस्ताही बंद झाला. काम मंदावले, अव्याहतपणे

धडधडणाऱ्या क्रेन्स आणि रोऽऽ रोऽऽ करणारे काही ड्रिल ठप्प झाल्यामुळे खाणकामगारांच्या कुटुंबीयांमध्ये चलबिचल झाली व गैरसमजामुळे त्या सर्वांनी तिथेच धरणे धरले, स्वतः आत जाऊन कामगारांना शोधण्याची तयारी दाखवली. सरकारने ही मागणी तत्काळ नाकारली.

खाणमंत्री गॉलबॉर्न यांची खाणीजवळची उपस्थिती आणि प्रत्येक निर्णयातला सहभाग सरकारमधील काही उच्चपदस्थांना मान्य नव्हती. अशा रेस्क्यू ऑपरेशनमध्ये सरकारने पडद्याआडून काम केले पाहिजे, हा त्यांचा अनुभव होता. रेस्क्यू ऑपरेशन अयशस्वी झाले तर संपूर्ण मंत्रीमंडळाला देश चालवणे अशक्य होणार होते. यादरम्यान एका मुलाखतीमध्ये गॉलबॉर्न यांनी खाणकामगारांच्या बचावण्याची शक्यता 'खूप कमी' असल्याचे सांगितले व एकच गदारोळ झाला. सरकारमधील एका जबाबदार मंत्र्याने असे अप्रिय विधान करणे कोणालाच रुचले नाही. पण रेस्क्यू ऑपरेशनमधून कोणत्याही प्रकारच्या अपेक्षा तयार होऊ नयेत आणि झाल्याच तर उंचावू नयेत, यासाठी हे धाडसी विधान केले.

ड्रिलिंगचे काम पूर्ण वेगाने चालूच होते. घाईगडबडीत ड्रिल आपली जागा आणि ठरवलेला मार्ग सोडून भरकटत होते. टणक खडकामुळे ड्रिलचे दर्शनी भाग मोडत होते, नादुरुस्त होत होते. ड्रिल मशीन्सची गती मंदावत होती आणि सर्वांच्या काळजीत भर पडत होती. रेस्क्युअर्सचा धीर सुटू लागला होता. नातेवाईक, सरकार, बचावलेले खाण कामगार सर्व जण हळूहळू नि:शब्दपणे हार मानत होते. त्या ३३ जणांच्या सुरक्षिततेबद्दल आता नकारार्थी मतप्रवाह पसरत होते, उत्साहाने सुरू झालेले ड्रिलिंगचे काम यंत्रवत सुरू होते, सर्वांच्या भावभावना जणू थिजून गेल्या होत्या.

रेस्क्युअर्सना आणखी एक धक्का बसला. कामगार नक्की सापडतील अशी अपेक्षा असलेल्या एका ड्रिलला काहीच मिळाले नाही. या अनपेक्षित धक्क्याने सर्व जण कोलमडून गेले. कामगारांनी भूगर्भातील शेल्टरमध्ये आश्रय घेतला असला तरी तिथे असणारा अन्न-पाण्याचा साठा फक्त ४८ तास पुरेल इतकाच होता. इथे तर १५ दिवस उलटून गेले होते. खाणीमध्ये पिण्याच्या पाण्याचा साठा कामगारांनी शोधून काढला असता. पण.. हवा..?? इतके दिवस पुरेल असा हवेचा काहीही स्रोत खाणीमध्ये नव्हता. त्यातही अपघातामुळे धुळीचा अतिप्रचंड लोट उठला असण्याची शक्यता होती. उपलब्ध असणारी हवा त्यामुळे दूषित झाली असण्याची दाट शक्यता होती. परिस्थितीसमोर रेस्क्युअर्स हतबल झाले होते. कितीही उंचावलेले मनोबल आणि नीतिधैर्य असले तरी वास्तवाची जाणीव वाईट प्रकारे प्रत्येकावर आपला प्रभाव दाखवत होती.

धक्क्यावर धक्के देणाऱ्या नियतीने आणखी एक धक्का दिला. खोदकाम सुरू असणाऱ्या १५ ड्रिल्समुळे अक्षरशः चाळण झालेल्या त्या परिसरात अंतर्गत पडझड सुरू झाली. भूगर्भीय हालचालींमुळे त्या परिसरात काम करणे अत्यंत धोकादायक झाले. ३३ कामगारांसाठी - जे जिवंत आहेत की नाही हेही माहीत नाही, अशा ३३ जणांसाठी - शेकडो लोकांचा जीव धोक्यात घालणे कितपत शहाणपणाचे आहे? हा प्रश्न उभा राहिला. काही ड्रिल बंद केली गेली, काही सुरू होती. बेपत्ता ३३ कामगारांचे नातेवाईक अजूनही आशा लावून बसले होते. रोजच्या मीटिंग्ज सुरू झाल्यापासून बहुधा पहिल्यांदाच सरकारचे प्रवक्ते आणि कुटुंबीय यांमध्ये जबरदस्त मतभेद झाले. कुटुंबीयांनी स्वतः आत जाऊन शोधकार्य करण्याची पुन्हा एकदा मागणी केली. सरकारने ही मागणीही विनाविलंब नाकारली.

कामगारांचा शोध घेण्याचा १७वा दिवस सुरू झाला. कामगार जिवंत असण्याच्या शक्यता जवळजवळ

संपुष्टात आल्या होत्या, आता आपण फक्त प्रेतांसाठी खोदकाम करतोय ही भावना रेस्क्यू पार्टीमध्ये बळावू लागली. सर्वत्र एक अनामिक ताण भरून राहिला होता.
अचानक एका ड्रिलला चिकटून काहीतरी वर आले. एक लाल कापडाचा तुकडा.. एक चिकटपट्टीच्या वेष्टणात गुंडाळालेले काहीतरी.. ड्रिलपासून ते काळजीपूर्वक वेगळे केले गेले आणि एकच जल्लोष उडाला. सर्वच्या सर्व ३३ कामगार सुरक्षित असल्याचा संदेश त्या चिठ्ठ्यांवर लिहिला होता. त्या संदेशासोबत कामगारांची परिस्थिती विशद करणारी विस्तृत माहिती दिली होती. ही तारीख होती २२ ऑगस्ट २०१०. रेस्क्यू करणाऱ्यांमध्ये, राष्ट्रपती व मंत्रीमंडळामध्ये, कुटुंबीयांमध्ये आणि संपूर्ण चिलीमध्ये आनंदाची एक लाट उसळली. ड्रिल करणारे कित्येक जण ते ऐकून ढसाढसा रडू लागले, आनंदाश्रू. १७ दिवस हे सर्व कामगार अमानवीय परिस्थितीमध्ये जिवंत होते, ३६ अंश तापमानामुळे निर्माण झालेली उष्णता, ९०%पेक्षा जास्त आर्द्रता, अपुरी हवा, अपुरे अन्न आणि दूषित पाणी आणि अनिश्चित भवितव्य पचवून हे सर्व जण मानसिक व शारीरिकदृष्ट्या धडधाकट होते.




हाच तो संदेश, "We are well in the shelter, the 33". चिलीचे राष्ट्रपती तो संदेश पत्रकारांना दाखवताना.

अपघात झाल्यानंतर कामगारांनी तातडीने घेतलेल्या निर्णयांमुळे सर्वांचे जीव बचावले होते. अपघातानंतर सर्वप्रथम आत अडकलेले कामगार एकत्र आले, सर्वांच्या शारीरिक अवस्थेची तपासणी केली, सुदैवाने कुणीही जखमी झाले नव्हते. सर्वांनी 'शेल्टर'चा आश्रय घेतला, जे या खाणीमधले एकमेव आश्रयस्थान होते. कामगारांनी सुटकेचे मार्ग शोधण्यास सुरुवात केली. काही अनुभवी कामगार परिस्थितीचा आढावा घेऊन आले. जिथे खडक कोसळला होता त्या ठिकाणी आढावा घेणाऱ्या कामगारांनी तशा परिस्थितीतही स्प्रे पेंटने मार्किंग केले, वेगवेगळ्या नोंदी घेतल्या. या दुर्घटनेचे गांभीर्य ओळखून व सुटकेसाठी कितीही वेळ लागू शकतो हे समजून कामगारांनी महत्त्वाचे एक काम केले, ते म्हणजे आपल्यातूनच सर्वात अनुभवी आणि सर्वात वयस्कर अशा 'लुई उर्झ्वा' याला लीडर बनवले आणि त्याचे आदेश मानण्याचे मान्य केले. लीडरच्या आदेशांनुसार पिण्याच्या पाण्याचा शोध घेतला, एक कामगार धर्मगुरूचे काम करू लागला, औषधांची माहिती असणारा एक कामगार मेडिकल लीडर झाला. वेगवेगळ्या

रेस्क्यू पार्टीज तयार केल्या. कामगारांच्या रेस्क्यू पार्टीने हवा खेळती राहण्यासाठी असलेल्या व्हेंटिलेशन शाफ्टमधून निसटण्याचा प्रयत्न केला, पण तिथल्या शिड्या गायब होत्या, भूगर्भीय हालचालींमुळे हे व्हेंटिलेशन शाफ्टही तिसऱ्याच दिवशी बंद झाले. रेस्क्यू पार्टीने स्प्रे पेंटने मार्किंग केलेल्या खडकाचे निरीक्षण केले असता त्यांच्या हेही लक्षात आले की, खडक आणखी काही फूट खाली सरकला होता. अशा अस्थिर परिस्थितीमध्ये आणखी कोणतेही साहस न करता त्यांनी शेल्टरमध्ये राहणे पसंत केले.

शेल्टरचे ठिकाण कळताच मदतकार्य जोमाने सुरू झाले.

हे 'शेल्टर' म्हणजे ५५० स्क्वेअर फुटाची एक मोठी खोली होती, त्या खोलीबरोबरच दोन किलोमीटरचा एक रस्ताही मोकळा होता. रेस्क्यू पार्टीने जलदगतीने हालचाली करून या परिसरात अनेक ड्रिल्स पोहोचवली.

एका ठिकाणाहून सप्लाय लाईन सुरू केली गेली. रेफ्रीजरेटेड ऑक्सीजनचा पुरवठा सुरू झाला. त्यामुळे आतले तापमान थोडे उतरवून कामगारांचे तिथले आयुष्य सुसह्य होण्यास मदत झाली. आणखी एका लाईनमधून अन्न, पाणी, संदेश देवाणघेवाण सुरू झाली. एक ऑप्टिकल केबलही खाली सोडली. फोन कनेक्शन जोडले, खाणमंत्री लॉरेन्स गॉलबोर्न आणि बाकी लोक आतुरतेने वाट बघत होते.. रिंग वाजली आणि एक कामगार फोनवर बोलू लागला. त्याने सर्व परिस्थिती विशद केली. सर्व जण ठीक आहेत, याची खातरी पटली. सगळीकडे एकच जल्लोष झाला. १७ दिवसांनंतरच्या झालेल्या पहिल्यावाहिल्या संभाषणाचा शेवट सर्व खाणकामगारांनी मिळून चिलीचे राष्ट्रगीत गाऊन केला. कामगारांच्या या उत्स्फूर्त कृतीमुळे सर्व जण हेलावून गेले. वरती अनेकांना भावना अनावर झाल्या.

यथावकाश व्हिडिओ कॅमेरा खाली सोडला गेला. सर्व जण आतुरतेने पहिल्या दृश्याची वाट बघत होते. अचानक एक कृश, गबाळा, दाढी वाढलेला पण तरतरीत डोळ्याचा असा एक हसतमुख चेहरा समोर आला. पुन्हा जल्लोश झाला. उपासमारीने कृश झालेले, दाढी वाढलेले, घामेजलेले, उघडेवाघडे आणि तरीही आशा टिकवून असलेले असे कामगार संपूर्ण जगाने पाहिले. १७ दिवस कोणत्याही भवितव्याशिवाय जगूनही त्यांनी हार मानली नव्हती, कामगार अत्यंत धीरोदात्तपणे कॅमेऱ्याला - जगाला सामोरे आले.

जग या क्षणाची आतुरतेने वाट बघत होते.

खाणीमधील दृश्ये.










वरून शोधकार्य चालू असताना सुरू असलेले खोदकाम कामगार ऐकत होते. आज ना उद्या ड्रिल आपल्यापर्यंत पोहोचणार याची जाणीव झाल्यावर त्यांनी मदतीसाठी संदेश लिहिले, महत्त्वाची माहिती लिहून काढली आणि हे सर्व वरती पोहोचविण्यासाठी चिकटपट्टीपासून सगळ्याची जय्यत तयारी केली. ड्रिल त्यांच्या ठिकाणी पोहोचल्यानंतर चपळाईने ड्रिल शाफ्टला हा सगळा जामानिमा चिकटवला. त्या परिस्थितीतही कामगारांनी केलेले विचार, कृती आणि दाखवलेले धैर्य वाखाणण्याजोगे होते.

कामगारांचा ठावठिकाणा कळल्यानंतर आता सुटकेचे प्रयत्न सुरू झाले. कामगारांची झालेली उपासमार लक्षात घेता सप्लाय लाईनमधून फक्त द्रवरूप आहार पाठवण्यास सुरुवात झाली.

सुटकेचा अंतिम आराखडा तयार झाला आणि सर्व जण पुन्हा चिंतेत पडले. या सुटकेसाठी तब्बल ४ महिने लागणार होते. अस्तित्वात असलेली ड्रिल मोठी करून व त्यातून एक माणूस मावू शकेल इतकी मोठी कॅप्सूल जाईल इतका मोठा आरपार बोगदा तयार करावा लागणार होता, दरम्यान होणाऱ्या भूगर्भीय हालचालींचा सामना करण्यासाठी या संपूर्ण उभ्या बोगद्याला आतून एक तितक्याच मोठ्या स्टील पाईपचा थर द्यावा लागणार होता. या सर्व कामासाठी साधारणपणे चार महिने लागणार होते.

सुटकेचा अंतिम आराखडा




सुटकेसाठी लागणाऱ्या वेळाची कामगारांना माहिती द्यावी की नाही, त्यांची प्रतिक्रिया काय असेल यावरही विचार केला गेला आणि तिसऱ्या दिवशी स्वतः खाणमंत्र्यांनी कामगारांना या परिस्थितीची जाणीव करून दिली. हे सगळे आधीच माहिती असल्याप्रमाणे कामगारांनी याही बातमीचे आश्चर्यकारकरीत्या हसतमुखाने स्वागत केले.

कामगारांना सप्लाय लाईनमधून अन्न आणि पाण्याबरोबर आता नातेवाइकांची पत्रेही मिळू लागली.

पत्रामध्ये कामगारांचे मनोधैर्य टिकून राहण्यासाठी मजकूर कशा प्रकारे लिहावा, मनोबल आणि विजिगीषू वृत्तीला धक्का पोहोचणार नाही याची काळजी कशी घ्यावी, याचे धडे तज्ज्ञ सायकॉलॉजिस्टकडून नातेवाइकांना मिळू लागले. चिली सरकारने 'नासा'कडून एका लाँग टर्म आयसोलेशन स्पेशालिस्ट टीमला बोलावून घेतले. पाणबुड्या, अवकाशयान वगैरे ठिकाणी असणारी परिस्थिती दुर्दैवाने या खाणीमध्ये तयार झाली होती. कामगारांना बरेच महिने एकत्र काढावे लागणार होते आणि यादरम्यान होणाऱ्या सुटकेच्या सर्व प्रयत्नांच्या यशासाठी कामगारांच्या सहकार्याची नितांत गरज होती.

रात्रंदिवस अव्याहतपणे सुरू असलेले मदतकार्य.




खाणीमध्ये अडकलेल्या कामगारांनीही सैनिकांप्रमाणे शिस्तीचा दिनक्रम आखून घेतला होता. सुरुवातीचे १७ दिवस संपर्क होईपर्यंत, मर्यादित खाद्यपदार्थांचा साठा असताना सर्व कामगार अक्षरशः उपासमार सहन करत होते. प्रत्येक कामगार एक चमचा ट्युना मासा, दुधाचा एक घोट आणि बिस्किटाचा एक तुकडा दर दोन दिवसांनी खात होता. कामगारांची झालेली ही उपासमार लक्षात घेता, सतराव्या दिवशी संपर्क प्रस्थापित झाल्यानंतर सप्लाय लाईनमधून सुरुवातीला फक्त द्रवरूप आहार पाठवण्यास सुरुवात झाली. सुरुवातीला ५०० कॅलरी असणारा आहार हळूहळू १००० व नंतर २००० कॅलरीच्या पुढे नेला. १७ दिवसांच्या उपासामुळे कामगारांची पचनसंस्था नाजूक झाली होती व घन अन्नपदार्थ स्वीकारण्याची क्षमता कमी झाली होती. प्रचंड उपासमारीनंतर, अचानक जड अन्न खाल्ल्यामुळे आजारी पडण्याची / मृत्यू होण्याची शक्यता गृहीत धरून सर्व प्रकारे काळजी घेतली जात होती.

कामगारांची तब्येत हळूहळू सुधारत होती. या दरम्यान एक मजेशीर घटना घडली. कामगारांना लिक्विड डाएटवरून सॉलिड डाएटवर आणून बरेच दिवस झाले होते व सप्लाय लाईनमधून नेहमीचे जेवण पुरवले

जात होते. जेवणातले एक ‘डेझर्ट’ अचानक परत आले, कारण त्या कामगाराला ‘ते डेझर्ट आवडले नाही’. हे कळताच वरती असलेले अधिकारी सक्रीय झाले व तेच डेझर्ट पुन्हा त्याच कामगाराला परत पाठवले व सोबत एक निरोपही पाठवला, "आहे हे असे आहे आणि इथे राहून आम्ही शक्य ते सर्व करीत आहोत". (रोज पुरवल्या जाणाऱ्या जेवणावरही नंतर नंतर मर्यादा आणली गेली; कारण काही धष्टपुष्ट कामगारांचे वजन वाढले तर ते कॅप्सूलमध्ये शिरू शकणार नाहीत, अशी काही अधिकाऱ्यांना भीती वाटू लागली.)

कामगारांनी त्यांचा शिस्तीचा दिनक्रम आणखी शिस्तबध्द केला. शेल्टरमध्ये आणि बोगद्यामध्ये एक वेगळा डायनिंग एरिया तयार केला, वेगळा मेडिकल एरिया तयार केला, प्रसाधनासाठी जागा तयार केली. कामगारांनी आपल्यातून ११ जणांचा एक असे तीन गट तयार केले. प्रत्येक गट सकाळ, दुपार आणि रात्र अशा ‘शिफ्ट्स’ करू लागला. प्रत्येक गट वेगवेगळ्या ठिकाणी झोपत होता, विश्रांती घेत होता आणि काम करत होता. प्रत्येक शिफ्टकडे महत्त्वाचे काम होते, ते म्हणजे सप्लाय लाईन सांभाळणे. या सप्लाय लाईनमधून कामगारांसाठी स्लीपिंग बॅग्ज, प्रोजेक्टर पाठवले. वेगवेगळ्या मूव्हीज, टीव्ही शो वगैरेंनी कामगार आपली करमणूक करू लागले. कामगारांकडूनच आजारी कामगारांची व्यवस्थित काळजी घेतली जात होती व बंदिस्त जागेत संसर्ग पसरला जाणार नाही याचीही खबरदारी घेतली गेली. प्रत्येक कामगाराच्या अंगावर इलेक्ट्रॉनिक मॉनिटर्स चिकटवले होते, ज्याद्वारे भूपृष्ठावरून डॉक्टरांची एक टीम कामगारांच्या तब्येतीकडे बारकाईने लक्ष ठेवून होती. वेळोवेळी औषधे, प्रतिजैविके, लसी खाली पाठवल्या जात होत्या. तशा परिस्थितीतही सर्व जण स्वतः तयार केलेले सर्व नियम न चुकता पाळत होते.

चिलीयन खाणकामगारांची सुटका हा आता संपूर्ण जगाच्या जिव्हाळ्याचा मुद्दा झाला होता. या ३३ जणांच्या आत्तापर्यंतच्या प्रेरणादायी प्रवासाला सलाम करत संपूर्ण जगभरातून खाण क्षेत्रातील तज्ज्ञ, ड्रिलिंगचे तज्ज्ञ, महाकाय ड्रील मशीन वापरणाऱ्या कंपन्या, वेगवेगळे डॉक्टर्स, धर्मगुरू, मानसोपचार तज्ज्ञ... सर्वांनी आपापल्या क्षेत्रातील मदत देऊ केली. चिली सरकारने कोणताही अनमान न बाळगता ही मदत स्वीकारली आणि या सर्व तज्ज्ञांना संपूर्णपणे सहकार्य केले. ऑस्ट्रिया, कॅनडा, कोरिया, जपान, सिंगापूर, अमेरिका आणि दक्षिण आफ्रिका या देशांनी संपूर्ण घटनाक्रमात महत्त्वाची भूमिका बजावली.

चिली सरकारने संपूर्ण परिस्थितीची अत्यंत बारीकसारीक माहिती जमवली होती आणि ती अत्यंत सुटसुटीतपणे साठवून ठेवली होती. कोणत्याही क्षेत्रातल्या तज्ज्ञाला सर्वप्रथम आवश्यक ती माहिती देऊन नंतर प्रत्यक्ष काम सुरू केले गेले. या प्रत्येक तज्ज्ञाबरोबर चिलीचे प्रतिनिधी कायम उपलब्ध होते. या घटनेमधला अत्यंत महत्त्वाचा घटक होता ‘वेळ’. तो वाया जाऊ नये, म्हणून प्रत्येक जण धडपडत होता.

भूपृष्ठापासून शेल्टरपर्यंत मोठे ड्रिल करण्यासाठी एकूण तीन प्लॅन बनवले गेले. प्लॅन A, प्लॅन B व प्लॅन C. खाणीचे १२१ वर्षांचे आयुर्मान पाहता आणखी खडक कोसळून एखादा प्लॅन बारगळला तर पुन्हा पहिल्यापासून सुरुवात करायला लागू नये, म्हणून तीन प्लॅन बनवले गेले व टप्प्या टप्प्याने सुरू केले.

-----प्लॅन A-----

Strata 950 - जमिनीमध्ये सरळ ९० अंशामध्ये ड्रिल करणे




Strata 950 हे ड्रील वापरून रेस्क्यू प्लॅनची सुरूवात झाली. Murray & Roberts या साऊथ अफ्रिकन कंपनीच्या मालकीचे हे ड्रील, सुरुवातीला एक पायलट होल करून नंतर त्याच्या आजूबाजूच्या खडकामध्ये ड्रिल करून हवा असणारा उभा बोगदा करण्यासाठी उपयोगी पडणारे होते.

-----प्लॅन B----- जमिनीमध्ये सरळ ८२ अंशामध्ये ड्रिल करणे




Schramm Inc. T130XD हे ड्रिल एका चिलीयन कंपनीच्या मालकीचे होते, पण दुर्घटनेदरम्यान ते अमेरिकेत होते. अत्यंत तातडीने UPS कुरीयरच्या एका अजस्र विमानातून ते खाणीपाशी आणले गेले. या ड्रिलचे मुख्य काम होते, आधी पाडलेले एखादे होल कामगारांना वर आणण्यासाठी तयार केलेली कॅप्सूल जाईल इतके मोठे करणे.

या ड्रिलमुळे खडक कापताना त्याचे बारीक बारीक तुकडे खाली पडणार होते. खाली असलेल्या कामगारांना ते तुकडे वेळोवेळी हलवण्याच्या विशेष सूचना दिल्या गेल्या.या ड्रिलमुळे तासाला ५०० किलो या गतीने एकूण ७०० मेट्रीक टन खडक कामगारांनी रात्रंदिवस काम करून हलवला.

ड्रिलचा दर्शनी भाग मोडल्यामुळे व ड्रिल केलेल्या होलमध्येच अडकल्याने सर्व काम ठप्प झाले. वेगवेगळे उपाय वापरून हे ड्रिल काढले गेले, परंतु त्यादरम्यान अमूल्य असे पाच दिवस वाया गेले. प्लॅन A पेक्षा हे

ड्रिल जलदगतीने खोदकाम करू शकत होते.

सरतेशेवटी याच ड्रिलमुळे कामगारांची सुटका झाली.

-----प्लॅन C----- जमिनीमध्ये सरळ ८५ अंशामध्ये ड्रिल करणे




RIG-421 हे कॅनडामधील एका कंपनीने तयार केलेले अत्यंत शक्तिशाली ड्रील होते, परंतु याच्या डिझाईनमध्ये बऱ्याच गुंतागुंतीच्या गोष्टी होत्या व त्यामुळे हे ड्रील शक्तिशाली व वेगवान असूनही कूर्मगतीने खोदकाम करत होते.

सरतेशेवटी प्लॅन B यश मिळाले व शेल्टरपर्यंत कॅप्सूल जाईल इतके मोठे ड्रील करण्यात आले, तारीख होती ९ ऑक्टोबर २०१०.

भूपृष्ठाकडे येणाऱ्या कामगारांच्या प्रवासासाठी एका कॅप्सूलच्या डिझाईनमध्ये नासामधील बरेच तज्ज्ञ व्यस्त होते. सर्व शक्यतांचा आणि परिस्थितीचा विचार करून कॅप्सूलमध्ये असाव्यात अशा तब्बल ७५पेक्षा जास्त गोष्टींची १२ पानी यादी चिली सरकारकडे पाठवली. चिलीयन नौदलाने तातडीने एकसारख्या तीन कॅप्सूल तयार केल्या व त्यांचे नामकरण केले 'फिनिक्स'. २७०० फूट भूगर्भातून जमिनीवर येताना शरीरावर होणारे गुरुत्वाकर्षणाचे परिणाम, आजूबाजूच्या अस्थिर खडकाचे कॅप्सूलवर होणारे परिणाम वगैरे अनेक बारीकसारीक घटक लक्षात घेऊन हे कॅप्सूल तयार झाले. या कॅप्सूलला शक्तिशाली शॉक ॲब्सॉर्बरसह ८ चाके जोडली गेली, कामगारांना कॅप्सूलमध्येच ऑक्सीजन, व्हिडीओ कॅमेरा, फोन, सुरक्षिततेसाठी पट्टे, डोक्यासह डोळ्यांचे रक्षण करणारे हेल्मेट, पायांना खास आवरण यांमुळे कॅप्सूलमधून वर येताना कामगारांना कोणताही शारीरिक त्रास होणार नव्हता. कामगारांना खास गॉगलही दिले जाणार होते, ज्यामुळे प्रखर सूर्यप्रकाशाच्या अचानक सान्निध्यात येऊनही डोळ्यांवर दुष्परिणाम होणार नव्हता.

‘फिनिक्स’ कॅप्सूल.




९ ऑक्टोबरला ड्रिल पूर्ण झाल्यानंतर खडकाची व कॅप्सूलची चाचणी घेण्यात आणखी ३ दिवस गेले व १३ ऑक्टोबरला पहिला रेस्क्युअर फिनिक्समधून ‘शेल्टर’मध्ये उतरला. तत्पूर्वी लीडरने ३३ कामगारांना ३ गटांमध्ये विभागले होते. स्किल्ड, वीक आणि स्ट्रॉंग. वर येणारे पहिले चार कामगार स्किल्ड गटातले होते. कॅप्सूल परत येताना होणारा त्रास झाला तर तो सहन करण्याची त्यांच्यात शारीरिक, मानसिक क्षमता होती व त्यानुसार कॅप्सूलच्या रचनेत, प्रवासात आयत्या वेळी बदल केले जाणार होते. नंतर वीक गटातले कामगार वर येणार होते. सर्वात शेवटी स्ट्रॉंग कामगार. हे कामगार शारीरिकदृष्ट्या धडधाकट होतेच, मात्र हे मानसिक दृष्ट्याही धडधाकट होते. आपल्या सहकाऱ्यांच्या सुटकेदरम्यान त्यांनी कोणताही उतावळेपणा करून चालणार नव्हता. एखादी चूक, घाईगडबड, छोटासा अपघात ६९ दिवसांच्या अथक परिश्रमावर पाणी फेरण्यास पुरेसा होता.

नासाच्या आहारतज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार, सुटकेआधी ६ तास प्रत्येक कामगार संपूर्णपणे लिक्विड डाएटवर होता. साखर, पोटॅशिअम आणि मिनिरल्सचा अतिरिक्त डोस प्रत्येकाला दिला गेला. रक्ताच्या गुठळ्या होऊ नयेत म्हणून ॲस्पिरिन दिल्या गेल्या व प्रवासादरम्यान रक्तदाब स्थिर राहावा, याचीही काळजी घेतली गेली.

पहिला रेस्क्युअर खाली उतरल्यापासून २४ तासांच्या आत सर्व खाणकामगार बाहेर आले. एका खऱ्याखुऱ्या लीडरप्रमाणे खाणकामगारांचा लीडर 'लुई उर्झ्वा' शेवटी बाहेर पडला. एकूण ३३ कामगार व ६ रेस्क्युअर्सना घेऊन फिनिक्सने ३९ फेऱ्या मारल्या.

संपूर्ण चिलीमध्ये, जगभरामध्ये जल्लोष झाला.

मिशन ॲकंप्लीश चिली. (मिशन पूर्ण झाल्यानंतर खाणीमधल्या शेल्टरमध्ये फडकवला गेलेला झेंडा)




या घटनेच्या शेवटी ३३ जणांच्या नेत्याने चिलीच्या नेत्याशी (राष्ट्रपतींशी) साधलेला संवाद मन हेलावून टाकतो.

(Leader) Luis Urzúa : "I've delivered to you this shift of workers, as we agreed I would".

(The President) Sebastián Piñera : "I gladly receive your shift, because you completed your duty, leaving last like a good captain. You are not the same after this, and Chile won't be the same either!"

३३ कामगारांच्या सुटकेबरोबर हा अध्याय संपला नाही, संपणारही नाहीये. भूगर्भात असताना या सगळ्यांच्यात दिसून आलेली एकीची भावना नंतरही टिकून राहिली. या घटनेचे पडसाद नंतरही उमटत राहिले. या ३३ जणांना जगभरात अचानक, अनपेक्षित प्रसिद्धी मिळाली. प्रसिद्धीला सामोरे जातानाही या कामगारांनी विलक्षण प्रगल्भता दाखवली. स्वतःच्या सुटकेपुरता आनंद न मानता, खाणव्यवसायात असलेल्या धोकादायक स्थितींमध्ये सुधारणा घडवण्यासाठी या अनुभवाचा उपयोग करण्याचे त्यांचे प्रयत्न आहेत.

एक होऊन निधड्या छातीने या दुर्घटनेला सामोरे जाणारे हे सगळे आज दंतकथा बनले आहेत.

फक्त चिलीच्या नव्हे, तर जगाच्या इतिहासात ही घटना माणसाच्या अढळ विश्वासाचं आणि जगण्याच्या मूलभूत, चिरंतन प्रेरणेचं प्रतीक बनून राहील - कायमस्वरूपी.

# परी टॅक्सिडर्मीरूपे उरला

सुधांशुनूलकर.

दसऱ्याचा दिवस. सूर्योदयाची वेळ. रोजच्यासारखा प्रभातफेरीसाठी निघालो होतो. एका सोसायटीच्या दारातल्या दोन सप्तपर्णी भरघोस फुलल्या होत्या, गालिचा अंथरल्यासारखा रस्त्यावर फुलांचा सडा पडला होता आणि फुलांचा उग्रसा गंध दरवळत होता. तो गंध मनात दरवळत असतानाच रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला माझं अचानक लक्ष गेलं. रस्त्याच्या कडेला साळुंकीएवढा एक पक्षी उताणा पडलेला दिसला. जवळ जाऊन बघतो, तो आमचा लाडका, परिचित पक्षी नवरंग ऊर्फ पिट्टा (Indian Pitta) अचेतन अवस्थेत पडला होता. त्याला बघितल्यावर एकदम फ्लॅशबॅकमध्ये २००५ सालात गेलो.



२००५मधली मे महिन्यातली एक टळटळीत दुपार होती. कामात असतानाच चेंबूरहून एका मित्राचा फोन आला की इथे भर बाजारात एक निराळाच पक्षी जखमी अवस्थेत जमिनीवर आहे, त्याला उडता येत नाहीये आणि त्याला 'मुंबईचे कावळे' चोच मारून भंडावून सोडत आहेत. पक्ष्याच्या वर्णनावरून त्याची ओळख पटली. तो नवरंग (पिट्टा) होता. मग मित्राला दिलेल्या सूचनांप्रमाणे त्याने जवळच्याच एका दुकानातून एक खोका मिळवून त्यात त्या पक्ष्याला घालून घरी आणलं होतं. प्राण्यांच्या डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्याच्यावर उपचार सुरू केले होते आणि आठवडाभराने तो बरा झाल्यावर त्याला विक्रोळीच्या गोदरेजच्या तिवराच्या जंगलात सोडून दिलं होतं. हे सर्व एका दैनिकात सविस्तर छापून आलं होतं आणि आम्ही एकदम प्रसिद्ध झालो होतो.

यानंतर पिट्ट्याशी आमचे जणू ऋणानुबंध जुळले. दर वर्षी मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात चेंबूरमध्ये पिट्टा दिसत राहिला. याचं कारण, हिमालयाच्या तळटेकड्यांच्या थंडगार परिसराचा हा रहिवासी. दिवाळीनंतर तिथे थंडी पडायला सुरुवात झाली की अन्नाची टंचाई जाणवायला लागते. मग तो दक्षिणेकडे स्थलांतर करतो. तीनचार महिने दक्षिणेत राहून, वसंत ऋतू सुरू झाला की परत उत्तरेकडे स्वगृही परततो. तिथे पावसाळ्यात (जून-ऑगस्टमध्ये) त्याची वीण होते. आणि पुन्हा थंडी सुरू झाली की दक्षिणेकडे पुन्हा स्थलांतर करतो, असं हे स्थानिक स्थलांतराचं चक्र. मेमध्ये स्वगृही परतताना तो मुंबईमार्गे जात असावा, आणि विश्रांती-अन्न-पाण्यासाठी मुंबईस थांबत असावा, चेंबूर हा हिरवागार परिसर (ग्रीन झोन)

असल्यामुळे चेंबूरमध्ये उतरत असावा, आणि आम्हाला दिसत असावा. प्रत्येक वेळी जखमी (कावळ्यांनी चोची मारल्यामुळे), निर्जलीकरणामुळे तहानलेल्या, भुकेजलेल्या, थकलेल्या, भरकटलेल्या अवस्थेत मिळत असे. त्याच्यावर उपचार करून बरा झाल्यावर विक्रोळीला सोडून देत असू. या वर्षी असं पहिल्यांदाच झालं, की तो ऑक्टोबरमध्येही दिसला.

नवरंग या नावाप्रमाणे खरोखर नऊ रंग ल्यालेला, अत्यंत सुंदर. मुख्यत: कीटकभक्षी. जमिनीवर, झाडावर उड्या मारत कीटक टिपणे हा त्याचा उद्योग.





फ्लॅशबॅक संपला. या नवरंगाला एका कागदात गुंडाळून घरी आणलं आणि हवाबंद पिशवीत घालून डीप फ्रीझरमध्ये ठेवून दिलं. आता याचं काय करावं? एखाद्या कॉलेजच्या जीवशास्त्र विभागाला द्यावं का? आणि लख्खकन् एक कल्पना सुचली. काही महिन्यांपूर्वी एक बातमी वाचली होती, महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या राजभवनातला, राज्यपालांचा अत्यंत लाडका मोर मृत्यू पावल्यावर एका डॉक्टरांनी त्याच्यावर प्रक्रिया (टॅक्सिडर्मी) करून राजभवनात परत नेऊन ठेवला. म्हणजे, त्याला एक प्रकारे संजीवनी दिल्यासारखंच झालं. आपल्या या पिट्ट्यालाही अशीच संजीवनी देता येईल का? मग थोडं गुगलून पाहिल्यावर काही माहिती मिळाली.

मुंबईच्या पशुवैद्यकीय महाविद्यालयात पशू शरीररचनाशास्त्र (व्हेटर्नरी ॲनाटॉमी) विभागात सहयोगी प्राध्यापक असलेले डॉ. संतोष गायकवाड हे भारतातले या क्षेत्रातले (एकमेव) प्रशिक्षित आणि अनुभवी व्यक्ती (टॅक्सिडर्मिस्ट) आहेत. थोड्या प्रयत्नांती त्यांच्याशी संपर्क झाला. त्यांनी पिट्ट्यावर प्रक्रिया करायचं आनंदाने मान्य केलं. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे, या प्रक्रियेनंतर तो आता पुढची ५० वर्षं तरी लोकांना बघायला मिळेल. लोकशिक्षणासाठी त्याचा खूप उपयोग होईल. एका अर्थाने त्याला एक नवजीवन, संजीवनी, एक नवी ओळखच मिळेल. 'आमचा' पिट्टा टॅक्सिडर्मीरूपे उरेल.

वन विभागाने संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात डॉ. संतोष गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली एक टॅक्सिडर्मी सेंटरही सुरू केलं आहे. तिथे आज अनेक प्राणी-पक्षी जतन केलेले दिसतात. त्यामध्ये आता या पिट्ट्याचीही लवकरच भर पडेल.

# तेव्हा भेटूच.

सोनल कर्णिक वायकुळ

रसरशीत तापलेल्या सोनेरी झळीतल्या आणि
ओल्या निसरड्या फसव्या घळीतल्या

कात टाकणा-या रंगीत पानगळीतल्या आणि
गर्दीने नटलेल्या बाजारातल्या आळीतल्या

निरव चांदण्यात निपचित पहुडलेल्या आणि
काळ्याभोर रेषेत क्षितीजाला भिडलेल्या

सगळ्या सगळ्या वाटांवरून सोबत चालतानासुद्धा
वाट बघण मात्र संपत नाही
मी तुझी, तू अजून कुणाची...

पण या सगळ्या वाटा मिळतात तिथे त्या मुक्कामाला
मला खात्री आहे,
मीच पोचेन तुझ्या आधी, आणि तुही येशीलच कधीतरी

तेव्हा भेटूच.


# रिकामपणाचे उद्योग

मस्त कलंदर

कॉलेजमध्ये कुणीतरी एक लेटरपॅड विसरून गेलं होतं. गुलबट-बदामी पानं आणि खालच्या कोपऱ्यात दोन-तीन चित्रे थोड्या थोड्या अंतराने आली होती. त्यातलं एक चित्र जाम आवडलं होतं म्हणून त्याचं एक पान मी फाडून घरी आणलं. तीन-चार वर्षे तशीच गेली. मध्येच मी माझा पहिला वहिला बाऊल रंगवला, त्यानंतरही ग्लास पेंटिंग केलं आणि मग या बाईला पेंट करावं अशी मनानं उचल खाल्ली. माझ्या घरातल्या स्वयंपाक घरात उघडणारा हॉलचा दरवाजा भिंतीच्या मधोमध आहे. तेव्हा दोन्ही बाजूला काहीतरी पेंट करून लावल्यास छान दिसेलसं वाटलं. साधारण प्रमाण पाहता ए३ हा आकार चांगला दिसेलसं माझं मीच ठरवलं. बरेच सव्यापसव्य करून ते दीड इंच बाय तीन इंचाचं चित्र आधी ए४ आणि नंतर ए३ मध्ये एका कागदावर छापून आणलं. पण तेही नंतर लहान वाटलं म्हणून कसंबसं ए२ आकारातलं रेखाचित्र जमवलं. तरीही कितपत जमेल असा आत्मविश्वास नसल्यानं आधी एका ट्रान्सपरन्सीवर रंगीत तालिम घेतली आणि किमान 'हे जमू शकेल' असं म्हणून स्वत:चीच पाठ थोपटून घेतली.

पहिली पायरी: जीटी मारणे (पक्षी: ग्लास ट्रेसींग). इंजिनिअरिंगला असताना कधी न करावा लागलेला प्रकार आता मी सहज करते!

हे चित्र पूर्णपणे ट्रेस करायला साधारण दोनेक तास लागले.



पृष्ठभाग बाऊलसारखा गोलाकार नसल्याने रंग ओघळणं ही अडचण नव्हती. फक्त रंगांच्या बुडबुड्यांनी तोंडाला फेस आणला. हे पहिलं पूर्ण चित्र.



नीट जमत आलेलं काम बिघडवण्याची माझी परंपरा यावेळीही खंडित झाली नाही. काही ठिकाणचा रंग तुलनेने पातळ वाटत होता म्हणून मी रात्री झोपायला जाताना आणखी एक रंगाचा थर दिला. सकाळी उठून पाहते, तर खालचा रंग फाटून सगळं चित्र अगदी चित्रविचित्र झालं होतं. आधी चुकचुक, मग नेहमीप्रमाणेच "कशी मला दुर्बुद्धी झाली?", "आता काय करू" वगैरे नेहमीची पालुपदे आळवून झाल्यावर पुन्हा एकदा नेहमीप्रमाणेच झाला पराक्रम निस्तरायला स्वारी सज्ज झाली. एका बोथट चाकूने तो फाटलेला रंगाचा भाग वरच्यावर कापला, काही ठिकाणचं बाजूचं काळ्या रंगाचं रेखाटनही 'तेरा मेरा साथ रहे' म्हणत सोबत निघून आलं. लगोलग 'जालिम जमाना' बनत त्यांचा साथ मी तिथंच कापून टाकला. मग, आधी रेखाटनाची दुरूस्ती केली. फाटलेला नारिंगी रंग संपला होता म्हणून तिथे आता चॉकलेटी रंग देऊन टाकला. आणि "लहान मुलं असतील नसतील तेवढे सगळे रंग वापरतात तसं माझं चित्र वाटत नाहीय. ना?" असं म्हणून नकारार्थी उत्तराला जराही वाव न ठेवता निखिलकडून "चित्र चांगलंच झालंय" अशी पावती घेतली.

इतके दिवस मला काही फ्रेम करून घेण्याची गरज पडली नव्हती. त्यामुळं आता फ्रेम करणारं माणूस/बाईमाणूस शोधणं आलं. मध्येच एकदा खरडाखरडीत 'मिसळलेल्या काव्यप्रेमी'च्या खव मध्ये मी ट्रान्सपरन्सीचा फोटू डकवून आले होते. तो पाहून लीमाऊजेट्ने "ही हेदर ना गं?" असा प्रश्न विचारून पुढे याच्या पार्श्वभूमीवर इजिप्तमध्ये पपायरस/पॅपीरस नावाचा गवतापासून बनवलेला हातकागद वापरतात असं सांगितलं. आतापर्यंत ही चित्रातली बाई कोण याचाही गंध नव्हता, पण अज्ञान उघड होऊ नये म्हणून

तिला "हो..हो" केलं. अधिक शोभा नको म्हणून आता त्या मेल्या 'पपायरस' सदृश्य काही मिळवायचा प्रयत्न चालू केला. जुन्या काडाच्या चटया सहसा मिळण्यासारख्या नव्हत्या आणि अधिक त्रास घेणं माझ्या आळशीपणाला मानवणारं नव्हतं. म्हणून मग मूळ योजनेबरहुकूम मी हातकागद शोधायला लागले. हेदर जणू माझ्यावर प्रसन्न झाली आणि मला चटईसारखा दिसणारा हातकागद मिळाला. हुश्श. आता सुटले म्हणेतोवर जो मला फ्रेम करणारा भेटला तो फक्त सकाळी ११ ते १२:३० व संध्याकाळी ६:३० ते ७:३० असं हौशीखातर काम करणारा महाभाग. त्याने पुढे त्याच्या व्यवसाय धर्माला जागून मी निवडलेली फ्रेम न लावता दुसरीच कुठलीशी फ्रेम लावली. सुदैवाने तीही जरा बरी होती.



हेदर:

आता मला दुसऱ्या बाजूची फ्रेम करायची होती. आता हेदरबाईंमुळे दुसऱ्या बाजूलाही कुणीतरी इजिप्शियन सोबत आणावी असं वाटत होतं. होता होता तुतनखामेनचा बळी घ्यायचं ठरवलं. दरवाजाच्या दोन्ही बाजूंचं सारखेपण जपायचं असल्यामुळं जर लवकर चित्र दिलं नाही तर तशीच फ्रेम पुन्हा मिळणार नाही असं त्या फ्रेमवाल्यानं सांगितलं. हे त्याचं पुढचं काम मिळवण्याचं गिमिक असू शकेल असं वाटूनही मी धोका पत्करायला तयार नव्हते. आणि नुसत्या काचेच्या आकाराने तो मापं घ्यायला आढेवेढे घ्यायला तयार नव्हता. अशा वेळेस जे होतं तेच झालं. तयार होता होता पुन्हा एकदा ९८% तयार झालेलं चित्र बिघडलं.

त्यानंतर आठवडाभर आम्ही गावी चाललो होतो. आता " जे व्हायचे ते होऊ दे" असं म्हणून फ्रेम-सारखेपणा-आणि जे जे काही असेल ते गेलं खड्ड्यात म्हणून सरळ त्या बिघडलेल्या तुतनखामेनकडे तुच्छ कटाक्ष टाकून आम्ही घराबाहेर पडलो. तसंही या चित्रापायी "हा बाई का बुवा जे काही आहे ते जरा इथून हलव" असले शब्द ऐकून मला या चित्राचाच कंटाळा आला होता.
परत आल्यावर नव्याने तयारीला लागले. आधी चाकूने रंग-रेखाटने कापून आणि त्यातल्या दाद न देणाऱ्याला भागाला मस्तपैकी भांडी घासण्याच्या उपकरणांनी घासून काच पुन्हा पहिल्यासारखी केली. सुदैवाने किंवा जे काही असेल त्याप्रमाणे तशीच बाजूची फ्रेम मिळाली आणि एकदाचे तुतनखामेनोबा घरी आले.



या दोघांची स्थापना करून वर्ष उलटून गेलं आहे. दिवाळीनिमित्त काही वेगळ्या प्रकारातले कंदिल पाहून आणि माझी रंगांची आवड पाहून एका मित्राने मला असले पाच कंदिल आणून दिले. त्यातला एक अजून रंगवला नाहीय, दुसऱ्यावरचं चुकलेलं रंगकाम मी अजून दुरूस्त करतेय. हे बाकीचे तीनः







याने खूपच जास्त वेळ घेतला.



**ग्लास पेंटिंग करताना मला गवसलेली विचारमोत्ये:**

१. सराव म्हणून बाऊल सारखा आकार न घेता सपाट पृष्ठभाग घेतल्यास बरे.

२. चित्रात एखादा आकार खूपच मोठा असल्यास एकीकडचा रंग देऊन दुसरीकडे जाईपर्यंत आधीच रंग वाळतो आणि नंतर मग डाग दिसू लागतात. उदा. तुतनखामेनचा चेहऱ्याचा आणि मानेचा भाग. ते टाळण्यासाठी काही करता येत नाही; हात जरा भराभर चालवावा.

३. चित्र बिघडल्यास जास्त घाबरू नये, सरळ निघेल तितका रंग बोथट चाकूने काढून भांडे/काच घासून घ्यावे. काच चांगल्या प्रतीची असल्यास काही फरक पडत नाही. नसेल, तर काचेचा घासलेला भाग खरबरीत तर न घासलेला गुळगुळीत असं खूपच चिवित्र दिसतं. अशा फालतू संकटांनी डगमगून न जाता आधीचं डिझाईन रद्दबातल करून त्याठिकाणी *चित्रविचित्र दिसणारे मॉडर्न आर्ट काढावे. पाहणाऱ्यास आपण चतुरस्त्र आहोत आणि सगळ्या कलाप्रकारात आपणांस रूची आहे असे वाटते. त्यानंतर उगीच खुलासे करून 'झाकली मूठ' उघडण्याचा प्रयत्न करून नये.

४. इथे ठरवून या प्रकारचे डिझाईन काढले आहे. सध्याचा दुरूस्त करत असलेला कंदिल पूर्ण झाला की नक्की एन्ड प्रॉडक्ट कसे होते ते इथेच सांगेन.

४. हे तसे बरेच वेळखाऊ काम असल्याने विरंगुळा म्हणून "सीआयडी" ही मालिका टीव्हीवर लावावी. टीव्हीकडे न पाहताही आख्खा इपिसोड झक्कास कळतो. आणि छान मनोरंजन होते.

उदा. "दया, ये आदमी यहाँ क्यूं खडा है?"

"हाँ सर, ये आदमी बसस्टॉपपे क्यूं खडा है?"

"अभिजीत, देखो उसके हाथ में ब्राऊन कलरका लिफाफा है."

"हां सर, कितना बडा लिफाफा है, ऑर उसमें कुछ रखा भी है"


" ये यहाँ पिछले दस मिनिटसे खडा है"

"देखो दया , एक नीले रंगकी बस आ रही है"

"हां सर, ये नीली बस तो इसी आदमी की तरफ आ रही है"

"देखो, ये तो बसमें चढ गया"

५. मिपावरती लेख नाहीतर गेलाबाजार किमान फेसबुकावरतरी म्हणून फोटो डकवून लोकांकडून 'चान चान' म्हणून घ्यावे



# अमेरिकन राजकारणातील वर्णभेद

नंदन

चार वर्षांपूर्वी बराक ओबामांची अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी निवड झाल्यानंतर प्रसारमाध्यमांतील अनेकांनी अमेरिकन राजकारणातील वर्णभेद संपुष्टात आल्याचं मोठ्या आनंदाने जाहीर केलं. कृष्णवर्णीयांना समान हक्क मिळवून देण्याच्या चळवळीतला हा एक महत्त्वाचा टप्पा असला, तरी यामुळे वर्णभेदाच्या विखारी प्रवेशावर कायमचा पडदा पडला असं म्हणता येईल का? याचं उत्तर देण्यापूर्वी वर्णभेदाचे अमेरिकन राजकारणात आजवर जे पडसाद उमटत आले आहेत, त्यांचा मागोवा घेणं आवश्यक ठरेल.

गुलामगिरी आणि तदनुषंगिक व्यापाराच्या मुद्द्यांवरून सुमारे दीडशे वर्षांपूर्वी अमेरिकेच्या उत्तर भागांतील राज्ये आणि दक्षिणेतली राज्ये यांच्यात यादवी युद्ध झाले आणि गुलामगिरीच्या विरोधात असलेल्या उत्तरेतल्या राज्यांनी दक्षिणेचा पराभव करून निदान कागदोपत्री तरी गुलामगिरी बेकायदेशीर ठरवली, हा इतिहास तसा सर्वज्ञात आहे. मात्र अमेरिकेच्या इतिहासात ज्याला सर्वात महत्त्वाचे स्थान आहे, अशा ह्या यादवी युद्धानंतरही राजकारणात आणि रोजच्या सर्वसामान्य जीवनात कृष्णवर्णीय गुलामांच्या आयुष्यात जितका फरक पडणं अपेक्षित होतं, तितका पडला नाही.

रिपब्लिकन पक्षाचा द्रष्टा, उदारमतवादी अध्यक्ष अब्राहम लिंकन हा यादवी युद्धातील यशामागचा सूत्रधार होता. युद्धाच्या विरोधात असणाऱ्या डेमोक्रॅटिक पक्षातल्या काही गटांना हाताशी धरून पुन्हा सत्तेवर आलेल्या लिंकनची १८६५ साली हत्या झाल्यावर डेमोक्रॅट अँड्र्यू जॉन्सन सत्तेवर आला. ज्यांची कारकीर्द ऐतिहासिकदृष्ट्या सर्वात हानिकारक ठरली, अशा राष्ट्राध्यक्षांचा जर क्रम लावायचा झाला तर त्यात अँड्र्यू जॉन्सनचा क्रमांक फार वरचा लागेल.

'रिकन्स्ट्रक्शन इरा' अर्थात यादवी युद्धानंतर दुभंगलेल्या राष्ट्राच्या पुनर्बांधणी युगात म्हणजे साधारण १८६५ ते १८७७ या वर्षांत कृष्णवर्णीयांना समान हक्क मिळवून देण्यासाठी काही कायदेशीर प्रयत्न नक्कीच केले गेले. गुलामगिरी बेकायदेशीर ठरवणारी तेरावी घटनादुरुस्ती; समान नागरिकत्वाचे हक्क देणारी चौदावी घटनादुरूस्ती आणि मतदानाचा हक्क सर्वांना देणारी पंधरावी घटनादुरुस्ती हे महत्त्वाचे बदल याच काळातले. मात्र यादवी युद्धात हार पत्करावी लागूनही दक्षिणेतली जनता कृष्णवर्णीयांना समान नागरी हक्क देण्याच्या मनःस्थितीत नव्हती. १८६६ नंतर टेक्ससपासून वर्जिनियापर्यंत जवळजवळ सर्वच राज्य सरकारांनी कुप्रसिद्ध 'ब्लॅक कोड्स' पारित करून कृष्णवर्णीयांचं समाजातलं दुय्यम स्थान कायम राहील, याची दक्षता घेतली.

गुलामगिरीविरोधातल्या चळवळीने केलेल्या थोड्याफार प्रगतीवर बोळा फिरवणाऱ्या ह्या कायद्यांकडे राष्ट्राध्यक्ष अँड्र्यू जॉन्सनने कानाडोळा केला. १८७६ साली उदारमतवादी रिपब्लिकन रदरफोर्ड हेज राष्ट्राध्यक्ष झाला खरा, पण तो अतिशय वादग्रस्त पद्धतीने. त्या निवडणुकीत त्याला एकूण मतांपैकी फक्त ४८% मतंच मिळाली असली तरी राज्यांना विभागून दिलेल्या मतांप्रमाणे तो प्रतिनिधीगृहाच्या निवडणुकीत (इलेक्टोरल कॉलेज) १८५ - १८४ अशा निसटत्या मताधिक्याने विजयी झाला. परिणामी उद्भवलेल्या वादावर तोडगा म्हणून हेजने दक्षिणेतल्या राज्यांत कृष्णवर्णीयांच्या संरक्षणासाठी तैनात केलेल्या सैन्याच्या तुकड्या मागे घेतल्या आणि डेमोक्रॅटिक पक्षाने हेजची अध्यक्ष म्हणून निवड मान्य केली.

केंद्र सरकारचे दुर्लक्ष, राज्यातील सरकारांचा छुपा किंवा उघड पाठिंबा, 'कु क्लक्स क्लॅन' सारख्या संघटनांची याच काळात झालेली स्थापना यांचा परिणाम म्हणून कृष्णवर्णीयांविरूद्धच्या हिंसाचाराला आता ऊत आला. अनेकदा तावडीत सापडलेल्या व्यक्तीची किंवा ठरवून लक्ष्य केलेल्या समूहाची निर्घृण पद्धतीने हत्या करून त्यांची प्रेतं इतरांना दहशत बसावी म्हणून सार्वजनिक जागी टांगली जात. 'लिंचिंग' म्हणून ओळखल्या जात असलेल्या या प्रकाराला अधिकृत आकडेवारीप्रमाणे सुमारे साडेतीन हजारांहून अधिक कृष्णवर्णीय बळी पडले. हा हिंसाचार केवळ गुलामगिरीतून मुक्त होऊनही, अजूनही गरिबीत खितपत असलेल्या तळागाळातल्या वर्गाविरुद्ध नव्हता. ओक्लाहोमा राज्यातल्या टल्सा शहरात नव्याने उदयाला आलेला सुशिक्षित आणि

व्यापारी कृष्णवर्गीय मध्यमवर्गही या रोषाचा धनी ठरला (पहा: टल्सा रेस रायट - http://en.wikipedia.org/wiki/Tulsa_race_riot)

हिंसाचाराव्यतिरिक्त रोजच्या जीवनात मिळणारी दुय्यम वागणूकही 'जिम क्रो' ह्या सदराखाली येणाऱ्या कायद्यांनी संमत झाली होती. कागदोपत्री मताधिकार असला तरी तो अनेक कायद्यांनी वापरता येणार नाही अशी व्यवस्था करणे, 'समान तरीही वेगळे' या गोंडस लेबलाखाली - रेल्वे स्थानकांतले प्रतीक्षागृह असो वा बसमधली आसनव्यवस्था - कृष्णवर्णीयांना अस्पृश्यांसारखी वागणूक देणे यासारख्या गोष्टींमुळे लक्षावधी कृष्णवर्णीयांनी उत्तरेची वाट धरली.

गुलामगिरी अस्तित्वात असतानाही 'अंडरग्राऊंड रेलरोड' नावाच्या छुप्या, भूमिगत मार्गांनी अनेक गुलामांनी उत्तरेचा, मुक्तीचा मार्ग आपला जीव धोक्यात घालून चोखाळला होता. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला अघोषित गुलामगिरीच्या जाचाला कंटाळून सुमारे साठ लाख कृष्णवर्णीय उत्तरेतल्या न्यू यॉर्क, फिलाडेल्फिया, शिकागो, पिट्सबर्ग, डेट्रॉईट यासारख्या औद्योगिक क्रांतीमुळे वेगाने वाढणाऱ्या शहरांकडे वळले. ('द वॉर्म्थ ऑफ द अदर सन्स' हे पुलित्झर पारितोषिकविजेते पुस्तक या संदर्भात वाचनीय आहे).

अमेरिकन राजकारणावर ह्या 'ग्रेट मायग्रेशन'चा दूरगामी परिणाम झाला. उत्तरेतली उदारमतवादी, औद्योगिक राज्ये आणि दक्षिणेतली कृषिप्रधान, अजूनही वंशश्रेष्ठत्वाच्या भावनेला कवटाळून बसलेली राज्ये यांच्यातली दरी अधिक रूंदावली. उत्तरेकडच्या राज्यांत स्थलांतर केलेल्या कृष्णवर्णीयांच्या पुढच्या पिढीने ह्या अन्यायाविरुद्ध संघटित होणे सुरू केले. आधी 'नायग्रा चळवळ' आणि मग NAACP अर्थात 'नॅशनल असोसिएशन फॉर द ॲडव्हान्समेंट ऑफ कलर्ड पीपल' या संघटनेचा पाया घालणारा डब्ल्यू. इ. बी. डू ब्वॉज हा याच पिढीतला. बुकर टी. वॉशिंग्टनच्या उदारमतवादी रिपब्लिकन पण काहीशा मवाळ मागण्या NAACP-ने अधिक आक्रमकपणे मांडणे सुरु केले. पहिले महायुद्ध, वाढते औद्योगिकीकरण, महिलांना मिळालेला मताधिकार अशा अनेक घटनांमुळे या चळवळीलाही प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या बळ येत गेले.

असं असलं तरी खऱ्या अर्थाने मोठे बदल घडून यायला विसाव्या शतकाचा उत्तरार्ध उजाडावा लागला. दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेकडून सुमारे पंधरा लाखांहून अधिक कृष्णवर्णीय सैनिक लढले. त्यांची कामगिरीचा दोस्तराष्ट्रांच्या विजयात मोठा हिस्सा होता. परिणामी दुसरे महायुद्ध संपल्यावर सैन्यातली कातडीच्या रंगावर आधारित निरनिराळ्या तुकड्या बनवण्याची पद्धत राष्ट्राध्यक्ष हॅरी ट्रुमन यांनी बंद केली.

दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर जगातला वंशविद्वेष रोखण्यासाठी युद्धात उतरलेल्या अमेरिकेच्या एका मोठ्या समाजघटकाला मिळणारी दुय्यम वागणूक अधिक प्रकर्षाने नजरेत भरू लागली. १९५१ साली कॅन्सस राज्यातल्या टोपेका शहरात, ऑलिव्हर ब्राऊन नावाच्या एका वेल्डरच्या दुकानात काम करणाऱ्या कृष्णवर्णीय व्यक्तीने आपल्या मुलीला रोज शाळेत जाण्यासाठी लांबचा प्रवास करण्यापेक्षा जवळच्या गौरवर्णीयांसाठी राखीव असलेल्या शाळेत प्रवेश मिळावा, म्हणून इतर पालक आणि NAACP यांच्या मदतीने कोर्टात याचिका दाखल केली. सुरुवातीला तिला यश मिळाले नसले तरी तीन वर्षांनी अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने ९-० अशा एकमताने गौरवर्णीय विद्यार्थ्यांना वेगळ्या शाळा आणि कृष्णवर्णीय विद्यार्थ्यांना वेगळ्या हा भेदाभेद चौदाव्या घटनादुरुस्तीच्या विरुद्ध असल्याचा निकाल दिला.

'ब्राऊन वि. बोर्ड ऑफ एज्युकेशन' या नावाने प्रसिद्ध असलेला हा निकाल क्रांतिकारक होता. अलाबामा राज्यातल्या माँटगोमेरी शहरात रोझा पार्क्स ह्या एका सर्वसामान्य महिलेने सार्वजनिक बसमध्ये आपली जागा सोडून कृष्णवर्णीयांसाठी राखीव अशा शेवटच्या रांगांत बसायला दिलेला ठाम नकार, अर्कान्सा राज्यातल्या लिटल रॉक शहरात चक्क सैन्याच्या मदतीने करावे लागलेले विद्यार्थ्यांचे एकत्रीकरण, अनेक विद्यार्थ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी सुरू केलेले बैठे सत्याग्रह, डॉ. मार्टिन ल्युथर किंगच्या नेतृत्वाखाली राजधानी वॉशिंग्टनमध्ये निघालेला प्रचंड मोर्चा यासारख्या घटनांची परिणती अखेर १९६४ साली 'सिव्हिल राईट्स ॲक्ट' पारित होण्यात झाली.

सार्वजनिक ठिकाणी कातडीचा रंग, वंश, धर्म, राष्ट्रीयता आणि लिंग यांच्यावर आधारित कुठल्याही स्वरुपाचा भेदभाव करणारे नियम व प्रथा याद्वारे बंद करण्यात आल्या. पुढच्याच वर्षी 'व्होटिंग राईट्स ॲक्ट'द्वारे अल्पसंख्याकांना मतदानात आडकाठी आणणारे नियम दूर करण्यात आले आणि भविष्यात असे वर्णभेदी नियम पुन्हा अंमलात येऊ नयेत म्हणून केंद्र सरकारच्या न्याय विभागाची मतदानाच्या हक्कांच्या

निकषांतील बदलावर देखरेख असेल, अशी तरतूद केली गेली.

हे सारे कायदे पास केले जात असताना डेमोक्रॅट लिंडन बी. जॉन्सन राष्ट्राध्यक्ष होते. १८६० सालच्या यादवी युद्धापासून डेमोक्रॅटिक पक्षाने कृष्णवर्णीयांना समान हक्क देण्याची मागणी करणाऱ्या लिंकनच्या उदारमतवादी रिपब्लिकन पार्टीला दक्षिणेतील राज्यांत फारसे पाय रोवायचा वाव दिला नव्हता. फ्रँकलिन रूझवेल्टने बांधलेल्या 'न्यू डील कोएलिशन' या विविध समाजघटकांच्या मोळीच्या मतांमुळे अध्यक्षपद आणि दक्षिणेतली बव्हंशी राज्य सरकारं (आयसेनहॉवरचा अपवाद वगळता) १९३० च्या दशकापासून डेमोक्रॅटिक पक्षाच्या ताब्यात होती.

मात्र कृष्णवर्णीयांना समान वागणूक देणारे कायदे पास केल्याचा तडाखा डेमोक्रॅट्सना दक्षिणेत बसणार हे भाकीत लिंडन जॉन्सनने 'सिव्हिल राईट्स ॲक्ट'वर सही केल्याक्षणीच केलं होतं, अशी एक दंतकथा आहे. ती खरी असो वा नसो, पण ते भाकीत प्रत्यक्षात उतरलं. १९६४ च्या निवडणुकीत जरी लिंडन जॉन्सन विक्रमी मताधिक्याने निवडून आला असला तरी दक्षिणेतल्या पाच राज्यांनी रिपब्लिकन पक्षाचा कडवा उमेदवार बॅरी गोल्डवॉटरच्या पारड्यात आपली मतं टाकली होती.

http://upload.wikimedia.org/wikipedia/commons/c/ce/ElectoralCollege1964.svg

त्यापुढच्या म्हणजे १९६८ सालच्या अध्यक्षीय निवडणुकीत रिचर्ड निक्सनने डेमोक्रॅटिक पक्षाचा दक्षिणेतला हा कमकुवत झालेला पाया ओळखून रिपब्लिकन पक्षाची नवीन 'सदर्न स्ट्रॅटेजी' अधिक लोकप्रिय केली. यादवी युद्धापासून समानतेसाठी लढा देणारा अब्राहम लिंकनचा रिपब्लिकन पक्ष आता कृष्णवर्णीयांना समान हक्क मिळाल्यामुळे दुखावल्या गेलेल्या दक्षिणेतील गौरवर्णीयांचा तारणहार बनला. ही निवडणूक अमेरिकन राजकारणात 'रि-अलायनिंग इलेक्शन' म्हणून ओळखली जाते. १९६८ ते १९९२ या चोवीस वर्षांपैकी वीस वर्षे अध्यक्षपद रिपब्लिकन पक्षाच्या ताब्यात राहिलं, त्यातलं एक प्रमुख कारण ही 'सदर्न स्ट्रॅटेजी' होय. ती इतकी यशस्वी ठरली की ओबामाच्या निवडणुकीपर्यंत डेमोक्रॅटिक पक्षाचा उत्तरेतला एकही उमेदवार अध्यक्षपदाची निवडणूक जिंकू शकला नाही. (जिमी कार्टर आणि बिल क्लिंटन हे या कालावधीतले दोन्ही यशस्वी उमेदवार अनुक्रमे जॉर्जिया आणि अर्कान्सा या दक्षिणेतल्या राज्यांतले होते).

हे धोरण यशस्वी होण्यासाठी दक्षिणेतील गौरवर्णीयांच्या भावनांना सांकेतिक शब्दांत हात घालणे आवश्यक होते. रिचर्ड निक्सनने सुरु केलेली ही पद्धत ली ॲटवॉटर ह्या रिपब्लिकन राजकीय सल्लागाराने वेगळ्याच पातळीवर नेली. अमेरिकन राजकारणात अध्यक्षीय निवडणुकीपूर्वी पक्षाचा अधिकृत उमेदवार निवडण्यासाठी ज्या पक्षांतर्गत निवडणुका दर राज्यात टप्प्याटप्प्याने घेतल्या जातात, त्यांना प्रायमरीज म्हटलं जातं. आयोवा, न्यू हॅम्पशायर आणि साऊथ कॅरोलायना या राज्यांतल्या प्रायमरी निवडणुका सर्वात प्रथम होत असल्याने त्यांना अधिक महत्त्व आहे. १९८० साली रिपब्लिकन पक्षाच्या साऊथ कॅरोलायना राज्याच्या प्रायमरीत रोनाल्ड रेगनला मदत करण्यासाठी ली ॲटवॉटरने प्रतिस्पर्धी उमेदवार जॉन कॉनली हा कृष्णवर्णीयांची मते विकत घेण्याच्या प्रयत्नात आहे, अशी खोटी अफवा पसरवली आणि तुलनेने उदारमतवादी, कॅलिफोर्निया राज्यातल्या रेगन साऊथ कॅरोलायना आणि दक्षिणेतील इतर राज्यांतल्या प्रायमरीज जिंकून देण्यात मोठा हातभार लावला. (२००० साली अशाच स्वरूपाच्या अफवांनी जॉन मकेनचे जॉर्ज बुशच्या विरोधातले आव्हान साऊथ कॅरोलायनाच्या प्रायमरीत संपुष्टात आणले).

रिपब्लिकन पक्षाच्या उमेदवारीची निवडणूक जिंकल्यावर रेगनने अध्यक्षीय निवडणुकीचा प्रचार सुरु केला तोच मुळी मिसिसिपी राज्यातल्या फिलाडेल्फिया या शहरात. या शहरात १९६४ साली समान नागरी हक्कांसाठी झगडणाऱ्या तीन कार्यकर्त्यांची निर्घृण हत्या करण्यात आली होती. त्याच शहरात जाऊन 'राज्यांच्या हक्कांविषयी' भाषण देणे हा दक्षिणेतल्या वर्णवर्चस्ववादी गौरवर्णीयांना दिलेली सांकेतिक हाक होती. (अर्थात ढासळती अर्थव्यवस्था, इराणमधल्या वकीलातीला पडलेला वेढा आणि ओलीस धरले गेलेले अमेरिकन कर्मचारी यासारख्या कारणांमुळे डेमोक्रॅटिक पक्षाचा अध्यक्ष जिमी कार्टरची गच्छंती जवळपास नक्की होतीच) रेगन निवडून आल्यानंतर पुढच्याच वर्षी एका मुलाखतीत ली ॲटवॉटरने आपले आर्थिक धोरण आणि राज्यांचे हक्क यांनी शर्करावगुंठित केलेले 'सांकेतिक वर्णभेदाचे' धोरण उलगडून सांगितले -
http://en.wikiquote.org/wiki/Lee_Atwater

रेगनच्या कार्यकालात उपराष्ट्राध्यक्ष असलेल्या जॉर्ज एच. डब्ल्यू. बुशला १९८८ सालची अध्यक्षीय निवडणूक इराण-कॉन्ट्रा प्रकरणामुळे जड जाईल, अशी चिन्हं दिसत असताना ली ॲटवॉटरने पुन्हा एकदा छुप्या वर्णभेदाचे हत्यार उपसले. 'वीकेंड फर्लो' अर्थात सप्ताहांताला तरी गुन्हेगारांना आपल्या मित्रांना वा कुटुंबियांना भेटता यावे म्हणून मोकळे सोडण्याचा वादग्रस्त प्रकार रेगन कॅलिफोर्नियाचा गव्हर्नर असतानाही अंमलात आणला गेला होता आणि मॅसॅच्युसेट्स राज्यात गौरवर्णीय आणि कृष्णवर्णीय अशा दोन्ही वर्णाच्या गुन्हेगारांनी त्याचा गैरफायदा घेतला होता. मात्र 'विली हॉर्टन' आणि 'रिव्हॉल्व्हिंग डोअर' सारख्या जाहिरातींतून केवळ एका कृष्णवर्णीय गुन्हेगाराचा चेहरा ठसवून पुन्हा एकदा सांकेतिक वर्णभेदाच्या परिणामकारकतेची प्रचीती ॲटवॉटरने आणून दिली.

नव्वदच्या दशकापासून मात्र ह्या धोरणाची उपयुक्तता कमी होऊ लागली. मध्यममार्गी धोरणे आणि स्थानिक (अर्कान्सा राज्य) असल्याचा फायदा, याचा परिणाम म्हणून १९९२ च्या निवडणुकीत डेमोक्रॅट बिल क्लिंटन ल्युसियाना, अर्कान्सा, जॉर्जिया, केंटकी यासारखी दक्षिणेतली राज्यं जिंकू शकला. ली ॲटवॉटरच्या अकाली निधनानंतर जॉर्ज एच. डब्ल्यू. बुशच्या प्रचारासाठी पॅट बुकॅनने कुप्रसिद्ध 'कल्चर वॉर'ची घोषणा केली खरी; पण कॅलिफोर्निया आणि न्यू इंग्लंडमधल्या रिपब्लिकन पक्षाच्या सुशिक्षित, उदारमतवादी आणि आर्थिक धोरणांवर मत देणाऱ्या मतदारवर्गाच्या ती पचनी पडली नाही. ऐशीच्या दशकातल्या तिन्ही निवडणुकांत रिपब्लिकन पक्षाला मत देणारी ही राज्यं १९९२ च्या निवडणुकीपासून परवाच्या २०१२ च्या अध्यक्षीय निवडणुकीपर्यंत डेमोक्रॅटिक पक्षाचे बालेकिल्ले बनली आहेत. (रिपब्लिकन पक्षांतर्गत निवडणुकीतही कडव्या, उजव्या विचारसरणीच्या उमेदवारांपेक्षा जॉर्ज बुश, जॉन मकेन आणि मिट रॉमनी यांच्यासारख्या तुलनेने मध्यममार्गी उमेदवारांची निवड होते आहे).

याचा परिणाम म्हणजे गेल्या वीस वर्षांतील सहा अध्यक्षीय निवडणुकांत रिपब्लिकन पक्षाला फक्त एकदाच ५० टक्क्यांहून अधिक मतं (२००४ - जॉर्ज बुश ज्यु. - ५०.७%!!) मिळाली आहेत. बदलत्या समाजरचनेचा परिणाम २०१२ च्या निवडणुकीतही दिसून आला. आर्थिक आघाडीवर फारशी नेत्रदीपक कामगिरी न करताही डेमोक्रॅटिक पक्षाला अध्यक्षपद आणि सिनेटमधले बहुमत राखण्यात यश मिळाले. ओबामाच्या जन्मदाखल्याबद्दल उपस्थित केले गेलेले प्रश्न; कॉलिन पॉवेलही कृष्णवर्णीय असल्यामुळे त्याने ओबामाला पाठिंबा दिला असा रॉमनीचा सल्लागार जॉन सुनुनु याने केलेला दावा; उमेदवार रिक सँटोरमने कृष्णवर्णीयांबद्दल केलेले विधान (आणि त्यानंतरचे ब्लॅक पीपल ते ब्लाह् पीपल हे विनोदी घूमजाव); सहा वर्षांपूर्वी वर्जिनियात सिनेटच्या निवडणुकीत उमेदवार जॉर्ज ॲलनने एका भारतीय वंशाच्या कॅमेरामनला 'मकाका' (http://www.youtube.com/watch?v=r90z0PMnKwI) म्हणून संबोधणे; ट्विटरवरचा #votewhite असा हॅशटॅग; अल्पसंख्याक मतदारांना मत देणे कठीण व्हावे यासाठी केले जाणारे नियमांत बदल यासारखे छुपे आणि उघड प्रयत्न अजूनही होत आहेत. मात्र अ-श्वेतवर्णीय मतदारांचे वाढते प्रमाण आणि एकंदरीतच समाजाची वाढलेली स्वीकारार्हता, यामुळे अलीकडच्या काही वर्षांत तरी ते बव्हंशी अयशस्वी ठरले आहेत. यातून वर्णभेद नाहीसा झाला असा निष्कर्ष काढणं चुकीचं ठरेल; मात्र त्याचं प्रमाण आणि परिणाम कमी झाल्याची सुचिन्हं मात्र नक्कीच दिसत आहेत.

# सोकाजीनानांची चावडी

**सोत्री**

नमस्कार मंडळी, मी सोकाजीनाना, चावडीवरचा. सर्वप्रथम तुम्हा सर्वांना मनापासून दिवाळीच्या हार्दिक आणि अनेकोत्तम शुभेच्छा! दिवाळी साजरी करा पण 'गो ग्रीन' हा मंत्र विसरू नका.

त्याचे काय झाले आहे की चावडीवरची सर्व मंडळी दिवाळीच्या सुट्टीमुळे इकडे-तिकडे भटकायला गेलेली आहेत. त्यामुळे ह्या दिवाळीला विचारांचे आणि गप्पांचे फटाके काही चावडीवर फुटणार नाहीत. पण त्यामुळे चावडी सुनी सुनी वाटते आहे ना? प्रश्न मोठा गहन आहे, ऐन दिवाळीमध्ये चावडी सुनी सुनी? मलाही ह्या प्रश्नाची उकल होत नव्हती. पण ह्या गहन समस्येवर उपाय शोधला पूजा पवार. ने, हो! हो! तीच ती, सोकाजीनानांच्या चहाची चाहतं असलेली.

ऑं? ह्या सोकाजीनानाला पूजा पवार. कशी काय बुवा माहिती? असा प्रश्न पडला ना तुम्हाला, साहजिकच आहे हो! हा सोकाजीनानाही 'हिरवा' आहे का काय? असाही प्रश्न काहीजणांना पडणे साहजिकच आहे. पण तसे काही नाही. (पण ह्याचा अर्थ असा नाही की 'पिकल्या पानाचा देठ की हो हिरवा' हे गाणे मला माहिती नाही) आमच्या चावडीवरच्या गप्पा जश्या तुमच्या सोत्रिने तुमच्यापुढे आणल्या तशा इथे, मिपावर, झडणाऱ्या चर्चाही तो आम्हाला कळवतो. त्यात असे कळले की पूजाची अशी इच्छा होती की दिवाळीला काहीतरी धमाल गप्पा चावडीवर याव्यात. पण दिवाळीच्या सुट्टीमुळे ते काही शक्य नव्हते. पण तेवढ्यात अभिजीत_मी_नाही यांनी आम्हा सर्वांना तुमच्या पुढे चक्क दृश्य स्वरूपातच आणण्याचा विडा उचलला. त्यासाठी पूजा आणि अभिजीत_मी_नाही, या दोघांच्या खूपच श्रम घेतले, त्या दोघांच्या निखळ प्रयत्नांमुळे ह्या दिवाळीला चावडी सुनी सुनी का? ह्या प्रश्नाची समस्या निकाली निघून व आम्हा सर्वांना चित्रमय अस्तित्व मिळून तुमच्या पुढे येण्याची संधी प्राप्त झाली. त्याबद्दल पूजा पवार. आणि अभिजित_मी_नाही यांचे शतशः आभार.चला तर मग आता तुम्हाला मी सर्वांची ओळख करून देतो.

**घारूअण्णा**



हे आमचे घारूअण्णा, ह्यांचे बालपण गेले रत्नागिरीच्या मधल्या आळीत, तरुणपण गेले चिपळूणमध्ये आणि आता सध्या उतारवयात पुण्यात स्थायिक झाले आहेत.

रत्नागिरीच्या मधल्या आळीत ह्यांची सगळी हयात न गेल्यामुळे आणि पुण्यातही सदाशिव पेठेत न राहिल्यामुळे, त्यांचे बोलणे जरी तिरकस असले तरीही त्या तिरकस बोलण्याला धार नसते.

ह्यापलीकडे सरकारी नोकरीतून निवृत्त झाले असल्याने चावडीवर हजेरी लावून उरलेल्या वेळेत वहिनींना मंडईत घेऊन जाणे, संध्यानंद वाचणे, देवळात जाणे यात त्यांचा सारा वेळ जातो. या घारूअण्णांचा देवावर भयंकर विश्वास! अत्यंत धार्मिक आणि सनातनी.

बरेचसे अंधश्रद्धाळूही, भुजबळकाका आणि यांचे खटके उडण्याचे हे ही एक कारण.

## भुजबळकाका



हे आमचे भुजबळकाका, यांना त्यांच्या पुरोगामी विचारांमुळे चावडीवर बहुजनहृदयसम्राट हे नाव मीच दिले आहे. तसेही यांची पुण्या-मुंबईकडच्या अभिजनांच्या मताशी नेहमीच असहमती असते, पण त्यांचे विचार सर्वसमावेशक असतात.

भुजबळकाका सध्या लष्करातून निवृत्त होऊन आता एका खाजगी कंपनीत चीफ सुरक्षा अधिकारी (CSO) म्हणून काम करत आहेत.

सारी हयात लष्करात गेल्याने शिस्तीचे प्रचंड भोक्ते. कुठलाही उथळपणा यांना चालत नाही अगदी विचारांमधलाही. बालपण अती दुर्गम भागातल्या खेड्यात गेल्यामुळे, परिस्थितीचे बरेच टक्के टोणपे खाल्ल्यामुळे आणि चटके सोसल्यामुळे, विचारांमध्ये एका प्रकारची सर्वसमावेशकता आणि ठामपणा असतो यांच्या.

## शामराव बारामतीकर




हे आमचे शामराव बारामतीकर, मूळचे बारामतीचे पण नोकरीनिमित्त पुण्यात वास्तव्य. दर महिन्याला बारामतीला जाऊन शेतीचे कमीजास्त बघणे आणि गावाकडच्या नातेवाइकांची ख्यालीखुशाली विचारणे हा नेम कधी चुकत नाही.

आता बारामतीचेच असल्याने त्यांची 'साहेबांच्या' प्रती असलेली निष्ठा पदोपदी जाणवते. वैयक्तिक आयुष्यातही त्यांच्या कुटुंबावर 'साहेबांचे' बरेच उपकार आहेत असे त्यांनी मला खाजगीत बऱ्याचदा सांगितले आहे.

त्यामुळे राजकारणात साहेबांची बाजू लावून धरणे हे त्यांच्यासाठी क्रमप्राप्त असते. पण त्यांचा 'टग्या'दादांवर अतिशय राग आहे, त्या 'टग्या'दादांमुळे 'साहेबांची' प्रतिष्ठा कमी होते असे त्यांचे मत आहे. पण सुप्रियाताईंबद्दल त्यांना का कोण जाणे त्यांना खूप जिव्हाळा आहे.


| नारुतात्या | |
|---|---|
|  | हे आमचे नारुतात्या, कोणाच्याही न अध्यात न मध्यात. यांना सर्वांचेच म्हणणे पटते. थोडक्यात काय तर यांचा नेहमी 'बेंबट्या' होत असतो.<br><br>साधे सरळ व्यक्तिमत्त्व. यांची सोकाजीनानांवर अपार श्रद्धा. सोकाजीनाना जे म्हणतील ते करण्यास नेहमी तत्पर.<br><br>सरकारी नोकरीची शिल्लक राहिलेली काही वर्षे, प्रमोशनचे स्वप्न बघत घालवत आहेत कशीबशी. पण स्वभावाने अगदीच भिडस्त असल्याने साहेबांचे आणि त्यांचे मतभेद होत नाहीत. |

| चिंतोपंत | |
|---|---|
|  | हे आमचे चिंतोपंत, संघाच्या, ब्राह्मणी हिंदुत्वाच्या, मुशीत सारे बालपण आणि तारुण्य नागपुरात पोसले गेलेले आणि नोकरीच्या निमित्ताने पुण्यात येऊन स्थायिक झालेले.<br><br>ह्यांचे बरेचसे नातेवाईक आणि मुले परदेशात स्थायिक झालेली आहेत. पण ह्यांना परदेशात राहणे आवडत नसल्याने सध्या निवृत्त होऊन एका पेन्शनराचे आयुष्य मायदेशातच व्यतीत करत आहेत.<br><br>ह्यांचे मूळ कोंकणातले असल्याने यांचे आणि घारूअण्णांचे सूत व्यवस्थित जमते. |

| सोत्रि | |
|---|---|
|  | हे तुमचे-आमचे सोत्रि, यांनीच आम्हाला तुमच्यापर्यंत पोहोचवले. त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.<br><br>आता यांच्याबद्दल मी काय सांगणार तुम्हाला? तुम्हाला तर सगळे माहिती आहेच. |

अहो थांबा, सोकाजीनाना थांबा जरा! तुम्ही सर्वांची ओळख करून दिलीत, सर्वांबद्दल सर्व काही सांगितलेत खरें, पण तुमच्याबद्दल कोण सांगणार? बरं, मीच सांगतो.

## सोकाजीनाना



तर मंडळी, हे सोकाजीनाना, कमावत्या वयात, कमावलेला पैसा व्यवस्थित डोके लावून गुंतवला असल्याने आता व्ही. आर. एस. घेऊन स्वच्छंद आयुष्य जगत आहेत. कामानिमित्ताने संपूर्ण जग पालथे घातले असल्याने जाणीवा प्रगल्भ होऊन अनुभवाचे विश्व व्यापक झालेले चावडीवरचे अत्यंत आदरणीय व्यक्तिमत्त्व. ह्यांचा शब्द अंतिम आणि प्रमाण मानला जातो चावडीवर.

अनुभवसिद्ध असल्याने कुठल्याही विषयावर बोलण्याची हातोटी आहे यांची. एखाद्या विषयाबद्दल माहिती नसेल तर त्या विषयाचा अभ्यास करून त्या विषयातली शास्त्रशुद्ध माहिती मिळवण्याचा ह्यांचा ध्यास विलक्षण आहे. त्यामुळे माहिती नसली तर गप्पा राहून चिंतन करणे आणि अभ्यास करून माहिती मिळाल्यावर, आपल्या विचाराची बैठक भक्कम करूनच मग हे त्यांची मते चावडीवर मांडतात. त्यामुळे त्यांना चावडीवर फार मान आहे.

मंडळी आता ओळख तर झाली आहेच, तीही चक्क सचित्र. मग आता येत रहा चावडीवर नेहमी आठवणीने. काय आहे गप्पा मारायला आम्हाला आवडतेच पण आपल्या गप्पा कोणीतरी ऐकते, ऐकून त्यावर चर्चा होते हे खूपच सुखावह असते हो! चला आता मी आपली रजा घेतो. काय आहे, चहाची वेळ झाली आमच्या आणि आज ऑर्डर द्यायला कोणीही नाही त्यामुळे चहा प्यायला घरीच जावे लागेल. एक छानसा गजरा घेतो सौ.साठी, तेवढाच जरा मसाला चहा मिळेल हो, काय?
सोकाजीनाना मंद हसत.




सर्व मिसळपावचे सदस्य,

वाचक, हितचिंतकांना

हि दिपावली आनंदाची, सुखाची

आणि समाधानाची जावो

तिन्ही लोक आनंदाने भरुन गाऊ दे, तुझे गीत गाण्यासाठी मिसळ खाऊ दे